तुर्कांचें साम्राज्य

वासुदेव कृष्ण भावे.

तुर्कस्थानचा स्वातंत्र्यदीप



मुस्तफा केमालपाशा

तुर्कांचें साम्राज्य

लेखक
वासुदेव कृष्ण भावे, बी. ए.
सहसंपादक, केसरी

मुद्रक व प्रकाशक
शंकर रामचंद्र दाते, बी. ए. लोकसंग्रह छापखाना
२७ बुधवार पेठ, पुणें.

आवृत्ति १ ली

किंमत २ रुपये

अर्पणपत्रिका

मीं सुखाचे दिवस पहावे म्हणून जिनें मजकारितां
आपल्या आयुष्यांतील शेवटचा काळ समाधान-
पूर्वक दुःखांत घालविला व त्यांतच जिचा
अंत झाला त्या माझ्या वत्सल
व पूज्य मातुश्रीच्या स्वर्गस्थ
आत्म्यास ही कृति
प्रणामपूर्वक
अर्पण करीत
आहें.

अनुक्रमणिका.

खंड १ ला (राजकीय)

खंड २ रा.--(धार्मिक, सामाजिक, आर्थिक)

खंड १ ला

राजकीय

प्रस्तावना.

इंग्रजी भाषेच्या साहाय्यानें मराठी वाङ्मयास अनेक अपूर्व लाभ झाले आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्याबरोबरच इंग्रज लोकांस ज्या विषयाचें महत्त्व अधिक पण हिंदुस्थानास कमी अशाहि विषयांचा जुलूम थोडचाबहुत अंशांनीं मराठीस सोसावा लागला आहे. आज साऱ्या जगाची राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक सूत्रें युरोपखंडांतून हालत आहेत हें खरें; आणि तिकडील राज्यपद्धतीच्या धर्तीवरच आशिया खंडांतील हिंदुस्थान आदिकरून देशांत कालान्तरानें राज्यपद्धति अमलांत येणार हेंहि खरें; तथापि एवढ्यासाठीं सर्व प्रकारच्या युरोपियन हालचालींनें मराठी वाङ्मय गजबजून सोडावें आणि भूगोलदृष्ट्या निकटवर्ति अशा आशिया खंडांतील अफगाणिस्तान, इराण, अरबस्तान या मुसलमानी देशांचा व तिबेट, चीन व जपान या बौद्ध देशांचा इतिहास आम्हांस अवगत असूं नये आणि असलाच तर तो फारच तुटपुंजा असावा हें मोठेंच वैगुण्य होय. या वैगुण्याचा सर्वच दोष वाङ्मय सेवकांकडे येतो असें नाहीं. जीं राष्ट्रें जागृत आहेत त्यांच्यांतच हालचाली सुरू असावयाच्या आणि त्या ऐकूं आल्या म्हणजे त्यांजकडे लक्ष लागावयाचेंच. आशिया खंडांतील सर्वच राष्ट्रें एकदंडी अंथरुणें पसरून निजलेलीं. त्यांची वास्तपुस्त इंग्रज आदिकरून युरोपियन ग्रंथकारांनीं विशेषशी न घेतली तर त्यांस दोषी समजतां येणार नाहीं. युरोपियन ग्रंथकारांच्या दृष्टीनें सदरील राष्ट्रांचें महत्त्व कमी असलें तरी हिंदुस्थानची गोष्ट तशी नाहीं. युरोपियन राष्ट्रांची नजर हिंदुस्थानाकडे फिरण्यापूर्वी कित्येक शतकें हिंदुस्थानचे सर्व प्रकारचे व्यापार सभोंवतालच्या मुसलमानी व बौद्ध देशांशीं चालू होते. आर्यांनीं आपला धर्म तिबेट, चीन, जपान या बौद्ध देशांस शिकविला आणि अफगाणिस्थान इराण व अरबस्थान येथील धाडसी, धर्मवेड्या व क्रूर मुसलमानांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून आणि हिंदू लोकांवर अनेक शतकें आपलें राजकीय प्रभुत्व गाजवून या देशाची राजकीय, धार्मिक व सामाजिक घडी विस्क-

टून टाकून त्याची प्रगति खुंटविली. युरोपियन राष्ट्रांचें प्रभुत्व आज जगतावर आहे आणि त्यामुळें इस्लामी व बौद्ध देशांचा हिंदुस्थानाशीं व्यवहार बहुधा बंदच पडला आहे. परंतु ही अस्वाभाविक स्थिति निरंतर टिकूं शकणार नाहीं. इंग्रजांचा हिंदुस्थानावरील अंमल कालान्तरानें ढिला पडला किंबहुना संपला म्हणजे इस्लामी व बौद्ध देशांचे प्रवाह हिंदुस्थानांत मोकळ्या अंगानें वाहूं लागून हिंदुस्थानच्या परिस्थितींत निराळेच रंग दृष्टीस पडतील.

हा संभव इंग्रजी अमलाच्या ढिलाईच्या काळांत वाढेल; पण आजहि तुर्कस्थान हा प्रमुख मुसलमानी देश जागृत व स्वतंत्र झाला असल्याकारणानें हिंदुस्थानांतील हिंदू व मुसलमान यांच्या परस्परसंबंधास जोराचे आघात वरचेवर बसूं लागले आहेत. इतके जोरदार आघात अद्याप तिबेट, चीन व जपान या बौद्ध देशांचेहि बसले नाहींत. जपान देश सुदृढ होऊन सुमारें पंचवीस वर्षें झालीं आणि रूसो-जपानी युद्धांतील विजयानंतर त्यानें प्रमुख युरोपियन राष्ट्रांच्या बरोबरीचें स्थान पटकावलें; पण त्या योगानें हिंदुस्थानच्या अभ्यंतरांत जो हेलकावा बसला, त्यापेक्षां सहस्रपटींनीं अधिक मोठा हेलकावा खिलाफत चळवळीनें व मुस्तफा केमालपाशाच्या पराक्रमानें बसला आहे व त्याचें कारणहि उघडच आहे. हिंदुस्थानच्या बत्तीस कोटी वस्तीपैकीं सात कोटी मुसलमान आहेत व त्यांस हिंदुस्थानाबाहेरील पराक्रमी व स्वतंत्र अशा तुर्की धर्मबंधूंचा स्वाभाविकच अभिमान वाटतो. हिंदी मुसलमानांस आजच्या घटकेस तरी हिंदू बंधूंपेक्षां देशाभिमानामुळें परकीय पण धर्माभिमानामुळें स्वकीय असे तुर्क मुसलमान जवळचे वाटतात. या धर्माभिमानापुढें त्यांचा देशाभिमान इतका लुला पडला आहे कीं, खिलाफतीच्या चळवळींत हिंदूंशीं एकदिल झालेले मुसलमान हिंदूंबरोबर लढत रहाणें हें आपलें आद्य कर्तव्य समजत आहेत. इतकेंच नव्हे, तर मराठ्यांच्या उदयापूर्वी जसा मुसलमानांचा अंमल हिंदुस्थानावर होता तसा शक्य तर कधीं काळीं परदेशस्थ मुसलमानांच्या मदतीनें फिरूनहि बसविण्याची येथील कित्येक मुसलमान पुढाऱ्यांची मनीषा दिसते. तुर्कस्थान हा एकच मुसलमान देश स्वतंत्र व सुधारलेला झाला नाहीं, तोंच हिंदुस्थानचें अभ्यन्तर इतकें ढवळून गेलें आहे, तर तुर्कस्थानाप्रमाणेंच मोरोक्को, ईजिप्त, अरबस्तान हे युरोपियनांच्या ताब्यांतील

आणि अफगाणिस्तान, इराण, हे अमीर—शाहांच्या अखत्यारींतील मुसलमानी देश स्वतंत्र झाले व सुधारले तर त्यांचा हिंदुस्थानच्या परिस्थितीवर केवढा विलक्षण परिणाम घडेल याची कल्पना करणें आज तरी कठीण आहे.

वरील दृष्टीनें विचार केल्यास हिंदुस्थानास सर्व मुसलमानी देशांची इत्थंभूत माहिती असणें कसें आगत्याचें आहे याविषयीं कोणाचीहि खात्री होईल. त्या सर्व मुसलमानी देशांत तुर्कस्थानास आज अग्रस्थान मिळालें आहे व तें वाजवीहि आहे. लोकशाही पद्धतीवर स्वराज्य संपादणारा तुर्कस्थान हा एकच मुसलमानी देश साऱ्या आशिया खंडांतच काय पण जगतांत आहे आणि धर्मगुरुत्वाचा मान इस्तंबूलच्या माजी सुलतानाकडे असल्या-मुळें त्यास सर्व महंमदी राष्ट्रांत पहिल्या प्रतीचा मान मिळत आहे. खिला-फत चळवळींत प्रस्तुत लेखकाचें लक्ष या विषयाकडे लागलें आणि वर्त-मानपत्रांत संपादकीय व्यवसाय करीत असतां तुर्की प्रश्नाचा विचार अधिक करावा लागला. वर्तमानपत्रांचा व्यवसाय अनेक विषयांची गोडी लाव-ण्यास कारणीभूत होतो. आणि योग्य ती फुरसत, साधनसामुग्री व आवड यांची सांगड जमल्यास त्यांतील एखाद्या विषयाच्या उगमाशीं जाणें साधतें. तशा तऱ्हेचा दुर्मिळ योग प्रस्तुत लेखकास जुळून आला आणि त्यानें शक्य तीं साधनें हस्तगत करून या विषयावर दोन वर्षांपूर्वी ‘केसरीं’त ‘ तुर्कांचा अस्तोदय ’ या मथळ्याखालीं एक लेखमाला प्रसिद्ध केली व ती केसरीच्या गुणग्राही वाचकांस इतकी आवडली कीं, त्यांपैकीं शेंकडों वाचकांकडून सदरील लेखमाला पुस्तकरूपानें छापण्याचें आग्रहपूर्वक सुचविण्यांत आलें. या प्रेमळ सूचनांनीं लेखकास समाधान वाटलें तरी पुस्तकप्रकाशनाची खर्चाची बाब तितकी सोपी नव्हती. तथापि माझे मित्र व लोकसंग्रह छापखान्याचे मालक रा. शंकर रामचंद्र दाते, बी. ए., यांनीं हें जोखमीचें व धाडसाचें काम आनंदानें शिरावर घेण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें तें पार पाडलें याबद्दल त्यांचे जितके आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

‘ तुर्कांचा अस्तोदय ’ ही लेखमाला म्हणजे तुर्कस्थानच्या इति-हासांतील कांहीं निवडक प्रसंगांचे केवळ चुटके होते. तो समग्र इतिहास

नव्हता आणि महायुद्धानंतरची तुर्कस्थानची हकीकतहि त्यांत गोंवलेली नव्हती. या दृष्टीनें तुर्की साम्राज्याचा इतिहास लिहिण्याचें जेव्हां मीं योजलें तेव्हां लेखमालेसाठीं जुळविलेली सामुग्री अपुरी ठरली व लेखहि जसेच्या तसे उपयोगांत आणणें अशक्य वाटलें. प्रस्तुत इतिहासग्रंथांत सदर लेखमाला अंबुधींत जलबिंदुवत्‌च होय असेंच वाचकांच्या लक्षांत आल्या-वांचून रहाणार नाहीं. 'तुर्कांचें साम्राज्य' या नांवावरून प्रस्तुन पुस्तकांत तुर्कांचा केवळ राजकीय इतिहास गोंवला आहे अशी सामान्यतः समजूत होईल. परंतु या बाबतींत प्रस्तुत लेखकानें इतिहासाची कक्षा बरीचशी विस्तृत करून घेतली आहे. तुर्की साम्राज्याचें महत्त्व जसें राजकीय तसेंच धार्मिक दृष्ट्याहि असल्यानें नुसत्या राजकीय खंडावरच न भागवितां महंमद पैगंबराचें चरित्र, मुसलमानी धर्मतत्त्वें, खिलाफतीची प्रस्थापना व विस्तार यांचाहि प्रस्तुत ग्रंथांत समावेश करणें त्यांस श्रेयस्कर वाटलें. त्याचप्रमाणें एखाद्या राष्ट्राची यथायोग्य कल्पना येण्यास त्यांतील समाज-रचना, देशस्थिति, चालीरिती, वाङ्मयवृद्धि यांचें थोडें बहुत ज्ञान झालें तर इष्टच असल्याकारणानें या अंगांची जोड मूळ विषयास जरूर तेवढी दिलेली आहे. सारांश, तुर्कासंबंधीं हें एकच पुस्तक कोणीं वाचलें तर त्याला आजतागायत तुर्कस्थानचा सविस्तर इतिहास समजून एकंदरींत महंमदी समाजाचें अभ्यंतर आकलण्यास अडचण पडूं नये अशा धोरणावर ग्रंथ-रचना केलेली आहे.

हिंदुस्थानच्या इतिहासाशीं तुर्कस्थानचा संबंध बराच दूरचा असला तरी तुर्क जातीचा संबंध फार निकटचा आहे हें इतिहासज्ञांस विदितच आहे. गिझनीचा राजा सबक्तगीन व त्याचा मुलगा सुलतान महंमद हे जातीनें तुर्क होते. दिल्लीच्या तक्तावर बसून हिंदुस्थानावर अंमल गाजविणारे गुलाम, खिल्जी आणि तघलख हे राजे तुर्कच होते. तथापि हे तुर्क खोरासन म्हणजे मध्य आशियांतील होत. पण खुद्द इस्तंबूलच्या राजवंशाचा राजकीय संबंध प्रत्यक्ष महाराष्ट्राशीं आलेला आहे, हें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटल्यावांचून रहाणार नाहीं. विजापूरच्या आदिल-

शाही घराण्याचा संस्थापक युसफ आदिलखान हा कॉन्स्टांटिनोपलचा सुलतान बेयिझिद याचा पुत्र होय. त्यांची हकीकत येणेंप्रमाणें:—

[1]तुर्कस्थानचा सुलतान दुसरा मुराद सन १४५१ सालीं निवर्तला आणि त्याचा जेष्ठ पुत्र महमद गादीवर बसला. मुरादाच्या कारकिर्दींत मुरादाचा एक भाऊ व बेयिझिदचा मुलगा मुस्तफा तैमूरलंगाशीं लढत असतां पडला. त्याचा तोतया उत्पन्न होऊन व त्यानें बंड करून राज्यांत बखेडा माजविला होता; त्याची आठवण ताजी असलेल्या मंत्र्यांच्या सल्लयावरून महंमदानें आपल्या कनिष्ठ भावास ठार मारून त्याचें प्रेत प्रसिद्धपणें सर्वांस दाखवावें असा हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें मारेकरी युसफच्या मातुश्रीकडे गेले व त्यास स्वाधीन करण्याविषयीं त्यांनीं तिजपाशीं विनंति केली. आपल्या अर्भकास जीवदान द्यावें म्हणून राणीनें त्यांस पुष्कळ विनविलें.परंतु'राज्यास त्याजपासून भीति असेल तर त्याचा वध आणखी एक दिवस करूं नये, म्हणजे तितक्या अवसरांत मी विवेकानें दुःख सहन होण्याइतकें मन धट्ट करीन'असें तिनें शेवटीं सांगितलें. या गोष्टीस प्रधानानें रुकार दिला व राणीनेंहि त्या अल्पावकाशांत आपल्या मुलाचा जीव वाचविण्याची युक्ति योजिली.

खवाजा इमादउद्दीन नांवाचा एक इराणी व्यापारी इराणांतून माल आणून इस्तंबुलांत विकीत असे. त्यास बोलावून आणून राणीनें कांहीं गुलाम विकावयाचे आहेत काय म्हणून त्याजपाशीं चौकशी केली. तेव्हां त्यानें त्याजपाशीं असलेले पांच गुलाम राणीपुढें हजर केले. त्यांपैकीं एकाचा तोंडावळा राजपुत्र युसफ याजसारखा होता. त्यास राणीनें विकत घेऊन आपला पुत्र युसफ यास त्या व्यापाऱ्याच्या स्वाधीन केलें व त्यास पुष्कळ द्रव्य देऊन राजपुत्रास दूरदेशीं सुरक्षित स्थळीं घेऊन जाण्यास सांगितलें. खवाजा द्रव्यलोभानें राजपुत्रासह त्याच रात्रीं निघून गेला.इकडे दुसऱ्या दिवशीं राणीच्या महालीं येऊन प्रधान तिजपाशीं राजपुत्रास मागूं लागले. तेव्हां राणीनें पुष्कळ द्रव्य देण्याचें कबूल करून त्यांतून एकास एकांत

१ कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास.

भाग १ ला.

स्थळीं नेलें व त्यास कच्ची हकीकत सांगून अभय मागितलें. राणीच्या इच्छेस मान देऊन त्यांनीं गुलाम म्हणून आणलेल्या बच्याचा वध केला व त्यास जाहीरपणें नगराबाहेर नेऊन पुरलें.

खवाजानें युसफास इराणांत नेऊन साव्हा या गांवीं आपल्या घरीं ठेवलें. तेथें तो सात वर्षांचा झाला तेव्हां त्यास शाळेंत घालण्यांत आलें. पुढें राणीनें आपल्या मुलाच्या समाचारासाठीं साव्हा शहरास जासूद पाठविला व तो राजपुत्राची खबर घेऊन सुमारें नऊ महिन्यांनीं परतला. परंतु वाटेंत ईजिप्तमध्यें अलेक्झांड्रा शहरीं आजारी पडल्यामुळें त्याचें तेथें दीड वर्ष रहाणें झालें. त्यानंतर तुर्कस्थानांत जाऊन युसफच्या हातचें पत्र त्यानें राणीस दिलें. पुढें लवकरच राणीनें आपल्या पुत्राच्या दाईस, तिचा मुलगा गझनफरबेग आणि तिची मुलगी यासहवर्तमान साव्हा शहरीं राजपुत्राकडे पाठविलें व तिजबरोबर पुष्कळ पैकाहि दिला. युसफ सोळा वर्षांचा होईपर्यंत साव्हा शहरींच राहिला. कालान्तरानें युसफचें सत्यस्वरूप साव्हा येथील सुभेदाराच्या नजरेस आलें. सुभेदारानें युसफपासून चार हजार रुपये घेऊन त्यास तेथून इतरत्र जाण्यास परवानगी दिली.

साव्हाहून युसफ कूप शहरीं गेला, आणि तेथूनहि १।२ ठिकाणीं राहून तो शिराजास आला. तेथें त्यास एका साधूचा असा दृष्टांत झाला कीं, त्यानें इराण सोडून हिंदुस्थानांत जावें, म्हणजे त्याच्या नशिबीं राज्यपद आहे. त्याप्रमाणें युसफ, आपली दाई व तिचा मुलगा गझनफरबेग यांसह जहाजांत बसून कोंकणांत सन १४५९ मध्यें दाभोळ बंदरीं उतरला. त्याचें रूप, रुबाबदारी व शहाणपणा पाहून खवाजा महमद गुरजीस्तानिया नामक व्यापाऱ्यानें त्याच्याशीं स्नेह केला आणि त्यानें त्यास बेदर शहरीं नेलें. तेव्हां तेथील ब्राह्मणी राज्याचा प्रसिद्ध प्रधान महमद गवान यानें युसफची हुषारी पाहून त्यास विकत घेतलें. युसफानेंहि आपलें कुलशील उघडकीस येऊं न देतां स्वतःस विकूं दिलें.

प्रथम त्यास गवानानें रिसाल्यावरील मुख्य अधिकारी अझीझखान याच्या हाताखालीं ठेवलें. पण पुढें त्याची लायकी व हुषारी

पाहून साऱ्या रिसाल्याचें काम त्याजवर अझीझखानानें सोंपविलें. अझीझखानाच्या मरणोत्तर त्याच्या जागीं युसफचीच नेमणूक झाली. तें काम पहात असतां रिसाल्याकडील हिशेब ठेवणाऱ्या कारकुनाचें व युसफचें न पटून युसफ राजिनामा देऊन मोकळा झाला. पुढें बेदर दरबारचा सरदार निजाम उल् मुल्क तुर्क होता. त्याच्या हाताखालीं युसफ राहिला. उभयतांचा स्नेह दाट जमून निजामानें त्यास वऱ्हाडच्या सुभेदारीवर नेमलें व त्यास शहाकडून आदिलखान हा किताब व पांचशें स्वारांची सरदारी देवविली. निजाम केरल देशावर स्वारीस गेला; तेव्हां आदिलखान त्याच्या हाताखालीं शौर्यानें लढला. पण निजाम स्वारीवर असतां एका लढाईंत पडला. त्याच्या पश्चात् सैन्याचें आधिपत्य स्वीकारून युसफानें सर्व केरल प्रांत जिंकला व पुष्कळ लूट जमवून तो बेदरास परत आला. त्या वेळेपासून शहा व गवान यांची त्याजवर बहाल मर्जी बसली. गवान तर त्यास आपला दत्तक पुत्र समजूं लागला. गवान मरण पावल्यावर शहानें विजापूर सुभ्याचें काम युसफ अदिलखानासच सांगितलें. बेदरचा बादशहा महमदशहा निवर्तल्यावर अदिलखान स्वतंत्र झाला व त्याच वर्षी त्यानें आपल्या नांवाचा खुदबा वाचविण्याचा विजापुरास हुकूम फर्मावला. हाच विजापुरच्या आदिलशाहीचा मूळ पुरूष अब्बुल मुजफर यूसफ आदिलशहा होय.

वरील त्रोटक वृत्तान्तावरून इस्तंबूलच्या सुलतानांचा महाराष्ट्राशीं किती निकट संबंध पोंचतो याविषयीं कोणाचीहि खात्री होईल. मराठ्यांच्या तोंडींहि रूमशाम हें नांव फार घोळत असे. मुलुखगिरीची पराकाष्ठा म्हणजे रूमशामवर स्वारी करून तेथील सुलतानास नमविणें असें मराठे आपल्या ऐन ऐश्वर्याच्या काळांत समजत. मराठ्यांच्या महत्त्वाकांक्षेची दौड तुर्कस्थानापर्यंत कशी पोंचली होती हें भाऊसाहेबांच्या बखरीवरून समजून येणार आहे. पेशव्यांचा रणधुरंधर सेनापति सदाशिवरावभाऊ याची उमेद अटकेपार झेंडे लावून किंवा इराणी--दुराणींची रग जिरवून थांबणारी नव्हती. ‘ पुढेंहि रूमशाम येथें स्वराज्य करणें हीच उमेद भाऊसाहेबाचीहि मनांत आहे, दुसरा निजध्यास नाहीं ’ असें

बखरकार रघुनाथ यादव लिहितो. बखरकाराचें रूमशाम म्हणजेच टर्की, तुर्कस्थान, तुर्कांचें साम्राज्य किंवा रूमशाम होय. हें आपणास आणखीहि अनेक ग्रंथाधारांवरून सिद्ध करतां येतें. तुर्कांचें आगर जो अनातोलिया किंवा आशिया मायनर तो प्रसिद्ध इंग्रज इतिहासकार गिबन याच्या व इतरांच्या मतें रूम व सीरिया हा शाम होय. दिल्लीपद पादशाही घेतल्यावर कल्पनाशक्तीस रमविणारें रूमशामच्या पादशाहाशिवाय दुसरें ईप्सित सदाशिवराव भाऊसारख्या रणगाजीस दिसूं नये यावरून रूमशामच्या अर्थात् इस्तंबूलच्या तुर्की तक्ताची कीर्ति महाराष्ट्रीयांच्याहि कानीं कशी पोंचली होती याविषयीं खात्री पटते. रूमशामच्या पादशाहीची ओळख गेल्या महायुद्धानें आणि विशेषतः खिलाफत चळवळीनें अधिकच वृद्धिंगत होणार असल्यानें तुर्कांच्या सार्वांगिक हालचालीचें स्वरूप ग्रंथरूपानें वाचकांस आज सादर करणें जरूर वाटलें.

तुर्कांचे स्वातंत्र्यदाते, गाजी मुस्तफा केमालपाशा यांचें छायाचित्र प्रारंभीं दिलें असून तुर्कस्थानचा इतिहास नीट समजण्याकरितां त्यांचा एक तुर्कांच्या साम्राज्याची भरभराट दाखविणारा, दुसरा महायुद्धापूर्वींचा आणि तिसरा महायुद्धानंतरचा असे तीन नकाशे पुस्तकास जोडले आहेत.

प्रस्तुत ग्रंथ मूर्त स्वरूपास येण्यास केसरीचे संपादक व केसरी-मराठा संस्थेचे एक विश्वासनिधि (ट्रस्टी) रा. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचें प्रोत्साहन व अमोलिक साहाय्य कारण झालें, याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य होय. त्यांजकडून प्रस्तुत विषयावरील अनेक ग्रंथ मला वाचावयास मिळाले म्हणूनच हा प्रयत्न सिद्धीस गेला. पण या बाबतींत इतर प्रकारें माझे मित्र रा॰रा॰यशवंत नरसिंह केळकर, बी. ए. (टि. म. वि.,) रा॰रा॰ दत्तात्रेय विश्वनाथ ताम्हनकर बी. ए. व प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. दत्तात्रेय विष्णु आपटे बी. ए. आणि कऱ्हाडचे प्रसिद्ध सावकार व देशभक्त रा. पांडुरंग केशव शिराळकर यांनीं मजकरितां श्रम व झीज सोसली तिनेंही मला ऋणी करून ठेवलें आहे. शेवटीं ज्या जगन्नियंत्याच्या कृपेनें अनेक अडचणींतून प्रस्तुत प्रयत्न शेवटास गेला, त्यास विनम्रभावानें प्रणाम करून ही अल्पकृति वाचकांस सादर करीत आहें.

पुणें, मकरसंक्रमण, १८४७.

वासुदेव कृष्ण भावे.

तुर्कांचें साम्राज्य

तुर्कपूर्व परिस्थिति.

पूर्वयुरोप व पश्चिमआशिया खंड यांत उस्मानाच्या तुर्की सत्तेची उत्पत्ति व वृद्धि कशी झाली, हें नीट लक्षांत येण्यास तुर्कांपूर्वी वरील भूप्रदेश व त्याच्या आजूबाजूचा भाग यांची राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थिति समजावून घेणें आवश्यक होय. इ. स. २८४ पासून रोमन बादशाहा डायोक्लिशियन यानें राज्यकारभाराच्या सोयीसाठीं रोमन साम्राज्याचे पूर्व व पश्चिम असे दोन भाग पाडले. डायोक्लिशियन यानें घालून दिलेली वहिवाट कॉन्स्टंटाईन दि ग्रेट या रोमन बादशाहानें दृढ करून आपली राजधानी यूरोपच्या पूर्व टोकावर व बॉस्फरस सामुद्रधुनीच्या पश्चिम किनाऱ्यावरील बिझांटियम या नगरींत नेली. कॉन्स्टंटाईन बादशाहामुळेंच बिझांटियम नगरीचें रूपान्तर कॉन्स्टंटिनोपल शहरांत झालें. हूण या रानटी जातीनें रोम शहरचा जितका विध्वंस करून टाकला, तितका कॉन्स्टंटिनोपलचा न केल्यामुळें कॉन्स्टंटिनोपल शहर धर्म, विद्या व कलाकौशल्यांचें आदिपीठ होऊन राहिलें. कॉन्स्टंटाईन बादशाहानें स्वतः ख्रिस्ती धर्म स्वीकारून ख्रिस्ती धर्मास राजाश्रय व स्थैर्य मिळवून दिलें. रोमनबादशाहीच्या राज्यकारभारांत मुलकी वगैरे खात्यांवरील अमलदारांचीं कामें पॅट्रिआर्क यांजकडे देण्यांत येत. कॉन्स्टंटाईन बादशहानें कान्स्टांटिनोपलच्या पॅट्रिआर्कास चर्चचा आधिपति नेमलें. पॅट्रिआर्ककडे या रीतीनें धर्मगुरुत्व आल्यापासून कॉन्स्टंटिनोपल हें मोठ्या साम्राज्याच्या राजधानीप्रमाणेंच पूर्व यूरोपांतील ख्रिस्त्यांचें धर्मक्षेत्र मानलें जाऊं लागलें.

युरोपांत ख्रिस्ती धर्माचा पसार होत होता, त्यावेळीं व त्यानंतर आशियाखंडाच्या पश्चिम भागांत महमदी धर्म वाढीस लागत होता. आठव्या शतकांत आरबांच्या जबरीनें मध्यआशियांत इस्लामी धर्माचा

संचार होऊन तुर्कांनीं या नवीन धर्माची दीक्षा घेतली. बगदादच्या आबासईद खलिफांनीं त्यांस जिंकलें व त्यांच्याच पदरीं बरेचसे तुर्क येऊन राहिले. त्यांनीं आपल्या बाहुबलावर खलिफांचा सारा कारभार आटोपला व त्यांस बाहुलें बनवून ठेवलें. त्यांनीं त्यानंतर कॉन्स्टांटिनोपलच्या बिझांटाईन बादशाहापासून आशियामायनर प्रांत मिळविला. व सीरियांत शिरून पॅलेस्ताईन प्रांत व येरूशलेम शहर यांवर आपला ध्वज उभारला.

या काळीं युरोपांत प्रबळ अशीं राज्यें फार थोडीं होतीं. पहिला ओटो दि ग्रेट ह्यानें जर्मनींत ९६२त राज्य स्थापलें. पूर्व युरोपांत हेंच एक महत्त्वाचें राज्य होतें. आणि कॉंस्टँटिनोपलचें बिझांटाईन राज्य मोडकळीस आलें होतें; सर्व युरोपखंड सामाजिक व राजकीय दृष्ट्या फ्यूडॅलिझमनें म्हणजे वतनदारी पद्धतीनें जखडलें गेलें होतें. या पद्धतीखालीं राजा हा जमिनीचा मालक समजण्यांत येऊन तो आपल्या ताब्यांतील जमीन अनेक मांडलीक सरदारांस वाटून देई. हे सरदार स्वतः जमीन इनामदारांप्रमाणें कुळांकडे लावीत. कुळांस जमीन केव्हांहि सोडतां येत नसे आणि त्यांचें जीवित व वित्त सरदारांच्या मुठींत असे. त्यांनीं त्यास अपराधाबद्दल हवी ती शिक्षा करावी. देशांत सरदार अगदींच मूठभर असून त्यांचीं कुळें (सर्फ्स्) हीच देशांतील मुख्य वस्ती असे. याखेरीज स्वतंत्र वर्ग म्हणजे व्यापारी व कारागीर यांचा. हे बहुधा शहरांतच राहात. अशा रीतीनें राजे (लॉर्ड),सरदार (व्हॅसल) व कुळें (सर्फ) यांनीं यूरोपखंड गजबजून सोडलें होतें. अकराव्या शतकांत फ्रान्स देशांत राजे किंवा मुख्य सरदार दोनशे व पोट सरंजामीदार किंवा सरदार सत्तरहजार होते. सरदारांचें संरक्षण राजानें (लॉर्डानें) शत्रूपासून करावें आणि सरदारानें आपलें सरंजामी सैन्य घेऊन राजाच्या मदतीस धावावें, असे करार असत आणि हे करार सरंजामदारांनीं मोडल्यास त्यांचा सरंजाम जप्त होई. तरुण सरदारांनीं नाईट हा राजकीय अधिकार मिळवावा किंवा बिशप, आर्चबिशप हे धर्माधिकार पत्करावे.

पोप आणि बादशहा यांच्यांत श्रेष्ठपणासंबंधीं अकराव्या शतकांत

बरीच चुरस माजून राहिली होती. पोप सातवा ग्रेगरी याचा जर्मन बादशहा चौथा हेनरी याबरोबर याच बाबतींत तंटा लागला. सर्व धर्माधिकाऱ्यांनीं ब्रह्मचर्य पाळावें आणि चर्चचे अधिकारी पोपनें नेमावे, यावर ग्रेगरीचा कटाक्ष होता. पण हेनरी पोपाचा अधिकार मानीना. अखेर पोपनें हेनरीस बहिष्कृत केल्यावर तो निमूटपणें शरण आला.

धर्माची छाप युरोपखंडावर अधिक होती, याचें दुसरें प्रत्यंतर धर्मयुद्धाचें होय. सेल्जुक तुर्कांनीं पॅलेस्टाइन जिंकलें व जेरुसलेममधील पवित्र ख्रिस्ती देवळांत तबेले ठेविले. या विटंबनेनें चिडून जाऊन ख्रिस्ती लोकांनीं पोप दुसरा अर्बन याच्या धुरीणत्वाखालीं सेल्जुक तुर्कांशीं धर्मयुद्ध आरंभलें. या युद्धांत इंग्लंड, जर्मनी आदिकरून युरोपांतील बहुतेक देशांतील राजे व सरदार सामील झाले होते. अशीं धर्मयुद्धें किंवा शूल युद्धें इ. स. १०९६ पासून १२७० पर्यंत आठ झालीं. पहिल्या प्रथम ख्रिस्त्यांस यश येऊन गॉड फ्रे बुलान यानें पॅलेस्टाइन आपल्या ताब्यांत आणिलें. परंतु पुढें मुसलमानांची सरशी होऊन ईजिप्तचा सुलतान सलाउद्दीन यानें ख्रिस्त्यांचा मोड करून त्यांस युरोपांत कायमचें पिटून लावलें.

रोमन साम्राज्य मोडल्यापासून युरोपावर मध्य आशियांतील रानटी टोळ्यांच्या धाडीवर धाडी येऊन आदळत होत्या; आणि त्याखालीं समाज विस्कळित होऊन त्याची प्रगति खुंटली होती. हूण, गॉथ मोगल यांजकडे युरोपखंडाच्या नाशाचें पुष्कळ श्रेय जातें. अशा अव्यवस्थेच्या व संकटाच्या काळांत युरोपची प्रगति थांबून समाजाचा पुरुषार्थ संपुष्टांत आला होता. नांव घेण्याजोगे राजे कोणी उरले नव्हते, आणि फ्यूडॅलिझमच्या पद्धतीखालीं प्रत्येक देशाचे लहान लहान तुकडे पडून राजकीय दृष्ट्या देशांत मोठ्या प्रमाणावर संघशक्ति उत्पन्न होण्याचें साधन राहिलें नव्हतें.बहुजनसमाज फ्यूडॅलिझममुळें (सरंजामी पद्धतीमुळें)एक प्रकारें गुलामगिरींत सांपडल्यानें त्यास स्वातंत्र्याचें महत्त्व समजत नव्हतें राष्ट्राभिमान व देशाभिमान या कल्पना उदय पावावयाच्या होत्या. आणि राजनिष्ठा हा गुण अद्यापि जीव धरून असला तरी त्याच्या बळावर आपल्या विवक्षित देशाचें किंवा युरोप खंडाचें डोकें वर काढूं इच्छिणारे मोठे राजेहि युरोपांत

अवशिष्ट नव्हते. राजकीय भावनांच्या अभावीं धर्मभावना युरोपियन समाजांत कांहींशी प्रबळ होती; व धर्मयुद्धाचे बाबतींत तिनें थोडासा प्रभावहि दर्शविला होता, परंतु संघटनेचा आणि एकसूत्रीपणाचा अभाव, बारभाईची बजबजपुरी आणि मुसलमानांच्या मानानें शौर्याची व धार्मिक आवेशाची कमतरता या दोषामुळें ख्रिस्ती समाजास मुसलमानी समाजापुढें बाराव्या व तेराव्या शतकांत कचच खावी लागली. अशा सुमारास मध्य आशियांतून तुर्कांचा नवा लोंढा आशियामायनरांत उतरला आणि त्यानें खिळखिळ्या झालेल्या बिझांटाईन राज्यास तडाखे लगावून व सेल्जुक तुर्कांच्या भंगलेल्या सत्तेस पायाखालीं चिरडून आपलें राज्य नव्या दमानें सहज स्थापिलें. त्यांनीं सारें युरोपखंड पादाक्रांत केलें असतें; परंतु त्यांपूर्वी मध्य आशियांतून डान्यूब नदीच्या काठीं येऊन स्थायिक झालेल्या तुराणी लोकांनीं त्यांस थोपवून धरलें. सांप्रतच्या हंगेरियनांचे पूर्वज तुराणी होत. त्यांनीं सन ८९५ मध्यें हंगेरींत वस्ती केली. पूर्व युरोपांतून मध्य व पश्चिम युरोपांत शिरण्याचा तत्कालीन राजमार्ग हाच होय. पंधराव्या आणि सोळाव्या शतकांत तुर्कांनीं या राजमार्गावरील हंगेरियनांचा पहारा उठवून लावण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले; व त्यांजपासून कांहीं मुलुख जबरदस्तीनें मिळविलाहि. तथापि फळी फोडून युरोपांत शिरण्याचे कामीं त्यांस हारच खावी लागली. उस्मान आशिया मायनरांत राज्य स्थापण्याच्या उद्योगास लागला. त्या वेळीं वरील प्रमाणें परिस्थिति होती. बुद्धिमत्ता, एकजूट, धडाडी, शौर्य, धार्मिक आवेश व दम या पैकीं हरएक गुणांत तुर्क लोक युरोपियन ख्रिस्त्यांपेक्षां किंवा आशियाटिक सेल्जुक तुर्कांपेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें त्यांस एवढें अफाट साम्राज्य उभारतां आलें हें उघड होय.

राज्यस्थापना.

उस्मान १२८७–१३२६

तुर्की साम्राज्याचा मूळ संस्थापक उस्मान. पण त्याचा आशियामायनरमध्यें प्रवेश होण्यास त्याचा बाप आरतोग्रल कारण झाला. अनेक पराक्रमी पुरुषांस अनादि काळापासून जन्म देणारा मध्य आशिया

तुर्कांची जनक होय. या वीर्यवान् पण कंगाल देशांतून उस्मानचा आजा सुलेमानशहा आपली लहानशी फौज घेऊन इ. स. १२२० चे सुमारास नशिबाची परीक्षा पहाण्याकरितां बाहेर पडला. तो इराणच्या वाटेनें आर्मीनियांत उतरला व तेथेंच कांहीं दिवसांनीं मृत्यु पावला. त्याच्या पश्चात् आरतोग्रलकडे बापाच्या फौजेचें नायकत्व आलें. आरतोग्रल फौजेनिशीं मुलुखगिरी करीत हिंडत असतां त्याला दोन फौजा परस्परांशीं लढतांना आढळल्या. त्यांतील दुर्बळ पक्षास आरतोग्रलनें कुमक केली व तो पक्ष विजयीहि झाला. विजयी पक्षाचा अधिपति अल्लाउद्दिन सेल्जुक यानें आरतोग्रलचे उपकार ठेवले नाहींत. सेल्जुकांचें प्रबळ राज्य मोडून त्याचीं या सुमारास लहान लहान राज्यें झालीं होतीं. त्याच राज्यांपैकीं आशियामायनरमधील एका छोट्या राज्याचा अल्लाउद्दिन हा धनी असल्या-मुळें त्यानें आरतोग्रलास ग्रीकांच्या तोंडावरील इस्कीशहर व सुगत हीं शहरें आणि त्यासभोंवारचा प्रदेश जहागीर करून दिला.

तोग्रलच्या पोटीं उस्मानचा जन्म सुगतशहरीं १२५८ त झाला. त्याच्या लग्नाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात. उस्मानास यौवनदशा प्राप्त झाल्यावर त्याचें शेख आवेदली नामक एका अवलियाच्या रूपवती कन्येवर मन गेलें. पण बुवाजींस हें स्थळ रुचलें नाहीं. तथापि तेवढ्यानें उस्मानानें मुलीचा नाद मात्र सोडला नाहीं. पुढें थोड्याच दिवसांच्या आंत अवेदलीस एक दृष्टांत झाला; आणि त्यांत उस्मानाशीं विवाह झाल्यास मुलीच्या नशिबीं मोठें राज्य आहे असें आलें. व हा अल्लाचा संकेतच मानून अवेदली मुलीचें उस्मानाशीं लग्न लावून मोकळा झाला. लग्नसमयीं उस्मानाचें वय सोळा वर्षांचें होतें. विवाहाच्या वयोमर्यादे-संबधानें तुर्कांच्या स्वाभाविक समजुती साडेसाहाशें वर्षांपूर्वींहि काय होत्या हें यावरून सहज समजून येतें.

उस्मान अल्लाउद्दिनाच्या पदरचा अमीर या नात्यानें राज्य वाढ-वीत असल्यामुळें त्यानें आपली नजर पश्चिमेकडे वळवून शेजारचें मोड-कळीस आलेलें कॉन्स्टँटिनोपलचें ग्रीक राज्य तोडतोडून खाऊन फस्त करण्याचें काम चालविलें आणि अल्लाउद्दिनाच्या मरणोत्तर स्वतंत्र होऊन

तो तीच नजर पूर्वेकडील सेल्जुक राज्यावर वळवून योग्य संधीची वाट पहात राहिला. अडतीस वर्षांच्या अवधींत काळ्या समुद्रास व बॉस्फरस सामुद्रधुनीस धरून त्यानें शंभर मैल लांब व साठ मैल रुंद राज्य पसरून दिलें. एवढ्या प्रदेशांत उस्मानानें नांव घेण्यासारखें ब्रूसा हें एकच नवें शहर अखेरी अखेरीस सर केलें.

उस्मानच्या प्रजाजनांत मुख्य भरणा ख्रिस्त्यांचा होता. ख्रिस्त्यांतहि ग्रीक व स्लाव्ह अशा दोन जाती होत्या. यांपैकीं पुष्कळांनीं ऐहिक सुखावर नजर देऊन इस्लामी धर्माचा अंगीकार केला. आणि धर्मांतरानंतर जातिभेद नसलेल्या तुर्कांशीं ते अल्पवधींतच एकरूप होऊन गेले. ते आपणास उस्मानअली म्हणजे आटोमन म्हणवूं लागले व सेल्जुक वगैरे पूर्वींच्या राज्यकर्त्या जातीस हीन लेखूं लागले. उस्मान शूर व लढवय्या होता यांत नवल नाहीं. पण तो तसाच शहाणा राज्यकर्ताहि होता. यामुळें दंतकथांनीं त्याच्या तोंडीं घातलेले उद्गार खरे असतील असें वाटत नाहीं त्यानें आपल्या मुलास पुढीलप्रमाणें उपदेश केल्याचें कोणी एक दंतकथा कथन करते.—'जिवाची पर्वा बाळगूं नकोस. जुलूम करूं नकोस किंवा क्रौर्यहि दाखवूं नकोस. न्यायानें वागून जगास शोभा आण. जयावर जय मिळवून माझ्या आत्म्यास संतोष दे. जगाचा स्वामी होऊन समशेरीच्या साहाय्यानें धर्मप्रसार कर. विद्वानांचा परामर्श घे, म्हणजे तो अल्लाच्या घरीं रुजू होईल. सैन्याच्या बळावर उड्या मारूं नकोस किंवा संपत्तीनें उन्मत्त होऊं नकोस. अल्लाचा कायदा हेंच आमचें शस्त्र आणि त्याचा मार्ग हीच आमची प्रगति. साम्राज्यविस्ताराहून धर्मप्रसार मला फार प्रिय आहे. कर्तव्यास जाग. डोळ्यांत तेल घालून प्रजापालन कर म्हणजे अल्ला तुजवर मेहेर करील.'

वरील उपदेश असंबद्ध व म्हणून अविश्वसनीय वाटतो. ऐहिक सुखाच्या आशेनेंच उस्मानानें राज्य स्थापलेलें स्पष्ट दिसतें. धर्मप्रसार हा राज्यस्थापनेचा व राज्यविस्ताराचा त्याचा किंवा त्याच्या वंशजांचा केव्हांहि प्रधान हेतु नव्हता. तो असता तर त्याच्या राज्यांत ख्रिस्ती प्रजेवर जुलूम होता; आणि तीस स्वधर्मास मुकावेंच लागतें. कॉन्स्टँटिनो-

पलमधील ग्रीकचर्चेचें परिपालन आणि ख्रिस्तीप्रजेची सुलतानी सत्तेखालीं भरभराट या गोष्टी प्रजेस संतुष्ट राखण्याच्या राज्यकर्त्यांच्या इच्छेच्याच द्योतक होत. परमुलुखावर स्वाऱ्या करून तेथील जनतेस क्रूरपणानें वागविणें आणि तिला जिंकल्यावर तिचें न्यायानें रक्षण करणें हेंच राज्य मिळवून शाश्वत राखूं पाहणाऱ्या राजकर्त्यांस उचित असून हेंच धोरण तुर्की सुलतानांनीं पाळावें यांत नवल नाहीं.

आरखान १३२६–१३५८

तुर्की सुलतानांचे विवाह सोळाव्या वर्षांच्या आंतबाहेरच होत, तरी त्यामुळें त्यांच्या आयुर्बलारोग्यांत रतिभरहि कमतरता आल्याचें आढळून येत नाहीं. उस्मानानें आडतीस वर्षें राज्योपभोग घेतला आणि त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र आरखान गादीवर आला, तेव्हां तो बेचाळीस वर्षांचा असून यापुढें त्यानें बत्तीस वर्षें राज्यसुख अनुभविलें. हा क्रम पहिल्या बऱ्याच सुलतानांनीं अव्याहत चालविला. यावरून आरखानाची वयोमर्यादा अपवादात्मक नव्हे, हें सहज सिद्ध होतें. आरखानानें पित्याच्या देखरेखीखालीं राज्यकारभाराचीं लहान मोठीं कामें पाहिलीं होतीं, यामुळें ' प्रवर्तितो दीप इव प्रदीपात् ' इतकी योग्यता तख्तनशीन होतेसमयींच त्यांस प्राप्त झाली होती. अशा अनुभविक व परिपक्व राजाच्या अमलखालीं राज्यास धोका बसण्याची भीति नसल्यामुळें पूर्वींचीं राज्यें एकतंत्री असूनही दीर्घकाल टिकून राहात.

सुलतान ही पदवी धारण करणारा पहिला राजा आरखान हाच होय. यानें आपली राजधानी स्वसंपादित ब्रूसा शहरीं नेली व आपल्या नांवाचें नाणें पाडलें. ' उस्मानचा पुत्र आरखान याचें साम्राज्य अनंत काळ टिको ' अशीं अक्षरें त्यानें आपल्या नाण्यावर कोरलीं होतीं. त्यावरून साम्राज्यस्थापनेची त्याची प्रबल इच्छा शाबीत होते. तो बापाप्रमाणें उजव्या हातानें ग्रीक राज्य मोडून खातच होता. पण बापावरहि कडी करून शेजारच्या सेल्जुक राज्यास पूर्वेकडून खाण्यास त्यानें

आपला डावा हातहि पुढें पसरला. आरखानानें ग्रीक सत्तेचे आशियाच्या किनाऱ्यावरून समूळ उच्चाटन करून स्वस्थ न बसतां युरोप खंडाचा किनारा चढून जाण्याचीहि संधि गमाविली नाहीं.

इ० स० १३३८ त कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा तिसरा अँड्रोनिकस मरण पावला. मरणसमयीं युवराज अज्ञान असल्यामुळें बादशहानें राज्यरक्षणार्थ वजीर(ग्रँडचॅन्सेलर)कॅन्टाकूझिन यास व आपल्या राणीस जोडीनें कारभारी(रीजेंट) नेमलें. रीजेंट होऊन कॅन्टाकूझिनची हाव कमी न होतां वाढली. त्यानें १३४३ त स्वतःस बादशहा म्हणवून आपल्या नांवाची द्वाही फिरविली.कॅन्टाकूझिनच्या या अरेरावीचा राणीस राग येऊन ती आरखानास शरण गेली. उलट कॅन्टाकूझिन यानें राणीविरुद्ध आरखानाचाच आश्रय केला. कॅन्टाकूझिननें आपली उपवर कन्या अरखानास देऊं केल्यामुळें आरखानाचा कांटा कॅन्टाकूझिनकडे आपोआपच झुकला. आरखानाच्या मदतीमुळें कॅन्टाकूझिनास विजयश्रीनें वरिलें. याचा परिणाम असा झाला कीं, कॉन्टाकूझिन व त्याची पत्नी आणि राणी व तिचा अज्ञान पुत्र या चौघांस एकदमच राज्यभिषेक होऊन ते सर्व राज्याचे अधिकारी झाले. राणीशीं विशेष सख्य जोडण्याकरितां कॅन्टाकूझिननें आपली मुलगी युवराजास दिली. इकडे आरखानास पहिली नियोजित वधू मिळून त्याचें तिजबरोबर वयाच्या ६२ व्या वर्षीं लग्न लागलें, कान्टाकूझिन व त्याचा धाकटा जांवई जो राजपुत्र त्याचें न पटून त्यानें थोरला जांवई आरखान याला पुन्हा मदत मागितली व ती त्यास मिळाली. याचा मोबदला म्हणून आरखानास युरोपखंडांत झिंपी नामक लहानसा किल्ला मिळाला. या सुमारास थ्रेस प्रांतीं धरणीकंप होऊन गॅलीपोलीचा किल्ला ढांसळला. त्यावर आरखानानें आपलें निशाण रोवलें. जांवयाच्या या कृत्याविरुद्ध कॅन्टाकूझिननें तक्रार करतांच धरणीकंपाचा धक्का हा अल्लानें दिलेला कौल होय,अशी मखलाशी करून सुलतानानें तो किल्ला पचवूनहि टाकिला.सुलतानाविरुद्ध बादशाहानें सर्व्हियनांची मदत मागितली; पण ती त्यांनीं साफ नाकारली. तुर्कांचा राज्यविस्तार जसा त्यांचा शौर्यानें तसा खिस्ती संघांतील दुहीनेंहि झाला असें म्हणणें भाग

पडतें. तुर्कांस आपली युरोपांमधील सत्ता वाढविण्यास दार्दानेलीस सामुद्र-धुनीच्या तोंडचा व मान्याचा किल्ला फार उपयोगी पडला.

राज्यास मुख्य आधार सैनिकांचा. आरखानानें आपला भाऊ अल्लाउद्दीन याच्या चातुर्यानें सैन्याची मजबुती कायमची करून टाकली. त्यानें पायदळ कायमचें पदरीं बाळगलें आणि रिसाल्याची उभारणी मात्र सरंजामी पद्धतीवर केली. राज्याचे लहान लहान विभाग पाडून त्यानें ते आपल्या सरदारांस जहागीर दिले आणि त्या मोबदला ठराविक घोडे-स्वार घेऊन युद्धप्रसंगीं चाकरीस यावें अशी योजना केली. ही सरंजामी पद्धत त्या काळीं युरोपभर होती. पण तुर्कांच्या व युरोपियन पद्धतींत फरक एवढाच कीं, युरोपांत दिलेल्या जहागिरी वंशपरंपरा चालत आणि तुर्की राज्यांत मात्र त्या तहाहयात असत. सैन्यांत फक्त मुसलमान घेतले जात आणि ख्रिस्ती प्रजाजनांस लष्करी चाकरी माफ असे. मात्र इस्लामी कायद्याप्रमाणें त्या मोबदला त्यांजपासून जादा कर वसूल केला जात असे. ज्यांच्या वाट्यास जहागिरी येत नसत, त्यांचे खिसे लुटींतील सोन्यानाण्यानें जड होत आणि ज्यांच्या हातास सोनेंनाणेंहि न लागे त्यांची शय्या लढाईंत गुलाम करून आणलेल्या यौवनसंपन्न स्त्रियांनीं सुखदायक होई. ही गुलामगिरी मुसलमानेतर ख्रिस्त्यांच्या नशीबीं लिहिली अस-ल्यामुळें पुष्कळ ख्रिश्चनास बाटून मुसलमान होणें सोयीचें वाटलें असेल, यांत नवल नाहीं.

लढाईंत पकडलेल्या गुलामांची विक्री करून येणाऱ्या रकमेचा $\frac{1}{5}$ सरकारी खजिन्यांत व $\frac{4}{5}$ सैनिकांच्या खिशांत पडत असल्यामुळें हा लाभ सामान्य शिपायांस मोठाच होय, यांत शंका नाहीं. आरखान १३५८ मध्यें वारला त्यावेळीं त्याचें वय बहात्तर वर्षांचें होतें.

मुराद पहिला १३५९–१३८९

आरखानामागून त्याचा मुलगा पहिला मुराद गादीवर बसला. त्या-वेळीं त्याचें वय चाळीस वर्षांचें होतें. मुत्सद्दीपणा व शिपाईगिरी हे दोन्ही गुण त्याच्या अंगीं एकवटले होते. पण लिहिण्यावाचण्यांत तो इतका खंदा होता कीं, त्यास धड सहीही करितां येत नव्हती! एकदां तहावर

सही करण्याची पाळी आली असतां त्यानें शाईत बोटें बुडवून तीं तहाच्या खर्ड्यावर टिपलीं. मुरादाच्या कारकिर्दीत तुर्की साम्राज्य पांचपट मोठें झालें; आणि म्हणूनच मुरादाची गणना तुर्की साम्राज्यांतील अत्यंत वैभवसंपन्न अशा तीन सुलतानांत होते. आरखानानें गॅलीपोलीचा किल्ला फक्त हस्तगत करून युरोपांत भावी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. तीच ध्वजा हातीं धरून त्यानें बालकन पर्वतापर्यंत फडकाविली. कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा आणि आरखानाचा साडू जॉन आतां वयांत आला होता. परंतु तो अगदींच नादान ठरला होता. त्याच्याच राज्यावर स्वारी करून मुरादानें एका तडफेसरशीं आद्रियानोपलसुद्धां सर्व थ्रेस प्रांत जिंकून घेतला; आणि कॉन्स्टँटिनोपलपासून पांच मैलांवर त्याची सत्ता येऊन धडकली.

थ्रेस गेल्यामुळें तुर्कांची धाड बल्गेरियावर येणार, असें दिसतांच आजूबाजूच्या ख्रिस्ती राजांचें धाबें दणाणून गेलें. तत्कालीन ख्रिस्तीराष्ट्रें पोपाचा बराच मान राखीत असत. पोप पांचवा अर्बन यानें हंगेरीचा राजा लुई आणि सर्व्हिया, बोस्निया व वालाशिया येथील राजेरजवाड्यांस हलवून जागे करून भावी संकटाची ओळख दिली व त्यांच्यांत आजवर कधींहि दृष्टीस न पडलेली जूट जमविली. त्यांनीं वीस हजार सैन्य उभे करून थ्रेसवर पाठवून दिलें. मुरादाचा सेनापति लालाशालीन याची व सदर सैन्याची गांठ मारिट्झा नदीवर पडली. तुर्कांनीं रात्रीं अचानक छापा घालून ख्रिस्ती सैन्य निजून असतां त्यांतील बऱ्याच जणांस जागच्या जागींच गारद केलें आणि उरलेल्यांस पळतां भुई थोडी करून सोडली. या विजयानें मारिट्झा नदीपासून बालकन पर्वतापर्यंतचा मुलुख मुरादच्या पायावर घातला. आशिया खंडांतील ब्रूसा शहर पडूं लागल्यामुळें त्यानें आपली राजधानी थ्रेसमध्यें आद्रियानोपलास हलविली. त्यामुळें पूर्व युरोपावर त्याचा दरारा अधिक बसला, नवीन मुलुख जिंकण्यास अधिक नेट सांपडला आणि कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा जॉन मांडलिक बनला.

कॉन्स्टँटिनोपलचें ग्रीक व रोमचें रोमनचर्च यांचें आपसांत नीट नव्हतें. कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा सुलतानाचा मांडलिक झाला ही गोष्ट

त्याच्या इभ्रतीस व धर्माभिमानास अपमानास्पद होती. तुर्कासारख्या परधर्मीयांच्या कह्यांत राहण्यापेक्षां रोमचा पोप पांचवा अर्बन या स्वधर्मांतील शत्रूसहि शरण जाऊन त्याच्या कृपेनें पारतंत्र्यांतून सुटण्याचा मार्ग सांपडला तर पहावा या इराद्यानें बादशहा रोम शहरीं गेला. रोमच्या पोपनें घातल्या त्या सर्व अटी नाक मुठींत धरून त्यानें मानल्या. सेंट पीटर चर्चमध्यें जाऊन ग्रीक पंथ सोडल्याचें त्यानें जाहीर केलें व पोपचें धार्मिक वर्चस्वहि स्वतःवर लादून घेतलें. इतकी विटंबना झाल्यावर आपल्यापुढें गुढघे टेकून बसण्याची व हस्तचुंबनाची परवानगी रोमन पोपपासून त्यास मिळाली. आणि पोप खेचरावर बसून निघाला असतां त्याच्या खेचराचा लगाम धरून हिंडणें हा बहुमान असेल तर तोहि त्याच्या वाट्यास आला. इतके सोहाळे आटोपल्यावर पोपनें ख्रिस्ती राजांस कॉन्स्टँटिनोपलच्या बादशहाच्या वतीनें सुलतानाशीं लढण्यास उभे करावयाचें तर कोणताहि राजा सुलतानाविरुद्ध पाय धरीना. बादशहाची ही शरणागति अशा रीतीनें वाया गेली व त्याचें हें अपमानास्पद कृत्य ग्रीक पोपास पसंत न पडून तो तिकडूनहि फजीत पावला. ख्रिस्ती राजांत एकजूट कशी नव्हती व मुसलमानापुढें ते कसे पंगू होते, इकडे लक्ष पुरविणारास मुसलमानांचे ख्रिस्त्यावरील श्रेष्ठत्व कबूल करावें लागतें. दुही व धार्मिक शिकावणींतील दौर्बल्य यांनीं हतवीर्य झालेल्या ख्रिस्ती राजांस जिंकणें धर्माभिमानाचें व स्वार्थमूलक महत्त्वाकांक्षेचें स्फुरण चढलेल्या व जात्याच वीरवृत्तीच्या मुसलमानांस सोपें गेलें. बलगेरिया व सार्व्हिया या दोन्ही देशांच्या राजांस मुरादाच्या सेनेनें जिंकलें आणि बल्गेरियाच्या राजानें आपली बहीण सिसमन हिला सुलतानाचा जनानखाना दाखवून त्याची मर्जी संपादिली.

रजपूत राजांचा नक्षा जसा दिल्लीच्या मोगल बादशाहांनीं उतरविला, त्याच धर्तीवर सुलतानांनींहि परधर्मीय युरोपियन राजांचा स्वाभिमान हरण केला, त्यांच्या कन्यांशीं लग्नें लावून पुरुषार्थ गाजविलाच; पण ख्रिस्ती राजांस मदतीस घेऊन त्यांनीं आशियाखंडांतील मुसलमानी अमीरांसहि धुळीस मिळविण्यास कमी केलें नाहीं. मुरादाचें राज्य

आशियाखंडांत मुळींच वाढलें नव्हतें; म्हणून १३७६ पासून १३८० पर्यंत मुरादानें याच बाजूस लक्ष पुरविलें. त्यानें बऱ्याच अमीरांस जिंकून अंगोराच्या मैदानावर करमानियांशीं मोठाच संग्राम केला. पण तेवढ्यानें त्यास करमानियाचें राज्य सफाई बुडवितां आलें नाहीं. जशी ख्रिस्ती राजांत आपसांत जूट नव्हती, तसा मुसलमानी राजांतहि तिचा गंध नव्हता, हीहि गोष्ट या उदाहरणावरून सिद्ध होते. सुलतानास ख्रिस्ती राजांवर विजय मिळाले ते मुसलमानांच्या जुटीमुळें नसून सुलतानांच्या व त्यांच्या सेनापतींच्या शौर्यामुळें होत हेंहि विसरतां कामा नये.

मुराद करमानियाच्या लढाईनंतर थोड्याच दिवसांत मरण पावला. त्याच्या वाढत्या राज्यास सरंजामी, रिसाला व पगारी पायदळ अपुरें पडल्यामुळें त्यानें विश्वासू, एकदिल व निधड्या छातीचें सैन्य उभारण्याची एक नवीनच हिकमत काढली. लढाईत गुलाम करून आणलेल्या १० ते १२ वर्षांपर्यंतच्या ख्रिस्ती मुलांची सुंता करून त्यांस प्रथम महमदी धर्माची दीक्षा देण्यांत येई. आईबापांच्या अभावीं ममतेनें संगोपन करणाऱ्या सुलतानास ते पित्यासमान मान देत आणि ७।८ वर्षें लष्करी शिक्षण मिळाल्यावर विसाव्या वर्षीं त्यांस सैन्यांत दाखल करून घेण्यांत येत असे. ना आई, ना बाप, ना बायको, यामुळें या शिपायांस लढाईत जिवाची पर्वा वाटत नसल्यानें त्यांजपुढें प्रतिपक्षाचा टिकाव लागणें शक्य नसे. या सैन्यास जेनिसरीज म्हणत. जेनी=ज्यानी, ज्वानी=ज्वान =युवन म्हणजे तरुण व त्यांची चेरी=चमू म्हणजे सैन्य, हें सैन्य वाढत वाढत बारा हजारापर्यंत पोंचलें होतें. इतकें शिस्तवार, विश्वासाचें आणि निधड्या छातीचें सैन्य सुलतानाच्या पाठीशीं असल्यामुळें मोठमोठ्या लढायांत त्यास सहजच फत्ते मिळत गेली.

तैमूरलंगाची स्वारी.

बेयिझिड १३८९–१४०३

मुरादचा मुलगा बेयिझिड ३४ व्या वर्षीं गादीवर आला. त्यानें सर्व्हियाच्या स्टीफन राजापासून दरसाल खंडणी व पांच हजार सैन्य आपल्या चाकरीस ठेवून घेतलें. स्टीफनची बहीणहि सुलतानास मिळाली.

कॉन्स्टँटिनोपलच्या वृद्ध जॉन बादशहापासूनहि अशीच खंडणी बेयिझिडनें घेतली व १२ हजार सैन्याची कुमक मिळविली. बेयिझिद मोठा स्त्री-लंपट होता. मार्मोराच्या समुद्रांतून एक परदेशचें जहाज चाललें होतें. त्यावरील राजकन्येस पकडून आणून तिला जॉन बादशहाचा मुलगा सॅम्युएल यास देणाचा त्याचा विचार होता. पण त्या विचारांत मागाहून बदल होऊन त्यानें तिला आपल्यासाठींच जनानखान्यांत ठेवून घेतलें. आजूबाजूच्या अमीरांस जिंकण्याचा क्रम बेमिझिड यानेंहि पुढें चालवीत पूर्वेस करमानियापर्यंत आपल्या राज्याची हद्द वाढविली. १३९३ मध्यें बल्गेरिया पुरा हस्तगत झाला व हंगेरीच्या हद्दीस हद्द भिडली, त्यामुळें हंगेरीचा राजा सिगिस्मंड यास काळजी पडली. रोमचा पोप नववा बॉनि-फेस यानें या सुमारास ख्रिस्ती राजांस सावध राहण्याचा इषारा दिला. फ्रान्सचा राजा सहावा चार्लस याच्या कानावर ही गडबड गेली. त्याच्या प्रोत्साहनावरून फ्रान्सांतून आणि इंग्लंड, स्कॉटलंड, फ्लँडर्स व लंबार्डी येथूनहि अनेक योद्धे हंगेरीच्या मदतीस धावले. पुष्कळ जर्मन शिलेदारहि त्यांस येऊन मिळाले. सर्व सैन्याची साठ हजारांपर्यंत भरती झाली, व तें तुर्कांच्या ताब्यांतील निकोपोलीस किल्ल्यापाशीं तळ देऊन बसलें. पण त्यास तुर्कांचा इंगा माहीत नसल्यामुळें तें नायकिणीं-च्या नाचरंगांत व गाण्याबजावण्यांत दंग होऊन गेलें. हंगेरीचा राजा सिगिस्मंड यास तुर्कांचा पराक्रम पुरा माहीत होता; पण त्याच्या पोक्त सल्ल्यास कोणीच भीक घालीना. तुर्कांनीं या ख्रिस्ती बारभाईचा धुव्वा उडवून दहा हजार सैनिक कैद केले व त्यांची सुलतानाच्या हुकुमावरून कत्तल केली. बेयिझिडनें आपल्या कारकीर्दींत रूमचा म्हणजे आशिया-मायनरचा बराच मोठा भाग, मॅसिडोनिया, उत्तर बल्गेरिया व थिसली हे प्रदेश आपल्या राज्यास जोडले आणि सर्व्हिया, वालाशिया, बोस्निया, व ग्रीस यांस मांडलिक बनविलें. त्याच्या सामर्थ्यास आतांपर्यंत आरमा-राची जोड नसल्यामुळें त्याला परचक्रापासून समुद्रकांठच्या मुलखाचा बचाव करतां येत नव्हता; तथापि त्यानें नवें आरमार उभारून हीहि उणीव दूर केली.

पण याच सुमारास बेयिझिड यास शेरास सव्वा शेर भेटावा असा इतिहासप्रसिद्ध तैमुरलंग भेटला. तैमूरलंग याचा जन्म मध्य आशियांत समरकंद शहरीं १३३३ त झाला. वयाच्या पस्तिसाव्या वर्षीं त्यास जग जिंकण्याची उमेद आली. स्वर्गांत जसा एक देव तसा पृथ्वीवर एक राजा कां असूं नये, असा त्यानें स्वतः-सच प्रश्न विचारला. आणि पुढील तीस वर्षें याच प्रश्नास उत्तर देण्यांत त्यानें खर्च केलीं. पूर्वेस चीनच्या तटापासून पश्चिमेस रूमच्या सरहद्दीपर्यंत आणि उत्तरेस अरल समुद्रापासून दक्षिणेस भागीरथीसारख्या पवित्र सरितेपर्यंत सारा भूभाग त्यानें पादाक्रांत केला. १३९८ त हिंदुस्थानावर त्याची धाड आली व त्याचें नांव ऐकतांच दिल्लीचा बादशहा अहमदशहा राजधानी सोडून पळत सुटला. दिल्लीपतीची अशा रीतीनें गाळण उडविल्यावर दोन वर्षांनीं ही संक्रांत बेयिझिड्कडे वळली. आतांपर्यंत सत्तावीस राज्यें आणि नऊ राजघराणीं त्यानें धुळीस मिळविलीं होतीं. तुर्की साम्राज्यास त्याची हद्द भिडल्यामुळें बेयिझिड व तैमूर यांमधील संग्राम ठरून चुकला होता.

या प्रसंगानें बेयिझिड व तैमूरलंग यांचे दरम्यान झालेला पत्रव्यवहार अनेक दृष्टींनीं वाचनीय आहे. तैमूरलंग बेयिझिडास लिहितो ‘ तूं माझ्याशी असा मगरूरीनें कां वागतोस हें मी जाणतों. रूमच्या जंगलांत थोड्याशा लढाया तूं मारल्या असशील, पण त्या किती क्षुल्लक ! पैगंबराच्या कृपेनें कांहीं ख्रिस्ती राजांवर तूं समशेर चालविली आहेस आणि त्या पुण्य कृत्यामुळेंच तुझा मुलुख बेचिराख करण्याचें माझ्या जिवावर आलें आहे. पण भल्या माणसा ! थोडा विचार कर. हत्तीपुढें जशी मुंगी, तसा मजपुढें तूं. मुंगीवर हत्तीचा पाय पडण्याचा अवकाश कीं ती चेंगरलीच. ’ तैमूरलंगाच्या या पत्रास बेयि-झिडनें लिहिलेलें उत्तर याहूनहि घमेंडखोरीचें व असभ्यपणाचें आहे. तो म्हणतो ‘लढाईत मीं तुला पाठ दाखविली तर माझ्या स्त्रियांवर त्रिवार बला-त्कार झाल्याप्रमाणें मी दिलगीर होईन. पण मजबरोबर दोन हात कर-

ण्याचें धैर्य तुझ्या अंगीं न दिसलें तर तुझ्या स्त्रिया परपुरुषाशीं रत झाल्या असें समजण्यास तूं तयार आहेस काय?"

इ० स० १४०० त तैमूरलंगानें आर्मेनियाच्या सरहद्दीवरील तुर्कांच्या सिवास किल्ल्यास वेढा घातला. किल्ल्याची मजबुती चांगली होती व तो तुर्की फौजेनें शौर्यानें लढविलाहि; पण किड्याप्रमाणें हवीं तितकीं माणसें चिरडून किल्ला सर करण्यास तैमूर मागें घेणारा नसल्यानें तुर्कांचा त्याजपुढें निभाव लागणें अशक्य झालें. त्यानें सहा हजार माणसें लावून तटाखालीं सुरुंग घेतले व ते उडवून देऊन तटबंदी जमीनदोस्त केली. सिवास शहर हस्तगत झाल्यावर तैमूरलंगानें सूड म्हणून सहा हजार माणसांस जिवंत समाधि दिली.

सिवास येथील पराजयाची दुःखद वार्ता कानीं येतांच १४०१ मध्यें बेयिझिद एक लक्ष वीस हजार सैन्यानिशीं शत्रूस तोंड देण्यास सिद्ध झाला. पण तैमूर बेयिझिडशीं मुकाबल्यास न येतां बगल देऊन सीरियांत उतरला व त्यानें दमास्कस शहर सर केलें. सीरिया भागून मेसोपोटेमियांत घुसून त्यानें बगदादहि घेतलें. यानंतर त्यानें फिरून रूमकडे भरारी मारली व अंगोराच्या समरभूमीवर सुलतानाशीं सामना दिला. सुलतानाचें सैन्यहि मोठें होतें. त्याच्या बाजूनें सर्व्हियन राजा स्टीफन, इतर ख्रिस्ती पथकें व तार्तार लढत होते. जेनिसरींनीं मर्दुमकीची शिकस्त केली. पण बेयिझिडतर्फे आघाडीवर लढणाऱ्या तार्तर सैन्यानें स्वजातीयांस मिळून अन्नदात्यास दगा दिला. तैमूरलंगाचें सैन्यही संख्येनें शक्तीनें आणि पराक्रमानें अधिक होतें. यामुळें बेयिझिदच्या फौजेचा चुराडा उडाला. सैन्याची दाणदाण झाली तरी एकटा सुलतान बेयिझिड् शेवटपर्यंत लढत राहिला. पण एवढ्या अतुल शौर्याचा कांहींहि उपयोग न होऊन त्याला कैद व्हावें लागलें. तैमूरनें सुलतानाचा प्रथम मोठा मान राखला. पण सुलतानानें अटकेंतून सुटण्याचा प्रयत्न केल्यामुळें तैमूर रागावून त्याजबरोबर अत्यंत कठोरपणानें वागला. त्यानें सुलतानाच्या पायांत बेड्या ठोकल्या, उघड्या डोलींत घालून त्यास आपल्या स्वारीबरोबर हिंडविलें, सर्व्हियाची राजकन्या व त्याची राणी डेस्पिना हिला

आपल्या भोजनप्रसंगीं मद्यपात्रें घेऊन नग्न उभें रहावयास लावलें. तिची व तिजबरोबरच्या सुलतानाच्या इतर स्त्रियांची तैमूरच्या जनानखान्यांत रवानगी झाली. बेयिझिडचें नष्टचर्य एवढ्यानेंहि न संपून तैमूर त्याच्या पाठीवर पादपीठाप्रमाणें पाय ठेवून सिंहासनावर चढत असे असेंही म्हणतात.

तुर्की राज्याची धुळधाण उडवून तैमूर स्मरना शहरावर गेला. स्मरना शहर अद्यापि तुर्कांपाशीं चांगलें आरमार नसल्यामुळें सुलतानास सर करतां आलें नसून त्यावर सेंटजान नाईट यांचेंच राज्य होतें. सदर नाईट तैमूरचें वावटळ येतांच शहर सोडून पळाले आणि शहरांतले इतर लोक होते त्यांची कत्तल करून तैमूरलंगानें त्यांच्या मस्तकांचा मनोरा रचला. इ. स. १३९८ त तैमूर हिंदुस्थानांत उतरला होता, तेव्हां त्याच्या भीतीनें दिल्लीचा बादशहा महमूद तघलख गुजराथेंत फरारी झाला. दिल्लींतील पंधरा वर्षांवरील सुमारें एक लाख कैद्यांस त्यानें ठार केलें. रस्त्यांत प्रेतांचा खच इतका पडला कीं, रस्त्यांतून जिवंत माणसास फिरकणें अशक्य झालें. पांच दिवस लूट, कत्तल, व जाळपोळ यांशिवाय दिल्लींत दुसरा प्रकारच संभवत नव्हता. त्या हृदयद्रावक प्रसंगाची या वेळीं आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

सुलतान बेयिझिड हा तैमूरलंगाच्या कैदेंत आठ महिन्यांनीं झुरून झुरून मेला. बेयिझिड शूर असून अनेक दुर्व्यसनांनीं पीडित होता. तो वजिरांच्या संगतींत मद्यप्राशन करी, यथेच्छ विषयोपभोग घेई, आणि याहूनहि विपरीत गोष्ट अशी कीं, आपल्या राज्यांतील ख्रिस्ती आईबापांचीं देखणीं पोरें आणवून, त्यांस इस्लामी धर्माची दीक्षा देऊन व त्यांची हुजऱ्याच्या जागीं नेमणूक करून त्यांजबरोबर सृष्टिक्रमा-विरुद्ध कर्म करी !

महंमद पहिला १४१३–२१

तैमूरलंग निघून गेला आणि सुलतान बेयिझिद कैदेंत मेला. या अवधींत तुर्की राज्य मोठ्याच गंडांतरांतून बाहेर पडलें. त्याच्या पश्चात् त्याच्या पांच मुलांत गादीसाठीं तंटे लागून राहिले. अशा अडचणीच्या वेळीं ख्रिस्ती राजांनीं उचल खाऊन आणि जूट बांधून तुर्की साम्राज्यास

उठून उभें राहूं न देण्याचें कारस्थान रचलें असतें, तर मुसलमानांच्या जुलमांतून त्यांची कायमची सुटका झाली असती. पण पूर्व युरोपांतील तत्कालीन राष्ट्रांत जूट, बळ व ईर्षा नसल्यामुळें आलेली दुर्मिळ संधि त्यांनीं गमावली. इकडे पांचहि भावांत सुमारें दहा वर्षें यादवी माजली व त्या सर्व भावांत धाकटा भाऊ महमद यानें इतर सर्वांस लढाईत व अन्य प्रसंगीं ठार मारून गेलेलें राज्य परत मिळविलें. राज्याचा उपभोग घेण्यास महमद अवघीं आठ वर्षें वांचला, पण तेवढ्यांत त्यानें शौर्य, कर्तबगारी, सावधगिरी, मनमिळाऊपणा व संथपणा हे गुण प्रकटविले. महमद १४२१ त सत्तेचाळीस वर्षांचा होऊन मरण पावला. त्यानें 'हिरवी मशीद' नांवाची सुंदर इमारत ब्रूसा शहरीं बांधली.

मुराद दुसरा १४२१–१४५१

पहिल्या मुरादानंतर सुलतानपदास दीर्घकाल लाभलेला दुसरा सुलतान दुसरा मुराद हाच होय. मुख्य वारसाखेरीज करून बाकीच्या सर्व भाऊबंदांचा वध करण्याची वहिवाट आरखानापासूनच पडली होती. तीमुळें सुलतानपद बहुधा निष्कंटकच असे. तथापि त्यांतूनहि एखादा वारस शिल्लक राहिला तर तो कसा नडे, याचें एक उदाहरण मुरादाच्या वेळीं घडून आलें. बेयिझिडचा एक मुलगा मुस्तफा तैमुरलंगाशीं अंगोऱ्याच्या लढाईत लढत असतां कामास आल्याची बोलवा होती. त्याचा तोतया उभा करून कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा मॅन्यूअल यानें त्याच्यामार्फत तुर्की राज्यांत फूट पाडण्याची शक्कल काढिली. पण मुरादानें तोतयास पकडून व ठार करून तंट्याचें मूळच उपटून टाकलें. या गोष्टीचा सूड घेण्याकरितां मुरादानें बादशाहावर स्वारी केली आणि कॉन्स्टँटिनोपल खेरीज करून बाकीचें सर्व राज्य जिंकून घेतलें. कान्स्टँटिनोपलास वेढा पडून तें हातीं लागण्याचे बेतांत आलें होतें, तोंच रूममध्यें (आशिया मायनर) आणखी एक तोतया उठल्याची आवई येतांच मुरादास वेढा उठवून निघून जावें लागलें. आद्रियानोपल शहर याच वेळीं सुलतानास मिळालें. शहर जिंकल्यावर आंतील ग्रीक लोकांस गुलाम म्हणून विकण्यांत आलें. या

विक्रींत गिऱ्हाइकाच्या मानानें माल इतका रेलचेल होता कीं, पकड-लेली एक एक सुंदर ग्रीक मुलगी बुटाच्या किंमतीस विकली गेली !

बल्गेरिया साम्राज्यास जोडल्यावर डान्यूब नदीपलीकडे तुर्कांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या. हंगेरीचा राजा सिगिस्मंड याचा एकदां पराभव झाल्यापासून तुर्कांच्या नजरेस नजर भिडविण्याची त्याची छाती होईना. तेव्हां त्याचा शूर पुत्र हुन्याडी पुढें झाला आणि हुन्याडीस पोलंड, वाला-शिया आणि बोस्निया हे तुर्कांचें समानशत्रू मिळाले. सर्व्हियाचा स्टीफन राजा तुर्कांचा मांडलिक होऊन रहाण्यांत मानहानीच समजत होता. ताहि याच कारस्थानांत सामील झाला. रोमच्या पोपकडूनहि या कार्यास पुण्याशीर्वाद मिळाला. फ्रेंच व जर्मन सरदारहि आपपल्या फौजांनिशीं मद-तीस आले. इतालींत व्हेनिस व जिनोवा या प्रजासत्ताक राज्यांनींहि या व्यू-हास पाठिंबा दिला. सारांश इंग्लंड, पोर्तुगाल व स्पेन हे दूरचे देश वगळ-ल्यास सारा ख्रिस्ती धर्म तुर्क मुसलमानांस खावयास उठला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. किरिस्तावांनीं एवढी जय्यत तयारी केली होती, तरी त्यांस तुर्कांवर मोठासा जय मिळवितां आला नाहीं. ख्रिस्ती व मुस-लमान यांचे दरम्यान तह ठरून फक्त सर्व्हिया तेवढा तुर्कांपासून स्वतंत्र झाला.

यानंतर राज्यकारभाराच्या दगदगीस कंटाळून मुराद राज्यपद सोडून स्वस्थ बसला व त्याचा चौदा वर्षांचा कोंवळा मुलगा महंमद तख्तनशीन झाला. पोरवयाच्या महंमदास पाहून सुलतानाच्या युरोप व आशिया या दोन्ही खंडांमधील शत्रूंचें चांगलेंच फावलें. शेजारचा कर्मानियाचा अमीर तुर्कांवर उठला आणि हुन्याडीच्या निशाणाखालीं फिरून किरिस्ताव मंडळ पूर्ववत् खडें राहून काळ्या समुद्रांतून बल्गेरियांतील वार्णा बंदरांत उतरलें. ही आणीबाणीची वेळ येऊन ठेपतांच खासा मुराद याचें अवसान दुप्पट चढलें व त्यासरशीं सर्व सैन्याचें आधिपत्य स्वीकारून त्यानें साऱ्या ख्रिस्ती सेनेचा धुव्वा उडवून दिला. हंगेरीच्या राजाचें मुंडकें भाल्यावर टोंचून नाचवितांच ख्रिस्त्यांचा धीर सुटला. या संग्रामांत पोपचा कार्डि-नल, कित्येक बिशप व दोन तृतीयांश ख्रिस्ती सैन्य गारद झालें. मुरादानें

सर्व्हियास पुन्हा आपणासमोर मांडलिकत्व पत्करून नाक घासावयास लावलें आणि बोस्नियासहि त्याच्याच पंक्तीस बसविलें. एवढाले पराक्रम करून मुराद १४५१ त मेंदूच्या विकारानें मृत्यु पावला.

मुराद मोठा न्यायी, शूर व दिलदार होता.स्वतः विद्वान व दानशूरहि असल्यामुळें त्याच्या कारकिर्दींत विद्या, कला व शास्त्रें यांस बरेंच उत्तेजन मिळालें. कोणताहि देश जिंकल्यावर त्यांत मशिदी, धर्मशाळा, मद्रेसा व दवाखाने बांधल्यावाचून तो रहात नसे.

फत्ते महंमद १४५१-१४८१

बाप जिवंत असतांच महमदास दोनदां गादीवर बसण्याची सुसंधि प्राप्त झाली होती. आतां तो एकवीस वर्षांचा झाला होता. साऱ्या सुलतानांत महंमदाची योग्यता फार मोठी समजतात. बुद्धिमत्ता व विद्वत्ता आणि मुत्सद्दीपणा व सेनानायकत्व हे चारहि गुण त्याच्या अंगीं एकवटले होते. त्याला पांच भाषा अस्खलित बोलतां येत असत. त्याच्या इतका कुलाभिमान सुलतानांच्या घराण्यांत कोणाच्याहि अंगीं नसेल. या अनेक श्रेष्ठ गुणांबरोबरच त्याचे ठायीं क्रौर्य आणि विषयासक्ति कमालीस पोंचली होती.

राजघराण्यांतील गादीवर वारसा हक्क सांगणारा कोणीहि पुरूष जिवंत राहूं द्यावयाचा नाहीं असा सर्व सुलतानांचा नियमच होता; त्यास अनुसरून सर्व्हियाच्या राजकन्येपासून मुरादास झालेला मुलगा त्यानें स्नानगृहांतील पाण्यांत बुडवून जिवें मारविला; आणि त्या बालराजपुत्राच्या मातेचें म्हणजे आपल्या सापत्न मातेचें त्यानें एका गुलामाशीं लग्न लावून दिलें.

गादीवर बसल्यापासून महमदाचा कॉन्स्टँटिनोपलवर डोळा होता. त्याच्या बापाची ती एक अतृप्त राहिलेली इच्छा होती; आणि ती आपल्या कारकीर्दींत सिद्धीस नेण्याचा त्याचा ठाम विचार ठरला. मार्मोरा समुद्राचीं दोन्हीं तीरें तुर्की सत्तेनें व्यापिलीं होतीं; आणि त्यावरील सत्तेस मजबुती येण्यास बास्फरस, मार्मोरा व दार्दानेलीस हीं माऱ्याचीं ठिकाणें तुर्कांच्या कबजांत येणें आवश्यक होतें. बल्गेरिया, हंगेरी, पोलंड, रशिया

आणि जॉर्जिया या देशांस जगाची ओळख करून घेण्यास काळ्या समुद्राचीच मनधरणी करणें प्राप्त होतें. काळ्या समुद्राची ही योग्यता महंमदाच्या ध्यानीं आल्यावाचून कशी राहील ? वरील सर्व राष्ट्रांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची व स्वतःच्या सुरक्षिततेची ही गुरुकिल्ली हर प्रयत्नानें हस्तगत करण्याचा मनसुबा महंमदाच्या मनानें घेतला. एक कॉन्स्टँटिनोपल शहर पडलें कीं ही किल्ली हातांत पडणार होती.

कॉन्स्टँटिनोपल आतांपर्यंत ख्रिस्ती ग्रीक बादशहाच्या ताब्यांत असल्यामुळें हा बादशहा युरोपांतील इतर ख्रिस्ती राजांस मिळाल्यास रूम आणि थ्रेस यांमधील तुर्कांच्या दळणवळणास त्यास सहज खो देतां आला असता. तुर्की साम्राज्याचा विस्तार मुख्यतः युरोपांतच इतका झाल्यावर त्या साम्राज्याची मान ग्रीकांच्या मुठींत ठेवणें धोक्याचें होतें, यांत शंका नाहीं. ग्रीक आरमाराच्या तोडीचें आरमार सुलतानापाशीं नव्हतें, हीहि सुलतानाच्या वाटेंत आणखी एक अडचण होती. खेरीज कॉन्स्टँटिनोपलचा किल्ला इतका अजिंक्य होता कीं, त्यावर आतांपर्यंत मुसलमानांच्या अनेक लाटा आदळून फुटल्या होत्या. खुद्द महंमदाच्या बापानेंच कॉन्स्टँटिनोपलास घातलेला वेढा त्यास उठवावा लागला होता. हा अनुभव सुलतानाच्या डोळ्यांपुढें अगदीं ताजा होता. इतक्या अडचणींपुढें खचून न जातां अधिक ईर्षा मनांत बाळगून महंमदानें किल्ला जिंकण्यासाठीं कंबर बांधली, हें त्याच्या निश्चयाचें, चिकाटीचें आणि हिमतीचेंच द्योतक होय. कॉन्स्टँटिनोपलच्या शेजारीं आपल्याच हद्दींत आपला वेगळा किल्ला बांधण्याचें महंमदानें योजिलें. ही गोष्ट ग्रीक बादशहास भीतिप्रद असल्यानें त्यानें सुलतानास विरोध केला. पण त्यास न जुमानतां सुलतानानें १४५२ मध्यें किल्ल्याचें बांधकाम पुरेंहि केलें. किल्ल्यावर हल्ला चढविण्याची एक बाजू बळकट केल्यानंतर हंगेरीचा राजा व करमानियाचा अमीर या दोन मुख्य व प्रबळ शत्रूंशीं तह करून त्यानें परचक्राची भीति काढून टाकली. युरोपांत तोफा नुकत्याच प्रचारांत येऊं लागल्या होत्या. सुलतानापाशीं अशा प्रकारच्या तोफा ओतणारे कारागीर नव्हते. यासाठीं त्यानें ग्रीकांच्या पदरीं असलेल्या एका वालाशियन कारागिरास जास्ती पगा-

राची लालूच दाखवून वश करून घेतलें. आद्रियानोपल या राजधानीच्या शहरीं त्याजकडून एक कारखानाहि काढण्यांत आला. या कारखान्यांत तीन महिन्यांच्या आंत एक तोफ ओतवून निघाली. ती बारा काठ्या लांब होती आणि तिच्यांतून तीनशे शेर वजनाचा गोळा टाकतां येत होता. चोंहोंकडे दवंडी देऊन राजवाड्यासमोर सर्वांच्या देखत गोळा उडविण्याचा समारंभ झाला. तो गोळा दारूच्या जोरावर एक मैल लांब उडाला आणि जेथें पडला तेथें जमिनींत एक पुरुष खोल गेला. आद्रियानोपलपासून कॉन्स्टँटिनोपल दीडशे मैल अंतरावर आहे. तेथें साठ बैलांनीं ती तोफ दोन महिन्यांत ओढून नेली. १४५३ सालाच्या प्रारंभीं कॉन्स्टँटिनोपल शहरासमोर सुलतानाचें दीड लाख सैन्य जमा झालें, त्यांत जेनिसरीज बारा हजार होते.

प्राप्त झालेल्या संकटास तोंड देण्याची कॉन्स्टँटाईन बादशाहासहि तयारी करणें भाग पडलें. युरोपांतील सर्व ख्रिस्ती राष्ट्रांची मदत मिळावी म्हणून ग्रीक पंथ व रोमन पंथ यांचा समेट करण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यांत रोमन पंथाच्या बहुतेक अटी बादशहानें पत्करल्या. परंतु ग्रीक लोकांची धर्मबुद्धि इतकी कोती होती कीं, रोमन पंथाचें वर्चस्व कबूल करून धर्मरक्षण व आत्मरक्षण करण्यापेक्षां कॉन्स्टँटिनोपल शहरांत तुर्कांची पगडी झळकली तरी चालेल, पण कार्डिनलची टोपी दिसतां कामा नये असें खुद्द बादशाहाचा सेनापति ग्रँड डयूक नोटारस देखील म्हणूं लागला. कॉन्स्टँटिनोपलसारख्या ख्रिस्ती धर्मक्षेत्रावर इस्लामी चांद चमकण्याचा बिकट प्रसंग आला असतां, फ्रान्स, जर्मनी, हंगेरी, पोलंड या देशांतून एकहि शिपाई बादशहाच्या मदतीस धावून आला नाहीं. यामुळें ऐनवेळीं बादशहापाशीं अवघें आठ हजार सैन्यहि जुळलें नाहीं.

कॉन्स्टँटिनोपल

कॉन्स्टँटिनोपल शहराची वस्तु ग्रीक लोकांनीं इ० स० पूर्वीं ६६६ वर्षें निवडून काढली. याचें मूळ नांव बिझांटियम असून तेथील राज्यास तेंच नांव प्राप्त झालें. रोमच्या कॉन्स्टँटाईन बादशहानें तें ग्रीकांपासून जिंकून घेऊन राजधानीचा मानहि त्याजकडेच पूर्ववत् चालू ठेवला

रोमन लोकांस आजूबाजूस जमीनजुमला देऊन कॉन्स्टंटाईन राजकुलानें त्यांची वस्ती करविली. व्यापाराच्या विशेष सोयींमुळें पुष्कळ उदमी व खलाशी येथेंच येऊन राहिले. कॉन्स्टंटाइन पहिला बादशहा त्यास नवें रोम शहर म्हणूं लागला; पण बादशहाच्या मरणोत्तर त्याचेंच नांव त्या शहराकडे परतलें.

भूमध्य समुद्र व काळा समुद्र यांचा स्नेहसंबंध एका खाडीनें कायम ठेवला आहे. ही खाडी मध्यंतरीं रुंद व दोन्ही शेवटांस निमुळती होत गेल्यामुळें तिचा आकार दुतोंड्या बाटली सारखा झाला आहे. भूमध्य-समुद्राकडील तोंडास दार्दानेलीस आणि काळ्या समुद्राकडील तोंडास बॉस्फरस सामुद्रधुनी असें म्हणतात. दोन्ही तोंडांच्या आंतील भाग त्यास समुद्र मानावा इतका फुगीर आहे व म्हणून त्यास मार्मोराचा समुद्र म्हणतात. दार्दानेलीसच्या तोंडाशीं गॅलीपोली आहे. कॉन्स्टँ-टिनोपलपासून या दोन्ही सामुद्रधुन्या दूर असून कॉन्स्टँटिनोपल त्यांच्या मध्यभागीं मार्मोरा समुद्रावर आहे; आणि मार्मोरा समुद्राची एक ओळ पश्चिमेस जमिनींत घुसली असून तिलाच त्याच्या वैभवावरून सुवर्णशृंग अशी अभिमानास्पद संज्ञा मिळाली आहे. कॉन्स्टँटिनोपलचा जगप्रसिद्ध किनारा याच जलप्रवाहावर आहे. सुवर्णशृंगानें उत्तर बाजू आणि मार्मो-रानें पूर्व व दक्षिण बाजू संभाळल्यामुळें समुद्रवलयांकित अशा कॉन्स्ट-टिनोपलचा जमिनीनें मोकळा टाकलेला पश्चिमेकडील भाग ग्रीक राजांनीं तटांनीं झाकून घेतला. भूमध्य समुद्रापासून काळ्या समुद्रापर्यंत दोन्ही सामुद्रधुन्या व मधला समुद्र यांची लांबी ४५ मैल व रुंदी एक मैला-पासून पांच मैलांपर्यंत आहे. भूमध्यसमुद्र किंवा काळा समुद्र यांतून मार्मोरा समुद्रांत शिरावयाचें तर दार्दानेलीस किंवा बॉस्फरस या दोन नळ्यांत प्रथम प्रवेश केला पाहिजे; आणि अशा रीतीनें बॉस्फरसाच्या जठरांत संचार सुरू झाला, तरी तेवढ्यानें इस्तंबूल हस्तगत होतें असें नाहीं. इस्तं-बूलच्या किनाऱ्यावर चढण्यापूर्वीं सुवर्णशृंगावर बसावें लागतें. सुवर्णशृंगाची लांबी आठ मैल व रुंदी दोन मैल आहे. दोन्ही सामुद्रधुन्यांचे दोन्ही किनारे ठायीं ठायीं बांधलेल्या किल्ल्यांनीं आधींच दुर्भेद्य करून सोडले

आहेत, आणि त्यांसहि न जुमानतां एखाद्या धाडसी शत्रूनें वाट काढली तरी त्यास अडवून धरण्यास सुवर्णशृंगांची दिंडी उभी आहेच; ती झाकून घेतली कीं शत्रूचे सर्व उपाय हरले आणि यामुळेंच कॉन्स्टँटिनोपल सारखा सोयिस्कर व सुरक्षित किनारा जगांतील कोणत्याहि बंदरास लाभला नाहीं म्हणतात. तें खोटें नव्हे.

कॉन्स्टँटिनोपलचें हें ठिकाण इतकें मजबूत आणि तशांत तटबंदीनें त्याची खांबिरी वाढविल्यामुळें तर 'आधींच सोन्याचें आणि त्यांत जडावाचें' अशी त्याची स्थिति झाली आहे. शहराभोंवतीं १२ मैलांचा कोट आहे सुलतान महंमदानें शहरावर हल्ला चढविला, तेव्हां त्यास एका आड एक असे तीन तट होते. बाहेरचा तट साठ फूट रुंद होता. या तटांतून आंत शिरल्यावर दोन अजस्र तट लागत असून त्यांजमधील अंतर साठ फूट होतें. ही तटबंदी इतकी मजबूत होती कीं, तिनें एक हजार वर्षे कॉन्स्टँटिनोपलचें संरक्षण केलें आणि त्या मुदतींत शत्रूच्या वीस स्वाऱ्या परतविल्या. तटाच्या भिंतींचें प्राचीनत्व आजहि त्यांवर पसरलेल्या वयोवृद्ध वृक्षांच्या शाखा पटवून देतात. शहराचें सौंदर्य दुरून अप्रतिम दिसतें. त्यांत प्रेक्षणीय व प्राचीन स्थळें असंख्य आहेत. ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें आणि इस्लामी मशिदी यांची जणूं काय स्पर्धाच लागून राहिली आहे. सेंट सोफियासारख्या ख्रिस्ती देवळांवरील क्रॉसपाशीं मुसलमानांचा चमकणारा चांद शहराचें सौंदर्य अधिकच खुलवून दाखवितो. शहराकडे बाहेरून नजर फेकणाऱ्याच्या चित्तास सुंदर शरीराच्या नीटस अवयवांप्रमाणें शहरच्या सर्व भागांतील प्रमाणबद्धता व समरसता पाहून जो आनंद होतो तो अवर्णनीय होय. शहराच्या शिरोभागीं अनेक इमारतींचीं शिखरें एकमेकांवर ताण करतांना आढळतात. पण त्यांत सेंट सोफियाचें चर्च, सुलतान महंमदाचे मनोरे आणि सुलेमानी मशिदीचा घुमट यांची बरोबरी कोणाच्यानेंहि करवत नाहीं.

धर्म, राजकारण, लोकव्यवहार, विद्या आणि कला यांचें निवासस्थान होऊन रहाण्यास कॉन्स्टँटिनोपल शहराच्या अंगीं कांहीं अद्वितीय गुण असला पाहिजे, हें सांगावयास नकोच. हा अद्वितीय गुण म्हणजे

कॉन्स्टँटिनोपलचें वास्तुमहात्म्य. कॉन्स्टँटिनोपलास वास्तूच अशी मिळाली आहे कीं, त्या शहराची थोरवी कालत्रयींहि नष्ट होऊं नये.काळा व भूमध्य हे दोन समुद्र आणि आशिया व यूरोप हीं दोन खंडें यांच्या मेहेरपींत बसलेल्या कॉन्स्टँटिनोपलकडे पाहून तुर्की सुलतानास सोन्याच्या अंगठीची उपमा आठवे. दोन समुद्र हे दोन पाचूचे खडे आणि दोन खंडें हीं माणकें ज्यावर जडविलीं आहेत, अशी इस्तंबूलची अंगठी आपल्या राज्यलक्ष्मीच्या करांगुलीवर केव्हां चढेल अशी साम्राज्यसंस्थापक उस्मान याच्या मनास चुटपूट लागून राहिली होती.

आशिया, युरोप व आफ्रिका या जुन्या त्रिखंड पृथ्वींत जें माहात्म्य भूमध्य समुद्राचें तेंच खास युरोपांत काळ्या समुद्राचें होय; आणि हे दोन्ही समुद्र कॉन्स्टँटिनोपलच्या दोन्ही तळहातांवर खेळत असल्यामुळें ज्याच्याकडे कॉन्स्टँटिनोपलचें प्रभुत्व,त्याजकडे साऱ्या युरोपखंडाचें सामित्व अशी एक वेळ स्थिति होती. डान्यूब व डॉन ह्या नद्या काळ्या समुद्रास आणि व्हॉन ही नदी कास्पियन समुद्रास मिळते. या तिन्ही नद्या आपल्यांतील पाण्याबरोबर त्या त्या प्रांतांतील संपत्तीचा ओघहि कॉन्स्टँटिनोपलच्या किनाऱ्यावर वाहून आणीत. ऑस्ट्रिया, हंगेरी, व बल्गेरिया व रुमानिया या मध्य युरोपांतील देशांमधील सुवर्णरजांनीं इस्तंबूलचा किनारा सुवर्णमय करून सोडला आणि डॉन व व्होलगा या नद्यांनीं दक्षिण रशियांतील विपुल धान्याच्या राशी आणून ओतल्या. या अगणित संपत्तीमुळेंच इस्तंबूलच्या किनाऱ्यास सुवर्णशृंग ही सार्थ संज्ञा प्राप्त झाली आहे. याखेरीज आशियांतील दूरदूरच्या पूर्वेकडील देशांतून येणाऱ्या कारवानांस सांडणीवरून आणलेला माल उतरण्यास कॉन्स्टँटिनोपलाशिवाय लगत्याची दुसरी पेठ नव्हती. इराणचे रंग, डाक्याची मलमल, चीनचीं मृण्मय पात्रें व टुकून वस्त्रें आणि मसाले लांबच्या मुशाफरीवरून दमून आल्यानंतर युरोपांत संचारार्थ निघण्यापूर्वीं कॉन्स्टँटिनोपलच्या बंदरांतच विसावा घेत.

दुरून पहातांना शहर सुंदर दिसतें खरें, तरी पण त्याजविषयीं प्रथम झालेला अनुकूल ग्रह शहरांत पाऊल पडल्यावर लवकरच मावळल्यावांचून रहात नाहीं. बहुतेक घरें लांकडी आहेत आणि तीं ज्यांत बांधलीं

आहेत त्या गल्ल्या अतिशय गलिच्छ व गजबजलेल्या आहेत. यामुळें शहरांत साथी वारंवार उद्भवतात आणि आगी पेट घेतात. सन १८३१ मध्यें अशीच एक भयंकर आग लागून पंधरा हजार घरें जळालीं व एक लाख माणसें उघडीं पडलीं. शहरांत वेगवेगळ्या धर्मांचे व जातीचे लोक वेगवेगळया मोहल्ल्यांतून राहतात. फनार नामक मोहल्ल्यांत ग्रीक वस्ती आहे. व्यापार व सावकारी यांवर येथील ग्रीक चांगले गबर झाले आहेत. पूर्वींच्या ग्रीक राजवटींतील हे मानकरी होत. इस्लामी तरवारीपुढें वांकून आणि राजे पाशा अशा पदव्यांची झूल पाठीवर वाहून ते हव्या त्या मार्गानें संपत्ति कमावतात. कॉन्स्टॅंटिनोपलची वस्ती सुमारें नऊ लाख आहे. त्यांत निम्या स्त्रिया व बेचाळीस हजार गुलाम आहेत. युरोपियन लोकांनीं आपली वसाहत सुवर्ण शृंगाच्या पैल तीरावर केली आहे. पेरा व गलाटा आणि स्कुटारी हीं अशींच वसलेलीं उपनगरें होत. या उपनगरांची रचना पाश्चात्य धर्तीची आणि वस्ती श्रीमंतांची आहे.

कॉन्स्टॅंटिनोपलास तट चोहोंकडून होता आणि त्यांतल्या त्यांत जमिनीच्या बाजूचा तट विशेष बळकट होता. १४५३ सालीं एप्रिल महिन्याच्या प्रारंभीं किल्ल्यास वेढा पडला. जमिनीच्या बाजूनें किल्ल्यावर तोफांचा मारा प्रथम करून पहाण्यांत आला. पण किल्ला पडण्याचें चिन्ह दिसेना. किल्ल्यांत सांपडलेल्या नागरिकांची बाहेरून समुद्रांतून येणारी रसद मारण्याचा प्रयत्न झाला. पण तुर्क दर्यावर्दीपणांत ग्रीकांइतके निपुण नसल्यामुळें त्यांचा हा प्रयत्न फसला. किल्ल्याची जमिनीकडील बाजू जितकी खंबीर होती, तितकी सुवर्णशृंगाकडची नव्हती. बॉस्फरसच्या बाजूनें सुवर्णशृंगाच्या वरच्या अंगाकडून सुलतान महंमदानें आडवा लांकडी पूल बांधविला; आणि मेण चोपडून तो इतका गुळगुळीत केला कीं, त्यावरून शहरच्या बाजूस जहाजें सहज घसरत जावीं. बादशहाचें सैन्य थोडेंच असल्यामुळें त्यानें जमिनीच्या बाजूस तें एकत्र गोळा केलें होतें. पाण्यांतून हल्ला होईल अशी त्यास कल्पनाहि नव्हती. त्या बाजूनें मारा सुरू होतांच शहराचा तिकडून बचाव करण्यासाठीं बादशहास आपलें कांहीं सैन्य तिकडे न्यावें लागलें. पाण्याकडून सात आठवडे

तोफांचा धडाका सुरू राहिल्यावर तटाची भिंत ढांसळून खंदक मातीनें भरून गेला. ग्रीकांनीं मर्दुमकीची शिकस्त केली. खासा सुलतान महंमद आपल्या सैन्याच्या आघाडीवर उभा राहून सैनिकांस प्रोत्साहन देत होता. रोमॅनस दरवाजापाशीं तुर्की फौजेनें गर्दी केली. तटाच्या तीन चिलखतांपैकीं दुसऱ्या चिलखताचा दरवाजा बंद केल्यामुळें शत्रूस जिंकावें किंवा मरून जावें याशिवाय ग्रीकांस तिसरा मार्गच खुला नव्हता. तिसरें चिलखत ज्या ठिकाणीं ढासळलें होतें तेथें ग्रीकांनीं लांकडी बुरूज रचला होता. त्या बुरुजावर तोफा डागून उडालेल्या धुळीच्या लोटांत तुर्की सैन्य आंत घुसलें. तुर्कांचे दोन हल्ले ग्रीकांनीं परतविले. तिसऱ्या खेपेस सुलतानानें जेनिसरीजची अस्सल तुकडी आणली होती. फिरून तोफ डागण्यांत आली. तिनें उडविलेल्या धुराच्या लोटांत जेनिसरीजपुढें घुसून हातघाईची लढाई जुंपली. लढाई ऐन रंगांत आली असतां ग्रीक सेनापति गिस्तिनिआनी जखमी झाला व रणांगण सोडून दुसऱ्या तटाचा दरवाजा उघडून निघून गेला. त्याबरोबर सैन्याचा धीर खचला. महंमदानें शत्रूची गोम ओळखली व ओरडून जेनिसरीजना आश्वासन दिलें कीं, ‘ शहर घेतलें. तें आमचें झालें. तटावर चिटपाखरूहि नाहीं. ’ त्या आवेशयुक्त भाषणासरसा तुर्की सेनासमुद्र वेगानें पुढें धावला, बादशहाचें धाबें दणाणलें व तो आर्तस्वरानें म्हणाला ‘ शहर तर हातचें गेलें आणि मी जिवंत कसा !’ बादशहा लढतां लढतां पडला व त्याची फौज तुर्कांनीं एकजात कापून काढली. या अपूर्व यशाचा धनी सेनाधुरंधर महंमद हाच होय !

शहरांत शिरल्यावर कत्तल, लूट आणि धरपकड यांची तुर्कांनीं विजयोत्साहांत दंगल माजवून दिली. जिवाच्या भीतीनें ख्रिस्ती लोकांच्या झुंडीच्या झुंडी सेंट सोफियाच्या प्रसिद्ध चर्चमध्यें दडल्या. समजूत ही कीं, या पवित्र मंदिरास शत्रू धक्का लावणार नाहीं. पण तुर्कांनीं तेंच स्थळ नेमकें गांठलें. तेथील देवास वाहिलेल्या कुमारिकांच्या वेण्या ओढून त्यांच्या जवळचा एकूण एक दागिना त्यांनीं लुबाडला. हा कहर तीन दिवसांनीं सुलतानानें आपल्या हुकुमानें थांबविला. सुलतान एके दिवशीं

घोड्यावर बसून सेंट सोफियाच्या चर्चमध्यें गेला आणि मुल्लास सांगून त्यानें सोफिया चर्चची मशीद बनविली. कॉन्स्टँटिनोपलच्या चर्चची मशीद बनविणें म्हणजे औरंगजेबानें काशींतील विश्वेश्वरास गंगेंत फेकून देण्यासारखेंच भयंकर कृत्य होय. महंमदानें याच सुमारास एक अत्यंत घोर कर्म केलें. एके दिवशीं सुलतान दारूच्या निशेंत मेजवानीस बसला असतां, त्यानें ग्रीक सेनापति नोटारस याजकडे आपल्या खोजास पाठवून त्याचा देखणा मुलगा मागितला. या विलक्षण मागणीचा अर्थ तात्काळ ओळखून सेनापतीनें मुलास देण्याचें साफ नाकारलें. याचें प्रायश्चित्त नोटारस यास लागलीच मिळालें. सुलतानाच्या हुकुमावरून नोटारस व त्याचीं बायकामुलें यांची कत्तल उडविण्यांत आली आणि त्यांच्या रुंडमाला मेजवानीच्या जागीं सभोंवार ठेवून त्यानें या आराशीनें मेजवानीचा दिवाणखाना शृंगारला.

ख्रिस्त्यांस बाटवून स्वधर्माचा प्रसार करण्याचा महंमदाचा प्रधान हेतु नव्हता. युरोपांत स्थापन केलेल्या राज्यास बळकटी आणणें आणि तें मजबूत पायावर वाढीस लावणें हा उद्देश मनांत होता; म्हणून महंमदास एवढ्या महत्कार्यास हात घालण्याचें स्फुरण चढलें. केवळ धर्मप्रसारार्थ राज्यें मिळविल्याचीं उदाहरणें मुसलमानी राजांतहि क्वचित्‌च सांपडतील. तथापि पूर्वेकडील रोमन साम्राज्याची राजधानी, ग्रीक पंथाचें धर्मक्षेत्र, व्यापाराचें केंद्र व युरोपखंडाचें नाक इत्यादि गुणांनीं कॉन्स्टँटिनोपलकडे सुलतानाचें लक्ष्य ओढलें. कॉन्स्टँटिनोपल जिंकून सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यावर महंमदानें ग्रीक क्लर्जी गेनॅडियस यास बोलावून आणिलें व त्याची पॅट्रिआर्कच्या आचार्यपीठावर स्थापना केली. ‘ मी तुझी पॅट्रिआर्क म्हणून नेमणूक करीत आहे. ईश्वर तुझें रक्षण करो, प्रसंगीं माझें स्मरण कर म्हणजे मी तुझ्या साहाय्यार्थ धावत येईन. तुझ्या पूर्वींच्या पॅट्रिआर्कास जे अधिकार व हक्क होते ते सर्व तुजकडे चालत राहतील ’ असेंहि सुलतानाकडून त्यास आश्वासन मिळालें. महंमदाच्या उलट विचारसरणी हंगेरीचा देशभक्त हुन्याडी याची होती. कॉन्स्टँटिनोपल हस्तगत झाल्यास मी तेथील ग्रीकचर्च मोडून कॅथॉलिक चर्च उभारीन ’ हें हुन्याडीचें कोतें व आत्म-

घातकी उद्गार कोठें आणि महंमदाचे उदात्त व सर्वसंग्राहक विचार कोठें! तत्कालीन ख्रिस्ती व मुसलमान राजांत अंतर होतें तें हेंच होय. महंमद म्हणत असे ' आमच्या प्रत्येक मशिदीशेजारीं तुमचें चर्च बांधलें जाईल व त्यांत तुम्हास प्रार्थना करण्यास सदर परवानगी राहील. जिंकलेल्या प्रजेच्या मनावरील जखमेस सतत चिघळीत बसण्याचें खुनशी व अनुदार धोरण महंमदास पसंत नव्हतें. आपल्या नव्या राजधानीचें वैभव वृद्धिंगत व्हावें, यासाठीं महंमदानें ग्रीक, यहुदी व तुर्क यांची मुद्दाम सवलती देऊन वस्ती करविली.

कॉन्स्टँटिनोपल मागून सर्व्हियापलीकडील बोस्निया व मोरिया प्रांत, काळ्या समुद्राच्या दक्षिण तीरावरील आर्मीनियाजवळचें त्रिबिझोंदचें राज्य व आपल्या रूममधील राज्याच्या पूर्वेकडील हद्दीवरील करमानियाची अमिरात हीं सर्व बुडवून महंमदानें आपल्या राज्याचा विस्तार केला. डान्यूब नदीच्या पलीकडील वालाशिया प्रांत आणि काळ्या समुद्राच्या उत्तर तीरावरील क्रीमिया यांनीं त्याचें मांडलिकत्व पत्करलें. ग्रीक आर्किपेलेगामधील लेसबास लेमास वगैरे बरींच बेटें जिंकून त्यानें व्हेनीसपर्यंत स्वारी केली. व्हेनीसचें लोकसत्ताक राज्य सुलतानास शरण आलें. हंगेरींत व जर्मनींत शिरण्याचा त्याचा बेत होता, पण तो ख्रिस्ती राजांनीं एक होऊन सिद्धीस जाऊं दिला नाहीं. आद्रियानोपलचा राज्यलक्ष्मीनें त्याग केला व ती कॉन्स्टँटिनोपलास रहावयास गेली. दार्दानेलीस सामुद्रधुनीच्या दुतर्फा दोन किल्ले बांधून त्यांवर तीस तीस तोफा चढविण्यांत आल्या. समुद्रावर माशाप्रमाणें तरंगण्याचा प्रसंग आल्यानें भूमध्य समुद्रावरील एका देशापेक्षां आधिक आरमार बाळगणें सुलतानास भाग पडलें. याच आरमाराच्या बलावर त्यानें र्‍होडस बेटहि सर केलें. अशा रीतीनें हंगेरी, पोलंड, रुमानिया सबंध रूम, (आशियामायनर) यावर म्हणजे युरोपखंडाच्या एक चतुर्थांश भागावर महंमदाचें वर्चस्व बसलें.

योद्धा व सेनापति, राज्यकर्ता व मुत्सद्दी, रसिक व प्रजाहितदक्ष हे सर्व गुण महंमदांत एकवटले होते. त्याच्या सैन्याची टापटीप उत्तम व

व दारूगोळा आणि शस्त्रास्त्रें भरपूर व जय्यत होतीं.व यांतील मुख्य मुख्य शहरीं त्यानें शाळा, पाठशाळा (कॉलेजें) व दवाखाने घातले आणि मशिदी बांधल्या. विद्वानांस त्याचा चांगला आश्रय होता. विषयोपभोगांत त्यानें सृष्टिक्रमहि सोडला होता. एकवीस वर्षें राज्य करून लढायांच्या दगदगीनें ५१ व्या वर्षीं महंमद मरण पावला. कॉन्स्टँटिनोपल सर केल्याबद्दल त्यास बहुमानदर्शक फत्ते ही पदवी मिळाली होती. कॉन्स्टँटिनोपलांत पहिला पुरलेला सुलतान महंमदच होय.

दुसरा बेयिझिड १४८१—१५१२

वयाच्या पसातिसाव्या वर्षीं बेयिझिडास तक्त मिळालें.त्यानें एकतीस वर्षें राज्य केलें; पण त्याच्या शांतवृत्तीमुळें त्याच्या कारकिर्दींत महत्त्वाची गोष्ट एकहि घडली नाहीं. त्यानें हार्जिगोविना प्रांत आपल्या राज्यास जोडला व मोरियांतील नाव्हारिनो, मोडोन व कोरोन हे किल्ले व्हेनीशियन राजांपासून मिळविले. जेनिसरीज सैन्याचें प्रस्थ याच्या कारकिर्दींत इतकें माजलें कीं, त्यांतील सैनिक सुलतानास जुमानीनासे झाले. सुलतानाच्या तीन पुत्रांत सर्वांत धाकटा सेलीम हुशार व कर्तबगार होता. पण मधल्या मुलावर सुलतानाची मर्जी होती. ती सेलिमास न आवडून व जेनिसरीजच्या मदतीनें बंड करून त्यानें सुलतान बेयिझिड यास पदच्युत केलें. पदच्युत झाल्यावर बेयिझिड तीनच दिवसांत मृत्यु पावल्याची बातमी फुटली. कदाचित् सेलिमानेंच त्याचा गुप्तपणें वध करविला असेल.

खिलाफतप्राप्ति.

पहिला सेलीम १५१२—१५२०

सेलिमास अवघीं आठच वर्षें राज्य लाभलें. पण तेवढ्या अल्पावधींत अनेक घडामोडी करून त्यानें राज्यविस्तार दुप्पट वाढविला. यूरोपांत हंगेरियनांच्या प्रतिकारामुळें तुर्कांच्या पराक्रमाची डान्यूब नदी हीच सरहद्द ठरून गेली होती. तेव्हां तिकडे पाठ फिरवून सेलिमानें आशिखंडाकडेच मोर्चा वळविला. पूर्वेच्या बाजूस इराणचा शहा आणि ईजिप्तचे मामेल्युक यांशिवाय सेलीमास नांव घेण्यासारखा प्रतिस्पर्धी उरला नव्हता. हे शत्रू बरेच जबरदस्त होते आणि त्यांस सामना देण्या-

पूर्वी स्वराज्य निष्कंटक करणें सुलतानास आवश्यक वाटलें. सेलिमाचे खोरकंद व अहमद हे दोघे भाऊ रूममध्यें सुभेदारीच्या हुद्यावर होते. त्यांनीं सेलिमाविरुद्ध राज्यांत फितुरी माजविली. त्यांचें प्रथम पारिपत्य करून त्यांपैकीं खोरकंदाचें मस्तक त्यानें बाणानें उडविलें. पांच वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंतच्या पांच पुतण्यांचाहि असाच शिरच्छेद करण्यांत आला. उरलेला अहमद याचीहि अवस्था पुढें तशीच झाली.

मुसलमानांत शिया व सुनी असे दोन प्रमुख पंथ असून त्या दोहोंत पूर्वींपासून उभा दावा आहे. तुर्क सुनी व इराणी लोक शिया असल्यामुळें या दोन समबल राज्यकर्त्यांत वैमनस्याचा अधिक पीळ बसला. रूममध्यें इराणांतून बरेच शिया येऊन राहिले होते. त्यांपैकीं चाळीस हजार शियांची सेलिमानें कांहीं कुरापतीवरून कत्तल करविली. अहंमदाचा मुलगा व सेलिमाचा पुतण्या मुराद यास शहानें आश्रय दिल्यावरून सुलतानानें हें घोर कर्म करविलें असेंहि म्हणतात. या वेळीं इराणचा शहा इस्माईल होता. इस्माईल यानें आपल्या राज्याचा बराच विस्तार केला होता आणि त्याची सरहद्द रूमपर्यंत येऊन भिडली असल्यामुळें ती मागें हटविल्यावांचून सुलतानास आपलें राज्य पूर्वेकडे फैलावणें शक्य नव्हतें. इ. स. १५१४ च्या मार्च महिन्यांत दीडलाख फौज व तीनशे तोफा यांनिशीं सेलिम मोहिमेवर निघाला. इराणची त्यावेळची राजधानी ताब्रिज, इस्तंबूल पासून कमींत कमी एक हजार मैल तरी होती. इराणच्या हद्दीपाशीं सुलतानाचें सैन्य येतांच त्याला तोंड देण्याचें सोडून शहा आपलाच मुलूख बेचिराख करीत ताब्रीजकडे परत फिरला. सरहद्दीवरून सेलिमानें शहास चिडविणारीं दोन पत्रें लिहिलीं. त्यांपैकीं एका पत्रांतील मजकूर पुढील आशयाचा होता. ' राज्यश्री ही कांता आहे. ती ज्याचा ओठ तलवारीच्या पात्याचें चुंबन घेतांना पांढरा पडत नाहीं अशा वीरासच वरते. ' त्यास शहानें उत्तर दिलें कीं ' असलें हलकट पत्र सुलतानाच्या टाकांतून उतरणें शक्य नाहीं. तें बहुधा सुलतानाच्या चिटणीसानें अफूच्या कैफांत खरडलें असावें ! या पत्रासोबत शहानें एक अफूची डबीहि सुलतानास मस्करीनें नजर पाठविली.

मोहिमेवर निघाल्यापासून ११६ दिवसांची मजल मारून सुलतान शहाच्या राजधानीपाशीं ठेपला. शहाची भिस्त रिसाल्यावर आणि सुलतानाची तोफखान्यांवर आणि बंदुकांवर होती. गोलंदाजीचा शोध आशिया खंडांतील या देशांत माहीत नव्हता आणि त्याच्याच बळावर इराणचे पंचवीस हजार स्वार मारून सुलतान विजयी झाला. या युद्धांत सुलतानास दायर बकर व कुर्दिस्तान हे प्रांत मिळाले. आपल्या धर्मबंधूवर एवढा मोठा विजय मिळविल्याचें तुर्कांच्या इतिहासांत हें पहिलेंच उदाहरण होय. या युद्धांत सुलतानानें सैन्याची जी शिस्त राखली, जो मोठा प्रवास केला आणि नवा मुलुख संपादिला त्या योगानें त्याची गणना पहिल्या प्रतीच्या सेनानींत होऊं लागली.

पूर्वेस इराकास (मेसापोटेमियास) तुर्की राज्य भिडल्यावर मक्का व मदिना हीं इस्लामी धर्मक्षेत्रें, आपल्या छत्राखालीं आणण्याची सेलिमाची मनीषा होती. हीं धर्मक्षेत्रें, आरबस्थानचा मुलुख व शाम (सीरिया) ईजिप्तच्या ताब्यांत होतीं. ईजिप्तमधील मामेल्युकांनीं शाममधून करमानियाकडे स्वारीकरून त्या प्रांतांतील तुर्कांचे कांहीं किल्ले बळकावले होते. निमित्तास टेकलेल्या सुलतानास एवढेंच कारण बस्स होऊन तो आतां मामेल्युकांच्या पाठीस लागला. मामेल्युक शिपाई पेशाचे असून ते आपसांतील कोणा तरी हुषार शिपायाची सुलतान पदावर तहाहयात स्थापना करून राज्यकारभार चालवीत. कनरुर घोरी नामा ईजिप्तच्या गादीवरील सुलतान ८० वर्षांचा असूनही जातीनें रणांगणावर लढत असे. घोरीचा मुक्काम शाममध्यें आलेपो शहरीं असतां त्यास सेलिमानें एक उद्दामपणाची थैली पाठविली. ती पोंचतांच वरकांतीं वैषम्य न दाखवितां घोरीनें आपला एक वकील व दहा उत्कृष्ट पोशाख केलेले लष्करी अधिकारी सुलतानाच्या भेटीस रवाना केले. शत्रूचा हा लष्करी दिमाख पाहून सेलीम अधिकच खवळला; व त्या रागाच्या भरांत त्यानें आलेल्या वकिलांच्या दाढीमिशा बोडून, डोक्याला कानटोपी घालून व मरतुकड्या गाढवावर बसवून त्यांस घोरीकडे परत पाठवून दिलें. हें एक प्रकारें शत्रुपक्षास युद्धाचें आव्हानच होतें. याही-

प्रसंगीं तोफखान्यानेंच तुर्कांची बाजू संभाळली होती. सैन्याची गांठ आलेप्पोपाशीं पडून अवघ्या एका तासाच्या आंत तुर्कांनीं शत्रुसैन्याचा धुव्वा उडवून दिला.

या युद्धांत सेलिमास शाम म्हणजे सीरिया प्रांत मिळाला. त्यानंतर सेलिम अलेप्पोसच राहिला व तेथूनच त्यानें ईजिप्तवरील स्वारीची तयारी चालविली. गाझा येथें तुर्कांनीं मामेल्युकांचा दुसरा मोड केला आणि तेथून दहा दिवसांत मधील रण चालून जाऊन तुर्की सैन्य ईजिप्तमध्यें शिरलें. रिदानियाच्या लढाईंत मामेल्युकांचा तिसरा पराभव होऊन त्यांचें पंचवीस हजार सैन्य धारातीर्थीं पतन पावलें. पुढें तीन दिवसांनीं केरो शहर पडलें. केरोमधील लोकांनीं हातपाय हलविल्यावाचून शरण न आल्यानें पन्नास हजार शहरवासीयांस सुलतानानें कंठस्नान घातलें. ईजिप्त पूर्णपणें स्वाधीन झाल्यावर त्याचा कारभार मामेल्युकांवरच सेलिमानें सोंपविला.

ईजिप्तवरील स्वारीचें महत्त्व निवळ मुलूखगिरीहून आधिक आहे. या स्वारींत अरबस्थानांतील मक्का व मदिना हीं पवित्र क्षेत्रें सुलतानास मिळालींच. पण त्याखेरीज ज्या योगानें जगांतील सर्व मुसलमानी समाजाचें गुरुत्व तुर्की सुलतानांस चिरकाल लाभलें, ती खिलाफतहि सेलिमाच्या गळीं पडली. केरोच्या खलिपासून खिलाफत, महंमदाचा झगा व काठी सेलीम घेऊन गेला. कॉन्स्टँटिनोपलहून दूरच्या ईजिप्तवर तुर्की सुलतानास आपलें वर्चस्व पूर्णपणें राखतां आलें नाहीं. तरी पण तेथील पाशापासून सुलतानास दरसाल बरीच खंडणी व जरूर तेव्हां आरमार व सैन्य यांचीहि कुमक मिळत असे.

सुलतान सेलीम याची सर्व कारकीर्द परधर्मीय ख्रिस्त्यांपेक्षां स्वधर्मीय मुसलमानांशीं लढण्यांतच गेली. पण त्यामुळें ज्याप्रमाणें तत्कालीन ख्रिस्त्यांहून, त्याप्रमाणें मुसलमानांहूनहि तुर्की सुलतान मर्दुमकींत श्रेष्ठ होते, ही गोष्ट सिद्ध झाली. ख्रिस्ती राजे व तुर्की सुलतान यांजपाशीं गोलंदाजीसारखीं शस्त्रास्त्रें एका जातीचींच होतीं. परंतु तुर्कांच्या बाहुबलापुढें ख्रिस्त्यांचा टिकाव लागला नाहीं; आणि उलट पक्षीं इराण व मिसर या

देशांतील मुसलमान बाहुबलांत तुर्कांच्या तोडीचे होते. तरी गोलंदाजीनें तुर्कांनीं त्यांजवर मात केली. सेलिमाचें राज्य पृथ्वीच्या पाठीवरील मुसलमानी बादशाहातींत पहिल्या प्रतीचें होतें आणि खिलाफतीचा धर्माधिकारहि आतां प्राप्त झाल्यामुळें तें सर्वांत अग्रगण्य ठरलें. मिसर देशांतून १५१८ त परत आल्यावर सेलिमानें नवीन १५० लढाऊ जहाजें बांधून आपलें आरमारी बळ वाढविलें. सेलीम जसा शूर तसा अत्यंत क्रूरहि होता. वजिरावर सुलतानाची गैरमर्जी होण्याचा इतका नेम नव्हता कीं, तुर्कस्थानांत एखाद्यास शाप द्यावयाचा तर 'तूं सुलतान सेलिमाचा वजीर हो' असा देण्यांत येई. सेलीम १५२०त मरण पावला. सेलिमाचें सर्व बळ व आयुष्य स्वधर्मीयांविरुद्ध लढून स्वसाम्राज्याची बढती करण्यांत गेलें. इराण शिया पंथाचा तरी होता; पण ईजिप्तचे मामेल्युक सुनी पंथाचे असूनहि त्यांजविरुद्ध शस्त्र उचलून त्यांजपासून ईजिप्त हा विस्तीर्ण देश, मक्का व मदिना हीं पवित्र धर्मक्षेत्रें आणि खिलाफत हें थोर धर्मपीठ जिंकून आणण्यांत सुलतानास मुळींच गैर वाटलें नाहीं. जसे ख्रिस्ती राजे परस्परांत लढत, किंवा हिंदू राजे आपसांत भांडत, तसे मुसलमानी बादशाहाहि एकमेकांचा मुलूख जिंकून घेत. इतकेंच नव्हे तर त्यांपैकीं एखाद्यावर परधर्मीयांचें परचक्र आल्यास त्याच्या संरक्षणार्थ बाकीचे धावून जात नसत हें तुर्कांच्या पुढील इतिहासावरून दिसून येणारच आहे.

वैभवशाली सुलेमान १५२०–१५६६

सेलीमास सुलेमान हा अद्वितीय पुत्र होता आणि तसाच तो तख्तनशीन झाल्यावर अद्वितीय सुलतान ठरला. राज्यसूत्रें २६ व्या वर्षीं हातीं घेऊन त्यानें तीं बेचाळीस वर्षें खेळविलीं. त्यानें तुर्कांचें वैभव कळसास पोंचविलें; म्हणून त्यास इतिहासकार 'वैभवशाली' या पदवीनें गौरवितात. तो मोठा राजकारणपटु, पराक्रमी व वचनाचा धड होता. बापाच्या हयातींत तीन प्रांतांची सुभेदारी केली असल्यामुळें तो गादीवर पटाईत सुलतान म्हणूनच बसला.

सुलेमान इतका हुशार खरा, परंतु त्यासहि घौरम नामक रशियन स्त्रीनें प्रेमपाशांत गोवून आपल्या बोटावर खेळविल्यावांचून सोडलें नाहीं. सुले-

मानाच्या पश्चात् आपल्या मुलास राज्य मिळावें या हेतूनें घौरम एक घोर कृत्य करण्यास प्रवृत्त झाली. सुलेमानास दुसऱ्या स्त्रीपासून झालेला पुत्र मुस्तफा सुलतानाविरुद्ध कारस्थान रचीत आहे असें तिनें सुलतानाच्या मनांत खोटेंच भरवून दिलें. याबद्दल जाब विचारण्याकरितां एके दिवशीं सुलतानानें शहाजाद्यास आपल्या तंबूंत बोलावलें. मुस्ताफास घौरमच्या चिथावणीवरून मारेकऱ्यांनीं पुरतें बोलूंहि न देतां त्याचे सुलतानासमोर तुकडे उडविले. हा प्रकार सुलेमानानें चूप बसून पाहिला. सुलेमानाच्या दुसऱ्या पुत्रासहि अशीच यमसदनाची वाट दाखविण्यांत आली. हे दोघे राजपुत्र इहलोकांतून नाहींसे झाल्यावर घौरमाचाच मुलगा शिल्लक राहिला व त्यालाच सुलेमानामागून राज्यपद मिळालें. सुलेमानानंतर सुलतानांचा वैभवरवि कलला याचें कारण कित्येकांच्या मतें कुलहीन स्त्रीपासून झालेली संतति हेंच होय.

घौरमच्या संगतींत सुलतानाच्या मूक संमतीनें आणखी एक दुष्कृत्य घडलें. इब्राहिम नांवाचा एक ग्रीक मुलगा मॅग्नेशियांतील एका विधवेनें बाटवून लहानाचा मोठा केला होता. त्याची उत्कृष्ट बुद्धिमत्ता पाहून तिनें त्याचा विद्याभ्यासहि योग्य रीतीनें करविला. सुलेमान मॅग्नेशियांत दौऱ्यावर हिंडत असतां त्याच्या पाहण्यांत सदर मुलगा आला. त्याच्या गोड गायनानें खुष होऊन सुलेमानानें त्यास हुजऱ्याची जागा दिली, व आपल्या हुशारीवर वाढत वाढत अखेर त्यास वजिरात मिळाली; आणि शेवटीं त्याचें सुलतानाच्या खुद्द बहिणीशीं लग्न झालें. इब्राहिमावर सुलतानाची बसलेली मर्जी घौरमच्यानें पाहवली नाहीं. वजिरात आपल्या जांवयास मिळावी अशी तिची इच्छा होती. राणीच्या कारस्थानांतून निभावून इब्राहिम सुमारें १३ वर्षें वजिरातीचा उपभोग घेत राहिला. पण १५३६ त एके दिवशीं नित्याप्रमाणें इब्राहिम राजवाड्यांत सुलतानाच्या पंक्तीस जेवावयास गेला, तो पुन्हा जिवंत बाहेरच पडला नाहीं. शेजारच्या खोलींत मारेकरी त्याचा जीव घेत असतां घौरम आपला प्राणवल्लभ सुलेमान याचें चुंबनावर चुंबन घेऊन त्याचा जीव गुदमरून सोडीत होती म्हणतात. दिल्लीचा मोगल बादशहा जहांगिर

यास जशी जहांबाज नूरजहान भेटली, तशीच सुलेमानास घौरम मिळाली म्हणावयाची ! घौरम व नूरजहान यांत साम्य विलक्षण खरें; तरी पण सुलेमानाची सर सेलिमास येणें शक्य नाहीं. सुलेमान जहांगिराप्रमाणें विलासप्रिय, पण अकबराप्रमाणें पराक्रमी, निरलस, शहाणा व धूर्त होता.

प्रियेचे बाहुपाश बाजूस सारून मृत्यूच्या पाशांतहि जाऊन पडण्याचें धाडस सुलेमानांत होतें. सन १५२१ त एक लाख सैन्य व तीनशें तोफा यांनिशीं स्वारी करून सुलेमानानें सर्व्हियाची राजधानी बेलग्रेड ही घेतली. तेथील चर्च पाडून त्याची मशीद बनविण्यांत आली. सुलेमानापूर्वीं सेलिमानें मिसर देशावर खुष्कीच्या मार्गानें स्वारी केली होती. पण खुष्कीचा मार्ग लांबणीचा असल्यामुळें सुलेमान जलमार्गानें ईजिप्तमध्यें गेला. जातांना वाटेवरील ऱ्होड्स बेटहि त्यानें घेतलें. त्यानंतर दोन वर्षांनीं डान्यूब नदी उल्लंघून तो हंगेरीवर चालून गेला. या लढाईत हंगेरीचा राजा, आठ बिशप, बरेच सरदार व चोवीस हजार शिपाई ठार झाले; मोहिमेवरून परत येतांना सुलेमान अगणित लूट व गुलाम म्हणून विकण्याकरितां एक लाख स्त्रीपुरुष घेऊन आला. १५२९ त हंगेरीवर दुसरी स्वारी करून त्यानें हंगेरीचें राजधानीचें शहर बुदापेस्ट सर केलें. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं ऑस्ट्रियाची राजधानी व्हीएन्ना हिजवर तो चालून गेला. परंतु व्हीएन्नाच्या मजबूत किल्ल्यापुढें हार खाऊन त्यास निघून यावें लागलें. व्हीएन्नाहून परत येतांना त्यानें कित्येक सुंदर स्त्रिया गुलाम करून आणिल्या.

सुलेमानास समकालीन असे युरोपांत नांव घेण्यासारखे तीन राजे होते. एक इंग्लंडचा आठवा हेनरी, दुसरा फ्रान्सचा पहिला फ्रान्सिस आणि तिसरा स्पेनचा पांचवा चार्लस. या सर्वांत स्पेनचा पांचवा चार्लसच प्रमुख असून त्याच्या प्रभुत्वाखालीं स्पेन, नेपल्स, सार्डीनिया, सिसिली, ऑस्ट्रिया आणि हंगेरी एवढा विस्तृत प्रदेश मोडत असे. आणि त्यास पोपकरवीं जर्मन सम्राट्पदाचा अभिषेक झाल्यामुळें त्याचें वैभव फ्रान्सच्या फ्रान्सिस राजास सहन होईना. चार्लसचा तेजोभंग करण्याच्या उद्देशानें फ्रान्सिसनें सुलेमानासारख्या परधर्मीयाबरोबर सख्य करून त्याजकडून वर लिहिल्या-

प्रमाणें १५२९ मध्यें ऑस्ट्रियांतील व्हीएन्ना राजधानीस वेढा घालविला. पण तो उठविण्यास चार्लस धजला नाहीं, यावरून सुलेमानाच्या दराऱ्याची अटकळ बांधतां येते. सुलेमान तत्कालीन साऱ्या युरोपियन राजांस भारी होता, इतकेंच नव्हे तर 'सुलतानाच्या घोड्याच्या टापेखालीं जो मुलूख सांपडला तो सुलतानाच्या छत्राखालीं आला' या सुलेमानाचा वजीर इब्राहिम याच्या उक्तींत दर्पोक्तीचा लेशहि नव्हता.

आशियांत आशियामायनर (रूम) पलीकडे दायरबकर व कुर्दिस्तान आणि दक्षिणेस सीरिया,मक्का, मदिना व ईजिप्त हा प्रदेश सेलिमानें पूर्वींच आपल्या राज्यास जोडला होता. सुलेमानानें इराणाबरोबर पुन्हां युद्ध मांडून तेथील शहापासून आर्मीनियाचा कांहीं भाग, इराकमधील मोसल, बगदाद आणि बसरा, आरबस्तानांतील ओमान व एडन आणि उत्तर आफ्रिका व ईजिप्तचा आणखी टापू जिंकून घेतला.

सैन्याप्रमाणें सुलतानाचें आरमारहि अत्यंत प्रबळ होतें. युरोपांत सर्वांत प्रबळ आरमार या काळीं स्पेनचें होतें. स्पेनच्या तोडीचें आरमार तुर्कांचें होतें. स्पेनचें व व्हेनीसचें आरमार एक झालें असतांहि त्याजवर तुर्कांनीं विजय मिळविला होता. सुलेमानाच्या कारकिर्दींत भूमध्य समुद्रावर तुर्की आरमाराचें स्वामित्व असल्यामुळें त्रिपोली व आफ्रिकेंतील आल्जेरिया व ओरण त्यास जिंकतां आलें. या वेळीं उत्तर आफ्रिकेंतील मुसलमान राजे अवनतीस पोचले असून त्यांच्या किनाऱ्यावर चांचे लोकांची वस्ती होती. भूमध्य समुद्रांतून येणारीं जाणारीं जहाजें लुटावीं व त्यांतील प्रवाशांस पकडून गुलाम म्हणून विकावें असा त्यांचा क्रम होता. स्पेन, इताली, फ्रान्स, इंग्लंड व आयर्लंड यांच्या किनाऱ्यासहि त्यांजपासून उपद्रव होत असे. पण चांचेपणाच्या नादानें आफ्रिकन मुसलमानांना नौकानयनांत नैपुण्य मिळवितां आलें. सुलेमानानें त्यांपैकीं हुशार चांचे पदरीं बाळगून आपलें आरमार सुधारलें. कित्येकांस त्याजकडून मोठ्या हुद्याच्या जागाहि मिळाल्या. बार्बारोस, द्रगूट व पायली हे सुलतानाचे दर्यावर्दी सरदार याच वर्गांतील होत. त्यांतील एकास त्यानें त्रिपोलीचा सुभेदार नेमलें. या जय्यत तयारीनें

तुर्की आरमाराचा वचक भूमध्य समुद्राच्या पाठोपाठ तांबडा समुद्र व हिंदी महासागर यांवरहि बसला आणि सुलेमानाच्या आरमारानें हिंदी महासागराच्या पश्चिम टोंकावर एडनपाशीं उडविलेली खळबळ हवेंतून पूर्व टोंकाशीं हिंदुस्थानास ऐकूं जाऊन दिल्लीचा पदच्युत बादशहा शिकंदर लोदी यानें हुमायुनाविरुद्ध सुलेमानापाशीं १५३८ त मदत मागितली. त्याचप्रमाणें गुजराथेचा राजा बहादुरशहा याजपासून १५४७ त पोर्तुगीजांनीं दीव बेट घेतल्यावर त्यानेंहि सुलेमानाचेच पाय धरले होते. पण सुलेमानाचें आरमार कुमकेस निघणार, तोंच बहादुरशहा पोर्तुगीजांशीं लढतांना पडल्याची बातमी त्यास कळली.

इ. स. १५६६ त सुलेमानाची हंगेरीवर तिसरी व शेवटची स्वारी झाली. इतर तेरा स्वाऱ्यांप्रमाणें या स्वारींतहि सुलतान जातीनें हजर होता. या स्वारीवर असतांच मेंदूच्या विकारानें त्यास मृत्यु आला. त्यास मनुष्याची पारख अचूक होती. सैन्य व आरमार यांवर त्यानें नेमलेले अधिकारी खऱ्या योग्यतेचे ठरले. तो मोठा खंबीर व निश्चयी होता. राज्यकर्ता या नात्यानें प्रजेवर करांचें ओझें हलकें बसवूनहि खजिन्यांत त्यानें पैशाची तूट कधींहि भासूं दिली नाहीं. सारें युरोपखंड, आफ्रिका आणि हिंदुस्थानापर्यंतचें आशियाखंड यांत सुलेमान योग्यतेनें, सामर्थ्यानें व साम्राज्यविस्तारानें अद्वितीय होता. पण त्याच्या मृत्यूनंतर तुर्की साम्राज्याचा कळस जो ढांसळला तो परवांपर्यंत खालीं घगगळत येतच होता.

उपसंहार

तुर्कांची सत्ता ही साडेसहाशें वर्षांची वयोवृद्ध सत्ता आहे. तिच्या आयुर्मानापैकीं पहिली उमर वैभवशाली सुलेमानाबरोबर संपते. सुलेमान निवर्तला, त्या वेळीं तुर्की सत्तेस तीनशें वर्षें भरत आलीं होतीं. तुर्कांइतकी जुनी राजसत्ता मुसलमानांत दुसरी नव्हतीच म्हटलें तरी चालेल; आणि तिचा विकास शुक्लेंदुवत् एकसारखा तीनशें वर्षें होत चाललेला तुर्कस्थानाबाहेरील इस्लामी जगांत कोठेंहि आढळणार नाहीं. तुर्कांच्या खालोखाल जिचा नंबर लागेल अशी हिंदुस्थानांतील एक मोगली बाद-

शहातच होय. ती पुरती तीनशें वर्षेंहि टिकली नाहीं, मग तिचें वैभव तितकीं वर्षे कोठून दृष्टीस पडणार ? उत्कर्ष व चिरंजीवित्त्व या दृष्टीनें तुर्की सुलतानशाही मुसलमानांत जशी अद्वितीय, तशीच ती राज्यविस्तारांताहे अद्वितीय होती. सुलेमानाच्या अखेरीपर्यंत तुर्की साम्राज्यांत युरोपमध्यें रुमानिया, सर्व्हिया, बल्गेरिया, ग्रीस, थ्रेस, आणि आर्किपेलेगोमधील व भूमध्य समुद्रांतील कित्येक बेटें मोडूं लागलीं. आशियापैकीं रुम, शाम, आर्मीनिया, मोसल, इराक, बहुतेक सारा अरबस्तान यांवर तुर्की निशाण फडकत राहिलें आणि आफ्रिका खंडांत ईजिप्त, आलजेरिया आणि ट्यूनिस हीं त्यांच्या हस्तगत झालीं.युरोपखंडाच्या पाऊणपटीएवढें साम्राज्य सुलतानांनीं स्थापलें व त्याची चढती कमान तीनशें वर्षे राखली यांतच त्यांचे अनेक गुण प्रगट होत असून त्यांचाच प्रकृत स्थळीं विचार कर्तव्य आहे.

साम्राज्य स्थापूं इच्छिणाऱ्या राजांनीं आपल्या प्रजाजनांनीं आपलें राज्य जसें पत्करलें तसा आपला धर्महि पत्करला पाहिजे असा आग्रह धरल्यास त्यांचें साम्राज्य फार दिवस टिकूं शकणार नाहीं. तुर्कांनीं आपलें साम्राज्यच परराज्यांत आणि परधर्मीयांत नेऊन स्थापल्यामुळें ख्रिस्ती धर्माशीं त्यांच्या इस्लामी धर्माचें घर्षण प्रारंभापासून सुरू झालें. या प्रतिकूल स्थितींत त्यांस स्वधर्माचा दुराग्रह मुळांतच सोडून द्यावा लागला. ख्रिस्ती धर्माशीं सहिष्णुतेनें वागण्याची जडलेली संवय दिवसानुदिवस वाढतच जाऊन कॉन्स्टांटिनोपल हातीं आल्यावर तेथें ग्रीक पॅट्रिआर्कची स्थापना फत्तेमहंमदानें आपल्या हातानें मोठ्या संतोषानें केली. शेंकडों किंबहुना सहस्रावधि ख्रिस्ती बाटून मुसलमान झाले असतील; परंतु त्यांतील पुष्कळांनीं स्वार्थासाठीं आणि सुलभ सुखासाठींच इस्लामी धर्म स्वीकारला. परधर्मीय राजकन्यांशीं विवाह लावणें हा स्वधर्मप्रसाराचा कित्येक मुसलमान राजे सोपा उपाय समजत आले आहेत. परंतु तुर्की सुलतानांनीं सर्व्हिया आणि बल्गेरिया येथील राजकन्यांशीं लग्न केलें तें केवळ आपलें राजकीय वर्चस्व व वैभव प्रस्थापित करण्याकरितांच होय. कारण अशा विवाहसंबंधांनीं सर्व्हिया, बल्गेरिया किंवा ग्रीस येथील राजांचें धर्मांतर झाल्याचा पुरावा नाहीं.

सुलतानाचें पहिलें लग्न बहुधा १६ ते २० वर्षांपर्यंत होत असे व त्यांच्या स्त्रियांचीं वयें हि १२ ते १६ वर्षांपर्यंत असत. परंतु बहुतेक सुलतानांस दीर्घायुष्य लाभलें होतें. यावरून ही विवाहपद्धति त्यांच्या आरोग्याच्या व शरीरसामर्थ्याच्या आड येत नव्हती असें उघडच ठरतें. मुसलमानी धर्मास अनुसरून सुलतानास बहुभार्यत्वाचा अधिकार असल्यामुळें त्यांस अनेक विवाहित स्त्रिया असत आणि त्याखेरीज रखेल्यांची तर गणतीच नव्हती. याचाहि परिणाम सुलतानांच्या शरीरप्रकृतीवर अनिष्ट झाल्याचें दिसत नाहीं. पौर्वात्य देशांत बहुभार्यत्वाची चाल अनादि व सार्वत्रिक आहे. असें असतांही आयुर्बलारोग्यांत इकडील राजेरजवाडे पाश्चात्यांस हार जाणारे नव्हते. हिंदुस्थानांतील मुसलमानांचा जनानखाना तर प्रसिद्धच आहे. आणि हिंदूंतहि पांडवकालापासून अगदीं अर्वाचीन कालापर्यंत अनेक स्त्रिया असणें हानिकारक समजलें न जातां भूषणावह व आवश्यकहि मानण्यांत येई. या गोष्टीहि विचार करण्यासारख्या आहेत, यांत शंका नाहीं.

सुलेमानासारखे कांहीं सुलतान विद्वान होते, तरी बाकीचे बरेच अक्षरशत्रूहि असत. पण अक्षरशत्रुत्वामुळें सुलतान या नात्यानें त्यांची लायखी व पात्रता कमी भरत नव्हती. तख्तनशीन सुलतानाच्या अमदानींत सुभेदारीच्या कामावर राज्यकारभाराचा पूर्ण अनुभव घेतलेला शहाजादा राज्यारूढ झाला असतां एक दीप मालवून तितक्याच तेजाचा अन्य दीप लावावा अशा प्रतीनें तो प्रकाशमान होई. मद्याच्या व्यसनापासुन सुलतान अलिप्त नव्हते, तरी त्या योगानें राज्यकारभारांत घोंटाळा माजत नव्हता.

स्वतःच्या संततीखेरजि आपले बंधु व पुतणे मारण्यास मुसलमानी राजांस कुराणानें दिलेल्या सदर परवानगीचा उपयोग सुलतान नेहमींच करीत असल्यानें त्यांच्या राज्यांत फंदफितुरी व बंडाळी यांचा संभव फारसा नव्हता आणि त्यामुळें परसत्तेस त्यांच्या राज्यांत बोट शिरकविण्यास जागा मिळत नव्हती. ख्रिस्ती राजे आणि मुसलमान अमीर, शहा व सुलतान, यांजबरोबर तुर्की सुलतान लढले आणि त्या सर्वांसहि

त्यांनीं पराभूत केलें. ख्रिस्ती राजे व तुर्की सुलतान यांची शस्त्रास्त्रांत बरोबरी होती. परंतु शौर्य आणि धार्मिक आवेश या अनुकूल गुणांनीं तुर्की सुलतानांस ख्रिस्ती राजांवर सरशी करतां आली. उलटपक्षीं मुसलमान राजे शौर्यांत तुर्कांशीं तुल्यबल असले तरी आशिया व युरोप यांच्या सरहद्दीवर असण्याचा फायदा तुर्कांस मिळाला असल्यानें अग्निगोलकादि शस्त्रास्त्रांतील वरचढपणाच्या जोरावर त्यांस मुसलमानांस नामोहरम करतां आलें. याखेरीज जेनिसरीजची जिलिबिची शेलकी फौज आणि खडें पायदळ पलटण हा सरंजाम तुर्कांप्रमाणें ख्रिस्ती वा मुसलमानी कोणाहि राजापाशीं नव्हता हेंहि विसरतां कामा नये.

तोफांचा फार मोठ्या प्रमाणांवर उपयोग प्रथम तुर्कांनींच युरोपांत केला. तोफखान्यावरील अधिपतीस 'टोपजीबाशी' ही संज्ञा होती. या संज्ञेंतील टोप या शब्दापासून महाराष्ट्र भाषेंतील तोफांचा जन्म झाल्याचें चाणाक्ष वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. इराणचे शहा व ईजिप्तचे मामेल्युक यांची धुळधाण सुलतानांच्या तोफखान्यांच्या सरबत्तीनेंच उडवून दिली.

रिसाल्यांच्या टापेखालीं, प्याद्यांच्या समशेरीखालीं आणि तोफांच्या गोळ्यांखालीं प्रजेस दाबून धरणें हा साम्राज्यसंरक्षणाचा बाह्योपाय झाला. प्रजेस सैन्याच्या धाकांत ठेवण्यापेक्षां स्वराज्य पद्धतीनें तिला आपला लळा लावणें यांतच राज्यकर्त्यांचा खरा तरणोपाय होय. ह्या बाबतींत तुर्कांनीं प्रकट केलेल्या उदार राजनीतिपासून सांप्रतच्या सुधारलेल्या युरोपियन राजांनीं अवश्य बोध घ्यावा. प्रजेचा धर्म, जीवित, व वित्त यांस धक्का न लागणें, किंबहुना तिच्या द्रव्यार्जनाची आणि योगक्षेमाची जीं जीं म्हणून साधनें असतील तीं तीं प्रजेपाशीं अबाधित राखणें हें धर्मशील, नीतिमान व स्वहिततत्पर राजे आपलें कर्तव्य समजतात. सुलतानांच्या राज्यांत पॅट्रिआर्क हा ख्रिस्ती धर्माधिपति होताच. पण त्याच्या हाताखालीं दिवाणी व फौजदारी दावे चालविण्याकरितां एक धर्माधिकाऱ्यांचें ट्रायब्यूनलहि दिलें होतें.

ख्रिस्ती धर्माप्रमाणेंच ख्रिस्त्यांच्या कायदेकानूंत, रीतीभातींत, वहिवाटींत व सामाजिक सभारंभांत सुलतानांनीं मुळींच हात घातला नाहीं.

यामुळें ख्रिस्त्यांस मनसोक्त धर्माचरण करतां आलें, पैसा कमावतां आला आणि संतति वाढवितां आली. मनुष्याचे ऐहिक व पारमार्थिक व्यापार अशा रीतीनें निर्वेध राहिल्यावर ग्रीकादि ख्रिस्त्यांस परराज्य उलथून पाडून स्वराज्यस्थापनेची इच्छा काय म्हणून व्हावी? या गुणानें तुर्कांची युरोपांतील सत्ता इतकी दृढमूल केली कीं, तैमूरलंगाच्या वावटळींत तुर्की राज्यमंदिर धुळीस मिळाल्यासारखें दिसत असतांहि वावटळ निघून जातांच तें अचलच आढळलें.

सुलतानांच्या राजानीतींत सध्यांच्या सुधारलेल्या काळांतील दांभिकपणा नव्हता. परमेश्वरानें निर्माण केलेला मनुष्यप्राणी जसा पूर्ण असावा तशा प्रकारचे सुलतान होते. ते क्रूर होते आणि कनवाळू होते, लोभी होते आणि उदारहि होते, संकटास कवटाळणारे होते आणि सुखांत लोळणारे होते,शत्रूंचे कर्दनकाळ होते आणि गुणिजनांचे दासानुदास होते. ते जातीनें मोहिमावर जात आणि सहस्रावधि शत्रुसैनिकास कंठस्नान घालण्यांत प्रकट झालेलें त्यांचें शौर्य किंवा क्रौर्य आणि मोहिमांवरून परत आल्यावर अन्तःपुरांतील सहस्रावधि विलासिनींच्या गाढालिंगनानें मनांत उतरलेलें मार्दव किंवा दयाळुत्व यांच्या आघातप्रत्याघातानें त्यांचें शील किंवा स्वभाव बनत असत. कमलवनांचा विध्वंस करून करिणींच्या कळपांत सुखविलासास आलेल्या मतंगजाप्रमाणें विषयोपभोगानें सुलतानांचें शरीरबल क्षीण न होतां वृद्धिच पावत असे. बहुतेक सुलतान बलवान् व आयुष्यमान् असून त्यांनीं तिसपासून चाळीस वर्षांपर्यंत राज्योपभोग घेतला आणि सत्तर बहात्तर वर्षांच्या घरांतः मरणाचें दार पाहिलें. मराठ्यांतील शिवाजी, बाजी आणि बाळाजी या कर्त्या व पराक्रमी पुरुषांच्या हयातीशीं सुलतानांची तुलना केल्यास सुलतानांस चिरंजीवच मानावें लागेल. यावरून अव्वल दर्जाचे पुरूष प्रसवण्याचें सामर्थ्य मध्यआशियांतील मानव वंशाच्या कुशींत जितकें दृष्टीस पडतें, त्याचा हिंदूलोकांत, विशेषतः मराठ्यांत त्यांच्या ऐन अमदानींतहि लोप झाला होता असें म्हणावें लागतें. तुर्कांच्या मानानें पहिले मोगल बादशहाहि फिके पडतात.

फत्ते महंमदापासून राज्यकारभाराची घडी उत्तम प्रकारें बसून तेथून पुढें विद्या व कलाकौशल्य यांची भाग्यशाली सुलेमानापर्यंत सारखी अभिवृद्धिच होत गेली. सुलेमानाच्या कारकिर्दींत प्रजेवर कराचा बोजा हलका होता; पण त्याची गंगाजळी मात्र भरून वहात होती. मशिदी, पाठशाला, दवाखाने, कालवे, पूल इत्यादि लोकोपयोगी कार्याकडे त्यानें पैशाचा पाण्याप्रमाणें व्यय केला. कला व वाङ्मय यांची त्यास फार आवड होती. त्यानें स्वतः कविता रचिली असून ती त्याच्या राज्यवैभवाप्रमाणें थाटदार आहे. अबदुल बाकी हा महान् वर्णाकवि सुलेमानाच्या राजवटींत उदय पावला. सुलेमानानें आपला पुत्र मुस्तफा याचा वध केल्याचा त्यावर आळ आला होता. त्या हृदयद्रावक प्रसंगावर अत्यंत शोकरसपर काव्य अबदुल बाकीनें लिहिलें व तें इतकें सरस वठलें कीं, सुलतानास कवीच्या औद्धत्याबद्दल राग आला असतांहि त्यानें त्याची गर्दन न उडवितां 'अमर' या पदवीनें अभय दिलें. सुलेमानाच्या मृत्यूवर अबदुलानें रचलेलें काव्य फारच बहारीचें असून तें सुलेमानाचें स्मारक समजलें जातें. खैल नामक कवीचें कल्पनावैभव व शब्द सौष्ठव अत्युत्कृष्ट असल्यामुळें सुलेमानास त्याच्या काव्यांतील प्रत्येक शब्द मौक्तिकतुल्य वाटून त्यानें सदर कवीस सहस्रावधि रुपयांची नक्त नेमणूक करून दिली. सुलेमानाचा इस्तंबूलमधील दरबार एकाहून एक तेजस्वी अशा दीडशे कवीप्रदीपांनीं प्रकाशमान झाला असून त्याच्या साम्राज्यावरील मेघडंबरींत अशा प्रकारचे तीनशे दीप तेवत होते. या काळांत गज्जल ही चाल राजदरबारीं अत्यंत मान्यता पावली होती. ज्यांच्या राजवटींत साहित्य, संगीत इत्यादि कला, तत्त्वज्ञान, राजनीति, वैद्यक, ज्योतिष व न्याय इत्यादि शास्त्रें प्रकर्षास पोहोंचलीं. ज्यांच्या राज्यांत सुखाचा आस्वाद घेण्यास हंगेरी, रशिया इत्यादि परराज्यांतील प्रजाहि आनंदानें येऊन रहात होती, ते इस्तबूलचे सुलतान तत्कालीन ख्रिस्ती राजांपेक्षां अधिक सुसंस्कृत व प्रजाहिततत्पर नव्हते असें कोण म्हणेल ?

प्रकरण दुसरें.

तुर्कांचा ऱ्हासकाळ

तीनशे वर्षांच्या दीर्घ काळांत त्रिखंड पृथ्वीवर तुर्की साम्राज्य अजिंक्य ठरलें होतें; तरी पण कोणत्याही मानवी संस्थेप्रमाणें हेंहि साम्राज्य यावच्चंद्रदिवाकरौ अजिंक्य व अक्षय रहाणें शक्य नव्हतें. कर्तबगार व पराक्रमी सुलतानांची परंपरा सृष्टिक्रमास अनुसरून वैभवशाली सुलेमानाअखेर विराम पावली, हें तुर्कांच्या ऱ्हासाचें मुख्य कारण होय. पण तेवढें एकच प्रतिकूल कारण नव्हतें. त्यापेक्षांहि युरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रांचा उदयकाळ हें प्रमुख कारण समजलें पाहिजे. मध्ययुग या संज्ञेनें ज्या काळाची युरोपियन ग्रंथकार नालस्ती करतात, तो काळ मुसलमानांच्या दृष्टीनें वैभवाचा व सुधारणेचा होय. परंतु चक्रनेमिक्रमानें मुसलमानांचा वैभवरवि मावळून त्याचा उदय ख्रिस्ती राष्ट्रांत झाला. इस्लामी संस्कृतीपुढें ख्रिस्ती संस्कृति फिकी पडली होती, तोंपर्यंत कॉन्स्टँटिनोपलसारखें ख्रिस्ती जगाचें नाक फत्ते महमदानें छाटलें असतांहि तो अपमान ख्रिस्त्यांस मान खालीं घालून सहन करावा लागला. परंतु अपमानाचें हें शल्य ख्रिस्ती राष्ट्रांच्या काळजांत घर करून बसलें यांत शंका नाहीं आणि त्याचा सूड पुढील तीनशें वर्षांत तुर्कस्थानची मानखंडना करून किरिस्तावांनीं उगवल्यावांचून सोडला नाहीं.

कॉन्स्टँटिनोपल घेतांना अजस्र तोफ निर्माण करून तिच्यांतून सोडलेल्या गोळ्यानें तुर्कांनीं कॉन्स्टँटिनोपलच्या तटाचें चिलखतच उडवून टाकलें असें नाहीं; तर त्या बरोबर पुढील विटंबनेच्या भीतीनें पाद्री भटभिक्षुकहि उडाले आणि ते आपल्या पोथीपुस्तकांनिशीं इतालीपासून आल्प्स पर्वतापलीकडे स्पेनपर्यंत जेथें जेथें जाऊन पडले, तेथें तेथें नवीन सुधारणेचीं बीजें त्यांनीं पेरलीं. युरोपच्या पूर्वेकडील दार्दानेलीस सामुद्रधुनीच्या टोकावर तुर्की सुलतान महंमद ज्या क्षणीं अपूर्व अशा विजयो-

त्सवांत निमग्न होता, त्याच क्षणीं युरोपच्या पश्चिमेकडील जिब्राल्टर सामुद्रधुनीच्या टोंकावर पोर्तुगीज राजा हेनरी महंमदाच्या वंशजांस दैन्याचे दिवस कसे दाखावितां येतील याच्या शोधांत गुंग होऊन गेला होता.

आठव्या शतकांत आरबांनीं स्पेन जिंकून तेथें विद्यापीठें, ग्रंथसंग्रह पदार्थालयें आणि वेधशाळा या रूपानें अरब संस्कृतीचें बीजारोपण केलें होतें. स्पॅनिश लोकांनीं स्पेनमधून आरबांस अर्धचंद्र दिला, पण त्यांच्या संस्कृतीचा मात्र कायमचा आश्रय केला.आरबांपासून मिळालेल्या ज्ञानांतच कॉन्स्टांटिनोपलमधून पळून आलेल्या ग्रीक विद्येची भर पडल्यामुळें स्पेन देश व स्पेन देशाबरोबरच पोर्तुगाल यांजकडे पश्चिम युरोप खंडाचें अग्रेसरत्व आलें. या सुमारास युरोपचा सारा व्यापाराचा ओघ व्हेनिस, जिनोवा, कॉन्स्टांटिनोपल व अलेक्झांड्रिया या बंदरांच्या वळणानें पडला असून पोर्तुगाल, स्पेन, फ्रान्स, इंग्लंड व हालंड या दुरावलेल्या देशांवर कंगाल स्थितींत कुडकुडत बसण्याची पाळी आली होती. परंतु घाटांतील रिव्हर्सिंग स्टेशनावर गाडीची दिशा बदलतांच आगगाडीचा जो डबा सर्वांच्या मागें असतो, त्यास जसा यदृच्छेनें पुढाकार मिळतो, त्याप्रमाणें स्पेन व पोर्तुगाल यांची स्थिति झाली; आणि आफ्रिकेच्या दक्षिणेचा जो प्रांत इताली, ग्रीस, तुर्कस्थान व ईजिप्त या देशांपासून छपून राहिला होता, तो समोरच्या डोळे उघडून पहाणाऱ्या पोर्तुगाल देशास आपणाकडे खुणावूं लागला.

भूमध्यसमुद्रांत अडकून पडलेला व्यापार युक्तिप्रयुक्तीनें सोडवून अटलांटिक महासागराच्या स्वाधीन केल्यावांचून आपलें दारिद्र्य सुटणार नाहीं, अशी पोर्तुगाल व स्पेन यांची खात्री झाली असल्यामुळें त्यांनीं अटलांटिक महासागराकडून हिंदुस्थान हुडकण्याचा अटोकाट प्रयत्न चालविला; आणि एक डोळा मागणाऱ्या अंधळ्यास दोन डोळे देऊन देवानें संतुष्ट करावें, त्याप्रमाणें हिंदुस्थानचा छडा लावण्यास कोलंबसानें समुद्रांत उडी घेतल्यावर प्रवासाची दिशा चुकल्यानें हिंदुस्थानाऐवजीं अमेरिकाच त्याच्या हातीं लागली; आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे इ. स. १४९८ मध्यें पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को दि गामा याचे पाय हिंदुस्थान-

च्या कालिकत बंदरास लागून पोर्तुगाल व स्पेन या दोन्ही देशांचें दैव उघडलें. स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेस बुचाडून आणलेल्या सुवर्णानें आपली मातृभूमि मढविली, तर पोर्तुगीजांनीं भूमध्य समुद्रांतील व्यापाराचा ओघ अटलांटिक महासागरांतून आफ्रिकेच्या कडेकडेनें आपल्या किनाऱ्यावर आणून आपले पांग फेडले.

अमेरिकेच्या शोधाबरोबर त्रिखंड पृथ्वीची जुनी कल्पना मागें पडून तिला विस्तीर्ण, संपन्न व प्रायः निर्जन खंडाची जोड मिळाल्यानें स्पॅनिश लोकांस, व त्याचप्रमाणें हिंदुस्थानच्या नव्या मार्गाच्या शोधानें पोर्तुगीजांस अपूर्व ऐश्वर्य तर लाभलेंच, पण त्याखेरीज त्यांच्या मनोवृत्तीवर, बुद्धीवर व कल्पनाशक्तीवर घडून आलेला परिणाम अतर्क्य होय यांत शंका नाहीं. हिंदुस्थानापासून अमेरिकेपर्यंतच्या अफाट सागरावरील पडदा एकाएकीं दूर होऊन त्याच्या विराट् स्वरूपाचें दर्शन या दोन देशांस झाल्यामुळें त्यांची दृष्टि फांकली, मनोवृत्ती उंचबळल्या, ज्ञानेंद्रियांस स्फुरण चढलें आणि अरबांपासून व ग्रीकांपासून प्राप्त झालेली परंपरागत विद्या फिकी वाटून अधिक ज्ञानाची, शोधाची आणि मानवी सुधारणेच्या साधनांची त्यांस हाव सुटली. ख्रिस्ती राष्ट्रकुटुंबांतील दोन राष्ट्रांचें सुकृत अशा रीतीनें फळास आल्यावर त्यांच्या वैभवाचा वाटा हॉलंड, इंग्लंड व फ्रान्स इत्यादि कुटुंबीयांना कां न मिळावा ? इंग्लंडचा धाडसी पुरुष सर वॉल्टर रॅले पहिल्या जेम्स राजास सोन्याचें आमिष दाखवून अमेरिकेची सफर मारून आला आणि फ्रॅन्सिस ड्रेक यानें पृथ्वीस तात्कालीन समजुतीप्रमाणें प्रदक्षिणाहि घातली. या राष्ट्रांच्या समुद्रांतून लांबवर सफरीवर सफरी सुरू झाल्यामुळें त्यांचें आरमारहि बळावलें आणि त्यांच्या प्रत्येक चलनवलनांत चैतन्य चमकूं लागलें.

रोमन साम्राज्याच्या पडक्या इमारतीखालीं दडपून गेलेल्या युरोपखंडांत, फ्यूडल पद्धतीनें बारीक सारीक सरदारांवर बसलेला अंमल उठवून नव्या राजांनीं आपलीं सिंहासनें सावरलीं, सरदारांचें प्रस्थ मोडून कायमचें सैन्य उभारलें आणि त्या सैन्याच्या हातांतील धनुष्यबाणास फाटा देऊन त्यांच्या हातांत दारूनें भरलेल्या बंदुका ठेवल्या. मुद्रणकला

उदयास आली आणि तिनें पोपच्या कपाटांत छपून राहिलेलें बायबल छापवून त्याच्या प्रती घरोघरीं पोंचत्या केल्या व अशा रीतीनें पंख फुटलेल्या बायबलानें बहुजनसमाजाच्या बुद्धीस स्वातंत्र्य मिळवून दिलें. ज्या जर्मनींत धर्मसुधारक लूथर जन्मास आला त्याच जर्मनींतील कोपरनिकस, इतालींतील गॅलीलिओ, हॉलंडांतील टायकोब्रा यांच्या स्वतंत्र व शोधक बुद्धीस हा भूगोल अपुरा वाटून तिनें अंतराळांत उड्डाण मारून दुर्बिणीच्या साहाय्यानें अनेक ग्रहोपग्रहांचे शोध लावले. या बुद्धिमान शोधकांच्या स्वतंत्र शोधांचा सामान्य जनतेवरहि पगडा बसून ऑरिस्टॉटलसारख्या जुन्या तर्कशास्त्रज्ञास गुंडाळून ठेवून बेकन प्रभृतींच्या अनुगमपद्धतीच्या तर्कशास्त्राच्या साहाय्यानें यूरोपियन समाज सर्व व्यावहारिक गोष्टींचा विचार करूं लागला. पश्चिमेकडील युरोपियन राष्ट्रांची सामाजिक, धार्मिक औद्योगिक या सर्व दिशांनीं उन्नति होत गेल्यामुळें इंग्लंडचा आठवा हेनरी, फ्रान्सचा पहिला फ्रॉन्सिस आणि स्पेनचा पांचवा चार्लस यांचें प्राबल्य वाढून तुर्कांची बहुतेक प्रगति सोळाव्या शतकांत खुंटली. इतकेंच नव्हे तर इंग्लंड, फ्रान्स व स्पेन येथील राजांचा कित्ता उचलणाऱ्या ख्रिस्ती राष्ट्रांचें कडें सोळाव्या शतकानंतर तुर्की साम्राज्याभोंवतीं वाढत चाललें. १७४० त प्रशियानें डोकें वर काढून प्रशियाचा राजा फेड्रिक दि ग्रेट याच्या कवाइतींच्या कंपूच्या जिवावर आपल्या राष्ट्राची गणना युरोपांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत करून घेतली. ऑस्ट्रियाचें बळ प्रशियाहूनहि मोठें असून युरोपांतील राजसत्तेचा काटा याच दोन राष्ट्रांनीं समतोल राखला होता.

ऑस्ट्रिया व प्रशिया यांजप्रमाणें रशियानेंहि आपला रानवटपणा झाडून सुधारलेल्या राष्ट्रांच्या प्रभावळींत स्वतःचा प्रवेश करून घेतला. रशियाच्या पश्चिमेचा बाल्टिक समुद्र स्वीडनच्या, आणि दक्षिणेचा काळा समुद्र तुर्कस्थान व तार्तरी यांच्या ताब्यांत राहिल्यामुळें रशियाचा ख्रिस्ती राष्ट्रांशीं बहुतेक संबंध तुटल्यासारखाच होता. पण आपलें राष्ट्र जगांतील चढाओढींत पुढें सरसवावयाचें, तर या दोन्ही समुद्रांवर रशियाचें स्वामित्व बसलें पाहिजे हा विचार पीटर दि ग्रेट याच्या डोक्यांत आला. त्यानें

१६९६ त तुर्कांपासून अजोव्ह घेऊन काळ्या समुद्रांत पाऊल टाकलें; आणि तुर्कांवर दरारा राहील एवढें आरमार जवळ बाळगलें. तसेंच स्वीडनपासून बाल्टिक समुद्राच्या पूर्वेकडील प्रांत जिंकून बाल्टिक समुद्रांतहि आपली सत्ता सरकावली. पीटर अधिकारानें राजा, पण वागणुकीनें साधा असल्यामुळें स्वदेशोद्धारार्थ हॉलंड या दर्यावर्दी गुरूच्या पायापाशीं बसून गलबतें बांधण्याचा धंदा शिकण्यांत त्यास कमीपणा वाटला नाहीं. पीटरनंतरच्या रशियन राज्यकर्त्यांनीं तुर्कस्थानच्या पूर्वेस कास्पियन समुद्रांत शिरून व इराणच्या सत्तेस मागें हटवून मध्य आशियावर आपला दरारा बसविला; आणि इंग्लंडच्या छत्राची छाया अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत आशियाखंडांत पसरत पसरत तिनें सारें हिंदुस्थान आक्रमून हिंदी महासागरांतून, तांबड्या समुद्रांतून आणि भूमध्य समुद्रांतूनहि तुर्कांची पिच्छेहाट चालविली.

महावृक्ष पाडावयाचा झाल्यास त्याच्या सभोंवतालची जमीन भुसभुशीत करीत त्याच्या मुळ्या बुंध्यापर्यंत सैल करण्याची लाकूड तोड्यांची वहिवाट आहे. त्या वहिवाटीस अनुसरून प्रमुख युरोपियन राष्ट्रांनीं तुर्कांची चोहो बाजूंनीं नाकेबंदी केली, अन्नरस तोडून त्यांची उपासमार मांडली आणि सरतेशवटीं नादान व पंगू स्थितींत त्याच्या फांद्या एकामागून एक छाटून फक्त मुंडा बनविलेला बुंधा जाग्यावर कायम राखला.

तुर्कांचे बाह्य व्यापार अशा रीतीनें खुंटविले जात असतां त्याचें शरीरसामर्थ्य कायम राखण्याचा प्रयत्न तुर्की सुलतानांकडून व्हावयाचा तर वैभवशाली सुलेमानामागून कर्तबगार सुलतानांची परंपराच मुळीं थांबली; आणि सुलतानांचा नादानपणा दिसूं न देणारे अनेक धुरंधर वजीर तुर्की दरबारास लाभले असतांहि, तुर्की समाजास युरोपियन समाजाच्या धर्तीवर नेणाऱ्या ज्या क्रांतिकारक सुधारणा सुलतान स्वतःच्या हिमतीवर करूं शकले असते, त्या उपरी वजिरांनीं हातीं घेणें संभवनीय नव्हतें. शहाजादा राजकारणांत लुडबुड करून नसत्या भानगडी उपस्थित करील या भयानें त्यास गादीवर बसेपर्यंत एकान्तांत ठेवण्याची तक्तनशीन सुलतान

खबरदारी घेऊं लागल्यामुळें अननुभवी सुलतानांच्या अंगीं कोणतीहि अवघड कामगिरी शिरीं घेण्याचा वकुब उरला नाहीं. अशा रीतीनें सुलतान निस्तेज पडून जनानखान्यांतील अबला प्रबळ झाल्या. मोठमोठ्या अधिकारांच्या जागांचे लिलाव पुकारल्यामुळें नालायकांच्या हातीं राज्य-सूत्रें जाऊन कारभारांत बेजबाबदारी माजली. सुलतानांनीं स्वतः मोहिमांवर जावें व त्यांच्या हुकमतींत जेनिसरीजसारख्या वाकबगार सैन्यानें चालावें हा जुन्या सुलतानांचा रिवाज मोडणारे नवे सुलतान घरकोंबडे होऊन राहिल्यामुळें जेनिसरीज वरिष्ठांचा हुकूम मानीनासे झाले. कैकवेळां पेशव्यांच्या पदरच्या गारद्यांप्रमाणें शिरजोरपणा करून त्यांनीं कांहीं वजिरांचीं मुंडकीं उडविलीं व सुलतानांस पदच्युत केलें. नवीन शास्त्रांचा आणि विद्यांचा तुर्की साम्राज्याबाहेरील युरोपियन देशांतून फार मोठ्या प्रमाणावर प्रसार होत चालला आणि सुलतानांचें जुनें शहाणपण व ज्ञान कूपमंडूकवृत्तीप्रमाणें संकुचित व निरुपयोगी ठरलें. तें हरएक सुधारणेचा कंटाळा करूं लागलें आणि यच्चयावत् ज्ञान कुराणांत सांठून राहिलें आहे अशी त्यांनीं आपली खोटी व घातुक समजूत करून घेतली.

तुर्कांचें साम्राज्य खुद्द युरोपांत असतां तें युरोपियन संस्कृतीपासून हिंदुस्तानाइतकेंच अलिप्त राहिलें याचा सकृद्दर्शनीं विस्मय वाटतो खरा, पण किंचित् सूक्ष्म विचार करणाराची, ही चूक अगदीं स्वाभाविक होय अशीच खात्री होईल. तुर्कस्थान वगळून युरोपांतील बाकीचीं सर्व राष्ट्रें धर्मानें ख्रिस्ती होतीं. धर्माच्या समान व प्रबळ नात्यानें पाश्चात्य संस्कृतीचे प्रवाह समान पातळींतील ख्रिस्ती समाजांत सहजगत्या सर्वत्र खेळले. पण तेच प्रवाह तुर्कांच्या भिन्न अशा इस्लामी समाजाशीं येऊन थडकतांच त्या चढत्या जमीनीपासून परत फिरले. तुर्की समाज या अडचणीमुळें मागासला, पण त्यांच्याच ताब्यांतील ग्रीस, सर्व्हिया, बल्गेरिया, रुमानिया इत्यादि देशांतील ख्रिस्ती प्रजा स्वतंत्र युरोपियन राष्ट्रांच्या संसर्गानें बरीच सुधारली आणि तिनें रशिया, ऑस्ट्रिया फ्रान्स, प्रशिया व इंग्लंड आदि-करून जातभाई राष्ट्रांच्या प्रत्यक्ष मदतीनें व अप्रत्यक्ष चिथावणीनें अनेक शतकें गमावलेलें स्वातंत्र्य फिरून कमाविलें, त्याचा हिंदुस्थानच्या दृष्टीनें बोधप्रद व अत्यंत मनोरम इतिहास पुढील खंडांत वाचावयास मिळेल.

वजीर व राण्या यांची राजवट १५६६-१७००

सुलेमानाच्या मरणानंतर त्याचा एकुलता एक मुलगा सेलीम गादीवर बसला. सेलिमापासून नामधारी सुलतानांची परंपरा सुरू झाल्यामुळें दरबारांतील कर्ते वजीर व जनानखान्यांतील हुशार राण्या यांच्याच हातीं राज्यसूत्रें गेलीं. सुलतानाच्या भाऊबंदांनीं राज्यावर उठावें, तर त्यांचा प्रारंभापासून बीमोडच करून टाकण्यांत येत असे. यामुळें अन्तःस्थ यादवी टळली; व परचक्राखालीं राज्याची वातहत व्हावी तर जुन्या सुलतानांच्या शाळेंत शिकलेले मुत्सद्दी व योद्धे यांची परंपरा कायम असल्यामुळें त्यांनीं पुढील नामधारी सुलतानांची बाजू चांगली सावरली. सन १५६६ पासून १७०० पर्यंतच्या दीड शतकांत तुर्कांनीं नवीन मुलुख जितका कमावला, त्यापेक्षां गमावला अधिक; तरी पण विस्ताराच्या दृष्टीनें तुर्की साम्राज्य फारसें खालावलें असें नाहीं. अशा बिकट काळांत वजीर सोकोल्लीन यानें बारा वर्षें गादीची चाकरी इमानें इतबारीनें व हुशारीनें केली.

डॉन व होलगा या दोन नद्या कालव्यानें जोडून पोलंडांत आपल्या गलबतांचा प्रवेश करण्याच्या इराद्यानें सोकोल्ली यानें कास्पियन समुद्रावरील अस्त्राखान बंदर घेण्यास सैन्य पाठविलें. तुर्क व रशियन सैन्याचा याच निमित्तानें पहिला सामना झडला व त्यांत तुर्कांचा पराभव झाला. त्याच वर्षीं येमेनसुद्धां सर्व अरबस्तान त्यांस जिंकतां आला. सायप्रस बेट १५७० त त्यांच्या हातीं पडलें. सदर बेटांत ख्रिस्ती लोकांची वस्ती मोठी होती. त्यांपैकीं तीस हजार माणसांची तुर्कांनीं कत्तल केली, व त्यांच्या भयानें कैक बायकांपोरांनीं जीव दिले. सायप्रसमधून दोन हजार देखणीं मुलें पकडून आणून त्यांस गुलाम म्हणून विकण्यांत आलें. खिस्त्यांचा कैवार धर्मदृष्ट्या रोमच्या पोपावांचून दुसरा कोण घेणार? पोपच्या आज्ञेवरून, स्पेन, व्हेनिस यांनीं आपलें आरमार एकत्र करून तुर्कांचा फार मोठा पराभव केला. ह्या आरमारी युद्धांत तुर्कांचें नुकसान फार झालें, पण तें त्यांनीं लवकरच भरून काढून भूमध्य समुद्रांत आपला दरारा पूर्ववत् बसविला व इतकें करून सोकोल्ली १५७८ त मरण पावला.

पांचवा चार्लस पश्चिम युरोपांत बिनजोड ठरला होता. तो स्पेनचा

राजा, हंगेरीचा अधिपती, नेदर्लंडचा मालक, इतलीचा स्वामी आणि आस्ट्रीया व जर्मन यांचा बादशाहा होता. तुर्की साम्राज्याच्या वायव्येकडील या बड्या प्रस्थापुढें तुर्कांची त्या दिशेची प्रगतिच खुंटली. सोकोल्लीच्या अमदानींत आस्ट्रियाचा बादशहा मॅक्सिमिलन होता. सुलेमान व चार्लस ह्या दोघांत पराक्रमानें व सामर्थ्यानें वरचढ असलेल्या सुलेमानापुढें चार्लस-ला नमतेंच घ्यावें लागत होतें. पण ऑस्ट्रियाचा चार्लस आणि तुर्कस्थान-चा सुलेमान यांच्या आतां जागा भरून काढणाऱ्या मॅक्सिमिलन व सोकोल्ली या जोडींत बादशाहा मॅक्सिमिलन वजीर सोकोल्लीस भारी होता. त्याच्या फुशीनें ट्रॅन्सिलव्हानिया व वालाशिया (सांप्रतच्या रुमानियाचा एक भाग) यांनीं तुर्कांविरुद्ध बंड केलें व बंडाच्या दंगलींत मॅक्सिमिलन यानें वालाशि-याची बुखारेस्ट ही राजधानी व इतर किल्ले सर केले आणि वालाशिया तुर्कांस पुढें परत मिळाला, तरी ट्रॅन्सिलव्हानिया व हंगेरीचा अर्धा भाग त्यांच्या हातचा गेला.

सोकोल्ली राज्य चालवीत असतां सुलतान सेलीम मद्य व मदालसा यांच्या नादांत चूर झाला होता. सेलीमचें हें व्यसन न्यायाधीश, काजी व उलेमा यांच्यांतहि उतरलें.कवींची प्रतिभाहि शराबच्या पेल्यांत रममाण होऊन गेली. हफीज नामक तत्कालीन एक नामांकित कवि अल्लड पोरीच्या चुंबना-पेक्षांही मद्याचें चुंबन अधिक मधुर म्हणून वाखाणतो.सोकोल्लीच्या मरणो-त्तर राजसत्ता वजिरांपाशीं ठरून न राहातां ती जनानखान्यांत शिरली. सुलताना बाफू हिचें प्रस्थ या सुमारास फार माजलें. ती सुंदर, व महत्त्वा-कांक्षी स्त्री होती. त्या वेळीं मुराद सुलतान असून तो पूर्णपणें बाफूच्या अहारी गेला होता. सुलतानाच्या आईनें त्याला बाफूच्या कबजांतून सोडविण्याची एक चमत्कारिक युक्ति काढली. बाफूहूनहि खुपसुरत स्त्रिया तिनें सुलतानास मिळवून दिल्या. त्यांच्या आकर्षणानें बाफूची मिठी बरीच सैल झाली. तथापि तिचें दरबारांतील वजन कमी झालें नाहीं

सरकारी अंमलदारांच्या जागा विकण्याची दुष्ट चाल हिनेंच पाडली. या पद्धतीनें सर्व कारभार खालपासून वरपर्यंत नासला. न्यायाधीश जो पक्षकार जास्ती लांच देईल त्याच्या बाजूनें न्याय देऊं लागले. वरचा अंम-

लदार हाताखालच्या अंमलदाराची पैसा खाऊन नेमणूक करीत असल्यानें कोणाहि अंमलदारास आपल्या जागेची शाश्वती वाटेनाशी झाली, व जो दिवस गेला तो पदरांत पडला, अशा समजुतीनें रयतेपासून निघेल तितका पैसा पिळून काढण्यास कोणीहि अधिकारी कमी करीना. लांचलुचपतीचा सुळसुळाट सैन्यांतहि झाला. पैशाच्या बळावर मोठमोठ्या लष्करी हुद्यावर चढलेल्या नादान अधिकाऱ्यांना हाताखालचे शूर व लायक शिपाई जुमानीनात. जेनिसरीज म्हणतील ती पूर्व दिशा ठरूं लागली. यामुळें राज्यांत बेदिली माजून सरहद्दीवरील प्रांतांत बंडें उद्भवलीं.

राज्यास एकीकडून उतरती कळा लागत चालली, तर दुसरीकडून देशाची सांपत्तिक स्थितिहि खालावली. हिंदुस्थानांत सेलीमच्या दरबारीं राहिलेला इंग्रजांचा वकील सर टामस रो १६२२ पासून पांच वर्षेपर्यंत आलेजअर्स व ट्यूनिस येथील मुसलमान चांचे लोकांचा बंदोबस्त करून घेण्याकरितां कॉन्स्टांटिनोपलास मुक्काम करून होता. तो म्हणतो—ग्रीस व रूम यांतून पांच पांच सहा सहा दिवस प्रवास केला तरी एकाहि खेड्यांत माझ्या घोड्यास पुरेशी चंदी मिळाली नाहीं. सरकारी वसूल होत नाहीं. सैनिकांस देण्यास सरकारपाशीं पैसा नाहीं आणि सुलतानाचा खर्चहि निभत नाहीं.

राज्याची शक्ती आंतून क्षीण होत चालली होती, तरी तुर्कांना बाहेरील सर्व मोहिमांतून अपयशच येत होतें असें नाहीं. सुलतान मुराद अगदींच नादान नव्हता. त्यानें १६३२ त जेनिसरीजच्या पुढाऱ्यांस फाशीं देऊन त्यांचें बंड मोडलें. १६३६ त इराणावर स्वारी करून, गेलेलें बगदाद शहर परत मिळविलें व १६४१ मध्यें रशियनापासून अझोव्ह घेतलें.

मुरादामागून नवे सुलतान नकर्ते निघाले व त्या वेळीं किपरली वजिरांनीं पुढें होऊन १६५६ पासून १७०२ पर्यंत गादीची अब्रू संभाळण्याची शिकस्त केली. महंमद किपरली या घराण्याचा मूळ पुरुष होय. त्यानें करडा अंमल चालवून लाचखाऊ अधिकारी, अन्यायी न्यायाधीश, नामर्द सेनापती, आणि बंडखोर शिपाई यांस देहान्त शासन दिलें. अशा रीतीनें त्याच्या पांच वर्षांच्या कारकीर्दींत पसतीस हजार माणसें प्राणास मुकलीं.

कॉन्स्टांटिनोपलच्या एका डोंबानें आपण एकट्यानें सरकारी हुकुमावरून चार हजार माणसांचीं डोकीं मारल्याचें कबूल केलें आहे. १६६०त आफ्रिकेंतील आलजेअर्स व ट्यूनिस हे प्रांत तुर्कांपासून स्वतंत्र झाले. १६६४ पासून १६९८ अखेर चौतीस वर्षांत ऑस्ट्रियाबरोबर तुर्कांचीं पांच युद्धें झालीं व त्या बहुतेक युद्धांत राजपुत्र युजीनच्या पराक्रमापुढें तुर्क पराजय पावले. १६९८ सालीं इंग्लंड व हॉलंड यांच्या मध्यस्थीनें ऑस्ट्रिया, व्हेनिस व पोलंड यांजबरोबर तुर्कांचा तह होऊन त्या तिन्ही राष्ट्रांनीं तुर्कांपासून जो मुलख घेतला होता, तो त्यांजकडे तसाच राहावा असें ठरलें. यामुळें मोरिया व ग्रीस यांतील बराच भाग व्हेनिसकडे राहिला. तथापि व्हेनिसचें क्रीट बेट आणि पोलंडचा पोलादिया प्रांत तुर्कांस मिळाला. जेनिसरीज यावेळीं इतके मातले होते कीं, त्यांनीं कॉन्टांटिनापलमध्यें कत्तल करून वजिरांचे वाडे जाळले.

युरोपियन कारस्थान (१७००–१८०८)

सतराव्या शतकाचे आरंभीं युरोपांत ऑस्ट्रिया हा एकच प्रबल शत्रु तुर्कांस भेटला असला तर आठराव्या शतकांत तुर्कीसाम्राज्यास ऑस्ट्रियाच्या जोडीनें रशिया हा नवा शत्रु निर्माण झाला. या दोन शत्रूंनी पश्चिम व उत्तर या दोन दिशांनीं मिळून तुर्कांस जर्जर करून सोडलें. हीं दोन राष्ट्रें कधीं एकजुटीनें तुर्कस्थानांवर चालून येत, तर कधीं वेगवेगळीं लढत. परंतु या दोन्ही तऱ्हांनीं तुर्कांचा नाश व्हावयाचा एकच ठरलेला परिणाम मात्र सहसा चुकला नाहीं. ऑस्ट्रियास आपल्या राज्यांतून तुर्कांनीं गिळंकृत केलेले प्रांत तरी मिळावावयाचे होते, परंतु रशियाची भूक इतकी लहान नव्हती. त्याला युरोपांतील सर्व तुर्की साम्राज्यच घशाखालीं उतरावयास पाहिजे होतें. रशियाचें अस्वल पांढऱ्या समुद्राकडील बर्फ एका बाजूस गारठून पडलें असल्यामुळें त्यास अंगांत उबारा चढण्यास भूमध्य समुद्रांत फेरफटका करण्याची मुभा मिळणें आवश्यक होतें. त्यापूर्वीं काळा व मार्मोरा हे दोन समुद्र आणि त्यांच्या कन्यका अशा दोन खाड्या तरून गेल्यावांचून दुसरी गतिच नव्हती. परंतु त्या सर्वांवर सत्ता चालविणार तुर्क असल्यामुळें त्यांस युरोपखंडांतून चंबूगवाळ्यानिशीं आशिया खंडांत हाकून देणें हा एकच रस्ता

खुला करण्याचा उपाय होता.म्हणून त्यांनं तुर्की साम्राज्यावर प्रत्यक्ष स्वाऱ्या करून व तुर्कांच्या ख्रिस्ती प्रजेस तुर्कांविरुद्ध उठवून ऑस्ट्रिया बरा पण हा रशिया नको असा उच्छाद आणून सोडला.

रशियाचा उदय पीटर दि ग्रेटच्या काळीं म्हणजे १६९६ त झाला. तेव्हांपासूनच तो हात धुवून तुर्कांच्या पाठीस लागला. पीटरनें स्वकष्टानें जहाजें बांधण्याची कला व शिल्पकला आपल्या राज्यांत आणिली, सैन्यास कवाईत शिकविली व सेंटपीटर्सबर्ग या नव्या स्वतः वसविलेल्या राजधानींत शास्त्रीय कॉलेज (Academy of Science) स्थापलें आणि या आधुनिक साधनांनीं रशियाची आंतून सुधारणा चालविली. प्रारंभीं-च्या झटापटींत रशिया तुर्कांपुढें हरला, परंतु त्याचा वाढता अंकुर लव-करच जोरास लागून तो तुर्कांचा कर्दनकाळ होऊन राहिला. पीटर, त्याची राणी कॅथेराइन व त्यानंतर दुसरी कॅथराईन यांनींच प्रमुखत्वें-करून तुर्कांविरुद्ध कारस्थानें रचिलीं. आठराव्या शतकांत रशिया व तुर्कस्थान यांचें दरम्यान चार युद्धें झालीं. पहिलें युद्ध १७२१ त पोलंड संबंधानें घडलें. त्यांत पीटर दि ग्रेट स्वतः तुर्कांच्या हातीं सांपडण्याच्या बेतांत आला होता. परंतु त्याच्या राणीनें प्रसंगावधान राखून मोठ्या धूर्तपणानें त्याचा बचाव केला. खुद्द रशियाचाच पराभव झाल्यामुळें त्यास तुर्कांच्या इच्छेविरुद्ध पोलंड मिळविणें साधलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्या वेळीं झालेल्या तहांत अझोव्ह व त्या सभोंवतालचा मुलूख रशियानें सुलतानास द्यावा, रशियानें आपलें सैन्य पोलंडमधून काढून न्यावें व कॉन्स्टांटिनोपलमध्यें रशियाच्या वकिलास थारा मिळूं नये असें ठरलें. रशि-याचा वकीलहि आपल्या दरबारीं राहूं दिल्यानें त्यास आपणविरुद्ध खुळें उभीं करण्यास सवड सांपडते हें इंगित तुर्कांच्या लवकरच लक्षांत आलें म्हणा-वयाचें! १७१८ त राजपुत्र यूजिन या शूर सेनापतीच्या अधिपत्याखालीं ऑस्ट्रियानें तुर्कांचा पुरा मोड करून पासरविशच्या तहांत तुर्कांपासून हंगेरी सोडवून घेतला.

सन १७३५ त रशियानें तुर्कांपासून क्रीमिया उपटण्याकरितां त्यावर स्वारी केली, आणि आस्ट्रियानें रशिया व तुर्कस्थान यांचें दरम्यान

मध्यस्थीचा आव आणून तुर्कांवरच तरवार उपसली. पण तुर्कांनीं मोठी मर्दुमकी दाखवून ऑस्ट्रिया व रशिया यांचा वेगवेगळ्या ठिकाणीं पराभव केला. या विजयानें पासरविशच्या तहांत गेलेला सर्व प्रदेश आस्ट्रियापासून तुर्कांस परत मिळाला. रशियानें मोलडाविया व क्रीमिया यांत घेतलेला मुलुख तुर्कांस परत दिला आणि काळा समुद्र व अझोव्ह यांतून आपलें आरमार काढून घेतलें. १७७४ त प्रशियाचा बादशहा फ्रेड्रिक दि ग्रेट, रशियाची कारस्थानी राणी कॅथेराईन आणि आस्ट्रियाची प्रसिद्ध महाराणी मराया थेर्सा यांनीं पोलंड आपसांत वाटून घेण्याचा कट केला. हें कारस्थान तुर्कांच्या हितसंबंधाच्या आड येणार असल्यानें रशिया व तुर्कस्थान यांच्या बऱ्याच झटापटी होऊन केनार्डीस उभयतांत तह ठरला. या तहानें वालाशिया व मोल्डाव्हिया, बेस अरेबिया, जॉर्जिया, वगैरे प्रांत तुर्कांस रशियानें परत दिले. परंतु आपल्या साम्राज्यांतील वालशिया व मोल्डाव्हिया या प्रांतांतील ख्रिस्ती प्रजेच्या धर्मासंबंधानें एक महत्त्वाचें कलम घालण्यांत आलें. तें असें—ख्रिस्तीधर्म व चर्चें यांचें तुर्कांनीं रक्षण केलें पाहिजे आणि हें रक्षण होत आहे कीं नाहीं, ह्यावर नजर ठेवण्याकरितां रशियाचा एक मंत्री सुलतानाच्या दरबारीं रहावा व त्यानें ख्रिस्ती प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घ्यावी. या अटीनें १७३५ च्या तहाचें सारें उट्टें रशियानें सव्याज भरून काढलें. ख्रिस्ती प्रजेच्या धार्मिक हितसंबंधाच्या नांवाखालीं तुर्क दरबारांत ढवळाढवळ करण्याचें आणि तुर्कांवर एकाअर्थी हुकमत गाजविण्याचें हत्यार रशियाच्या हातीं आलें. त्याच प्रमाणें काळा समुद्र आणि भूमध्य समुद्र यांतूनहि आरमाराची वाहतुक करण्याचा दुसरा नवा व अत्यंत महत्त्वाचा हक्क रशियास प्राप्त झाला. या हक्कानें रशियाचा चाळीस वर्षांचा जुना मनोरथ शेवटास गेला, व तुर्की मुलूख रशियासमोर केव्हांहि उघडा पडला. किंबहुना केनार्डीच्या तहानें तुर्कांचें राज्यहरण करण्यास सुरुवात केली असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं.

केनार्डीच्या तहांत मिळालेल्या अपूर्व सवलतींनीं रशियाची तृप्ति मुळींच झाली नाहीं. रशियाची राणी कॅथेराईन हिच्या मनांत तुर्कांस

युरोपांतून हुसकावयाचें होतें; आणि हा हेतु साध्य करण्यास तिनें एक नवीनच बूट काढला. तुर्कांचें युरोपांतील राज्य ग्रीक साम्राज्यास मारून जन्मास आलें होतें. रशिया हा ग्रीकपंथीय ख्रिस्ती होता. तेव्हां ग्रीक पंथाचा अभिमान धरून तुमच्या बादशाही अमलाची कॉन्स्टांटिनोपलास पुन्हा स्थापना करते असें मधाचें बोट ग्रीक लोकांच्या तोंडास लावल्यास ग्रीक लोक ते मिटक्या मारीत चोखतील अशी कॅथेराइनची खात्री होती. ग्रीक लोकांस या आशेवर झुलवीत ठेवून त्यांना तुर्कांशीं सामना देण्यास उभें करावें आणि त्यांच्या नांवावर व आपल्या सैन्याच्या बळावर ग्रीस देश एकदाचा आपलासा झाला, म्हणजे ग्रीकांच्या तोंडास पानें पुसून इसाबनीतींतील गोष्टीप्रमाणें त्यांच्या पाठीवर एकदा ठेवलेलें खोगीर कायमचें बसवून द्यावें असा कॅथेराइनचा बेत होता. तिला दुसरा नातू झाला तेव्हां त्याचें तिनें ग्रीकांस गोड वाटेल असें कान्स्टंटाइन हें परिचित नांव ठेवलें. त्यास ग्रीक लोकांचा लळा लागण्याकरितां त्याजपाशीं ग्रीक दाया ठेवल्या. भाषाहि ग्रीकच शिकविली आणि कॉन्स्टांटिनोपलमध्यें ग्रीक बादशहा म्हणून स्थापण्याचा मनसुबा केला. सबंध युरोपांतलि तुर्की साम्राज्य हातीं आल्यास त्या प्राप्तीचा अर्धा वाटा आपणांस मिळावा असा करार करून ऑस्ट्रियाचा बादशहा जोसेफ हाहि १७८७ त या कटांत सामील झाला. या धर्मकृत्यास ग्रीकांची संमत्ति मिळविण्याकरितां कॅथेराइन हिनें आपले दूत ग्रीसमध्यें पाठवून त्यांस स्वधर्मबंधमोचनार्थ तुर्कांविरुद्ध उठण्यास भर दिली. बाह्यात्कारी आमच्या मदतीस या अशी याचना करणारें शिष्टमंडळहि ग्रीकांकडून तिनें बोलावलें. शिष्टमंडळानें तिजपाशीं दारूगोळ्याची मदत मागितली, आणि राणीनें ती त्यांस देऊं केली. ठरलेल्या संकल्पानुसार ऑस्ट्रियानें तुर्कांशीं लढाई उकरून काढली आणि इलिझाबेथ त्याला मिळून उभयतांनीं तुर्कांचा १७९० सालीं बऱ्याच ठिकाणीं पराभव केला.

ऑस्ट्रिया व रशिया तुर्कस्थानास आतां गिळून टाकणार अशीं दुश्चिन्हें दिसतांच इंग्लंड, प्रांशिया व हॉलंड यांच्या मदतीनें मध्यस्थीचा आव आणून या पूर्वयुरोपांतील राजकारणांत घुसलें. या

त्रिकूटानें सिस्टोवा येथें ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांचा तह जमवून आणून त्यांजकडून परस्परांचा मुलूख परस्परास देवविला. ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांचा लढा अशा रीतीनें मिटविल्यावर सदर त्रिकूट रशिया व तुर्कस्थान यांचा तंटा तोडण्याच्या उद्योगास लागलें. इंग्लंड व फ्रान्स यांचें आजपर्यंत हाड वैर असल्यामुळें फ्रान्सला दाबांत ठेवण्यासाठीं इंग्लंड रशियाशीं मैत्रीनें होतें. परंतु तुर्कस्थानास फस्त करून फ्रान्सपेक्षां रशिया मातणार असें दिसतांच रशियास इंग्लंडनें झिडकारून त्याजविरुद्ध फ्रान्सबरोबरच सख्य केलें. रशियाची राणी इंग्लंडास भीक घालीना, तेव्हां रशियावर सैन्य पाठविण्यापर्यंत इंग्लंडची मजल आली. या प्रसंगास उद्देशून धाकट्या पिटनें काढलेले उद्गार मननीय आहेत. तो म्हणाला तुर्कांस खाऊन रशिया पुष्ट होईल, आणि रशिया बळावला म्हणजे तो प्रशियाच्या प्रगतीच्या आड येईल. प्रशिया व स्वीडन यांवर संकट गुदरेल आणि युरोपांतील सत्तेचा समतोल कांटा ढळेल. यासाठीं कसेंहि करून तुर्कस्थानास जगविलें हें पाहिजेच. युरोपियन लांडग्यांच्या तावडींतून तुर्कमेंढी आजवर एकटी कशी जीव धरून राहिली, या कोड्याचा उलगडा या लांडग्यांच्या आपसांतील चुरशींतच होणार आहे. १७९१ त रशिया व तुर्कस्थान यांचा तह ठरून रशियानें नीस्टर व बग या दोन नद्यांमधील मुलुख, शिवाय बाकीचा तुर्कांपासून घेतलेला सारा मुलुख सोडला. मात्र बेस अरेबिया, मोलदाविया, वालाशिया आणि क्यूबा यांवरील तुर्की साम्राज्यांतील राजेरजवाड्यांचा रशिया त्राता(protector)बनला.म्हणजे एवढ्या मुलखावरील तुर्की साम्राज्य लयास जाऊन त्यावर रशियन साम्राज्य पसरलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें सांप्रतच्या सबंध रूमानियास तुर्कस्थान अंशतः मुकला.

साम्राज्याची मोडतोड

बाल्कन राज्यें व ईजिप्त १८२७–१८८२

फ्रान्सांत राजीबेराजी आठराव्या शतकाच्या अखेरीसच झाली. परंतु तिचा खरा प्रभाव युरोपखंडास एकोणिसाव्या शतकांतच जाणवला. राजक्रांतीच्या कल्पनांचा उदय फ्रांस देशांत रुसो, व्हॉल्टेअर हेवेट्रिअस

आणि कान्डियाक या नामांकित ग्रंथकारांनीं करून दिला; तथापि त्याचा फैलाव साऱ्या युरोपांत नेपोलियनच्या दारूगोळ्यांतून झाला हें निर्विवाद होय. वरील ग्रंथकारांनीं ख्रिस्ती धर्मकल्पना, राजनिष्ठा व परंपरेचा अभिमान यांच्या चिंधड्या उडवून दिल्या आणि त्याबरोबर सत्य, दया व दाक्षिण्य हीं धुळीस मिळविलीं. १७९२ त फ्रांसमध्यें लोकसत्ताक राज्याची प्राणप्रतिष्ठा झाली आणि त्याच्या पुढच्याच वर्षीं फ्रेंच राजा सोळावा लुई यास फांसावर चढावें लागलें. इतकेंच नव्हे तर अनाथ, निरपराधी आणि केवळ लावण्याची खाण अशी राजपत्नी मेरी ॲन्टोनेट, व राजभगिनी इलिझाबेथ या अबलांवर हात टाकण्यासहि क्रांतीच्या वेडानें डोकें फिरून गेलेल्या पुढाऱ्यांस दिक्कत वाटली नाहीं. या घोर कृत्यांनीं युरोपखंडभर हाहा:कार उडाला व ऑस्ट्रिया, प्राशिया, रशिया आदिकरून बादशाहांचें धाबें दणाणलें. त्या सर्वांनीं इंग्लंडच्या आधिपत्याखालीं फ्रान्सचे हे चाळे बंद पाडण्याकरितां आपले हात म्यानास घातले. पण त्या सर्वांसहि पुरून उरणारा नेपोलियन क्षितिजावर उगवल्यामुळें फ्रान्समधील आग शमण्याचें दूरच राहून ती सर्व युरोपभर भडकून तिच्यांत बहुतेक राजांचीं सिंहासनें होरपळून निघालीं, आणि त्या आगीच्या ठिणग्या तुर्कांच्या साम्राज्यछत्रावर उडाल्यावांचून राहिल्या नाहींत.

युरोपांतील साऱ्या बादशाहीस मुख्य आधार इंग्लंडचा असल्यामुळें ब्रिटिश साम्राज्याच्या मुळाशीं हात घालून तें उपटून टाकल्यावांचून फ्रान्सचे मनोरथ पूर्ण होणार नाहींत अशी नेपोलियनाची पक्की समजूत होती. म्हणून ब्रिटिश साम्राज्याचा डोलारा ज्यावर उभा होता तो हिंदुस्थान व इंग्लंड यांचा राजकीय व व्यापारी संबंध तोडण्याकरितां नेपोलियनानें तुर्कीसाम्राज्य छत्राखालील ईजिप्तवर अचानक भरारी मारली आणि आपलें गरुडांकित निशाण प्रख्यात पिरामिडवर रोवलें व तेथून विजेप्रमाणें पॅलेस्ताईनमधील पवित्र टेबर पर्वताच्या पायथ्याशीं थडकून तुर्कांची युद्धांत भयंकर कत्तल केली.तथापि एकरपाशीं इंग्लिश दर्यावर्दी सर सिडने स्मिथ यानें ऐन वेळीं तुर्कांची बाजू संभाळून नेपोलियनास दाबून धरलें नसतें तर तुर्की साम्राज्याची धडगतच नव्हती. अरबस्थानांतून पिच्छेहाट झाल्या-

वर आबूकीर येथें तुर्कांस नेपोलियनानें जातांजातां आणखी एक सहज थप्पड लगावली, पण तीही गरीब बिचाऱ्या तुर्कस्थानास चांगलीच बसली. प्रबळ व प्रतिस्पर्धी फ्रान्सपेक्षां दुर्बळ दोस्त जो तुर्क त्याच्या ताब्यांत तूर्त ईजिप्त राहाणें इंग्लडास हवें असल्यानें १८०२ मधील अथेन्स येथील तहांत इंग्लंडनें फ्रान्सकडून सुलतानाची ईजिप्तवरील सत्ता कबूल करून घेतली. १८२२ त राशिया व तुर्कस्थान यांचे दरम्यान बुखारेस्ट येथें तह होऊन त्या दोन्ही राज्यांची प्रूथ नदी ही सरहद्द ठरली आणि वालाशिया आणि मोलडाव्हिया यांचा बराच भाग तुर्कांस परत मिळाला. युरोपांतील मोठाल्या बादशाहांना फ्रेंच राजक्रांतीमुळें आपलीं सिंहासनें पालथीं होऊन प्रजासत्ताक राज्यांची स्थापना त्या ठिकाणीं होईल कीं काय अशी धास्ती पडली होती, पण त्यांच्या सिंहासनांच्या खुराखालीं सांपडलेल्या परतंत्र राष्ट्रांस स्वतंत्र होण्याची स्फूर्ति याच राज्यक्रांतीपासून मिळाली. याहि राष्ट्रांत दोन पक्ष होते. एक ख्रिस्ती बादशाहांचा अंकित तर दुसरा तुर्की मुसलमान सुलतानांचा बंदा इताली देश ख्रिस्ती ऑस्ट्रियाच्या जोखडाखालीं सांपडला असल्यामुळें त्यास ऑस्ट्रियन जूं झुगारून देऊन स्वतंत्र होण्याची जितकी आशा होती, त्यापेक्षां इस्लामी सुलतानाच्या सत्तेखालील ग्रीस, रुमानिया, बलगेरिया व सार्व्हिया यांस ती सहाजिकच अधिक होती. कारण इतालीस आस्ट्रियापासून सोडविण्यास फक्त राजकीय निमित्त होतें, परंतु उपरिनिर्दिष्ट बालकन राष्ट्रांच्या मुक्तीस राजकीय व त्याहूनही प्रबळ असें धार्मिक हीं दोन्ही निमित्तें एकवटलीं होतीं. या कारणांत रशियाचा स्वतःचा हितसंबंध विशेष गोंवला गेला असल्यामुळें त्याचा आणि मुख्यतः ग्रीसचा मोक्षकाळ समीप आला होता; व त्यांचा मोक्षकाळही ज्या क्रमानें तीं पाचशें वर्षांपूर्वीं एका शतकाच्या अवधींत तुर्कांच्या बंधांत सापडलीं त्याच क्रमानें वाट चालू लागला, हेंही लक्षांत आल्यावांचून राहात नाहीं.

ग्रीस

दुसऱ्या महंमदानें १४६०त ग्रीस देश जिंकला. तेव्हांपासून ते ग्रीक लोक तुर्की अमलाखालीं सुखांत होते. ते स्वतंत्र असतांना त्यांचे आपसांत माज-

लेले कलह तुर्कांच्या एकतंत्री अमलाखालीं बंद पडले. ख्रिस्ती म्हणून तुर्की सैन्यांत ग्रीक लोकांस दाखल करण्यास मनाई होती. त्याबद्दल दंडादाखल त्यांच्या कोवळ्या मुलांस आईबापांपासून काढून नेऊन जेनिसरीज पलटणींची भरती करण्यांत येई. युद्धकर्मास पारखे झालेले ग्रीक नामर्द बनले. आणि कित्येक शतकें तुर्की इतिहासांत त्यांचा इतिहास विलीन होऊन गेल्यामुळें वैय्यक्तिक गुण शिल्लक राहिले असले, तरी त्यांच्या राष्ट्रीय गुणांचा लोप झाला. राज्याचीं मुख्य सूत्रें तुर्क सुभेदार आपल्या हातीं वागवीत आणि त्यांच्या छत्राखालीं वित्त, जीवित व धर्म सुरक्षित रहातो या समाधानांत ग्रीक लोक आयुष्य घालवीत. शेतकी व व्यापार पूर्णपणें त्यांचाच होता. त्याच्या आधारें व सुभेदार आणि पाशा यांच्या मर्जीनें ते तुर्कांहूनही अधिक संपत्ति उपभोगीत. बुद्धिमत्ता, सुशिक्षण व तरतरी हे मूळचे सद्गुण त्यांनीं जतन करून ठेवले होते. परंतु तुर्कांपुढें लवून वागण्याची संवय जडल्यामुळें लटपटीतपणा, डावपेंची, कुढेपणा व खूषामत या दुर्गुणांचाही प्रादुर्भाव त्यांचे ठिकाणीं पूर्णपणें झाला होता. फिनले म्हणतो त्याप्रमाणें ज्यांचे बौद्धिक, मानसिक व शारीरिक व्यापार मोकळेपणानें चालत होते ते राज्यकर्ते तुर्क ग्रीकांपेक्षां धैर्य, नीतिमता, संघटना, व इभ्रतदारी यांत श्रेष्ठ असल्यास नवल काय ?

रशियाची राणी कॅथेराईन हिनें १७७० त ग्रीकांस चिथावून त्यांजकडून तुर्कांविरुद्ध बंड करविलें; आणि तिनें आपलें आरमार भूमध्य समुद्रांत पाठवून १५०० शिपाई ग्रीसच्या मोरिया प्रांतांत उतरविलें. त्यांच्या आधारावर एरव्हीं शांतताप्रिय असे ग्रीक बंडास प्रवृत्त होऊन त्यांनीं पुष्कळ तुर्क कापून काढले व बाकीच्यांस हाकून लावलें. परंतु यापुढें रशियानें मदतीची कुचराई केली, त्यामुळें निराधार पण बंडखोर ग्रीकांचा तुर्कांनीं सहजच सूड घेऊन फडशा पाडला. कॅथेराईनच्या वेळच्या धोरणांत रशियाचा झार अलेक्झांडर यानें तफावत केली. स्वातंत्र्याच्या कल्पना फ्रान्सच्या उदाहरणानें ग्रीकांस एकदां समजल्यावर ते तुर्कांपासून मुक्त केले तरी आपल्या अमलाखालीं टिकणार नाहींत ह्या भयानें अलेक्झांडर त्या वाटेसच गेला नाहीं.

सुलतान महंमद दुसरा हा १८०८ सालीं कॉन्स्टांटिनोपलच्या गादीवर बसला व त्यानें पुढें एकतीस वर्षेपर्यंत शहाणपणानें राज्य चालविलें. तथापि त्यांजवर या वेळीं आलेलीं संकटेंच इतकीं बहुविध व दुस्तर होतीं कीं, त्यापुढें एकट्या माणसाचें शहाणपण काय करूं शकणार? मूळ सत्ता कमकुवत झाल्यापासून डान्यूब नदीवरील विदीन, तैग्रीसवरील बगदाद आणि सीरियांतील एकर येथील सुभेदार सुलतानास न जुमानतां स्वतंत्रपणानें कारभार हाकण्यास सवकले होते. सर्व्हिया, वालाशिया मोल्डाविया व ग्रीस यांत असंतोष धुमसत होता व या सर्वांना आवरण्यास सुलतानापाशीं जय्यत व कैदशीर सैन्यच नव्हतें. जेनिसरीज होते पण ते इतके शिरजोर होऊन बसले होते कीं, कोणा वजिराची बहाली बडतर्फी करावी, यांच्या उलट्या गोष्टी ते सुलतानासच शिकवीत! अशा संकटसमयींहि जें थोडेंबहुत सैन्य महंमदानें १८२७ त ग्रीसमधील बंड मोडण्यास पाठविलें तें ग्रीकांनीं फस्त केलें. त्या वेळीं ईजिप्तचा पाशा व सुलतानचा अंकित महंमदअली याचीच महमदास पायधरणी करावी लागली. सीरिया, दमास्कस व क्रीट यांची पातशहात सुलतान आपणास बहाल करील तरच त्यास आपण कुमक देऊं अशा शर्तीवर महंमद अलीनें आपला शूर पुत्र इब्राहिम यास ग्रीसवर पाठविलें. नाव्हारिनो येथील लढाईंत इब्राहीमच्या कवाइती पलटणींनीं ग्रीकांचा पुरता मोड केला. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं युरोपियन मध्यस्थांनीं शिष्टाईकरितां मध्येंच तोंड घातलें नसतें तर ग्रीसचे खात्रीनें बारा वाजले असते.

इब्राहिमानें मोरिया (ग्रीस) ताब्यावर आणिला व तुर्की आणि ईजिप्शियन आरमार नाव्हारिनो बंदरांत विजयी होऊन स्वस्थ बसलें. ग्रीस व तुर्कस्थान यांजमधील हा लढा मिटविण्याच्या वाटाघाटींत रशिया, फ्रान्स, व इंग्लंड गुंतल्यामुळें इब्राहिम मोरियांत स्वस्थ होता. या तिन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींबरोबर इब्राहिमचें तहाचें बोलणें सुरू होतें. ग्रीकांबरोबर लढूं नका अशी विनंति या तिन्ही आरमारांवरील ॲडमिरलांनीं इब्राहिमास केली होती. पुढील लढाईची गंधवार्ताहि त्यांस नव्हती. इतक्यांत मोरियाच्या समुद्रांतून दोस्तांचीं तीन आरमारें निघालीं व तुर्की

आरमारापाशीं थांबलीं. इतक्यांत कोठून गोळी उडाली कोण जाणे! दोस्तांचें साधलें व त्यांनीं तात्काळ युद्ध पुकारलें. प्रथम इंग्लिशांनीं गोळ्या झाडल्या व त्यांच्या पाठोपाठ फ्रेंच व रशियन यांच्याहि गोळ्या सुटल्या. आणि त्यांनीं तुर्की व इजिप्शियन आरमारास समुद्राचा तळ दाखविला.

अशा विश्वासघातानें तुर्कांचा गळा कापल्यावर फ्रेंच सेनापति येऊन चौदा हजार सैन्यानिशीं मोरियांत उतरला व त्यानें इब्राहिमास मोरियांतून ईजिप्तकडे हांकून लावलें. अशा रीतीनें १८२८ च्या अक्टोबर महिन्यांत ग्रीस देशास एकदाचें स्वातंत्र्य लाभलें. व पुढें बऱ्याच घडामोडीनंतर बव्हेरियाचा प्रिन्स ओटो ग्रीसचा राजा झाला. ग्रीक लोकांत स्वातंत्र्याची स्फूर्ति उत्पन्न करण्यास आंग्ल कवि लॉर्ड बायरन याचें प्रख्यात 'चाइल्ड हॅरोल्ड' हेंहि काव्य कारण झालें हें विसरतां कामा नये.

ईजिप्त.

छोट्या राष्ट्रांची कड घेऊन मोठीं युरोपियन राष्ट्रें जशीं तुर्कांविरुद्ध एक होत, त्याप्रमाणें तुर्कांस पाठबळ देण्यास कोणीहि मुसलमानी देश पुढें येत नव्हता, हा पाश्चात्य व पौर्वात्य राष्ट्रांतील ठळक भेद होय. तुर्की साम्राज्य स्थापन करतांना ख्रिस्ती व मुसलमानी राज्यें यांची राजकीय व धार्मिक दृष्ट्या सारखीच स्थिति होती. परंतु तुर्क हें स्वतःच प्रबळ असल्यामुळें केवळ मनगटाच्या जोरांवर त्यांस विस्कळीत ख्रिस्ती राज्यांवर जय मिळवून एकाकी स्थितींत साम्राज्य वाढवितां आलें. ही मध्ययुगांतील म्हणजे पंधराव्या सोळाव्या शतकांतील गोष्ट झाली. पण तेव्हांपासून एकोणिसाव्या शतकापर्यंत लोटलेल्या तीनचारशें वर्षांच्या काळांत जमीन अस्मानचें अंतर ख्रिस्ती राष्ट्रांत पडलें होतें. तीं देशाच्या किंवा राज्याच्या प्रथमावस्थेंतून बाहेर पडून राष्ट्रपदवीस पोंचलीं होतीं. परंतु हें परिवर्तन मुसलमानी देशांत मात्र घडून आलें नव्हतें. तीं तीन चारशें वर्षांच्या काळांत नवें शहाणपण शिकलीं नाहींत, इतकेंच नव्हे तर वृद्धावस्थेमुळें कीं काय कोण जाणे जुनें शहाणपणाहि विसरून गेलीं. राजकीय किंवा धार्मिक प्रयोजन उपस्थित होतांच, यूरोपियन राष्ट्रांचे

तात्पुरते संघ निर्माण होत व ते संपतांच जरूर तर मोडूनहि जात. स्पेनचें वारसायुद्ध किंवा फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं निर्माण झालेले राष्ट्रसंघ युरोपियनांच्या राजकीय प्रगतीचे द्योतक होत. उलट पक्षीं मुसलमानी राज्यांत संघशक्तीची ही कल्पना पंधराव्या शतकांत जशी नव्हती, तशी चारशें वर्षांनंतरच्या एकोणिसाव्या शतकांतहि उदय पावली नव्हती.

युरोपांत ग्रीक व रोमन हे जुने धर्मपंथ, प्राटेस्टंट, ह्युजनॉट, प्यूरिटन, मेथॉडिस्ट हे नवे धर्मपंथ प्रचलित होते. परंतु परमतसहिष्णुतेचें वारें वाढत्या राजकीय आकांक्षांनीं खेळूं दिल्यापासून पंथभेदाचें ख्रिस्त्यांच्या राजकारणांतून उच्चाटन झालें. मुसलमानी देशांतहि अफगाणिस्तानचा अमीर, इराणचा शहा, मोरोक्कोचा सुलतान हे प्रबळ होते; परंतु मुसलमान लोक कडवे धर्माभिमानी समजले जात असतांहि या राजेरजवाड्यांस खुद्द धर्मावरील व स्वतःवरील भावी संकटाची कल्पनाहि शिवली नाहीं व तुर्की सुलतानांस वांचविण्याचें मनांतहि आलें नाहीं. इस्लाम एकोणिसाव्या शतकांत राजकारणांत व खऱ्या धर्माभिमानांत किरिस्तावांच्या किती मागें पडला होता, याचें मोजमाप तुर्कस्थानच्या दुर्दशेंत पहावयास सापडतें.

ग्रीसमधील बंडाळी, सुभेदारांची बेदिली, सैन्याची हलाखी आणि इतर अंकित ख्रिस्ती राष्ट्रांची धुसफुस यांच्या चिंतेनें व्यग्र होऊन गेलेल्या सुलतान महंमदास १८२७ मध्यें ग्रीसचें बंड मोडण्याकरितां ईजिप्तमधील पदरच्या पाशांच्या दाढीस हात लावावा लागला यापेक्षां दुबळी अवस्था ती कोणती! पेशवाईंत नाना फडनविसास महादजी शिंद्याचीं आर्जवें करावी लागत होतीं त्यांतलाच हा प्रकार. ईजिप्त सेलिमानें जिंकून घेतला होता खरा. तरी पण त्या दूरच्या मुलुखावर नेमलेल्या पाशावर त्यांची हुकमत फारशी नव्हती; आणि अलीकडे मध्यवर्ती सत्ता खचत चालल्यामुळें तर ईजिप्तचे पाशा स्वतंत्रतेनेंच वागत. नेपोलियन बोनापार्टनें १७९४ सालीं ईजिप्तवर झडप घातली असतां, ईजिप्तच्या मदतीस इस्तंबूलहून रवाना झालेल्या सैन्यांत महमदअली हा एक छोटासा सरदार होता. अबूकीरच्या लढाईंत नेपोलियनानें तुर्की सैन्य समुद्रांत ढकललें त्या वेळीं महमद-

अली बुडतां बुडतां वांचला. ईजिप्तमध्यें मुख्य प्रस्थ मामेल्युकांचें होतें. तो ईजिप्तमधील क्षात्रियांचा वर्ग असून तुर्की अमलाखालींहि त्यांचें प्राबल्य कमी झालें नव्हतें. सुलतानांनीं नेमलेल्या पाशास मामेल्युकांच्याच तंत्रानें वागावें लागत होतें. पण नेपोलियनाच्या परचक्रांत प्रख्यात मनोऱ्यांच्या पायथ्याशीं वीस हजार वेचक मामेल्युक धारातीर्थी पतन पावल्यामुळें त्यांचा बीमोडच झाल्याप्रमाणें होता. मर्द मामेल्युक मरून गेल्यावर महंमदअलीचें महत्त्व ईजिप्तमध्यें फार वाढलें अलेअझर क्षेत्रांतील विद्वान उलेमानांनीं तुर्की सुलतानास न जुमानतां त्याची पाशा म्हणून द्वाहि फिरविली. आणि आपला बोज राखण्याकरितां सुलतानास घडलेल्या गोष्टीस मान तुकवावी लागली. १८०७ मध्यें इंग्लिश सैन्यासहि ईजि. प्तमध्यें त्यानें चांगलेच खडे चारले असल्यामुळें इंग्रज तेव्हांपासून चपापून होते. पाशा झाल्यावर जे थोडे मामेल्यूक त्याचें आसन हालविण्यास जिवंत राहिले होते, त्यांतील पांचशे मामेल्यूकांस केरोच्या किल्ल्यांत मेजवानीस बोलावून त्यांची त्यानें कत्तल करविली होती.

सुलतान महमद याच्या निमंत्रणावरून महंमदअलीनें ग्रीसमधील पुंडावा मोडण्यास आपला पराक्रमी पुत्र इब्राहिम यास पाठविलें होतें हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. इंग्लंड आदिकरून युरोपियन राष्ट्रांच्या ढगलबाजीपुढें इब्राहिमाचा पराक्रम निष्फळ ठरला. या कारणानें महंमदअलीच्या सिरीया, दमास्कस व क्रीट यांच्या पाशाती मिळविण्याच्या शर्ती पुऱ्या करण्याची सुलतानास जरुरी राहिली नाहीं. तथापि महमदअली त्या संबंधाचा आपला हट्ट सोडीना. शेवटीं सुलतानानें मोठ्या मिनतवारीनें क्रीट बेटाची पाशात त्यास देऊं केली. या पाशाती मिळवून, सुलतानाच्या दुबळेपणाचा फायदा घेऊन व त्याचेच प्रांत गिळंकृत करून स्वतंत्र राज्य स्थापण्याचा महंमदअलीचा हेतु स्पष्ट होता. तो हेतु सुलतान कसा सिद्धीस जाऊं देणार? पण महंमद अलीस आपल्या कवाइती कंपूची घमेंड होती. त्यानें बुडालेल्या आरमाराचे जागीं नवें आरमार उभारलें आणि सीरीयावर स्वारी करून गाझा, येरूसलेम, आलेपो व दमास्कस हीं शहरें घेतलीं. तेथून तो आशियामायनरांत (रूम) ब्रुसावर आला. आणि पुढची वाट-

तशीच मोकळी सांपडती तर तो इस्तंबुलहि काबीज करण्यास चुकताना सुलतानास हा पेंच पडला. कोणा मुसलमानी सत्तेची मदत तर नाहींच; पण आपल्याच एका मुसलमान सरदारापासून बचावण्याची सुलतानावर पाळी आली. तो नुकतांच दगा दिलेल्या इंग्लंडास शरण निघाला पण ब्रिटिश महामंत्री लॉर्ड पामरस्टन यांनीं त्यास झिडकारलें. मग तुर्की सत्तेवर तिलांजलि घेऊन बसलेला आपला हाडवैरी जो रशिया त्याजकडे नाक मुठींत धरून सुलतान गेला आणि त्यानें त्यास मदत देण्याचें हंसत कबूल केलें. इस्तंबूलवर पांढऱ्या रशियन आस्वलाची घनदाट काळी छाया पडली आणि चमत्कार असा कीं, रशियन अधिकारी तुर्की सैन्यास कवाईत शिकविण्यास आले. तुर्कस्थान पूर्णपणें रशियाच्या कह्यांत जात आहे, असें पाहतांच इंग्लंड व फ्रान्स यांस धडकी बसली. सुलतान रशियन सैन्यास कॉन्स्टांटिनोपलमधून घालवून देईल तर ईजिप्तपासून आम्ही सुलतानाचें रक्षण करूं असें इंग्लंड व फ्रान्स या दुकलीनें सुलतानास आश्वासन दिलें. रशियास घरांत घेऊन इंग्लंडास सुलतानानें एक प्रकारें पेंचच घातला आणि तो अखेर साधला. इंग्लंड व फ्रान्स सुलतानास मिळाल्यास आपला निभाव लागणार नाहीं या समजुतीनें महमदअली १८७३ त सुलतानाशीं तह करण्यास कबूल झाला. या तहानें ईजिप्त, सीरिया, दमास्कस, एडन, त्रिपोली, क्रीट यांची पाशात महमदअलीस तहाहयात मिळावी, सुलतान फक्त नांवाचा प्रभु रहावा, रशियानें इस्तंबूलमधून आपलें सैन्य काढून न्यावें, त्यास तुर्कस्थानच्या परवानगीवांचून बॉस्फरस व दार्दानेलीस सामुद्रधुन्यांतून आरमार नेण्याचा अधिकार असावा आणि हा अधिकार इतर राष्ट्रांस रशियाची आगाऊ परवानगी घेऊनच तुर्कस्थानानें द्यावा असें ठरलें.

सदरील तहानें तिघांचे तीन हेतु साधले. महमद अलीनें मागितलें त्याहून अधिक हक्क त्यास तुर्कस्थानापासून मिळाले. रशियास सामुद्रधुन्या मिळाल्या, पण त्याचें दोस्तांस नको असलेलें इस्तंबूलवरील वर्चस्व मात्र कमी झालें. अशा रीतीनें तिघां धूर्तांनीं आपला कावा साधला, पण दोस्तांनीं मध्यस्ती करून सुलतानाचें कोणतें हित पाहिलें हा प्रश्न शिल्लक

रहातो. सुलतान परभारें महमद अलीच्या मूळ मागण्या कबूल करता, तर त्यांत सुलतानाचा अधिक फायदा होऊन महमदअली खुष रहाता. सुलतान महमदास हा तह मुळींच पसंत पडला नाहीं व ते उभयता फिरून युद्धाच्या तयारीस लागले. महमदानें विख्यात जर्मन सेनापति व्हॉन मोल्टके याच्या नजरेखालीं आपल्या सैन्याची तयारी चालविली; तर महंमदअलीनें फ्रेंच अधिकारी पदरीं बाळगले. दोन्ही सैन्यांची गांठ सीरियांत नझीब येथें पडून तुर्कांचें फार नुकसान झालें, व तुर्की आरमार आयत्या वेळीं दगा देऊन महमदअलीस मिळालें.

याच सुमारास सुलतान महमद एकाएकी पराजयाच्या वार्तेनें मृत्यु पावला. तेव्हां ईजिप्त, सीरिया, त्रिपोली आणि एडन येथील पाशात आपणास दिल्यास लढाई बंद करूं असें नवा सुलतान अबदुल मजीद याजपाशीं महमद अलीनें बोलणें लावलें. सुलतान या अटीस कबूल होता. तथापि इंग्लंड, फ्रान्स, रशिया, ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्या इस्तंबूलमधील वकिलातींनीं त्यास मोडता घातला. लंडनमध्यें वरील राष्ट्रपंचकाची परिषद भरून त्यांनीं बहुमतानें महमदअलीस सीरिया सोडण्यास व तुर्की आरमार तुर्कस्थानास परत देण्यास फर्माविलें. ईजिप्तची वंशपरंपरा पाशात व सीरियाची तहहयात पाशात देण्यास ते तयार होते; तरी महमदअली ऐकेना, तेव्हां ब्रिटिश ॲडमिरल सर चार्लस नेपियर व स्टॅफोर्ड यांनीं बिरूटवर हल्ला केला व ईजिप्शिअन सैन्याचा पराभव केला. अखेरीस महमदअलीनें सीरिया सोडावा, ईजिप्तची पाशात तहाहयात पत्करावी, सुलतानास सालिना ४ लक्ष पौंड खंडणी द्यावी आणि १८ हजारांपेक्षां अधिक सैन्य बाळगूं नये असें ठरलें व त्यास सुलतानाची संमति मिळाली. या नामुष्कीच्या अटींनीं धीर खचून महमदअली १८४१ त मरण पावला. यापुढें ईजिप्तवरील सुलतानाचें खंडणीपुरतें स्वामित्व राहिलें आणि पुढें इंग्लंडनें ईजिप्त व्यापल्यामुळें महायुद्धानंतर तेंहि स्वामित्व संपलें.

रुमानिया

सतराव्या शतकाच्या प्रारंभीं मोल्डाव्हिया व वालाशिया हे दोन

प्रांत तुर्कांनीं जिंकले. हे दोन प्रांत मिळूनच सध्याचा रुमानिया होतो. त्याची सांप्रतची राजधानी बुखारेस्ट आहे. पहिलीं शंभर वर्षें तेथील मूळचे राजेच सुलतानाच्या हुकुमानें कारभार पहात असत. रशिया व रुमानिया यांजमधील प्रूथ नदी हीच काय ती सरहद्द, यामुळें सर्वांच्या आधीं रुमानिया आपणास मिळावा अशी रशियास सहाजिकच इच्छा झाली. तुर्की अमलाखालीं रुमानियांतील रयत सुखी होती. परंतु रुमानियांत बोट शिरकविण्यास कांहीं निमित्त सांपडावें यासाठीं तुर्की जुलुमापासून आपलें रक्षण करा अशा आशयाचे अर्ज तेथील राजांकडून रशियानें मिळविले. पहिला अर्ज १६७४ त झाला आणि त्यानंतरचा दुसरा अर्ज पीटर दि ग्रेटनें त्यांजपासून १६८८ मध्यें घेतला. त्या अर्जास धरून १७११ सालीं रशिया व रुमानिया यांचे दरम्यान करारमदारहि झाले. कॉन्स्टांटिनोपल जिंकून घेण्यास रुमानियानें तीस हजार सैन्याची रशियास मदत करावी आणि रशियानें रुमानियास तुर्कांच्या कबजांतून सोडवावें असें ठरलें. रुमानियाच्या मदतीनें रशियानें १७२१ मध्यें तुर्कांबरोबर लढाई केली खरी; पण त्या लढाईंत तुर्क पराभव पावण्याऐवजीं रशियाचा झार पीटर दि ग्रेट कसाबसा जिवानिशीं सुटला.

रुमानियानें असा दगा दिल्यावर मोल्डाव्हिया व वालाशिया यांजवरील मूळचे मांडलिक राजे काढून त्यांच्या जागीं तोंडपुजे ग्रीक अधिकारी नेमण्यांत आले. ते प्रजेशीं दंडेलीनें वागत व तुर्कांचीं आर्जवें करीत. त्यानंतर पीटरमागून रशियाची राणी ऍन हिनें रुमानियास स्वतंत्र गणण्यांत यावें व त्यांचें स्वातंत्र्यरक्षण रशियानें करावें असा तुर्की सुलतानास सल्ला दिला, पण तो सुलतानानें अर्थातच मानला नाहीं. ऍननंतर दुसरी कॅथेराईन हिच्या कारकीर्दींत तेंच धोरण पुढें चालत राहिलें. तिनें रुमानियन लोकांचीं मनें भारण्याकरितां रशियन प्रचारक रुमानियांत पाठविले. १७३८ त रुमानिया सर करण्यास रशियन सैन्यहि आलें व ठरल्याप्रमाणें रुमानिया स्वाधीन झाला. ऑस्ट्रियाच्या हद्दीवरचा रुमानिया रशिया घेतो असें दिसतांच ऑस्ट्रियाची घाबरगुंडी उडाली व त्यानें या गोष्टीस हरकत घेतली. १७७४ त केनार्डजीचा तह होऊन रुमानिया

व तुर्की सुलतान यांचे दरम्यान तंटा उपस्थित झाल्यास रुमानियाची बाजू राशियन वकिलानें मांडावी एवढ्यापुरतें तुर्की राजकारणांत रशियाचें बोट शिरकलें.

सन १८७२ मध्यें रशिया व तुर्कस्थान यांजमध्यें घडलेल्या तहांत रुमानियावर सात वर्षांच्या मुदतीनें सुभेदार नेमण्यांत यावेत, ते इस्तंबूल दरबारांतील रशियन वकिलाच्या सल्लयावांचून सुलतानानें काढूं नयेत व सदर प्रांतानें सुलतानास खंडणी द्यावी पण त्याचें संरक्षण रशियानें करावें असें ठरलें. १८२९ मध्यें रशियानें याहिपुढें मजल मारली. (१) रुमानियावरील सुभेदारांची नेमणूक सात वर्षांपुरती न करतां तहाहयात करावी,(२) त्याची प्रूथ नदी ही रशियाच्या बाजूची सरहद्द असावी, (३) रुमानियांत जे मुसलमान राहात असतील त्यांनीं १८ महिन्यांत आपला जमनिजुमला विकून ती हद्द सोडावी, (४) सुभेदारांवर तुर्कांचा अंमल चालू नये,(५) रुमानियानें येथून पुढें दहा वर्षें राशियास खंडणी द्यावी व ती खंडणी वसूल होईपर्यंत रुमानियाच्या बंदोबस्तासाठीं रशियन फौजेनें रुमानियांत तळ द्यावा, (६) व दहा वर्षांपुढें सुलतानास रुमानियानें खंडणी द्यावी अशा अटी होत्या. या तहास आद्रियानोपलच्या तह म्हणतात.

आद्रियानोपलच्या तहानें फरक एवढाच झाला कीं, रुमानिया याचे तुर्क जाऊन रशियन धनी ठरले. त्यामुळें रुमानियांत सुभेदारीच्या हुद्यावर येणारे राजे तुर्कांऐवजीं रशियाचें हित पाहूं लागले. या वेळीं रुमानियांत पुष्कळच फेरबदल झाला होता. रुमानियन तरुणांनीं फ्रान्स व इतर युरोपियन राष्ट्रांतून शिकून येऊन आपल्या देशांत शाळा स्थापल्या व शिक्षण स्वभाषेंतून सुरू केलें. रशियास या शाळांची भीति पडून त्यानें त्या बंद ठेवविण्याचा प्रयत्न केला. तरी १८४८ पर्यंत राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ चालूच होती. त्या वर्षीं फ्रान्समध्यें फिरून राज्यक्रांति घडून सर्व युरोपभर स्वतंत्रता व राष्ट्रीयत्व या कल्पना खेळूं लागल्या व त्यांनीं तरुण रुमानियाचीं मनें भारून टाकलीं. यापुढें लवकरच पॅरिसचा तह होऊन रुमानियावरील रशियाचें छत्र निघून तुर्कांचें वर्चस्व कायम झालें. रुमा-

नियास या तहांत अन्तर्गत स्वातंत्र्य मिळालें व त्यावरील कायद्याची सुधारणा करण्याकरितां एक युरोपियन राष्ट्रांचें कमिशन नेमण्याचें ठरलें. तरुण रुमानियास हाहि युरोपियन राष्ट्रांचा सासुरवास नकोसा झाला. त्यानें १८७७ त रशियाशीं गुप्त तह करून त्याच्या मदतीनें स्वतंत्र होण्याचें ठरविलें. पॅरिसच्या तहाच्या अटी या गुप्त तहानें धडधडीत पायाखालीं तुडविल्या जात होत्या. व तशी तुर्कस्थानानें इंग्लंड आदिकरून युरोपियन राष्ट्रांकडे तक्रारहि केली. परंतु त्याचें ऐकतो कोण ? आम्ही काय तुर्कांचे पगारी रखवालदार आहोंत म्हणून उठल्यासुठल्या मदतीस यावें ? असा त्यांनीं सुलतानास रोकडा जबाब दिला. सुलतानाची ही धडपड निरुपयोगी ठरून १८८१ त रुमानियाचें स्वातंत्र्यहि यूरोपनें कबूल केलें. व प्रिन्स चार्लस यास बेलग्रेड येथें राज्याभिषेक झाला.

बल्गेरिया

रुमानिया, सर्व्हिया, आल्बानिया, ग्रीस, बल्गेरिया या सर्वांस मिळून बाल्कन संस्थानें अशी संज्ञा अलीकडे देण्यांत आली आहे. बाल्कन पर्वत या संस्थानांत प्रमुख असल्यामुळें त्यांस हें नांव मिळाल्याचें उघड दिसतें. परंतु बाल्कन पर्वतावर बाल्कन संस्थानांचें महत्त्व अवलंबून असल्यास तो पर्वत ज्या देशांत उभा आहे त्या बल्गेरियाचें महत्त्व सर्वांत अधिक मानलें पाहिजे. तुर्कांनीं १३७१ सालीं बल्गेरिया हस्तगत केला. त्या प्रांतास रुमेली असें नांव देऊन सुलतानांनीं त्यावर एका तुर्की सुभेदाराची नेमणूक केली. परंतु बल्गेरियावरील सर्व अधिकारी नेहमी तुर्कच असत असें नाहीं. थोर घराण्यांतील बल्गरासहि हा अधिकार मिळत असे व एक बल्गर तर सोळाव्या शतकांत सुलतानाच्या मुख्य वजिरातीसारख्या हुद्यावरहि चढला होता.

तुर्कांनीं आपल्या भरभराटीच्या काळीं बल्गेरियांत सडका बांधल्या, व्यापार वाढविला, प्रजेच्या हक्कांचें रक्षण केलें व ख्रिस्ती देवळांस धक्का लावला नाहीं. परंतु पडत्या काळांत ही स्थिति फारशी न टिकून बल्गरांस जुलूम सोसावा लागला. ख्रिस्ती देवळें बांधण्यास त्यांस परवानगी मिळेना. बल्गरांनीं अमूकच प्रकारचा पोषाख केला पाहिजे असे नियम

झाले, त्यांच्या मुलींस सुलतानांचा जनानखाना सक्तीनें दाखविण्यात आला व चौदा वर्षांवरील ख्रिस्ती इसमांवर डोईपट्टी बसली. या सुमारास व प्रारंभींहि बरेच ख्रिस्ती बाटून मुसलमान झाले. अशा मुसलमानांस मोठाल्या जमीनदाऱ्या मिळत व त्यांच्या शेतांत मजूर होऊन राबण्याचा ख्रिस्ती प्रजेवर प्रसंग येई.

तुर्की साम्राज्यांत तुर्कांच्या खालोखाल वरचष्मा ग्रीकांचा. बल्गेरिया खालसा झाल्यावर तेथील चर्च कॉन्स्टांटिनोपलाच्या पॅट्रिआर्कांच्या ताब्यांत आलें; व धर्माधिकारी ग्रीक आणि राज्याधिकारी तुर्क यांच्या चिमट्यांत बल्गेरिया सांपडला. बल्गेरियन भाषेस अंधारांत बसावें लागून ग्रीक शाळा, ग्रीक भाषा, ग्रीक पुस्तकें व ग्रीक धुळाक्षरें यांनीं बल्गेरियावर आपला जुलूम चालविला. आणि तो बल्गेरियनांच्या अंगवळणीं पडून त्यांस ग्रीक म्हणवून घेण्यांतहि भूषण वाटूं लागलें. यापेक्षां अधिक राष्ट्रीय तेजोवध तो कोणता? या कुचंबणेंतून प्रथम ऑस्ट्रियन व मागाहून रशियन सोडवितील अशी बल्गेरियास आशा होती. पण ऑस्ट्रियाचें तुर्कांच्या पराक्रमापुढें कांहीं चाललें नाहीं.

इ. स १७६२ त पेरीज नामक इतिहासकारानें बल्गेरियाचा स्फूर्तिदायक इतिहास लिहिला. रुमानियांत बुखारेस्ट येथें बल्गेरियनानें आपली एक वसाहत केली व तेथून रुमानियाच्या सहानुभूतीनें राष्ट्रीय वाङ्मय व राष्ट्रीय शिक्षण यांची अभिवृद्धि त्यांनीं जोरानें चालविली. १८३५ त गाब्रोहो येथें राष्ट्रीय शाळा निघाली व तिच्यांत स्वभाषेंतून शिक्षण मिळूं लागलें. पुढील दहा वर्षांत या धर्तीच्या ५३ शाळा निघाल्या. तुर्कांनीं या चळवळीस अटकाव केला नाहीं ही ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट होय. ग्रीकांस त्यांच्या वर्चस्वाच्या आड येणारा हा उपक्रम पसंत नव्हता; परंतु त्यांना त्यास उघडपणें विरोध करतां आला नाहीं. याच संस्थांतून राजकीय व धार्मिक आकांक्षांचा प्रादुर्भाव सर्व बल्गेरियाभर करण्यांत आला. बल्गेरियांतील राष्ट्रीय शाळा आणि कॉन्स्टांटिनोपलमधील अमेरिकन संस्थेनें चालविलेलें रॉबर्ट कॉलेज यांतून बल्गेरियन मुत्सद्दी व देशभक्त पैदा झाले. ग्रीक बिशपांच्या ताब्यांतून आपलें चर्च सोडविणें व तें राष्ट्रीय बनविणें हाहि बल्गेरियन देशभक्तांचा उद्देश होता.

सर्व स्लाव्ह राष्ट्रें एक करण्याची कल्पना सेंट पीटर्सबर्ग येथून निघाली व तिनें भारलेल्या शाळामास्तरांच्या आणि धर्माधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं बल्गेरियनांनीं एक लहानसें बंड केलें, पण तें तुर्कांनीं मोठ्या निष्ठुरपणानें मोडलें. ख्रिस्ती युरोपियन राष्ट्रें यामुळें तुर्कांवर खवळलीं. बाल्कन पर्वतांतील बटक नामक गांवचे रहिवाशी तुर्की अधिकाऱ्यांनीं कापून काढले. १८७८ च्या मे महिन्यांत १२ हजार बल्गरांची कत्तल झाली असावी असा बेअरिंग या इंग्रज बातमीदाराचा तर्क आहे. ही हकीकत बेअरिंगनें इंग्लडांत कळवितांच प्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी मि. ग्लॅडस्टन साहेब चवताळून त्यांनीं 'बल्गेरियांतील अत्याचार' पुस्तक प्रसिद्ध केलें व त्याच्या आवृत्त्यावर आवृत्त्या निघाल्या. रशियास कांहीं सबब हवीच होती. ती अशा रीतीनें मिळतांच त्याचें सैन्य तुर्कस्थानावर चालून जाण्याकरितां बल्गेरियांत उतरलें. व १८७८ त स्टॅनहोप येथें तह होऊन डान्यूब नदीपासून एजियन समुद्रापर्यंत बल्गेरियन भाषा बोलणाऱ्या मुलखास आंतरस्वातंत्र्य मिळालें. तुर्कांचें अधिराज्य नांवाचें राहिलें आणि त्याची वेसण मात्र रशियाच्या हातांत गेली. परंतु एवढा मुलुख रशियास उपभोगण्यास मिळणें इंग्लंड व ऑस्ट्रिया यांस सहाजिकच इष्ट नव्हतें. यामुळें त्याच वर्षीं १३ जुलईस तह झाला. त्या तहानें बल्गेरियाचे तीन तुकडे पडले. मॅसिडोनिया व आद्रियानोपल प्रांत तुर्कांकडे राहिला. पूर्व भाग रशियास मिळाला आणि खास बल्गेरिया स्वतंत्र झाला.

नवी व्यवस्था लागेपर्यंत बल्गेरिया व पूर्व रुमानिया रशियाच्या अमलाखालींच होता. १८७९ त रशियाच्या सूचनेवरून बटेनबर्गचा प्रिन्स अलेक्झांडर बल्गेरियाचा राजा निवडून गेला. तथापि रशियन अधिकारी त्याचें कांहीं चालू देईनात. शेवटीं रशियाशीं निकरावर येऊन राजानें रशियाचे दोन सेनापति बल्गेरियांतून हाकून लावले. यानंतर बल्गेरिया व रशियाच्या छत्राखालील रुमानिया एक होऊन बृहन्बल्गेरिया निर्माण झाला.

सर्व्हिया

पंधराव्या शतकांत तुर्कांच्या स्वाऱ्या हंगेरीवर वारंवार होत असत.

त्यामुळें हंगेरीच्या वाटेवरील सर्व्हिया लवकरच तुर्कांच्या ताब्यांत गेला. सर्व्हियांतील जुन्या जहागीरदारांच्या जमिनी खालसा करून तुर्क स्पाही म्हणजे घोडेस्वार यांस देण्यांत आल्या. सर्व्हिया निःशस्त्र झाला व सर्व्हियनांनीं तुर्कांविरूद्ध जेव्हां जेव्हां बंडें केलीं, तेव्हां तेव्हां तीं काठ्या घेऊनच केलीं. सर्व्हियाची राजधानी बेलग्रेड येथें तुर्कांनीं नेमलेला पाशा राहात असे. तुर्की स्पाही आपल्या कुळापासून जमिनीच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा घेत असत. रयतेपासून वेठीनें काम करून घेण्याचीहि पाशाची पद्धत होती. ख्रिस्ती व मुसलमान यांस न्याय देण्याचें काम काजी करीत. सर्व्हियन शेतकरी जमिनीचा मालक असून त्यास आपल्या गांवचा मॅजिस्ट्रेट नेमण्याचा अधिकार होता. सर्व्हियाचा धर्म बुडविण्याचा तुर्कांनीं कधींहि प्रयत्न केला नाहीं. त्यास आपला पॅट्रिआर्क निवडण्याचा हक्क होता. वेठीप्रमाणेंच पारतंत्र्य जाणविणारे जुलुम मुसलमानी अमलास शोभतील असे सर्व्हियांत चालू होते. सर्व्हियनांस घोड्यावर बसून शहरांत जाण्यास परवानगी नव्हती. वाटेंत मुसलमान अधिकारी भेटल्यास त्यानें घोड्यावरून उतरून त्याला सलाम केला पाहिजे असा नियम होता.

सर्व्हिया निःशस्त्र व पंगू झाला होता, तरी त्याला शेजारच्या हंगेरीचा व ऑस्ट्रियाचा मोठा आधार होता. १७८३ त पुष्कळ सर्व्हियनांस ऑस्ट्रियन सैन्यांत लढण्याची संधि मिळाल्यामुळें युद्धकर्मांत ते लवकरच प्रवीण झाले आणि हें प्रावीण्य पुढील स्वातंत्र्याच्या झगड्यांत त्यांस उपयोगी पडलें. सन १८०४ मध्यें हाजी मुस्तफा नामक पाशा सर्व्हियावर अंमल करीत होता. त्याच्या दयाळू कारकिर्दींत सर्व्हिया सुस्थितींत होता. जेनिसरीज लोकांपासून उकळपट्टी करूं लागले व ते हाजी मुस्तफास जुमानीनात. शेवटीं सर्व्हियनांच्या मदतीनें तो जेनिसरीजचा बंदोबस्त करूं लागला असतां, सर्व्हियनांची त्यांनीं गांवोगांवीं कत्तल केली. अशा आणीबाणीच्या वेळीं सर्व्हियनांस काळा जॉर्ज नामक पुढारी भेटला. काळ्या कुळकुळीत केसावरून त्याचें काळा हें नांव पडलें होतें. त्याची शिस्त मोठी कडक होती. पुढारी बनल्यावरहि तो अंगावर घोंगडी घेऊन फावल्या वेळीं शेतभात करी व डुकरें बाळगी. त्यानें आपल्यापाशीं बरीच फौज जमवून

बोस्नियाच्या पाशाच्या मदतीनें बेलग्रेड घेतलें व जेनिसरीजांची खोड मोडली.

जेनिसरीजच्या जुलुमांतून सुटल्यावर सुलतानाच्या अमलाखालूनहि सुटण्याची काळा जॉर्ज यास इच्छा झाली. त्यानें प्रथम साम्राज्यान्तर्गत स्वराज्याची सुलतानापाशीं मागणी केली व त्या मागणीचा पुरस्कार करण्याचें रशियानें कबूल केलें. सर्व्हियांतील किल्ल्यांतून तुर्की सैन्य न ठेवतां त्याची व्यवस्था आपल्याकडे यावी असेंहि सुलतानास ते म्हणूं लागले. सर्व्हियनांचा स्वतंत्र होण्याचा रोख ओळखून निश येथील पाशास त्यांजपासून हत्यारें काढून घेण्यास सुलतानानें फर्माविलें. सर्व्हियनहि हत्यारें खालीं न ठेवतां तुर्की सैन्याशीं गनिमी काव्यानें त्या डोंगराळ मुलखांत लढले. ता. ४ ऑगष्ट १८०६ च्या लढाईत त्यांनीं तुर्कांवर विजय मिळविला. विजयानंतर तहाचें बोलणें करण्यास सर्व्हियनांनीं आपला वकील इस्तंबुलास पाठविला व सर्व्हियास रशियाची मदत मिळेल या भीतीनें बेलग्रेड येथें तुर्कांचें १॥ लाख सैन्य रहावें व सर्व्हियनांनीं स्वराज्य भोगावें असें सुलतानानें कबूल केलें; तोंच नेपोलियनाशीं लढण्यांत झार गुंतेल या आशेनें सुलतानानें तहाचें बोलणें रहित केलें. तेव्हां काळा जॉर्ज यानें युद्ध पुकारून बेलग्रेड घेतलें व त्याच्या अनुयायांनीं तुर्कांची कत्तल केली. इतकेंच नव्हे तर स्वतंत्र राज्याची उभारणी करून सेनेट व न्यायकोर्टें स्थापणें, शिक्षण देणें, कायम सैन्य ठेवणें हीं कामें त्यानें शेवटास नेलीं. सर्व्हियनांची ही चळवळ चिरडून टाकण्यास तुर्कस्थानानें सार्व्हियांत सैन्य पाठविलें. पण त्याचा काळा जार्ज यानें रशियाच्या मदतीनें सन १८०९ त मोड केला.

सन १८१२ त बुखारेस्टच्या तहानें नेपोलियनाची भीति पडून रशिया सर्व्हियास हातीं धरीना. ती संधि साधून तुर्क पुन्हा सर्व्हियावर आले आणि आतां त्यांजपुढें आपला निभाव लागणार नाहीं हें जाणून काळा जॉर्ज ऑस्ट्रियांत जाऊन राहिला. त्याच्या पश्चात् मिलोश ऑबर नाव्हिक नांवाचा एक शेतकरी सर्व्हियाचा पुढारी झाला. सध्याचें राजघराणें यांचेंच आहे. काळ्या जॉर्जप्रमाणें तुर्कांशीं फाटून न वागतां

मिळतें धोरण त्यानें स्वीकारलें. तें इतकें कीं, त्याच्या स्वदेशभक्तीविषयींहि लोक संशय प्रकट करूं लागले. कारण कांहीं सर्व्हियनांनीं तुर्कांविरुद्ध केलेलें बंड यानेंच मोडलें. पुढें याहि धोरणानें तुर्क प्रसन्न होत नाहींत असें दिसून आल्यावरून मिलोश यानें डोंगरांचा आश्रय धरून तुर्कांविरुद्ध गनिमी काव्याची लढाई सुरू केली. आणि सन १८१५ त सर्व्हियन देशभक्तांनीं व्हीएन्नाच्या कांग्रेसपाशीं मदत मागण्यास शिष्टमंडळ पाठविलें. त्याच सुमारास रशिया नेपोलियनाच्या काचांतून मोकळा झाला. त्याच वर्षीं मिलोश यास सर्व्हियांतील देशमुखांनीं राजा (प्रिन्स) ही पदवी दिली. ती रशियानें कबूल केली. पण तुर्की सुलतान कबूल करीना. सदर पदवीस तुर्कांनीं मान्यता द्यावी व सर्व्हिया सोडावा असा रशियानें तुर्कांचा पिच्छा पुरविला व अखेर १८३० त सुलतानानें मिलोश याची ही पदवी वंशपरंपरेनें कबूल केली.

मिलोश प्रजेस फसविण्यांत मोठा पटाईत होता. त्यानें औदार्याचा मोठा आव आणून १८३५ मध्यें सर्व्हियास पार्लमेंट दिलें, पण सर्व्हिया अद्यापि मागासलेला असल्यामुळें ही योजना कागदोपत्रींच राहिली व मिलोश एकतंत्री बनला. मिलोशची सत्ता वाढूं लागलेली पाहून सर्व्हिया पूर्ण स्वतंत्र होईल अशी सुलतानांस भीति पडली. उलट पक्षीं सर्व्हियासारख्या ख्रिस्ती राष्ट्रांनीं तुर्कांपासून सुटावें, परंतु आपल्या मदतीनें चालावें असें इच्छिणाऱ्या रशियासहि मिलोश आपणास जुमानणार नाहीं ही धास्ती वाटली. यासाठीं मिलोश याची सत्ता मिलोश व प्रजाजन यांत वाटून मिलोश यास निर्बल बनवावा या उद्योगास रशिया लागला. रशियाच्या या पेचास मिलोशनें नवीच तोड काढली. सर्व्हियाची पेठ बकिंगहॅम व मँचेस्टर येथील मालास मिळावी व ती मिलोश याची सत्ता अनियंत्रित राहिल्यानेंच मिळेल अशी इंग्लंडची अपेक्षा असल्यामुळें इंग्लंडनें सर्व्हियास मदत पोंचाविण्याचें कबुल केलें. परंतु दूरच्या इंग्लंडच्या नादीं लागण्यापेक्षां रशिया सांगतो तेंच ऐकावें असें ठरवून मिलोशयानें १८३८ सालीं सर्व्हियास सीनेट व कौंसिल दिलें. १८६७ त युरोपियन राष्ट्रांनीं तुर्कांस सर्व्हियांतून सैन्य काढून नेण्यास भाग पाडलें व १८८२ सालीं सर्व्हिया तुर्कांपासून पूर्ण स्वतंत्र झाला.

प्रकरण तिसरें

तरुण तुर्क व राजक्रांति

उपोद्घात

बाल्कन राष्ट्रें व ईजिप्त तुर्की साम्राज्यांतून फुटून जाण्याचें कार्य पाऊण शतक चालूं होतें. तेवढ्या कालावधींत दुसरा महमद (१८०८–१८३९) अबदुल मझीद, (१८३९–१८७०), अबदुल अझीझ (१८७०–७६) अबदुल हमीद (१८७६–१९०९) इतके सुलतान तुर्कस्थानच्या गादीवर होऊन गेले. यांपैकीं बहुतेक सुलतान शहाणे होते. परंतु त्यांची अन्तर्बाह्य स्थिति इतकी प्रतिकूल होती कीं, त्यांनीं साम्राज्यसंरक्षणार्थ केलेला उद्योग शेवटास जाणें शक्य नव्हतें. बाहेरून युरोपियन राष्ट्रें आपल्या कुटिल कारस्थानांनीं सुलतानाच्या युरोपांतील साम्राज्याचे लचके तोडण्यास टपलीं होतीं, तर आंतून सुलतानांस त्यांच्या एकतंत्री अमलामुळें योग्य सल्ला मिळून राज्याची घडी बसणें असंभवनीय होतें. तशांतूनहि सुलतानांस शहाणे व निस्पृह मंत्री भेटून त्यांचा जम नीट बसतो असें दिसतांच तो विस्कटून टाकण्याच्या युरोपियन राष्ट्रांच्या कृत्या कमी नसत. बाहेरच्या चिथावणीनें बाल्कनांतील एखाद्या देशानें बंड करून तुर्की प्रजेची कत्तल उडविली कीं, त्यांची तुर्कांकडून उलट कत्तल अत्यंत घोरपणें व्हावयाची हें ठरलेलेंच; आणि तुर्कांनीं असा सूड घेतला कीं, ख्रिस्ती प्रजा संभाळण्याची लायखी तुर्कांत नाहीं असें कुभांड घेऊन सदर प्रजेस आमच्या ताब्यांत द्या किंवा स्वतंत्र तरी करा असें टुमणें राशिया आदि. करून युरोपियन राष्ट्रांकडून लागावयाचें होंहि ठरलेलेंच. दोन धर्मांची प्रजा एकत्र नांदविणें निष्पक्षपाती पण प्रबल राजास अवघड नाहीं; परंतु असा राजा दुबळा असला, आणि त्याच्या भोंवतालची परधर्मीय राज्यें बलवान असलीं म्हणजे त्याच्या विटंबनेस पारावारच नसतो. या कुटिल कारस्थानांपुढें युरोपांतील तुर्कांचें साम्राज्य लयास जाणार हें सांगावयास ज्योतिष्याची गरजच नव्हती. अशा रीतीनें युरोपांतील साम्राज्य बुडालें तरी आशिया खंडांतील साम्राज्य टिकेल हाहि भरंवसा

नव्हता. युरोपाइतकी आशियाखंडांत ख्रिस्त्यांची वस्ती नव्हती हें खरें, तरी पण कलागत लावण्यापुरते ख्रिस्ती लोक आशियाखंडांतील तुर्की साम्राज्यांत होते यांत शंका नाहीं.

तुर्कांनीं आपल्या राज्याचा पाया प्रथम ज्या देशांत घातला व ज्यांत त्यांची व त्यांच्या जातभाईंची वस्ती मोठी झाली, त्या अनातोलियांत (रूम) हि ग्रीकांचें घर तुर्कांपूर्वींपासून आहे. आणि सीरियांत, प्रत्यक्ष येशु ख्रिस्ताच्या जन्मभूमींत जुने पुराणे अस्सल ख्रिस्ती असतील हें काय सांगावयास पाहिजे ? सीरियाप्रमाणें आर्मीनियांतहि किरिस्ताव आहेतच, या योगानें कलागतीची कोलीत याहि गंजीवर फेकण्यास रशियानें कमी केलें नाहीं. रशियासारख्या ख्रिस्ती राष्ट्रानें तुर्कांच्या ख्रिस्ती प्रजेस तुर्कांविरुद्ध चेतविलें तर तें क्षणभर क्षम्य तरी मानावें लागेल. पण रशियानें एक वेगळीच पण अजब शक्कल काढली. त्यानें पदरचा पगार देऊन एक मुसलमान दरवेशी मुसलमानांस ख्रिस्त्याविरुद्ध चिडविण्यास अनातोलियांत मुद्दाम ठेवला होता. आर्मीनियनांची कत्तल होण्याचा प्रसंग अशाच कारस्थानानें आला.

दुसरा महंमद व अबदुल मजीद हे शहाणे व सुधारणाप्रिय सुलतान होते व त्यांस रशीद पाशासारखा विद्वान् मंत्रीहि लाभला होता. त्याच्या सल्ल्यावरून १८३९ मध्यें नव्या मनूस अनुसरून एक फर्मान निघून सदनशीर राज्यपद्धति स्थापन करण्याचें प्रजेस अभिवचन मिळालें. १८६१ त अबदुल मजीद मरून त्याच्या तक्तावर अबदुल अझीझ बसला. त्यास फऊद पाशा, रशीद पाशा, अल्लीपाशा व मिधातपाशा हे देशाभिमानी मंत्री भेटले. त्यानें त्यांच्या सल्ल्यावरून आपलें आरमार मजबूत केलें,सैन्याची रचना बदलली,न्यायपद्धति सुधारली व प्रजेस मुद्रण-स्वातंत्र्य दिलें. पण १८७२ त त्यास महंमद नेदीम हा अशिक्षित व युरोपियनद्वेष्टा बदसल्लागार मुख्य मंत्री व वजीर मिळाला. तेव्हांपासून अबदुल अझीझ बिघडत चालला. सुलतानास आळा घालण्यास आजवर अधिकारसंपन्न मंत्रिमंडळ होतें. त्यांच्या हातचा मुख्य कारभार काढून सुलतानानें आपणाकडे घेतला व खजिना ताब्यांत घेऊन त्यानें पैशाची

उधळपट्टी मांडली; आणि खजिना रिता पडल्यावर युरोपियन राष्ट्रांपाशीं त्यानें कर्जहि काढलें. मिधातपाशानें सुलतानाची गांठ घेऊन कर्जरूपानें युरोपियन राष्ट्रांचें उंटाचें पिल्लू एकदां तुर्की राज्यमंदिरांत शिरलें कीं तें सर्व मंदिर जमीनदोस्त केल्यावांचून थांबणार नाहीं असा त्यास खडखडीत इशारा दिला. या सल्लयाचा सुपरिणाम तात्पुरताच टिकला व सुलतानानें आपलें दिवाळें वाजविलें.

सुलताल अबदुल अझीझ

समोवतालच्या बाल्कन राष्ट्रांतील उलाढालींचा व एकंदर युरोपियन राजकारणाचा परिणाम तुर्कस्थानमधील प्रजेवर झाल्यावांचून राहिला नाहीं. तुर्कस्थानांत जुनी पुराणी शिक्षणपद्धति सुरू होतीच व त्याखेरीज अमेरिकन, व फ्रेंच मिशनऱ्यांनीं कॉन्स्टांटिनोपल, आद्रियानोपल, स्मरना व दमास्कस या प्रमुख शहरीं पाश्चात्य धर्तीवर शाळा व कॉलेजेंहि चालविलीं होतीं. या शिक्षणसंस्थांतून बरेच तरुण तुर्क विद्या संपादन करीत व पॅरिस आणि लंडन येथेंहि जाऊन कित्येक शिकून येत. यांची दृष्टि पुष्कळच फांकली असल्यामुळें साम्राज्यसंरक्षणाची तेहि आपल्या परीनें चिंता वहात होते. एकतंत्री राज्यकारभारानें नव्या मनूंत टिकाव लागणार नाहीं अशी त्यांची दृढ समजुत होती, आणि सुलतान अझीझ याच्या घातकी लीलांनीं तर या समजुतीस दुजोराच मिळाला. सुलतानाच्या दिवाळखोरीनें पाश्चात्य वळणावरील सुशिक्षित वर्गच चिडून गेला असें नव्हे, तर तुर्कस्थानांतील प्रत्येक समंजस माणसास संताप आला. ता. २२ मे १८७६ रोजीं मद्रेसांतील सहा हजार विद्यार्थ्यांचा घोळका मंत्रिमंडळावर चालून गेला व त्यांनीं मुख्य वजीर महंमद नेदीम याच्या वर्तनाविरुद्ध गिल्ला केला. सुलतानानें घाबरून नेदिमास वजिरातीवरून दूर केलें व रशिदपाशा व मिधातपाशा यांस परत बोलावून नवें मंत्रिमंडळ उभारलें. पण मंत्र्यांस सुलतानाचा विश्वास न येऊन त्यांनीं खुद्द त्यासच पदभ्रष्ट करण्याचें योजिलें. ता. ३० मे १८७६ रोजीं सैन्यानें राजवाड्यास वेढा दिला व धर्ममंत्री (शेख उल् इस्लाम) यानें मुख्य खोजामार्फत सुलतानाच्या हातीं आपला फतवा ठेवविला. त्यांत चक्क म्हटलें होतें कीं, ' सुल.

तानाची अक्कल गेली आहे, तो राज्याचा नाश करीत आहे, मूर्खपणानें पैसा उधळीत आहे व लहरीस येईल तसा वागत आहे,

सुलतान अबदुल हमीद

या फतव्यानें व सैन्याच्या कैचीनें सुलतान अबदूल अझीझ यास नेमका खव्यासारखा उडविला, व त्याच्या मागून बसलेला नादान सुलतान मुराद यानें राजिनामा दिल्यावर अबदुल हमीद १८७६ त राज्याचा सूत्रधार झाला. अबदुल हमीद यानें राष्ट्रास सनदशीर स्वातंत्र्य देण्याचें तक्तनशीन होतांना बाह्यात्कारी कबूल केलें. सुप्रसिद्ध उदारमतवादी मिधात पाशा यास वजिरात देण्यांत आली, त्यानें आपला मसुदा तयार करून सर्व जातींस व पंचास समानता देऊं केली. पण हा रंग पालटून वाजिरातीचीं वस्त्रें मिळून चार महिने झाले नाहींत, तोंच, मिधात हद्दपार झाला व अबदुल अझीझ यास काढून टाकण्यांत ज्यांचें अंग होतें त्या रशीदपाशास व शेखउल् इस्लमास साम्राज्याच्या दूरच्या भागांत सुलताना-च्या हुकुमानें नेऊन सोडलें.

मिधात पाशा युरोपांत सोडून देण्यांत आपण चूक केली असें हमीदच्या मागाहून लक्षांत आलें. मिधात युरोपांतील निरनिराळ्या देशां-तून हिंडून उत्तम राज्यकारभाराचीं आद्य तत्त्वें समजून घेत होता. असा मुत्सद्दी युरोपांत मोकळा राहणें सुलतानास धोक्याचें वाटून त्यानें कृतक-र्माबद्दल पश्चात्ताप दर्शवून त्यास परत बोलावलें व सीरियाच्या सुभेदारीवर त्याची रवानगी केली. यानंतर अबदुल अझीझच्या खुनाचा आरोप त्याज-वर ठेऊन व त्याच्या चौकशीचा फार्स करून त्यास अरबस्थानांतील एका किल्ल्यांत कोंडून ठेवण्यांत आलें. पुढें तीन वर्षांनीं त्याचा खून झाला आणि त्याचें मुंडकें सुलतानाच्या दर्शनास आलें! मिधात मारला गेल्या-वर त्याची सनदशीर योजना अंशतः अमलांत आणून जनतेची गेलेली सहानुभूति सुलतानानें परत मिळविली. मिधातच्या योजनेप्रमाणें त्यानें पार्लमेंट भरविलें, पण तें पार्लमेंट आपल्या मर्जीबाहेर वागूं नये असाहि बंदोबस्त करून ठेवला. तथापि पार्लमेंटांतील कित्येक सभासदांनीं आपला

स्वतंत्र बाणा सोडला नाहीं. पुढें १८७८ त कांहीं तरी ढोंग करून त्यानें हेंहि पार्लमेंट रद्द केलें व १९०८ पर्यंत एकट्यानेंच धिंगाणा घातला.

अबदुल हमीद गादीवर बसला, त्यावेळीं सर्व बाल्कन राष्ट्रें तुर्की सत्तेखालून निसटून गेलीं होतीं. १८२७ सालीं ग्रीक, १८६७ मध्यें रुमानिया, १८७० त बल्गेरिया स्वतंत्र्य झाला होता आणि सर्व्हिया स्वातंत्र होण्याच्या मार्गांत होता. युरोपांत मॅसिडोनिया व थ्रेस एवढ्याच प्रांतांवर सुलतानाचा अंमल अस्तित्वांत असून अशियाखंडांत मात्र ईजिप्तशिवाय करून अनातोलिया, आर्मिनिया, सीरिया, मेसापोटेमिया व अरबस्थान हे देश अद्यापि त्याच्या राज्यांतच मोडत होतें. एवढा प्रदेश तरी हातचा न गमावणें एवढेंच सुलतानाचें कर्तव्य होतें. सुलतान अब्दुल हमीद व सुशिक्षित तुर्क लोक यांची एवढ्या बाबतींत एकवाक्यता असली, तरी सदर प्रदेश राखण्याचे मार्ग मात्र उभयतांचे एक नव्हते. अबदुल हमीद याच्या अंगीं सुलतान व खलिफा या दोन्ही अधिकारांचा अहंकार पूर्णपणें बाणून राहिला होता, आपल्या सुलतानी सत्तेस अणुमात्रहि धक्का पोचूं देण्यास तो तयार नव्हता. सुलतानाची सत्ता आहे तशी अनियंत्रित राखण्यांतच प्रजाजनांचें हित आहे असें तो भासवीत असे. बाल्कन राष्ट्रें आपल्या ख्रिस्ती धर्माची ऐट मारून बड्या युरोपियन राष्ट्रांच्या मदतीनें स्वतंत्र झाल्याबद्दल ख्रिस्त्यांचा तो मनापासून द्वेष करीत होता, तर खिलाफतीचें स्तोम माजवून जगांतील सर्व मुसलमानी देशांनीं एक व्हावें व आपल्यास मानावें अशी त्याची इच्छा होती. धर्माच्या नांवाखालीं सर्व मुसलमानांचा संघ बनवावा व त्याचा राजकीय उपयोग करून सर्व मुसलमान देशांनीं आपलें कल्याण साधावें हें धोरण त्यानें आपल्या मनश्चक्षूसमोर धरलें होतें व हें साधण्याकरितां जुन्या सुलतानांनीं ख्रिस्ती प्रजेस दिलेले हक्क व परदेशीय युरोपियन व्यापाऱ्यांस मिळालेल्या सवलतीहि काढून घेण्यास त्यास हरकत वाटत नव्हती.

अबदुल हमीद यांचें हें धोरण सुशिक्षित तुर्कांसच काय पण कोणा समंजस तिऱ्हाइतासहि पसंत पडण्यासारखें नव्हतें. मुसलमानी, ख्रिस्ती व यहुदी या तिन्ही धर्मांच्या अनुयायांस जर एकाच साम्राज्यांत

नांदावयाचें तर त्यांत मुसलमानी धर्माचा वरचष्मा सर्वांवर लादूं पहाण्यांत शहाणपण तें कोणतें ? धार्मिक बाबतींत परमतासहिष्णुता व राजकारणांत समानता या दोन तत्त्वांचा अंगीकार करणें अपरिहार्य होतें. परधर्मीयांस वागविण्याची ही तऱ्हा ठरल्यानंतर सुलतानाकडे असलेली अनियंत्रिक सत्ता पूर्ववत् चालू ठेवावयाची कीं काय हा प्रश्न तुर्की मुसलमानांस महत्त्वाचा होता. राजनीति सुलतानाच्या लहरीवर राहूं देण्यांत मुसलमानांचाहि निभाव नव्हता. तुर्कस्थानची युरोपियन राष्ट्रांच्या भिंतीस भिंत लागून राहिली असतां, तुर्की साम्राज्य सुधारणेंत कोरडेंच्या कोरडें राहिलें याचें एक कारण म्हटलें म्हणजे सुलतानांचा एकतंत्री अंमल हें होय. सुलतान खलिफा होता हा आणखी एक अडथळा होय. शिक्षण हें मुसलमानांत पूर्वीपासून धर्माचें एक अंग समजलें जात असून त्यांत आधुनिक पद्धतीवर सुधारणा करणें उलेमा अधर्म मानीत व सुलतानासहि आपल्या खिलाफतीची इभ्रत व मान्यता बहुजनसमाजांत अबाधित राखण्याकरितां उलेमांच्या दुराग्रहापुढें मान तुकवावी लागत होती. सुशिक्षित तुर्क पॅरिस व लंडन येथील ज्ञानामृत प्राशन करून व युरोपची मोकळी हवा खाऊन आले असल्यामुळें सुलतानाच्या सत्तेस सनदशीर नियंत्रण घालून धर्मभेद विसरून सर्वांस सारखे राजकीय हक्क व धार्मिक स्वातंत्र्य दिल्यावाचून आपलें साम्राज्य जिवंत राहावयाचें नाहीं व त्याचा उद्धार व्हावयाचा नाहीं अशी त्यांची बालंबाल खात्री पटली होती. सर्व मुसलमानी देशांनीं एक होऊन ख्रिस्ती युरोपियन राष्ट्रांस टक्कर देण्याची अबदुल हमीद याची कल्पना होती. पण ती अमलांत आणण्याची वेळ केव्हांच निघून गेली होती. युरोपियन राष्ट्रें इतकीं दुर्बळ व मागासलेलीं असतां आपल्या राज्यांत कोट्यावधि ख्रिस्ती प्रजा आहे. इकडे दुर्लक्ष करून पॅन इस्लामिझमची तळी उचलणें म्हणजे साम्राज्याचें मरण ओढवणें होय, अशीच सर्व सुशिक्षित तुर्कांची ठाम समजूत होती. याच सुशिक्षित तुर्कांतून पुढें तरुण तुर्क हा पक्ष लवकरच निर्माण झाला. ते धर्मलंड नव्हते, पण धर्मवेडेहि नव्हते. सुलतानांची सत्ता कमी होऊन देशास सदनशीर राज्यपद्धति मिळणें यांत त्यांच्या मतें धर्मबाह्य कांहींच

नव्हतें. इस्लाम मुळांत स्वतंत्र व लोकमतवादी आहे व त्यास जुलूम आणि अनाचार खपत नाहीं असेंच ते प्रतिपादीत.

दोघांच्या धोरणामधील फरक उभयतांसहि नडला. सुलतानी सत्तेस आळा बसून लोकमतानुवर्ती राज्यपद्धति अमलांत यावी एवढीच तरुण तुर्कांची पहिली मागणी होती. पण अनियंत्रित सत्तेस सोकावलेल्या सुलतानानें तरुण तुर्कांच्या चळवळीवर राजद्रोहाचा छाप मारून त्यांचा छळ आरंभिला. काल सुलतानापेक्षां तरुण तुर्कांसच अनुकूल होता. सुलतानास आधार काय तो धर्मगुरु व बहुजनसमाज यांचा. अबदुल अझीझ यास पदच्युत करण्यास शेख उल् इस्लाम या संस्थेनें अनुमति देऊन तरुण तुर्कांच्या अंगीकृत कार्यास एक प्रकारें आशीर्वादच दिला होता. रहाता राहिला बहुजनसमाज, पण तो अक्षरशत्रू होता व तो तसाच ठेवल्यास आपली आज्ञा शिरसावंद्य मानील असें सुलतान मनांत मांडे खात होता. सुलतानानें न्यायाची पद्धति, पोलिसचा बंदोबस्त आणि अधिकाऱ्यांचें वर्तन चोख ठेवण्याचा आपल्याकडून प्रयत्न केला असता, तर तुर्कस्थानांतील प्राकृत जनांनीं त्याचीच बाजू राखली असती, परंतु न्यायाधीश पैसे खात, पोलीसच चोऱ्या करीत आणि इतर अधिकारी पगार वेळेवर व भरपूर मिळत नसल्यामुळें प्रजेवर चरत. गरिबांवर कराचा बोजा बिनचूक बसे आणि श्रीमंतास लाचानें तो अचूक टाळतां येई. त्या योगानें रयत एकंदरींत नाराजच होती. तथापि याहि दोषाचें खापर सुलतानाच्या माथीं न फोडतां मंत्रिमंडळ व अधिकारी वर्ग यासच बोट लावून ती स्वस्थ बसे. परंतु राज्यकारभारांतील अव्यवस्थेची मालिका सुलतानापर्यंत नेऊन भिडविण्यास त्यासहि तसेंच जबरदस्त कारण घडलें. आंतील असंतोष व बाहेरील परचक्र यांपासून राज्याचें रक्षण करण्याकरितां सुलतानानें आपल्या सैन्याची सुधारणा चालविली होती. सैन्यावरील कामदार जर्मनींतून लष्करी शिक्षण देऊन तरबेज करून आणिले होते आणि त्याखेरीज लष्करी शिक्षणाच्या शाळाहि त्यानें ठिकठिकाणीं घातल्या होत्या. अधिकारी मग तो सुशिक्षित म्हटला कीं आपला द्वेष्टाच असला पाहिजे, असा सुलतानानें आपला ग्रह करून घेतला होता. अशा प्रकारचे लष्करी कामदार व त्यां-

च्या तालमींत तयार झालेली सेना सुलतान हेजज व येमेनसारख्या दूर देशांत बंडें मोडण्यास पाठवून देई व अक्षरशत्रूंना तोंडाजवळ बाळगी. दूर देशीं गेलेल्या सैन्याची ना नीट कपडा, ना अन्न, ना पैसा अशी अनास्था असे. लढाईंत जखमी झाले त्यांस सरकारी खर्चानें व व्यवस्थेनें स्वदेशीं पोचतेंहि करण्यांत येत नसे. परकीयांच्या जहाजांवरून ते स्वदेशीं गेल्यानंतर त्यांचें एकच दैन्य अनेक जिव्हांनीं असंतोषाच्या ज्वाला शेतकऱ्यांच्या झोंपड्यांतूनहि पसरून देत असे. ख्रिस्ती लोकांस पलटणींत मज्जाव असल्यामुळें सैन्यांत सारा भरणा मुसलमानांचाच होता. अशा रीतीनें दुःखानें व जुलुमानें गांजलेला शेतकरी वर्ग तरुण तुर्कांच्या हातीं अचानक लागला. सुशिक्षित अधिकारीवर्ग तर त्यांस आंतून अनुकूलच होता.

तरुण तुर्कांचें वजन धर्मसंस्था व गरीब रयत यांवर वाढत चाललेलें पाहून तरुण तुर्कांस छळण्याचा उपक्रम सुलतानानें आरंभला. मतप्रचाराचीं मुख्य साधनें व्याख्यान, छापखाना, टाईपरायटर व टेलिफोन हीं होत. तुर्कस्थानांत बाहेरून येणाऱ्या छापील मजकुरावर सरकारी तपासणी बसली. आंग्ल तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर याचें पुस्तक कोणापाशीं सांपडलें कीं त्यास तुरुंग पहावा लागे. नाटकगृहांत हॅम्लेट नाटकास बंदी झाली, सुशिक्षित तुर्कांच्या घरांच्या झडत्या होऊं लागल्या, सभा संपल्या व तीनचार मित्रांस एकत्र जमून विचार करणें धोक्याचें ठरलें. तुर्कांस कोणास मेजवानीस बोलवावयाचें तर त्यास अधिकाऱ्यांची परवानगी पाहिजे असे. गुप्त हेरांचें जाळें पसरून कोणीहि हेर हव्या त्या माणसावर हवा तो आळ घेऊन पैसे उकळी. एक हेर दुसऱ्या हेरावर, एक मंत्री दुसऱ्या मंत्र्यावर, नोकर यजमानावर व मित्र मित्रावर टेहळणी ठेवी. सुलतानाचे हेर जेथें जेथें परदेशीं देशभक्त तुर्क जाऊन राहिले होते, तेथें तेथें त्यांवर टेहळणी करण्यास गेले होते. हेराप्रीत्यर्थ दरसाल वीस लक्ष पौंडाचा सरकारास खर्च येत असे. टेलिफोन व टाईप रायटर यांसहि तुर्कस्थानांत थारा नव्हता. तुर्कस्थानच्या हद्दींत परराष्ट्रीय पोस्टें होतीं. त्यांतून तरुण तुर्कांचा परदेशांशीं पत्रव्यवहार होत असेल, अशा वहिमावरून सुलतान

वेळाशक टपाल फोडून पहात असे आणि मागाहून त्या त्या राष्ट्रांची माफी मागण्यासहि लाजत नसे.

चोहोंकडून गळचेपी होऊं लागल्यावर स्वदेशांत राहून चळवळ करण्याचा मार्ग बहुतेक खुंटल्यामुळें बऱ्याच तरुणांनीं देशांतर केलें. स्वेच्छेनें हद्दपार झालेल्या या तरुणांचीं व परेच्छेनें हद्दपारीवर रवाना झालेल्या देशभक्तांची संख्या अजमासें एक लाखापर्यंत होती. स्वित्सरलंडमधील जिनीवा शहर अलीकडे कैक वर्षें पृथ्वीच्या पाठीवरील अराजकांचें व क्रांतिकारकांचें माहेरघरच होऊन राहिलें आहे. या शहरीं १८९१ सालीं कांहीं हद्दपार तुर्क रहावयास आले व तेथें त्यांनीं ऐक्यप्रगतिसंघ स्थापन केला. संघानें आपलें ध्येय सुशिक्षित तुर्कांनीं त्यापूर्वीं प्रतिपादिलेल्या मतांहून भिन्न नव्हतें. तुर्कस्थानची राजकीय स्थिति परकीय राष्ट्रांच्या मदतीनें बाहेरून न सुधारतां आंतून आपल्याच प्रयत्नानें सुधारणें सुशिक्षित वर्ग व बहुजनसमाज यांच्या साहाय्यानें सुलतानावर दडपण घालून त्याजकडून सनदशीर राजकीय हक्क मिळविणें व सुलतानाच्या सत्तेस मर्यादा घालणें हा संघाचा कार्यक्रम ठरत होता. संघ थोड्याच दिवसांत जिनीवाहून पॅरिस येथें आला. पॅरिसमध्यें संघाचें बळ बरेंच वाढलें व त्याच्या कार्याचा व्यापहि वाढला. संघापाशीं परदेशांत पुरेसा पैसा नव्हता, तो तुर्कस्थानांतील त्यांच्या देशाभिमानी बांधवांनीं पुरविला. सुलतानाच्या राज्यकारभारांतील दोष वेशीवर टांगणें आणि त्या मजकुराचे कागदपत्र गुप्तपणें तुर्कस्थानांत पाठवून देणें हीं दोन कामें मोठ्या प्रमाणावर बिनबोभाट होऊं लागलीं. संघाचे हस्तक कॉन्स्टांटिनोपलमध्यें असत. ते पॅरिसहून आलेलीं पत्रकें शहरभर रातोरात भिंतीस चिकटवीत व अशा रीतीनें पॅरिसमधील संघाची कामगिरी व त्यासमवेत क्रांतीचाहि राजरोस उपदेश तुर्कांच्या कानावर घालीत. तुर्कस्थानांतील बहुजनसमाजास कार्याचें स्वरूप, त्याचे परिणाम, युक्तायुक्तता व स्वतःचें कर्तव्य समजण्यास या प्रसिद्धिपत्रकांचा फारच उपयोग झाला.

तरुण तुर्कांनीं तुर्कस्थानांतील धार्मिक व शेतकरी मुसलमानांचें मन आपल्याकडे बरेंच बळवून घेतलें होतें. परंतु याहिपेक्षां त्यांस बिकट

अडचण होती ती आर्मीनियन, बल्गेरियन, ग्रीक, व सर्व्हियन यांस आपली कार्यपद्धति पटवून देण्याची. बल्गेरिया, ग्रीस, सर्व्हिया हे देश आतांपर्यंत स्वतंत्र झालेलेच होते. तरी पण हे देश स्वतंत्र होऊन युरोपांत जो मॅसिडोनिया व थ्रेस हा मुलूख तुर्कांच्या राज्यांत राहिला त्यांत वरील जातींचे लोक अद्यापि रहात होतेच. हाहि मुलूख छिनावून घेऊन तुर्कांस पांचशें वर्षांच्या अमलानंतर युरोपांतून ऐनजिनसी मार्मोरा समुद्रापलीकडे फेकून देण्याचेहि युरोपियन राष्ट्रांचे बेत चालूच होते. १८९० मध्यें रशियाच्या चिथावणीवरून बंड केल्यामुळें आर्मीनियनांची कत्तल झाली होती व १९०३ मध्यें मॅसिडोनियांत बल्गेरियनांचें झालेलें बंडहि तुर्कांनीं कत्तल करूनच मोडलें. रशिया व इंग्लंड यांनीं या गोष्टींचा बराच गवगवा केला होता. रशिया, इराण, व तुर्कस्थान यांनीं बृहन्आर्मीनिया पूर्वीच वाटून घेतला असून त्यापैकीं तुर्कस्थानच्या वाटणीस आलेल्या आर्मीनियांत ख्रिस्त्यांपेक्षां मुसलमानच संख्येनें अधिक होते. रशिया व तुर्कस्थान यांतील कोणा एकाचें स्वामित्व जर पत्करावयाचें तर तुर्कस्थानचेंच काय वाईट ? आणि संख्येवरून देश कोणत्या जातीचा हें ठरवावयाचें तर अर्मीनिया हा मुसलमानांचा ठरून त्यास तुर्की अंमलाखालींच अखेर रहावें लागणार हें दिसतच होतें. तथापि रशियाच्या भुलथापांनीं प्रारंभीं फसलेले आर्मीनियन स्वतंत्र होण्याची चळवळ करीत होतेच. त्यांचे क्रांतिकारक पुढारी पॅरिसमध्येंच तळ देऊन होते. त्यांची व तरुण तुर्कांची गांठ पडली व सर्वांस सारखें वागविण्याचें आणि जात व धर्म राजकीय व्यवहारांत न मानण्याचें तुर्कांचें ध्येय आर्मीनियनांस पटून ते तरुण तुर्कांस १९०३ मध्यें सामील झाले. यहुद्यांचा कैवार घ्यावा असें त्यांच्या धर्मबंधूंचें स्वतंत्र राष्ट्र एकहि नाहीं व पॅलेस्टाईन खेरीज त्यांस देशहि नाहीं, अशा अडचणींत यहुद्यांनीं तरुण तुर्कांच्या संघाचाच आश्रय केला.

आतां फक्त मॅसिडोनियांत राहाणारे बल्गेरियन, ग्रीक व सार्व्हियन यांची तेवढी समजूत घालावयाची राहिली व तेंच काम मोठें बिकट होतें. ग्रीस, सर्व्हिया व बल्गेरिया हे त्यांचे स्वदेश स्वतंत्र झाले होते व या सभोंवारच्या देशांतून बंड करण्यास त्यांस प्रोत्साहन व साहाय्य मिळत

असे. परंतु प्रत्यक्ष त्यांजकरितां शस्त्र उपसण्याची त्यांच्यापैकीं एकाच्याहि अंगांत अद्यापि ताकद नव्हती. वस्तीहि अशा संकीर्ण कीं, मॅसिडोनिया किंवा थ्रेस हा प्रांत एकट्या ग्रीकांचा, सर्व्हियनांचा कीं बल्गेरियनांचा हें ठरविणें मुष्किलीचें होतें. तीन देशांपैकीं कोणचाहि देश त्याचा ताबा घेऊं म्हणेल तर बाकीचे देश त्यांस भंडावून सोडीत. या छोट्या राष्ट्रांची अडचण या युक्तिवादानें मिटल्यानंतर मोठ्या राष्ट्रांच्या मदतीचा प्रश्न काय तो उरतो. तोहि मोठ्या चातुर्यानें त्यांनीं सोडविला. प्रबळ युरोपियन राष्ट्रांच्या मदतीवर बसण्यांत तात्पर्य नाहीं. त्या राष्ट्रांची परस्पराशीं स्पर्धा व मत्सर आहे. त्यांनीं मदत केली तरी ते स्वतःचें हित साधतील. मॅसिडोनियांतील लोक ख्रिस्ती आहेत, म्हणून ते त्यांच्या राजकीय आकांक्षा तृप्त करतील असें नाहीं. त्यांच्या नादीं लागून तुर्की साम्राज्यांतून फटकून निघण्याच्या विचारापेक्षां साम्राज्यांत राहूनच तुर्कांच्या बरोबरीनें आपण राजकीय हक्क मिळवावे हा फायदेशीर विचार त्यांच्या हळूहळू गळीं उतरला व त्यांच्या स्वातंत्र्यार्थ स्थापन झालेल्या पॅरिसमधील कमिट्या बिचकत व थबकत तरुण तुर्कपक्षास मिळाल्या.

डिसेंबर १९०७ मध्यें तुर्क क्रांतिकारकांनीं पॅरिस शहरीं आपली कॉंग्रेस भरविली. तिला आर्मीनियन, बल्गेरियन, यहुदी, आरब, आल्बानियन इत्यादि कमिट्यांचे सभासद व तरुण तुर्कांच्या ऐक्य–प्रगतिसंघाचे सभासद हजर होते. कांग्रेसमध्यें (१) सुलतान अबदुल हमीद यास काढून टाकणें, (२) इस्लामी साम्राज्य राखणें (३) सर्व जातींस एकच कायदा लागू करणें, हे ठराव पास झाले.

वरील कांग्रेस भरण्यापूर्वीं एक वर्ष ऐक्य–प्रगतिसंघानें पॅरिस सोडलें व मॅसिडोनियांतील सॅलोनिका शहरीं ठाणें दिलें. या सुमारास मॅसिडोनियांतील रशिया व ऑस्ट्रिया यांचें राजकारण बहुतेक शिजत आलें होतें. त्यांना हवी तशी अंदाधुंदी तेथें माजून राहिली होती. खुनी राजकीय टोळ्या प्रांतभर फिरत होत्या व या प्रांतांत शांतता व सुव्यवस्था आपल्याच्यानें ठेववत नाहीं अशी लांच्छनास्पद कबुली तुर्की सरकारानें दिल्यासारखीच होती. कारण त्या प्रांताचा मुलकी कारभार पाहण्याचें व

बंदोबस्त राखण्याचें अधिकारपत्र (मॅन्डेट) तुर्की सरकारास मिळालेंहि होतें. त्यांनीं शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचें दूरच राहून त्यांत अधिकच बखेडा माजविला आणि तो अशाकरितां कीं, तुर्कांचा यत्किंचित्‌हि अधिकार त्या प्रांतावर जोंपर्यंत आहे तोंपर्यंत शांतता प्रस्थापित होणें अशक्यप्राय होय असें सांगावयास सांपडून सदर प्रांत आपणास मिळावा.

मॅसिडोनियांत सैन्य तुर्कांचें होतें व पोलिस पराष्ट्रांचें होतें. तुर्की सैन्य सदर प्रांतीं असून त्याच्या हातून बंडाळी मोडूं नये, एवढ्या पुरता परराष्ट्रांचा तुर्क सरकारावरील आक्षेप दिसण्यांत वाजवी होता. परंतु अंदरकी बात वेगळीच होती. सैन्यावरील अंमलदार तरुण, सुशिक्षित, परकीय जर्मन वगैरे वरिष्ठांच्या हाताखालीं लष्करी शिक्षण संपादिलेले होते. त्यांस वेळेवर धड कपडा मिळत नव्हता, कीं खावयास पोटभर अन्न नव्हतें. उलट पक्षीं परराष्ट्रांतील पोलिस व्यवस्थित, झोंकदार, पगाराचे पैसे बाळगून व खाऊन पिऊन सुखी होते. त्यांच्या व स्वतःच्या स्थितींतील फरक पाहून तर तुर्की सेनेच्या अंगाचा तिळपापड होई व त्यांस तरुण तुर्कांच्या चळवळीविषयीं सहजच सहानुभूति वाटे. असलें सैन्य क्रांतिकारकांस त्वरित वश होण्यासारखें होतें. प्रजेंत ग्रीक, बल्गेरियन व सर्व्हियन अशी तिघड होती. बल्गेरियन लोकांस स्वतःचा धार्मिक पंथ वेगळा हवा असतां त्यांजवर ग्रीक पंथाची सत्ता लादलेली होती. त्या पंथापासून ते फुटून निघूं लागतांच उभयतांचे आपसांत तंटे लागले. आणि शेजारच्या ग्रीस व बल्गेरियाच्या फिसालतीनें या तंट्याचें खुनांत व एकमेकांचीं खेडीं जाळण्यांत पर्यवसान झालें. परंतु शांतताप्रिय सामान्य जनास या उपाधींचा वीट आला असल्यामुळें त्यांसहि तरुण तुर्क पक्षाची कार्यपद्धति पसंत पडली.

धामधुमीच्या अनुकूल अडगळींत तरुण तुर्कांना आपल्या संघाचें ठाणें देणें इष्ट व सोयीचें वाटलें व त्यांनीं सॅलोनिका हें शहर आपलें केंद्र बनविलें. सॅलोनिकांत ग्रीक, यहुदी, अल्बानियन बल्गेरियन व लीव्हंटाईन लोक रहातात. ते भिन्न भाषा बोलतात व भिन्न वेष धारण करतात. अशा बकाली लोकांच्या आडोशांत पोशाख बदलून गुप्तपणानें कायम

राखणें फार सोपें होतें. १९०६ सालीं सॅलोनिकास येऊन राहिल्यावर क्रांतिकारकांनीं फ्रीमेसनरी नांवाचें मंडळ स्थापन केलें व त्याच्या शाखा मॅसिडोनियांतील स्कुटारी, मोनॅस्टीर व जानीना या गांवीं निघाल्या. मंडळाचे लष्करी अधिकारी, जमीनदार, प्रोफेसर, वकील, डॉक्टर व उलेमा हे विभिन्न धंद्याचे व पेशाचे, प्रतिष्ठित, विचारी व विद्वान लोक सभासद झाले. ते सर्व स्वार्थत्यागी व देशाभिमानी होते. अशा गृहस्थांची नीट ओळख पटली व त्यांच्या स्वभावांविषयीं खात्री झाली, म्हणजे क्रांतिकारकांच्या गुप्त सभेंत त्यांस प्रविष्ट करावयाचें अशीं संघाचीं दोन प्रकारचीं कामें असत. युक्तिवाद, खल व मोहबत या उपायांनीं तुर्की जनतेंतील सर्व वर्गांतून अनुयायी मिळविणें हें एक आणि विशेष खात्रीच्या माणसास संघाचे सभासद बनविणें हें दुसरें. संघाचा सभासद करण्याची युक्ति अशी असे. संघाच्या जुन्या सभासदानें आपला मित्र देशाभिमानी, सदाचरणी व जुलमास चिडलेला आहे, असें पाहून त्याची गांठ घ्यावी, त्याचा ठाव पहावा व नंतर त्यास म्हणावें 'मित्रा मला तुजपाशीं एक गोष्ट बोलावयाची आहे. ती तूं कोणापाशीं शपथपूर्वक फोडणार नसशील तर तुला सांगतों.' त्यानें शपथ वाहिली म्हणजे त्यास गुप्त संघाची माहिती, तिचा सध्याची राज्यपद्धति मोडण्याचा हेतु, सभासद होणारावरील, जबाबदारी व त्याची खुषी, इतकें झाल्यावर या गोष्टी तितक्याच ठेवावयाच्या. पुढें एके दिवशीं दोघा दूतांनीं या नव्या उमेदवारास भेटावें, त्यास त्याच्या सभासद मित्रांची ओळख द्यावी, एकांतीं घेऊन जावें, त्याचे डोळे बांधावे, व तेथून एखाद्या रिकाम्या घरांत किंवा अरण्यांत घेऊन जावें. तेथें नेल्यावर त्यास डोळे बांधून उभें करावें, दोघा उत्कृष्ट वाक्पटूंनीं देशाच्या दीन स्थितीचें भेसूर चित्र त्याजपुढें रंगवावें; उस्मानी साम्राज्याचा अंमल कसा नासला आहे, राजवाड्यांतील हेरांपासून कसा त्रास पोंचत आहे, यासाठीं तुर्कस्थानास स्वतंत्र करणें हें जातिवंत तुर्कांचें कसें कर्तव्य ठरतें, याची जळजळीत शब्दांनीं फोड करावी. हें भाषण इतकें मर्मभेदक असे कीं, तें ऐकून उमेदवाराच्या डोळ्यांतून टपटपा अश्रूच गळावे. यानंतर गुप्तपणा राखण्याची, इमान बाळगण्याची

व कमिटीचे हुकूम बिनशर्त पाळण्याची शपथ कुराण व कृपाण यांवर हात ठेवून घेण्यांत येई. शपथविधि आटोपून डोळे सोडल्यावरहि त्यास आपणाभोंवती बुरखा घेतलेलीं पांच माणसें आहेत एवढेंच फक्त समजे. सुलतानाचे हेर सर्वत्र कसे पसरले आहेत, त्यांतील कांहीं हेर संघांत असण्याचा संभव कसा आहे, यासाठीं गुप्तपणा राखणें कसें जरूर आहे, एकमेकांची ओळख होऊं न देणें का भाग आहे, सभासदांचीं कर्तव्यें कोणतीं, कुराणाची शपथ घेतल्यामुळें तुर्कस्थान बंधमुक्त होईपर्यंत कार्य चालविणें कसें जरूर आहे, जगांत जेथें पाठवण्यांत येईल तेथें कसें गेलें पाहिजे, व प्रसंग पडल्यास आपल्या भावाचाहि वध कसा करावा लागेल, हें त्यास पुन्हां समजावून सांगण्यांत येई. इतकें झाल्यावर त्याचे डोळे पुन्हां बांधून त्यास दूत घेऊन जात.

नव्या सभासदांस कांहीं महिने हंगामी समजण्यांत येई. त्याला गुप्तपणें हुकुम येऊन पोंचत व ते त्याला पाळावे लागत. त्याच्या इमानाची जबाबदारी त्याच्या मित्रावर असे. तो इमानास न जागला तर त्याच्या शिरच्छेदाची कामगिरी त्याच्या मित्राकडेच येई. तो विश्वासू आहे असें अनुभवाअंतीं ठरलें म्हणजे ते पूर्वींचे दूत त्यास गुप्त संघाच्या बैठकीस घेऊन जात आणि पूर्वींप्रमाणें त्यावर आणखी संस्कार झाल्यावर संघाच्या अनेक पथकांपैकीं एकांत त्यास दाखल करून घेण्यांत येई. प्रत्येक पथकांत दीडशे सभासद असत. पण या नव्या सभासदाच्या ओळखीचे चारच होत. या ऐक्य–प्रगति–संघास कायमचा अध्यक्ष नसे. सर्व सभासदांचा दर्जा सारखा. दरसाल नवा चेअरमन निवडून घ्यावयाचा. प्रत्येक पथकांतील पांच सभासदांचा एक गट असे. पथकाच्या प्रत्येक पंचकांतील एका इसमाची दुसऱ्या पथकाशीं साखळी जोडलेली असे. अशा प्रकारचे सभासद एकट्या मॅसिडोनियांत पंधरा हजार होते. सर्व धर्मांतील लोकांशीं संभाषण करून आपल्या मताचा प्रसार करण्याचें नाजूक व जोखमीचें काम सभासदांकडे असे. तें करीत असतां पुष्कळ इसम हेरांच्या सांगण्यावरून पकडले गेल्यास त्यांस फांशीची किंवा इतर जबर शिक्षा सोसावी लागे. प्रथम त्यांस लालूच दाखवून बातमी काढून

घेण्याची खटपट होई. पण लालुचीस न वधल्यास चौदावें रत्न-हि दाखविण्यांत येई. पण असें असतां सभासदानें विश्वासघात केल्याचें एकहि उदाहरण घडलें नाहीं.

संघाची तयारी मोठी होती. संघाचा खर्च सभासदांच्या वर्गणी-वर व श्रीमंतांच्या देणग्यांवर चालत असे. दारूगोळा व हत्यारें गुप्तपणें खरेदी करण्यांत येत. संघाचें कार्य करीत असतां प्राणास मुकत किंवा शिक्षेवर जात अशा सभासदांच्या कुटुंबांस वार्षिक नेमणूक मिळे. बातम्या तारेनें किंवा टपालानें पोचविणें धोक्याचें असल्यामुळें बातमीदार सभासद वेषांतर करून निरोप नेत. गुप्त हेरांनीं सरकारी हेरांवरहि मात करावी. ज्यांस सुलतानाकडून हेराचा पगार मिळे, त्यांपैकीं कित्येक संघाचे विश्वासू बातमीदार असत. सभासदांत सरकारी नोकरहि होते. मुलकी खातें, पोस्ट खातें, तार खातें, जकात खातें, युद्ध खातें हीं सर्व खातीं सभासदांनीं व्यापलीं होतीं. यामुळें सरकारी पत्रव्यवहार फोडणें, राजवाड्यांतील गुप्त कारस्थानें जाणणें या गोष्टी संघास सहज साधत. त्यांचे हेर तुर्क सरकारच्या परदेशांतील वकिलांतूनहि होते. याशिवाय साऱ्या साम्राज्यभर संघाच्या क्रांतिकारक मतांचा फैलाव करणारीं असंख्य माणसें होतीं. सरकारास कर कां देऊं नयेत, क्रांतिकारक चळ-वळ कशी न्याय्य आहे, तिजविरुद्ध शस्त्र उपसण्याचा सुलतानानें हुकूम सोडला तरी तो कां मानूं नये, हें तीं माणसें सांगत. कित्येक तुर्क अधिकारी वेषांतर करून व स्वतः स्वस्त जवाहिर, सरबतें, विडीकाडी विकत हिंडून शेतकऱ्यांच्या झोपड्यांतून व शिपायांच्या कोठड्यांतून प्रवेश करून घेत व त्यांस क्रांतिकारक हस्तपत्रकें व चोपडीं वाटीत. एका प्रसिद्ध अधिकाऱ्यानें बगदाद येथें न्हाव्याचें दुकान घातलें होतें, व त्यांत बसून तो आपल्या गिऱ्हाइकांस क्रांतिकारकांच्या कल्पना समजावून देत असे. नाझीम बे अनातोलियामध्यें हद्दपारीवर असतां दीड वर्ष-पर्यंत फेरीवाल्याच्या धंदा करून तेथील पलटणी फितवीत होता. लष्क-री अधिकाऱ्यांच्या व शिपायांच्या मनावर त्यानें क्रांतिकारक मतें इतकीं बेमालूम बिंबविलीं कीं, मॅसिडोनियांतील क्रांतिकारकांचें बंड मोडण्यास

सुलतानानें अनातोलियांत सैन्य पाठविलें, तेव्हां त्यांनीं आपल्या दोस्तांवर शस्त्र उगारण्याचें नाकारलें तुर्कस्थानांत स्त्रियांस मोठ्या आदबीनें वागविण्यांत येतें, या सवलतीचा फायदा घेऊन निरोप व कागदपत्र पोचविण्याचें नाजूक काम कित्येकदां स्त्रिया करीत. कमिटींतील एका सभासदाच्या बायकोस डोळ्यावर न येतां दुसऱ्या सभासदाच्या बायकोकडे चिठ्ठीचपाटी किंवा निरोप घेऊन बिनधोक जातां येत असे.

तरुण तुर्कांनीं मॅसिडोनिया चांगला पोखरला. मुलकी अधिकाऱ्यांचा त्यांस आधार मिळाला. वरिष्ठ अधिकारी निरुपयोगी होते पण त्यांच्या हाताखालचे लष्करी अधिकारी सामील करून घेण्यांत आले. त्यांजकडून सैन्य फितविण्याची बिकट कामगिरी सोपी झाली. बल्गेरियन टोळ्यांचा पाठलाग करीत सैन्य फिरत असतां हे अधिकारी आपल्या फौजेच्या सभा आड बाजूस भरवून तिला संघाचे उद्देश स्पष्ट करून सांगत. थ्रेसमधील अधिकाऱ्यांची अशीच मदत होती. अनातोलियांतील शूर शेतकरी शिपायांची तयारी डॉ. नायझी बे व इतर अधिकारी करीत होते. अशा रीतीनें इस्तंबूलच्या सभोवारचा प्रदेश सुलतानास खावयास उठला.

बंडाची पूर्ण तयारी सन १९०९ मध्यें होईल अशी अटकळ होती. पण एक आगंतुक संकट उद्भवल्यामुळें तो दिवस अलीकडे आणावा लागला. इंग्लंड व रशिया यांनीं आपलें सैन्य मॅसिडोनियांत पाठवून शांतता प्रस्थापित करण्याचें ठरविलें. ह्या सैन्याचें पाऊल मॅसिडोनियांत पडणें म्हणजे तरुण तुर्कांच्या मुळावर घाव बसणेंच होतें. या संकटाचा विचार करण्याकरितां ऐक्य-प्रगति-संघाच्या गुप्त सभा १९०८ च्या मे महिन्यांत सॅलोनिकास भरूं लागल्या. त्यांनीं पूर्ण विचार करून आपल्या संघाचें अस्तित्व युरोपियन राष्ट्रांस भासविण्याचें व मॅसिडोनियाची जिम्मा आम्ही घेण्यास तयार आहों असें त्यांस कळविण्याचें ठरविलें. त्यांनीं पुढीलप्रमाणें जाहीरनामा पाठविला. "मॅसिडोनियास सुखप्राप्ति व्हावी या उद्देशानें युरोपियन राष्ट्रें त्या प्रांतीं सुधारणा अमलांत आणणार आहेत. पण त्यास आमचें उलट उत्तर असें आहे कीं, युरोपचा हा हेतु आजवर साधला नाहीं. युरोपियन राष्ट्रांची ही ढवळाढवळ कायदेशीर नाहीं, नव्हे

ती तुर्की साम्राज्यास अपायकारक आहे. आम्ही मुसलमान व ख्रिस्ती आतां एक झालों आहों. परकीयांच्या लांब्या कारभारांतून आमच्या देशाची सुटका करण्याचा आमचा निश्चय कायम झाला आहे. सध्यांच्या राज्यापासून आम्ही आपलें वैय्यक्तिक व राजकीय स्वातंत्र्य मिळविणार आहों. इंग्लंड व रशिया यांनीं केलेला बेत शेवटास गेल्यास मॅसिडोनिया प्रांत तुर्की साम्राज्यांतून फुटून वेगळा होईल. आमच्या साम्राज्याचा घात करणारी ही योजना आम्ही कधींहि स्वीकारणार नाहीं. आम्ही आमचे नैसर्गिक हक्क मिळविण्याचा हरप्रयत्न करूं." या जाहिरनाम्यास युरोपियन राष्ट्रांनीं उत्तर तर दिलें नाहींच, पण तीं तरुण तुर्कांच्या धाष्ट्यर्याबद्दल गालांतल्या गालांत हसलीं मात्र असतील ? संघास घरचे शत्रू व दारचे शत्रू यांपासून आपला बचाव करून घ्यावयाचा असल्यामुळें त्याचें कार्य किती अवघड होतें याची अटकळ बांधतां येईल.

ठरलेल्या मुदतीच्या आंत बंड उभारण्यास अनुकूल व प्रतिकूल अशीं दोन्ही प्रकारचीं कारणें होतीं. १९०८ च्या प्रारंभीं मॅसिडोनियांतील सरकारी सैन्याची आतुरता वाढत चालली. क्रांतिकारकांचीं मतें ऐकल्यापासून तर त्यांस आपल्या हालअपेष्टा अधिकच असह्य वाटूं लागल्या. त्यांनीं लष्करी कोड हातांत घेऊन त्याबरहुकूम आपली व्यवस्था सरकाराकडून लावून घेण्याचा निश्चय केला. पगाराच्या थकलेल्या बाकीचा त्यांनीं वरिष्ठामागें लकडा लावला व योग्य तो पोटगी—भत्ता मिळण्याबद्दल हट्ट धरला. कफल्लक सरकाराकडून या मागण्या पुरविल्या जाईनात, तेव्हां सैन्यानें शिस्त मोडण्यास सुरुवात केली. हेदजजमध्यें जाण्याचा झालेला हुकूम त्यांनीं मानला नाहीं. इकडे तरुण तुर्कांची चळवळहि जोरावत होती. सैनिक व तरुण तुर्क यांचा एक जीव होणार अशा बेतांत दरबारानें संघाचा छडा लावण्याकरितां मॅसिडोनियांत एक कमिशन पाठविलें. कमिशननें सर्वत्र हेर सोडले, धरपकडी केल्या, लालूच दाखविली. तरी संघाच्या सूत्रधारांचा पत्ता त्यास लागला नाहीं. फक्त मॅसिडोनियांत एक प्रबळ गुप्त मंडळ आहे व तेथील सैन्य सरकारास वेळेवर मदत करील असें वाटत नाहीं, एवढाच रिपोर्ट कमिशनास करतां आला.

सरकारास आपलें अस्तित्व एकदाचें समजलें असल्यामुळें संघाची पाळेंमुळें खणून निघण्याच्या आधींच बंड उभारावें असें सूत्रधारांच्या मनानें घेतलें. या कामीं मुख्य पुढाकार नायझी बे या देशभक्तानें घेतला. ता. २८ जून १९०८ रोजीं नायझीनें आपल्या प्रांतीं संघाच्या एका शाखेची सभा भरवून बंडाचा विचार ठाम ठरविला. बंड उभारण्यापूर्वी संघाच्या मुख्य कमिटीची मंजुरी मिळविणें जरूर होतें व ती मंजुरी दोन दिवसांत मिळाल्यावर त्या तारखेच्या पुढच्या शुक्रवारीं म्हणजे ता. ३ जुलई रोजीं रेस्ना प्रांतांत बंडाचा बावटा उभारला.

नायझीबे ह्याचा जन्म एका मुसलमान घराण्यांत मोनॅस्टीर व आाक्रिडा या दोन शहरांमधील रेस्ना गांवीं झाला होता. हा प्रांत अत्यंत सुपीक व रमणीय आहे. फळाचे बाग, धान्याचीं शेतें, गवताचीं कुरणें व अरण्यें यांनीं तो गजबजला आहे. सरोवरांनीं तर त्यास विशेषच शोभा आली आहे. नायझीस या प्रदेशाची बाळपणापासून माहिती व त्याचे खेड्यापाड्यांतून बाळमित्रहि फार. ऐन तारुण्यांत नायझी लष्करांत शिरला व त्यानें ग्रीक लोकांविरूद्ध मोठी बहादुरी मिळविली. क्रांतीच्या पूर्वीं पांच वर्षें याच प्रांतांतील धामधूम मोडण्याच्या कामावर सरकारनें त्याची नेमणूक केली होती. सदर प्रांतांमधील ख्रिस्ती व मुसलमान सुलतानांच्या जुलमी अमलास त्रासल्यामुळें दंगे होतात हें तो पूर्णपणें जाणून असल्यामुळें त्याचा हेतु लक्षांत घेऊन या दोन धर्मीयांत सलोखा जमवून आणण्याचा त्यानें प्रयत्न केला. दंगेखोरांच्या टोळ्या एखाद्या गांवावर केव्हां धाड घालतील याचा नेम नसल्यामुळें गांवांचें रक्षण करणारीं पथकें त्यानें ठिकठिकाणीं स्थापन केलीं. या योगानें तो दोन्ही धर्मांस प्रिय होता. रेस्ना प्रांतांत ख्रिस्त्यापेक्षां मुसलमानांचीच वस्ती मोठी होती व त्यांची खेड्यांतून व शहरांतून जूट जमली होती. त्या बाजूस मुलूख डोंगराळ व झाडी दाट; तिच्यांत मुसलमानांच्या एखाद्या टोळीनें सरकारच्या सैन्यास गुंगवीत ठेवावयाचें म्हटलें तर शेतकऱ्यांच्या मदतीवर ही गोष्ट त्यांस कित्येक महिने साध्य होती. या प्रांतीं इमानें इतबारें सरकारी नोकरी बजावीत असतां नायझीनें दारूगोळा व बांब जवळ बाळगणारे शेकडो लोक पकडून चौकशी

न करितां सरकारांत पाठवून दिले; पण वरील अधिकाऱ्यांनीं कित्येक गुन्हेगारांस सोडून दिलें व गरीब शेतकऱ्यांस मात्र शिक्षा ठोठावल्या. नायझी सुलतानी अंमलास आधींपासूनच विटला होता व ऐक्य–प्रगतिसंघाचा सभासद पूर्वींच झाला होता; आणि संघाच्या कार्यावर नजर ठेवूनच तो नोकरीवर असतां आपल्या प्रांताची तयारी करीत होता. इंग्लंड व रशिया मॅसिडोनियास गिळंकृत करण्याच्या खटपटींत असतां सरकार स्वस्थ बसतें याची नायझीस चीड आली.

आपल्या सवंगड्यांस बंडांस उद्युक्त करतांना त्यानें काढलेले उद्गार उद्दीपक व स्फूर्तिदायक आहेत. तो म्हणाला—' रेस्ना गांवीं बंडाचें निशाण उभें करावें. दोनशे इसमास लागेल इतका दारूगोळा, काडतुसें, हत्यारें व पैसा मी पुरवितों. पण त्यांनीं मात्र कुटुंबावर व सुखावर पाणी सोडलें पाहिजे. इतकेंहि करून आपल्या देशास स्वातंत्र्य न मिळालें तर मरणापेक्षां अधिक सुखकर काय आहे ? भ्याडांचा व निंद्य लोकांचा हा देश अशी तुर्कस्थानची साऱ्या युरोपांत बदनामी होत आहे. पण हें बंड करून आह्मी जगास असें दाखविणार आहों कीं, आह्मी ख्रिस्त्यांवराहि प्रेम करतों, त्यांना समान लेखतो, त्यांच्या इज्जतीस स्वतःच्या इज्जतीप्रमाणें जपतो, त्यांच्या प्राणास स्वतःच्या प्राणासारखे मानतो. हें बंड व्यक्तींविरूद्ध नाहीं, विशिष्ट अशा राज्यपद्धतीविरुद्ध आहे. हें बंड स्वतंत्रता, समता, बंधुता यांच्या नांवानें होत आहे. मी आपल्या प्रिय पत्नीस, बहिणीस आणि तिच्या पोरक्या पोरांस परगांवीं पाठवून देत आहे. त्यांस माझा हा शेवटलाच निरोप. '

नायझीचें हें आवेशयुक्त व कळकळीचें भाषण पुरें झालें नाहीं तोंच, ' तुमच्या बरोबर आह्मीहि मरावयास तयार आहों ' अशी सर्वांनीं एकच गर्जना केली. नायझीनें याच सुमारास एका प्रासिद्ध बल्गेरियन ख्रिस्ती क्रांतिकाराच्या बायकोस बंडवाल्यांच्या हातून सोडवून आणिलें, त्यामुळें तर ख्रिस्ती व मुसलमान या उभयतांसहि त्याच्या सद्धेतूंविषयीं शंका उरली नाहीं. बंडाच्या आदल्या रात्रीं नायझीनें सुलतानाचा चीफ सेक्रेटरी, इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस व मोनॅस्टीरचा

गव्हरनर यांस पुढीलप्रमाणें पत्रें पाठविलीं. ' हेराच्या कामावर असलेले पाशा यांस मॅसिडोनियांतून कॉन्स्टांटिनोपलास स्पेशल ट्रेननें ताबडतोब परत पाठवावें, राष्ट्रास सदनशीर हक मिळावे, पार्लमेंट सभा तात्काळ भरवावी. हें न होईल तर आम्ही सरकारास तसें करण्यास भाग पाडूं. मग रक्तपाताची जबाबदारी मात्र आम्हावर रहाणार नाहीं. '

शुक्रवारचा दिवस उजाडला. रेस्ना येथें बंडाला सुरुवात, त्याचें खरें स्वरूप कोणास कळूं न देतांच, करण्यांत आली. रेस्ना गांवावर छापा घालण्याकरितां शेजारच्या डोंगरांत बल्गेरियनांची टोळी आल्याची भुमका संघाच्या कांहीं सभासदांनींच उठविली. त्याबरोबर डोंगराच्या रोखानें गांवांतील सर्व फौज निघून गेली, व शिपायांच्या बराक्या रिकाम्या पडल्या. नायझीबे ही संधि साधून लष्करी पोशाख चढवून बराकींत गेला, व त्याचे दोस्त एकट दुकट त्याजभोंवतीं जमले. त्यानें तलवारीनें खूण करतांच त्याजबरोबरचे दीडशें शिपाई बराकींत घुसले. कांहीं पहिले शिपाई बराकींत होतेच. त्यांना हेहि शिपाई सरकारीच वाटून शंका आली नाहीं. मेजर नायझी बल्गेरियनांच्या टोळीवर जाण्याकरितां तयारी करीत आहे, अशीच त्यांची समजूत झाली. नायझीच्या हुकुमावरून बंदुका व दारूगोळा यांच्या पेट्या उघडण्यांत आल्या. प्रत्येक शिपायानें दोन दोन बंदुका उचलल्या. हेतु हा कीं, नवीन येऊन मिळणाऱ्या शिपायास हत्यारें पुरवितां यावीं. खजिन्याच्या पेटींतूनहि पैसे काढून घेण्यांत आले. ही मंडळी गांवाबाहेर तृणाच्छादित माळावर गेली, व इतर लोकहि त्यांस येऊन मिळाले. नायझीनें त्यास उद्देशून पुढील भाषण केलें—"आपल्या देशास स्वातंत्र्य मिळेपर्यंत आपल्या घराचें तोंडहि न पहाण्याची तयारी आहेना ? ज्यांच्या अंगीं कष्ट सोसण्याची हिंमत नसेल त्यांनीं खुशाल घरीं जावें व आम्हांस निदान यश तरी चिंतावें. सैनिकांनीं स्वदेशबांधवाची जी इज्जत तीच आपली इज्जत समजावी, त्यांजवर दया करावी, जुलूम करूं नये, लुबाडूं नये, स्त्रियांच्या पातिव्रत्याला धक्का लावूं नये व स्वतः पवित्र रहावें. याविरुद्ध वागेल त्यास मी शिक्षा करीन व ती देहान्त शिक्षा असेल. सैन्यांत येणाऱ्या प्रत्येक इसमास त्याच्या

कुटुंबपोषणार्थ मी तीन पौन्ड व अन्नवस्त्र देईन. या अटी तुम्हांस पसंत आहेत ना ? जर असतील तर देवाची शपथ घ्या. त्याबरोबर सर्वांनीं एकदम 'वलाही विलाही' असा गजर केला.

बंडाची ही खबर देशभर पसरली. तें मोडण्याच्या कामगिरीवर सेनापति शेमशी पाशा याची नेमणूक झाली. ता. ६ जुलईस तो मोनॅस्टीर येथें आला. मुसलमानांचें धर्मवेड पेटवून क्रांतिकारकांचें बळ मोडण्याचा त्यानें उद्योग आरंभला. हा संघ ख्रिस्त्यांकडून मुसलमानांची कत्तल करविणार आहे; संघास पाहिजे ती राज्यपद्धति इस्लामी धर्माच्या विरुद्ध आहे; स्त्रियांनीं बुरखा फेंकून द्यावा असें संघाचें मत आहे. या खोट्या कंड्यांबरोबर संघाच्या सभासदांस पैशाची व पदव्याची लालूच दाखविण्यांत आली. पण या प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट त्याच्या हाताखालचा स्टाफ मेजर अनवर बे बंडवाल्यांस मिळाला. तो ज्या दोन पलटणी बंडवाल्यावर पाठविणार होता, त्यांतील एका पलटणीमधील लहान थोर अधिकाऱ्यांनीं संघाशीं इमान राखण्याच्या शपथा पूर्वींच घेतल्या होत्या. सरकारी कंड्यांविरुद्ध संघानेंहि आपल्या पक्षाचे जाहीरनामे मोनॅस्टीर येथें शेमशी पाशा यांच्या समोर लावले.

नायझी बेचा माग सरकारी सैन्यास न लागण्यासाठीं क्रांतिकारकांनीं ठिकठिकाणीं दंगे मांडले व सरकारी गुप्त हेरांस ठार मारण्याचा क्रम इतक्या शिस्तीनें चालविला कीं, मोठमोठे पगार देऊनहि हेरांचें काम करण्यास सरकारास कोणी मिळेना. नायझीनें ३ जुलईस बंड केलें व २३ जुलईस तरुण तुर्कांस स्वराज्याचे हक्क देण्यांत आले. या वीस दिवसांतील नायझीचा कार्यक्रम ध्यानांत ठेवण्याजोगा होता. त्यानें आपली टोळी घेऊन एखाद्या मुसलमान वस्तीच्या गांवीं जावें. 'अलाह अक्बर, ला इलाह इललाह' या जयघोषानें गांवकऱ्यांनीं त्याचें स्वागत करावें, व नायझी आणि त्याचे अनुयायी यांस कडकडून भेटावें. गांवांत गेल्यावर रहिवाश्यांनीं सभा भरवावी, त्याजबरोबर नायझीनें मशीदींत नमाज पढावा, क्षोभकारक भाषणें करावीं, चळवळीचे हेतु समजून सांगावे आणि मग गांवकऱ्यांनीं शपथा घेऊन संघाचे सभासद व्हावें. मशीदींत नमाज पढ-

ण्यानें क्रांतिकारक पंथ धर्मलंड नाहीं अशी बहुजनांची खात्री होत असे. नायझीनें सैन्याच्या अन्न–वस्त्राकरितां गांवकऱ्यांस कधींहि तोशीस लागूं दिली नाहीं. लागेल ती वस्तु रोख पैसे देऊन तो विकत घेई. पैसे कोणी न घेतल्यास त्यांस तो पैसा मिळाल्याच्या पावत्या देई व त्या पावत्या मुदीर वगैरे अधिकाऱ्यांस दाखवून तेवढी रक्कम कराच्या पैशांतून कमी करण्यास तो सांगे. या पावत्या न मानल्या तर तुम्हांस देहान्तशासन क्रांतिकारकांकडून मिळेल असें अधिकाऱ्यांस बजावण्यासहि गांवकऱ्यांपाशीं कळवी. असे कित्येक गांव शपथा घेतल्यावर क्रांतिकारकांच्या अमलाखालीं आले व त्यांनीं सुलतानी सरकारास धाब्यावर बसविलें.

नायझी डोंगराळ मुलखांतून फिरे, मुख्य रस्ते चुकवी, अडचणीच्या भागांतून मार्ग काढी, यामुळें त्यास पुष्कळ संकटें सोसावीं लागलीं. ता. ६ जुलई रोजीं मॅसिडोनियांतील बल्गेरियनांस उद्देशून नायझीनें जाहीरनामा काढला. त्यांत त्यानें संघास अधिकारी, नागरिक, शेतकरी वगैरे सन्मान्य माणसें मिळालीं असून सर्वांस स्वातंत्र्य व न्याय देऊन समानतेनें वागविण्याचा संघाचा उद्देश असल्याचें बजाविलें. त्याचा बल्गेरियनांवर उत्तम परिणाम झाला. पुष्कळ बल्गेरियन संघास मिळाले. सेनापति शेमशी पाशा याच्या हाताखालचा अधिकारी मेजर अनवरबे क्रांतिकारकांस मिळाला. नायझीस पकडण्यास शेमशी गाडींत बसून निघाला असतां त्याचा ता. ७ जुलई रोजीं मोनॅस्टीर येथेंच एका लष्करी अधिकाऱ्यानें दिवसा ढवळ्या खून पाडला. गाडीभोंवती दीड हजार माणूस होतें, पण एकजणहि खुनी इसमास पकडण्यास धजला नाहीं. शेमशीच्या मृत्यूनें पुढील यादवी युद्ध टळलें. तो जिवंत राहता तरी अल्बानियाचा डोंगराळ मुलूख, त्यांतील हत्यारबंद वस्ती आणि नायझीबच्या गनिमी काव्यांत तरबेज झालेले लोक यांनीं शेमशीस मुळींच दाद दिली नसती.

मोनॅस्टरच्या वलीनें (गव्हर्नर) मुख्य वजिरास पाठविलेला खलिता सरकारचा नादानपणा व क्रांतिकारकांची सर्वत्र फत्ते याचा कबुलीजबाबच होय. ‘ नायझी बे व त्याचे दोस्त यांस पकडण्याचा हुकूम सुटला आहे. संघाचा प्रभाव आतां चांगलाच दिसूं लागला आहे.

संघ एकटाच नाहीं. त्याच्या मागण्यास सैन्यांतील अधिकाऱ्यांचा व जनतेचा जोराचा पाठिंबा आहे. यामुळें नायझीस पकडण्याची गोष्ट दूरच राहो, पण संघांतील सभासदांना पकडण्यास, फार काय पण तपास लावण्यासहि कोणी धजणार नाहीं. शुक्रीपाशाच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या कमिशनास हें कार्य याच कारणाकरितां सोडावें लागलें. संघाविरुद्ध उपदेश करण्यास सरकारानें गांवोगांव उलेमा पाठविले होते. त्यांस खुनाची धमकी संघाकडून मिळतांच ते परत फिरले. मी आणि इतर अधिकारी जीव मुठींत धरून आहों, आणि धमक्या खऱ्या करून दाखविण्याची धमक संघांत आहे. येथें सेनापति उस्मान हिदायत पाशा यानें खलिफाचें फर्मान वाचून दाखविण्याकरितां लोक जमविले असतां एका अधिकाऱ्यानें तीनदा गोळ्या घालून त्याचा प्राण घेतला. सर्व लोकांसमक्ष हें कृत्य घडलें, पण एकानेंहि त्यास पकडून दिलें नाहीं कीं त्याचें नांवहि सांगण्याचें धैर्य दाखविलें नाहीं. पोलीस व न्याय खात्यांतील अधिकारी राजिनामे देण्याच्या विचारांत आहेत. माझ्या घराण्यानें सुलतानाच्या गादीशीं चारशे वर्षें इमान राखलें आहे आणि मीहि चाळीस वर्षें निरनिराळ्या हुद्यांवर चाकरी करीत आलों आहें. यासाठीं या आणिबाणीच्या प्रसंगीं मी आपल्या जागेचा राजिनामा देईन तर बेइमानी ठरेन. माझ्या व माझ्या कुटुंबाच्या जिवावर जरी बेतली, तरी आम्ही इमान राखणार आणि क्रांतिकारक व सैन्यांतील अधिकारी यांचें तादात्म्य होऊं देणार नाहीं. मात्र त्या उभयतांचे विचार एक आहेत हें बरीक खरें.'

रेस्नावर नायझींचें पारिपत्य करण्यास सहा पलटणी पाठविल्या आहेत, पण त्या माशा मारीत बसल्या आहेत. त्यांचे कमांडर उपाय हरले म्हणून खुशाल सांगतात. नायझीचा पाठलाग करावयाचा म्हटलें तरी शिपाई त्याजवर व त्याच्या साथीदारावर बंदूक धरण्याचें साफ नाकारतील. सेनापति शमशी पाशा याच्या खुनी इसमास पकडण्याकरितां त्याच्या अल्बानियन बॉडी गार्डांपैकीं शरीररक्षक कांहीं शिपाई व इतर सैनिक रवाना झाले. पण पाठलागाचे वेळीं त्यांनीं आपल्या बंदुका हवेंत उडविल्या अनातोलियांतून

सैन्य इकडे येणार आहे, पण तेंहि क्रांतिकारकांवर शस्त्र उचलण्याचें नाक-रणार अशी बातमी आहे. चळवळ दिवसानुदिवस वाढत आहे. दडपशाही व आर्जव यांच्या आटोक्याबाहेर ती पोंचली आहे. यासाठीं देश-कालवर्तमान ओळखून उपाययोजना व्हावी.'

हा खलिता पोंचल्यावर दरबारानें धोरण बदललें. त्यांनीं ग्रीस देशाची मदत मागितली. संघास मिळालेल्या लष्करी अमलदारांस माफी, बढती, बक्षीस, यांची लालूच दाखविली. राजकीय कैद्यांस मुक्त केलें. सैन्यांतील व आरमारांवरील शिपायांस बढती दिली.मग अनातोलियांतील पलटणी मॅसिडोनियांतील बंड मोडण्यास रवाना केल्या.पलटणीबरोबर संघाचे कैक सभासद सरबत विकणाराच्या व मुल्लाच्या वेषानें होते.त्यांनीं पलटणीस आगाऊच फितवून ठेवलें होतें. सर्व सेनेवरचा मुख्य सेनापति ही चलबिचल ओळखूनच होता. गांठ कोणाशीं आहे हें तो जाणून होता.मुसलमानांत व बल्गेरियनांत संघानें हत्यारें पेरलीं होतीं. आल्बानियांतील दहा हजार सशस्त्र योद्धे सरकारावर उठण्यास सिद्ध होते. ग्रीक लोकांची संघास भीति होती. परंतु ग्रीक बिशपास पळवून नेऊन व त्यांच्या खुनाची भीति घालून ग्रीकांस संघानें गप्प बसविलें होतें. २२ जुलई रोजीं ग्रीकां-स उद्देशून काढलेल्या जाहीरनाम्यांत तुम्हाला समान हक, उन्नतावस्था व स्वतंत्रता हवी असेल, तर आम्हांस येऊन मिळा' असें म्हटलें होतें. कांहीं झालें तरी सेनापति उस्मान पाशा नायझीस पकडण्यास निघणार हें ठरून चुकलें होतें. तेव्हां खुद्द उस्मानास एकाएकीं गिरफदार कर-ण्याचा शेवटचा उपाय उरला. त्याच विचारास नायझी लागला. या कामास त्याच्या मतानें दोन हजार माणसें पाहिजे होतीं. ता. २०।२१ जुलई रोजीं हिंडून त्यानें टोळ्यांवर टोळ्या आणल्या व ता.२२रोजीं राष्ट्रीय सैन्याची हजिरी घेतली, तेव्हां त्यांत वीस पलटणीस, कमांडर, लेफ्टेनंट, कर्नल, मेजर, कॅप्टन, वगैरे जय्यत माणसें होतीं. त्याखेरीज डॉक्टर व जमीनदारहि होते. या सैन्यास जमवून मुशीर उस्मान पाशा यास त्याच्या घरांतून उचलून आणण्याचा उद्देश नायझीनें जाहीर केला. सैन्य मोनॅस्टीरवर कूच करून निघालें असतां वाटेंत नायझीस एक हरीण

मिळालें व तो त्यास शुभ शकून वाटला. संध्याकाळीं हें सैन्य मोनॅस्टीरच्या अलीकडे थोड्या अंतरावर पोचलें. फराळासाठीं त्यानें तेथेंच कांहीं वेळ मुक्काम केला. तेथें मोनॅस्टीर येथील संघाच्या कमिटीचें पत्र घेऊन उस्मान अफंदी ५० लोकांनिशीं येऊन त्यास मिळाला. पत्रांत पुढील योजना सविस्तर लिहिली होती. सर्व मंडळी वहाणा घालून पावलें न वाजवितां पुढें निघालीं; रात्रीं ८ वाजतां ती मोनॅस्टिरास पोचली. गांवांत रहदारी बंद होती. लहान लहान जमावानें सैन्य गांवांत शिरलें. मोनॅस्टीर कमिटीचे सभासद सांगतील तसे सारे वागत होते. त्यांनीं सरकारवाडा, व उस्मानचें राहाण्याचें ठिकाण यांस गुपचुप गराडा दिला. कमिटीच्या लोकांनीं तारा तोडून से० उस्मान पाशा व त्याचे लष्करी अमलदार यांचें दळणवळण एकदम बंद पाडलें. सेनापतीच्या पहारेकऱ्यांची हत्यारें काढून घेण्यांत आलीं. मग दोन अधिकारी व नायझीचे विश्वासू इसम सेनापति उस्मानच्या खोलींत शिरले व उस्मानास जागा करून कैद करण्यांत आलें. बाकीच्यांनीं इतर अधिकाऱ्यांस पकडलें. उस्मानचा इतमाम राखून त्याला संघाचा पुढाकार घेऊन सुलतानाचा जुलमी अंमल चिरडून टाकण्याची विनंति करणारें पत्र त्याच्या हातीं देण्यांत आलें. शेजारच्या खोलींत जाऊन कपडे घालण्यास त्यानें परवानगी मागितली व ती मिळाली. सेनापति घोड्यावर बसला व नायझीचे लोक त्यास घेऊन रेस्ना येथें दुसऱ्या दिवशीं रात्रीं पोचले. त्याला तेथें एका मानकऱ्याच्या घरीं कैद करून ठेवण्यांत आलें.

ता. २३ जुलई रोजीं मॅसिडोनिया व आल्बानिया यांनीं सुलतानाचा अंमल झुगारून दिला. उस्मान बंदिवान होऊन रेस्नास जात असतां वाटेंत मोनॅस्टीर येथें स्वतंत्रतादेवीस मिळालेली तोफांची सलामी त्याच्या कानीं पडली असेल! ता. २४ रोजीं रेस्ना येथें सर्वत्र आनंदीआनंद होऊन राहिला. तुर्क, ग्रीक, बल्गेरियन, वाल्श बंधुभावानें परस्परांस कडकडून भेटले. स्वतंत्रता, समता, बंधुता, व न्यायप्रियता ह्या शब्दांनीं अलंकृत निशाणें जिकडे तिकडे फडकत होतीं. 'राष्ट्राचा जयजयकार असो' 'सेनेचा जयजयकार असो' 'संघाचा जयजयकार असो'

असा जयघोष सर्वत्र होत होता. नायझी मोनॅस्टीरला परत गेला तों त्याजवर पडदा पडला. उस्मानअल्ली पकडला गेल्यावर संघाच्या मोनॅस्टीर केंद्रांतील सभासदांनीं सुलतानास तार पाठवून १८७९ मध्यें पास झालेली सनद लागू करण्यास व प्रजेची परीक्षा न पाहाण्यास कळविलें. रविवार ता. २६ रोजीं पार्लमेंट उघडण्याचा जाहीरनामा न निघाल्यास सुलतानाची पर्वा केली जाणार नाहीं, असेंहि त्या तारेंत म्हटलें होतें. मोनॅस्टीरची कमिटी तार करून स्वस्थ बसली नाहीं. तिनें स्वराज्याचे हक्क आपणच जाहीर करण्याचें ठरविलें. हें काम तिनें खुद्द प्रांतिक गव्हरनरा-वरच सोपविलें. ता. २३ रोजीं गव्हरनर उघडपणें क्रांतिकारकांस मिळाला. त्यानें कमिटीचा जाहीरनामा वाचून दाखविला. जाहीरनामा वाचून झाल्यावर तोफांचा गडगडाट झाला. मॅसिडोनियांत उरलेला मोठा अधिकारी हिल्मी पाशा होय. ' स्वराज्याचे हक्क वांचून न दाखविशील तर तुझा शिरच्छेद होईल अशी क्रांतिकारकांनीं त्यास दहशत घातली. त्यानें सुलतानास तारेनें कळविलें ' जुनी राजवट संपली असें समजा. सुलतानाचा ज्यांवर इलबार ते दोघे पाशा हिल्मी व उस्मान संघानें कैद केले. अनातोलियांतील इमानी गणली गेलेली फौज संघास मिळाली. दुसरी व तिसरी कोअर तर खास संघाचीच. पहिल्या कोअरपैकीं इस्तं-बूलच्या राजवाड्यावरील पहारेकरी काय ते विश्वासाचे उरले आहेत. तरुण तुर्कांवर अरब व इतर आशियाटिक उठविण्यास आतां फुरसत नाहीं. सर्व प्रांतांचे गव्हनर व दुसरे बडे अधिकारी कमिटीस मिळणार अशी दाट वंदता आहे "

ही तार पोंचल्यावर सुलतान अबदुल हमीद यानें मुख्य वजीर फरीद पाशा यास काढून टाकलें. तेवीस मंत्र्यांचा दरबार भरविला. नवा मुख्य वजीर सय्यद व केमिल यांनीं हार खाण्याचा सल्ला दिला. पण कोणीहि ' स्वराज्याचे हक्क ' (कॉन्स्टिटयूशन) हीं अक्षरें सरळ तोंडा-तून काढीना. या विषयावर जो तो आडून आडून बोलत होता. शेवटीं ही नाजूक गाठ सोडविण्याकरितां अबदुल हुद्दा नामक एका वृद्ध अरब ज्योतिष्यास डोलींत घालून दरबारांत आणण्यांत आलें. त्यानें मात्र मंत्र्यांचें

मनोगत ओळखून सय्यद पाशानें हुजुरास स्वराज्याचे हक्काचा सल्ला द्याव-याचा का ? असा मंत्रिमंडळास ओझरता प्रश्न टाकला,पण कोणी त्यास रुकार देईना कीं नको म्हणेना. सय्यदानें ज्याकडे डोळा फिरवावा त्यानें आपला डोळा दुसरीकडेच वळवावा.शेवटीं जिवाच्या करारावर सय्यदानें 'स्वराज्य' सुचविलें व सुलतानानेंहि मोठ्या चातुर्यानें त्यास रुकार भरला.

स्वराज्याची शुभ वार्ता ता. २४ जुलई १९०८ रोजीं सकाळीं तुर्की साम्राज्याच्या कोनाकोपऱ्यांतूनहि दुमदुमली. सुलतानाचें अभिनंदन कर-ण्यास सांबूळ येथें मुसलमान, ख्रिस्ती व यहुदी यांचे थवेच्या थवे जमले. सालोनिकास हिल्मी पाशानें सदर जाहीरनामा लाखो लोकांपुढें वाचून दाखविला. सुलतानाचें फर्मान लवकरच निघालें. त्याप्रमाणें वागण्याची शपथ शेख उल् इस्लामनें सुलतानापासून घेतली. हेंच स्वराज्य तीस वर्षां-पूर्वीं अबदुल अझीझनें फेटाळलें होतें.

सुलतानाच्या फर्मानाप्रमाणें २४ जुलई नंतर तुर्कस्थानास मिळा-लेल्या राज्ययंत्राची रचना पाश्चात्य धर्तीवरच होती.. पार्लमेंटाचे दोन विभाग पाडण्यांत येऊन एकास प्रतिनिधि सभा (चेंबर ऑफ डेप्यूटीज) व दुसऱ्यास सीनेट अशीं नांवें मिळालीं. प्रतिनिधिसभा हीच खरी लोक-मतनिदर्शक असून तिजमधील सभासदांची निवडणूक बहुजनसमाजाकडून होण्याचें ठरलें. निवडणुकीचा अधिकार फक्त पुरुषांसच मिळाला. पन्नास हजार पुरुष नागरिकांमागें एक प्रतिनिधि म्हणजे डेप्युटी या प्रमाणांत निवडणूक व्हावयाची. प्रतिनिधींची लायखी अगदीं सोपी होती. प्रतिनि-धि होऊं इच्छिणारा उमेदवार सरकारी नोकर नसावा, आटोमन म्हणजे तुर्की साम्राज्यांतील रहिवाशी असावा, त्यास लिहितां वाचतां यावें व त्याचें वय तीस वर्षांहून कमी असूं नये, एवढ्याच अटी होत्या. प्रत्येक प्रतिनिधीस दर बैठकीस वीस हजार पैसे (piastris) पगार ठरला. प्रतिनिधींची मुदत चार वर्षांपुरतीच असे. प्रतिनिधि-सभेच्या जोडीस उमराव सभा देण्यांत आली. राज्याची ज्यांनीं उत्तम कामगिरी बजावली आहे त्यांना सुलतानानें सीनेटचा सभासद नेमावें. प्रतिनिधि सभेचा अध्यक्ष व दोन उपाध्यक्ष यांची नेमणूक सुलतानानेंच करावी.

या दोन सभांशिवाय सुलतानाचें मंत्रिमंडळ वेगळें असावें. त्यांत मुख्य वजीर, शेख उल् इस्लाम व इतर बारा मंत्री असत. त्यांची नेमणूक सुलतान करील व ते कायदे मंडळास जबाबदार रहातील.

वरील राज्यपद्धति अमलांत येण्यास निवडणूक होईपर्यंत अवकाश असल्यानें तरुण तुर्कांनी राज्यक्रान्ति घडवून आणतां क्षणींच नवीन पद्धतीचे कायदे लोकांस अनुभवास येणें शक्य नव्हतें. परंतु क्रांतीचा प्रभाव इतर मार्गांनीं लोकनिदर्शनास आला. सुलतान अबदुल हमीद यानें फर्मान काढून राजकीय कैद्यांस बंधमुक्त केलें, युरोप व अमेरिका खंडांत हद्दपार झालेल्या सत्तर हजार देशभक्तांस स्वदेशीं परत येण्याची परवानगी दिली, मुद्रणावरील नियंत्रण काढून घेतलें, परदेशांतून तुर्कस्थानांत येणाऱ्या वाङ्मयावरील देखरेख उठविली, हत्याराच्या विक्रीवरील प्रतिबंध नष्ट केला, परदेशांत प्रवास करण्याची सर्वांस मोकळीक ठेवली, हेरांस रजा दिली व आपल्या मर्जींतील नालायक माणसें नोकरींतून कमी केलीं. सुशिक्षितांस राज्यक्रांतीचा हा फायदा तात्काळ कळून आला. परंतु तो अज्ञसमाजाच्या लक्षांत येण्यासारखा नव्हता. राज्यक्रान्तीसंबंधीं त्यांची समजूत कांहीं विचित्रच होती. आपणास कर द्यावा लागणार नाहीं, आपणावर कोणाचीहि हुकमत चालणार नाहीं आणि सावकारांचें कर्जहि आपोआप माफ होईल, अशी त्यांची वेडगळ कल्पना होती आणि म्हणून राज्यक्रान्ति झाली तरी सुलतान तख्तनशीन आहेच व पूर्ववत् सर्व व्यवस्था कायम आहे असें जेव्हां अज्ञजनांच्या नजरेस आलें तेव्हां त्यांची तीव्र निराशा झाली.

सुलतान नांवाचा उरला असून खरी सत्ता तरुण तुर्कांच्या मुठींत होती, तरी त्यांस राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव मुळींच नसल्यामुळें त्यांनीं जुन्या राजवटींतील अंमलदारांकडूनच काम करवून घेण्याचें ठरविलें. क्रांतीच्या काळीं केमालपाशा स्मरना प्रांताचा गव्हरनर होता. त्यानें सदर प्रांतीं १३ वर्षे मोठ्या इभ्रतीनें काम करून मोठा लौकिक मिळविला होता. तो मोठा शहाणा, निःस्पृह, न्यायी, सुधारणाप्रिय, अनुभविक, पोक्त व नेमस्त होता. अशियामायनरमध्यें झालेल्या बंडाळीस केमाल पाशाची फूस असल्याचा सुलतानास

आदेश आल्यावरून त्यास अटक करण्याचा सुलतानानें गुप्त हुकूम सोडला होता. ही गुप्त बातमी केमाल पाशास लागून तो स्मरना येथें ब्रिटिशांच्या आश्रयास गेला. तेव्हां ब्रिटिश वकिलानें त्यास थारा देऊन ब्रिटिश सरकारची परवानगी मागितली. केमाल ब्रिटिशांच्या ताब्यांतील सायप्रस बेटांत जन्मला असल्यानें त्यास ब्रिटिश साम्राज्यांत नागरिकत्वाचा हक्क पोचतो, असा शास्त्रार्थ काढून तत्कालीन ब्रिटिश परराष्ट्र मंत्री सर एडवर्ड ग्रे यानें त्यास ठेवून घेण्यास कायदेशीर हरकत नसल्याचा निर्णय सांगितला. केमाल इंग्रजांच्या आश्रयास कांहीं दिवस राहिल्यावर सुलतानाची समक्ष गांठ घेऊन शहानिशा करून घेण्याकरितां जर्मन बोटींत बसून मोठ्या धीटपणानें कॉन्स्टांटिनोपल शहरीं सुलतानास भेटण्यास गेला. त्याच्या केसास धक्का लागणार नाहीं अशी ब्रिटिश वकिलानें हमी सुलतानापासून घेतली होती. केमाल यानें चुकीच्या व घातकी धोरणबद्दल सुलतानाची चांगली कानउघाडणी केली व राजक्रांतीच्या अखेरीपर्यंत स्वतः कॉन्स्टांटिनोपल शहरींच राहिला. केमालसारखा गुंडा मुख्य वजिरातीवर चढल्यामुळें सर्व पक्षांच्या लोकांस सारखाच आनंद वाटला. फार काय पण इंग्लंडचे राजे सप्तम एडवर्ड यांनीं त्यास अभिनंदनपर तार पाठविली. ६ आगस्ट १९०८ रोजीं या महत्पदावर नेमणूक होतांच त्यास नवीन प्रधानमंडळ बनविण्यास सुलतानानें सांगितलें. त्यानें राज्यक्रांतीस अनुकुल असलेला शेख उल् इस्लाम व परराष्ट्रमंत्री यां दोघांखेरीज बाकीचें सर्व मंत्रिमंडळ नवें नेमलें.

सुलतानाच्या अमदानींत तुर्की साम्राज्याची खुंटलेली प्रगति वाढूं द्यावयाची, तर त्याचा सर्व बाजूंनीं विचार करणें आवश्यक होतें. नवीन धर्तीवर कवाईत शिकलेलें शिस्तवार सैन्य व सुधारलेलें आरमार तुर्कस्थानापाशीं नव्हतें, म्हणून तुर्कांच्या साम्राज्याचा पुष्कळ अंशीं विध्वंस झाला. हें व्यंग दूर करण्याचें तरुण तुर्कांनीं प्रथम ठरविलें. त्याखेरीज हजारो मैल साध्या सडका व लोखंडी सडका बांधणें, मॉसेडोनिया व स्मरना या भागांतील पडीत जमीन फिरून लागवडीस आणणें, मेसापोटेमियांत कालवे सुरू करणें, नद्यांतून आगबोटी जातील एवढाले प्रवाह

रुंदावणें, इंजिनियरिंग कॉलेज काढणें व नाविक, औद्योगिक आणि व्यापारी कंपन्या स्थापणें अशीं कितीतरी लोकोपयोगी कार्यें त्यांस करा, वयाचीं होतीं. हीं महत्त्वाचीं कार्यें करण्याचें ज्ञान तुर्क अधिकाऱ्यांस नसल्यामुळें तरुण तुर्कांनीं युरोपियन राष्ट्रांपासून तज्ज्ञ मागविले. जमाखर्चाची व्यवस्था लावण्यास आणि करांचा महसूल कमी खर्चांत करण्यास त्यांनीं एम् लॉरेन्स नामक तज्ज्ञ फ्रान्समधून आणविला. त्याचप्रमाणें जकातीची व्यवस्था लावणारा क्राफर्ड त्यांस इंग्लंडपासून मिळाला. आरमाराची सुधारणा करणारे अधिकारीहि इंग्लंडपासूनच आले आणि कालव्याचीं कामें फ्रेंच इंजीनियरांवर सोपविण्याचें ठरलें.

तरुण तुर्कांनीं वरीलप्रमाणें कामास सुरुवात केली होती, तरी नव्या राज्यघटनेस धरून पार्लमेंटाची नवी निवडणूक अद्यापि व्हावयाची होती. तुर्की साम्राज्यांतील जनतेस निवडणूक हें एक मोठें गौडबंगाल असल्यानें निवणुकीचें महत्त्व व उपयुक्तता सर्वांस समजून सांगणें तरुण तुर्कांचें कर्तव्य होऊन बसलें. नागरिकांचीं कर्तव्यें, सदनशीर राज्यपद्धतीचें स्वरूप, प्रतिनिधि–सभेचें (चेंबर ऑफ डेप्युटीज)महत्त्व व तींत तरुण तुर्कांचें बहुमत करून घेण्याची आवश्यकता, या गोष्टी बहुजनसमाजास पटवून देण्याकरितां त्यांनीं देशभर दौरे काढले. आम्ही कर देतों त्यापासून आमचा फायदा नसून त्यावर कॉन्स्टांटिनोपलमधलि अधिकारी मात्र पुष्ट होतात, ही समजूत काढून टाकून राज्यपद्धति कोणतीहि असली तरी रयतेस कर हे भरावेच लागणार, मात्र या करांचा विनियोग सनदशीर व जबाबदार राज्यपद्धतींत रयतेच्या हिताकडे होत असतो, हें महत्तत्त्व तिच्या मनावर बिंबविणें तरुण तुर्कांस फार जड गेलें.

तरुण तुर्कांस प्रतिस्पर्धी असे दोन पक्ष होते. एक उदारपक्ष (लिबरल यूनियन) व दुसरा सुलतान पक्ष. याशिवाय ग्रीकांचा एक तृतीय पंथ होता, पण तो क्षुल्लक असल्यामुळें त्याची क्षिति बाळगण्याचें तरुण तुर्कपक्षास कारण नव्हतें. उदार पक्षांतील कांहीं पुढाऱ्यांचीं मतें तरुण तुर्कांस जुळतीं अशींच होतीं. परंतु तुर्कांस राज्यक्रांतींत यश आल्यापासून ते अरेरावीनें वागतात अशी त्यांची तक्रार होती. सुलता-

नापासून सनद मिळून तिची अमलबजावणी सुरू झाल्यावर तरुण तुर्कांच्या ऐक्य-प्रगति-संघाची गरजच उरलेली नाहीं, नवीन राज्यपद्धती-वर सुलतानपक्ष गंडांतर आणील असें वरकरणी लटकेंच ढोंग करून पण आंतून सत्तेचा अभिलाष बाळगून हा संघ उदारपक्षाच्या मतें जिवंत राखण्यांत येत होता. सदर पक्षांत मुसलमान व ख्रिस्ती सामिल होते. नवीन राज्यपद्धतीखालीं सर्व जातींस व धर्मांस सारखें वागविण्याचें ठरलें असलें, तरी राज्यकारभार मुसलमानांच्याच बहुमताच्या ताब्यांत राहिला पाहिजे, ह्यावर तरुण तुर्कांचा मुख्य कटाक्ष होता. कारण तुर्की मुसलमानांऐवजीं ग्रीकांसारख्या ख्रिस्त्यांच्या हातीं कारभार गेल्यास ग्रीक लोकांस तुर्क साम्राज्याच्या हितापेक्षां कचित् प्रसंगीं ग्रीसचें हित साधणें श्रेयस्कर वाटण्याचा पुष्कळ संभव होता. ही आपत्ति टळावी व ज्यांत अधिक लोकसंख्या मुसलमानांची, त्या साम्राज्यानें निश्चित रहावें यासाठीं तरुण तुर्कांनीं वरील मार्गाचा अवलंब केला होता. तरुण तुर्कां-पेक्षां उदार पक्षाचें धोरण ग्रीक व ख्रिस्त्यांस पुष्कळच अनुकूल असल्यानें धनिक ग्रीकांकडून त्यांस द्रव्यबळ मिळालें. तुर्कस्थानचा कारकुनी कार-भार ग्रीकांकडे व शिपाईगिरी तुर्कांकडे अशी वहिवाट अनेक शतकें चालत आली आहे. या वहिवाटीस धरून ग्रीक लोक स्वतः संख्येनें थोडे असले तरी राज्यव्यवस्था सुरळीत चालण्यास आपलेंच बहुमत सर्वत्र पाहिजे असें म्हणत होते. या दोघांशिवाय सुलतानाचा तिसरा पक्ष होता. या पक्षांत सुलतानांच्या कृपेवर पोसले जाणारे व नव्या राजवटींत बडतर्फ झालेले लोक होते. या त्यांस नवीन राज्यपद्धती-पेक्षां जुन्या राज्यपद्धतीखालींच चैन मारतां येणार असल्यानें ते तरुण तुर्कांची नालस्ती करण्यास टपले होते. त्यांनीं जुनें राज्य एकट्या मुसलमानांचें होतें व नवें राज्य ख्रिस्ती, यहुदी व मुसलमान यांचें होणार असल्याचा बोभाटा करून मुसलमानांचीं मनें बिथरविण्याचा यत्न केला. तथापि या सर्वांस टक्कर देऊन अखेर तरुण पक्षच निवडणुकींत विजयी झाला.

नवें पार्लमेंट ता. १७ डिसेंबर १९०८ रोजीं सुलतान अबदुल

हमीद यानें उघडलें. त्यापूर्वी थोडे दिवस तरुण तुर्क व सुलतान यांचे दरम्यान बेबनाव होण्यासारखीं कारणें घडलीं. केमालपाशाचें उदारपक्षाशीं (लिबरल युनियन) सूत होतें हें तरुण तुर्कांस आवडलें नाहीं. कमिटीनें आणीबाणीच्या प्रसंगीं हुकुमी मदत मिळावी म्हणून ज्याच्या जीवावर राजक्रांति घडवून आणिली तें मॅसिडोनियांतील सैन्य कान्स्टांटिनोपलास हाताशीं आणून ठेवलें होतें. तें सैन्य केमालनें मॅसिडोनियांत लष्करी कामगिरीवर परत पाठविलें; तसेंच तरुण तुर्कांनीं नेमलेले युद्ध व आरमार मंत्री ऐक्य–प्रगति-संघाचा सल्ला न घेतां काढून टाकले.केमालचें हें धोरण तरुण तुर्कांस पसंत न पडून त्यांनीं केमालपाशास राजिनामा देण्यास लावलें.

राजक्रान्तीची छोटी आवृत्ति.

केमालचा राजिनामा संघाच्या मुळावर आला.केमालपाशा सर्व पक्षांस सारखाच प्रिय व आदरणीय होता. उदारपक्षाशीं त्याचें सख्य असल्यामुळें तो पक्ष तुर्कांवर चिडला. केमाल इंग्रजांचा दोस्त असल्यामुळें ब्रिटिश सरकार तुर्कांवर रुष्ट झालें. उदारपक्ष व सुलतान पक्ष यांस हें आयतेंच शस्त्र सांपडून तरुण पक्षाविरुद्ध शत्रू उठविणें फार सोपें गेलें. याच सुमारास बोस्निया व हर्जिगोविना हे तुर्की साम्राज्यांतील प्रांत ऑस्ट्रियानें आपल्या राज्यास जोडले, आणि बल्गेरियाचें स्वातंत्र्य तुर्क सरकारनें मान्य केलें. यामुळें तर आगींत तेल ओतल्याप्रमाणें झालें. नवें सरकार राज्य बुडविणारें व सर्व धर्मीयांचें म्हणून मुसलमानी धर्मदृष्ट्या धर्मलंड असल्याचा बभ्रा कच्या मुसलमानांस सहज करतां आला व तो रयतेस पटलाहि. या वेळीं राजधानींतील सैन्य तरुण तुर्कांस अनुकूल नव्हतें. तरुण तुर्कपक्ष देशबुडव्या आहे अशी समजूत होतांच तो पक्ष जमीनदोस्त करून सुलतानाची अनियंत्रित सत्ता स्थापित करण्यासाठीं कॉन्स्टांटिनोपलमधील सैन्य ता. १३ एप्रिल १९०९ रोजीं बंड करून उठलें. बंडांत वीस हजार सैनिक सामील झाले. संघास अनुकूल असलेले अधिकारी ते ठार करीत सुटले. त्यांनीं न्यायमंत्री नाझिमपाशा याचा खून केला. आरमारमंत्र्यास जखमी केलें, टॅनिनपत्राचा संपादक समजून अमरि महमद याचा प्राण घेतला, ऐक्य–प्रगति–संघाची कचेरी धुळीस मिळविली व त्याचप्रमाणें सुरा इ

उमेन व टॅनिन या पत्रांच्या कचेऱ्यांचीहि वाट लावली.संघाचें सैन्य मॅसिडोनियांत असल्यामुळें संघाच्या सभासदांस कान्स्टांटिनोपलमध्यें दडून बसणें किंवा जीव घेऊन पळ काढणें, याशिवाय तिसरा मार्ग मोकळा नव्हता. त्यांपैकीं बऱ्याच जणांनीं युरोपियन वस्तींत एका इंग्रज व्यापाऱ्याच्या घराचा आश्रय केला. अशा रीतीनें आठ घटकांपर्यंत तरी बंडवाल्यांस कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. दुसऱ्या दिवशीं राजधानीवर त्यांचा पूर्ण अंमल बसला. राज्यकारभार कुरणांतील आज्ञेबरहुकूम चालावा, नवीन सरकार उलथून पाडावें, संघाचा बीमोड करावा, केमालपाशाचे जागीं नेमलेला हिल्मी पाशा यास काढून टाकावें, युद्धमंत्री व आरमारमंत्री यांसहि अर्धचंद्र द्यावा, तरुणतुर्कपक्षाचें पत्र टॅनिन याच्या संपादकास कॉन्स्टांटिनोपलमधून हद्दपार करावें अशा बंडवाल्यांच्या सुलतानापाशीं मागण्या होत्या. त्या दिवशीं प्रतिनिधि सभेचे कांहीं उदारपक्षीय सभासद सभागृहांत जमले व कोरमचे सर्व नियम गुंडाळून ठेवून त्यांनीं केमालपाशास मुख्य वजीर नेमण्याचा ठराव पास केला व तो सुलतानास सांगितला. पण सुलतानानें मुख्य वजिराचे जागीं केमालची नेमणूक न करतां त्यूफिक पाशास त्याजागेवर आणि एधेम पाशास युद्धमंत्रिपदावर नेमलें. ता. १५ रोजीं नाजीम पाशास पहिल्या अक्षौहिणीचा सेनापति(कमॅन्डर ऑफ धि फर्स्ट आर्मी कोअर, व दुय्यम युद्धमंत्री नेमण्यांत आलें. याच इसमास गेल्या फेब्रुवारींत केमाल पाशानें युद्धमंत्री नेमल्यामुळें तें कृत्य तरुणतुर्क पक्षास न रुचून त्यानें केमालपाशास राजिनामा देण्यास लाविलें होतें. सुलतानानें केलेल्या या नेमणुकी शहाणपणाच्या व सामान्यतः सर्वमान्य होत्या; नाझीम उत्तम शिपाई व खरा उदारमतवादी होता. गेल्या दोन दिवसांत ज्यांनीं शहरांत प्राणहानि केली होती, त्या बंडवाल्यांस सुलतानानें माफी दिली; आणि त्यानंतर जे कोणी रस्त्यानें गोळीबार करतील त्यांस कडक शासन होईल, असा नाझीमनें हुकूम सोडला. बंडवाल्यांनीं अटकेंत ठेवलेले अधिकारी त्यानें सोडून दिले व अल्पावधींत सर्वत्र स्थिरस्थावर झालें.

नाझीमनें बंड मोडलें तरी तरुण तुर्कांचें वर्चस्व तेवढ्यानें प्रस्थापित होणार नव्हतें. नाझीम उदार पक्षाचा होता आणि याच पक्षाच्या

हातीं कांहीं दिवस सत्ता राहिली असती, तर धूर्त सुलतान अबदुल हमीद नवीन राज्यघटना धाब्यावर बसवून ती सत्ता फिरून बळकावण्यास चुकताना. तरुण तुर्कांस हे परिणाम ढळढळीत दिसत असल्यामुळें सैन्याच्या बळावर इस्तंबूल कबजांत घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांची सारी भिस्त, ज्याच्या जिवावर त्यांनीं राजक्रांति घडवून आणिली त्या मॅसिडोनियांतील सैन्यावर होती. हें सैन्य तरुण तुर्कांच्या धोरणाप्रमाणें कॉन्स्टांटिनोपलांत असतें तर शिपायांचें बंड खात्रीनें टळलें असतें. केमाल पाशाची ही चूक तरुण तुर्कांस भोंवली व तिच्या परिमार्जनार्थ त्यांनीं कंबर बांधली. केमालपाशास तरुण तुर्कपक्षाचें जड बूड नको असल्यामुळेंच त्यानें सैन्य हलविण्याची शक्कल काढली असली पाहिजे.

बंडाची बातमी मॅसिडोनियांत सॅलोनिका शहरीं समजतांच मुसलमान, ख्रिस्ती व यहुदी देशभक्त सैनिक कॉन्स्टांटिनोपलवर जाण्यास निघाले. जर्मन अंमलदारांच्या हाताखालीं उत्कृष्ट कवाइत शिकवून हें सैन्य जय्यत राखण्यांत आलें होतें. २२ एप्रिलपर्यंत या सैन्याची तीस हजारांपर्यंत जमवाजमव झाली. त्यांत कित्येक डोंगरी माणसेंहि होतीं. सेनापति महमद शौकत पाशा याजकडे सैन्याचें आधिपत्य होतें. हें सैन्य उत्तम स्थितींत होतें. त्याजबरोबर दवाखाने, तारायंत्र वगैरे सर्व आधुनिक युद्धोपयोगी साहित्य होतें सैन्यानें जमिनीवरून व आरमारानें समुद्रांतून कॉन्स्टांटिनोपलास वेढा दिला. २४व्या तारखेस तें मुख्य दरवाजानें शहरांत शिरलें. कांहीं ठिकाणीं बंडवाल्यांबरोबर त्यांची हातघाईची लढाई झाली; पण शत्रूचें त्याजपुढें कांहींच चाललें नाहीं. हजारों बंडखोरांस विजयी सैन्यानें अटक केली. पहिल्या अक्षौहिणीस बडतर्फ करून त्यास मॅसिडोनियांतील सडकांची दुरुस्ती करण्याची शिक्षा सुनावण्यांत आली. २७ एप्रिल रोजीं पार्लमेंटाची म्हणजे नॅशनल असेंब्लीची सभा भरून सुलतान अबदुल हमीद यास तिनें पदच्युत केलें व तख्तावर त्याचा भाऊ रशद अफंदी यास पांचवा महंमद हें नांव देऊन बसविलें.

प्रकरण ४ थें

तरुण तुर्क व महायुद्ध

इतालियन युद्ध, बाल्कन युद्ध व महायुद्ध यांचे दुव्रे एकमेकांत कसे आडकले आहेत तें पुढील हकीकतीवरून वाचकांचे लक्षांत येईल. इतालियन युद्ध व बाल्कन युद्ध ही महायुद्धाची नांदीच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून त्यांचा समावेश महायुद्धाच्या सदराखालींच केला आहे.

इतालियन युद्ध

कॉन्स्टांटिनोपलमधील पहिल्या अक्षौहिणीनें केलेलें बंड तुरुण तुर्क पक्षानें मॅसिडोनियांतील सैन्याच्या मदतीनें मोडलें; आणि तरुण तुर्कांचें आसन नीट स्थिर होण्याच्या बेतांत आलें. परंतु त्यांस विसावा मिळूं देऊन त्यांची सत्ता खंबीर होऊं द्यावयाची नाहीं, असा युरोपियन राष्ट्रांनीं जणूं काय विडाच उचलला होता. आतांपर्यंत तुर्कांस कैक युरोपियन राष्ट्रांशीं दोन हात करण्याचे प्रसंग आले होते. तथापि त्यांत इतालीची व तुर्कस्थानची गांठ मुळींच पडली नव्हती. याचें कारणहि उघडच होतें. आस्ट्रियाच्या मगरमिठींतून इताली मुक्त असा १८७० तच झाला. त्यानंतर थोड्याच दिवसांत मॅझिनीच्या स्वातंत्र्याच्या उदात्त कल्पनास तिलांजलि देऊन व इंग्लंड, फ्रान्स आदिकरून बड्या युरोपियन राष्ट्रांचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेऊन त्यांजप्रमाणें आपलेंहि साम्राज्य स्थापन करून वाढवावें अशी इतालीस इच्छा झाली. इतालीस वसाहतीच्या रूपानें आपलें साम्राज्य वाढविण्यास सोपें व नजीकचें ठिकाण म्हणजे आफ्रिका खंड होय. पूर्व आफ्रिकेंतील सोमालीलँडमध्यें इतालीनें ठाणें दिलें व त्यानंतर भूमध्यसमुद्राच्या पूर्व किनाऱ्यावरील ट्यूनिस घेण्याचा तिचा बेत होता, तोंच फ्रान्सनें झडप घालून तो प्रांत गट्ट गेला.

ट्युनिसची हेरलेली शिकार सुटल्यावर इतालीस तुर्कस्थानचा आफ्रिकेंतील त्रिपोली प्रांत बेवारशी वाटला व त्यावर तिनें शिष्टाचार

गुंडाळून ठेऊन राजरोस दरोडा घातला. इतालीस आपलें आरमार व आकाशदळ यांची मोठी घमेंड होती. त्यांच्या मदतीनें १९११ च्या सप्टेंबर महिन्यांत ८० हजार इतालियन सैन्य त्रिपोलीच्या किनाऱ्यावर उतरलें. या वेळीं तरुण तुर्कांचें देवच मुळीं देवाऱ्यांत नसल्यानें या नवीन परचक्रापासून तुर्क त्रिपोलीचें रक्षण काय करूं शकणार ! तथापि त्यांनीं शक्य तेवढें सैन्य त्रिपोलींत पाठवून तेथील अरब रहिवाश्यांस आधार दिला. आरब व तुर्क या जोडगोळीनें एवढ्या तोऱ्यानें आलेल्या बलाढ्य इतालियन सैन्यास किनाऱ्यावरच आडवून धरलें. कॉन्टांटिनोपलच्या बाजूस तुर्कांवर चढाई केल्यानें बाल्कन राष्ट्रांतील मत्सराग्नि पेट घेईल व ती आग भडकत भडकत सर्व युरोपभर पसरेल अशी इटालीसहि भीति वाटत होती व म्हणूनच ऑस्ट्रियाशीं तशा अर्थाचा करार करून इतालीनें आपलें सैन्य परभारें आफ्रिकेच्या किनाऱ्यावरच उतरविलें. पण तें त्या ठिकाणीं कित्येक महिने माशा मारीत बसलें, तरी काडीमात्रहि पाऊल पुढें पडेना असें दृष्टोत्पत्तीस आल्यामुळें इटालीनें आपला मूळचा बेत बदलला आणि एजियन समुद्रांतील तुर्कांचीं आकरा बेटें घेतलीं आणि दार्दानेलिसच्या सामुद्रधुनीवर तोफांचे गोळे सोडले. इतालियन आरमार सामुद्रधुनींतून आंत घुसून कॉन्स्टांटिनोपलास शह देईल अशी तुर्कांस सहजच काळजी पडली व तत्क्षणीं त्यांनीं सामुद्रधुनीचें दार लावून घेतलें. त्याबरोबर इंग्लंडांतील व्यापारी जहाजांचें सामुद्रधुनींतून जाणें येणें तावडतोब खुटलें व इंग्रज व्यापाऱ्यांनीं ब्रिटिश सरकारचें डोकें उठविलें. असें व्हावें यासाठींच इतालीनें हा पेंच तुर्कस्थानास बुद्ध्याच घातला होता. इंग्लंडसारख्या बड्या राष्ट्रांस आपली लढाई नडूं लागली म्हणून तीं मध्यस्ती करून तंटा मिटवितील व त्रिपोली आपल्या पचनीं पडेल अशी इतालीची अटकळ होती.पण ती यावेळीं खरी ठरली नाहीं.ही मात्रा लागू पडत नाहीं असें दिसतांच इतालियन मुत्सद्यांनीं नव्याच मात्रेचे वळसे उगाळले.

तरुणतुर्कांच्या ऐक्य–प्रगति–संघानें आपलें बंड मॅसिडोनियांत शिजवून मागें राज्यक्रान्ति शेवटास नेली, हें वाचकांस माहितच आहे. मॅसिडोनियांत ग्रीक, बल्गेरियन व सार्व्हियन या तिन्ही जातींचे रहि-

व्याशी होते. नायझीबेच्या अक्कलहुशारीनें ते तरुण तुर्कपक्षाचे पाठी-राखे झालेले अल्पकाळ दृष्टीस पडले तरी सभोंवार त्यांच्या जातभाई राष्ट्रांचा गराडा पडत असल्यामुळें त्यांची छाप फिरून त्यांजवर बसण्यास विलंब लागला नाहीं. ग्रीस, बल्गेरिया व सर्व्हिया यांच्या चिथावणीवरून मॅसिडोनियानें तुर्कांविरुद्ध आतां बंड केलें. तुर्कांच्या जाचांतून आपल्या जातभाईंस सोडविण्याचा बहाणा करून व तुर्कांस इतालीनें ग्रासून सोडला असल्याची संधि साधून या तिन्ही राष्ट्रांनीं १५ आक्टोबर १९१२रोजीं तुर्कांविरुद्ध युद्ध पुकारलें व त्यांस मांटिनिग्रोहि येऊन मिळाला. बाल्कन राष्ट्राच्या या काव्यास इतालीचेंहि अंग असलें पाहिजे हें सांगावयास नकोच. हें नवें संकट पहिल्या संकटाहून फारच मोठें व भयप्रद होतें. तें दत्त म्हणून उभें राहतांच त्याच तारखेस यूशी येथें इतालीशीं तह करून तुर्कस्थानानें इतालीच्या हातावर त्रिपोलीचें उदक सोडलें.

तरुण तुर्कांचें दौर्बल्य इतालियन युद्धानें उघडें पडलें.त्याचा परिणाम असा झाला कीं, जीं छोटीं छोटीं बाल्कन राष्ट्रें पांचशें वर्षेंपर्यंत तुर्कांनीं अडकविलेल्या शृंखला भूषण मानून खुळखुळवीत होतीं व ज्यांनीं मोठ्या युरोपियन राष्ट्रांच्या मदतीनें भूषण म्हणून मानलेल्या शृंखला तोडून टाकल्यास पुरतें पावशतकहि लोटलें नव्हतें, त्या बाल्कन राष्ट्रांनीं तुर्कांपुढें नाक खाजवून त्याला हिणावण्याची ही संधि वाया जाऊं दिली नाहीं. बाल्कन राष्ट्रांचें एकमेकाशीं मोठेसें रहस्य होतें असें नाहीं. परंतु तुर्कांपासून आणखी मुलूख लुबाडण्यांत सर्वांचा सारखाच स्वार्थ साधणार असल्यामुळें त्यांचें सख्य जुळून आलें.मॅसिडोनिया व आल्बानिया हे दोन प्रांत मांटिनिग्रो, सर्व्हिया, बल्गेरिया,ग्रीस यांच्या लगत्यास असून ते अद्यापपर्यंत तुर्कांच्याच छत्राखालीं होते. तरुण तुर्कांचें वजन याच प्रांतांत होतें. परंतु त्यांत मुसलमानांप्रमाणेंच ग्रीक, सर्व्हियन व बल्गेरियन लोकांची वस्ती असल्यानें ते आपल्या जातभाईंस केव्हां मिळतील याचा नेम नव्हता. त्याप्रमाणें आल्बानियानें बंड केलें होतें, व मॅसिडोनियांतहि अस्वस्थता माजून राहिली होती. मांटिनिग्रो, ग्रीस व बल्गेरिया यांस समुद्रकिनारा होता. पण तो एकट्या सर्व्हियास नसल्यामुळें त्याचा आल्बानियावर

डोळा होता. तुर्काशीं युद्ध पुकारण्यापूर्वी सर्व्हिया व बल्गेरिया यांजमध्यें अशा प्रकारचे गुप्त करारमदारहि झाले होते. मॅसिडोनिया, प्रांत बल्गेरिया व ग्रीस यांत वाटला जावयाचा आणि मांटिनिग्रोच्या वाट्यास आल्बानियाचा कांहीं भाग यावयाचा असाहि अंदाज होता. आधीं तुर्कांस जिंकून हे दोन्ही प्रांत तर हस्तगत करावे आणि मग त्यांच्या वाटणीचा विचार पहावा असें या चारी राष्ट्रांनीं ठरविलें. या कटास बाल्कन संघ असें नांव असून त्यापासून बाल्कन राष्ट्रांपैकीं एकटा रुमानिया काय तो अलिप्त राहिला होता.

वरील चार राष्ट्रांतील प्रत्येक राष्ट्रानें आपल्या लगत्याच्या तुर्की मुलुखांत घुसण्याचें ठरविलें. सर्व्हियन व मांटेनिग्रन सैन्य आल्बानियांत, ग्रीक सैन्य मॅसिडोनियांत आणि बल्गेरियन सैन्य आद्रियानोपल व कान्स्टांटिनोपल यांच्या रोखानें थ्रेसमध्यें शिरलें. युद्ध चारच आठवडे चाललें, पण तेवढ्या अवकाशांत चार राष्ट्रांनीं चौफेर चाल करून एकट्या तुर्की सेनेची पांचावर धारण बसविली. ग्रीक लोक जयावर जय मिळवीत युवराज कॉन्स्टंटाईन यासह मॅसिडोनियांतील सॅलोनिका बंदरांत आले. सर्व्हियनांनीं कुमानोव्हो येथें जय मिळविला. बल्गेरियाचें सैन्य सर्वांत मोठें होतें. त्यानें कर्ककिलीसी व लुलबुर्गास या दोन ठिकाणीं लढाई करून तुर्कांच्या सैन्याचा फार मोठा पराभव केला. लुलबुर्गासच्या लढाईत उभय पक्षांचें मिळून ३॥ लाख सैन्य लढत होतें. तीन दिवस खडाजंगी युद्ध होऊन तुर्कांचा चुराडा उडाला. युद्धास प्रारंभ १५ आक्टोबर रोजीं झाला. पण नोव्हेंबर महिना पुरता निम्माही लोटला नाहीं तोंच बल्गेरियन सैन्य चटलजाच्या तटबंदीच्या ओळींपाशीं ठेपलें. येथून कॉन्स्टांटिनोपल अवघें पंचवीस मैल राहिलें. थ्रेस, मॅसिडोनिया व आल्लबानिया या पूर्व–पश्चिम प्रांतांत तुर्कांच्या ताब्यांत थ्रेसमधील आद्रियानोपल आणि आल्बानियांत स्कुटारी व जानीना हीं तीनच कायतीं मोठीं शहरें उरलीं.

डिसेंबर १९१२ मध्यें लंडन शहरीं तहपरिषद भरली. तिच्यांत आल्बानिया व मॅसिडोनिया यांशिवाय बल्गेरियानें स्वत:करितां आद्रिया-

नोपलचीहि मागणी केली. परंतु इतका प्रदेश सोडून जिकीरीस आलेल्या तुर्कांनीं आद्रियानोपल देण्याचें साफ नाकारलें. कॉन्स्टांटिनोपलपूर्वीं आद्रियानोपल हीच तुर्कांची राजधानी होती. या दृष्टीनें तुर्कास आद्रियानोपल सोडण्यांत एक प्रकारें मानहानीहि वाटल्यास नवल नाहीं. यामुळें लंडन परिषदेचें काम अर्धवटच थांबून पुढच्या वर्षाच्या मार्च महिन्यांत युद्धास फिरून तोंड लागलें. तुर्कांचे उरलेले किल्ले एकामागून एक शत्रूंनीं पाडाव केले. मार्च महिन्याच्या ५ व्या तारखेस जानीना, २३ तारखेस स्कुटारी व २६ व्या तारखेस आद्रियानोपल गेलें. सरते शेवटीं ता. ३० मे रोजीं लंडन शहरीं तहपरिषद पुन्हां भरून एजियन समुद्रावरील इनासपासून काळ्या समुद्रावरील मिडियापर्यंत एक रेषा ओढली असतां पश्चिमेचा जेवढा मुलख रहातो, तेवढ्या मुलुखास तुर्कस्थान मुकला. यांत अर्थात्च आद्रियानोपलहि बल्गेरियास मिळालेंच. फक्त आद्रियातिक समुद्रावरील सर्व्हियाच्या पापी नजरेखालचा आल्बानियाचा मोघम तुकडा तुर्कांकडे शिल्लक राहिला. क्रीटबेट बड्या राष्ट्रांनीं प्रथम आपल्या ताब्यांत घेतलें पण मागाहून तें ग्रीकांस मिळालें. एजियन समुद्रांतील जीं बेटें युद्धांत ग्रीसनें तुर्कांपासून घेतलीं होतीं, त्यांचा निर्णय बड्या राष्ट्रांनीं सांगावा असें ठरलें.

लंडनच्या तहानें बाल्कनराष्ट्रें व तुर्कस्थान यांच राष्ट्रांनीं लढाई थांबली खरी, पण तत्क्षणीं ती बाल्कन राष्ट्रांतच सुरू झाली. तुर्कांचा सबंध मॅसिडोनिया व थ्रेसचा बराच मोठा भाग सदरील तहानें बाल्कन राष्ट्रांनीं घेतला, तसा आल्बानिया त्यांस घेतां आला नसता असें नाहीं. पूर्वसंकेताप्रमाणें आल्बानिया सर्व्हियास मिळावयाचा होता. सर्व्हियास आद्रियातिक समुद्रावर आपल्या शेजारीं किनारा मिळणें ऑस्ट्रिया व इताली या बडया राष्ट्रांस मनांतून नको होतें. म्हणून बाल्कन राष्ट्रांत आल्बानिया वाटून देण्यापेक्षां तो वेगळा राखून त्याचें स्वतंत्र राज्य बनवावें असा उभयतांचा बेत होता. ऑस्ट्रियाच्या राज्यांत सर्व्हियन लोक पुष्कळ होते. ऑस्ट्रियाच्या शेजारीं सर्व्हियास आद्रियातिक किनारा मिळून त्याचें माहात्म्य वाढलेलें त्याच्या दृष्टीस पडल्यानें ऑस्ट्रियापासून सुटून सर्व्हियांत सामील होण्याची वासना त्यांस होईल अशीहि ऑस्ट्रियास भीति

वाटत असावी. त्याखेरीज, सर्व्हिया हा रशियाचा पित्त्या असल्यानें नव्या किनाऱ्याचा उपयोग ऑस्ट्रियाचा प्रतिस्पर्धी रशिया करावयास चुकताना.

किनारा नाहीं तर नाहीं; पण त्याच्या मोबदला मॅसिडोनियाचा अधिक भाग आपणांस मिळावा अशी कुरकुर सर्व्हियानें बल्गेरियापाशीं सुरू केली. पण सर्व्हियाकारितां बल्गेरिया काय म्हणून स्वतःचें नुकसान करून घेईल ? आमचें सैन्य मोठें व युद्धांत आम्ही जयाहि मोठे मिळविले असें बल्गेरियाचें म्हणणें ! आपण सैन्याच्या बळावर सर्व्हिया व ग्रीस यांस सहज खडे चारूं अशी बल्गेरियास घमेंड; व त्या घमेंडींत त्यानें १९१३ च्या अखेर ग्रीस व सर्व्हिया यांवर एकदम स्वारी केली.

साऱ्या बाल्कन राष्ट्रांत छोटयांत मोठें राष्ट्र रुमानियाचें. रुमानिया आतांपर्यंत दुरून मौज पहात होता. रुमानियाच्या खालोखाल बल्गेरिया हे दुसरें मोठें राष्ट्र होय. ग्रीस व सर्व्हिया यांस लुबाडून बल्गेरिया पुष्ट होणें रुमानियास भयप्रद होतें. बल्गेरियानें आपला वायव्य कोपरा आपणास द्यावा म्हणजे आपण त्याच्या वाटेस जाणार नाहीं व बाल्कनमधील प्रतिस्पर्धी राष्ट्रें तुल्यबळ रहातील असा रुमानियाचा युक्तिवाद पुढें आला. बल्गेरियानें रुमानियासहि धाब्यावर बसविलें. तेव्हां रुमानियाहि दंगलींत सामील झाला. इतकेंच नव्हे तर या लाटेंत आपलाहि हात जमल्यास धुवून घ्यावा या आशेनें तुर्कस्थानाहि बल्गेरियावर उठला. अशा रीतीनें ज्या बल्गेरियास आपलें बूड ग्रीस व सर्व्हिया यांजपुढें जड वाटत होतें त्याजवर रुमानिया व तुर्कस्थान याहि राष्ट्रांनीं तलवार उपसतांच त्याचेंच धाबें दणाणलें. कसाबसा अर्धा जुलई महिना त्यानें दम धरला आणि शेवटीं आपले उपाय हरले अशी खात्री झाल्यावर १० आगष्ट १९१३ रोजीं त्यानें रुमानियाची राजधानी बुखारेस्ट येथें तह केला. त्यांत सर्व्हिया व ग्रीस यांस त्यांच्या अटकळीपलीकडे मुलूख मिळाला. रुमानियास बल्गेरियाचा वायव्य कोपरा घ्यावयास सांपडला. तुर्कस्थानानें आद्रियानोपल व त्या सभोंवतालचा बराच मुलूख पुन्हा कमावला आणि बल्गेरियाला चांगलीच अद्दल घडून सारेंच पारडें फिरलें. या तहापासून तो सारखा

बोटें मोडीत बसला व त्याचेंच पर्यवसान शेवटीं नाजिक वाढून ठेवलेल्या महायुद्धांत झालें.

या दोन युद्धांत मिळून बल्गेरिया व तुर्कस्थान यांचे प्रत्येकीं १॥ लाख माणूस गारद झालें. सर्व्हिया व ग्रीस यांचे ७० हजार आणि मांटिनिग्रोचें १० हजारापर्यंत नुकसान झालें. तुर्की साम्राज्यावर पुष्ट होऊन मांटिनिग्रो, ग्रीस व सर्व्हिया यांचा दुप्पट विस्तार वाढला. बल्गेरिया व रुमानिया हे फोफावले आणि तुर्की साम्राज्याच्या नाड्या युरोपांत निखालस आखडल्या गेल्या.

महायुद्धाचीं कारणें.

बुखारेस्टचा तह ता. १० ऑगष्ट १९१३ रोजीं झाला. सर्व्हियास समुद्राचा तजेलदार वारा लागूं नये म्हणून आस्ट्रिया व हंगेरी यांनीं बोस्निया व हर्जिगोविना हे प्रांत सर्व्हियास मिळण्याच्या आधींच १९०८ मध्यें तुर्कस्थानापासून घेऊन आपल्या राज्यास जोडले. त्यानंतर बाल्कन युद्धांत आल्बानिया सर्व्हियास मिळण्याचा संभव उद्भवला. त्या वेळीं आल्बानियाचें स्वतंत्र राज्य निर्माण करून ऑस्ट्रियानें तोहि प्रसंग टाळला. तथापि सदर युद्ध उदरीं येऊन सर्व्हिया दुप्पट झाला, हेंहि आस्ट्रियास पाहावलें नाहीं. बुखारेस्टच्या तहापासून ही गोष्ट आस्ट्रियाच्या मनांत डांचतच होती; व कांहीं तरी निमित्त काढून सर्व्हियानें गिळलेला मुलूख त्याजपासून उपटावा या हेतूनें सर्व्हियावर स्वारी करण्याकरितां ऑस्ट्रियानें इतालीपाशीं मदत मागितली. आस्ट्रिया-हंगेरी, इताली व जर्मनी या त्रिकूटाचे परस्परांशीं एकमेकांस साहाय्य करण्याचे करारमदार पूर्वींच झाले होते. परंतु सर्व्हियाशीं उकरून काढावयाचें युद्ध आत्मसंरक्षणार्थ नसल्यामुळें इतालीचा त्यास रुकार पडेना. वास्तविक सर्व्हियास चिरडून टाकण्यास ऑस्ट्रिया पुरून उरण्याजोगा होता. परंतु सर्व्हियास धक्का लावला कीं, त्याचा स्लाव्ह कैवारी रशिया चमकणार हें ठरल्यासारखेंच होतें. यामुळें आस्ट्रियास इतालीच्या मदतीची याचना करावी लागली होती.

आस्ट्रियाचा मनोरथ अशा रीतीनें तात्पुरता विफळ ठरला. तरी

पण त्यानंतर सुमारें एक वर्षानें ऑस्ट्रियाच्या राजघराण्यावर एक संकट गुदरलें व त्यानंतर आपला भाग्योदय होईल अशी ऑस्ट्रियास बळकट आशा वाटली. २८ जून १९१४ रोजीं ऑस्ट्रियन बादशाहाचा पुतण्या व गादीचा वारस आर्चडयूक फ्रॅन्सिस फर्डिनांड बोस्नियाची राजधानी साराजिव्हो येथें सपत्निक मारला गेला. ज्यांनीं हें घोर कृत्य केलें ते बोस्नियाचे रहिवाशी, ऑस्ट्रियाचे प्रजाजन पण जातीचे सर्व्हियन होते. यामुळें खुनाचें खापर ऑस्ट्रियानें सर्व्हियाच्याच माथीं फोडलें. ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांचा परस्पर संबंध लक्षांत घेतां, ऑस्ट्रियानें सर्व्हियास जबाबदार धरलें, यांत नवल नाहीं. खुनानंतर चार आठवडे ऑस्ट्रियानें मुळींच हालचाल केली नाहीं. यावरून हें प्रकरण विशेष पेटणार नाहीं अशी आशा वाटत होती. परंतु ती लवकरच निराधार ठरून ता. २३ जुलईस ऑस्ट्रियानें सर्व्हियास खलिता पाठविला. सदर खलित्यांत पुढीलप्रमाणें अटी घालण्यांत आल्या होत्या. ऑस्ट्रिया-हंगेरीविरुद्ध सध्यां सर्व्हियांत चळवळ सुरू आहे तिचा सर्व्हियानें निषेध करावा, या चळवळीशीं सर्व्हियन अधिकाऱ्यांचा संबंध असल्याकारणानें त्याबद्दल सर्व्हियानें खेद प्रदर्शित करावा, कटांचा शोध लावून कटवाल्यांचें पारिपत्य करावें व वर्तमानपत्रांवरहि जरब बसवावी. ऑस्ट्रो-हंगेरियन राजघराण्याविषयीं द्वेष उत्पन्न होईल अशा प्रकारचे धडे शाळांतील क्रमिक पुस्तकांतून काढून टाकावे. तसेंच खुनाचा कट उघडकीस आणण्याचें कामीं सर्व्हियानें ऑस्ट्रियन सरकारची मदत घ्यावी. खुनाची तयारी सर्व्हियांत झाली होती व तींत सर्व्हियन अधिकाऱ्यांचें अंग होतें असेंहि खलित्याच्या अखेरीस स्पष्ट विधान होतें.

खलित्यांतील वरील मजकुरावरून तो निर्वाणीचा व सर्व्हियास युद्धार्थ आव्हान करणारा होता याविषयीं संशयच उरत नाहीं. उत्तरास फक्त ४८ तासांची मुदत देण्यांत आली होती. इंग्लंड, फ्रान्स व रशिया या प्रमुख राष्ट्रांनीं खलित्याचा पूर्ण विचार होण्यास ही मुदत पुरेशी नसल्यामुळें ती वाढविण्यांत यावी अशी सर्व्हियाच्या वतीनें ऑस्ट्रियापाशीं रदबदली करून पाहिली पण ती निरुपयोगी ठरली. तेव्हां ऑस्ट्रिया ऐकत नाहीं

तर सर्व्हियानें तरी नमतें घ्यावें असा त्यांस सल्ला देण्यांत आला.सर्व्हियानें ऑस्ट्रियाच्या बऱ्याच मागण्या कबूल केल्या आणि तेवढ्यानें ऑस्ट्रियाचें समाधान होत नसल्यास हा प्रश्न तिऱ्हाईत अशा हेग परिषदेपुढें ठेवण्याचीहि तयारी त्यानें दर्शविली; पण सर्व्हियाच्या उत्तरानें ऑस्ट्रियाचें समाधान झालें नाहीं व युद्धाची परिस्थिति उद्भवली.

सर्व्हियाविरुद्ध लढाईसाठीं कंबर बांधल्यास त्याचे परिणाम कोठवर जाऊन पोचतील याची कल्पना ऑस्ट्रियास नसेल असें नाहीं. परंतु राजपुत्राच्या वधानें चवताळल्यामुळें म्हणा किंवा कांहींतरी कुरापत काढून सगळ्या युरोपचें होमकुंड पेटविण्यास ऑस्ट्रियास जर्मनीची चिथावणूक असल्यामुळें म्हणा, ऑस्ट्रिया युद्धास उभा ठाकला. सर्व्हिया आदिकरून बाल्कन राष्ट्रें हीं स्लाव्ह राष्ट्रें होत. रशिया त्यांचा धुरीण समजला जातो. सर्व्हियावर ऑस्ट्रिया उठला कीं, रशिया सर्व्हियाच्या संरक्षणार्थ युद्धांत उडी घेणार हें ठरल्यासारखेंच होतें. आणि ऑस्ट्रियाच्या पाठीशीं जर्मनी होता.ऑस्ट्रियानें सर्व्हियाविरुद्ध युद्ध पुकारतांच रशियानें आपल्या सैन्याची जमवाजमव सुरू केली; आणि हें प्रकरण विकोपास जाऊं न देतां प्रारंभींच विझवितां आल्यास पहावें, यासाठीं जर्मनी, रशिया, फ्रान्स, इंग्लंड इताली या तिऱ्हाईत अशा प्रमुख राष्ट्रांची लंडनशहरीं परिषद भरवावी असा ब्रिटिश मुत्सद्यांनीं बूट काढला. पण जर्मनीचें म्हणणें वेगळेंच पडलें. हा तंटा सर्व्हिया व ऑस्ट्रिया यांजमधील असल्यानें त्यांचा शेवट त्यांचा त्यांनींच लावावा,इतर राष्ट्रांनीं त्यांच्या कारभारांत पडण्याचें कारण नाहीं असा जर्मनीनें आग्रह धरला. रशियानेंहि सर्व्हियाची बाजू घेऊं नये याबद्दल त्याचेंहि मन वळविण्याचा जर्मनीकडून प्रयत्न झाला. परंतु बाल्कन प्रश्न आपल्या मर्जीप्रमाणें सुटला पाहिजे असें म्हणण्यास आपणास पिढिजाद हक्क पोचतो हा रशियाचा युक्तिवाद नडला.

महायुद्धास सुरुवात

अशा रीतीनें भिन्न भिन्न राष्ट्रांच्या हितसंबंधांचा तिढा बसून परिषदेचा बेत फसला व ऑस्ट्रियानें खुनानंतर बरोबर एक महिन्यानें २८ जुलई रोजीं सर्व्हियाविरुद्ध युद्ध पुकारलें. रशियानें आपलें सैन्य जमविलें. रशियाची युद्धाची तयारी दिसतांच जर्मनीनें त्यास २८ जुलईस

निर्वाणीचा खलिता पाठविला. त्याचें रशियाकडून उत्तर न आल्यामुळें जर्मनीनें ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तारखेस रशियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें. ऑस्ट्रिया व जर्मनी यांजमधील तहास धरूनच ही गोष्ट झाली. रशियाचा जो शत्रु तोच फ्रान्सचाहि शत्रु अशी परस्परांतलि तहनाम्यानें स्थिति निर्माण केली असल्यामुळें जर्मनी हा फ्रान्सचा उघडपणें शत्रु ठरला. आरमार, व्यापार व वसाहती यांच्या विस्तारानें जर्मनीच्या वाढत्या सामर्थ्याची इंग्लंडास धास्ती पडली असल्यानें या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यास कधींतरी तोंड देण्याचा प्रसंग येईल अशी अटकळ बांधून इंग्लंडानें फ्रान्स व रशिया यांजबरोबर आगाऊच दोस्ती जमविली होती व फ्रान्सबरोबर १९०४ सालीं आणि रशियाबरोबर १९०७ सालीं तह करून स्नेहग्रंथि घट्ट आवळली होती. या त्रिकुटापैकीं सर्वांचा हितसंबंध असल्यास सर्वांनीं एक व्हावें अशीहि तहांत सोडवणूक होती. तथापि या प्रसंगीं जर्मनीस व ऑस्ट्रियास चिरडून टाकण्यांत सर्वांचें हित असल्याचें ठरून इंग्लंडहि युद्धांत सामिल झालें. इंग्लड अलिप्त राहून युद्ध पेटलें तर उरलेल्या राष्ट्रांत जर्मनीच वरचढ ठरून फ्रान्स जर्मनीच्या सहज भक्षस्थानीं पडला असता आणि जर्मनीनें पश्चिमेस फ्रान्स व पूर्वेस बगदादपर्यंत आपलें पाय पसरणें म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या दफनाची तयारी करणें होय असा त्याचा सरळ अर्थ असल्याकारणानें आपणावर युद्ध ओढवून घेणें इंग्लंडास क्रमप्राप्तच होतें.

युद्ध क्षेत्राची व्याप्ति व त्याचे दूरवरील परिणाम जर्मनी ओळखून होता. युद्धांत केवढीहि महान् राष्ट्रें गुंतलीं तरी एकट्या फ्रान्स देशास पादाक्रांत करून तो मुलूख डोव्हर सामुद्रधुनीपर्यंत पहिल्या झटक्यास आपल्या राज्यास जोडला कीं,यश:श्री आपणासच माळ घालणार अशी जर्मनीची खात्री होती. त्यानें इंग्लंड युद्धापासून अलिप्त रहावें यासाठीं प्रथमतः प्रयत्नाची शिकस्त करून पाहिली.आणि इंग्लंड ही मसलत साधूं देत नाहीं असें सिद्ध झाल्यावर जर्मनीनें फ्रान्सवर एकाएकीं जाऊन पडण्याचें ठरविलें. जर्मनींतून फ्रान्सांत शिरण्याचा जवळचा मार्ग एकट्या बेल्जममधूनच होता. फ्रान्स, जर्मनी, व हॉलंड यांच्या चिमट्यांतील बेल्जम, फ्रान्स, जर्मनी, बेल्जम व

हॉलंड यांच्या चौकटींतील लक्झेंबर्ग आणि फ्रान्स, इताली, आस्ट्रिया व जर्मनी यांच्या सांध्यांतील स्वित्झरलंड हीं राज्यें आन्तरराष्ट्रीय कानूनीं तटस्थ ठरविलीं असून या योजनेस इंलंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रिया व रशिया या प्रमुख राष्ट्रांची संमतिहि मिळाली होती. प्रमुख राष्ट्रांस एकमेकांवर अचानक स्वाऱ्या करावयास सांपडूं नये, यासाठींच ही युक्ति योजलेली होती. परंतु जें राष्ट्र युद्धार्थ सर्वस्वाची होळी करण्यास सिद्ध झालें, त्यास हीं बारीक बंधनें कोठवर आडवून ठेवूं शकणार !

बेल्जममध्यें प्रवेश

जर्मनीनें प्रथम सामोपचारानें बेल्जमपाशीं वाट मागितली. पण बेल्जमानें ती देण्याचें नाकारलें. तेव्हां कराराच्या कपटचाची वावडी उडवून जर्मनीनें आपलें सैन्य बेल्जममध्यें घातलें. जर्मन सैन्यानें ऑगष्ट महिन्याच्या ७ तारखेस नीज, २० तारखेस ब्रूसेल्स व २२ तारखेस नामूर हीं बळकट ठाणीं घेतलीं. एवढ्या दोन तीन आठवड्यांच्या अवधींत ब्रिटिश सैन्य फ्रेंचांच्या मदतीस आलें व उभय सैन्यें जर्मनांस अडवून धरण्याकरितां फ्रान्सच्या हद्दीवर फळी पसरून बसलीं. परंतु जर्मन सैन्याच्या अनिरुद्ध लोंढ्यापुढें दोस्तांचें सैन्य हटत चाललें. जर्मन लोक पॅरिसपासून १५ मैलावर आले आणि फ्रान्सची राजधानी बोरडेक्स येथें गेली. सप्टेंबर ५ तारखेपासून १० पर्यंत पॅरिसपासून व्हर्डूनपर्यंत शंभर मैलाची दोस्तांनीं फळी धरली व मार्न नदीवर उभय पक्षांचें तुंबळ युद्ध होऊन जर्मन सेना मागें सरली.

मार्ननदीवर जर्मन सेनेचा मोड झाल्यावर आयनेच्या बाजूनें जर्मन सेनेची फळी फोडण्याच्या उद्योगास दोस्त लागले. पुढची गति खुंटल्याचें दृष्टीस पडतांच जर्मनांनीं उत्तरेस ब्रिटिश खाडीच्या रोखानें चर खणण्यास सुरुवात केली आणि बेल्जमचा पश्चिम भाग ताब्यांत घेतला. यामुळें फ्रान्स व बेल्जम यांचे उत्तरेचा समुद्रकिनारा जर्मनांस वापरावयास सांपडून ब्रिटिश खाडी व उत्तर समुद्र यांस शह देणें त्यांस सोपें गेलें. त्यांनीं १० आक्टोबर रोजीं ॲन्टवर्प व ऑस्टेंड हीं बेल्जमचीं नवीं शहरें घेऊन त्या देशाचा उत्तरभागहि काबीज केला. बेल्जमास लागून फ्रान्सच्या हद्दींतील डंकिर्क व कॅले हीं ब्रिटिश खाडीच्या लगत्याची व

मान्याचीं बंदरेंहि घेण्याचा त्यांच्या बेत होता व तो सिद्धीस गेला असता, तर लांब पल्लयाच्या तोफांनीं खाडीवर वर्चस्व ठेवून इंग्लंडवर स्वारी करणें जर्मनीस कदाचित् साधण्याचाहि संभव होता. परंतु येसर नदीवर दोस्त सैन्यानें त्यास थोपवून धरल्यामुळें हा बेत फसला. यानंतर दोन्ही सैन्यें एकमेकांसमोर १९१८ च्या मार्च महिन्यापर्यंत फळी धरून बसलीं. या मुदतींत फ्रान्सची ईशान्य बाजू व सारा बेल्जम जर्मनीच्या हातीं राहिल्यामुळें फ्रासच्या शें. ९० लोखंडाच्या खाणी, शें. ५० कोळशाच्या खाणी व सारा बेल्जमचा किनारा वापरण्यास सांपडून पाणबुड्याचा धुमाकूळ उत्तर समुद्रांत जर्मनीस घालता आला.

पश्चिमेस जर्मनीचें वर्चस्व प्रस्थापित झालें असतां पूर्वेच्या बाजूनें रशियानें त्याचा पाय ओढून धरला. जर्मनीचें वेचक सैन्य पश्चिमेस गुंतलेलें पाहून रशिया पूर्व प्रशियांत उतरला व त्यानें जर्मनीवर बरेच जय मिळविले. यामुळें रशियाचें पारिपत्य करणें जर्मनीस भाग पडून त्याला आपलें पश्चिम रणक्षेत्रावरील बरेंच सैन्य पूर्व रणक्षेत्रावर हजर करावें लागलें. सैन्याची ही ओहोटी पश्चिमेस चटकन् जाणवली व मार्न नदीवर मागें सांगितल्याप्रमाणें जर्मनीस हार खावी लागली. पूर्वांगावर रशियानें मिळविलेलें जय इतके क्षणभंगुर होते कीं, जर्मनीचें सैन्य त्या बाजूस वळतांच जर्मन सेनानी हिंडेनबुर्ग यानें २६ आगष्ट ते १ सप्टेंबर १९१४ पर्यंत रशियन सैन्याचा धुव्वा उडवून दिला. तथापि रशियास ऑस्ट्रियावर जय मिळवितां आले. त्यानें ऑस्ट्रियाच्या गॅलीशिया प्रांतांत उतरून तार्नोपोल, लेंबर्ग, जारोस्लव्ह व प्रेझमिझल हीं ठिकाणें घेतलीं. आस्ट्रियास रशियानें अशा रीतीनें अडकवून टाकल्यामुळें आस्ट्रियाच्या सर्व्हियांत तळ ठेऊन बसलेल्या सैन्यास सर्व्हियानें डिसेंबर १९१४ त बाहेर हाकून लावलें. ७ आगष्ट १९१४ रोजीं मांटिनिग्रो सर्व्हियास मिळाला आणि त्याच वर्षीं नोव्हेंबरच्या २ तारखेस तुर्कस्थान जर्मनीस सामिल झाला.

तुर्कस्थानचा प्रवेश

तुर्कस्थानानें जर्मनीस मिळावें हें अगाऊ ठरलेलेंच होतें. परंतु कोणत्या घटकेस मिळावयाचें ती घटका महायुद्धाच्या एकंदर रागरंगावर अवलंबून होती. आगष्टच्या पहिल्या तारखेस जर्मनी युद्धांत सामिल झाला.

जर्मनीमागून बरोबर तीन महिन्यांनीं जर्मनीची साथ उघड रीतीनें करण्याचें तुर्कस्थानानें योजलें, हें कार्यकारण संबंधावांचून खात्रीनें घडलें नाहीं. गेल्या तीन महिन्यांत जर्मनीनें पश्चिमेच्या रणक्षेत्रावर फ्रेंच व इंग्रज कायमचें दाबून धरले होते आणि पूर्व रणक्षेत्रावर रशियास चांगलीच अद्दल घडविली होती. तथापि रशियाचा पायबंद मिळाल्यानें जर्मनीची पूर्व-पश्चिमेंत ओढाताण चालू होती. दोस्तांचें खरें बळ ॲंग्लो-फ्रेंचांत होतें. त्यांची पूर्वेच्या अंगानें ओढताण करण्यास जर्मनीपाशीं तुर्कस्थानाशिवाय दुसरा जबरदस्त ताण नव्हता. तुर्कांचें युरोपांतील साम्राज्य नांवापुरतेंच होतें. त्यांचें खरें साम्राज्य आशिया मायनर, आर्मीनिया, मेसापोटेमिया सीरिया, पॅलेस्ताईन व आरबस्थान या विस्तीर्ण प्रदेशावर पसरलें होतें. तुर्कस्थान जर्मनीचा उघडपणें दोस्त झाला याचा अर्थ असा कीं, तुर्कस्थानच्या मार्फत जर्मनीचे हात हिंदुस्थान व इजिप्त यांच्या आसपास पसरले. इराणी आखात व सुएझचा कालवा यांत जर्मनांच्या बागुलबोवास इंग्रजी साम्राज्यास उपद्रव देण्यापुरती यामुळें जागा मिळाली. दार्दानेलीस मधून इंग्रज व फ्रेंच यांनीं रशियास दारूगोळा पुरविणें व रशियापासून दाणागोटा मिळविणें आतां बंद पडलें आणि सर्व्हिया व मांटिनिग्रो यांस छळण्यास आस्ट्रिया व जर्मनी यांच्या जोडीस तिसरा वैरी उभा राहिला. या तीन चार ठिकाणीं पश्चिमेस फ्रान्सांत एकवटलेलें सैन्य इतःपर वाटावें लागणार आणि ब्रिटिश साम्राज्यांतील वेगवेगळ्या भागांतून येणारा सैन्याचा ओघ त्यास थोडाबहुत या नव्या केंद्राकडे वळवावा लागणार. जर्मनीस जसा रशियाचा तसाच जवळजवळ दोस्तास तुर्कांचा पायबंद बसला असें मानण्याचा हरकत नाहीं. बर्लिनचें जर्मन सैन्य बगदादपाशीं ओतावें हा जर्मन कायसरचा बेत सिद्धीस जाण्यास बल्गेरिया जर्मनीस मिळणें आवश्यक होतें. परंतु ती गोष्ट घडून येण्यास अद्यापि एक वर्षाचा अवधि होता.

तुर्कस्थान जर्मनीस मिळण्यास बाह्यात्कारें पुढील निमित्त घडलें. महायुद्धाच्या सुरुवातीस गोबेन व ग्रेसला हीं दोन जर्मन क्रूझरें भूमध्य समुद्रांत हिंडत होतीं. त्यांनीं आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील एक दोन शह-

रांवर तोफांचा भडिमार केला. तेव्हां ब्रिटिश व फ्रेंच जहाजांनीं त्यांचा पाठलाग करीत मेसीनाच्या सामुद्रधुनींत त्यांस गाठलें आणि तेथून शिताफीनें निसटून तीं क्रूझरें १० ऑगस्ट रोजीं दार्दानेलीसमध्यें शिरलीं. या वेळीं तटस्थ तुर्कस्थानानें आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणें त्यांस अडकवून ठेवणें जरूर होतें, परंतु तसें न करतां हीं क्रूझरें आम्ही जर्मनीपासून खरेदी घेतलीं आहेत व त्यांवरील खलाशी व अधिकारी यांस सदर जहाजें आमच्या किनाऱ्यास लागल्यावर परत जर्मनींत जाण्यास सांगूं असें उडवाउडवीचें उत्तर तुर्कांनीं दोस्तांस दिलें. पण तुर्कांनीं जर्मन लोकांस जहाजावरून घालवून तर दिलेंच नाहीं. उलट, जर्मन खलाशांकडून त्यांची दुरुस्ती करविली. तुर्की आरमाराची सुधारणा करण्याकरितां इंग्रजांनीं ॲडमिरल लिंपस आदिकरून आपले कामगार मुद्दाम नोकरीस दिले होते. लिंपस यानें जर्मनांस घालवून देण्याचा लकडा तुर्कांमागें लावतांच त्यांनीं त्याचा सदर अधिकार काढून घेऊन आरमारमंत्र्याच्या हाताखालीं त्याची नेमणूक केली. अशी कारवाई एकीकडे सुरू असतां दुसऱ्या बाजूनें तुर्क लोक दोस्तांपाशीं (१) परकीय लोकांचें तुर्कस्थानांतील विशेष हक्कसंबंध नष्ट करणें (२) तुर्कांची बाहेरून यावयाची युद्धोपयोगी जहाजें तुर्कांस मिळूं देणें (३) तुर्कस्थानच्या अन्तर्गत कारभारांत बोट न घालणें (४) बल्गेरिया दोस्तांस मिळाल्यास पश्चिम थ्रेस तुर्कांस परत मिळणें व (५) ग्रीक बेटें तुर्कांस परत करणें, अशी मागणी करीत होते.

तुर्कस्थान जर्मनीचा मित्र झाल्यानें उत्पन्न होणाऱ्या संकटाची इंग्लंडास कल्पना असल्यामुळें या अटींचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें इंग्रजांनीं त्यास आश्वासन दिलें होतें. कारण बॉस्फरसची सामुद्रधुनी त्यांस खुली रहावयास पाहिजे होती. पूर्वीच्या तहाप्रमाणें इंग्लंडच्या व्यापारी जहाजांचा फेरफटका तुर्कस्थानानें अटकावून धरणें रास्त नव्हतें. परंतु पाण्यांत सुरुंग पेरले असल्यामुळें या जहाजांस अटकाव करणें भाग आहे असें त्यांनीं इंग्लंडास भासविलें. इंग्रजांचीं अशी ६०।७० जहाजें त्यांनीं आडविलीं. याच सुमारास तुर्क व जर्मन हेरांनीं इजिप्तमध्यें इंग्रजांविरुद्ध फितुरी आरंभिली. त्यांचें कांहीं सैन्य ईजिप्तकडे, मोसलकडे व सीरियाकडे रवाना होत

आहे अशाहि बातम्या उठल्या. रशियानें नोव्हेंबरच्या तीन तारखेस व फ्रान्सनेंहि त्याच सुमारास तुर्कांविरुद्ध युद्ध पुकारलें. तुर्कस्थान व ईजिप्त यांचें संगनमत झाल्यास सुएझ कालव्यावर संकट ठेविलेलेंच होतें. यासाठीं संगनमताच्या अंधुक संशयावरून ब्रिटिशांनीं खेदीवास काढून टाकून त्याच्या चुलत्यास सुलतान ही पदवी देऊन गादीवर बसविलें व इजिप्तचें होतें तेंहि स्वातंत्र्य हरण करून त्या देशाची इंग्लंडच्या आश्रितांत (प्रोटेक्टरेट) गणना केली गेली. अशा रीतीनें सुएझचें द्वार बंद करण्याचा तुर्कांचा प्रयत्न १९१५ च्या फेब्रुवारी महिन्यांत फसला.

जर्मनीचा पराक्रम—

जर्मनांचा मूळ बेत फ्रान्सला चिरडून टाकून रशियाच्या मागें लागण्याचा होता. परंतु रशियानें तितकी फुरसत जर्मनीस मिळूं दिली नाहीं आणि म्हणून मार्न नदीवर जर्मनीचा मोड झाल्यापासून तिकडची प्रगति तूर्त तहकूब करून जर्मनांनीं रशियाचा पिच्छा पुरविला. रशिया पूर्वप्रशियांत फिरून शिरला होता. त्याचा १२ फेब्रुवारी सन १९१५ रोजीं हिंडनबुर्गनें मोठा पराभव केला, त्यांत रशियाचें १॥ लाख सैन्य मेलें व जखमी झालें व १ लाख माणूस पकडले गेलें. ऑस्ट्रियाचा गॅलीशिया त्यानें बळकावला होता, त्यांतूनही त्यास जर्मनांनीं हुसकून लावलें. ता. २ जून रोजीं प्रेझामिझल व २२ रोजीं लेंबर्ग हीं ऑस्ट्रियांचीं गेलेलीं ठाणीं त्यांनीं मिळविलींच, पण त्याखेरीज रशियाच्या हद्दींत घुसून पोलंडची राजधानी वार्सा ऑगष्टच्या ५ व्या तारखेस सर केली. अशा रीतीनें रशियाचा ६०५ हजार चौरस मैल मुलूख जर्मनीस मिळाला. त्यांचीं एकंदर १२ लक्ष माणसें मेलीं व जखमी झालीं आणि १० लक्ष कैद झालीं.

इंग्लंड, फ्रान्स व रशिया या त्रिवर्गांपैकीं फिरून मान वर करूं नये असा तडाखा रशियास मिळाला. रशियास रणसाहित्य पुरविणें आणि त्याजपासून धान्यसामुग्री मिळविणें हीं दोन कार्यें इंग्लंड व फ्रान्स यांस अत्यंत निकडीचीं होतीं. यासाठीं दार्दानेलीस व बॉस्फरस या दोन सामुद्रधुन्यांचा ताबा घेणें त्यांस भाग होतें. हा महत्त्वाची गोष्ट दोस्तांस रशियाचा पराभव होत असतां साधली असती, तर रशिया वांचून शिवाय बल्गेरिया, रुमानिया, व ग्रीस हीं गप्प बसलेलीं बाल्कन राष्ट्रेंहि त्यांच्या

पक्षास मिळण्याचा फार संभव होता. इंग्लंड व फ्रान्स यांस पूर्वेकडून ताण देण्याचा जर्मनीचा संकल्प मात्र तुर्कस्थानास आपल्या बाजूस घेतल्यानें सफळ झाला. सन १९१५ च्या फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यांत ब्रिटिश व फ्रेंच आरमारांनीं दार्दानेलीसमधून घुसण्याची खटपट केली. ते दार्दानलीसमधून तिच्यांतील चिंचोळ्या गळ्यापर्यंत जाऊन पोंचले. पण खाडीच्या दोन्ही तीरावरील किल्ल्यांतून जर्मनांच्या मदतीनें तुर्कांनीं पक्का बंदोबस्त करून ठेवला होता. त्या तुर्कांनीं दोस्तांच्या आंत शिरणाऱ्या आरमारावर अग्निगोलकांचा पाऊस पाडला. त्यांत अत्यंत नुकसान पोंचून दोस्तांच्या आरमारास सामुद्रधुनींतून परत फिरणें भाग पडलें.

गॅलिपोली—

पाण्यांतून कॉन्स्टांटिनोपल गाठणें अशक्य झाल्यावर जमीनीवरून प्रयत्न करून पाहाण्यांत आला. या सुमारास दोस्तांस ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या ब्रिटिश वसाहतींतून नवें सैन्य येऊन मिळालें. ब्रिटिश ॲडमिरल सर हॅमिल्टन यांच्या आधिपत्याखालीं दोस्तांचें सैन्य दार्दानेलीस सामुद्रधुनीच्या तोंडाशीं आलेल्या तुर्कस्थानच्या गॅलीशिया नामक चौंचेवर उतरलें. ही बातमी तुर्कांना अगाऊच लागल्यामुळें त्यांनीं आपलें सैन्य जर्मन सेनापति लिमन व्हान सँडर्स याच्या हाताखालीं तोंड देण्यास तयार ठेवलें होतें. दोस्तांचें सैन्य कसेंबसें जमिनीवर उतरलें पण तुर्की सैन्यापुढें त्यांचा रिघावच होईना. या ठिकाणीं सदर सैन्य वर्षभर बसून राहिलें. नुकसान फार झालें. फायदा एवढाच कीं, तुर्क सैन्य येथें गुंतून पडल्यामुळें सुएझ कालव्यावर हल्ला करण्यास त्यास सवड मिळाली नाहीं. दोस्तांचा नक्षा असा उतरलेला पाहून बल्गेरिया व ग्रीस यांचा कांटा जर्मनीकडे झुकत चालला.

बल्गेरियाचा बुखारेस्टच्या तहापासून सर्व्हिया, रुमानिया व ग्रीस यांवर रोष होता. जर्मनीचा पक्ष स्वीकारल्यानें झालेलें नुकसान भरून निघेल अशी आशा बाळगण्याजोगी परिस्थिति आतां उत्पन्न झाली होती. हिंडेनबर्ग रशियास सारखा मागें हटवीत होता, तुर्क व जर्मन यांनीं सामुद्रधुन्या बंद पाडल्या होत्या, गॅलीपोलींत ब्रिटिश सैन्य माशा मारीत बसलें होतें, आणि फ्रान्समध्यें फ्रेंच व इंग्रज यांचे उपाय हरले होते. जर्म

नीची अशा रीतीनें चढती कमान पाहून ४ आक्टोबर १९१५ रोजीं बल्गेरिया जर्मनीस मिळाला. जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांची साखळी जोडण्यास एकच दुव्वा कमी होता. तो बल्गेरियानें मिळवून दिल्यामुळें बर्लिनपासून बगदादपर्यंत एक खंडप्राय प्रदेश जर्मनीच्या हुकमतीखालीं आला. आतां सर्व्हियाचें मात्र पुरें मरण ओढवलें. ग्रीस व सर्व्हिया यांजमधील तहान्वयें सर्व्हियास ग्रीसची मदत पोचणें जरूर होतें. परंतु ग्रीसचा राजा व जर्मनीचा बादशाहा यांचें नातें असल्यामुळें ग्रीस अलिप्त राहिला. बल्गेरिया मिळतांच जर्मन सेनापति मॅकेन्सन याच्या धुरीणत्वाखालीं जर्मन व ऑस्ट्रियन सैन्य पश्चिमेकडून सर्व्हियांत घुसलें आणि बल्गेरियानें पूर्वेकडून स्वारी केली. या त्रिवर्गांनीं प्रथम सर्व्हियाचा व नंतर मांटेनिग्रोचा फडशा पाडला.

सर्व्हिया संकटावस्थेंत असतां त्याचा बचाव करणें दोस्तांचें कर्तव्य होतें. त्याप्रमाणें इंग्लिश व फ्रेंच सैन्य ग्रीसच्या सॅलोनिका बंदरांत उतरलें. तटस्थ ग्रीस देशास दोस्तांस घरांत घेणें आंतरराष्ट्रीय कायद्यास सोडून होतें. तथापि ग्रीसचा इंग्रजास अनुकूल असणारा मुख्य मंत्री व्हेनीझिलास यानें ही परवानगी दिली. ग्रीक राजा कॉन्स्टंटाइन जर्मन बादशाहाचा मेहुणा असल्यामुळें त्यास ही गोष्ट रुचली नाहीं. त्यानें व्हेनीझिलास यास या चुकीबद्दल प्रधानपदावरून काढून टाकलें. तेव्हां दोस्त सैन्यांस सॅलोनिकांतून पाय काढून घ्यावा लागला.

इतालीचें आगमन—

जर्मनीच्या पारड्यांत एकामागून एक राष्ट्रें पडत असतां दोस्तांच्या पारड्यांतहि या सुमारास इतालीचें वजन पडून तें पारडें बरेंच जड झालें. इताली देश मूळचा जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी यांच्या मेळांतील आणि ऑस्ट्रिया लढाईंत शिरतांच १८८३ च्या तहाप्रमाणें इतालीनें त्यास मिळणें जरूर होतें. परंतु ऑस्ट्रियानें विनाकारण आपणावर लढाईचें संकट ओढवून घेतलें असें मिष करून इताली तुटक राहिला. दोस्तांस प्रतिकूल ग्रह असतां इताली त्यांच्या पक्षाचा झाला याबद्दल आश्चर्य वाटतें खरें. तरी पण इतालीचा स्वार्थ जसा दोस्तांस तसा ऑस्ट्रियास मिळून साधण्यासारखा नव्हता. ऑस्ट्रिया इतालीचा नवा मित्र झाला असला

तरी जुना शत्रूच होता. इताली ऑस्ट्रियाच्या छत्राखालीं होता, त्यावेळचा ट्रेंटिनो, ट्रिस्टी हा इतालीचा भाग अद्यापि ऑस्ट्रियाकडेच होता आणि तो दोस्तांचा पक्ष उचलल्यानेंच इतालीस मिळण्याचा सुमार होता.

इताली दोस्तांचा झाला तरी महायुद्धाचीं पहिलीं दोन वर्षे दोस्तांस फार वाईट गेलीं. त्यांनीं जर्मनीच्या वसाहती मात्र परस्पर त्यांजपासून काढून घेतल्या. जपान दोस्तपक्षीय होऊन त्यानें कियूशियू बेट घेतलें. आफ्रिकेतील मुलूख से. स्मट्स व इंग्रजी सैन्य यांनीं जिंकला. फ्रान्सचा पूर्व भाग जर्मनीनें पादाक्रांत केलाच होता. त्यानंतर मार्न नदीवर जी प्रगति खुंटली ती चालू करून पॅरिस शहरावर आपलें निशाण रोंवण्याची उमेद कायमच होती. ती पुरी करण्याकरितां १९१६ मध्यें जर्मनीनें कंबर बांधली. या वेळीं व्हर्डूनवर जर्मनीचा रोख होता. व्हर्डून हें अत्यंत मजबूत व नाक्याचें ठिकाण सर झालें कीं, पॅरिसवर मोर्चेबंदी करण्यास विलंब लागणार नाहीं अशी जर्मनीची खात्री होती. जर्मन सेनाधिपत्य युवराजानें आपल्याकडे घेतलें. हें युद्ध १९१६ च्या फेब्रुवारीपासून तों थेट आक्टोबरपर्यंत चालू होतें. फ्रेंच सैन्याचें आधिपत्य से. जोफ्रे यांजकडे होतें. बेल्जमपासून स्वित्झर्लंडपर्यंत जर्मनांनीं फळी धरली होती. त्यांपैकीं व्हर्डून व सोम नदी यावर तुंबळ युद्ध माजून राहिलें होतें. व्हर्डूनच्या बाजूस धडक मारण्याचें काम जर्मनांनीं अंगीकारलें असून सोमनदीवर फ्रेंच जर्मनांशीं धडकदेत होते. सोमनदीची बाजू उत्तर समुद्रास व म्हणून इंग्लंडास जवळ असल्यानें फ्रेंचांस इंग्रजी फौजेचें सहाय्य होतें. व्हर्डूनच्या बाजूस जर्मनांनीं जोराचा नेट लावून फ्रेंचांस चार दिवसांत चार मैल मागें रेटलें. शेवटीं फ्रेंचांचा जर्मनांपुढें निभाव लागेनासा झाल्यामुळें तेथील सेनाधिपत्य नेव्हिली यांजकडे आलें. नेव्हिली व त्याच्या हाताखालचा अधिकारी पिटेन यांनीं जोर बांधून जर्मनांवर चांगलीच जरब बसविली. सोमनदीवरील दोस्तांचा हल्ला जून महिन्यांत सुरू झाला. इंग्लंडनें यावेळीं सक्तीची सैन्यभरती सुरू केल्यामुळें त्यांचें बरेचसें सैन्य या वर्षीं फ्रान्सांत उतरलें होतें. त्यांच्या मदतीनें त्या बाजूस दोस्तांची प्रगति मुंगीच्या पावलानें चालू होती.

रुमानियाचा विध्वंस—

यावर्षीं पश्चिमेस दोस्तांची हकीकत वरील प्रकारची होती. पूर्वेस रशिया

व इताली यांनीं बराच जोर धरला होता. तथापि टायरोलच्या रोखानें आस्ट्रिया इतालीस मागें हटवीत चालला. तशीच पुढें चाल करून व्हेनिसच्या मैदानांत उतरण्याचा त्याचा विचार होता. तोंच रशियानें त्यास दुसरीकडून शह दिल्यामुळें सदरील बेत त्यास सोडून द्यावा लागला. इताली दोस्तपक्षीय बनला. आणि १९१६ त दोन्ही पक्ष तुल्यबल झाल्यासारखे दिसले, याचा दोस्तांस फायदा मिळाल्यावांचून राहिला नाहीं. आस्ट्रो-हंगेरियन राज्यांत रुमानियनांची तीस लाख वस्ती होती. या वस्तीचा मुलूख परत मिळण्यास आस्ट्रियाविरुद्ध दोस्तांची कास धरण्याशिवाय रुमानियास गत्यंतर नव्हतें. रुमानिया २७ ऑगष्ट १९१६ रोजीं दोस्तांचा झाला. पांच बाल्कन राष्ट्रांपैकीं मांटिनिग्रो, सर्व्हिया व रुमानिया हीं तीन राष्ट्रें दोस्तांस मिळालीं. एकट्या बल्गेरियानें जर्मनीचा पक्ष उचलला आणि ग्रीस डळमळीत राहिला. रुमानिया जर्मनीचा जुना दोस्त. तो जातांच बर्लिन—बगदाद दळणवळणास व जर्मनीच्या पूर्वेकडील साम्राज्यकल्पनेस जबरदस्त धक्का बसला. जर्मनीनें या विश्वासघाताबद्दल रुमानियास चांगलीच अद्दल घडविण्याचें ठरविलें. जर्मनीचे रणगाजी सेनापति फॉकनहेन व मॅकेन्सन यांनीं आपल्या हाताखालीं जर्मन, ऑस्ट्रियन, हंगेरियन व बल्गेरियन सैन्यें घेऊन रुमानियावर धाड घातली आणि रुमानियास जमीनदोस्त करून टाकलें. ६ डिसेंबर रोजीं सदर सैन्य रुमानियाच्या बुखारेस्ट राजधानींत शिरलें आणि त्याजवर हव्यातशा अटींचा त्यांनीं तह लादला. रुमानियास ताबडतोब लोळविल्यामुळें जर्मनीची मध्य युरोप आपल्या छत्राखालीं आणण्याची आकांक्षा स्थिरावली.

जर्मनी जमीनीवर दोस्तास भारी ठरला, परंतु त्याचा पाण्यांत ब्रिटिश आरमारापुढें पाड लागणार नाहीं हें ठरल्यासारखें होतें. १९१६ च्या फेब्रुवारींत इंग्लंड व जर्मनी यांचें जटलंडपाशीं आरमारी युद्ध झालें. त्यांत जर्मनीचा पराभव झाला. समुद्रांतून परदेशांहून जर्मनींत जाणारा माल आडवावयाचा हाहि जर्मनीस रडकुंडी आणण्याचा इंग्लंडपाशीं उपाय होता. त्याचा या वर्षीं पूर्णपणें उपयोग करून इंग्लंडनें जर्मनीस कोंडून धरलें व त्याचा समुद्रांतून परदेशांहून येणारा पेट्रोलम, कापूस, रबर, जस्त, टिन वगैरे युद्धोपयोगी माल आणि अन्नसामुग्री बंद पाडली.

रशियांतील राज्यक्रान्ति—

राशियांत १९१७ सालीं प्रचंड राज्यक्रान्ति होऊन झारावर राज्यपद सोडण्याची पाळी आली. झारच्या एकतंत्री अमलास महायुद्धापूर्वींच रशियन प्रजा कंटाळली होती आणि त्यावेळींच घाटत असलेली क्रांति महायुद्धांत लक्षावधि योद्धयांचा बळी देऊन वैतागलेल्या जनतेनें एकाएकीं शेवटास नेली. रशिया ढासळल्याचे दुष्परिणाम फार दूरावर पोंचणारे होते. रशियाचीं सूत्रें ज्या बोल्शेव्हिकांच्या हातीं गेलीं ते बोल्शेव्हिक साम्राज्यसत्तेच्याच काय, पण प्रचलित समाजघटनेच्याहि विरुद्ध होते. त्यांनीं मुळीं हत्यारच खालीं ठेवल्यामुळें दोस्तांनीं पूर्व बाजूनें जर्मनीस दिलेला पायबंद पार तुटला. आणि रुमानियाचें त्यानें आधींच चंदन उडविलें असल्यानें दोस्तांस फ्रान्समध्यें नैस्तनाबूद करणें याशिवाय जर्मनीस उद्योगच राहिला नाहीं.

अमेरिकेचा प्रवेश—

दोस्तांनीं रशिया गमावला खरा, पण त्यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे ७ डिसेंबर १९१७ रोजीं अमेरिकेसारखी अत्यंत प्रबळ सत्ता आपल्या पक्षास ओढली. त्यापूर्वीं थोडेच दिवस जर्मनीचा पक्षपाती ग्रीसचा राजा कॉन्स्टंटाईन पदच्युत होऊन ग्रीसहि दोस्तांकडे झुकला होता. पण अमेरिकेच्या मानानें ही गोष्ट विशेष महत्वाची नव्हे. त्याचबरोबर सयाम, ब्रॅझिल, चीन यांनींहि जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारलें हें सांगून ठेवणें जरूर आहे. फेब्रुवारी १९१५ त जर्मनीनें ग्रेटब्रिटन भोंवतालचा समुद्र समरकक्षेतील असल्याचें ठरवून तटस्थ राष्ट्रांनीं आपलीं व्यापारी जहाजेंहि त्यांत जाऊं दिल्यास ती बुडाल्याची जबाबदारी आपणावर रहाणार नाहीं असें जाहीर केलें. अध्यक्ष विल्सन यांनीं त्याविरुद्ध पुष्कळ हकाटी केली पण त्यास उडवाउडवीचीं उत्तरें देण्यापलीकडे जर्मनीनें कांहींच खबरदारी घेतली नाहीं. १ मे रोजीं अमेरिकेच्या गुड फाईट जहाजास टार्पेडो लागली व पुढें ल्युसिटानिया बोट बुडून बरेच अमेरिकन प्राणांस मुकले. जर्मन पाणबुड्यांनीं कहर उडवून दिल्यामुळें अमेरिकेस नाइलाजानें युद्धाची वाट धरावी लागली.

सोमनदीवर जर्मनीची पिच्छेहाट सुरू असतांच रशियाचा पायबंद तुटून स्वैर झालेला जर्मनी आस्ट्रियास मदतीस घेऊन इतालीवर कोसळला. त्यांनीं आक्टोबरच्या २८ व ३० तारखेस अतिशय निकराचा हल्ला करून इतालीचें ३ लाख सैन्य कैद केलें व ३ हजार तोफा घेतल्या. त्याखेरीज चार हजार चौरस मैल मुलूख मिळाला तो वेगळाच. यापुढें जर्मनीस इतालीचीहि भीति उरली नाहीं.

कट् एल् अमरा—

बर्लिन—बगदाद जोडणें, मध्य यूरोप आपलें करणें व तैग्रीस आणि युफ्रातीस नद्यांवर आपली सत्ता बसविणें हे जर्मनीचे बेत होते. जर्मनी, ऑस्ट्रिया, रुमानिया, बल्गेरिया व तुर्कस्थान यांची साखळी एकदा जुळल्यावर जर्मनी इराणी आखातांतून सुएझच्या कालव्यांतून आपले पाय केव्हां बाहेर काढून हिंदुस्थानावर संकट आणील याची इंग्लंडास सतत धास्ती वाटत होती. १९१५ त ज्याप्रमाणें जर्मनीनें रुमानियास पुढें धुळीस मिळविलें त्याप्रमाणें दोस्तांनीं कॉन्स्टांटिनोपल काबीज करून तुर्कस्थानास दार्दानेलीस सामुद्रधुनींतून शिरून उडवून टाकण्याचें योजिलें होतें. परंतु जर्मनांच्या पराक्रमापुढें त्यांचा बेत फसला. आतां इराणी आखात व सुएझचा कालवा यांतून तुर्कांस तंबी देण्याची राहिली. त्यांपैकीं इराणी आखातांत बसऱ्यापाशीं जमिनीवर चढून मेसापोटेमिया घेण्यास १९१५ तच से. टाऊनशेंड यास हिंदुस्थानांतून सैन्य देऊन पाठविण्यांत आलें. हें सैन्य तैग्रीस नदी ५० मैल चढून गेलें व त्यानें कट—एल्—अमरा शहर काबीज केलें. अमऱ्यांत इंग्रजी सैन्य जाऊन बसल्यावर तुर्की सैन्यानें त्यास चोहोंकडून वेढलें. टाऊनशेंड वेढ्यांत अडकल्यामुळें त्यास आपल्या दहा हजार सैन्यानिशीं २८ एप्रिल १९१६ रोजीं शत्रूच्या स्वाधीन व्हावें लागलें. टाऊनशेंडास सोडविण्यासाठीं व स्वतःच्या इभ्रतीसाठीं हिंदुस्थान सरकारनें सेनापति मॉड यास १९१७ च्या फेब्रुवारींत मेसापोटेमियांत पाठविलें. रशियन सैन्याच्या मदतीनें मॉड याची मोहीम यशस्वी होऊन त्यानें कट-एल्-अमरा घेतला आणि ब्रिटिश सेनेचा बगदाद शहरांत मोठ्या विजयोत्सवानें व दिमाखानें प्रवेश झाला.

इराणी आखाताइतकीच इंग्रजांस सुएझ कालव्याची भीति होती. सन १९१६ च्या प्रारंभीं तुर्कांनीं आरबस्थानांत शिरून एडन प्रांतावर स्वारी केली. पण ब्रिटिशांनीं शेख उस्मान येथें त्यांचा पराभव केला. त्यानंतर चार दिवसांनीं त्यांचा बीरअहमदपाशीं दुसरा पराभव झाला. अरब व तुर्क यांचें परस्परांशीं सख्य कधींच नव्हतें. मक्केचा शेरीफ हुसेनसारखा हस्तक इंग्रजांस हवाच होता आणि हुसेनासहि तुर्कांच्या वर्चस्वाखालून सुटून नुसता शेरीफ होऊन न राहातां इंग्रजांच्या मदतीनें राज्यपद मिळालें तर पाहिजेच होतें. इंग्रज व तुर्क यांचें युद्ध जुंपतांच आरबांनीं बंड केलें. ता. १४ जून १९१६ रोजीं त्यांनीं मक्का घेतली. जुलईच्या १ तारखेस जिद्दा व नंतर तांबड्या समुद्रावरील यंबो बंदर त्यांच्या हातीं लागलें. ६ नोव्हेंबरपर्यंत हुसेनाचें बस्तान इतकें उत्तम बसलें कीं, त्यानें हेजजचा राजा म्हणून आपल्या नांवाची द्वाही फिरविली.

महायुद्धांत जर्मनीच्या बाजूनें प्रविष्ट होतांच सन १९१४ च्या नोव्हेंबर महिन्यांत तुर्कांनीं सीनाय प्रांत घेऊन ईजिप्त प्रांताकडे दृष्टि वळविली होती. परंतु त्या वेळीं इंग्रजांनीं त्यांस थोपवून धरलें.त्यानंतर दुसरा हल्ला ता. १९ जूलई १९१६ रोजीं तुर्कांनीं केला. तोहि सुएझ कालव्यापाशीं आडवून धरण्यांत आल्यावर पुढल्या वर्षीं तुर्कांस मेसापोटेमियाप्रमाणेंच आरबस्थान, पॅलेस्ताईन, सीरिया या प्रदेशांतून निर्मूल करण्याचें ब्रिटिशांनीं ठरविलें. या कामगिरीवर से. आलेन्बी याची नेमणूक झाली. त्यास नवा आरब राजा शेरीफ हुसेन याचा मुलगा अमीर फैजुलही येऊन मिळाला. आलेन्बी १ आक्टोबर १९१७ रोजीं फैजूलसह दमास्कस येथें गेला. त्याच महिन्याच्या ६ व्या तारखेस फ्रेंच आरमारानें सीरियांतील प्रमख बंदर बिरूट घेतलें. १३।१५।२६ या तारखांस त्रिपोली, हॉम्स व अलेप्पो हीं ठाणीं पडलीं. ता. १० डिसेंबरास अलेन्बी जाफा बंदर घेऊन जेरूसलेममध्यें शिरला. सुप्रसिद्ध हरून अल् रशीदच्या बगदाद या जगविख्यात राजधानींत प्रवेश करतांना से. मॉड याच्या अन्तःकरणांत राजसवृत्तीच्या ऊर्मि उठल्या असतील तर जेरुसलेम मुसलमानांच्या हातचें सुटून ख्रिस्ती इंग्रजांच्या सत्तेखालीं आल्याचें ऐकून साऱ्या ख्रिस्ती जगाचें हृदय सात्त्विक अभिमानानें व आनंदानें भरून आलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

अलेन्बीनें जेरुसलेम घेतलें त्यावेळीं त्याजपाशीं १ लक्ष २० हजार सैन्य होतें. तेव्हांपासून १९१८ च्या सप्टेंबर महिन्यापर्यंत पॅलेस्ताईन प्रांतांतच तळ देऊन सप्टेंबर महिन्यांत तुर्कांस चोंहोंकडून वेढून सामारियाच्या मैदानावर अलेन्बीनें त्यांस जोराचा तडाखा लगावला. या वेळीं तुर्कांचें सैन्य ३ लक्ष ८० हजार होतें, आणि सक्तीनें भरती केलेलें मिळून १६ लक्ष होतें. त्या सैन्यापैकीं ज्या तुकड्या सीरियांत होत्या त्यांतील ७० हजार सैन्य व ७०० तोफा अलेन्बीच्या हातीं पडल्या. १ आक्टोबर रोजीं अलेन्बी दमास्कस शहरीं आला, तेथें त्यानें ७ हजार शिपाई कैद केलें. त्याच महिन्याच्या ६ व्या तारखेस फ्रेंच काफिल्यानें सीरियाचें बंदर फिरून घेतलें. त्यानंतर कॉन्स्टांटिनोपल–बगदाद रेल्वेवरील अलेपो, हें महत्वाचें ठाणें त्यानें सर केलें. त्यामुळें बगदाद व कॉन्स्टांटिनोपल यांचा संबंध तुटून सेनापति मॉड यानें १९१७ सालीं घेतलेल्या मेसापोटेमिया प्रांतांत कॉन्स्टांटिनोपलच्या बाजूनें तुर्की सैन्य येण्याची भीति निर्मूल झाली. आक्टोबरच्या २५ तारखेस दमास्कस व अलेपो यांमधील हॉम्स शहर दोस्तांस मिळालें. सारांश, १९१८ अखेरपर्यंत मेसापोटामिया, सीरिया, पॅलस्ताईन व अरबस्थान यांवरील तुर्कांचा अंमल पार उडाला व त्यांस दोस्तांपुढें शस्त्र ठेवण्याचा प्रसंग लवकरच येणार याविषयीं शंका उरली नाहीं.

रशियाशीं तह

तुर्कांचें पूर्वेकडील अफाट साम्राज्य संपुष्टांत येत असतां जर्मनी रशियाची पुरती गठडी आवळण्यांत गुंतला होता, व रशियांतील बोल्शेव्हिक राज्यकर्त्यांनीं ३ मार्च १९१७ रोजीं ब्रेसलिटोव्हस्क येथें जर्मनी व ऑस्ट्रिया यांजबरोबर तह केला. या तहानें रशियानें पोलंड लिथूआनिया, कुरलँड, लिव्होनिया, इस्थोनिया यांवरील हक्क सोडला, फिन्लंड व युक्रेन यांचें स्वातंत्र्य कबूल केलें, व आर्मिनियाच्या पलीकडील कॉकेशस प्रांतांतील कॉर्सचा किल्ला, काळ्या समुद्रावरील बातुमचें बंदर व एरिव्हान तुर्कांस दिलें; आणि सोडलेल्या प्रदेशांत आणि जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्या राज्यांत बोल्शेव्हिक मतांचा प्रसार न करण्याचें अभिवचनहि त्यांजपासून मिळविण्यांत आलें. या तहानें रशियानें आपल्या साम्राज्याचे तुकडे पाडून

घेतले. याउपर रशियाचा युरोप व आशिया या दोन खंडावरील दरारा आणि पृथ्वींतील राष्ट्रांत असलेलें उच्च स्थान नष्ट झालें आणि तुर्कांवरील रशियाचें संकट कायमचें टळलें. या तहानें जर्मन साम्राज्याच्या दुप्पट म्हणजे पांच लक्ष चौरस मैलाचा मुलूख म्हणजे झार पीटर दि ग्रेट पासून दुसऱ्या निकोलसपर्यंत कमावलेलें सारें साम्राज्य रशिया बोळवून बसला आणि तो तनिशें वर्षांपूर्वीच्या हीन स्थितींस पोंचला. राजकीय दृष्टि सोडून व्यापारी दृष्ट्या मोजदाद करावयाची तर ३७ टक्के उद्योगधंदे, ७५ टक्के कोळसा व ७३ टक्के लोखंड या संपत्तीवर त्यानें पाणी सोडलें. रशियामागून जर्मनी—आस्ट्रियाचा रुमानियाशीं तह झाला व त्याचाहि बराच मुलूख व खनिज संपत्ति हातची गेली.

दोस्तांचा रशिया व जर्मनीचा तुर्कस्थान यांची अवस्था सारखी होऊन त्यांचा एकमेकांशीं संक्षेप गेला असें मानण्यास हरकत नाहीं. पूर्वेस बाकी पूज्य झाल्यावर जर्मनीस पश्चिम बाजूस फक्त दोस्तांची रग जिरविणें एवढेंच महत्त्वाचें कार्य उरलें. जर्मनीची, फ्रान्सवर ही तिसरी धडक होय. या धडकेस २१ मार्च १९१८ रोजीं सुरुवात झाली. त्यापूर्वीं चारच महिने अमेरिका दोस्तपक्षास मिळाली होती, परंतु तिचें म्हणण्याजोगें सैन्य फ्रान्सांत अद्यापि येऊं लागलें नसल्यामुळें तो प्रवाह जोरानें वाहूं लागण्यापूर्वींच फ्रेंचांस लोळवावें, या उद्देशानें जर्मनीनें विशेष लगट केली. आपण या धडकीनें फ्रेंचांस जमीनदोस्त करूं अशी कायसर बादशहासहि मोठी उमेद होती. त्यानें आपल्या सैनिकांस जाहीर केलें कीं ‘ विजयाचा लाभ आम्हांस खात्रीपूर्वक मिळणार. तह असा तसा होणार नाहीं, तर जर्मनीच्या हितास सर्वस्वीं धरून असाच होईल.’ या भरंवशानें ही धडक अत्यंत निकरानें देण्यांत आली व ती तीन महिने टिकून राहिली. शत्रूचा प्राण हरण करणारा विषारी धूर जर्मनांनीं सोडला, आणि लांब पल्लयाच्या तोफा पॅरिस शहरावर डागल्या गेल्या. उत्तरेकडून इंग्लिश व दक्षिणेकडून फ्रेंच यांच्या फळ्या आमेन्सपाशीं जुळल्या होत्या. त्यांच्या सांध्यावर नेमकी पाचर मारून दोन्हीं सैन्यामधून भांग पाडाव-याचा जर्मनीनें बेत केला. ठरल्याप्रमाणें त्यांनीं इंग्लिशांस बाजूस काढून

त्यांचा मध्य सोमनदीच्या पलीकडे रेटला. इंग्रजांचें सैन्य जर्मनीपुढें लटपटूं लागतांच फ्रेंच रिसाला त्यास सावरून धरण्यास पुढें सरसावला. तथापि २१ ते २८ मार्चपर्यंत जर्मनांची बरीच प्रगति झाली. त्यांनीं शहरांमागून शहरें घेतलीं. जर्मन पक्षाचा पुढारी एकटा जर्मनी असल्यामुळें त्याचें धोरण एकतंत्री होतें. पण समसमान अशा दोस्तांत धोरणाचे बाबतींत सहाजिकच बहुनायकी होती. ही चूक या वेळीं दुरूस्त करून से. फॉक यास २८ मार्च रोजीं कुलमुखत्यारी देण्यांत आली. २८ मार्च नंतर थोडा दम खाऊन जर्मनांनीं इंग्रजी फौजेवर दुसरी धडक मारली. तिच्या धक्यासरशीं इंग्रज सेनापति हेग याचा धीर बराच खचला. 'इतक्या वर्षांच्या लढाईनें आतां आपण बरेच थकलों आहों. परंतु ज्याचा दम शेवटपर्यंत टिकेल त्यासच विजयश्री वरणार ' असा संदेश त्यानें आपल्या सैनिकांस कळविला.

अमेरिकेची मदत

येप्रेस नदीवर इंग्रज व जर्मन यांचें तुंबळ युद्ध झालें. इंग्रजांचीं महत्त्वाचीं ठाणीं जर्मनांनीं घेतलीं. पण फ्रेंचांनीं ऐन वेळीं पुन्हा मदतीस येऊन इंग्रजांची बाजू सांवरली. या सुमारास जर्मन सैन्याचें सूत्रधारित्व हिंडेनबुर्गकडून जाऊन लुडेन डॉर्फ याजकडे आलें. २७ मार्च रोजीं ४० मैलांची फळी धरून जर्मनांनीं धडक मारण्यास सुरुवात केली. ३१ मे पर्यंत पुढें सरकत सरकत जर्मनांनीं चार वर्षांनीं मार्न नदी फिरून गांठली. चार दिवसांत चाळीस हजार सैनिक कैद केले व बराच दारूगोळा मिळविला. पॅरिसपासून चाळीस मैलावर ते येऊन ठेपले. पण २ जून रोजीं फ्रेंचांच्या राखीव सैन्यानें येऊन जर्मनांस अटकाव केला या वेळीं थोडेसें अमेरिकन सैन्य येऊन आपला प्रभाव किंचित् दाखवींत होतें. ९ व्या तारखेस फ्रेंचांच्या फळीवर धडक देऊन जर्मनांनीं त्यांस कित्येक मैल मागें रेटलें. १५ जुलईस त्यांनीं शेवटची धडक मारली.मार्न नदी कित्येक ठिकाणीं ओलांडली. अशा क्रमानें २१ मार्च ते १८ जुलईपर्यंत जर्मनांस जयावर जय मिळत गेले. जर्मन अखेरी साधणार अशी जगाची पुरी खात्री झाली. अशा आणीबाणीच्या प्रसंगी इंग्रज व फ्रेंच यांस अमेरिकानांशिवाय दुसरा आधार कोणाचा! २७ मार्च रोजींच ब्रिटिश महामंत्री मि

लॉईड जॉर्ज यानें अमेरिकनांचा धावा केला ' जर्मनीच्या मोठ्या सैन्यापुढें आमचा टिकाव लागत नाहीं तरी टाकोटाक शक्य तितकें अधिक सैन्य पाठवा, अशी याचना लॉईड जॉर्जकडून येतांच अमेरिकेंतून सैन्याचा एकसारखा ओघ फ्रान्समध्यें वहात राहिला. १९१७ अखेर अमेरिकेची दोन लाख सेना फ्रान्सांत उतरलीच होती. परंतु १९१८ च्या मार्च-पासून जुलईअखेर १३ लक्ष अमेरिकन सैन्य फ्रान्सांत उतरलें आणि नोव्हेंबरापर्यंत तर वीस लक्षांपर्यंत भरती झाली.हें सारें सैन्य ताज्या दमाचें होतें आणि त्याची प्रचंड शक्ति पाठीशी येऊन उभी राहिल्यावर दोस्तां-चें अवसान अनेक पटींनीं वाढलें. त्याच्या जोरावर जर्मनांच्या ऐवजीं फ्रेंच सेनापति फॉक यानें उलट जर्मनांवर धडक मारण्यास प्रारंभ केला. मार्ननदीवरील जर्मन फळीवर त्यानें जोराचे तडाखे लगावले. त्या जोरापुढें जर्मनांची फळी ५।६ मैल मागें सरकली. मार्न नदीवरून हटत हटत जर्मन ऐन नदीवर थांबले. दोस्तांनीं आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या होत्या. दक्षिणेस फ्रेंच व अमेरिकन मिळून लढत असून त्या सैन्यांत ३० टक्के अमेरिकन होते. आरगॉन जंगल व म्यूजनदी यांमधील बाजू अमे-रिकानांनीं संभाळली होती. त्याशिवाय तिसरा विभाग फ्रेंच, ब्रिटिश, इतालियन, बेल्जन, पोर्तुगीज व अमेरिकन यांचा संमिश्र होता. अशा व्यवस्थेनें स्वित्झरलंडपासून ब्रिटिश खाडीपर्यंत दोस्तांच्या सैन्याची रांग लागली होती. सप्टेंबर अखेरपर्यंत जर्मन सेना हटत हटत प्रख्यात हिंडेन-बुर्ग रेषेवर थांबली. या जागीं गेल्या चार वर्षांत जर्मनांनीं स्वसंरक्षणार्थ चांगला बंदोबस्त करून ठेवला होता. त्यांनीं या स्थळीं नेटाची झुंज देण्याचें योजिलें होतें. राखीव सैन्याची जर्मनांनीं येथें मदत घेतल्यामुळें दोस्तांची गति किंचित खुंटली. अमेरिकन व फ्रेंच यांनीं जर्मनांच्या दोन बगलांवर वेगळाले हल्ले चढविले. आरगॉन जंगलापासून म्यूजपर्यंतची एक बगल अमेरिकन सेनापति लिगेट यानें संभाळली. फ्रेंच सेनापति गौरोड आरगॉन जंगलापलीकडच्या बाजूस लढत होता. आणि बेलजन व इंग्लिश सैन्य उत्तरेस बेल्जममध्यें जर्मनांच्या उजव्या बाजूवर हल्ला करीत होतें. ८ आक्टोबर १९१८ रोजीं से. फॉक यानें शेवटच्या टकरेची तयारी

चालविली. तीन दिवस ब्रिटिश सेनेनें अद्भुत पराक्रम करून हिंडेनबुर्ग रेषा फोडली. १६ व्या तारखेस जर्मनांनीं बेल्जम किनारा सोडला. सर्व ठिकाणीं हिंडेनबुर्ग रेषा सुटली व जर्मन सैन्य स्वदेशांत केव्हां प्रविष्ट होणार एवढेंच ठरावयाचें उरलें.

जर्मनी पराभूत होणार अशीं चिन्हें आतां ढळढळीत दिसूं लागलीं. त्यामुळें जर्मनीच्या दोस्तांचेंहि अवसान खचत चाललें. फ्रेंच, ब्रिटिश सार्व्हियन व इतालियन यांच्या संमिश्र सैन्यानें बाल्कन भागांत बल्गेरियाचा पुरा मोड केला. १९१६ च्या डिसेंबर महिन्यांत ऑस्ट्रिया-जर्मनीनें रुमानियाची जी हैराणगत करून सोडली, तीच हैराणगत १९१८ च्या सप्टेंबरांत दोस्तांनीं बल्गेरियाच्या अनुभवास आणून दिली म्हटलें तरी चालेल. किंबहुना सप्टेंबरपासून नोव्हेंबरपर्यंतच्या दोन महिन्यांच्या थोडक्या अवधींत महायुद्धाची परिसमाप्तिच झाली. ता. २९ सप्टेंबर रोजीं बल्गेरियानें दोस्तांपाशीं युद्धतहकुबी मागितली. सर्व्हियनांनीं आपला देश जर्मनीपासून पुन्हां जिंकून घेतला. आक्टोबरच्या ३ ऱ्या तारखेस बल्गेरियाचा झार फार्डिनांड यानें राज्यत्याग केला. नोव्हेंबरांत बल्गेरियांत बंड होऊन प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें. ३१ आक्टोबरास तुर्कस्थानानें दोस्तांपाशीं युद्धतहकुबी मागून घेतली. त्यांत पुढील अटी होत्या–(१) दार्दानेलीस व बॉस्फरस या दोन्ही सामुद्र-धुन्या दोस्तांस खुल्या रहाव्या, (२) यांजवरील संरक्षक किल्ले दोस्तांनीं आपले कबजांत ठेवावेत, (३) तुर्कांनीं आपल्या फौजफाटयास रजा द्यावी आणि (४) तुर्कस्थानांतील माऱ्याच्या ठिकाणांवर दोस्तांची सत्ता असावी. ता. ४ नोव्हेंबरास ऑस्ट्रियास युद्धतहकुबी मिळाली, ती अशी:-(१) आस्ट्रि-यानें आपल्या ऑस्ट्रोहंगेरियन सैन्यास निरोप द्यावा (२) रणसामुग्रीपैकीं बरीच दोस्त व अमेरिका यांस द्यावी (३) पंधरा दिवसांत सर्व जर्मन सैन्यानें ऑस्ट्रिया–हंगेरींतून निघून जावें. (४) सर्व कैद्यांस बंधमुक्त करावें. (५)आपलें बरेंच आरमार दोस्तांस द्यावें, (६)आणि युद्धांत घेतलेला मुलूख सोडावा.

युद्धसमाप्तीनंतर राज्यक्रांति होऊन ऑस्ट्रोहंगेरियन राज्य मोडलें,

झिफोस्लोव्हाक स्वतंत्र झाले व हंगेरी स्वतंत्र झाली. शेवटीं नायक जर्मनी तेवढा राहिला. त्यास नोव्हेंबरच्या ८ व्या तारखेस युद्धतहकुबी मिळून चार वर्षें गाजत राहिलेलें महायुद्ध संपलें. ९ व्या तारखेस जर्मन बादशहा दुसरा विल्यम राज्यत्याग करून हॉलंडच्या आश्रयास जाऊन राहिला. युवराज फ्रेड्रिक विल्यम यानें गादीवरील हक्क सोडला आणि सर्वानुमतानें जर्मनीची नॅशनल असेंब्ली अस्तित्वांत येऊन तिनें नवीन राज्यपद्धति अमलांत आणावी असें ठरलें.

प्रकरण पांचवें

तहाची वाटाघाट

साऱ्या जगांत हलकल्लोळ उडवून देणारें महायुद्ध तर बहुतेक संपलेंच. फक्त त्याचा तहाचा शेवटचा अंक उरला आणि युद्धांतील विजयी राष्ट्रांच्या श्रमाची सार्थकता त्यावरच अवलंबून राहिली. महायुद्धाची सुरवात ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांचे दरम्यान आर्च डयुक फ्रॅन्सिस फार्डिनांड याच्या खुनानें करून दिली असली तरी ऑस्ट्रिया व सर्व्हिया यांच्या वेगळाल्या पक्षास येऊन मिळालेलीं राष्ट्रें केवळ स्वार्थबुद्धीनेंच मिळालीं हें उघड होय. सर्व राष्ट्रांत तुटक अशा अमेरिकेची स्वार्थबुद्धि कमी दृष्टीस पडते; तथापि युद्धाच्या जवळ जवळ अखेरीपर्यंत वाट पाहून शेवटीं इंग्लंडादि दोस्तांस येऊन मिळण्यांत अमेरिकेनेंही एक प्रकारें स्वार्थच साधला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण सारें जग लढाईंत गुंतल्यामुळें जगाची गिऱ्हाइकी एकटया अमेरिकेकडे येऊन युद्धोपयोगी सामानापासून अन्नवस्त्रापर्यंत हरएक चीज जगास पुरविण्याचा मक्ता अमेरिकेस मिळाल्यामुळें अमेरिकेनें संपत्तीच्या व व्यापाराच्या दृष्टीनें आपलें कोटकल्याण करून घेतलें. इंग्लंडेंच साम्राज्य एवढें जगद्व्यापी असतांही अग्रपूजेचा मान अमेरिकेकडे व साऱ्या जगाची शेंडी अमेरिकेच्या हातांत असें अद्वितीयत्व अमेरिकेस महायुद्धानेंच प्राप्त करून दिलें. युरोपासारख्या दूरच्या खंडांत साम्राज्य विस्तारून अमेरिकेस कांहीं तादृश फायदा नसल्यामुळें मुलूखगिरीच्या कटांतून अमेरिका महायुद्धानंतर फुटून निघाली याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

अमेरिकेचा विचार क्षणभर बाजूला ठेवल्यावर ऑस्ट्रिया व सर्व्हिया या दोन पक्षांस जीं राष्ट्रें प्रथमच येऊन मिळालीं, त्यांस महायुद्धाचा शेवट कसा होणार याचा अगाऊ अंदाज नसल्यामुळें त्यांपैकीं बऱ्याच जणांचा स्वार्थमूलक दोष युद्धाचा रागरंग पाहून उशीरा येऊन मिळालेल्या राष्ट्रांपेक्षां कांहीं अंशांनीं कमी ठरतो खरा; तरी पण युद्ध संपून लुटीची वांटणी

करतांना स्वार्थांतील तरतमभाव नष्ट होऊन सर्वच विजयी राष्ट्रें आपलें साधन सोळा आणे कसें करून घेतां येईल या विचारास लागलीं. युद्धाचे परिणाम तुर्की साम्राज्यापुरतेच पाहिल्यास रशियाचा डोळा कॉन्स्टांटिनोपलावर अडीचशें वर्षांपूर्वींप्रमाणें याहि वेळीं निर्विवाद होता. परंतु रशियाचा झारच गादीवर उरला नाहीं, तर त्याचा डोळा तरी ठिकाणावर कोठून राहणार ? युद्धाच्या परिणामांतहि तुर्की साम्राज्याचे दोन भाग करावे लागतात. एक युरोपांतील व दुसरा आशिया खंडामधील. रशिया गळून पडल्यावर बाल्कन राष्ट्रांपैकीं तुर्कांच्या काबूंतून थोड्याच वर्षांपूर्वी सुटलेल्या आणि तुर्कस्थानच्या हद्दीस भिडून असलेल्या ग्रीस देशाचीच तुर्कांस भीति उरते. कॉन्स्टांटिनोपल, आद्रियानोपल व त्या सभोंवारचा टापू यांची पूर्वपीठिका लक्षांत घेतल्यास हा पांचशें वर्षांपूर्वींचा ग्रीकांचा प्रांत ग्रीकांस फिरून मिळवावासा वाटणें मनुष्यमात्राच्या ममत्वबुद्धीस सर्वस्वीं धरूनच होय.

युरोपांतील तुर्की तुकड्यावर ग्रीक पंजा पडण्याचा संभव अशा कारणानें उद्भवला; आणि महायुद्धांत विजयी राष्ट्रांच्या पंक्तीस ग्रीस देश बसला नसतांहि ग्रीसचा प्रधानमंत्री व्हेनीझिलास व इंग्लंड यांच्या जिव्हाळ्याच्या संबंधानें ग्रीसचें कल्याण साधण्याची वेळ आली. युरोपामागून आशिया व आफ्रिका खंडांतील तुर्की प्रदेशांचा विचार शिल्लक राहातो. याकडे पापी नजरेनें पाहाणारांत इंग्लंड, फ्रान्स व ग्रीस यांचा प्रमुखत्वानें निर्देश करणें जरूर आहे. आफ्रिका खंडांतील ईजिप्त इंग्लंडनें अर्धेअधिक महायुद्धापूर्वींच गिळलें होतें. त्यावर तुर्की सुलतानाचें फक्त नामधारी स्वामित्व होतें. तेंहि युद्धकाळीं उडवून देऊन इंग्लंडनें ईजिप्तास आपल्या आश्रित जनांच्या पंक्तीस बसविलें. आणि ब्रिटिश साम्राज्य आतां इतकें मोठें व प्रतिष्ठित झालें होतें कीं, त्याच्या वैभवास उचित अशी जित राष्ट्रांप्रमाणेंच आश्रित जनांची नवी पंगतहि थाटणें त्यास क्रमप्राप्त होतें. अमेरिकेचे तत्त्वज्ञ प्रेसिडेंट मि. विल्सन यांनीं चौदा अमोलिक तत्त्वांची संथा आपल्या दोस्त मंडळींस दिली असल्यानें 'जित' किंवा 'खालसा' या शब्दांचा उच्चार करण्याचीहि आतां दोस्तांची प्राज्ञा नव्हती.

खेरीज तुर्की साम्राज्यांतील आशियामधील देश आश्रयास घेण्याचा इंग्लंडचा डाव इतका नवाहि नव्हता. हे बेत व त्यांची जुळणी इंग्लंडनें पांच पन्नास वर्षें अगाऊच करून ठेविली होती. किंबहुना तुर्कांच्या नाड्या इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व ऑस्ट्रिया या सर्वांनींच भांडवल, व्यापार आणि कर्ज या तीन रज्जूंनीं फार वर्षांपासून आवळून टाकल्या होत्या. ऑस्ट्रिया व जर्मनी यांची पराजयानंतर दुर्दशा उडाल्यानें त्यांचीं सुखस्वप्नें मावळलीं; परंतु इंग्लंड व फ्रान्स यांचीं स्वप्नें रात्रीच्या अंधेरांतून दिवसाच्या उजेडांत नांदावयास बाहेर पडलीं. महायुद्धांत आपल्या सोईसोईनें कधीं आरबांस, कधीं फ्रेंचांस हाताशीं धरून तर कधीं एकटेंच लढून इंग्लंडानें मेसापोटेमिया, अरबस्तान, पॅलेस्ताईन व सीरिया हे प्रदेश जिंकले व खुद्द कॉन्स्टांटिनोपलचाहि कबजा घेऊन टाकला. फक्त त्याची वांटणी दोस्तांत कशी करावयाची एवढाच प्रश्न शिल्लक उरला.

कॉन्स्टांटिनोपल व त्या जवळच्या खाड्या आणि त्या भोंवतालचा प्रदेश अखेर कोणाच्या स्वाधीन राहावा हा मुद्दा वादग्रस्त असला, तरी त्याशिवाय उरलेला आशियाखंडांतील भाग इग्लंड व फ्रान्स यांपैकीं ज्यांच्या हातीं लागला त्यांजकडेच तो कायम रहाणार याबद्दल शंका नव्हती. मेसापोटेमिया इंग्लंडचा, सीरिया फ्रान्सचा, आर्मीनिया अमेरिकेचा, आशिया मायनर इतालीचा किंवा ग्रीसचा आणि कॉन्स्टांटिनोपलहि कदाचित् ग्रीसचेंच अशी वांटणी आपसांत कांहीं अंशीं अंतस्थ व गुप्त करारमदारांनीं व कांहीं अंशीं मनगटाच्या जोरावर ठरून चुकलीहि होती. आणि तुर्कांची मौज अशी आहे कीं, स्वतःच्या साम्राज्यांत खास त्यांचा स्वतःचा स्वदेश नसल्यामुळें त्यांचा कोणताहि मुलूख कोणीहि उपटावा! एकोणिसाव्या शतकांत अशाच उपटाउपटीनें युरोपांतील सारें तुर्की साम्राज्य अस्तास गेलें आणि विसाव्या शतकांत आशियांतील साम्राज्य बुडण्याची पाळी आली. तुर्कांचा स्वदेश मध्य आशियांमधील अमुदर्या व सरदर्या या नद्यांच्या दरम्यान आणि तुर्कस्तान नांवाचें शहरहि सरदर्या नदीच्या कांठीं. अशा दूरच्या स्वदेशांतून सहाशें वर्षांपूर्वीं तुर्क लोक आशिया मायनरांत उतरले ते उपरी म्हणूनच; आणि आज टर्की अगर

तुर्कस्थान या नांवाचा देशच तुर्की साम्राज्यांत अस्तित्वांत नसल्याकारणानें तुर्की साम्राज्य उडवून फक्त तुर्कांचें स्वराज्य जिवंत राखावयाचें असें ठरविणें युरोपियन राष्ट्रांच्या मर्जीवर असतें, तर तुर्कीराज्य नकाशावर दिसणेंहि अशक्य होतें.

सुलतान पक्ष

दोस्तांपासून तुर्कांनीं युद्धतहकुबी ३१ आक्टोबर १९१८ रोजीं मागून घेतली. युद्धांत मोड होतांच ऐक्य व प्रगति संघाचे अधिकारारूढ मंत्रिमंडळ अन्तर्धान पावलें व सुलतानपक्षाचें मंत्रिमंडळ राज्यशकट हांकण्यास दंडधारी होऊन बसलें. नव्या मंत्रिमंडळांतील मुख्य वज़ीर दमाद पाशा होता. त्यानें सर्व राजकीय कैद्यांस बंधमुक्त करण्याचें अभिवचन दिलें आणि अमेरिकेचे अध्यक्ष मि. विल्सन यांच्या स्वयंनिर्णयादिकरून चौदा संस्मरणीय तत्त्वांस अनुसरून दोस्तांबरोबर तह करण्याची इच्छा दर्शविली. त्याचप्रमाणें खिस्ती, इस्लामी, यहुदी इत्यादि धर्मभेद व ग्रीक, तुर्क, आर्मीनियन इत्यादि राष्ट्रभेद लक्षांत न घेतां साम्राज्यांतील सर्व प्रजाजनांस पूर्ण राजकीय हक्क व राज्यकारभारांत वाटा देण्याचें त्यानें कबूल केलें. आरब संस्कृति व तुर्क संस्कृति या भिन्न असून या दोन्ही वर्गांत वैमनस्यहि फार जुनें आहे. यासाठीं अरबांस स्वयंनिर्णयाच्या तत्वास अनुसरून स्वायत्तता द्यावयाची त्यांची तयारीहि होती. मात्र खिलाफत व सुलतान यांचें वर्चस्व त्यांनीं मानावें एवढीच त्यानें अट ठेवली. दमादपाशाचें मंत्रिमंडळ प्रसंग पाहून वागणारें असल्यामुळें त्यांनीं दोस्तांस आवडेल अशी वरील प्रकारची योजना आंखली होती आणि ही योजना कालत्रयींहि मान्य न करणारें व दोस्तांपुढें मान वाकविण्यास तयार नसलेले तलत आणि अनवरपाशा सारखे जर्मन पक्षपाती मुत्सद्दी व वीर यांनीं युद्ध संपताच जर्मनीची वाट धरली होती.

दोस्तांचे बेत

तुर्की साम्राज्याची वाट कशी लावावयाची याचा विचार दोस्तांनीं १९१५ सालींच केला होता. सबंध आर्मीनिया, द पूर्व आशिया मायनर

हा आशियाखंडांतील प्रदेश आणि कॉन्स्टांटिनोपल व दोनही सामुद्रधुन्या राशियानें घ्याव्या. इंग्लंड व फ्रान्स यांनीं मेसापोटेमिया व सीरिया यांचे तुकडे पाडून हैफा व बगदाद यांसुद्धां दक्षिणभाग इंग्रजांनीं आपणासाठीं ठेवावा आणि अलेक्झांड्रिटा व मोसलसुद्धा उत्तर भाग फ्रान्सला द्यावा; इतालीकडे पश्चिम आशियामायनर,स्मरना व अदालिया रहावा, पॅलेस्ताईन वर आन्तरराष्ट्रीय सत्ता चालावी आणि अरबस्थानास स्वातंत्र्य द्यावें असें त्या वेळीं ठरलें होतें.तुर्कसाम्राज्याच्या वांटण्या अशा रीतीनें ठरण्यास तशींच कारणें होतीं. आर्मीनियाचा उत्तरभाग राशियानें तुर्कांपासून पूर्वींच लुबाडून घेतला होता.आर्मीनियांतील वस्ती ख्रिस्ती आणि राशियाहि ख्रिस्ती यामुळें आणि आर्मीनियनांची तुर्कांनीं कत्तल केल्याची बरीच हकाटी झाल्यामुळें तुर्कांचा आर्मीनिया राशियाच्या हवालीं करण्यास इतर दोस्तांची साहाजिकच तयारी होती. भूमध्यसमुद्रांत पाऊल टाकण्यासाठीं कॉन्स्टांटिनोपल व सामुद्रधुन्या आपल्या राज्यास जोडल्या पाहिजेत, याविषयीं राशियाची धडपड दोनशें वर्षें चालू असल्यानें त्या मिळविण्याची महायुद्धानें आणून दिलेली दुर्मिळ संधि राशिया कां दवडील ? इ० सन १५३५ पासून फ्रेंचांनीं व्यापाराच्या मिषानें तुर्की साम्राज्यांत पाया रोंवला आहे. आणि एकोणिसाव्या शतकापासून तर त्यांनीं आपला पुष्कळ पैसा त्यांत खेळता ठेविला आहे. १८५४ पासून १८७५ पर्यंत तुर्क सरकारनें तेरा वेळा परदेशांत कर्ज काढलें आणि त्यांपैकीं दहा वेळा तें फ्रेंचांनीं त्यांस पुरविलें. तुर्क सरकारनें रकमेवरील व्याज भागविण्याकरितां फ्रेंचांस बीट व तंबाखू यांचा मक्ता दिला आणि कर्ज वारण्याकरितां जकातीच्या उत्पन्नाची वाढ, पेटंट व लायसेन्स यांच्या उत्पन्नाची वाढ इतक्या बाबी लावून दिल्या. तुर्कांवर जर्मनी, आस्ट्रिया, इंग्लंड,बेल्जम व फ्रान्स या सर्वांचें कर्ज असून त्याच्या व्यवस्थेसाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. परंतु त्या सर्व सावकारांत फ्रेंचांची रक्कमच मोठी असल्यामुळें फ्रेंच सरकारचें वर्चस्व कॉन्स्टांटिनोपलच्या दरबारीं जबरदस्त होतें. १६०० मैल लांबीचा लोहमार्ग तुर्कस्थानांत फ्रेंचांच्या पैशानें बांधला होता. कॉन्स्टांटिनोपलचें बंदर दीपगृहें, व गॅसचीं कामें फ्रेंच भांडवलावर व श्रमावर उभारलीं गेलीं असून

त्रिपोली जाफा, हैफा हीं बंदरें फ्रेंच भांडवलानें बांधण्याचें निश्चित झालें होतें. त्याखेरीज फ्रेंचांचे कारखाने व शेतें तुर्कस्थानांत बरींच होतीं. सर्व सीरिया तर फ्रेंचांनीं शाळा, कॉलेजें, कारखाने, यांनीं भेदून टाकला होता. या सर्व कारणांमुळें फ्रेंचांची वाटणी इंग्रजापेक्षां मोठी ठरली. तुर्कस्थान फ्रान्सच्या खालोखाल इंग्लंडच्या कर्जांत रुतलें होतें. इंग्लंडनें तुर्कांच्या हद्दींत आपल्या भांडवलावर ४५० मैल लांबीचा लोहमार्ग बांधला होता व त्याखेरीज व्यापाराच्या रूपानें रुपेरी शृंखला तुर्कांच्या पायांत आडकाविली होती. व्यापारानें इंग्लंड व फ्रान्स यांनीं तुर्कस्थानास पूर्वींच अर्धे अधिक पचनीं पाडलें होतें. आणि त्यांतून उरलेले भाग ते राजसत्तेनें फस्त करणार होते. एकंदर लुटीच्या थोड्याबहुत वांट्यानें इतालीचाहि ओटा भरणें जरूर होतें आणि तुर्कांपासून त्रिपोली जबरदस्तीनें घेऊन इतालीनें आपली वसाहतींची प्रबळ इच्छा व्यक्त केलीच होती. यासाठीं कांहींसा ग्रीक-वस्तीचा व समुद्रकिनाऱ्याचा हा प्रदेश दोस्तांनीं इतालीस देण्याचें योजलें असावें. यहुद्यांस पॅलेस्ताईनशिवाय स्वदेश असा पृथ्वीच्या पाठीवर कोठें-हि नाहीं आणि ती तर येशूख्रिस्ताच्या यशानें पुनीत झालेली भूमि. यासाठीं तिजवर एका ख्रिस्ती राष्ट्राची सत्ता प्रस्थापित होणें इतर ख्रिस्ती राष्ट्रांस खपणारें नसल्यामुळें तो प्रांत बारभाईच्या (आन्तरराष्ट्रीय) ताब्यांत ठेवण्याचें ठरलें होतें. अरबस्थानास स्वतंत्र करून अरब संस्कृतीची ही सवत तुर्कांशीं झुंजण्यासाठीं उभी करण्यांत यावयाची होती. पण तिचें स्वरूप निश्चित झालें नव्हतें.

महायुद्धाचीं पहिलीं दोन वर्षें संपल्यावर १९१७ त रशिया मोडून पडला आणि अमेरिका दोस्तांच्या बाजूनें लढण्यास उभी राहिली. तेव्हां पूर्वींची योजना बऱ्याच अंशीं निरुपयोगी ठरली. अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांच्या मतें तुर्की साम्राज्यापैकीं अस्सल तुर्क वस्तीचा भाग तुर्कांकडे रहावा आणि उरलेल्या भागांतील देशास जीवित व वित्त यांची सुरक्षितता आणि अन्तर्गत स्वातंत्र्य मिळावें असें होतें. फेब्रुवारी १९१९ मध्यें भरलेल्या दोस्तपरिषदेंत, विल्सनच्या सूचनेवरून, तुर्कांपासून घेतलेला सर्व मुलूख राष्ट्रसंघाच्या स्वाधीन करावा आणि राष्ट्रसंघानें त्यांज-

वरील देखरेख वेगवेगळ्या दोस्तांकडे सोपवावी अशी योजना मंजूर करण्यांत आली. १९१६ सालच्या योजनेंत व नव्या योजनेंत तत्वतः फरक मुळींच नव्हता. फक्त राष्ट्रसंघाचें रिकामें बुजगावणें नव्या योजनेंत मध्येंच उभें केलें होतें एवढेंच काय तें. ग्रीसचा मुख्य मंत्री व इंग्रजांचा पित्त्या व्हेनिझिलास यानें ही संधि साधून ग्रीसचें घोडें दामटलें. आशिया मायनरांत कांहीं वस्ती ग्रीकांची असल्याकारणानें आशिया मायनरचा पश्चिम किनारा स्मरन्यासुद्धां ग्रीसला मिळावा, असें व्हेनिझिलासचें मत पडलें. पण त्यास इतालीनें आधींच विरोध केला. तेव्हां इतालीचें तोंड त्याला दुसरा घास देऊन बंद करण्याचें ठरलें. आशिया मायनरचा पश्चिम भाग ग्रीकांस मिळावयाचा आणि आर्मीनिया रशियाच्या ऐवजीं अमेरिकेस द्यावयाचा बेत झाला. या भागांत अर्झरूम, व्हान, दायरबेकीर आणि त्रिबीझोंद हीं शहरें मोडतात. पूर्व व पश्चिम भागांची अशा वाटणीनें बोळवण झाल्यावर इतालीस काय द्यावयाचें हा प्रश्न शिल्लक उरतो. ब्रूसा, अंगोरा, कोनिया व सिवास हा पूर्व-पश्चिमच्या मधला टापू खास तुर्कांकडे ठेवावा आणि त्याजवर इतालीची हुकमत(mandate) रहावी अशी नवीन क्लृप्तिहि निघाली. कान्स्टांटिनोपल व सामुद्रधुन्या रशियास मिळण्याचा १९१६ सालींच संकल्प सुटला होता. परंतु रशिया गळाठल्यामुळें तो प्रदेश आन्तरराष्ट्रीय सत्तेखालीं राखण्याचा बेत नव्यानें करावा लागला. तुर्की साम्राज्यापासून अरबस्तान वेगळा तोडावयाचा खरा, पण त्याची व्यवस्था कशी लावावी, हें मात्र नक्की ठरलें नव्हतें. तथापि शेरीफ हुसेन व त्याचा मुलगा अमीर फैजुल यांस इंग्लंडचा पाठिंबा असल्यामुळें हुसेन यास अरबस्थानची गादी देण्यास इंग्लंडची तयारी होती.

ग्रीसची स्मरन्यावर स्वारी.

ग्रीस देशास स्मरना प्रांत बहाल करण्याचा बेत इंग्लंडचा असला तरी त्याची अंमलबजावणी तहानंतरच व्हावयास पाहिजे होती. तथापि स्मरना शहरीं ग्रीक व तुर्क या उभयतांची वस्ती असून स्मरन्यांत बखेडा माजल्यामुळें ग्रीकांवर संकट गुदरेल अशी सबब सांगून ग्रीक सरकारनें स्मरना व्यापण्याची दोस्तांच्या सुप्रीम कौन्सीलापाशीं परवानगी

मागितली आणि ती त्यास देण्यांतहि आली. त्याप्रमाणें १५ मे १९१९ मध्यें ग्रीक सैन्य स्मरन्यास उतरलें. हें कृत्य इताली व फ्रान्स यांस मनांतून खपलें नाहीं. ग्रीकांची हांव बृहद्ग्रीस बनविण्याची असल्यानें त्यास पूर्व थ्रेस, कॉन्स्टांटिनोपल, स्मरना, त्रिबिझोंद, अदाना हा सर्व प्रदेश आक्रमावयाचा होता. स्मरन्यावरील स्वारी ही त्या महत्वाकांक्षेंतील पहिली पायरी होय.

ग्रीकांनीं स्मरना बळकावला हीं गोष्ट कितपत न्यायास धरून झाली, याची चवकशी दोस्तांनीं नेमलेल्या कमिशनानें १२ आक्टोबर १९१९ रोजीं केली. ' स्मरना प्रांतांतील स्त्रियांची स्थिति समाधानकारक आहे. स्मरना ग्रीकांनीं व्यापला हा अन्याय झाला. तुर्कस्थान व दोस्त यांजमधील युद्धतहकुबीच्या शर्तीस सोडून हें वर्तन होय. या कमिशनच्या आभिप्रायावरून केवळ इंग्रजांच्या पाठबळावर ग्रीकहीं दंडेली करण्यास प्रवृत्त झाले आणि फ्रान्स व इताली हीं राष्ट्रें केवळ इंग्लंडच्या भिडेखातर गप्प बसलीं असेंच सिद्ध होतें. तुर्कस्थानचे बाबतींत इत:पर इंग्लंडच्या विरुद्ध वरील दुकलीनें धोरण स्वीकारलें याचें इंगित हेंच होय.

दोस्त परिषदेनें तुर्कांबरोबर करावयाच्या तहाचा मसुदा बनवून त्यांस २१ जून १९१९ रोजीं पॅरिस शहरीं वाटाघाटीस बोलावलें. शिष्ट मंडळांत सुलतान महमद याचा पुतण्या व तुर्कस्थानचा मुख्य वजीर दमाद फेरीद पाशा प्रमुख होता. त्यानें तुर्कस्थान जर्मनीस सामिल झाल्याचा दोष तरुण तुर्कपक्ष व जर्मन मुत्सद्दी यांच्याच कारस्थानास दिला. तरुण तुर्कांच्या पापाचें प्रायश्चित्त तुर्कस्थानास देणें अन्यायाचें होय, असेंहि दोस्त मुत्सद्यांस प्रार्थिलें. पॅरिसच्या दोस्तपरिषदेस हिंदुस्थानचें तत्कालीन स्टेट सेक्रेटरी मि. मॉटेग्यू हेहि मुसलमानांची बाजू मांडण्याकरितां हजर होते. त्यांजपाशीं, साम्राज्य परिषदेसाठीं इंग्लंडांत गेलेले बिकानेरचे महाराज यांनीं हिंदी मुसलमानांची कैफियत सादर केली.

महायुद्धांत तुर्कस्थान इंग्रज सरकारच्या शत्रुस्थानीं असल्यामुळें हिंदुस्थानांतील मुसलमानांची इकडे आड तिकडे विहीर अशी अडचणीची स्थिति झाली. तुर्कस्थानचा सुल्तान हा अखिल मुसलमानांचा,

महंमद पैगंबराचा प्रतिनिधि या नात्यानें धर्मगुरू होता आणि उलटपक्षीं ग्रेट ब्रिटन हिंदी मुसलमानांचे राज्यकर्ते होते. राजनिष्ठा व धर्माभिमान यांच्या विरोधांत येथील मुसलमान सांपडले असतां, आपल्या धर्मगुरूच्या भवितव्याविषयीं त्यांनीं निर्धास्त रहावें म्हणून इंग्लंडचे तत्कालिन मुख्य मंत्री मि. लॉईड जॉर्ज यांनीं 'तुर्कांची सत्ता त्यांच्या स्वतःच्या देशांत (Home land) अबाधित राहील आणि त्या प्रदेशाची राजधानी पूर्ववत् कॉन्स्टांटिनोपल शहरीं असल्यास हरकत घेतली जाणार नाहीं' असें आश्वासन दिलें, म्हणूनच महायुद्धांत हिंदी मुसलमानांनीं त्यांस द्रव्यबळ व मनुष्यबळ पुरविलें. लॉईड जॉर्ज यांचें आश्वासन अर्थातच मोघम होतें. परंतु महायुद्धाच्या समाप्तीनंतर येथील मुसलमान पुढाऱ्यांनीं आपल्या मागण्यास निश्चित व स्पष्ट स्परूप दिलें. त्यांच्या मागण्या तीन प्रकारच्या होत्याः-(१) मुसलमानांचीं तीर्थस्थानें खलिफाच्याच ताब्यांत रहावींत. इंग्रजांनीं बाहुल्याप्रमाणें नाचविलेल्या मक्केच्या शेरीफाच्या हातीं तीं ठेवूं नयेत. (२) जझिरत उल् अरब म्हणजे अरबस्थान हें बेट पैगंबराच्या आज्ञेप्रमाणें खलिफाच्या हुकमतीखालीं ठेवलें पाहिजे. या प्रदेशांत अरबस्थान, मेसापोटेमिया, सीरिया व पॅलेस्ताइन यांचा समावेश होतो. (३) धर्मरक्षणार्थ खिलाफतीचें आस्तित्व पाहिजे. खलिफास आपला इतमाम व अधिकार निर्वेध ठेवण्यास त्याजपाशीं पुरेसा मुलख, पुरेसें सैन्य, पुरेसें आरमार आणि पुरेसें आर्थिक बळ असणें जरूर आहे. या दृष्टीनें थ्रेस, स्मरना व सिसीलिया यांजवर अंमल सुलतानाचाच राहिला पाहिजे. हिंदी मुसलमानांच्या मागण्या या स्वरूपाच्या होत्या. मि. लॉईड जार्ज यांनीं दिलेलें अभिवचन खरें करून दाखविण्याचा मार्गहि यांतच सांपडणार होता. तुर्कांचा जो मुलख अर्थातच दोस्तांनीं लढाईंत जिंकून घेतला होता. तो परत देण्यास परिषद तयार नव्हती. हिंदी मुसलमानांची सर्व मागणी पुरवितां येणारी नव्हती. तरी ती ऐनजिनसी फेंटाळून लावणें इंग्रजांस अविचाराचें वाटल्यामुळें २७ जून रोजीं तहपरिषदेच्या अध्यक्षांनीं आन्तरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार करण्यास मुदत पाहिजे असा बहाणा करून परिषदेचें काम लांबणीवर टाकलें.

ग्रीकांनीं स्मरना व त्या भोंवतालचा मनास वाटेल तेवढा टापू व्यापल्यावर तुर्क सरकारानें आशियामायनरांत मुस्तफा केमालपाशास सैन्यावरील इन्स्पेक्टर जनरलच्या हुद्यावर नेमलें. तेथें जातांच त्यानें राष्ट्रीय चळवळ सुरूं करून स्वतःचें स्वतंत्र सैन्य जमविलें. या कामीं मुस्ताफास माजी आरमारी प्रधान रूफबे, माजी गव्हर्नर जनरल बकरसामी बे वगैरे बडे बडे अधिकारी व बरेच लढवय्ये मिळाले. मुस्ताफाची ही चलबिचल पाहून त्यास तुर्क सरकारानें कान्स्टांटिनोपलास परत बोलाविलें. परंतु त्यानें तो हुकूम मानण्याचें साफ नाकारलें. इतकेंच नव्हे, तर तुर्कस्थानाशीं बेइमान होऊन त्यास दोस्तांच्या दाढेंत दिल्याचा ठपका तुर्कीसरकारावर त्यानें ठेवला, आणि आपला धर्म व देश यांच्या रक्षणार्थ पुढें येण्याचा सर्वांस उपदेश केला. त्या वेळीं त्याजपाशीं दोन तुकड्या (डिव्हिजन्स) होत्या. त्याच्या हांकेस ओ देऊन सिवास व युशक येथील लोक व स्मरना भागांतील तुर्क कमांडर बेकरसामी दहा हजार सैन्यानिशीं त्यास मिळाला. तुर्की राज्यास अंतर द्यावयाचें नाहीं आणि तुर्की साम्राज्यांतील कोणताहि प्रांत दोस्तांस पचूं द्यावयाचा नाहीं असा केमालपाशाचा निश्चय असल्यामुळें सर्व जनता त्यास अनुकूल झाली. तुर्कांच्या हक्कसंरक्षणार्थ आशियामायनर व रुमेलिया यांची एक राष्ट्रीय संस्था स्थापन झाली होती. तिचे उद्देश पुढीलप्रमाणें होते.:—(१) साम्राज्यांतील वेगळाल्या इस्लामी राष्ट्रांचें, त्यांचें वैशिष्टय राखण्याकरितां गट बनविणें (२) सबंध साम्राज्याचें ऐक्य साधेल अशा धोरणानें मुसलमानेतरांस समान हक्क देणें. (३) सप्टेंबर १९१८ त युद्धतहकुबी होईपर्यंत तुर्कांच्या ताब्यांत जेवढा मुलूख होता तेवढा सर्व त्यांजकडे कायम राखणें व (४) तुर्की साम्राज्यसत्तेचा नाश होऊं न देणें. या कामीं राजकीय अगर सांपत्तिक दास्य पत्करावें न लागेल अशा बेतानें कोणत्याहि देशाची मदत घेणें. सन १९१९ च्या सप्टेंबरांत सिवास येथें दुसरी राष्ट्रीय सभा भरून तिच्यांत वरील ठराव पासहि झाला. त्याच्या अंमलबजावणीसाठीं एक कमिटी नेमण्यांत येऊन तिच्या अध्य-

क्षस्थानीं मुस्ताफा केमालपाशा याची योजना झाली. व त्यानें आपल्या सैन्याचें आधिपत्य कारा बकीर काशीम पाशा यास दिलें.

तुर्कांबरोबर करावयाचा तह दोस्तांनीं लांबणीवर टाकला. याचा परिणाम सुलतान व त्याचें मंत्रिमंडळ यांस भोंवल्यावांचून राहिला नाहीं; आणि मंत्रिमंडळापेक्षां केमालपाशाच्या राष्ट्रीय पक्षाची चळवळ तेजस्वी व तुर्क जनतेस फायदेशीर असल्यामुळें राष्ट्रीय पक्षाचें बळही वाढीस लागलें.

जून १९१८ मध्यें लांबणीवर पडलेल्या तहपरिषदेस फेब्रुवारी सन १९१९ अखेर पुन्हां सुरुवात झाली. परिषदेचें काम तीन कमिशनांकडे वांटून देण्यांत आलें. पहिल्या कमिशनानें आर्मीनियाचें स्वतंत्र राष्ट्र बनवावयाचें या दृष्टीनें त्याच्या हद्दी ठरवाव्या, दुसऱ्यानें तुर्कस्थानचें राष्ट्रीय कर्ज व आर्थिक स्थिति यांची चौकशी करावी आणि तिसऱ्या कमिशनानें ग्रीसचे स्मरन्यांत हक्कसंबंध काय आहेत हें पहावें. सामुद्रधुन्या आन्तर राष्ट्रीय केल्या तरी त्यांवर कोणत्या युरोपियन राष्ट्रांचा ताबा राहावा, तसेंच कॉन्स्टांटिनोपल तुर्कांकडे ठेवल्यावरहि कॉन्स्टांटिनोपलच्या हद्दी काय असाव्यात आणि तुर्कांचा आद्रियानोपलवरील हक्क यांचा निर्णय सांगावा.

खिलाफत आणि हिंदुस्थान

पहिल्या तहपरिषदेची वार्ता हिंदुस्थानांत समजण्यापूर्वींच हिंदी मुसलमान सावध होऊन त्यांनीं हिंदुस्थानसरकार व स्टेटसेक्रेटरी यांच्या तहपरिषदेवर वजन टाकण्याची योजना निश्चित केली होती. १९१८ च्या अखेरीस आखिल भारतीय मुस्लीम लीगचे अध्यक्ष डॉ. अन्सारी यांनीं भावी संकटाची पहिली आरोळी दिल्लीस ठोकली, तरी तिजकडे हिंदुस्थानचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं. मुसलमानांच्या खिलाफत चळवळीस हिंदुस्थानांत खरा प्रारंभ अमृतसर येथें राष्ट्रीय सभेबरोबर मौ. शौकतअल्ली यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या खिलाफत परिषदेंतच झाला. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं हिंदुलोकांतर्फे म. गांधी यांनीं खिलाफत चळवळीस जोरानें पाठबळ देऊन खिलाफत बुडविण्याचा ब्रिटिश सरकारचा धोरणाच्या निषेध करणारा अर्ज व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांस शिष्टमंडळामार्फत सादर केला

आणि भारतमंत्री मि. मॉंटेग्यू व मुख्यमंत्री मि. लॉईड जॉर्ज यांच्या भेटीस मौ. महमद अल्ली प्रभृति मुसलमानांचें शिष्टमंडळहि रवाना झालें.

हिंदी मुसलमानांस ब्रिटिश मुत्सद्यांच्या पाताळयंत्राविषयीं भीति वाटण्यास एक सबळ कारण सांपडलें. १२ सप्टेंबर १९१९ रोजीं इंग्लंडतर्फे फ्रेस्टर, नोलन व चर्चिल आणि सुलतानातर्फे मुख्य वजीर दमाद फरीद पाशा यांचे दरम्यान पुढीलप्रमाणें गुप्ततहहि ठरला होता. (१) खिलाफत कॉन्स्टांटिनोपलांत रहावी, सामुद्रधुन्या ब्रिटिशांच्या ताब्यांत जाव्यात, सुलतानानें इंग्रजांच्या नजरेखालीं खिलाफतीची सत्ता चालवावी, सीरिया व मेसापोटेमिया इत्यादींवर ब्रिटिशांचा अंमल प्रस्थापित होण्यास सुलतानानें संमति द्यावी, ईजिप्त व सायप्रस यांवरील हक्क सुलतानानें सोडावे आणि कुर्दिस्थान स्वतंत्र होण्यास हरकत घेऊं नये. या गुप्त तहाची कुणकुण कानीं आल्यामुळें धाबें दणाणून मुसलमान शिष्टमंडळ हिंदुस्थानांतून तातडीनें इंग्लंडच्या वाटेस लागलें.

तुर्कीतह व पक्षभेद

तुर्कस्थानाशीं करावयाचा तह कोणत्या धोरणावर असावा यासंबंधानें इंग्लंड, तुर्कस्थान व हिंदुस्थान या देशांत अनेक पक्ष असल्यामुळें त्या प्रत्येक पक्षाचें मत सारांशानें एकत्र नमूद केल्यास या वादाची नीट व स्पष्ट कल्पना वाचकांस येईल. खुद्द इंग्लंडांत लॉइड जॉर्ज पक्ष व बिशपपक्ष हे दोन प्रमुख पक्ष असून इंग्लंड व तुर्कस्थान या उभयतांचेंहि हित साधणारा असा अँग्लो–आटोमन पक्ष होता. एकदिलानें लढलें तरच महायुद्धांत विजयश्रीनें माळ घालण्याचा संभव आहे, अशी खात्री पटल्यामुळें ब्रिटिश मंत्रिमंडळ सर्वपक्षीय बनविण्यांत येऊन त्याचें धुरीणत्व लॉईड जॉर्ज यांजकडे आलें होतें या दृष्टीनें तुर्की तहावरील लॉईड जॉर्ज यांचें मत म्हणजे इंग्लंडच्या जबाबदार मुत्सद्यांचें मत होय. तें मत निवेदन केलें म्हणजे तहाचें शेवटचें टोक ओझरतें तरी दिसूं लागतें. पार्लमेंटांतील आक्षेपकांस उत्तर देतांना मि. लॉईड जॉर्ज यांनीं ता. २५ फेब्रुवारी १९२० रोजीं पुढील विचार प्रकट केले.

मि. लॉईड जार्ज यांचें मत

तुर्कांस कॉस्टांटिनोपलांत राहूं देणें आम्हांस सारासार विचाराअंतीं

श्रेयस्कर वाटतें. डिसेंबर १९१९ मध्यें मी म्हणालों होतों कीं,सामुद्रधुन्यावर तो (तुर्क) रखवालदार (गेट कीपर) आतां रहाणार नसून निराळाच पहारेकरी (पोर्टर) राहील. त्याच लोकांकडे फिरून सामुद्रधुन्यांची राखण ठेवणें म्हणजे मूर्खपणाचा कमाल करणें होय. सन १९१८ च्या जानेवारी महिन्यांत जे उद्गार मी काढले होते, ते सर्व पक्षांच्या संमतीनेंच काढले होते; ते असे कीं आम्ही ऑस्ट्रिया-हंगेरीचा नाश करण्यासाठीं लढत नाहीं. तुर्कस्थानची राजधानी घेण्याचा किंवा ज्यांत तुर्कांची मुख्य वस्ती आहे ते आशियामायनर व थ्रेस हे तुर्कांचे संपन्न व सुप्रसिद्ध प्रांत बळकावण्याचाहि आमचा विचार नाहीं. तुर्कांची वस्ती (Home land) ज्यांत प्रामुख्यानें आहे त्यावर तुर्कांचीच सत्ता रहावी व कॉन्स्टांटिनोपल मध्येंच त्यांची राजधानी असावी अशीच आमची इच्छा आहे. मात्र सामुद्रधुनींची वाट आन्तरराष्ट्रीय व तटस्थ रहावी.आमच्या मतें अरबस्थान आर्मीनिया, मेसापोटेमिया, सीरिया आणि पॅलेस्ताइन हीं राष्ट्रें स्वतंत्र व्हावीं. आमच्या या जाहीर आश्वासनामुळेंच हिंदुस्थानांत सैन्यभरतीचें काम जोरास लागलें.

आम्ही तुर्कांपुढें तहाच्या अटी मांडल्या व त्यांनीं त्या एककल्लीपणानें झिडकारल्या असें म्हणून तुम्हीं मोकळें होऊं इच्छितां. पण ब्रिटिशसत्ता ही जगांतील सर्व मुसलमानी सत्तांपेक्षां मोठी सत्ता आहे, हें तुम्ही विसरतां. तहानंतर तुर्कांचा अर्धा अधिक मुलूख जाणार, त्याजवर दोस्तांच्या तोफा रोखलेल्या रहाणार, त्यांचें सैन्य, आरमार व इभ्रत जगांतून नष्ट होणार, यानें तुर्कांच्या कोणत्या शत्रूचे डोळे निवणार नाहींत ?

तुर्कांशीं करावयाच्या तहांत आपण तीन गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. सामुद्रधुन्या स्वतंत्र राखणें ही पहिली गोष्ट. तुर्की साम्राज्यांतील तुर्केतर जातींस तुर्की सत्तेखालून मोकळें करणें ही दुसरी गोष्ट आणि तुर्की अशा जातीवर तुर्कांचें स्वराज्य कायम ठेवणें ही तिसरी गोष्ट. या तीन गोष्टींची व्यवस्था लावतांना आम्ही दोन प्रकारें खबरदारी घेणार. एक तर ज्या जातींवर तुर्कांनीं पूर्वीं जुलूम केला आहे त्यांवर तो पुन्हां

होऊं देणार नाहीं आणि दुसरें आपल्या समृद्धभूमींतील खनिज पदार्थ काढण्याचा हक्क तुर्कांकडून कोणाहि परकीय राष्ट्रांस मिळूं देणार नाहीं.

सामुद्रधुन्यावर तुर्कांचे किल्ले आहेत ते पाडून टाकावयाचे,सामुद्रधुन्यांच्या आसपास त्यांस सैन्य ठेवूं द्यावयाचें नाहीं, आणि तुर्कांपाशीं आरमार राहूं द्यावयाचें नाहीं. दोस्तांचें सैन्य मात्र तेथें राहील. असें न केलें तर सामुद्रधुन्यांच्या बंदोबस्ताचा दुसरा इलाज कोणता ? कॉन्स्टांटिनोपल व सामुद्रधुन्याभोंवतालचा प्रदेश यांवर आंतरराष्ट्रीय सत्ता ठेवणें हाहि एक उपाय आहे. पण त्या प्रदेशांतील पंधरा लक्ष लोकांवर फ्रान्स,इताली व इंग्लंड यांनीं मिळून राज्य करणें घोंटाळ्याचें आहे. आर्मीनियाचें पालन अमेरिकेनें केलें असतें पण ती त्यास तयार नाहीं. अशा स्थितींत आर्मीनियाचें काय करावें ? कॉन्स्टांटिनोपलमध्यें सुलतान व त्याचें मंत्रिमंडळ ठेवून त्यावर ब्रिटिश गॅरिसन व आरमार यांचा पहारा राखणें आर्मीनियनांस सोयीचें किंवा सुलतानास आशियामायनरमधील कोनियांत पिटाळून लावून त्याच्या ताब्यांत आर्मीनियनांस देणें सोयीचें ?

मि. मॉँटेग्यू

मि. लॉईड जॉर्ज यांचें धोरण बहुतेक जबाबदार ब्रिटिश मुत्सद्यांस मान्य होतें. लॉर्ड रॉबर्ट सेसिल यांची सुलतानास कॉन्स्टांटिनोपलमध्यें राहूं देण्यास हरकत मुळींच नव्हती. कॉन्स्टांटिनोपलवर तुर्कांची सत्ता मात्र त्यांस नको होती. युनियनिस्ट पक्षाचे पुढारी मि.बोनर लॉ यांचें मत मि. लॉइड जॉर्ज यांस सर्वस्वी अनुकूल होतें. मि. मांटेग्यू यासारखा मुसलमानांचा कैवारी क्वचितच आढळेल. ते म्हणाले कीं, कॉन्स्टांटिनोपल तुर्कांपासून जर आपणांस घ्यावयाचेंच होतें, तर महायुद्धांत हिंदुस्थानांतील मुसलमानांची आपण मदतच मागावयास नको होती. हिंदुस्थानांत शांतता राखावयाची तर कॉन्स्टांटिनोपल तुर्कांकडेच ठेवणें भाग आहे. सर एडवर्ड कार्सन हे आल्स्टर प्रांताचे पुढारी होत. दोस्त तुर्कांस कॉन्स्टांटिनोपलमधून घालवूं म्हणतील तर दुसरें महायुद्ध उद्भवेल असें त्यांनीं स्वच्छ सांगितलें.

ब्रिटिश मंत्रिमंडळाचा वरील विचार साम्राज्यदृष्ट्या होताच. परंतु

साम्राज्याच्या अभिमानापेक्षां ज्यांचा धर्माभिमानच अधिक कडवा होता त्यांची विचारसरणी अगदींच एककलीपणाची होती. कोणीहि ख्रिस्तधर्मानुयायी माणसास तुर्की अमलाखालीं राहूं लागू नये यावर इंग्लंडांतील कान्टरबरी व यॉर्क येथील आर्चबिशप व लंडनचा बिशप यांचा मुख्य कटाक्ष होता. व त्यांचीच विचारसरणी सेशिआलिस्टपक्षाचे पुढारी हिंडमन, लॉर्ड ब्राईस, प्रो. ओमॅन व कांहीं अंशीं उपरिनिर्दिष्ट लॉर्ड रॉबर्ट सेसिल यांची होती. ते आपल्या पत्रकांत म्हणतात,कॉन्स्टांटिनोपल तुर्कांच्या सत्तेखालीं ठेवल्यानें दुर्दैव ओढवेल इतकेंच नव्हे तर इंग्लंडची अपकीर्ति होईल. या शहरांत बसून या पूर्वींच तुर्कांनीं अनेक कुटिल कारस्थानें रचलीं आहेत. सदर शहर राष्ट्रसंघाच्या ताब्यांत गेल्यास खऱ्या मुसलमानास राग येणार नाहीं. कॉन्स्टांटिनोपलांतच खिलाफत राहिली पाहिजे असा आग्रह धरण्याचें मुसलमानांस कारण नाहीं. खिलाफत सुलतानाकडे असली व मग सुलतान कोठेंहि राहिला तरी लोक त्यास खलिफा म्हणून ओळखतीलच.

ख्रिस्ती लोकांवर मुसलमानांची हुकमत चालूं नये हा बिशपादिकरून ख्रिस्ती धर्मानुयायांचा मोठा आग्रह तर खराच. पण त्या खेरीज ग्रीकपंथाचें प्राचीन पुण्यक्षेत्र जें कॉन्स्टांटिनोपल तें साडेचारशें वर्षांनंतर फिरून ख्रिस्ती सत्तेखालीं यावें हीहि त्यांची प्रबळ इच्छा होती. ब्रिटिश-मंत्रिमंडळास हिंदी मुसलमानांची मर्जी राखून राजकारण साधावयाचें असल्यामुळें त्यांनीं सामुद्रधुन्या व तुर्की स्वराज्यांत न मोडणारा मुलख तुर्की सत्तेखालून काढून घेण्यापुरतेंच आपलें धोरण आंखलें.

अँग्लो-आटोमनपक्ष

ब्रिटिश मंत्रिमंडळ व बिशपपक्ष याखेरीज तुर्कांशीं मैत्री संपादूं पहाणारा अँग्लो आटोमन नामक इंग्रजी पक्ष होता.त्यानें आपलें मत १२ फेब्रुवारी १९२० रोजीं मि. लॉईड जॉर्ज यांस कळविलें. या पक्षांत लॉर्ड मौब्रो, मुंबई इलाख्याचे माजी गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन, सेनापति सर ब्रायन महॉन व मुंबईच्या क्रॉनिकल पत्राचे माजी संपादक मि. मार्माड्यूक पिक्थॉल यांची प्रमुखत्वानें गणना करणें जरूर आहे. ते आपल्या

कैफियतींत म्हणतात—ग्रीक सैन्यानें आइदिन विलायत (स्मरना प्रांत) व्यापली ही गोष्ट आम्हांस शरमेची वाटते. थ्रेस व कॉन्स्टांटिनोपलहि तहाचे वेळीं तुर्कांपासून छिनावून घेण्यांत येणार असें ऐकतों, ह्यामुळें वचनभंग होणार आहे. तसें झाल्यास आशिया व ईजिप्त यांतील लोकमत इंग्रजांविरुद्ध क्षुब्ध होईल. जगांत शांति राखावयाची असेल तर थ्रेस, आशिया मायनर व कॉन्स्टांटिनोपल तुर्कांपासून हिसकावलें जाणार नाहीं, असें इंग्लंडनें जाहीर करावें.

मौ. महमदअली

ब्रिटिश मंत्रिमंडळ व तुर्कांविषयीं सहानुभूति बाळगणारी विचारी इंग्रजांची अँग्लो-आटोमन सोसायटी यांच्या मताच्या पाठोपाठच तहाच्या कलमांतील पावलें वळणार ही गोष्ट ठरल्याप्रमाणेंच होती. आतांपर्यंत इंग्रज लोकांच्या मताचा विचार झाला.यापुढें हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या मताचा विचार करणें इष्ट होय. हिंदुस्थानांत खिलाफतीचा व तुर्क लोकांच्या हक्कांचा पुरस्कार करण्याकरितां खिलाफत कमिट्या स्थापन झाल्या होत्या. सन १९१९ च्या अखेर त्यांची परिषद भरून तिच्या वतीनें इंग्लंडमध्यें शिष्टमंडळ रवाना झालें. सदर शिष्टमंडळाचें मौ. महमदअली प्रमुख पुढारी होते. महमद अली यांनीं मि. लॉईड जॉर्ज यांची १९ मार्च १९२० रोजीं गांठ घेतली. त्यावेळीं हिंदी मुसलमानांची बाजू त्यांनीं पुढीलप्रमाणें मांडली. इस्लामाचीं केंद्रें दोन होत. एक केंद्र खुद्द खालिफा व दुसरें जझिरत उल् अरब (Land of the Prophets) धर्मरक्षणार्थ इस्लामास राजसत्तेची जरूरी वाटली. मक्का, मदिना व जेरूसलेम आणि नेझेफ, करबेला, काझीमन, समारा व बगदाद या पवित्र क्षेत्रांचा समावेश जझिरत उल् अरबमध्यें होतो. कॉन्स्टांटिनोपल हेंहि मुसलमानांच्या दृष्टीनें पवित्र क्षेत्रच होय. खिलाफतीचें अधिष्ठान त्या क्षेत्रीं पांचशें वर्षें आहे. कॉन्स्टांटिनोपल, थ्रेस व आशिया मायनर यांत मुसलमानांचेंच बाहुल्य असल्यामुळें हे प्रदेश तुर्की सत्तेखालींच राहिले पाहिजेत. धर्म निराळा व राज्य निराळें असें मुसलमान मानीत नाहींत. थ्रेसची व्यवस्था स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसारें व्हावी. स्मरना ग्रीकांनीं

अन्यायानें लाटला आहे. ते महायुद्धांत तुर्कांविरुद्ध व दोस्तांच्या वतीनें लढत नव्हते. स्मरना प्रांतांत मुख्य वस्ती तुर्कांचीच आहे. युरोपांतून व तसेंच आशियामायनरमधूनहि तुर्कांचें चंबुगवाळें हलविलें तर तें ठेवण्यास कोठेंहि जागाच उरणार नाहीं. ज्या उद्देशानें स्मरना प्रांत ग्रीकांस हवा आहे, त्याच उद्देशानें आर्मीनिया प्रांत (सिलीशिया) खिस्त्यांस पाहिजे आहे. आर्मीनियनांची तुर्कांनीं कत्तल केली असा आरोप आहे. यासाठीं एक आन्तरराष्ट्रीय कमिशन नेमून व त्यांत अखिल भारतीय खिलापतीचा एक प्रतिनिधी घेऊन या आरोपाची चौकशी करावी. बाल्कन प्रांतांतील कारस्थानें सिद्धीस गेल्यावर रशियानें आर्मीनिया व आशियामायनर यांत कारस्थानें चालविलीं. कत्तली झाल्या असल्या तर या कुटिल कारस्थांना-मुळेच झाल्या. सुलतानांच्या ख्रिस्ती प्रजाजनांनीं क्रांतिकारक मंडळ्या स्थापन केल्या, त्यांचाहि कत्तलीबरोबरच विचार होणें आगत्याचें आहे. आर्मीनियनांची तुर्कांनीं कत्तल केली म्हणतात. पण आर्मीनियनांप्रमाणेंच इतर ख्रिस्ती व यहुदी तुर्कांच्या खालीं आहेत.त्यांची तुर्कांनीं कत्तल केल्याचा बोभाटा कां नाहीं ? आर्मीनियन पांचशें वर्षें तुर्की अमलाखालीं आहेत. मग त्यांच्या कत्तलीचा बोभाट यापूर्वीं कधीं कां झाला नाहीं ?

मौ. महमदअल्ली यांच्या कैफियतीचा थोडक्यांत निष्कर्ष असा कीं, तुर्कांचें संख्याबाहुल्य म्हणून थ्रेस व आशियामायनर तुर्कांकडेच राहावा. खिलाफत पांचशें वर्षें कॉन्स्टांटिनोपलमध्यें राहिली म्हणून ती यापुढें तशीच कॉन्स्टांटिनोपलांत रहावी. आणि जेरूसलेम, मक्का, मदिना, बगदाद वगैरे शहरें जझिरत उल् अरब या प्रदेशांत सांपडतात, म्हणून पॅलेस्टाइन, सीरिया, अरबस्थान व मेसापोटेमियाहि तुर्की सत्तेखालींच रहावा. आर्मीनियन लोकांच्या कत्तलीचा आरोप खोटा असल्यामुळें आणि खोटा नसला तर आर्मीनियनांच्या बंडखोरीचें तें प्रायश्चित्त असल्यामुळें आर्मीनिया तुर्कांपासून काढून घेण्याचें प्रयोजन नाहीं.

या युक्तिवादावर लॉइड जॉर्ज यांनीं दिलेलें उत्तर महत्त्वाचें आहे. ते म्हणाले—"जर्मनी, ऑस्ट्रिया याप्रमाणेंच तुर्कस्थान आमच्याविरुद्ध लढला. तुर्कस्थानानें आम्हांविरुद्ध लढावें असा आम्हीं त्याचा कोणता

अपराध केला होता ? अरबस्थान व सीरिया यांतील अरबांची जात तुर्कांहून वेगळी आहे. स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार त्यांस स्वातंत्र्य हवें आहे. मक्केचा शरीफ हुसेन याचा पुत्र फैजुल यानें दमास्कस येथें सीरियाचा राजा व्हावें अशी अरबांची इच्छा आहे. आर्मीनियनासारख्या ख्रिस्त्यांस जें स्वातंत्र्य हवें आहे, तें तुर्कांहून भिन्नजातीय मुसलमानांस नको काय ? अरब मुसलमान म्हणून त्यांनीं तुर्कांचें अंकित होऊन रहावें काय ? सीरियानें स्वातंत्र्य मागितलें व तें आम्हीं त्यास दिलें. तुर्की भागावर तुर्कीसत्ता चालेल; पण अतुर्की भागावर तुर्कांची सत्ता आम्हीं चालूं देणार नाहीं ऑस्ट्रियासहि हाच न्याय आम्हीं लागूं केला; मि. लॉईड जॉर्ज यांच्या या उत्तरावरून थ्रेस, कॉन्स्टांटिनोपल व आशियामायनर एवढाच मुलूख तुर्कांच्या ताब्यांत ठेवण्याचा इंग्लंडचा उद्देश स्पष्ट दिसतो.

खिलाफत परिषदेच्या मानानें सुलतानपक्षाची मागणी फारच सौम्य होती. तुर्क सरकारचा मुख्य वजीर व परराष्ट्रमंत्री सलीपाशा यानें फेब्रुवारी १९१९ मध्यें दोस्तांस आपलें म्हणणें पुढीलप्रमाणें कळविलें. यांतील अटी व १२ सप्टेंबर रोजीं झालेल्या गुप्त करारांतील अटी यांत फरक नव्हता. (१) तुर्की साम्राज्याखालील ज्या भागांत तुर्कांचें बाहुल्य असेल तो भाग तुर्की सत्तेंत रहावा. (२) दोस्तांनीं घेतलेल्या मुलुखांचा दर्जा बदलावा व (३) तहांत कोणताहि निर्णय ठरविण्यापूर्वी तुर्क शिष्टमंडळाचें म्हणणें ऐकून घ्यावें. मि. लॉईड जॉर्ज यांनीं ठरविलेली योजना व तुर्क सरकारनें केलेली मागणी यांचा मेळ तंतोतंत बसत होता.

सुलतान पक्ष अगदींच गाय झाला असल्यामुळें त्याचें मत म्हणजे तुर्की राष्ट्राचें मत खास नव्हतें. सुलतानपक्षाची ही दीन वृत्ति मान्य नसणारा असा खरा राष्ट्रीय व तेजस्वी पक्ष म्हटला म्हणजे मुस्तफा केमालपाशाच्या पंखाखालीं आशियामायनरमध्यें वाढत चाललेला पक्ष होय. त्या ठिकाणीं सबंध तुर्की राज्यास एकवटणारा अनातोलियन ॲन्ड रुमेलियन लीग स्थापन झाला होता त्याला पुढें राष्ट्रीय मंडळ (National Organisation) हें नांव मिळालें. तरुण तुर्कपक्षाचें नवीन जीव धरणारें रोपडें हेंच होतें. त्यानें आपलें उद्दिष्ट येणेंप्रमाणें ठरविलें होतें.—(१) तुर्की साम्राज्यांत मुसलमानीच

पण वेगवेगळ्या जातींचीं राष्ट्रें अनेक आहेत पण ती राजकीय व भूगोलिक दृष्ट्या अविभाज्य आहेत. त्यांचें जातवार रक्षण होण्याकरितां वेगवेगळे गट बांधणें व त्यांचा तुर्की साम्राज्यांत संग्रह करणें (२) सबंध साम्राज्याचें राजकीय ऐक्य साधेल अशा धोरणानें मुसलमानेतर जातींस मुसलमानांच्या बरोबरीचे हक्क देणें (३) सप्टेंबर १९१८ त युद्ध संपलें त्या वेळीं तुर्कांच्या ताब्यांत जो मुलूख होता तो कायम राखणें (४) तुर्की साम्राज्य-सत्तेचा नाश होऊं न देणें व या कामीं परक्याचें राजकीय व सांपत्तिक दास्य न पत्करतां परराष्ट्रांची मदत घेणें.

ब्रिटिशांचें मंत्रिमंडळ व तुर्कांचा राष्ट्रीय पक्ष यांच्या धोरणांत बरेंच अंतर दृष्टीस पडतें. राष्ट्रीय पक्ष तुर्केतर मुसलमानी जातींस तुर्की साम्राज्यांतून जाऊं देण्यास तयार नव्हता. देशाची आर्थिक स्थिति सुधारण्यास लॉईड जॉर्ज जें स्वातंत्र्य देणार नव्हते, तें मिळविण्याचा तरुण तुर्कपक्षाचा इरादा होता. सुलतान पक्ष व तुर्क पक्ष यांचें आतांपर्यंत सूत नव्हतें. परंतु आधीं स्मरना प्रांत व मग थ्रेस आणि कदाचित् कांन्स्टोटिनोपलहि ग्रीकांस मिळावयाचें असलें तर तुर्कांचें राज्य रहाणार तरी कोठें अशी उभय पक्षांस चिंता पडून त्यांचें दोस्तांविरुद्ध सख्यहि जमण्याचा संभव उत्पन्न झाला. इंग्रजांस ही भीति होतीच. त्यांनीं आपल्या हायकमिश-नरमार्फत कॉन्स्टांटिनोपलचा ताबा घेतला, आणि तुर्कस्थानावर जो तह लादावयाचा आहे तो बिनबोभाट अमलांत यावा यासाठीं ही पूर्व तयारी होय, असेंहि हायकमिशनरानें कॉन्स्टांटिनोपल घेतेवेळीं जाहीर केलें. इंग्लिश, फ्रेंच व इतालियन या सर्वांचीं सैन्यें या मसलतींत होतीं; पण त्यांचा पुढाकार इंग्रज सेनापति मिलने यानें घेतला होता. ता. १६ मार्च १९२० रोजीं त्यानें सरकारी कचेऱ्या व्यापल्या. राज्यकार-भार कांहीं दिवस तुर्क अधिकाऱ्यांकडे राहील. पण तो लवकरच काढून घेतला जाईल असेंहि सुलतानास कळविण्यांत आलें. से. मिलने यानें कांहीं पार्लमेंटच्या सभासदांसहि संशयावरून पकडलें; तुर्की वर्तमानपत्रें लालूच दाखवून आपल्या बाजूस ओढलीं; मुख्य वजीर सली पाशा यास

राजिनामा द्यावयास लावलें व दमाद पाशास वजीर नेमून त्यास नवें मंत्रिमंडळ बनविण्यास सांगितलें.

अंगोऱ्याची नॅशनल असेंब्ली

ग्रेट ब्रिटनच्या कारवाईनें सुलतान व मंत्रिमंडळ आतां दोस्तांच्या हातांतील बाहुलें बनलें; आणि त्यांचा व केमाल पक्षाचा संबंध अर्थातच तुटला. केमालपाशानें आपलें धोरण ताबडतोब बदललें. कॉन्स्टांटिनोपल स्वतंत्र राहिलें नसल्यामुळें तेथील सरकारचा अंकित इतःपर मी नाहीं असें त्यानें सुलतानास कळविलें, आणि अनातोलियांत स्वतंत्र राज्य स्थापण्याचें व शेख उल् इस्लामची नवी नेमणूक करणें जरूर असल्याचें मुसलमान बंधूंच्या कानावर घातलें. इस्लामच्या तत्त्वाप्रमाणें खलिफा स्वतंत्र असला पाहिजे; पण तो तसा आतां नसल्यामुळें सुलतान हा खलिफाच नव्हे असेंहि त्यानें ठरवून टाकलें. मुस्तफा युद्धमंत्री झाला व त्यानें अंगोऱ्यास नॅशनल असेंब्लीचीहि प्राणप्रतिष्ठा केली तींत कॉन्स्टां-टिनोपलहून पळून आलेले पार्लमेंटाचे कित्येक सभासदहि होते. या सुमारास फ्रान्सचा अध्यक्ष एम्. मिलरँड यास केमालपाशानें पत्र लिहिलें तें वाचलें म्हणजे इंग्रजांनीं तुर्कांची कशी विटंबना मांडली होती याची कल्पना येते. तें पत्र असें, 'दोस्त सैन्यानें कॉन्स्टांटिनोपल शहर केवळ अन्यायानें बळकावलें आहे. त्यामुळें आमचा खलिफा कैद झाला. ता. २३ एप्रिल १९२० रोजीं आम्ही अंगोऱ्यास नवीन निवडणूक करून ग्रँड नॅशनल असेंब्लीची पहिली सभा भरविली. खलिफा व कॉन्स्टांटि-नोपल परक्यांच्या ताब्यांत असेंपर्यंत हीच संस्था कायदेशीर समजा-वयाची. युद्धतहकुबीचे नियम दोस्तांनीं दंडेलीनें मोडले आहेत. त्यांचा नॅशनल असेंब्ली निषेध करीत आहे. कॉन्स्टांटिनोपलास पार्लमेंट सभा भरली असतां इंग्रज पोलिसांनीं सभासदांस पकडून नेलें; सिनेटर, डेप्युटी, सेनापति व पंडित यांस हद्दपारीवर पाठविलें आणि कित्येक संभावि-तांच्या हातांत खोडाहि घातला. अशा स्थितींत उस्मानी लोकांनीं आपली राजधानी अंगोऱ्यास आणिली आहे. कॉन्स्टांटिनोपलहून निघणारा हुकूम

अगर फतवा त्यांस आतां मान्य नाहीं. तुर्क लोक आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण आपणच करणार. आमच्या राज्यांतील ख्रिस्त्यांचें संरक्षणहि आम्हीच करणार. पण त्यांनीं देशहिताच्या आड येणारें कोणतेंहि कृत्य करतां कामा नये.

सेव्हर्सचा तह

मार्च महिन्यांत कॉन्स्टांटिनोपलचा ताबा घेतल्यावर मे महिन्यांत पॅरिस येथें तहपरिषदेच्या कामास दोस्तांनीं सुरवात केली. या तहास सेव्हर्सचा तह म्हणतात. हिंदुस्थान सरकारनें सिमल्याहून १४ मे १९२० रोजीं जादा गॅझेट काढून तहाचीं कलमें प्रसिद्ध केलीं तीं पुढील प्रमाणें:—

१ तुर्की राष्ट्राच्या चतुःसीमा—युरोपांत उत्तरेस नौली येथील तहानें ठरलेली बल्गेरियाची हद्द; पश्चिमेस मारित्झा नदीचें डावें तीर; मात्र आद्रियानोपलपासून समुद्रापर्यंत वाट करून देण्याकरितां म्हणून मारिट्झा नदीवरील पूल आणि त्या नदीच्या उजव्या तीरावरील रेल्वे तुर्कस्थानला दिली जाईल. मारिट्झा नदीच्या दोन्ही बाजूस ३० किलोमीटरचा टापू बिनलष्करी समजला जावा. (त्यांत लष्करी छावणी अगर तटबंदी करूं नये) इंब्रास व टनेडांस खेरीज करून सर्व बेटांवरील हक्क तुर्कस्थानानें सोडावा. करील दोन बेटांनाहि तुर्कस्थानानें स्वराज्य द्यावें. आशिया खंडांत फ्रान्स व तुर्कस्थान यांचे दरम्यान झालेल्या तहानें ठरलेली सीरियाची हद्द कायम समजावी. इराकची मोसलच्या बाजूची सरहद्द राष्ट्रसंघानें ठरवावी. तुर्कस्थानानें सीरिया, पॅलेस्ताईन, इराक, हेज्जाज अरबस्थान, इजिप्त, सुदान, लिबिया, व सैप्रस यांवरील अधिराज्याचा हक्क सोडून द्यावा. तुर्कस्थानाची ही जी चतुःसीमा ठरली आहे तिच्या पलीकडील कोणत्याहि मुलुखांतील रहिवाशांवर तुर्कस्थानानें कसलाहि राजकीय हक्क सांगू नये. खलिफाची सत्ता त्याजवर चालण्यास दोस्त राष्ट्रांची हरकत नाहीं.

२ सामुद्रधुन्या—शांततेच्या काळांत अगर युद्धाचे वेळीं तुर्कस्थान तटस्थ असेपर्यंत व्यापारी जहाजांना सामुद्रधुन्यांतून केव्हांहि जाण्यायेण्यास पूर्ण मुभा असावी. तुर्कस्थान युद्धांत सामील असेल तर फक्त

तटस्थ राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांना मोकळीक असावी; मात्र काळ्या समुद्राच्या तीरावरील कोणत्याहि एका राष्ट्राच्या आरमाराहून अधिक लढाऊ जहाजें एकाच वेळीं कोणत्याही राष्ट्रानें पाठवूं नयेत. कोणत्याहि राष्ट्राला १० हजार टनांहून कमी अशीं किमानपक्ष तीन लढाऊ जहाजें पाठविण्याचा हक्क असावा. युद्ध उपस्थित झालें असून तुर्कस्थान तटस्थ असेल तर युद्धचमान राष्ट्रांनीं वाटेल तितकीं लढाऊ जहाजें पाठवावीं. मात्र लढाऊ जहाजांनीं केव्हांहि सामुद्रधुन्यांच्या हद्दींत धुमाकूळ घालूं नये. लढाईच्या वेळीं शत्रुराष्ट्रांच्या लढाऊ जहाजांना सामुद्रधुनींत येण्याची हरकत घेण्यास तुर्कांना हक्क आहे.

दार्दानेलीस व बॉस्फरस या दोन्ही तीरांवर, कॉन्स्टांटिनोपल शहर खेरीज करून इतरत्र ठराविक हद्दीपर्यंत तुर्कांनीं लष्करी छावणी किंवा तटबंदी करूं नये. मार्मोरा समुद्राच्या युरोपियन किनाऱ्याच्या बाजूस तोफाचे धमधमे किंवा टॉर्पेडो फेंकण्याची योजना करूं नये. आशियाटिक किनाऱ्यावरहि डारिज सामुद्रधुनीपर्यंत हाच नियम लागूं आहे.

सामुद्रधुन्यांचा बंदोबस्त आणि येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांवर देखरेख याकरितां एक कमिशन नेमावें. त्यांत फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, जपान, इताली, यूगोस्लाव्हिया, रुमानिया, बल्गेरिया यांचे प्रतिनिधी असावेत व तुर्क प्रतिनिधि अध्यक्ष असावा. रशिया व अमेरिका यांची या तहास मान्यता असल्यास त्यांचेहि प्रतिनिधि घेण्यांत यावेत. कोणत्याहि राष्ट्रानें सामुद्रधुनींतील हक्कांचा गैरउपयोग करूं नये, आणि तुर्कस्थानच्या स्वातंत्र्यावर गदा घालूं नये, याविषयीं राष्ट्रसंघानें देखरेख ठेवावी. यासंबंधांत राष्ट्रसंघाचा जो हुकूम होईल त्याची बजावणी करण्यास इंग्लंड, फ्रान्स, जपान व इताली ही चौकडी तयार राहील.

३ कॉन्स्टांटिनोपलचें संरक्षण—कॉन्स्टांटिनोपलच्या संरक्षणार्थ तुर्कांनीं तेथें बारा हजार सैन्य ठेवावें. त्याशिवाय पूर्व थ्रेस प्रांतांत आठ हजार सैन्य ठेवण्यास त्यांस परवानगी असावी. तुर्की आरमारानें सामुद्रधुन्यांत वाटेल तेथें फिरावें व चाहील तेथें गलबतें नांगरून ठेवावीं. वरील

अटीशिवाय तुर्की सैन्याला किंवा आरमाराला आणखी कोणत्याहि प्रतिबंधक अटी घातलेल्या नाहींत.

४ कबरस्थानें--परस्परांनीं परस्परांचे लढाईतील कैदी सोडण्याची मर्जीप्रमाणें तजवीज करावी. तुर्कांच्या हद्दींत दोस्त राष्ट्रांच्या शिपायांचीं कबरस्थानें व स्मारकस्तंभ आहेत. त्यांना तुर्कांनीं कसलाहि उपसर्ग न पोंचेल असें करावें व त्या स्थानावर दोस्तांचा पूर्ण अधिकार चालवा, या अटींस अनुसरून गॅलीपोलींतील ज्या भागांत ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील शिपायांच्या कबरी आहेत, त्या भागाची मालकी ग्रेटब्रिटनला देण्यांत यावी.

५ परकीय कोर्टें--तुर्कस्थानच्या हद्दींतील परकीय न्यायमंदिरें काढून टाकण्यांत यावी. (अ) युरोपियन राष्ट्रांतील नागरिक परस्परांच्या राज्यांत ज्या अटींवर वास्तव्य करतात, त्या अटीवर त्यांनीं तुर्कस्थानांत वास्तव्य करावें. (आ) तुर्कस्थानांत परकीय व्यापारी असतील त्यांवर राष्ट्रीय कर्ज देण्याची सक्ति करण्यांत येऊं नये (इ) वारसा, विवाह वगैरे विशिष्ट प्रकाराखेरीज इतर वाद अगर तंटे यांचा निकाल तुर्की कोर्टामार्फत व्हावा. (ई) परधर्मीय लोकांच्या धार्मिक, शिक्षणविषयक व परोकारार्थ काढलेल्या संस्था तुर्की हद्दींत असतील त्या तशाच चालू द्याव्या. व त्यास तुर्की सरकाराकडून उपसर्ग पोचूं नये. या संस्थांच्या मूळ हेतुला बाध न येतां त्यावर तुर्की कायद्याचें बंधन रहावें. नवीन संस्था काढण्यापूर्वी तुर्की अधिकाऱ्यांशीं नवे करार करून घ्यावे. (उ) पांच वर्षांत तुर्कस्थानानें आपली न्यायपद्धति सुधारावी. तोंपर्यंत परकीय राष्ट्रांच्या रहिवाश्यांचें जीवित व वित्त यांचें संरक्षण योग्य प्रकारें होईल अशा विशिष्ट सवलती तुर्क सरकारनें त्यांस आपण होऊन द्याव्यात.

६ अल्पसंख्याक लोकांचें संरक्षण—मुसलमानेतर अल्पसंख्य नागरिकांच्या जीविताचें व वित्ताचें योग्य रक्षण होईल अशी खबरदारी घेण्यांत यावी. या अल्पसंख्याक समाजांतील नागरिकांना देशांत कोठेंहि राहण्याची, देशाबाहेर जाण्याची, देशांत येण्याची, व्यापारधंदा करण्याची,

धार्मिक आचार-विचार पाळण्याची व स्वतःच्या शिक्षणाची सोय लावण्याची मुभा असावी. यावर राष्ट्रसंघानें नजर ठेवून युरोपांतील इतर राष्ट्रांतल्याप्रमाणें अल्पसंख्याक लोकांना वागविण्यांत येईल अशी तजवीज करावी.

७ कर, व्यापार, दळणवळण—तुर्की प्रजेवर जे कर लादण्यांत येतील त्याहून अधिक कर परदेशी प्रजेवर लादूं नयेत. त्यांना व्यापार करण्याचे आणि दळणवळणाचे सर्व मार्ग तुर्कांप्रमाणेंच खुले असावेत. परदेशाच्या आयात मालावर १९१६ सालीं जकातीचा जो दर होता तोच दर कायम असावा. मात्र तुर्की नाण्याची किंमत उतरून ⅕ झाली असल्यामुळें ही किंमत पुन्हां मूळ पदावर येईपर्यंत कांहीं विशिष्ट मालावरील जकात पांच पट वाढवावी व बाकीच्या मालावरील जकात आठ पट वाढवावी.

८ तुर्की कर्जाची फेड—तुर्क व परराष्ट्राचे रहिवासी यांचे महायुद्धाच्या सुरुवातीपूर्वीं जे करारमदार अपुरे राहिले असतील, त्यांची मुदत युद्धापासून तहापर्यंतच्या कालमर्यादेइतकी वाढविण्यांत यावी. व त्या वेळच्या सवलतींविरुद्ध अलीकडे कायदे झाले असल्यास ते रद्द करण्यांत यावेत. बाल्कन युद्धापूर्वीं तुर्कस्थानचें जें राष्ट्रीय कर्ज होतें, त्याची बाल्कन राष्ट्रें व तुर्कस्थान यांजमध्यें, बाल्कन युद्धानंतर प्रत्येकाकडे जेवढा मुलूख राहिला किंवा मिळाला त्याप्रमाणें हिस्सेरेशी करावी. महायुद्धाच्या प्रारंभापर्यंतच्या कर्जाचाहि असाच हिस्सेरशीनें येणारा बोजा तुर्कस्थानापासून आतां वेगळ्या होणाऱ्या प्रांतांवर बसावा. या प्रांतांनीं मधल्या मुदतींतील राहिलेले हप्ते २० वर्षांत फेडावे.

९ नुकसान भरपाई—ग्रीस खेरीजकरून इतर राष्ट्रांच्या नुकसानभरपाई करितां तुर्कस्थानानें १८ कोटी रुपये द्यावे. या रकमेवर दरसाल दर शेंकडा ५ प्रमाणें व्याज आकारून सर्व रकमेची फेड ३७ वर्षांत हप्तेबंदीनें करावी. युद्धापूर्वीं किंवा युद्धकाळीं तुर्कांनीं जर्मनीचें किंवा ऑस्ट्रिया-हंगेरीचें जें देणें राहिलें असेल, तें दोस्तांनीं तुर्कांना माफ केलें

आहे. शिवाय युद्धारंभीं तुर्कस्थानची जी रोकड बर्लिन व व्हीएन्ना येथील बँकांत होती ती शिल्लकहि तुर्कस्थानाला पांच वर्षांनंतर परत मिळेल.

लॉर्ड चेम्सफर्ड यांचा संदेश

याच वेळीं हिंदी मुसलमानांच्या शांतवनार्थ व्हाईसराय लॉर्ड चेम्सफर्ड यांनीं पुढील आशयाचा संदेश प्रसिद्ध केला. 'दोस्तांच्या सुप्रीम कौन्सिलानें तुर्कांबरोबर करावयाच्या तहाचीं कलमें आतां जगास माहित झालींच आहेत. सर्व मुसलमानी राष्ट्रांचें म्हणणें ऐकून घेऊन व त्याचा काळजीपूर्वक विचार करूनच दोस्तांनीं हा निर्णय ठरविला आहे. हिंदुस्थानांतील मुसलमानांचें म्हणणेंहि सुप्रीम कौन्सिलानें ऐकून घेतलें आहे. ब्रिटन व त्याचे दोस्त यांजबरोबर जीं राष्ट्रें लढलीं त्यांच्याशीं तह करतांना उदार तत्त्वांची अंमलबजावणी करण्यांत आली होती, तशीच ती तुर्की तहाचे प्रसंगींहि करण्यांत येत आहे. तरी पण तहाच्या अटी वाचून सर्व मुसलमानांस दुःख होईल अशी मला भीति वाटते. तह एक वर्ष लांबणीवर पडला व तसें होणें अपरिहार्यहि होतें. इतके दिवस तुम्ही मोठ्या काळजींत काढले आणि त्यानंतर अशी खेदजनक स्थिति तुम्हास प्राप्त झाल्याबद्दल मला तुम्हाविषयीं सहानुभूतिहि वाटते. साम्राज्याच्या अडचणीच्या वेळीं तुम्ही मदत केली आणि न्याय आणि भूतदया यांस विजय प्राप्त होण्याच्या कामीं सहाय्यभूत झालात. ज्या साम्राज्याचे तुम्ही घटक आहांत तें साम्राज्य आतां वरील तत्त्वांवर उत्कृष्ट प्रकारें स्थिर झालें आहे. हिंदी मुसलमानांची राजकीय व औद्योगिक दृष्ट्याहि उज्ज्वल भाविष्यकाळ वाट पहात आहे. त्यांस ब्रिटिश सत्तेखालीं पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य उपभोगावयास मिळालें आहे. महायुद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनचें तुर्कांबरोबर मित्रत्वाचेंच नातें होतें. तोच प्रीतितरु आतां तहानंतर टवटवीत होईल, व तुर्कस्थानाचें पुनरुज्जीवन होईल. त्याचें सामर्थ्य वृद्धिंगत होईल आणि इस्लामी धर्माचा तो आधारस्तंभहि होईल. या विचारानें तहाचीं कलमें नाइलाजानें, धैर्यानें आणि घट्ट मनानें स्वीकारण्यास तुम्ही तयार व्हाल व पूर्वीप्रमाणें यापुढेंहि साम्राज्याशीं राजनिष्ठेनें रहाल असा मला भरंवसा वाटतो.'

असहकारिता

असहकारितेचा विचार करण्यासाठीं सेंट्रल खिलाफत कमिटीची सभा अलाहाबादेस भरून तिनें ठरविल्याप्रमाणें सुनीपंथाच्या ९० मुसलमानांच्या सहींचें पत्र व्हाईसराय लॉर्ड चेम्सफर्ड यांस मुंबईहून २२ जून १९२० रोजीं पाठविण्यांत आलें. त्यावर याकुब हसन, मझरूल हक्क, अबदुल बारी, हजरत मोहानी, हाजी मियान महमद छोटानी व मौ. शौकत अल्ली यांच्या सह्या होत्या. सदर पत्र पुढीलप्रमाणें:—

व्हाईसरॉय यांस,

आमचें मत म्हणजे बहुतेक सर्व सुनी पंथानुयायांचें मत होय. तुर्की तहाचीं कलमें आम्ही काळजीपूर्वक वाचलीं व त्यावरून तीं आमच्या धार्मिक समजुतीच्या विरुद्ध आहेत अशी आमची खात्रा झाली. ब्रिटिश मुत्सद्यांनीं दिलेल्या अभिवचनांचाहि त्यामुळें भंग झाला आहे. ब्रिटिश साम्राज्यांत मुसलमानांची वस्ती फार मोठी आहे. अशा स्थितींत कोणा तरी पराभूत राष्ट्राशीं आपण तह करीत आहों असें ब्रिटननें समजू नये. कांहीं बाबतींत इतर पराभूत राष्ट्रांपेक्षांहि ब्रिटननें तुर्कस्थानास वाईट रीतीनें वागविलें आहे. आमचें म्हणणें न्यायास व युक्तीस धरून असेल तर तें ब्रिटिश मुत्सद्यांनीं विचारांत घेतलें पाहिजे. तुर्कस्थानानें आपल्या अमलाचा ख्रिस्त्यांविरुद्ध दुरुपयोग केला असेल तर त्या कृत्याचा आम्ही निषेध करतों. तुर्की सैनिकांनीं आर्मीनियनांस निर्दयपणानें वागविलें असेल तर त्या कृत्याची स्वतंत्र कमिशन नेमून चौकशी करण्यांत यावी. केवळ शिक्षा म्हणून तुर्कस्थानचे व तुर्की साम्राज्याचे तुकडे पाडण्यांत येत असतील, तर त्या गोष्टीकडे आमच्यानें डोळेझाक करवणार नाहीं. यासाठीं तुम्ही ब्रिटिश सरकारास तहाच्या अटींत बदल करण्यास सांगा आणि तसा बदल न कराल तर आम्ही हिंदुस्थानांतील मुसलमानांस मिळूं असेंहि त्यांस कळवा. हिंदी मुसलमानांचें गाऱ्हाणें आम्ही ब्रिटिश सरकारच्या कानावर वारंवार घातलें असल्याचें आपण म्हणतां म्हणून अशी विनंति आम्ही आपणास करीत आहों.तुमच्या विंनतीस ब्रिटिश सरकाराकडून मान न मिळाला तर जागेचा राजिनामा देण्याची तयारी तुम्हीं दाखविली

पाहिजे. हिंदुस्थान जर वसाहतीसारखें स्वराज्य उपभोगीत असता तर त्याच्या मंत्रिमंडळानें अशा आणीबाणीच्या प्रसंगीं राजिनामाच दिला असता. आमची ही विनंवणी तुम्ही मान्य न केल्यास येत्या ऑगष्ट महिन्याच्या पहिल्या तारखेपासून आम्हास सरकाराशीं असहकारिता करावी लागेल व आमच्या धर्मबंधूंसहि तसाच उपदेश सांगावा लागेल; आम्ही सरकारास धमकी देत आहों किंवा सरकारचा उपमर्द करीत आहों असें समजण्याचें मुळींच कारण नाहीं. हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि जातीइतकेच आम्हीहि सरकाराशीं राजनिष्ठ आहों. पण आम्ही इहलोकच्या राजास परलोकच्या राजापुढें गौण लेखतों. इस्लाम आम्हांस असें सांगत आहे कीं, खिलाफतीच्या इभ्रतीस धक्का लावतील त्यांस इस्लामाचे शत्रू लेखा व त्याचा प्रतिकार करा. पण जोंपर्यंत इतर मार्ग मोकळे आहेत, तोंपर्यंत तसें शक्य असतें तरी सशस्त्र प्रतिकार करूं नये असें आम्ही मानतों. खिलाफतीस निर्माल्यवत् करून सोडण्याचा गुन्हा करणारास मदत न करणें एवढें तरी प्रत्येक मुसलमानाचें कोणत्याहि परिस्थितींत पहिलें कर्तव्य होय. असल्या प्रकारचे तह जें सरकार कबूल करतें आणि आम्हांस मान्यता देण्यास सांगतें, त्या सरकाराशीं असहकारिता करणें हें मोठ्या दुःखानें आम्ही आपलें कर्तव्य समजतों. इतकी मजल येणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे. तथापि तेथवर जाण्याचा प्रसंग आला तरी आम्ही अत्याचारास प्रवृत्त होणार नाहीं असें आश्वासन देतों. आम्ही आपली जबाबदारी ओळखून आहों. आमच्या हातून अत्याचार घडल्यास आमच्या शांतिप्रधान व पवित्र कार्यास बाध येईल. हेंहि आम्ही जाणून आहों. यासाठीं सरकार पेंचांत न पडेल आणि कांहीं घोटाळाहि उत्पन्न न होईल अशा बेतानें आम्ही असहकारितेचा जिना चढणार आहों.

म. गांधी आणि खिलाफत

म. गांधी यांनीं खिलाफतीसंबंधीं आपलें मत पुढीलप्रमाणें जाहीर केलें.— मुसलमानांबरोबरच खिलाफतीशीं मी आपलें तादात्म्य केवळ मजवरील नैतिक जबाबदारी ओळखून करून घेत आहे. हिंदु

व मुसलमान याजमधील ऐक्य मला घडवून आणावयाचें आहे; परंतु तें तुर्कस्थानचे तुकडे पाडण्यांत गुंतलेल्या सरकारास पेंचांत धरण्याकरितां नव्हे. सरकारास अगर इतर कोणासहि पेचांत धरणें हें माझ्या ब्रीदास सोडून आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, माझ्या कृत्याचा परिणाम या प्रकारचा होणार नाहीं. परंतु एखादा मनुष्य दुष्कृत्य करीत असतां त्यास सदर दुष्कृत्य करूं न देण्यानें तो मनुष्य पेचांत पडत असला तर त्याची जबाबदारी मजवर नाहीं. खिलाफतीसंबंधीं ज्यांनीं वचनभंग केला त्यांच्या पक्षास मी मिळणार नाहीं. मि. लॉईड जॉर्ज यांनीं दिलेलें वचन हा मुसलमानांचा मुख्य आधार व त्या आधारास धर्मवचनांनीं मजबुती आणिली असल्यानें मुसलमानांची बाजू बिनतोड झाली आहे. पण यावरून तुर्कांचा अंदाधुंदी कारभार मला संमत आहे किंवा इस्तंबूल सरकारचा अन्यायी जुलूम मानव जातीच्या कल्याणाहून मी श्रेष्ठ प्रतीचा समजतों असें कोणी मानूं नये. इस्तंबूल सरकारचा अन्यायी जुलूम कायम रहावा अशी मुसलमानांचीहि मागणी नाहीं. उलट पक्षीं मुसलमानेतर छोट्या जमातींच्या संरक्षणाची पूर्ण हमी इस्तंबूल सरकारनें घ्यावी असेंच मुसलमानांचें मागणें आहे. आर्मीनिया व सीरिया येथील स्थिति कितपत वाईट आहे हें मला माहित नाहीं. या अंदाधुंदीच्या बातम्या अतिशयोक्तीच्या असाव्यात व अंदाधुंदीची जबाबदारीहि युरोपियन राष्ट्रांवर कांहीं अंशीं असावी अशी मला जबर शंका आहे. तुर्कांचा अगर इतर कोणाचा अंदाधुंदीचा अंमल चालू रहाण्यापासून माझा स्वतःचा कांहींच फायदा नाहीं. तुर्की अमंल नष्ट न करतां किंवा तुर्की साम्राज्याचे तुकडे न पाडतां दोस्त सरकारांस अंदाधुंदी मोडतां येणार आहे. ही परिस्थिति नवी नाहीं. तुर्कस्थानचे तुकडेच पाडावयाचे होते तर युद्धाच्या प्रारंभीं सरकारनें तसें स्पष्टपणें जाहीर करावयास पाहिजे होतें. मग वचनभंगाचा प्रश्नच उपस्थित होता ना. पण सध्याच्या वचनभंगामुळें ब्रिटिश मुत्सद्यांच्या शब्दावरील हिंदी मुसलमानांचा विश्वास उडाला आहे. माझ्या मतें, तुर्कांविरूद्ध ओरड म्हणजे खिस्त्यांची मुसलमानांविरुद्ध ओरड होय. या कोल्हेकुईच्या बाबतींत इंग्लंड पुढारी आहे. महमदअल्लींच्या नुकत्याच

आलेल्या तारेवरून हाच ग्रह दृढ होतो. ते म्हणतात कीं, इंग्लंडांतल्या-पेक्षां फ्रान्सांतून व फ्रेंच लोकांकडूनच आम्हांस मदत होत आहे.

यावरून मुसलमानांचा पक्ष न्यायाचा व सशास्त्र असल्याचें सिद्ध होतें. अशा सत्कार्यास हिंदूनीं मदत न केल्यास त्यांचें हातून बंधुद्रोह घडेल आणि मुसलमान बंधूसहि त्यांजविषयीं आगत्य वाटणार नाहीं. खिलाफतीच्या संरक्षणार्थ मी मुसलमानांस मदत न केली, तर ती गोष्ट सार्वजनिक कार्यकर्ता या माझ्या दर्जास कमीपणा आणील. त्यांस मदत करणें म्हणजे एक प्रकारें साम्राज्यसेवाच करणें होय. कारण मुसलमान बंधूंच्या मनोगतास मी शिस्तवारपणें वाचा फोडीत असल्यानें या चळवळीस पूर्णता, सुव्यवस्थितपणा आणि यशःप्राप्ति येण्याचा संभव आहे.

सुलतान पक्षाचें शिष्टमंडळ

दोस्त म्हणतील त्या अटींवर तह करण्यावांचून सुलतानपक्षास दुसरा मार्गच नव्हता. तहाकरितां ता. ६ मे १९२० रोजीं सुलतानपक्षाचें शिष्टमंडळ पॅरिस शहरीं गेलें. सदर शिष्टमंडळांत मुख्य वजीर दमाद फरीद, रशीद बे, जमालपाशा प्रभृति मुत्सद्दी होते. त्यांनीं आपली यादी तहपरिषदेस ता. २५ मे रोजीं सादर केली. तिचा मतलब असा—राष्ट्रीयत्वाचें मिष करून दोस्त आर्मीनिया व हेज्ज हे प्रांत तुर्कीसाम्राज्यांतून स्वतंत्र काढूं पहात आहेत. मेसापोटेमिया, पॅलेस्ताईन व सीरिया यांस युरोपियन राष्ट्रांच्या नजरेखालीं ठेवण्यांत येत आहे. सुएझ व सायप्रस इंग्लंड घेणार. पूर्व ग्रेस व स्मरना प्रांत यांत मुख्य वस्ती तुर्कांचीच आहे. महायुद्धांत ग्रीकांनीं दोस्तांस मुळींच मदत केली नाहीं व ते तुर्कांचे शत्रूहि नव्हते. यामुळें जेते या नात्यानें तुर्की मुलख घेण्याचा त्यांस कोणताहि हक्क पोचत नसतां, त्यांस हे दोन प्रांत मिळणार आहेत. अशा रीतीनें तुर्कस्थान आपल्या दोन तृतीयांश मुलुखास मुकणार. वस्तीच्या आणि संपत्तीच्याहि बाबतींत तुर्कांचें तितकेंच किंवा त्याहूनहि अधिक नुकसान होणार. कॉन्स्टांटिनोपलमध्येंहि एकट्या तुर्कांचा अंमल रहाणार नाहीं. तेथें बॉस्फरस, मार्मोरा व दार्दानेलीस यांवर नजर ठेवण्याकरितां आन्तरराष्ट्रीय कमिशन नेमण्यांत येणार आहे.

या कमिशनांत दोस्तांचा शत्रू जो बल्गेरिया त्याचाहि प्रतिनिधि घेतला जावयाचा; परंतु तुर्क प्रतिनिधीस मात्र त्यांत जागा मिळावयाची नाहीं. तुर्की सत्ता व कमिशनची सभा यांच्या जोडीस इंग्लंड, फ्रान्स व इताली या त्रिवर्गाचें सैन्यहि बंदोबस्तासाठीं कॉन्स्टांटिनोपलमध्यें ठेवण्याचें घाटत आहे. तुर्कांच्या शिबंदीवर दाब या त्रिवर्ग सैन्याचा. त्याखेरीज कायदेकानू, आन्तरराष्ट्रीय तह, जमाखर्च, राज्यव्यवस्था, न्यायमनसुबा व्यापार या संबंधांतहि आमचें स्वातंत्र्य नष्ट होणार.

दोस्तांनीं तहाच्या अटींनीं आमचा सर्वस्वी नाश करण्याचा घाट घातला आहे. अशा प्रतिकूलतेंतहि आम्हास कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. त्या पुढीलप्रमाणें—पोलंड, सर्व्हिया, क्रोशिया, स्लोव्होनिया व झिकोस्लोव्हाकिया हीं राज्यें आम्हांस मान्य आहेत. १९१८ त कबूल केल्याप्रमाणें आम्ही आर्मीनियास स्वातंत्र्य देतों. मोरोक्को तुर्कस्थानचा नव्हताच. तरी पण त्यावरील फ्रेंचांचें आर्थिक व व्यापारी वर्चस्व तुर्कस्थानास कबूल आहे. लीबिया व एजियन समुद्रांतील बेटें यांवरील आम्ही आपले हक्कसंबंध सोडतों. सीरिया, पॅलेस्टाइन व मेसोपोटेमिया ह्यांचें स्वातंत्र्य आम्ही मान्य करतों. ईजिप्तवरील ब्रिटिशांचें संरक्षण, सुएझ कालव्यांतील स्वैरसंचार, सुदानवरील इंग्रज व ईजिप्शियन यांचा कारभार व सायप्रसवरील ग्रेटब्रिटनचें स्वामित्त्व यांस आमची मान्यता आहे. (१) सुलतान (२) सामुद्रधुन्यांवरील कमिशन (३) दोस्त सैन्यांची सत्ता (४) फ्रान्स, इताली व इंग्लंड यांचें प्रतिनिधि मंडळ (५) आन्तरराष्ट्रीय कमिशन (६) जमाखर्च कमिशन (७) कर्ज कौंसिल (८) न्यायकौंसिल इतक्या आठ प्रकारच्या सत्तांची गुंतागुंत कॉन्स्टांटिनोपलास झाल्यास कॉन्स्टांटिनोपल शहर तुर्कांच्या सत्तेखालीं आहे असें म्हणण्यांत अर्थ तो काय राहिला ? या अडचणींचा विचार व्हावा. तुर्की सरकार सामुद्रधुन्या खुल्या ठेवण्यास तयार आहे. पण त्यावर राष्ट्रसंघाचा ताबा रहावा. कॉन्स्टांटिनोपलामध्यें २९ आक्टोबर १८८८ रोजीं तह होऊन सुएझ कालव्यासंबंधीं जी व्यवस्था ठरली, तशीच व्यवस्था सामुद्रधुन्या व मार्मोरा समुद्र यांचीहि

रहावी. लेमनास, इंब्रास, टेनेडास हीं दार्दानेलसच्या तोंडाचीं बेटें सामुद्रधुनीच्या क्षेत्रांत दाखल व्हावीं. तुर्की पाण्यांत परक्यांचीं जहाजें थोडीं रहावीं.

पूर्व थ्रेस व स्मरना प्रांत महायुद्धापूर्वीप्रमाणें तुर्कांकडे रहावा. फार तर ग्रीकांपासून सदर प्रांत काढून घेऊन दोस्तांनीं तीन वर्षेपर्यंत त्यावर देखरेख ठेवावी. कुर्दिस्तानची हद्द आन्तर राष्ट्रीय चौकशीनें ठरावी. पवित्र क्षेत्रें, मक्का व मदिना यांवर सुलतानाचा खलीफ या नात्याचा हक्कसंबंध हेज्जच्या अमीरानें कबूल करावा. अल्पसंख्याक जातीच्या संरक्षणाचीं तहांतील कलमें आम्हांस कबूल आहेत.

सेव्हर्सच्या तहावर सह्या

सुलतान पक्षाची कैफीयत अशा प्रकारची होती. तिला दोस्तांकडून १७ जुलईस जबाब मिळाला. त्यांत त्यांनीं सुलतान पक्षाची कोणतीच सूचना मान्य केली नाहीं. तहाचा खर्डा आहे त्या स्वरूपांत पत्करण्यास दोस्तांनीं तुर्कांस १० दिवसांची मुदत दिली. ही मुदत घेऊन मुख्य वजीर सुलतानाचा सल्ला घेण्यास राजधानीस आला. २० जुलईस सुलतानानें पंचावन मुत्सद्यांशीं या बाबतींत खलबत केलें. तह कितीहि अपमानकारक असला तरी त्यावर सही करावी असा मुख्य वजीर दमाद फरीद याचा आग्रह पडला.अशा बेअब्रूच्या अटी पत्करून जगण्यापेक्षां तुर्की राष्ट्र मेलेलें काय वाईट असें मार्शल फौद वैतागून म्हणाला.तथपि तुर्की शिष्टमंडळ सही करण्यास पुन्हा पॅरिसला परत गेलें आणि अखेर तुर्की वकिलांनीं ११ ऑगस्ट १९२० रोजीं तहावर एकदाच्या सह्या ठोकल्या. तह झाल्याची दुःखदायक वार्ता कॉन्स्टांटिनोपलास समजतांच नागरिकांनीं तो दिवस सुतकाप्रमाणें पाळला, वर्तमानपत्रें काळ्या चौकटींत प्रसिद्ध झालीं आणि सर्व जनता शोकसागरांत बुडून गेली.

ग्रीकांची चढाई व मोड

सेव्हर्स येथील तहनाम्यावर सुलतान पक्षाच्या सह्या झाल्या खऱ्या; तरी पण त्यांतील कलमें दोस्तराष्ट्रांसहि कबूल झालीं नाहींत. म्हणून तहाचें प्रकरण तसेंच भिजत पडलें. स्मर्न्यास ग्रीक सैन्यानें १५ मे १९१९ रोजींच तळ दिला होता सेव्हर्स येथील तहाच्या वाटाघाटी चालू असतां स्मरन्याच्या

आसपास तुर्कांचा मुलूख जिंकण्याचें काम ग्रीकांनीं जारीनें चालविलें व त्यांस इंग्रजांनीं मदत केली. तथापि शक्य तेवढें सैन्य जमवून तुर्की साम्राज्य जिवंत राखण्यांत केमालपाशानें आपल्याकडून मुळींच कसूर होऊं दिली नाहीं. जूनच्या १६ व्या तारखेस ब्रिटिश सैन्य व केमालिस्ट यांची चांगलीच चकमक झडली. व तिच्यांत इंग्लंडच्या बाजूचे ३० हिंदी शिपाई जखमी झाले. एका बाजूस ब्रिटिश सैन्याशीं झुंज चालू ठेवीत ठेवीत केमालिस्टांस ग्रीक सैन्यासहि तोंड देण्यावांचून गत्यंतर नव्हतें. ता. २० जून १९२० रोजीं ग्रीकांनीं स्मरना बंदर आणि तेथील तुर्कांचें पोस्ट ऑफिस सर केलें. २४ तारखेस सदर सैन्य स्मरन्यापलीकडे तुर्कांवर चोहों बाजूंनीं चढाई करीत निघालें. ८ जुलईस ग्रीकांनीं ब्रूसा हें तुर्कांचें जुनें राजधानीचें शहर आणि ब्रिटिश आरमारानें मुदानिया हें दुसरें शहर घेतलें. अशा रीतीनें आशिया मायनरमधील जो मुलूख ग्रीकांस जिंकावयाचा होता तो जिंकून झाला. युरोपांतील तुर्की मुलुखापैकीं आद्रियानोपल शहर व पूर्व थ्रेस प्रांत हींच फक्त घ्यावयाचीं उरलीं. इंग्रज सेनापति मिल्ने यास ग्रीक सेना याच उद्देशानें सदर प्रदेशांत येऊन मिळाली. से. मिल्ने यानें सुलतानाचें बहुतेक सैन्य मोडून टाकून तो प्रदेश निष्कंटक करून सोडला.

सेव्हर्सच्या तहानें पूर्व थ्रेस आणि स्मरना प्रांत ग्रीकांस देऊन टाकल्यामुळें तर ग्रीकांच्या मुलूखगिरीस एक प्रकारची राजमान्यताच मिळाली होती. ग्रीकांचा हा जोर एकसारखा वाढत गेला. सप्टेंबर १९२१ च्या सुमारास ग्रीकलोक केमालपाशाची नवी राजधानी अंगोरा येथपासून ५० मैलांच्या अंतरावर येऊन थांबले. जुलई १९२२ पर्यंत त्यांची प्रगति येथेंच खुंटली. जुलई महिन्यांत ग्रीक सैन्य इतकें शेफारलें कीं, त्यानें तहाच्या अटीहि झुगारून देऊन कॉन्स्टांटिनोपल घेण्याची धमकी दिली. सेव्हर्सचा तह दोस्तांपैकींच कांहीं राष्ट्रांस न आवडल्यामुळें व केमालपाशानेंहि त्याविषयीं नापसंती व्यक्त केल्यामुळें तहाचा एकदाचा सोक्षमोक्ष लावून स्वतःची कुंचबणा संपविण्याकरितां कॉन्स्टांटिनोपलास शह देण्याची ही युक्ति ग्रीकांनीं लढविली. परंतु ती चालू देणें इंग्रजांना अप्रशस्त वाटलें. आणि ग्रेट ब्रिटन व

दोस्त यांनीं ग्रीकांस जोराचा प्रतिबंध केला. तेव्हां दोस्तांनीं डोळे वटारतांच पड खाऊन ग्रीकांनीं आपलें सैन्य व कॉन्स्टांटिनोपल यामधील भूमि रिकामी राखली. ग्रीकांस अशा रीतीनें कान्स्टांटिनोपलकडून थप्पड बसली आणि त्याच सुमारास केमालिस्टांनीं जोर करून आशिया मायनरमध्यें दीड दोन वर्षे तळ देऊन बसलेल्या ग्रीक सैन्याची तारां-बळ उडवून दिली. त्यांनीं ग्रीकांपासून स्मरना परत घेतला आणि ग्रीक लोक आशियामायनर मधून आपला गाशा गुंडाळण्याच्या उद्योगास लागले. केमालिस्टांनीं शेंकडों ग्रीक सैनिक व सेनापति कैद केले. ग्रीक सैन्य तुर्कांपुढें आतांच धुळीस मिळण्याचें खरें कारण असें कीं, यावेळीं ब्रिटिश सरकारास ग्रीकांस सैन्याची कुमक उघडपणें करण्यास लाज वाटली. अशा निरुपयोगी गोळीबारासाठीं पैसा खर्चण्याची इंग्लंडची इच्छा नव्हती. नुक-सान भरपाईचे बाबतींत फ्रान्स व इंग्लंड यांचें धोरण जुळेनासें झाल्यामुळें फ्रेंचांनीं केमालिस्टांस मदत देऊन युरोपियन राजकारणांतील कसर प्राच्य राजकारणांत काढली. फ्रेंचांनीं आपलें सैन्य चणकहून काढून घेतलें आणि सामुद्रधुन्यांचें रक्षण केमालपाशापासून करण्याची जबाबदारी इंग्लंडवर टाकली. केमालिस्ट व ब्रिटिश सैन्य यांची लढाई जुंपण्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं. इतक्यांत केमलपाशा व इंग्रज सेनापति हॅरिंग्टन यांनीं प्रसंगावधान राखून युद्धप्रसंग टाळला. आक्टोबर महि-न्यांत मुदानियास तहपरिषद भरली. ही परिषद मुख्यतः इंग्लंड, तुर्कस्थान व ग्रीस यांच्या दरम्यानच होती. सदर परिषदेंत ग्रीकांनीं पूर्व थ्रेस सोडावा व कॉन्स्टांटिनोपल केमालिस्टांच्या ताब्यांत देईपर्यंत त्या शहरीं ब्रिटिश सैन्य रहावें असें ठरलें. त्रिवर्गांतील लढा थांबविण्यापुरतीच ही परिषद असून तुर्की तहाचा शेवटचा निकाल लावणारी परिषद स्वित्सर-लंडमध्यें लॉसेन शहरीं भरण्याचें ठरलें.

लॉसेनची तहपरिषद

लॉईड जॉर्ज यांनीं टाकलेला डाव केमालिस्ट व फ्रेंच यांनीं अशा रीतीनें फिसकटून टाकल्यामुळें लॉईड जॉर्ज यांच्या मुत्सद्दे-गिरीवरील इंग्लंडचा विश्वास उडाला. पार्लमेंटाची नवी निवडणूक होऊन

कॉन्झरव्हेटिव्ह पक्ष अधिकारारूढ झाला. प्रधानमंत्रिपद मि. बोनारलॉ यांस मिळालें. बोनारलॉ यानीं परराष्ट्रमंत्री लॉर्ड कर्झन यांचेमार्फत फ्रेंच मंत्री मि. पॉइंकारे यांजबरोबर गट्टी जमविली; आणि तहपरिषदेच्या कामास स्वित्सरलंडमध्यें लॉसेन येथें १९२२ च्या डिसेंबर महिन्यांत सुरुवात झाली. परिषदेस इंग्लंड, फ्रान्स, इताली, ग्रीस व रशिया यांचे वकील हजर होते. तुर्कांच्या वतीनें इस्मतपाशा काम चालवीत होता. दोस्तांचा हा तह सुलतानपक्षाशीं नसून केमालपाशाच्या अंगोरा सरकाराशींच होता. किंबहुना सेव्हर्सचा तह कबूल करून सुलतानपक्षानें जें नुकसान करून घेतलें होतें, त्याची केमालपाशाच्या पराक्रमानें मिळणारी ही भरपाईच होती. परिषदेचें काम आठ महिने चाललें; आणि एवढ्या दीर्घ काळांत परिषद मोडण्याचे प्रसंगहि पुष्कळ आले. परंतु ग्रीकांवर मिळविलेल्या विजयानें तुर्कांचा झालेला जयजयकार आणि ग्रीकांचा पाठीराखा इंग्लंड म्हणून त्याची झालेली नाचक्की यामुळें तुर्क राष्ट्रीयांच्या बाजवी मागण्या कबूल करून तह संपविल्याशिवाय उठावयाचें नाहीं, असा ब्रिटिश वकील लॉर्ड कर्झन यांचा मंत्रिमंडळाच्या सल्लयानें निश्चयच झाला होता. आणि इस्मालपाशानेंहि तुटेल इतकें न ताणण्याचें धोरण राखल्यामुळें अनेक वेळां अपेशी ठरलेल्या तहाच्या खर्ड्यावर उभय पक्षांचा ता. २३ जुलई १९२३ रोजीं सहीशिक्का पडला.

लॉसेनच्या तहास सेव्हर्सचा तह आधारभूत होय यांत शंका नाहीं. त्यांतील उभयपक्षांनीं निर्विवाद मानलेल्या अटी खेरीज करून वादग्रस्त अटींत केमालपाशाच्या पक्षाच्या कलानें फेरबदल करणें हेंच तहपरिषदेपुढील मुख्य काम होय. त्यांत पुढील महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. (१) आशिया मायनर प्रांतामधून ग्रीक सत्तेस पूर्ण अर्धचंद्र मिळून त्यावर तुर्कांचा अधिकार अबाधितपणें प्रस्थापित झाला. त्यांतील ग्रीक व आर्मीनियन वस्तीस तुर्की राज्यांत रहावयाचें नसल्यास त्यांनीं तेथून आपलें बिऱ्हाड हालवावें व ग्रीसच्या हद्दींत रहावयास जावें.असें ठरलें (२) कॉन्स्टांटिनोपलवर एकट्या तुर्कांचाच ताबा बसला. (३) कॉन्स्टांटिनोपलमधील ग्रीक धर्मगुरु (पॅट्रिआर्क) याजकडे ग्रीक व

आर्मीनियन ख्रिस्त्यांवर जे राजकीय अधिकार असत ते रद्द करण्यांत आले. (४) पूर्व थ्रेस व आद्रियानोपल शहर यथापूर्व ग्रीकांच्या हातचें सुटून तुर्कांसच मिळालें. (५) फार प्राचीन काळापासून तुर्की राज्यांत युरोपियन रहिवाश्यांस दिवाणी व फौजदारी स्वातंत्र्य मिळालें होतें, ती अडचणहि दूर झाली. (६) कॉन्स्टांटिनोपलची सुरक्षितता आणि त्याजवरील तुर्की सत्ता यांस धक्का न लावतां व्यापार व इतर दळणवळण यांस दार्दानेलीस, मार्मोरा आणि बॉस्फरस यांतील पाणवठे सर्व राष्ट्रांस खुले राहिले. (७) युरोपांत ग्रीक, तुर्क व बल्गेरियन यांच्या हद्दी परस्परांच्या मुलखाशीं जेथें भिडतात तो प्रदेश सैन्यविहीन झाला. (८) आशियाखंडांत आशियामायनरमध्यें तुर्कांचा तीन लाख चौरस मैलांचा एकधर्मी मुलुख बनला. (९) तुर्कांचें कर्जहि बरेंच कमी झालें. (१०) तुर्कस्थान व मेसापोटेमिया यांच्या सरहद्दीचा म्हणजे मोसलावरील सत्तेचा प्रश्न अंगोरा सरकार व ब्रिटिश सरकार यांनीं सलोख्यानें मिटविल्यास राष्ट्रसंघानें त्यांची वासलात लावावी, असें ठरलें. (१२) सायप्रस बेट इंग्लंडास, व डेडिनीज बेटें व कॅस्टेलोरिझो इतालीस मिळालें. (१३) ईजियन समुद्रांतील इंब्रास, टेनेडॉस, परॅबिट बेटें ग्रीसला मिळालीं.

सेव्हर्सच्या तहानें तुर्कस्थानांत माजलेला असंतोष लॉसनच्या तहानें शमला यांत शंका नाहीं. पूर्व थ्रेस व स्मरना प्रांत तुर्कांस परत मिळाल्यामुळें तुर्क जातीचे सर्व लोक तुर्की सत्तेखालींच आले. कॉन्स्टांटिनोपल पूर्ण स्वतंत्र होऊन खिलाफतीच्या तक्रारीचें मूळच छाटून निघालें. युरोपियन लोकांचे फौजदारी व मुलकी अधिकार नष्ट झाल्यानें परराष्ट्रांचा लांडा कारभार संपला आणि पॅट्रिआर्कच्या हातीं ख्रिस्ती लोकांवरील राजकीय अधिकार न राहिल्याकारणानें तुर्की हद्दींत धार्मिक तंटे उपस्थित होण्याचें आगंतुक निमित्त उरलें नाहीं. ग्रीक व आर्मीनियन आदिकरून ख्रिस्त्यांचा छळ तुर्कांच्या मुसलमानी सत्तेखालीं होत असल्याची तक्रार बरीच जुनी आहे. पण सदर ख्रिस्ती जातीस तुर्कांची हद्द सोडून जाण्याची परवानगी मिळाल्यामुळें त्या जाती निघून गेल्यानंतर सबंध तुर्की राज्य एकधर्मीय होण्याची संधि जवळ आली. सेव्हर्सचा तह

सुलतानपक्षाशीं झाला होता तर हा तह तरुण तुर्कांशीं म्हणजे केमालपक्षाशीं करण्यांत आला. केमालपक्षास परराष्ट्रीय मान्यता मिळाली ही महत्त्वाची गोष्ट घडली. केमालपक्षास तह समाधानकारक होता व त्यानें युरोपियन राष्ट्रांचेंहि समाधान झालें. इंग्लंड, फ्रान्स, इताली व ग्रीस या चौकडीचा डोळा तुर्की साम्राज्यावर असल्यामुळें त्यांसहि साम्राज्याचे लचके कमी अधिक प्रमाणांत तोडावयास सांपडले. ग्रीसला पूर्व थ्रेस व स्मरना प्रांत मिळाला नाहीं याचें उट्टें त्यास एजियन समुद्रांतील बेटें देऊन काढण्यांत आलें आणि इतालीसहि अशींच बेटें मिळाल्यामुळें तिलाहि कुरकुर करण्यास जागा राहिली नाहीं.

खिलापत विसर्जन

तुर्कांस लॉसेनचा तह समाधानकारक वाटला, परंतु हिंदुस्थानांतील खिलाफत चळवळीची मात्र त्यानें निराशा झाली. जझिरत उल् आरब यांत सांपडणारा पॅलेस्ताईन, सीरिया, अरबस्तान व मेसापोटेमिया हा मुलुख सुलतानाच्या वर्चस्वाखालीं रहावा किंबहुना महायुद्धापूर्वी जेवढ्या प्रदेशावर तुर्कांची सत्ता होती तो सर्व प्रदेश तुर्कांच्याच ताब्यांत राहावा हें खिलाफत चळवळीचें मागणें अर्थातच नाकारण्यांत आल्यामुळें तिला निराश व्हावें लागलें. परंतु हिंदुस्थानांतील खिलाफत चळवळीवर खऱ्या निराशेची पाळी अद्यापि यावयाचीच होती. खिलाफतीच्या संरक्षणार्थ हिंदुस्थानांतील मुसलमानांनीं द्रव्ययज्ञ व आत्मयज्ञ पराकाष्ठेचा केला, आणि ती कॉन्स्टांटिनोपल तुर्कांकडे पूर्ववत् राहिलें या दृष्टीनें बचावलीहि. खिलाफत खिस्त्यांच्या हातून सुटली, पण तिचा परधर्मीयांच्या व परकीयांच्या ऐवजीं स्वधर्मीयांच्या व स्वकीयांच्याच हातून कपाळमोक्ष व्हावयाचा होता, हें दूरस्थ व धर्मभोळ्या हिंदी मुसलमानांस काय माहीत ?

केमालपक्षास मुदानीयाच्या परिषदेंत परराष्ट्रीय मान्यता मिळाल्यावर सुलतान व खिलाफत या जोडसत्तेपैकीं सुलतानाचें सिंहासन केमालपाशानें आपल्या हातानें प्रथम हालवून सुलतान महंमद यास पदच्युत केलें व खिलाफतीचे अधिकार राजघराण्यांतील दुसऱ्या एका पुरुषास दिलें. केमालपाशाच्या या उद्धटपणामुळें इस्लामी जगाच्या डोळ्या-

समोर क्षणभर काजवे चमकले आणि त्यास व विशेषतः हिंदी मुसलमानांस हें लक्षण ठीक नव्हे असेंहि वाटलें. परंतु केमालपाशाचा खरा इंगा तुर्कस्थानाबाहेरील मुसलमानांस अद्यापि समजावयाचाच होता. लॉसेनच्या तहानंतर आठ महिन्यांनीं केमालपाशाच्या ग्रँड नॅशनल असेंब्लीनें यापुढचें पाऊल धिटाईनें टाकलें. शनिवार ता. १ मार्च १९२४ हा दिवस मुसलमानांच्या धार्मिक इतिहासांत ठळक अक्षरांनीं लिहून ठेवला जाईल. त्या दिवशीं अंगोरा प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष गाझी मुस्तफा केमालपाशा यानें खिलाफत बुडविण्याचा, खिलाफत घराण्यास हद्दपार करण्याचा आणि सदर घराण्याची मालमत्ता सरकारजमा करण्याचा ठराव असेंब्लीपुढें मांडला व तो प्रचंड बहुमतानें सोमवारीं पास झाला. मंगळवारीं दुपारीं २ वाजतां कॉन्स्टांटिनोपलचा वली (गव्हर्नर) व डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस हे डोल्मा बागेंतील राजवाड्यांत गेले, त्यांनीं खलिफास सिंहासनावर बसण्याची आज्ञा केली, त्याच्या पदच्युतीचा हुकूम त्यास वाचून दाखविला, फिरून त्यास सिंहासनावरून उतरण्यास फर्माविलें आणि कॉन्स्टांटिनोपलाहून निघण्याची तयारी करण्यास सांगितलें. त्यानंतर एका तासानें खलिफास त्याच्या दोन स्त्रिया व पुत्र यांनिशीं मोटारींत घालून चटलजास पोंचतें करण्यांत आलें. तेथून पुढें नेण्यास स्पेशल ट्रेन उभीच होती. अशा रीतीनें स्वातंत्र्याची वीज आकाशांतून क्षणांत कोसळून तिनें खिलाफतीचा तेराशें वर्षांचा जुनाट वृक्ष जाळून टाकला.

केमालपाशाची विजयपरंपरा विसरली आणि त्याचें खिलाफत–उच्छेदनाचें एकच कृत्य जगाच्या इतिहासांत उरलें तरी त्यावरून त्याचें असामान्यत्वच सिद्ध होणार आहे. क्रॉम्वेलनें इंग्लंडच्या पहिल्या चार्लस् राजास १६४९ च्या जानेवारी महिन्यांत फांसावर लटकावलें, किंवा फ्रान्समधील राज्यक्रान्तींत १७९१ मध्यें नॅशनल असेंब्लीनें सोळाव्या लुईचा बळी घेतला हीं कृत्यें जशीं तत्कालीन वीर पुरुषांच्या निधड्या छातीचीं व असामान्य कल्पनाशक्तीचीं निदर्शक होत, तशाच प्रतीचें मुस्तफा केमालपाशाचें खिलाफत–विसर्जन हें कृत्य होय. या वेळीं केमालपाशास तुर्कस्थानांतील सात कोटि मुसलमानांचाच केवळ

नव्हे तर जगांतील वीस कोटि मुसलमानांच्या मनोवृत्तीचा विचार करावयाचा होता आणि तोहि अशा वेळीं कीं, ज्या वेळीं जगभर पसरलेल्या मुससलमानांच्या चळवळीनें व सहानुभूतीमुळें त्याला कॉन्स्टांटिनोपलवरील आपलें निशाण कायम राखतां आलें. केमालपाशास जगांतील मुसलमानांकडून साहाय्य झालें तें खिलाफतसंरक्षणासाठीं, आणि त्यानें सदर मदतीचा उपयोग केला खिलाफतनाशासाठीं, ही केवढी विस्मयकारक गोष्ट होय ! पण ती गोष्ट केमालपाशानें मोठ्या धिटाईनें मनांत आणिली आणि मोठ्या निश्चयानें तडीस नेली. इतकी अचाट व अघटित करणी त्यानें केली पण त्यामुळें खुद्द तुर्कस्थानांत देखील रक्ताचा एकहि थेंब गळला नाहीं कीं तुंकस्थानाबाहेरील इस्लामी देशांतून निषेधाचा एकहि स्पष्ट शब्द ऐकू आला नाहीं. केमालपाशाचें केवढें हें जबरदस्त वजन व अवसान ! तुर्कस्थान महायुद्धाच्या महाव्याधीनें खचलो असेल, पण तो कडव्या मुसलमानांचा देश आहे आणि तसेच कडवे कोट्यावधि मुसलमान जगभरहि पसरले आहेत हें विसरतां कामा नये.

केमालपाशासारख्या दूरदृष्टि आणि समतोल वृत्तीचा वीरमुत्सद्दी खिलाफत बुडविण्यास उद्युक्त झाला त्या अर्थीं त्यानें ही गोष्ट अविचारानें केली नसेल असेंच कोणीहि म्हणणार. यासाठीं केमालपाशाच्या कृतीची सयुक्तिकता पूर्वेतिहास लक्षांत घेतल्यावांचून ध्यानांत येणारी नाहीं. तुर्की साम्राज्यांतील ग्रीस आदिकरून ख्रिस्ती राष्ट्रांस फोडण्याचा उद्योग रशियाची राणी कॅथेराइन हिनें १७७० पासूनच आरंभला. रशियाच्या या गृहभेदास हळू हळू यश येऊन ग्रीस देश १८१८ त साम्राज्याचें बंधन तोडून बाहेर पडला. तेव्हांपासून तुर्कस्थानांतील विचारी मुसलमानांस साम्राज्य टिकविण्याचा सनदशीर व लोकतंत्रानुवर्ती राज्यपद्धती हा एकच रामबाण उपाय सुचला. दुसरा महंमद व अबदुल अजीज हे शहाणे व सुधारणाप्रिय सुलतान होते. अबदुल अजीद यानें सनदशीर राज्यपद्धतीचें १८३९ त एक फर्मानहि काढलें होतें. १८७६ त मिधातपाशा मंत्रिमंडळांत असतां त्यानें अबदुल हमीद यांजकडून आणखी एक वरील प्रकारचें आश्वासन मिळविलें. परंतु या सुलतानांपैकीं एकहि आपल्या

वचनास जागला नाहीं. अबदुल हमीदच्या कारकिर्दींत तरुण तुर्कपक्ष स्थापन होऊन त्यानें बंडाचीहि पायरी गांठली. आणि त्यानें सुलतान हमीद याजपासून बाहुबलानें स्वराज्याचें हक्कहि १९०८ सालीं मिळविले. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस समानतेनें वागवून स्वराज्यांत सर्वांस सारखे हक्क द्यावयाचे आणि सर्वांस तुर्की साम्राज्यांतच सुखानें ठेवावयाचे हा तरुण तुर्कांचा राज्यक्रांति करण्यांत उद्देश होता. त्यानंतर कॉन्स्टांटिनोपलमधील सैन्यानें १९०९ त बंड करून तरुण तुर्कपक्षास उलथून पाडण्याचा व सुलतानाची सत्ता प्रस्थापित करण्याचा यत्न केला. तोहि तरुण तुर्कांनीं सिद्धीस जाऊं दिला नाहीं. या प्रयत्नास सुलतानाची आंतून फूस होती हें सांगणें नकोच. महायुद्धांत तरुण तुर्क पराभूत झाल्यावर कॉन्स्टांटिनोपल शहरीं १९१९ ते १९२२ पर्यंत दोस्तांच्या सैन्याची छावणी होती. त्यावेळीं जवळ ना पैसा ना सैन्य अशी सुलतानाची हलाखीची स्थिति होती. अशाहि विपन्नावस्थेंत तरुण तुर्कांशीं मिळतें घेऊन साम्राज्य शक्य तितकें जतन करण्याची बुद्धि सुलतान व तत्पक्षीय यांस झाली नाहीं; इतकेंच नव्हे तर तरुण तुर्कांस व साऱ्या इस्लामी जगास नापसंत असलेल्या सेव्हर्सच्या तहावर सही करण्यासही सुलतानास दिक्कत वाटली नाहीं. लॉसेनच्या तहाचे वेळीं केमालपक्षास स्वतंत्रपणें दोस्तांशीं तह करण्याचा अखत्यार नाहीं असें म्हणून सुलतान आडवा आलाच होता. केमाल पक्ष स्वतंत्रपणानें भरभराट पावून ग्रीसला तंबी पोचविण्यास चुकला असता, तर सुलताच्या तहानें तुर्कस्थानास सध्याचे बरे दिवस खात्रींनें पहावयास मिळाले नसते. कोणताहि सुलतान गादीवर असला तरी तो राष्ट्राची प्रगति अडवून धरतो व राष्ट्राचा घात करतो असा एक शतकभर अनुभव आल्यामुळेंच केमालपाशास पदच्युतीचें निर्वाणीचें शस्त्र काढावें लागलें. सुलतान या नात्यानें राजकीय सत्ता हातची सोडावयास नको आणि खलिफा या नात्यानें मुसलमानांचें धार्मिक वर्चस्व ख्रिस्ती, यहुदी या परधर्मीयांवर लादावयास पाहिजे हें सुलतानाचें जुनें पुराणें घातकी धोरण केमालपाशा आदिकरून उदारमतवादी मुत्सद्यांस

मुळींच पटण्यासारखें नव्हतें. म्हणून केमालपाशानें प्रथम राजकीय व नंतर धार्मिक मूळें उपटून सुलतानात व खिलाफत या दोन्ही संस्थांची राष्ट्रास लागलेली कीड काढून टाकली. केमालपाशा व त्याचे सहकारी यांच्या शहाणपणावर व सद्धेतूवर तुर्की मुसलमानांचा विश्वास आहे म्हणून त्यांनीं ही कडवट व तिखट गोळी मुकाट्यानें गिळली.

हिंदुस्थानांतील सेंट्रल खिलाफत कमिटीनें खिलाफत बुडविण्याचें कारण तुर्कस्थानच्या नॅशनल असेंब्लीस विचारलें होतें. नॅशनल असेंब्लींत कार्यकारी व कायदेकारी असे दोन्ही अधिकार समविष्ट झाले आहेत. असेंब्लीसाठीं सभासद निवडून देण्याचा अधिकार १८ वर्षांवरील सर्व पुरुष नागरिकांस आहे. मंत्रिमंडळांतील सभासद असेंब्लींतून निवडून देण्यांत येतात आणि ते सर्व व्यक्तिशः व सामुदायिक रीत्या असेंब्लीस जबाबदार आहेत. वसूल व खर्च यावर ताबा असेंब्लीचा असतो. धर्म, जात, हा भेद विसरून तुर्की नागरिकांचे हक्क ठरविण्यांत आले आहेत. न्यायाचे बाबतींत राजकीय किंवा इतर गोष्टी मनावर घ्यावयाच्या नाहींत. असेंब्लीचा अध्यक्ष या नात्यानें केमालपाशानें वरील प्रश्नास दिलेलें उत्तर सूत्रमय पण अर्थपूर्ण आहे. केमालपाशा म्हणतो—तुर्कस्थानच्या ग्रँड नॅशनल असेंब्लीनें कायदा केला तो असा, (१) खलिफास पदच्युत करण्यांत आलें आहे. (२) 'खिलाफत पीठ' याचा खरा अर्थ सरकार आणि लोकसत्ता असा असल्यामुळें खिलाफत पीठ बुडविलें गेलें. खिलाफत म्हणजे सरकार आणि सरकार म्हणजे राज्य. तुर्की लोकसत्ताक राज्यांत स्वतंत्र खिलाफत संस्था ठेवण्यापासून तुर्कस्थानच्या परराष्ट्रीय संबंधास आणि अन्तर्गत राजकीय ऐक्यास अडथळा होऊं लागला. या प्रश्नाच्या उलट बाजूनेंहि विचार करतां येईल. खिलाफत या संस्थेमुळें जगांतील सर्व मुसलमानांचें संयुक्त राज्य निर्माण होईल अशी कल्पना युगानुयुगें उराशीं बाळगण्यांत आली आहे. पण तिला मूर्तस्वरूप तर कधीं प्राप्त झालें नाहींच, पण उलट मुसलमानामुसलमानांतच त्यामुळें यादवी व लबाडी माजून राहिली आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, समाजांतील वेगवेगळ्या घटकांस वेगवेगळींच राज्यें पाहिजेत.

सदरील प्रसंगास अनुलक्षून कॉन्स्टांटिनोपलमधील प्रसिद्ध उदार-

मतवादी दैनिक 'टॅनिन' पत्रानें प्रकट केलेले विचारहि उध्दृत करण्यासारखे आहेत. टॅनिन म्हणतें—"आमच्या देशांत राजकीय व सामाजिक बाबतींत पूर्वी क्रान्ति झाली, पण तिनें फक्त स्वरूपात साधा फेरबदल केला. तो फेरबदल बाह्य व अपुरा होता. पण आज आमच्या स्वरूपांतच काय, पण ध्येयांत, मनोवृत्तींत, व कार्यपद्धतींत फेरबदल घडून येत आहे. खिलाफतीचें विसर्जन झाल्यानें तुर्कस्थान निखालस आधुनिक व पाश्चात्य वळणावर जात आहे. अर्वाचीन राज्यपद्धतीचीं तत्त्वें आमच्या राज्यव्यवस्थेंत सरसकट शिरत आहेत. युरोपियन राज्य व तुर्कस्थान यांत कांहींच तफावत आतां उरली नाहीं. सुधारणेंत आम्हीं मागें आहोंत खरें, तरी पण पाश्चात्यांचे उद्देश व पद्धति यांचेंच आम्ही अनुकरण करीत आहों. आणि युरोपियन राष्ट्रांच्या पावलावर पाऊल ठेवूनच आमची प्रगति होत आहे. लवकरच प्राच्य राष्ट्रें पूर्णपणें पाश्चात्य धर्तीवर गेलेलीं आमच्या दृष्टीस पडतील."

'वतन' पत्राचे उद्गार फारच व स्पष्ट सडेतोड आहेत "आमच्या संकटकालीं खलिफाची मुसलमानांवर असलेली सत्ता आमच्या उपयोगीं पडली नाहीं. महायुद्धांत खलिफानें जिहाद पुकारला तरी हिंदी मुसलमान आमच्या विरूद्धच लढले. आम्हीहि धार्मिक गोष्टी बाजूस सारून आधुनिक पद्धतीचेंच राज्य प्रस्थापित करीत आहों. खिलाफत चालत राहिल्यामुळें परराष्ट्रांतील मुसलमानांस आमच्या देशांतील राज्यकारभारांत लुडबुड करण्यास सवड सांपडली. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील मुसलमानांस तुर्की राज्यपद्धतीवर टीका करण्याचा हक्कच प्राप्त झाल्याप्रमाणें वाटलें. परराष्ट्रांनींहि या परिस्थितीचा फायदा घेतला व तुर्कांच्या राज्य कारभारांत बोट शिरकविण्यास मुसलमानी राष्ट्रांस चिथावणी दिली. या सर्व उपाधि आम्ही तोडून टाकीत आहोंत व सर्व धार्मिक लुडबुडींचा आमच्या राज्यव्यवस्थेशीं संबंध न येऊं देणार आहोंत. आधुनिक पद्धतीचें लोकसत्ताक राज्य स्थापण्यास खिलाफतीचें उच्चाटन अगदीं रास्त व जरूर होतें.

सद्यःस्थिति

महायुद्ध, सुलतान खिलाफत व तहनामा या अडचणींतून तुर्क-

तुर्कस्थानची सुटका झाली आहे. परंतु त्याचे परिणाम तुर्कस्थानास पुष्कळ दिवस भोगावे लागतील, यांत शंका नाहीं. लोकवस्तीची अदलाबदल करण्याची एक अट तहांत आहे.त्यामुळें समाजव्यवस्थेंत बराच घोंटाळा माजला आहे. तुर्कस्थानांतील ग्रीकांस ग्रीस देशांत रवाना करणें आणि ग्रीक हद्दींतील तुर्कांस तुर्कस्थानांत आणून सोडणें हा क्रम सांप्रत सुरू आहे. तुर्की राज्याचा मुख्य भाग अनातोलिया किंवा आशियामायनर हा होय. यांतील बहुतेक धंदे ग्रीक लोकांच्याच हातीं होते. व्यापारी, चांभार, दुकानदार, सुतार, लोहार, हे सर्व ग्रीकच होते. त्यांचा ग्रीस देशाशीं कित्येक शतकांत काडीचाही संबंध न राहिल्यामुळें त्यांस अनातोलिया हा स्वदेश व ग्रीस हा परदेश वाटावा यांत आश्चर्य नाहीं. हे लोक तुर्कस्थानास मुकल्यामुळें त्यांची तर धंद्याची घडी विसकटलीच, पण तसाच तुर्कस्थानच्या लोकव्यवहारांतहि घोंटाळा माजला. एखाद्याचा बूट फाटला तर तो दुरुस्त करूं न देणारा ठिगळ्या चांभारहि आज तुर्कस्थानांत मिळण्यास पंचाईत पडते.

भांडवलाचा तुटवडा व तज्ज्ञांची वाण या दोन अडचणी देशांत उद्योगधंद्यांची वाढ होण्याच्या आड येत आहेत. या बाबतींत युरोपियन सावकार, इंजिनियर व शास्त्रज्ञ यांचे पाय धरण्यावांचून तुर्कांस गत्यंतर नाहीं. पण तसें केल्यास तुर्कांच्या वाट्यास फक्त मजुरी यावयाची आणि संपत्तीचा मोठा अंश युरोपियन राष्ट्रांस मिळावयाचा हे परिणाम तुर्क ओळखून असल्यामुळें ते तूर्त या फंदांत पडत नाहींत. इंग्लंडशीं व्यापार करण्याची त्यांची इच्छा असली तरी त्यामुळें इंग्लंडचें राजकीय वर्चस्व आपल्यावर बसेल अशी त्यांस भीति वाटत आहे. जर्मनीचें राजकीय वर्चस्व बसावयाचा संभव आज नसल्यानें इंग्लंडच्याऐवजीं तुर्क लोक जर्मनीस जवळ करतील असा अंदाज आहे. अनातोलियाचा आंतील मुलूख ओसाड पडला आहे. थ्रेसमध्यें महायुद्धापूर्वीं ६॥ लक्ष शेतकरी होते, पण ती वस्ती हल्लीं २ लक्षच उरली आहे. रस्ते नादुरुस्त आहेत. महायुद्धकाळीं बांधलेला लोहमार्गहि बिघडला आहे.

तथापि देशांत शांतता व सुरक्षितता राखण्यांत तुर्कांनीं पुष्कळच यश मिळविलें आहे. जेंडरामरीचा बंदोबस्त उत्कृष्ट आहे. अंगोराची वस्ती अवघी तीस हजार आहे. त्यांत करमणुकीचीं साधनें मुळींच नाहींत. अंगोरा लष्करी दृष्ट्या नाक्याचें व महत्त्वाचें ठिकाण आहे. अंगोरा जातीच्या बकऱ्यांची पैदास ग्रीकांच्या १९२१।२२ मधील धामधुमीमुळें कमी झाली आहे. जर्मन लोक अंगोऱ्यास अनेक उद्योगांत आहेत. त्यांच्या मदतीनें अंगोरा राजधानीची पुष्कळ सुधारणा होण्यासारखी आहे. अंगोरा हें केंद्र मानून तेथून सर्व दिशांस सडका व लोहमार्ग फैलावून देण्याचा तुर्कांचा विचार आहे.

मँडेटचे दुष्परिणाम

मँडेटच्या नांवाखालीं इंग्लंडनें तुर्कांचा मेसापोटेमिया ऊर्फ इराक व पॅलेस्ताईन आणि फ्रान्सनें सीरिया ह्या प्रांतांचा कबजा घेतला आहे. सदर प्रांतांची स्थिति पुढील दोन प्रांतांच्या उदाहरणावरून लक्षांत येईल.

इराक

मेसापोटेमियाच्या बगदादपासून बसऱ्यापर्यंत पसरलेल्या प्रांतास इराक आरबी किंवा नुसताच इराक प्रांत म्हणत असत. परंतु अलीकडे मँडेट-अन्वयें इंग्लंडच्या ताब्यांत मेसापोटेमिया हा सारा देश आल्यापासून इराक हें नांव सबंध मेसापोटेमियास लावलें जातें. मक्केचा शेरीफ हुसेन याचा दुसरा मुलगा फैजूल यास इंग्रजांनीं इराकचा राज्याधिकार दिला आहे. त्याजवर देखरेख इंग्रजांनीं नेमलेला हाय कमिशनर ठेवतो. हुसेन राजास एक मंत्रिमंडळहि देण्यांत आलें आहे. मंत्रिमंडळाच्या साहाय्यानें फैजुल इराकची अन्तर्गत राज्यव्यवस्था पहातो. परंतु इराकचे परराष्ट्रीय संबंध हाय कमिशनरानें आपले स्वाधीन ठेवले आहेत. मंत्रिमंडळ हें कार्यकारी मंडळ हाय. त्याखेरीज मजालिस अल् तासिसी नामक प्रातिनिधिक मंडळ असून कायदेकानूंची सत्ता त्याजकडे आहे.

इंग्लंड व इराक यांचे दरम्यान १० आक्टोबर १९२२ रोजीं एक तात्पुरता तह झाला. त्या तहास अनुसरून वीस वर्षेपर्यंत इराकचें धोरण रहावें असें ठरलें होतें. परंतु वीस वर्षांची ही मुदत इराकी प्रजेस मोठी

वाटून तिनें ती चार वर्षांवर आणून सोडली. अशा प्रकारची दुरुस्ती वरील तहनाम्यांत ३० एप्रिल १९२३ रोजीं बगदाद मुक्कामीं करण्यांत आली. मजालिस अल् तासिसी या संस्थेंत इराकमधील सर्व जातींचे प्रतिनिधी निवडून येतात. या प्रतिनिधि मंडळाची तहनाम्यास संमति मिळाली. म्हणजे तहनाम्यास कायम स्वरूप प्राप्त होणार असल्यामुळें तो महत्त्वाचा कार्यभाग उरकून घेण्याच्या उद्योगास फैजुल राजा व हाय कमिशनर हे लागले. इराकचें सर्वस्व हरण करून त्यास इंग्रजांच्या गुलामगिरींत दीर्घ काळ ठेवणाऱ्या या तहनाम्यावर सही करण्याचे बाबतींत मजलिसनें एक वर्षभर घोळ घातला. अखेर बांबगोळ्यांच्या धाकानें आणि मनधरणीनें फैजुल राजे व हाय कमिशनर यांनीं मजालिसची ता. २७ मार्च १९२४ रोजीं सही घेतली. तहास विरोध सुशिक्षित वर्गाचा होता व तो गैर-वाजवी नव्हता हें पुढील चार अटींवरून कोणाच्याहि लक्षांत येईल.

हुसेनच्या मंत्रिमंडळांत गृहमंत्री, धनमंत्री, न्यायमंत्री, रक्षणमंत्री, लोककार्य मंत्री,(Public works) जलमंत्री, (इरीगेशन), कृषिमंत्री, मार्गमंत्री, पोलिस, पोस्ट, तार, आरोग्य, शिक्षण, व अन्तर्बाह्य जकात यांजवरील इन्स्पेक्टर जनरल आणि अपील कोर्टाचा अध्यक्ष इतके बडे अधिकारी आहेत. यांचे सर्व सल्लागार इंग्रज कामगार पाहिजेतच, पण त्याखेरीज बाकीचे अधिकारी इंग्रज नेमावे. निदान इतर जातींचे युरोपियन इराकसरकारनें नेमूं नयेत, असें तहांत एक कलम आहे. सदर इंग्रज कामगारांचे पगार फार जबर आहेत आणि ते इराकसारख्या गरीब देशास असह्य होत असें पुष्कळ विचारी इंग्रजांचेंहि मत आहे. परंतु लायख कामगार पाहिजे असतील तर त्यांच्या पगाराचा भार इराकनें सोसला पाहिजे असें त्यांचें मत आहे. पण एवढ्या पगाराचे अधिकारी इराकनें मागितले असले तरच त्याजवर पगाराची जबरदस्ती करण्यांत अर्थ आहे. आपल्या देशांतील लायख लोकांस बाजूस सारून परकीयांस वर्णी लावून देण्यास कोणतेंहि स्वदेशी सरकार तयार होणार नाहीं हें निर्विवाद होय. गोऱ्या अधिकाऱ्यांस नुसता पगारच द्यावा लागणार आहे असें नसून सल्लागार या साळसूद नांवाखालीं मंत्र्यांची सर्व सत्ता कातडीच्या व

साम्राज्य सरकारच्या जोरावर हे गोरे अधिकारी आवळून बसणार, हें सांगावयास नकोच. पगाराखेरीज त्यांस मिळणारें अलावन्सहि अधिकच अन्यायाचें व विलक्षण स्वरुपाचें आहे. रविवार, सणवार, आजार व वर्षास एकवीस दिवसांची स्थानिक म्हणजे देशांतल्या देशांत रजा आहेच, पण त्याशिवायहि विलायतेस जाण्याकरितां दर आठवड्यास एक दिवस. या हिशेबानें वर्षाचे काठीं ५२ दिवसांची पगारी रजा द्यावयास पाहिजे. आपण भिकेस लागून इंग्रज जांवयाची भर करण्याइतकें इराकमधील आरबांचें औदार्य वाया जात नसल्यामुळें मजलीसनें या शर्तीस विरोध केला. वरती हाय कमिशनर व खालती सल्लागार यांच्या सासुरवासांत सांपडलेल्या मंत्र्यांस राज्यशकट हांकण्यास स्वातंत्र्य तरी कसें मिळणार?

ब्रिटिशांनीं महायुद्धाच्या काळांत युद्धोपयोगार्थ बसरा व त्याच्या आजूबाजूस इमारती, लोहमार्ग व बंदर अशीं मोठमोठीं खर्चाचीं कामें करून ठेवलीं आहेत. तींहि इराकनें इंग्रजापासून खरेदी घ्यावी ही दुसरी शर्त आहे.बसऱ्याचीं कामें आरबांच्या संमतीनें किंवा त्यांच्या उपयोगासाठीं बांधलेलीं नाहींत. त्यांचा खर्च इराकानें काय म्हणून सोसावा? वरील कामें करणें इराकच्या मर्जीवर सोपविलें असतें, तर आपलें अंथरुण पाहूनच त्यानें पाय पसरले असते. तसें स्वातंत्र्य त्यास न ठेवतां त्याजवर हा पैशाचा बोजा लादणें म्हणजे सत्तेच्या बळावर जबरदस्तीच करणें होय. सैन्यादि संरक्षणाच्या साधनार्थ इराकनें आपल्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश खर्चावा असें तिसरें कलम आहे. इराकसारख्या गरीब व नव्या राष्ट्रावर हें ओझें जबरदस्तच म्हटलें पाहिजे. इराकचे रक्षणमंत्री नवरी पाशा सयद यांच्या मतें इराकास आत्मसंरक्षणार्थ १८ हजार सैन्य असणें आवश्यक होय. इराकपाशीं स्वतःचें सैन्य सध्यां मुळींच नसून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिश सैन्यानेंच उचलली आहे. इराकानें स्वतःचें सैन्य १९२७–२८ पर्यंत जमवावें असा करार आहे. म्हणजे आणखी २।३ वर्षेपर्यंत ब्रिटिश सैन्याचा खर्च इराकनेंच सोसावा असें समजावें लागतें.

इराकास नडणारें चौथें कलम कर्जाचें होय. नवीन अशा इराक देशास स्वतःचें वेगळें राष्ट्रीय कर्ज असण्याचें कारण नाहीं. पण इराक

असा रिकामा न पाहवल्यामुळेंच कीं काय इंग्लंडनें आपलें कर्जाचें ओझें इराकच्या रिकाम्या खांद्यावर ठेवण्याचें योजिलें आहे. इंग्लंड तुर्कस्थानाबरोबर लढलें व त्या लढाईत इंग्लंडास बराच खर्च करावा लागला. तुर्कस्थान युद्धांत पराभूत झाल्यामुळें हा खर्च तुर्कस्थानानें तरी सोसावा किंवा तुर्कस्थानास तो झेंपणार नसल्यास इंग्लंडनें तुर्कस्थानास फार तर सूट द्यावी. पण इंग्लंडनें या अडचणींतून वेगळ्याच रीतीनें वाट काढली आहे. तुर्कांचें साम्राज्य मोडून त्याचीं इराकसारखीं शकलें इंग्लंडच्या हातीं लागलीं आहेत. युद्धाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चाचा भाग हिस्सेरशीनें इराकानें सोसावा असें इंग्लंडचें त्यांच्या मागें टुमणें आहे. इंग्रज लोक तुर्कस्थानाशीं इराकला स्वतंत्र करण्यासाठीं खास लढले नाहींत. तुर्कस्थानच्या चिंधड्या उडविल्यावर इराकसारखे देश उघडपणें गट्ट करण्याची लाज वाटल्यामुळें मँडेटचा बुरखा तोंडावरून ओढून इराकचा गोळा गिळण्याची विलायती शक्कल इंग्रजांनीं काढली आहे आणि हिला ते इराकचें स्वातंत्र्य म्हणणार आणि त्या स्वातंत्र्याची किंमत म्हणून त्याजपासून तीन कोटि रुपयांची फेड करून मागणार ! अशा या स्वातंत्र्याच्या मिळमिळीत सौभाग्यापेक्षां पारतंत्र्याचें झळझळीत वैधव्य पुरवलें अशी इराकांतील आरबांच्या वैतागलेल्या मनाची अवस्था झाली असेल.

इराकची जमा व त्याजवर लादण्यांत येणारा खर्च यांचे आंकडे पुढें मांडले म्हणजे इराकच्या विटंबनेची यथार्थ कल्पना येणार आहे. इराकनें विकत घ्यावयाच्या बांधकामाच्या किंमता पुढीलप्रमाणें आहेत.

कामें	खर्च
कालवे व बंधारे	रुपये ६२१२०४०
रस्ते	३२००००
पूल	१११७५००
पोस्ट, तार, टेलिफोन	१७६००००
बसरा पोर्ट ट्रस्ट	७२१९०००
	१६६२८५४०

लष्करी खर्च	६६५२३२६
पोलीस खर्च	६६४१८२३
	१३२९४१४९
इराकचें उत्पन्न	४८८३४२४४

इराकचें सारें उत्पन्न पांच कोटींच्या आंतच आहे. यांतून पोलीस व सध्याचा लष्करी खर्चच १ कोटी ३३ लक्षांचा जाणार. त्याखेरीज दिवाणी व मुलकी वगैरे अनेक खात्याकडे व्हावयाच्या खर्चाचा विचार केल्यास नित्य खर्चास इराकचें उत्पन्नहि पुरणें शक्य नाहीं. अशा स्थितींत तीन कोटी रुपयांचें कर्ज इराकानें कशांतून द्यावें आणि इंग्रजांनीं करून ठेवलेल्या बांधकामाचें १ कोटि ६३ लक्ष रुपये फेडण्यास त्यांजपाशीं तारण काय ? सारांश, मॅंडेटच्या नांवाखालीं बळकावलेल्या देशांची स्थिति मुक्या व भारवाहक जनावराप्रमाणें शोचनीय झाली आहे.

इंग्लंड व इराक यांजमधील तहावर मजालिसची मारून मुटकून सही घेण्यांत आली त्या वेळीं मजालिस यानें घातलेल्या अटी वाचण्याजोग्या आहेत.

"तहांत घातलेल्या शर्ती इतक्या कडक आहेत कीं, त्या पाळण्याची शक्ति या इंग्लंडच्या दोस्ताच्या अंगीं बिलकूल नाहीं. परंतु ब्रिटिश सरकारच्या दानतीवर व सरळपणाच्या कीर्तीवर भिस्त ठेवून आम्ही आहों. इराकी लोकांच्या आकांक्षास ग्रेट ब्रिटन विरोध करणार नाहीं आणि इराक आपणावर अवलंबून आहे हें ग्रेट ब्रिटन विसरणार नाहीं, असा असेंब्लीस भरंवसा आहे."

" ब्रिटिश सरकाच्या वतीनें हाय कमिशनरानें तहासंबंधीं जो खुलासा केला आहे, त्याचा उपरिनिर्दिष्ट शर्तीवर असेंब्ली स्वीकार करीत आहे. तहास आमची संमति मिळाल्यावर इंग्रज लोक आपल्या लौकिकास जागून पैशासंबंधाच्या करारांत उदार मनानें फेरफार करतील असा असेंब्लीस भरंवसा आहे."

"याकरितां राजेसाहेबांनीं तह, करार (प्रोटोकॉल) आणि

मान्यता (ॲग्रीमेंट) यावर सही करावी अशी आमची त्यांस विनंति आहे. आणि आमची अशी समजूत (अंडरस्टँडिंग) आहे कीं, राजेसाहेब यासंबंधीं ब्रिटिश सरकाराशीं तावडतोब बोलणें सुरू करून सुचविलेले फेरफार घडवून आणतील. इराकचा मोसलवर असलेला हक्क ग्रेट ब्रिटन जर राखणार नाहीं तर हा तह व करार रद्द करण्यांत येईल."

मजलसीच्या सर्व अटींतील शेवटची खोच महत्त्वाची आहे. कर्ज व खर्च याबद्दल मजलसीची कुरकुर आहेच. तरी पण सर्वांत अधिक जोर मोसलवर आहे. तुर्कांपासून मोसल प्रांत घेऊन इंग्रजांनीं इराकच्या स्वाधीन केला तर मग त्या आशेवर बाकीचें सारें ओझें इराक निमुटपणानें सोसण्यास तयार होईल असा भरंवसा वाटतो. मोसलसाठीं ओढ धरण्यांतील इंग्रजांचें हेंहि कारण लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तुर्कस्थान व इराक यांजमधील सरहद्दीचा लढा अद्यापि मिटलेला नाहीं. लासेनच्या तहपरिषदेनें सदर लढा तुर्कस्थान व इंग्लंड यांनीं आपसांतील समजुतीनें सोडवावा असा निकाल दिला होता. तुर्कस्थान व इराक यांच्या सरहद्दीवर कुर्दिस्थान ऊर्फ मोसल प्रांत असून मोसलमधील रॉकेल तेलाच्या खाणींच्या लोभानें तो प्रांत इराकास जोडावा असा इंग्लंडचा आग्रह आहे. या प्रश्नाची चौकशी करण्याकरितां राष्ट्रसंघानें नेमलेल्या कमिशनानें नुकताच निकाल दिला असून कुर्दिस्थानची फाळणी करून कुर्दिस्थानचा धाकट्या झाल नदीपर्यंतचा सर्व पश्चिम भाग तुर्कस्थानास जोडावा किंवा इराकच्या संरक्षणाची जबाबदारी आणखी पंचवीस वर्षेंपर्यंत इंग्लंड घेत असल्यास सबंध कुर्दिस्थान इराकांत सामिल करावा असें ठरविलें आहे. कुर्दिस्तान इराकास जोडून इराकची जबाबदारी आणखी पंचवीस वर्षें घेण्यास इंग्लंड उत्सुक आहे. या गोष्टीला इंग्लंडनें इराकच्या मुख्य मंत्र्याची संमतीहि मिळविली आहे आणि या मनसुब्याच्या आड तुर्कस्थान येईल, तर त्यास चूप बसविण्यासाठीं भूमध्यसमुद्रांत आरमाराची जय्यत तयारी ठेवण्यांत आली आहे. राष्ट्रसंघाच्या रचनेवरून पहातां राष्ट्रसंघ इंग्लंडच्याच बाजूनें कौल देईल असा संभव दिसतो.

पॅलेस्ताईन

तुर्की साम्राज्यांतील सर्व प्रदेशापेक्षां युरोपियन राष्ट्रांस पॅलेस्ताइन प्रांत काळजाचा तुकडा वाटतो. त्यांत त्यांच्या येशूख्रिस्ताचा अवतार झालेला, मग तो प्रांत हस्तगत करण्याची आलेली सोन्यासारखी संधि इंग्लंड कशी फुकट दवडील ? परंतु एवढी सबब पॅलेस्ताईन जिंकून आपल्या राज्यास उजळ माथ्यानें जोडण्यास इंग्रजांस पुरेशी न वाटल्यामुळें त्यांनीं त्यांत यहुद्यांची प्रस्थापना करण्याचा व्यूह रचला. यहुद्यांचा धर्म ख्रिस्त्यांच्या धर्मास किती धरून आहे हें येशू ख्रिस्ताचा जन्म यहुद्यांच्या पाळण्यांत झाला या एकाच गोष्टीवरून सिद्ध होणार आहे. यामुळें पॅलेस्ताईन हा प्रांत यहुदी व ख्रिस्ती या उभयतांस सारखाच वंदनीय झाला आहे. अशा रीतीनें समान रज्जूंनीं एकत्र निगडित झालेल्या यहुद्यांनीं स्वदेशभूमि समजून पॅलेस्ताईन प्रांताचा परस्पर जीर्णोद्धार केला तर तो इंग्रजांस हवाच आहे. याच शर्तीवर अर्ल बाल्फोर यांनीं हा प्रांत इंग्लंडच्या नजरेखालीं ठेवून घेण्याचें कबूल केलें. बाल्फोर साहेबांनीं ही शर्त राजरोसपणें घातल्यावर पॅलेस्ताईनमधील आरबांस यहुद्यांच्या वर्चस्वाखालीं नांदावें लागणार हें उघड होय.

ऐतिहासिक दृष्ट्या आरबांपेक्षां यहुदी लोकांचें पॅलेस्ताईन प्रांतांत वास्तव्य प्राचीनतर आहे. तथापि आरब मुसलमान त्या प्रांतांत कैक वर्षें रहात आले आहेत व त्यांची संख्याहि यहुद्यांपेक्षां सातपटींनीं मोठी आहे. असें असतां तुमचें यहुद्यांशीं न पटल्यास तुम्ही अरबस्थान सोडून चालते व्हा, असें इंग्रजांनीं यहुद्यांतर्फे आरबांस सांगणें न्यायाचें होईल काय ? पॅलेस्ताईन शिवाय आरबांना दुसरा स्वदेश नाहीं असें सिद्ध झाल्यानंतर यहुदी व अरब यांस त्या देशांत समान हक्क मिळाले पाहिजेत, हें ओघानेंच कबूल करावें लागतें. परंतु पॅलेस्ताइन ही एकट्या यहुद्यांची स्वदेशभूमि ठरली तर आरबांच्या हक्कांची पायमल्ली झाल्यावांचून रहाणार नाहीं. आणि तशा प्रकारचीं दुश्चिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. यहुद्यांची जात आधींच धूर्त, धोरणी व धनिक, त्यांतून ती बारा बंदरचें पाणी प्यालेली, शिकलेली, सुधारलेली आणि आधुनिक यंत्रसामग्रीनें सज्ज

झालेली. तिला इंग्लंडचा पाठिंबा व तेथील हाय कमिशनर सर सॅम्युएल त्यांचाच जातभाई. आधुनिक चळवळीचे सर्व पवित्रे त्यांस अवगत आहेत आणि त्यांतहि ते थोडेसे घसरले तर त्यांस सांवरून धरण्यास त्यांचे इंग्रज पाठीराखे सिद्ध आहेत.

पॅलेस्ताईनमध्यें महायुद्धापूर्वी यहुदी, ख्रिस्ती व मुसलमान यांची वस्ती आठ लाख असून त्यांपैकीं पाऊण लाख यहुदी होते. पण गेल्या ५।६ वर्षांत पॅलेस्ताईनवर इंग्लंडचा ताबा बसल्यापासून त्यांत देशोदेशींचे २५।३० हजार यहुदी घुसले आहेत. अशा प्रकारचे संपन्न, सुधारलेले, कल्पक, गोडबोले, मितव्ययी व उद्योगी यहुदी काय करूं शकणार नाहींत? पॅलेस्ताईन ही भूमि तुर्की अमलाखालीं अगदीं कंगाल दशेस पोंचली असली तरी नैसर्गिक संपत्ति तिजपाशीं मुळींच नाहीं असें नाहीं. पॅलेस्ताईन ऐन भरभराटींत होतें, त्या वेळीं त्यांत संत्रे, अंजीर, द्राक्षें, व डाळिंबें यांच्या बागांच्या बागा लागून गेलेल्या असत वत्यांतून घृतकुल्या व मधुकुल्या वहात असत असें जुन्या ग्रंथांतून त्याचें वर्णन आढळतें. पॅलेस्ताईनच्या या प्राचीन संपन्नतेची कल्पना यहुद्यांस असल्यामुळें त्यांनीं त्या दिशेनें नव्या शांतियुगांत आतांपासूनच उद्योग आरंभला आहे. त्यांनीं २५०० एकर जमीन वसाहतीकरितां सवलतीनें घेऊन तिजवर ७२ ठिकाणीं टुमदार बंगले उठवून दिले आहेत. पैशाची थैली सोडल्यावर आरबांपासून त्यांस हवी तितकी जमीन सहज मिळतें. त्यांजपासून लक्ष्मीच्या नूपुररवानें यहुदी लोकांनीं हजारो एकर जमीन यापूर्वींच खरेदी केली आहे. तीस कोटी रुपये जमिनींत ओतून त्यांनीं जाफा व गाझा यांमधील प्रदेशांत द्राक्षांच्या वेली व नारिंगांचीं झाडें लावून त्याचें प्रति नंदनवनच करून सोडलें आहे.

यहुदी एकटचा शेतीवर अवलंबून नसून त्यांची दृष्टि चौफेर आहे. यांत्रिक व भौतिक सामर्थ्यावर त्यांनीं तऱ्हेतऱ्हेचे कारखाने उभे केले आहेत. त्याचप्रमाणें साबण, सीमेंट, कांच, रेशीम, गालिचे व गुंड्या यांचे धंदे पूर्ण भरभराटीस येत आहेत. उद्योगधंदे व शेती या दोहोंस दक्षतेनें, शहाणपणानें व पद्धतशीर रीतीनें वाहून घेतलेल्या

यहुद्यांचीं घरें लक्ष्मीचीं निवासस्थानें बनत आहेत. सहाराच्या रेताड मैदानांतून मधून मधून झुळू झुळू झरे वहावे त्याप्रमाणें यहुदी लोकांचे बागबगीचे व बंगले पॅलेस्ताईनच्या रुक्ष व डोंगराळ प्रदेशांत दृष्टीस तोषवीत आहेत.

पॅलेस्ताईनमधील वनें अशा रीतीनें सुशोभित होत असतां यहुद्यांचें लक्ष शहराकडे वेधूं लागलें आहे. स्टेनबर्ग नामक एका यहुद्यानें जॉर्डन नदीवर विद्युत निर्माण करून तीं शहरांतून खेळविण्याची योजना हातीं घेतली आहे. त्यास कमींत कमी १५ कोटि रुपये भांडवल लागेल असा अंदाज आहे. हें कार्य शेवटास गेल्यावर जेरुसलेम वगैरे शहरांतून ट्रामगाड्या धावूं लागतील, कारखान्यांचीं चक्रें फिरत राहतील आणि जनतेचें जीवित अधिक सुखमय होईल. पण आरबांचें काय होईल ?

फॉर्टनाइटली रिव्ह्यूच्या माहे जुलई सन १९२५ च्या अंकांत चिसहॉम डन्बर ब्रटन नामक एका लेखकानें ब्रिटिश मुत्सद्यांनीं पॅलेस्ताईनचा कबजा मॅंडेटच्या पांघरुणांखालीं घेतांना जाहीर केलेलें धोरण व प्रस्तुत पॅलेस्ताईनमध्यें घडणारे प्रकार यांमधील विरोध मार्मिकपणें दाखविला आहे. तो म्हणतो, ब्रिटिश अंमलाखालीं आरबांच्या प्रातिनिधिक संस्था व त्यांस तुर्कांनीं दिलेलें स्वराज्याचे हक्क नष्ट झाले आहेत. आरबांच्या जुन्या संस्था काढून घेऊन त्या ऐवजीं इंग्लंडनें दिलेल्या नव्या संस्था हा जुन्यांचा योग्य मोबदला नव्हे. बाहेरचे यहुदी क्रमाक्रमानें पॅलेस्ताईनमध्यें आणून यहुद्यांचें प्राबल्य प्रस्थापित करणें हेंच ब्रिटिश मुत्सद्यांचें व यहुदी पुढाऱ्यांचें धोरण असल्याविषयीं आरबांचा खात्री होत आहे. आणि म्हणूनच ब्रिटिश राजनीतीवरचा आरबांचा विश्वास उडाला आहे. पॅलेस्ताईनचा हाय कमिशनर सर हर्बर्ट सॅम्युएल व माजी वसाहतमंत्री मि. चर्चिल यांनीं सन १९२१ व २२ सालीं आरबांस निराळ्या प्रकारचीं आश्वासनें दिलीं होतीं. 'पॅलेस्ताईनच्या राज्यकारभारांत आरब लोकमतास पूर्ण मोकळीक व अधिकारयुक्तपणा देण्यांत येईल ' असें सॅम्युएल याचें आश्वासन होतें. कांहीं यहुद्यांनीं कांहीं विशिष्ट संख्येच्या मर्यादेपर्यंत आणि सांप्रतच्या जनतेच्या हिताच्या आड न येतील अशा बेतानें पॅलेस्ताईनमध्यें येऊन रहावें व पॅलेस्ताईनच्या उत्क-

षांस मदत करावी ' असें मि. चर्चिल यांनीं म्हटलें होतें. आणि सांप्रत वे ब्रिटिश वसाहतमंत्री मि. अमेरी यांनीं जेरुसलेम येथें गेल्यावेळीं आरब शिष्टमंडळास सांगितलें कीं ' पॅलेस्ताईनमधील सर्व जनतेचें हित साधणें हाच ब्रिटिशांचा प्रधान व मुख्य हेतु आहे.' परंतु हीं सर्व अभिवचनें केवळ शाब्दिक होत. वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. इंग्रज मुत्सद्दी बोलतात तशी त्यांची कृति नाहीं. सन १९२२ मध्यें पॅलेस्ताईन प्रांतास राजकीय घटना मिळाली, पण त्या वेळीं दिलेल्या कायदेमंडळांत प्रतिनिधींचा हक्क आरबांस त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत न मिळतां त्यांचे प्रतिनिधी सारे ४० टक्केच होते. आरब या विषम योजनेनें चिडले आणि त्यांनीं कायदेमंडळांत बसण्याचेंच नाकारलें.

यहुद्यांचें पॅलेस्ताईनमधील धोरण काय राहील यासंबंधीं यहुदी लोकांचे एक पुढारी डॉ. एडर यांचे उद्गार आरबांचा अविश्वास वाढविणारे आहेत. त्यानें १९२१ सालीं पॅलेस्ताईनमध्यें घडलेल्या दंग्याची चौकशी करण्याकरितां सरकारानें नेमलेल्या चौकशीकमिशनपुढें अशी साक्ष दिली कीं, ' पॅलेस्ताईन हा कोणाचा तरी एकाचाच स्वदेश होऊं शकेल आणि तोहि यहुद्यांचाच होय. यहुदी व आरब यांजमध्यें सत्तेची समान वांटणी होणार नाहीं. यहुद्यांची वस्ती पुरेशी वाढली म्हणजे प्राबल्य यहुद्यांचेंच राहील.' गेल्या मे महिन्याच्या ३ ऱ्या तारखेस न्यूयॉर्क शहरीं भरलेल्या यहुदी परिषदेंत पॅलेस्ताईन सिक्यूरिटीज कंपनीचे अध्यक्ष म्हणाले ' आम्ही यहुद्यांच्या वसाहतीस मजबुती आणण्याच्या खटपटींत आहों. आणि १०।१५ वर्षांत पॅलेस्ताईन भक्कमपणें यहुदी होईल.' यहुदी पुढाऱ्यांचे उद्गार या प्रकारचे आहेत. पॅलेस्ताईनमध्यें स्थापन झालेल्या राज्यव्यवस्थेंत यहुद्यांपेक्षां आरबांची संख्या आठपटींनीं अधिक असतां सत्तेचा बहुतेक अंश यहुद्यांनीं उचलला आहे. हाय कमिशनर यहुदी होता आणि अर्ल बाल्फोर यांच्या हस्तें येरुसलेममध्यें यहुदी विश्वविद्यालयहि नुकतेंच स्थापन झालें आहे. यावरून मँडेट म्हणून पॅलेस्ताईन प्रांताचा कबजा घेतल्यावर वचनभंग करून एकंदर जनतेच्या हितापेक्षां यहुद्यांच्या हितावर लक्ष देऊन पॅलेस्ताईनचा राज्यकारभार कसा पक्षपातीपणानें चालू आहे याची कल्पना आल्यावांचून रहात नाहीं.

प्रकरण ६ वें.

दोन चरित्रें.

मुस्तफा केमालपाशा

मुस्ताफा केमालपाशा याचा जन्म दुसऱ्या अबदुल हमीदच्या कारकिर्दींत १८८२ सालीं सालोनिका येथें झाला. त्याचा बाप सालोनिकाच्या जकात खात्यांत एक लहानसा नोकर होता. मुस्तफा अल्पवयींच असतां त्याचा बाप मरण पावला. बापाच्या पश्चात् मुस्ताफा व त्याची वडील बहीण त्यांच्या संगोपनाची जबाबदारी मुस्ताफाच्या आईवरच पडली. तिनें मुलीचें लवकरच लग्न करून टाकून तिला पोसण्याचा यातायातींतून आपली सुटका करून घेतली. आईच्या मनांत मुस्ताफास माशिदीस जोडून असलेल्या इकतब या शाळेंत घालण्याचें होतें. मुस्तफास शिकून तयार झाल्यावर त्यानें होजा व्हावें अशी तिची इच्छा होती. परंतु मुस्तफाचा कल वेगळ्याच दिशेकडे होता. सालोनिकाच्या रस्त्यांतून एकरंगी पोशाख करून मिरविण्याऱ्या लष्करी अधिकाऱ्यांस पाहून त्याच्या मनानें शिपाई होण्याचा नाद घेतला. सालोनिकास एक लष्करी शिक्षणाची प्राथमिक शाळा होती. त्या शाळेंत मुस्तफा जाऊं लागला. सदर शाळेंत शिकत असतां गणित विषयाच्या शिक्षकास हा लहान मुलगा फार आवडून त्यानें त्याचें नांव केमाल (Rightness) असें ठेवलें.

कॉन्स्टांटिनोपलचा सुलतान अबदुल हमीद हा मोठा जुलुमी म्हणून विख्यात आहे जनतेंत नवीत स्वातंत्र्याच्या आकांक्षा उदय पावलेल्या असून त्या निर्मूल करण्यांत अबदुल हमीद आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घालीत होता. जिकडे तिकडे गुप्त हेरांचें पेव फुटलें होतें. हेरांच्या चुगल्यांनीं जनतेंतील असंतोष व स्वातंत्र्याची आकांक्षा पुसली गेली नाहींच; पण ती राजरोस न वावरतां सांदीकोपऱ्यांत दडून बसली. त्यानें सैन्य नवीन धर्तीवर शिकवून जय्यत तयार करून ठेवलें. परंतु सैन्यांतील शिपायांस

सुलतानाचा सुलतानी अंमल न रुचून ते वरून राख पसरलेल्या अग्नीप्रमाणें आंतून धुमसत होते.

सालोनिका येथील प्राथमिक तयारीची शाळा, मोनॅस्टीर येथील अधिकारी तयार करण्याची शाळा आणि कॉन्स्टांटिनोपल येथील पाठशाळा (वॉर ऍकॅडेमी) यांतून शिकून व पदवीधर बनून मुस्तफा वयाच्या २१ व्या वर्षी बाहेर पडला आणि त्यानंतर त्याची लेफ्टनंटच्या हुद्यावर नेमणूक झाली. सन १९०८ च्या राजक्रांतींत पुढें प्रसिद्धीस आलेले मोनॅस्टीर तें हेंच होय. क्रांतिकारकांचें तें एक केंद्रच होतें. सदर ठिकाणीं ऐन ज्ञानग्रहाणाचे दिवस घालवीत असतां तेथील वातावरणांत दाट बसून राहिलेले राजकीय विचारहि केमालाच्या डोक्यांत भरले. केमाल बे नामक एका कवीनें वतन म्हणजे पितृलोक या नांवाचें नाटक रचिलें होतें. त्याची एक प्रत केमाल पाशाच्या हातीं पडली. अबदुल हमीद यानें सदर नाटकाची प्रत न् प्रत जप्त करून नेली होती. वतन नाटकाचा कर्ता केमाल बे यासहि राजभयानें तुर्कस्थान सोडून इंग्लंडांत जाऊन रहावें लागलें होतें. वतन वाचल्याच्या वहिमावरूनहि कॉन्स्टांटिनोपलमधील प्रजेवर हद्दपारीची पाळी यावी. केमाल पाशास वतन नाटक वाचून पाश्चात्य राज्यपद्धतीची कल्पना आली व तो सुलतानाच्या राज्यपद्धतीचा अधिकच द्वेष्टा बनला.

लष्करी पदवीधर झाल्यावर केमालानें कॉन्स्टांटिनोपलच्या स्तंबूल मोहल्यांत एक खोली भाड्यानें घेतली व तिच्यांत स्वातंत्र्य समितीचीं (Society of Liberty) मुख्य कचेरी ठेवली. तेव्हांपासून केमालच्या या चळवळीचा अधिकाऱ्यांस संशय येऊन त्यांनीं त्यास कांहीं दिवस पकडून अटकेंत ठेवलें व नंतर दमास्कसच्या रिसाल्यांत त्याची नेमणूक केली. दमास्कस येथें गेल्यावरही केमालनें आपला उद्योग तसाच अव्याहत सुरू ठेवून सीरियांत स्वातंत्र्य समितीच्या शाखा पसरविल्या. परंतु राज्यक्रांतीच्या चळवळीस सीरिया प्रांत योग्य नसून ती करावी तर युरोपांतच करावी अशी त्याची खात्री झाली. म्हणून दमास्कस येथून निसटून तो अलेक्झांड्रियास गेला आणि अलेक्झांड्रियाहून सालोनिकास

पोंचला. कारण तरुण तुर्कांच्या ऐक्य-प्रगति-संघाचें तें केंद्रच होऊन राहिलें होतें.

सालोनिकास मुस्तफा चार महिने छपून होता. सालोनिकास आपण आहों याचा वास कॉन्स्टांटिनोपलच्या दरबारीं लागल्यावर त्यानें आकाबास पळ काढला. आकाबा येथें या वेळीं बंडाळी माजली असल्यामुळें ती मोड-ल्याचें श्रेय आपण मिळवून दरबारचा रोष घालवावा अशी ही युक्ति होती. केमालची ही युक्ति साधली व त्याची पुन्हां सीरियांत नेमणूक झाली. तेथें कांहीं दिवस राहून युद्धमंत्र्यांच्या अदलाबदलींत त्यानें स्वतः-ची बदली पुन्हा सालोनिकांत करून घेतली. सालोनिकास परत आल्या-वर आपली स्वातंत्र्य-समिति स्वतंत्र ठेवणें त्यास इष्ट न वाटून त्यानें ती ऐक्य-प्रगति-संघांत मिसळून दिली.

आतांपर्यंत रशिया व तुर्कस्थान यांच्या चुरशींत रशियाविरुद्ध तुर्कस्थानास उचलून धरण्याचें इंग्लंडचें धोरण होतें. हें धोरण यावेळीं बदलून १९०७ च्या तहानें इंग्लडनें आपली दोस्ती रशियाशीं जमविली.

तरुण तुर्कांच्या दृष्टीनें हें लक्षण ठीक नसल्यानें त्यांनीं क्रान्ती-चीच उचल केली. या क्रान्तीच्या गडबडींत केमाल तिसऱ्या अक्षौहिणीचा सेनापति महमद शौकत पाशा याच्या हाताखालीं होता. क्रान्ति होऊन कॉन्स्टांटिनोपलचीं राज्यसूत्रें तरुण तुर्कांच्या हातीं आलीं. त्यावेळीं केमाल-पाशा व अनवर पाशा यांचें वाकडें आलें आणि ऐक्य-प्रगति-संघाशीं पटेनासें झाल्यामुळें केमाल पाशानें राजकारणच सोडून दिलें.

पुढील काळांत तुर्की साम्राज्य मोडून पडत असतां केमाल आपलें आयुष्य सामान्य लष्करी अधिकाऱ्याप्रमाणें कंठींत होता. अनवर पाशानें त्यास त्रिपोलींत नेऊन टाकलें, इझ्झत पाशानें त्यास सालोनिकास आणिलें, व महमद शौकत त्यास आल्बानियांत घेऊन गेला. आणि अनवरनें पुन्हा त्याची उचलबांगडी इतालियन युद्धांत त्रिपोलींतच केली. बाल्कन युद्धांत आद्रियानोपल बाल्कन राष्ट्रांपासून परत मिळविण्याची कामगिरी केमाल यानेंच बजावली. सन १९१४ त महायुद्ध सुरू झाल्यावर अनवर

पाशाच्या कारस्थानामुळें तुर्कस्थान जर्मनीस मिळाला. तेव्हां केमाल सोफिया येथील लष्करी जागा सोडून देऊन कॉन्स्टांटिनोपलास स्वस्थ बसून राहिला.

महायुद्धांत सामिल होण्याचें अवसान तुर्कस्थानांत नाहीं अशी केमालची खात्री होती. तथापि अनवरपाशानें दार्दानेलीसच्या संरक्षणार्थ केमालची नेमणूक केली. पण त्या ठिकाणीं शौर्य गाजविण्याची दुर्लभ संधि केमालास मिळाली. दार्दानेलीस येथेंच जर्मन सैन्याचें आधिपत्य केमालकडे आलें. तेथील आनाफोर्टाच्या लढाईत केमालकडून इंग्रजी सेने-चा मोड झाल्यामुळें केमाल नांवलौकिकास चढला. जर्मनींत तर तो मोठा वीर पुरूष समजला गेला. पण अनवर पाशास ही गोष्ट वावडी असल्यामुळें कॉन्स्टांटिनोपलमध्यें त्याच्या नांवाचा उच्चारहि त्यानें होऊं दिला नाहीं. केमालनें ब्रिटिशांचा मोड केला असें पाहून तुर्क सेनेचा अधिपति लिमन व्हॉन सिडर्स यानें त्यास रशियाच्या तोंडावर पाठविलें. या वेळीं त्याची मेजर जनरलच्या जागीं नेमणूक झाली होती. ब्रिटिशांनीं तुर्कांचें बगदाद शहर जिंकून घेतलें होतें. तें परत घ्यावें असा जर्मन सेनापति फॉकन हेन याचा विचार होता. तो केमाल पाशास पसंत न पडल्यामुळें केमालचें फॉकन हेनशीं वितुष्ट येऊन त्यास मेजर जनरलची जागा सोडून अलेप्पोस जाणें इष्ट वाटलें. केमालनें अलेप्पोस आल्यावर ता. ३० सप्टेंबर १९१७ रोजीं अनवर पाशास एक यादी लिहून वस्तुस्थिति निवेदन केली. सदर यादींत तुर्कस्थान व जर्मनी आणि इंग्लंड व फ्रान्स यांच्या परस्पर संबधा-विषयीं केमालनें प्रदर्शित केलेले विचार त्याच्या दूरदर्शित्वाची खात्री पटवितात. ही वेळ अशी होती कीं, जर्मनी विजयी होणार असेंच पुष्क-ळांचें मत बनलें होतें. परंतु कॉन्स्टांटिनोपलच्या दरबारचा विस्खळितपणा, देशांत पैशाचा तुटवडा आणि तुर्कस्थानांतून जर्मनींत वहाणारा द्रव्याचा ओघ, इकडे लक्ष पुरविण्यास तुर्कस्थानचा शेवटपर्यंत युद्धांत टिकाव लाग-णार नाहीं. फ्रान्स व इंग्लंड यांत फूट पडून आपणांस त्यास पिटावयास सांपडेल, ही गोष्ट घडणें शक्य नाहीं, ग्रेट ब्रिटन पॅलेस्ताईन जिंकून घेईल व तेथें ख्रिस्ती अंमल सुरू करील, असें त्यानें भाकीत केलें होतें.

अनवर पाशावर जर्मनीची छाप पक्की बसली असल्यामुळें केमालचा इशारा त्यानें मनावर घेतला तर नाहींच पण सेनापति फॉकन हेन याची पॅलेस्ताईनच्या तोंडावर नेमणूक केली आणि केमालपाशास शाहाजाद्याबरोबर (सध्याचा सुलतान) जर्मनींत पाठवून दिलें. केमाल ही मानहानि सोसून जर्मनी, ऑस्ट्रिया व हंगेरी या देशांत एक वर्षभर फिरत राहिला. तेथून अनवरनें त्यास परत बोलावून ब्रिटिशांपासून पॅलेस्ताईनचा बचाव करण्याकरितां त्याची तिकडे रवानगी केली. पण केमालनें इतक्या उशिरा पॅलेस्ताईनमध्यें येण्यापासून कांहीं फायदा नव्हता. सदर प्रांतीं केमाल पोचला तेव्हां ब्रिटिश सेनापति अॅलेन्बी यानें ग्रंथ आटपीत आणला होता. केमाल पिच्छेहाट करीत अदना येथें थांबला असतां रूफ बे ब्रिटिशांपासून युद्धतहकुबी मागून घेण्याकरितां मुद्रोस येथें जाण्यास निघाला असल्याची बातमी टेलिफोनमधून सांकेतिक शब्दांनीं त्यास कळविण्यांत आली.

केमालपाशा जेव्हां कॉन्स्टांटिनोपलास परत आला त्यावेळीं तेथें पुष्कळच वाताहत झाली असल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तरुण तुर्कांच्या ऐक्य–प्रगतिसंघाची मंडळी पळून गेली होती. त्या पक्षाचे महामंत्री तलत व युद्धमंत्री अनवर यांच्या ऐवजीं उलट पक्षाची मंडळी महामंत्रिपदावर दमाद फरीद पाशास नेमण्याच्या उद्योगांत होती. पार्लमेंट बरखास्त झालें होतें. ब्रिटिश सैन्य पेरा व गलाटा या कॉन्स्टांटिनोपलच्या उपनगरांत तळ देऊन होतें. फ्रेंचांनीं स्तंबूल भाग व्यापला होता, इतालियन सैन्य आशियाच्या किनाऱ्यावर बसलें होतें, आणि त्रिवर्ग दोस्तांचें आरमार बॉस्फरस सामुद्रधुनींत नांगर टाकून स्वस्थ होतें. फ्रेंच फौजेनें तुर्कस्थानची युरोपांतील रेल्वे दाबून धरली होती, ब्रिटिशांनीं आशियामायनरमधील रेल्वे, त्रान्सकॉकेशिया, इराण, मेसापोटेमिया, तुर्कस्थान, सीरिया, आशियामायनरचीं, भूमध्य समुद्र व काळा समुद्र यांजवरील बंदरें ताब्यांत घेतलीं होतीं. मुद्रोसच्या युद्ध तहकुबीनें तुर्की आरमार दोस्तांच्या स्वाधीन होऊन कॉन्स्टांटिनोपलास कोंडून पडलें होतें. व तुर्की सैन्यास रजा देण्याचा व त्याचीं हत्यारें काढून घेण्याचा उद्योग सुरू होता.

राशिया बोल्शेव्हिक बनून इंग्लंडच्या दोस्तींतून फुटल्यावर त्याची जागा ग्रीसनें भरून काढली व ग्रीसचा इंग्लंडबरोबर मिलाफ होण्यास ग्रीसचा प्रधान व्हेनिझिलास याचा स्नेहसंबंध कारण झाला. जुनी अँग्लो–रशियन दोस्ती पुरवली, पण ही नवी अँग्लो–ग्रीक दोस्ती नको इतकी भीति या नवीन बनावाची तुर्कस्थानास बसली. दोस्तांनीं कॉन्स्टांटिनोपल घेरलेलें आणि चिमुकल्या ग्रीकांस इंग्रजांच्या विजयी सैन्याचा जोर मिळालेला अशा प्रतिकूळ स्थितींत कॉन्टांटिनोपलमधील तुर्कांच्या फाटाफुटीची जूट जमविणें अशक्य समजून मुस्तफा केमाल पाशानें कॉन्स्टांटिनोपलचा त्याग करून आशिया मायनरचा रस्ता धरला. आशियामायनरांत शिरल्यावर दोस्तांचा डोळा चुकवून आपल्या पक्षाची घडी बसविण्यास केमाल यास पुष्कळच फुरसत सांपडली. नवीन पक्ष उभारून त्याच्या बळावर तुर्कस्थानचा मुख्य वजीर दमाद फरीद यास तुर्की साम्राज्याच्या भवितव्याचा विचार करण्यासाठीं पार्लमेंटची बैठक भरविण्यास भाग पाडूं अशी मुस्ताफास उमेद होती. केमालास कॉन्स्टांटिनोपल मधून युद्धमंत्र्यांनीं निसटून दिलें ही दमाद फरीद याच्या मतें मोठीच चूक झाली. त्यानें केमालास राजधानीस तारेनें परत बोलावलें. पण केमाल यानें तारेकडे दुर्लक्षच केलें. तेव्हां फरिदनें त्यास नोकरींतून काढून टाकलें. त्यापुढें फरिद व केमाल यांची खडाजंगी उडत राहिली. फरीदच्या आशियामायनरमधील अधिकाऱ्यांनीं केमालच्या हस्तकांस हस्तगत करून कॉन्टांटिनोपलास पाठवून द्यावें आणि केमालच्या अनुयायांनीं फरीदच्या लोकांस धरावें असा क्रम सुरू झाला.

ग्रीकांनीं स्मरना शहरीं १५मे १९१९ रोजीं तळ दिला. त्यासरसा फरीदचा आशियामायनरवरील ताबा उडून केमालचा बसला. ग्रीक सैन्य स्मरन्यांत आल्यावर युद्धतहकुबीच्या मद्रासच्या अटी कमालनें टरकावल्या व तो कॉन्स्टांटिनोपलच्या पार्लमेंटांत राष्ट्रीय पक्षाचें बहुमत करण्याच्या खटपटीस लागला. त्यानें अंगोरा ही आपली राजधानी केली. कॉन्स्टांटिनोपलहून आगगाडीनें अगर आगबोटीनें अंगोऱ्यास जलद जाऊन पोंचण्याची सोय असल्यामुळें राजधानीस हेंच शहर त्यास आवडलें. अंगोऱ्यास रा-

ष्ट्रीय पक्षाच्या वतीचे बारा पुढारी जमवून केमालानें राष्ट्रीय करार लिहून काढला व तो फरीद याजकडे पाठवून दिला. ब्रिटिशांच्या कॉन्स्टांटिनोपलमधील लष्करानें राष्ट्रीय पक्षाचे सभासद पकडून व त्यांस माल्टा येथें हद्दपार करून पार्लमेंटची चळवळ चिरडून टाकली. त्या गडबडींत बरेचसे राष्ट्रीय केमालकडे अंगोऱ्यास पळून आले व केमालानें अंगोऱ्यासच २३ एप्रिल १९२० रोजीं ग्रँड नॅशनल असेंब्लीची बैठक भरविली. सेव्हर्सचा तह ग्रीक व इंग्रज यांच्या संगनमतानें घडून आला. त्या तहानें कॉन्स्टांटिनोपल ग्रीकांच्या जबड्यांत देऊन व तुर्की सत्तेस आशियामायनरमध्यें पिटून लावून आशियामायनरास ग्रेट ब्रिटन, फ्रान्स व इताली यांच्या सैनिक, सांपत्तिक व औद्योगिक सत्तेचा गळफास घालावयाचा असा उभयतांचा बेत होता. हा तह मंजूर झाला असता तर तुर्की साम्राज्य व तुर्कस्थान यांचा अंतच होणार होता. ग्रीक सैन्यास तुर्की सैन्याकडून तंबी पोंचविण्याची तजवीज केमालच्या हातची होती. पण तुर्कांचें बहुतेक सर्व आरमार युद्धतहकुबीच्या वेळीं दोस्तांनीं जप्त केलें असल्यामुळें ग्रीकांनीं ताब्यांत घेतलेला आशियामायनरचा किनारा व ग्रीक सैन्याची युरोपांतील पिछाडी या बाबतींत तुर्कांचा निरुपाय होता. अशा रीतीनें आशियामायनरमध्यें कोंडून पडलेल्या नॅशनल असेंब्लीस ग्रीकांच्या आघाडीवर हल्ला चढविण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. ब्रिटिशांच्या लष्करी मिशनच्या मदतीनें ग्रीकांनीं प्रथम तुर्की सैन्याची दाणादाण उडवून दिली. पण मागाहून अंगोराच्या समोर ४० मैलांवर तुर्कांनीं उत्तर दक्षिण फळी धरली व तिचें आधिपत्य मुस्तफानें स्वतःकडे घेतलें. या लढाईत केमालची मर्दुमकी विलक्षण रीतीनें दिसून आली. तिची गणना जगांतील प्रसिद्ध लढायांत होईल म्हणतात.

केमाल पाशास ग्रीकांवर जो विजय मिळवितां आला, त्याचें सर्व श्रेय केमालासच दिलें पाहिजे, कीं त्या यशाचा दुसरा कोणी वांटेकरी आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. केमाल साम्राज्यसंरक्षणार्थ धारातीर्थीं देह ठेवणारे हजारो लढवय्ये मिळवूं शकला. परंतु त्या लढवय्यांस लागणारें हत्यारपात्यार व मोहिमा महिनोन् महिने चालवि-

ण्यास पैसाआडका त्यानें कोठून पैदा केला, ही शंका कोणाच्याहि मनांत उद्भवते. या कामीं मास्कोच्या सोव्हियट सरकारची केमालपक्षास मदत झाली, असें कित्येक इंग्रज लेखकांचें मत आहे. सोव्हियट सरकारनें ८० लक्ष पौंडांचें सोनें, तोफा, रायफल बंदुका व वहातुकीचीं साधनें केमालिस्टांस पुरविलीं; रशियनांच्या, तुर्की सरकारच्या व जर्मनांच्या तोफा जमवून केमालनें आपला तोफखाना सजविला; व जुनीं जर्मन विमानें गोळा करून त्यानें वैमानिक सैन्य उभारलें. रशियाचा झार तुर्कस्थानास पाण्यांत पहात असतां त्याचें राज्य उलथून पाडून स्थापन झालेल्या सोव्हियट सरकारनें केमाल पाशास कुमक कां करावी अशी शंका येथें उद्भवल्यास तिचें निराकरण सहज होतें. रशियानें भांडवलवाल्यांशीं वैर आरंभल्यामुळें त्यास सर्व पश्चिम यूरोपखंड पारखें झालें आहे. अशा प्रतिकूल स्थितींत एखादें तरी शेजारचें राष्ट्र अनुकूल करून घेणें त्यास भागच होतें. तुर्की राज्य हें रशियाच्या शिंवेवरचें राज्य आहे आणि तेथील सुलतानशाही संपवून आपल्याप्रमाणेंच नवें राज्य स्थापन करणाच्या खटपटींत केमाल असल्यामुळें त्यास संकटकाळीं सहाय्य केल्यानें बॉस्फरस सामुद्रधुनींतून जगांतील इतर देशांशीं दळणवळण ठेवण्याचा मार्ग आपणांस मोकळा होईल या आशेनें रशियाच्या सोव्हियट सरकारनें केमालिस्टांस मदत केली असावी व तशा आशयाचा तहहि त्या उभयतांत त्यापूर्वीं झाला होता. तें कसेंहि असलें, तरी त्यामुळें केमालच्या यशाची महती कमी न होतां त्याच्या शौर्याइतकीच त्याच्या मुत्सद्देगिरीची थोरवी मनांत बिंबल्यावांचून रहात नाहीं.

केमाल यानें तुर्कस्थानची राजधानी जेथें नेली आहे, तें अंगोरा शहर अगदीं लहान आहे. शहरापासून केमालचा बंगला कांहीं मैल अंतरावर डोंगरांच्या दरींतच आहे. बंगला साधा व छोटाच, आहे पण त्यांतील सर्व व्यवस्था युरोपियन धर्तीवर आहे. केमालचा वर्ण गौर, कपाळपट्टी मध्यम आणि डोळे घारे आहेत. विशेष पाणी डोळ्यांतच आहे. त्याचा शरीरबांधा उंच, सडपातळ पण बळकट आहे. बोलण्याची ढब जोरदार पण धिमेपणाची आहे. त्याचे हात लक्षांत रहाण्यासारखे नाजूक

पण मजबूत आहेत. तो अंगांत अस्सल युरोपियन पद्धतीचा पोशाख घालतो व तसाच पोशाख असेंब्लींतील सर्व सभासद करतात. त्याच्या डोक्याची कालपाक (टोपी) अस्ट्राखान लोकरीची व उंच असते व तसलीच टोपी सर्व राष्ट्रीय पक्षाचे तुर्क घालतात.

केमालची बायको त्याच्याहून वयानें पुष्कळच लहान आहे. तीहि युरोपियन पद्धतींतच वाढली आहे. तिचें वय विशीच्या आंत बाहेर असेल. हें लग्नहि मजेनें जुळून आलें. ग्रीक फौजेचा पराभव करून केमाल स्मरन्यांत शिरला, तेव्हां स्मरना येथील थोर गृहस्थांनीं त्याचें सत्कारपूर्वक स्वागत केलें. त्या स्वागत करणाऱ्या मंडळींत एक व्यापारी व त्याची मुलगी होती. मुलगी राष्ट्रीय मतांची होती. सदर मतांचा संशय येऊन ग्रीक लोक तिजवर लष्करी कायद्याखालीं खटलाच करणार होते. पहिल्याच भेटींत केमालचें मन तिजवर गेलें. केमालची व व्यापाऱ्याच्या घरच्या मंडळींची जानपछान वाढत जाऊन अखेर आतांपर्यंत अविवाहित असलेला केमाल सदर व्यापाऱ्याचा जांवई झाला.

केमालची पत्नी मध्यम उंचीची, वाटोळ्या तोंडाची असून तिचे डोळे काळेभोर आहेत. ती सुशिक्षित व स्त्रीस्वातंत्र्याची भोक्ती आहे. पण या बायकोशीं केमालनें अलीकडे काडीमोड केल्याचें समजतें.

अनवर पाशा

महायुद्धापूर्वीं तुर्की मंत्रिमंडळांतील जबरदस्त माणूस म्हणजे अनवर पाशा. त्रिपोलीच्या युद्धांत त्यानें मोठें धाडस केलें. बाल्कन युद्धांत बल्गेरियानें घेतलेलें आड्रियानोपल अनवर पाशानें स्वपराक्रमानें परत मिळविलें. १९१५ सालीं त्याचें वय ३१ वर्षांचें होतें. कॉन्स्टांटिनोपल शहरांतून खाकी पोशाख करून मिरविण्याची त्याला भारी हौस असे. त्याचा शरीरावरील पोशाख इंग्रजी धर्तीचा, पण शरीरांतील मन मात्र इंग्रजांच्या विरुद्ध होतें. त्याचा बाप एक बडा तुर्की अधिकारी होता. त्यानें अनवरास लहानपणीं शिक्षणहि उच्च प्रकारचें दिलें. लष्करी शिक्षणासाठीं त्याला लष्करी शाळेंत पाठविण्यांत आलें. त्यांत त्याची हुषारी पाहून त्यास पुढील लष्करी शिक्षण संपादण्यास जर्मनींत रवाना केलें.

जर्मनीत राहिल्यामुळें तो जर्मनांचा चहाता बनला. मोठ्या जर्मन पलटणी हवें तें करूं शकतील असा त्यास विश्वास आला. तो मोठा बुद्धिमान, धडाडीचा, धीट व हरदम होता. १९०८ च्या राज्यक्रान्तीनंतर तो जर्मनींत लष्करी मदतनीस (मिलिटरी अटॅची) म्हणून होता.

बल्गेरिया व त्याचे दोस्त यांचें वितुष्ट आलेलें पाहून अनवर पाशानें जुलई महिन्यांत आपलें सैन्य आद्रियानोपल येथें उतरविलें आणि लंडन येथें झालेल्या तहास न जुमानतां त्यानें आद्रियानोपल घेतलें. अनवरनें आद्रियानोपल घेतल्यावर तरुण तुर्कांस मोठा हुरूप चढला. या शौर्यामुळें व सुलतानाच्या राजघराण्यांतील एका मुलीशीं त्याचें लग्न झालें असल्या-मुळें तो आपल्यास नेपोलियन समजूं लागला. १६८३ व्हीएन्नास पराभव झाल्यापासून तुर्कांनीं जेवढा मुलूख गमावला होता, तेवढा त्यास परत मिळवून देण्याचा अनवरचा पण होता. नेपोलियनाचे अर्धपुतळे भोंवतालीं मांडून तो आपल्या खोलींत तासन्तास बसे, पुस्तकें वाची व मोहिमांचे बेत करी. १९१३ पासून अनवर मोठमोठ्या हुद्यांवर चढला. महायुद्धापूर्वीं तो युद्धमंत्री होता.

सुलतानाचा वडील मुलगा इझेदीन इंग्लंडचे राजे पंचम जॉर्ज यांस भेटण्यास गेला होता. भेटून परत आल्यावर त्यानें मंत्र्यांस घरीं बोलावून त्यांजबरोबर खलबत केलें तें अर्थातच गुप्त होतें. तथापि त्या बैठकीस अनवर पाशा जर्मन कमांडर इन चीफ से. व्हॉन सँडर्स यास बरोबर घेऊन गेला. शहाजादा इझेदिन यास ही गोष्ट आवडली नाहीं. तुर्कस्थान युद्धांत तटस्थ राहील तर फार बरें असें शहाजादा बोलला. शहाजाद्याचें हें म्हणणें मुख्य वजीर, फडणीस, व्यापार मंत्री व शेख उल् इसलाम यांस पसंत पडलें. पण अनवरला तें आवडलें नाहीं. त्यानें आपल्या वतीनें व्हॉन सँडर्स यास खुलासा करण्यास सांगितलें. शहाजादा यानें त्यास हरकत घेतली. त्यावर अनवर म्हणाला कीं, तुर्की सेनापति या नात्यानें त्यास बोलण्यास हरकत नसावी. युद्धमंत्र्याच्या चुकीमुळें सँडर्स बैठकीस आला असें शाहाजाद्यानें म्हटलें. अनवर यानें पार्लमेंटच्या पद्धतीस सोडून यावर उत्तर दिलें. अधिकारामुळें अनवर चढून गेला आहे असा शहाजाद्यानें

त्यास टोमणा मारला. अनवर व सँडर्स रागानें जाण्यास निघाले व जातां जातां अनवर यानें रिव्हॉलव्हरासहि हात घातला, हें पाहून शाहाजाद्यानें त्याजवर गोळ्या झाडल्या. त्या योगानें जखमी होऊन अनवर व सँडर्स चालते झाले. जर्मनीस महायुद्धांत गोंवणारा अनवरच होय. मुस्तफा केमाल पाशा या धोरणाच्या विरुद्ध होता आणि म्हणून महायुद्धकाळीं अनवर पाशा व केमाल पाशा यांचें मुळींच पटलें नाहीं. महायुद्धांत तुर्कस्थानचा मोड होऊन दोस्तांचें वर्चस्व कॉन्स्टांटिनोपलवर बसणार असें दिसतांच अनवर व त्याचे इतर सहकारी जर्मनींत पळून गेले. त्यानंतर कांहीं दिवसांनीं अनवरच्या मरणाचीहि बातमी प्रसिद्ध झाली.

प्रकरण ७ वें.

उपसंहार

तुर्कस्थानच्या राज्यस्थापनेस सहाशेंचाळीस वर्षें झालीं. खिस्ती राष्ट्रांची गोष्ट सोडून दिली तर मुसलमानी राष्ट्रांत इतकें प्राचीन व जगविख्यात राज्य दुसरें क्वचितच सांपडेल. दिल्लीची मोंगल बादशाहात हिंदुस्थानांत अत्यंत थोर, चिरंजीव व वैभवशाली समजली जाते. पण ती बादशाहात तुर्की सुलतानतीच्या मागून तीनशें वर्षांनीं जन्मास आली आणि तिच्या पूर्वी पाऊणशें वर्षें मरूनहि गेली. केवळ आयुर्दायांतच नव्हे तर वैभवांत आणि विस्तारांतही तुर्की सुलतानत दिल्लीपदपातशहातीपेक्षां किती तरी श्रेष्ठ ठरते. मोंगल पातशहातीचा अंमल आसेतुहिमाचल कधींच बसला नव्हता. आणि तो बसला होता असें गृहीत धरलें तरी त्या अमलाची लांबी आठराशे मैल आणि रुंदी पंधराशे मैल भरेल. भाग्यशाली सुलेमानाच्या अखेरीस म्हणजे इ. स. १५६६ त इस्तंबूलच्या सुलतानतीची सत्ता कळसास पोंचती होती असें समजण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं युरोप, आशिया व आफ्रिका या त्रिखंड पृथ्वींत तुर्की अंमल बसला होता. त्याचा ठोकळ मानानें चार हजार मैल लांब व तीन हजार मैल रुंद इतका विस्तार असावा. मोगली सत्ता अंगानें इतकी लांब रुंद नव्हतीच. पण रोमन साम्राज्यानंतर व ब्रिटिश साम्राज्यापूर्वीं एवढी विस्तीर्ण सत्ता जगानें पाहिली नाहीं असेंच कबूल करावें लागतें. एवढ्या प्रबल साम्राज्याचा अभिमान कोणाहि मुसलमानी समाजास वाटावा यांत नवल नाहीं.

सुमारें सहाशें चाळीस वर्षांचा काळ आणि एक कोटी वीस लक्ष चौरस मैलांचें स्थळ ज्या साम्राज्यानें व्यापलें, त्यानें आपल्या नशिबाचे अनेक बरे वाईट खेळ पाहिलेच पाहिजेत. सहाशे चाळीस वर्षांपैकीं पहिलीं २८६ वर्षें तुर्की साम्राज्यास अत्यंत भरभराटीची गेलीं. सुलतानांच्या छत्राखालीं मुसलमान, खिस्ती व यहुदी या भिन्न धर्मांचे काळ्या

आणि गोऱ्या या रंगांचे, ग्रीक, स्लाव्ह, तुर्क, आरब या जातींचे आणि ग्रीस, रुमानिया, सर्व्हिया, बल्गेरिया, मांटेनिग्रो, हंगेरी, पोलंड, अनातोलिया आर्मीनिया, सीरिया, मेसापोटेमिया, अरबस्थान, इजिप्त, ट्यूनिस,त्रिपोली या विविध राष्ट्रांचे लोक नांदावयास आले. सुलतानांच्या भव्य राजमुकुटावर खिलाफतीचा सात्त्विक मणि झळकूं लागल्यावर तर सुलतानांच्या भाग्यास आणि इभ्रतीस जगांत तोडच उरली नाहीं. मुसलमान राजांनीं इस्लामी धर्मप्रसाराच्या कितीहि बढाया मारल्या,तरी धर्मप्रसारार्थ राज्यपद गमावणारे राजे विरळाच सांपडतील. तुर्कस्थानचे सुलतान खिलाफतीवर आरूढ झाले म्हणून त्यांनीं राज्यपदावर तुळशीपत्र ठेवलें असें नाहीं. किंबहुना राज्यपदास बळकटी आणण्याकरितांच त्यांनीं खिलाफतीचें चिलखत चढविलें म्हटलें तरी चालेल.

सुलतानांच्या मुलुखांतील प्रजाजनांचे धर्मदृष्ट्या मुख्यत्वेंकरून दोनच भाग पडतात. एक मुसलमानांचा व दुसरा ख्रिस्त्यांचा. सुलतानाच्या मुकुटांत खिलाफतीचा झळकत असलेला मणि पाहून मुसलमान प्रजा सुलतानासमोर बहुधा नमूनच वागत असे. आणि ख्रिस्ती प्रजेवर सुलतानांनीं प्रारंभीं धर्मांतराची थोडी बहुत सक्ति चालविली होती असें मानलें तरी सक्तीचा आवेश स्वभावतःच मनुष्यांत सतत वसत नाहीं. तशांतून परधर्मीय प्रजा नम्रतेनें, गरिबीनें व इमानानें वागत असली, म्हणजे मुसलमान राज्यकर्तेंहि तिला मेहेरनजरेनें संभाळून घेण्यास तयार होत, असा हिंदुस्थानांतच काय पण तुर्की साम्राज्यांतहि अनुभव आलेला आहे. फत्ते महंमदानें कॉन्स्टांटिनोपल जिंकून घेतल्यावर त्यानें तेथील ग्रीक ख्रिस्त्यांस अभय दिलें, फार काय पण ग्रीक धर्मगुरूकडे (पॅट्रिआर्क) दिवाणी व फौजदारी अधिकार चालू ठेवले हें वरील मानवी स्वभावाचेंच द्योतक होय.

कॉन्स्टांटिनोपलचा पाडाव १४५३ सालीं झाला आणि तेव्हांपासून युरोपखंडांत जागृतीची पहांट फुटली. त्यानंतर आठव्या शतकांत युरोपियन राष्ट्रांचें सामार्थ्यहि इतकें वाढलें कीं, १७३५ मधील केनार्डजीच्या तहानें ख्रिस्ती प्रजेच्या संरक्षणाच्या मिषानें राशियानें तुर्की दरबारांत आपला हात हिंडविण्याचा अधिकार प्राप्त करून घेतला. युरोपि-

यन राष्ट्रांचें बल वर्धमान होत असतां तुर्की सुलतानांची कर्तबगार परंपरा संपल्यामुळें तुर्कांकडून युरोपियन राष्ट्रांस व्हावा तसा प्रतिकार झाला नाहीं. तुर्क शूर होते व आहेत आणि शौर्याच्या जोरावर त्यांनीं ऑस्ट्रिया, राशिया आदिकरून पाश्चात्य राष्ट्रांचा अनेकवार पराभवहि केला. परंतु केवळ एकट्यानें तलवारीच्या धारेवर राज्य राखण्याचे दिवस आतां मावळले होते. वेगवेगळीं युरोपियन राष्ट्रें एकजुटीनें तुर्कांवर तुटून पडत. परंतु जशीं राशिया, ऑस्ट्रिया व प्रशिया आपल्या बाजूनें जूट बांधीत किंवा ग्रीससारखा देश तुर्कांच्या तलवारीखालीं सांपडला असतां इंग्लंड व फ्रान्स त्याची मान सोडविण्यास सरसावून येत, तसा एकादिलाचा व जुटीचा प्रयत्न तुर्कांकडून कधींच झाला नाहीं. तुर्कांनीं मनांत आणिलें असतें तर त्यांस इराण, अफगाणिस्थान, मोरोक्को येथील शहांनीं, अमीरांनीं व सुलतानांनीं मदतहि केली असती. शिय्या व सुनी ह्या पंथभेदानें इराण व तुर्कस्थान यांचें सूत जमूं दिलें नसतें ही गोष्ट खरी; तरी पण यूरोप खंडांतहि प्रॉटेस्टंट, ह्यूजनॉट, कॅथोलिक, ग्रीक हे पंथ होतेच कीं नाहीं ? ते युरोपियन राष्ट्रांच्या राजकीय आकांक्षांच्या व जुटीच्या आड कोठें आले ? याचें कारण, युरोप खंड जागृत झालें होतें आणि त्यांचें धार्मिक सहिष्णुत्व राजकारणास संभाळून नेत होतें. इस्लामी देशाची स्थिति याहून भिन्न होती. त्यांचा धर्माभिमान व पंथाभिमान जुनेपणामुळें कडवा होता. शिय्यापंथाच्या मुसलमानांची कत्तल करणें हें स्वर्ग्यांत कर्तव्य समजलें जात होतें. आणि इस्तंबूलचा सुलतान स्वतःच खलिफा पडल्यामुळें मुसलमानांच्या पुष्कळशा जुन्या वळणाच्या धार्मिक धोरणांत तो एकदम बदल करण्यास केव्हांहि तयार होण्यासारखा नव्हता. केवळ सुलतान म्हणून ज्या सुधारणा युरोपियनांचें उदाहरण पाहून करण्यास तो प्रवृत्त झाला असता, त्या सुधारणा खलिफा म्हणून करण्याची त्याची तयारी नव्हती. याचा अर्थ असा कीं, तुर्कस्थानच्या सुलतानानें युरोपखंडाच्या पूर्वेकडील सरहद्दीवर दुसऱ्या आल्प्स पर्वताप्रमाणें हात पसरून युरोपांतून तुर्की साम्राज्यांत आणि आशिया खंडांत वहात येणारें राजकीय सुधारणांचें व शासनिक आणि सामाजिक कल्पनांचें वाजवी वारें थोपवून धरलें.

सुलतानाच्या या अटकावाचा परिणाम असा झाला कीं, तुर्कस्थान व त्यास पूर्वेकडे लागून असलेले जवळचे मुसलमानी देश हिंदुस्थानाइतकेच युरोप खंडास दुरावले. राज्यविस्ताराची हाव या वेळीं युरोपियन राष्ट्रांत प्रबळ होती त्यांत शंका नाहीं. परंतु तुर्की साम्राज्यांत ख्रिस्ती प्रजेची वस्ती नसली,तर धर्मभेदाचे निमित्त करून रशिया, ऑस्ट्रिया आशिया आदिकरून युरोपियन राष्ट्रांनीं तुर्की साम्राज्याचा तट चढून किंवा त्याच्या दरवाजाच्या कड्या काढून किंबहुना दरवाजे फोडून जो धिंगाणा घातला आणि ग्रीस, रुमानिया, बल्गेरिया व सर्व्हिया या चिमुकल्या बाळांस कडेवर घेऊन साम्राज्याबाहेर पळवून नेलें, तसें त्यास नेतां आलें नसतें. ख्रिस्ती प्रजेची ही राखण सुलतानांस एकसारखी भोवून त्यांचें साम्राज्य एकसारखें झडत चाललें.एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत तुर्की साम्राज्याचें बिऱ्हाड लोटीत लोटीत युरोपच्या टोकावर उचलून ठेवण्यांत आलें. साम्राज्याचा संसार एकदा मांडला म्हणजे त्यांत भिन्न धर्मांच्या व जातींच्या लोकांचा समावेश व्हावयाचाच. अशा भेसळ प्रजेचें साम्राज्यावर प्रेम जडविण्याचा उपाय असा कीं, त्यांत साम्राज्याविषयीं आत्मीय भाव उत्पन्न करावयाचा. आम्ही ख्रिस्ती व राज्यकर्ते मुसलमान हें ज्ञान प्रजाजनांत उत्पन्न झाल्यावर ख्रिस्ती प्रजा शेजारच्या स्वतंत्र ख्रिस्ती राष्ट्राकडे ओढ घेणारच. तुर्की साम्राज्य एकट्या सुलतानांचें नसून मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी या धर्मानुयायांचें आणि ग्रीक, स्लाव्ह, तुर्क, आरब या जातींचें आहे अशी प्रजाजनांत भावना उत्पन्न करण्याकरितां सुलतानांनीं जबाबदार राज्यपद्धति सुरू करावयास पाहिजे होती. आणि बाहेरील ख्रिस्ती राष्ट्रांचेंहि राज्य समाईक नाहीं असें दृष्टीस पडल्यावर वरीलप्रमाणें चिमुकलीं ख्रिस्ती राष्ट्रेंहि तुर्की साम्राज्यांत रहावयास सिद्ध झालीं असतीं. पण असा प्रयत्न सुलतानांकडून झाला नाहीं. आणि दुसरा महंमद, अबदुल मजीद, अबदुल अझीझ आणि अबदुल हमीद या सुलतानांकडून रशीद पाशा व मिधात पाशा यांसारख्या मुत्सद्यांनीं अशी सुधारणा घडवून आणण्याचा यत्न केला तरी त्यांस यश आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर मिधात पाशास या पायीं प्राणासहि मुकावें लागलें. आपण मुसलमानांचे धर्मगुरु

खलीफ हा धार्मिक अहंकार आणि सत्तेचा लोभ सुलतानांस सुटेना. त्यांस मुत्सद्यांचें म्हणणें पटेना व आशिक्षित मुसलमानी प्रजेस या सुधारणेचें महत्व कळेना.

तरुण तुर्क पक्षास ही सुधारणा पटली होती आणि नायझीचेच्या प्रयत्नानें त्यांनीं सुलतानाविरुद्ध बंड करून १९०८ सालीं ती अमलांतहि आणिली होती. त्यांची चळवळ शुद्ध राजकीय व समान हक्कांची असल्या-मुळें त्यांस ख्रिस्ती प्रजेचा पाठिंबा मिळाला. यावरून अशा प्रकारची सुधारणा सुलतानांनीं लवकर घडवून आणिली असती तर तुर्कांचें युरोपां-तील बहुतेक साम्राज्य बचावण्याचा पुष्कळ संभव होता. तरुण तुर्क सत्ता-धारी झाल्यावर समान हक्कांच्या तत्त्वावर उरगालेलें साम्राज्य बचावेल अशी आशा बाळगण्यास बरीच जागा होती, परंतु सत्ता हस्तगत होतांच तरुण तुर्क पक्षानें नव्या निवडणुकींत भावी पार्लमेंटचा रंग तुर्क-ग्रीक-मिश्रित न ठेवतां मुसलमानी किंबहुना तुर्कीच राहिला पाहिजे असा हट्ट धरला. कारण ग्रीक लोकांस कारभारांत घेतल्यास त्यांचा ओढा तुर्कीसाम्राज्याचें हित साधण्यापेक्षां ग्रीसचें हित साधण्याकडे वळेल,अशी तरुण तुर्कांस सकारण भीति वाटत होती. या संकुचित धोरणामुळें कर्त्या माणसांत फूट पडली.व तिचें पर्यवसान बंडांत झालें.आणि बंडाचे पाठोपाठ १९१२ चें इतालियन युद्ध, १९१३ चें बाल्कन युद्ध आणि १९१४ चें महायुद्ध यांनीं तरुण तुर्क पक्षास आपल्या मूळ धोरणावर राज्य चालवून तें यशस्वी करून दाखविण्यास मुळीं उसंतच मिळूं दिली नाहीं. सारांश आधुनिक लोक-सत्ताक राज्यपद्धति सुलतानांनीं उचलली नाहीं, तरुण तुर्कांनीं उचलली पण ती चालवून दाखविण्यास त्यांस जेवढी संधि मिळाली ती त्यांनीं गमाविली. अशा रीतीनें सर्व जातींच्या व धर्मांच्या संमतीनें मुसल-मानांस राज्य करतां येतें कीं नाहीं हा प्रयोग तुर्कस्थानांत जगास पहाव-यास मिळाला नाहीं. तो प्रयोग तुर्कस्थानांत यशस्वी झाला असता, तर हिंदु व मुसलमान यांनीं गजबजलेल्या हिंदुस्थानास स्वराज्य प्राप्त करून घेण्याची गुरुकिल्ली अनायासें सांपडली असती.

तरुण तुर्कपक्ष १९०८ सालीं सत्ताधारी झाल्यापासून तो गेल्या

सालापर्यंत अपेशीच ठरला आहे. कारण त्याच वर्षीं बल्गेरिया व हार्जिगोविना हे तुर्कांचे प्रांत ऑस्ट्रियानें आपल्या राज्यास जोडले. १९०९ मध्यें इतालीनें तुर्कस्थानापासून त्रिपोली हिसकावून घेतली. आणि १९१२।१३ च्या बाल्कनयुद्धांत १९०८ त्या राज्यक्रांतीचे वेळीं तरुण तुर्कांस उपयोगी पडलेला मॅसिडोनियाहि हातचा गेला. महायुद्धापूर्वीच तरुण तुर्कपक्षाचा हातगुण वाईट ठरला आणि महायुद्धांत इंग्लंड आदि करून दोस्तांविरुद्ध जर्मनीस मिळण्यांत तरी त्यानें घोडचूकच केली. अबदुल हमीदच्या कारकिर्दींत रशियाशीं लढत असतां पराभूत झाल्यावर तुर्कस्थानानें जर्मनीचें शिष्यत्व पत्करलें. जर्मन अधिकाऱ्यांच्या हाताखालीं तुर्क शिपाई युद्धकर्म शिकूं लागले. त्यांचा आधिपति जनरल व्हॉन डर गोलट्झ होता. सेनाशकट तयार करण्याची तशी, अबदुल हमीद यास पैसा पुरविण्याचीहि मदत जर्मनीपासून मिळाली. या कामीं तुर्की दरबाराचा जर्मन वकील बॅरन मार्शल व्हान बिबरस्टीन याचे परिश्रम मुख्यतःकारण झाले.त्याच्याच प्रयत्नानें एका जर्मन कंपनीस आशियामायनरमधून बगदादपर्यंत रेल्वे बांधण्याची परवानगी मिळाली. या रेल्वेचें बांधकाम पुरें झाल्यावर बर्लिनहून बगदादपर्यंत थेट व सलग रस्ता तयार होणार होता. तुर्कस्थानास आपलें सैन्य या रस्त्यानें कॉन्स्टांटिनोपलहून रशियाच्या हद्दीवर हवें तितक्या थोड्या वेळांत हुकुमी पाठवितां येणार असल्यामुळें रशिया या योजनेच्या विरुद्ध होता. इंग्लंड व फ्रान्स यांजपाशीं जर्मन कंपनीनें भागीदारीनें पैशाची मदत मागितली,पण ही योजनाच इंग्लंडच्या पूर्वेकडील व्यापारास जर्मनीकडून खो आणणारी असल्यानें इंग्लंड व त्याबरोबर फ्रान्स यांनीं मदत देण्याचें नाकारलें. इंग्लंड व फ्रान्स हीं राष्ट्रें तुर्कस्थानच्या उन्नतीच्या आड अशीं येतात असें भासवून जर्मन बादशहा विल्यम कायसर यानें तुर्कांचें मन दूषित केलें आणि भूमध्यसमुद्रांत याच सुमारास दौरा काढून एका भाषणांत 'मुसलमान व मुसलमानी धर्म' यांचें आपण रक्षण करूं असेंहि त्यानें आश्वासन दिलें.

सुलतानामागून तरुण तुर्कांवरहि जर्मनीनें आपली छाप अशीच कायम ठेवली. बाल्कन युद्धात ज्या तुर्क सैन्याचा मोड झाला,तें जर्मन अधिकाऱ्यांच्याच शाळेंत शिकलें होतें,त्यानंतर तुर्की सैन्याची जय्यत तयारी करण्या-

करितां जर्मन मिशन कॉन्स्टांटिनोपलास मुद्दाम येऊन राहिलें. त्याचा प्रमुख जनरल लिमन व्हॉन सँडर्स हा होता. तुर्की सैन्य भारी होईल तर आपली भूमध्यसमुद्रांतील वाट बंद पडेल, या भीतीनें रशियानें या योजनेस विरोध केला अशा रीतीनें इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांविषयीं तुर्कस्थानचें मन जसजसें दूषित होत गेलें, तसतसा जर्मनीवरील त्याचा विश्वास व भिस्त हीं वाढत चाललीं. जर्मनीनें दोस्तांविरुद्ध युद्धाची द्वाही फिरविल्यानंतर चारपांच हजार जर्मनसेनापति व शिपाई यांची इस्तंबूलास व त्याच्या सभोवार छावणीच पडली. क्रपच्या कारखान्यांतून तुर्कस्थानास नवीं हत्यारें पुरविण्यांत येत होतींच;आणि त्याखेरीज १९१४ च्या आक्टो-बर महिन्यांत तीन कोटि रुपयाचें सोनेंहि जर्मनींतून तुर्कस्थानांत पोचतें झालें. तरुण तुर्कपक्ष या अनेक उपायांनीं भारला जाऊन जर्मनांच्या अगदीं मुठींत गेला. तरी त्यांच्यामध्यें लढाऊ पक्ष व शांततावादी पक्ष असे दोन भेद कायम होतेच. तुर्क युद्धमंत्री अनवर पाशा युद्धास अनुकूळ असल्या-मुळें तुर्कस्थान अर्थातच जर्मन पक्षास मिळाला. तुर्कस्थान मिळण्यापूर्वी सर्व्हियाशिवाय इतर बाल्कन राष्ट्रें तटस्थ असल्यानें युद्धांत शिरून बाल्कन प्रांतांतील गेलेला मुलूख तुर्कस्थानास परत मिळणार होता असेंहि नाहीं. तुर्कस्थानचा कट्टा शत्रू रशिया हाच दोस्तांच्या बाजूचा होता. पण महायुद्धांत जर्मनपक्ष विजयी झाल्यानें रशियापासून तुर्कस्थानास म्हणण्या-सारखी प्राप्तिहि होण्याचा संभव नव्हता.उलटपक्षीं दार्दानेलीस सामुद्रधुनी बंद पडल्यानें रशियाशीं दळणवळण थांबू नये, यासाठीं इंग्लंड तुर्कस्थानचें होतें तेवढें राज्य राखून आणखीहि सवलती देण्यास कबूल झालें होतें. इंग्लंड अगर जर्मनी यांपैकीं कोणाचाहि पक्ष न घेतां ग्रीसप्रमाणें तुर्क-स्थान चूप बसला असता, तर त्याचा फायदाच झाला असता; पण जर्म-नीच्या मायावी स्वरूपास फसून लढाईत गुंतल्यानें तरुण तुर्कपक्षानें आपलें अपरिमित नुकसान करून घेतलें यांत शंका नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, महायुद्धापूर्वी पंधराशें मैल लांब व साडेसातशें मैल रुंद इतक्या मुलुखावरील स्वामित्व जाऊन महायुद्धानंतर मोठ्या मिनतवारीनें ८२५ मैल लांबीचा आणि ४५० मैल रुंदीचा मुलूख तुर्कांकडे उरला.

मुस्तफा केमाल पाशा हा शांततावादी वीर मुत्सद्दी महायुद्धांत सामील होणाऱ्या लढाऊ पक्षास विरुद्ध व इंग्रजांस अनुकूल होता. त्याच्या दूरदृष्टीच्या धुरीणत्वाखालीं तरुण तुर्कपक्ष आपला प्रगमनशील मार्ग सध्यां आक्रमीत आहे. आणि त्यानें आधुनिक साधनांच्या साहाय्यानें आपला देश उन्नतावस्थेस नेण्याचें ठरविल्यास हा विस्तीर्ण व अत्यंत सुपीक प्रदेश त्याच्या रास्त आकांक्षा पुऱ्या करण्यास निःसंशय समर्थ आहे. हा प्रदेश एकजात मुसलमानी वस्तीचा आणि विशेषतः तुर्क लोकसंख्येचा होणार आहे. त्यांत कोठें ग्रीक व आर्मीनियन असतील तर त्यांस तुर्कस्थान सोडून जाण्यास तहानें सवलत ठेवली आहे.व ते तसे जातहि आहेत. युरोपियनांच्या विशेष हक्कासंबंधाचे काटेहि उपटून टाकले आहेत. इंग्लंड, फ्रान्स, इताली, जर्मनी यांचें भांडवल महायुद्धापूर्वींच तुर्क हद्दींत खेळत राहिलें आहे व या सोन्याच्या साखळीनें आवळेलली तुर्कांची मान एकदम मोकळी होणें शक्य नसलें, तरी त्यांनीं मनांत आणल्यास आज ना उद्यां ती मोकळी होईलच होईल. सुलतानत व खिलाफत हें जुनें खोड उपटून फेकून देण्यांत आलें आहे व त्याची रोगट सावट तुर्कांच्या देशावर त्यांची वाढ खुंटविण्यास यापुढें पडणार नाहीं. कॉन्स्टांटिनोपल ही जुनी राजधानी नव्या राज्यांत बाजूस पडत असल्यामुळें अंगोरा ही मध्यस्थानची राजधानी असेंब्लीनें पत्करली आहे.

तरुण तुर्कांस कर्तृत्व दाखविण्याची संधि आतांच कोठें येत आहे. यापूर्वीं जुन्या सुलतानापेक्षां देशाचें अधिक कल्याण त्यांचे हातून घडलेलें नाहीं. लॅसेनचा तह आणि ग्रीकांचा मोड हीच त्यांची मोठी कामगिरी. पण खऱ्या व महत्त्वाच्या कामगिरीचा हा प्रारंभ असून यापुढील काळांत तुर्कपक्ष कोणता पुरुषार्थ करून दाखवितो, इकडे सर्व इस्लामी देशांचे व आशिया खंडाचे डोळे लागून राहिले आहेत. साडेसहाशे वर्षांच्या दीर्घ काळास साजेसा तुर्कांचा पूर्व लौकिक नाहीं. या बाबतींत लाला हरदयाळ यांचा तुर्कस्थानांतील अनुभव मननीय आहे.ते म्हणतात--"इस्लामी जगाचें धुरीणत्व पत्करण्यास तुर्कलोक नालायख आहेत. ते सुसंस्कृत नाहींत व त्यांच्या अंगीं राजकीय वकूबहि नाहीं. त्यांस डोकें कसलें तें नाहीं.ते लढ-


तील चांगले, पण त्यांना राज्यकारभार व संघटना साधणार नाहीं. त्यांचें वाङ्मय विपुल व थोर नाहीं. राजकीय यशाच्या मागोमाग कलाकौशल्य, वाङ्मय व तत्त्वज्ञान यांची अभिवृद्धि व्हावी, पण ती तुर्कस्थानांत झाली नाहीं. रोमन लोकांनीं ग्रीसवर राज्य केलें व त्यांची ते विद्या शिकले. एक रोमन कवि म्हणतो 'Conquered Greece and Conquered her 'Conquerers म्हणजे जित ग्रीसनें जत्यांस जिंकलें' रोममध्यें कवि व तत्त्वज्ञ निर्माण झाले. रोमप्रमाणें तुर्कस्थानानेंहि ग्रीकांस जिंकलें. पण तुर्क-लोक ग्रीकांपासून कांहींच शिकले नाहींत. एक इजिप्शियन म्हणतो त्या-प्रमाणें तुर्कांस दोन उद्योग माहीत आहेत. एक लढाया मारणें व दुसरा माशिदी बांधणें. ऐषआराम व आळस हे त्यांचे नित्याचे जोडीदार होत. सीरियावर त्यांस धड राज्यहि करतां आलें नाहीं. त्यांचे पोलीस म्हणजे चोर व दरोडेखोर यांचे साथीदार. तुर्कांनीं शेकडो ग्रीक स्त्रिया भ्रष्टविल्या. ते जगत्–इस्लाम–सत्तावादी नाहींत. ते स्वराष्ट्रभक्त आहेत. त्यांनीं हिंदी ईजिप्शियन, आल्जेरियन, ट्यूनीशियन, व सुदानी यांस पैसे चारून आपले भाट बनविले. तुर्क दुष्ट, आप्पलपोटे व चढेल आहेत. त्यांनीं आरबी भाषा आपल्या राज्यांत दडपून टाकली आहे. आपल्या साऱ्या प्रजेची भाषा तुर्क असावी अशी त्यांची इच्छा आहे. तुर्कांना इजिप्तनें स्वतंत्र होणें नको आहे. तुर्कांच्या अंमलास इराणीहि विटले. कांहीं हिंदी लोक कॉन्स्टांटिनोपलांत आहेत, पण ते उडाणटप्पू आहेत आपल्या पक्षाचा मतप्रसार करण्यास तुर्क सरकार हिंदी मुसलमान प्रचारकांस तनखा देतें."

लाल हरदयाळ यांनीं तुर्कांवर फारच तोंडसुख घेतलें आहे. कदाचित् महायुद्धांत तुर्कस्थानानें कित्येक मुसलमानांस व युरोपियनांस पैसा चारून आपलें भाट बनविलें, या दृष्टीनें वरील विधानांतील अतिशयोक्तीचा भाग का-ढून टाकला तरी उरलेलीं बरीचशीं विधानें विचार करण्यासारखीं आहेत. तुर्की साम्राज्यास एकट्या ग्रीक संस्कृतीचाच काय, पण त्यानंतरच्या आरब संस्कृतीचा ठेवा चारपांचशें वर्षे सांपडला होता. बगदादच्या अबासद खिलाफतीनें अवघ्या सव्वाशें वर्षांत ग्रीक सोडून बाकीच्या चार संस्कृ-तींच्या स्कंधभागीं बसून विद्या व कलाकौशल्य अभिजात स्वरूपास पोंच-

विलें. तुर्कांस वरील चार संस्कृतींच्या जोडीस युरोपांतील ग्रीक संस्कृति आणि आशियांतील स्वधर्मीयांची आरब संस्कृति लाभली होती; पण असा हा असाधारण निधि हातीं लागला त्याचें योग्य चीज त्यांच्यानें करवलें नाहीं. सुलेमानाच्या काळीं व त्यापूर्वीं वरील प्राचीन संस्कृतींचें स्तन्य प्राशन करून तुराणी ठेवणीच्या नव्या संस्कृतीनें ही वसुंधरा श्रीमान होणार असा रंग दिसूं लागला होता. परंतु सुलेमानाच्या अस्तामागोमाग पुढील पडत्या काळांत तिलाहि वैधव्य दशा प्राप्त झाली असें म्हणावें लागतें.

तुर्कांचें मूलस्थान मध्य आशियाच्या पठारावरील तुर्कस्थान. त्या राकट व आडदांड मुलुखांतील तुर्कांनीं आपला राकटपणा आणि आडदांडपणा अनातोलिया व थ्रेस या रमणीय व सुपीक प्रदेशांत येऊन राहिल्यावर वडिलोपार्जित जिंदगीप्रमाणें जतन करून ठेवलेला दिसतो. नाहीं पेक्षां पिछाडीशीं एकाहून एक सरस अशा सहा जुन्या संस्कृती आणि आघाडीस पाश्चात्यांची बहरास येत चाललेली नूतन संस्कृति अशा पुष्पराशींत आदबशीर बसविलेले तुर्क म्यानांत ठेवलेल्या तलवारीच्या पात्याप्रमाणेंच तिखट व कठोर राहिले नसते. जपान दूर व एकाकी असतां त्यानें महाप्रयासानें पाश्चात्य देशांतून अभिनव संस्कृतीचें रोप आणून आपल्या भूमींत रुजविलें आणि छोटेपणांतहि मोठेपण प्राप्त करून घेतलें; आणि उलट पक्षीं तुर्कांचीच गोष्ट पहा. त्यांनीं अंगावरून गंगा वहात असतां तिच्या उदकानें आपलें बलाढ्य व प्राचीन साम्राज्याचें पुष्पोद्यान सजवून देण्याचें सोडून देऊन त्याचें जीर्णोद्यान मात्र बनविलें. त्यांच्या अमलाखालील सीरिया व मेसापोटेमिया हे सुसंस्कृत, समृद्ध देश ओस व रानटी स्थितीस पोंचले. सुलतान वेळेवर जागे होते आणि पाश्चात्य विद्या, शास्त्रें व यंत्रकला यांचा प्रसार साम्राज्यांत करते, तर त्यांच्या साम्राज्यास बळकटी येऊन युरोप व आफ्रिका खंडांत कदाचित् बऱ्याच ठिकाणांवर भडक रंग चढण्याऐवजीं हिरवा रंग पसरला असता, शेजारचे मुसलमानी देश जागृत झाले असते, आणि युरोपियनांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपासून आशिया खंडाचा पुष्कळच बचाव झाला असता. परंतु हें बुद्धिवैभव आधुनिक सुलतानांत व तरुण तुर्कांतहि दृष्टीस पडलें नाहीं.

युद्धोत्तर कालीन तुर्क प्रदेश (१९२५)



महायुद्धानें जगाची सगळीच घडी बदलून गेली आहे. त्यांत राजांचीं राज्यें शिरलीं आणि तीं प्रजेचीं होऊन बाहेर पडलीं. किंबहुना महायुद्धाच्या भट्टींत राजांचे सुवर्णमुकूट वितळून त्याच्या पाडलेल्या चिपेचीं लेणीं करून प्रजेनें आपल्या अंगाखांद्यांवर चढविलीं. तुर्कस्थानास झुरणीस लावणारा रशियाचा झार सिंहासनावरून कोसळून खालीं पडला आणि त्याचा व त्याच्या वंशजांचा मागमूस देखील राहिला नाहीं. इतकेंच नव्हे, तर तेथील अनियंत्रित बादशाही अंमल संपून जगांतील लोकसत्ताक राज्यासहि मागें सारणाऱ्या समाजसत्तावादी सोव्हियट सरकारची स्थापना झाली. कोणत्याहि देशाच्या राजकीय लंबकास एवढा जोराचा हिसका जगाच्या इतिहासांत मिळाला नसेल. कैलास पर्वतास गदगदा हलविणाऱ्या रावणाप्रमाणें ज्यानें एकट्याच्या बुद्धिवैभवानें आणि पराक्रमानें महान् महान् सत्ताधारी पालथे घालून जगास थरथर कापावयास लावलें, तो प्रतिनेपोलियन असा विल्यम कायसर आपलें राज्य, देश व त्याबरोबर साऱ्या महत्त्वाकांक्षा यांस तिलांजलि देऊन हॉलंड देशांत चोरासारखा लपून बसला आणि त्याच्या पश्चात् त्याच्या सिंहासनाचे तुकडे उडून जर्मनींत लोकशाही अंमल सुरू झाला. ऑस्ट्रिया–हंगेरीची जुगल फुटून तिची इतकी दुर्दशा उडाली कीं त्या जोडीचें नांवहि नष्ट झालें. पश्चिमेकडून सुटलेल्या झंझावातांत इस्तंबूलच्या इस्लामी सुलतानाच्या तख्ताचाहि चुराडा उडावयास चुकला नाहीं. महायुद्धाचा निखारा आपल्या साम्राज्य मंदिरावर ठेवून तरुण तुर्कांनीं त्या मंदिराचा बराच भाग राखेस मिळविला असला, तरी त्यांतून उरलेल्या स्वराज्यावर भोंवतालच्या अष्टदिशा प्रसन्न आहेत आणि सुखद वायू वाहूं लागला आहे, त्या जवरील संकटें वितळलीं आहेत, रशियाचें भय उरलें नाहीं, व ख्रिस्त्यांची बाजू घेऊन तुर्कस्थानांत ढवळाढवळ करण्याचें निमित्तहि युरोपियन राष्ट्रांपाशीं नाहीं. तरुण तुर्कांनीं महायुद्धानंतर केमालपाशाच्या धुरीणत्वाखालीं जें शहाणपणाचें धोरण स्वीकारलें आहे, तें तसेंच चालू ठेवल्यास इस्लामी जगांत तुर्कस्थानास आज मिळणारा अग्रेसरत्वाचा मान सार्थ व सयुक्तिक ठरेल यांत शंका नाहीं.

केमाल पाशा यानें अंगोऱ्यास आपल्या लोकसत्ताक राज्याच्या वार्षिक समारंभाच्या निमित्तानें ता.२९।१०।२४ रोजीं केलेल्या भाषणांत आपण आतांपर्यंत बजाविलेली कामगिरी व पुढील धोरण जाहीर केलें आहे, त्यावरून तुर्कस्थानांत नवे कायदे अमलांत येत आहेत, तुर्की सैन्य जय्यत तयार होत आहे,आणि आरमार व विमान याच्या रचनेचा विचार चालू आहे, कराचें ओझें हलकें करून जमाखर्चाची तोंडमिळवणी राखण्याचा यत्न होत आहे. शेतकी या मुख्य धंद्याच्या सुधारणेकडे सरकारचें पूर्ण लक्ष आहे, मुलगे व मुली यांस एकत्र शिकविण्याची पद्धति पसंत पडत आहे, जुने ग्रह मोडत आहेत, अंगोरा सरकार व सोव्हियट रशिया यांत स्नेहभाव कायम आहे आणि दळणवळणाचे देशांतील मार्ग वाढविण्याकडे सरकारचें पूर्ण लक्ष आहे असें केमाल पाशा सांगत आहेत.

आशिया मायनरमध्यें ऊंस, कापूस, रेशीम, लोकर, ताग व तंबाखू यांची पैदास विपुल व तांबे कोळसा हीं खनिज द्रव्येंहि मुबलक व उत्तम प्रकारचीं आहेत. त्यास उत्तेजन देण्याकरितां अंगोरा सरकारानें १९२५ सालच्या अंदाजपत्रकांत बरीच मोठी रक्कम मंजूर केली आहे. वरील कच्चा माल व त्यापासून तयार झालेल्या जिनसा तुर्कस्थानास पुरून परराष्ट्रांस पाठविण्याइतक्याहि उरतील असा अंदाज आहे. सरकारनें कैसरे व किरशहर इत्यादि ठिकाणच्या लोकरीच्या गिरण्या ताब्यांत घेऊन अगदीं नवीन प्रकारच्या यंत्रसामुग्रीनें त्यापासून गालिचे तयार करण्याचें काम सुरूहि केलें आहे. अदाना येथें सरकारनें शेतकी पेढींतून एक कापडाची गिरणीहि काढली आहे. नवीन धंदे काढण्यास तुर्कस्थानापाशीं आज भांडवलाचा तुटवडा आहे. तो भरून काढण्यासाठीं परदेशाच्या भांडवलवाल्यांस सवलती देण्यांत येत आहेत. अंगोरा—सिवास आणि सॅमसीन—सीवास हे आगगाडीचे रस्ते बहुतेक तयार झाले आहेत. मुसलमानी देशांत प्रजासत्ताक राज्यपद्धतीचें बीजारोपण करण्याचा पहिला मान तुर्कस्थानानें मिळवला आहे. आणि केमालपाशासारख्या कर्तबगार वीर—मुत्सद्याच्या धुरीणत्वाखालीं सुधारणेचा मार्ग तुर्कस्थान असाच चोखाळीत राहिल्यास लोकसत्ताक राज्यपद्धतीचीं पाळेंमुळें खोल

जाऊन तिला कायमचें स्थैर्य प्राप्त होईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. जगदिस्लामसत्तेची हाव तुर्कांस नाहीं. त्यांच्या सर्व चळवळी देशाभिमानाच्या कल्पनेवर अधिष्ठित झाल्या असून खिलाफतीस अर्धचंद्र देऊन ऐहिक व्यवहारांत धर्माचें स्थान दुय्यम प्रतीचें आहे असें त्यांनीं कृतीनें दाखवून दिलें आहे. पूर्व व पश्चिम या दोन दिशांकडून वहात येणाऱ्या दोन महान् संस्कृतींच्या संगमावर तुर्क उभे आहेत. आणि दोन्ही नद्यांचें कित्येक शतकें अवगाहन केल्यावरच त्यांनीं प्रस्तुत राज्य पद्धति व विचारसरणी अवलंबिली आहे. या दृष्टीनें इतर मुसलमानी राष्ट्रांतहि जगदिस्लाम सत्तेसारख्या अव्यवहार्य व परिणामीं अहितकर कल्पनांस फाटा देऊन तुर्कांचीच राज्यपद्धति व विचारसरणी पत्करावी लागणार हें निर्विवाद होय. कोणतेंहि राष्ट्र जागृत झालें म्हणजे प्रथम तें तुर्कांप्रमाणें राजाच्या सत्तेस समूळ उपटून टाकणार किंवा जपानाप्रमाणें तिला त्या सत्तेला मर्यादा तरी घालून देणार. इराण व अफगाणिस्थान या इस्लामी देशांतहि हाच प्रभाव दृष्टीस पडणार आणि तसें झालें म्हणजे युरोपियन राष्ट्रें ख्रिस्ती असूनहि तीं जशीं प्रसंगविशेषीं एकमेकाशीं झगडतात आणि आपलेंच हितसंरक्षण करतात, तोच प्रकार आशिया खंडाच्या पश्चिमेकडील इस्लामी देशांतहि अनुभवास यावयाचा. अशा रीतीनें तुर्कस्थान तुर्कस्थानापुरता, ईजिप्त ईजिप्तपुरता, इराण इराणापुरता आणि अफगाणिस्थान अफगाणिस्थानापुरता पाहूं लागला असतां अफगाणिस्थान पुढें मागें हिंदी मुसलमानांच्या हिताकरितां हिंदुस्थानावर राज्य करील किंवा हिंदी मुसलमान अफगाणांचें राज्य आपणावर लादून घेतील ही गोष्ट संभवतच नाहीं. खऱ्या देशाभिमानाचा उदय झाल्यावर हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितां आणि अफगाणिस्थान तेथील लोकांकरितां हीच विचारसरणी फैलावेल आणि तिच्या प्रकाशांत हिंदुस्थानी मुसलमानांस अफगाण परकीयच वाटूं लागतील. ही विचारसरणी आज तुर्कस्थानांत विजयी झाली आहे आणि ती उद्यां धर्मभेद व धर्मवेड पायाखालीं तुडवून सर्व आशियाखंडभर विजयी होईल. इस्लामी देशाची महायुद्धापूर्वीची स्थिति आज राहिलेली नाहीं. महायुद्धापूर्वीं राष्ट्रीयत्वाचें वारें तुर्कस्थान व इंग्रजांच्या ताब्यांतील ईजिप्त

याच तेवढ्या देशांत शिरलें असून तुर्की साम्राज्याखालील तुर्कस्थाना-व्यतिरिक्त मेसापोटेमिया, सीरिया, पॅलेस्ताईन, आरबस्थान व त्यांच्या शेजा-रचे अफगाणिस्थान इराण हे देश अभेद्यच राहिले होते. परंतु महायुद्धानें त्यांच्या भोंवतालचे कवच फोडून त्यांस अष्टदिशांनीं खोललें आहे. मेसा-पोटेमिया, सीरिया, पॅलेस्ताईन व आरबस्तान यांवर इंग्रज-फ्रेंचांचाच अंमल बसला आहे.यामुळें पाश्चात्य ज्ञानाचा व कल्पनांचा फैलाव होण्यास अनेक वाटा मोकळ्या झाल्या आहेत. सीरियांत फ्रेंच वाङ्मयानें आणि इराण (मेसापोटेमिया) पॅलेस्ताईन व आरबस्थान यांत इंग्लिश वाङ्मयानें आपला शिरकाव करून घेतला आहे. सीरियांतील दमास्कस, इराकमधील बगदाद, ईजिप्तांतील केरो हीं शहरें पाश्चात्य संस्कृतीचीं केंद्रें बनत आहेत. किताबखाने, वर्तमानपत्रें, शाळा, कॉलेजें हीं पाश्चात्य विचारांचीं आगरें असून केरो, दमास्कस व बगदाद येथें इंग्रज–फ्रेंचांच्या छत्राखालीं त्यांचा बस चांगला बसला आहे. या तीन शहरांमध्यें मोटारींत अगर विमानांत बसून हें वाङ्मय तासा दोन तासांत शेकडों मैलांची वाट चालतें आणि हजारो जणांची गांठ घेतें. केरो व बगदाद हीं हजार मैलां-च्या अंतरावरील शहरें विमानामार्फत एकमेकांस भेटत आहेत आणि बिरुट, दमास्कस व बगदाद हीं तीन शहरें मोटारींनीं अगदीं नजीक आणून सोडलीं आहेत. प्राचीन दमास्कसच्या तटबंदीवर बिनतारी स्टेशनाचीहि स्थापना झाली आहे.

मुसलमान लोक परवांपर्यंत धर्माशिवाय इतर बात जाणीत नसत व त्यास सोडून इतर विषयांवरील वाङ्मय फारसें वाचीत नसत. परंतु या नवीन साधनांनीं त्यांची ज्ञानक्षुधा प्रज्वलित केली असून ते आधुनिक सामाजिक, व राजकीय विषयांवरील विचार हावरेपणानें गिळून टाकीत आहेत. इंग्लंड व फ्रान्स या देशांत विद्यार्जनार्थ दरसाल जाणारांची संख्या मक्केच्या यात्रेकरूंपेक्षां अधिक वाढत आहे असें म्हणतात. शाळां-तून व कॉलेजांतून मुली १८।२० वर्षांच्या होईपर्यंत शिकत आहेत. पाश्चात्य राजनीति व तत्त्वज्ञान यांवरील ग्रंथांच्या फैलावानें राजकीय बाबतींत लोकसत्ताक पद्धति व धार्मिक बाबतींत संशयवाद इकडे तरु-

णांचा कल झुकत आहे आणि इंग्रज-फ्रेंचांनीं आपआपल्या ताब्यांतील देशांतून उभारलेल्या पाश्चात्य धर्तीवरील राज्ययंत्रानें व मिशनऱ्यांच्या उपदेशानें उभय विचारांस बळकटी येत आहे. उन्हानें तापलेल्या खडका-वर पावसाचे थेंब पडल्यानें तो फुटून त्याचा चुरा व्हावा तशा प्रकारचा मुसलमानांच्या धार्मिक टणकपणाचा चुराडा आज दीड हजार वर्षांनीं इस्तंबूल, दमास्कस, केरो व बगदाद या चतुः-सीमेंतील प्रदेशांत सपाट्यानें उडत आहे. बगदादनजीकची इराण इराकास जोडणारी मोटारीची सडक बांधली गेल्यावर इराणी खडक व इराणा-मागून किंवा इराणाबरोबरच अफगाणी खडक फुटणार हें निर्विवाद होय. मुसलमानांचा धार्मिक टणकपणा नरम पडल्यावर त्या ठिकाणीं राष्ट्रधर्म आपला नवीन प्रकारचा टणकपणा स्थापन केल्यावांचून राहणार नाहीं. ईजिप्त व मोरोक्को यांच्या पुढारीपणाखालीं भूमध्यसमुद्रावरील आफ्रिका खंड आणि तुर्कस्थान व ईजिप्त यांच्या नेतृत्वाखालीं पश्चिम आशिया खंड इस्लामी अर्धचंद्राऐवजीं राष्ट्रधर्माचें निशाण फडकवूं लागणार यांत शंका नाहीं. कालाचा ओघच अशा प्रकारचा असल्यानें त्यास परतविण्यास समर्थ कोण आहे? जगदिस्लाम चळवळ आतां मागें पडणार आणि इस्लामी देशांतून राष्ट्रधर्माचा डंका इतःपर ऐकूं येणार हें निर्विवाद होय. हिंदुस्था-नांतील मुसलमानांनीं आज जर कोणत्या एखाद्या धर्माचे उपासक व्हाव-याचें असेल तर ते याच राष्ट्रधर्माचें होय आणि तुर्कस्थानच्या इतिहासा-पासून त्यांनीं बोधहि हाच घ्यावयास पाहिजे.

तुर्कांच्या इतिहासांतील महत्त्वाचे सन

६६६ कॉन्स्टांटिनोपलची स्थापना.
१२५८ उस्मानचा जन्म.
१३२६ उस्मानचा मृत्यु व आरखान गादीवर बसला.
१३३३ तैमूरलंगाचा जन्म.
१३३८ कॉन्स्टांटिनोपलचा बादशहा अँड्रोनिकस मरण पावला.
१३५८ आरखानाचा मृत्यु.
१३५९ पहिला मुराद गादीवर बसला.
१३८९ बेयिझिद गादीवर बसला.
१३९३ बल्गेरिया तुर्कांनीं घतला.
१३९८ तैमूरलंगाची हिंदुस्थानावर स्वारी.
१४०० तैमूरलंगाचा सिवासच्या किल्ल्यास वेढा.
१४०१ बेयिझिदची युद्धार्थ तयारी.
१४०२ बेयिझिदचा मृत्यु.
१४१३ पहिला महमद गादीवर बसला.
१४२१ महंमदाचा मृत्यु. दुसरा मुलगा मुराद गादीवर बसला.
१४५१ मुरादाचा मृत्यु. फत्ते महमद गादीवर बसला.
१४५२ कॉन्स्टांटिनोपलपाशीं महमदानें किल्ला बांधला.
१४५३ कॉन्स्टांटिनोपलवर महमदाची स्वारी.
१४६० दुसऱ्या महमदानें ग्रीस देश जिंकला.
१४८१ फत्ते महमदाचा मृत्यु व दुसरा बेयिझिद तख्तनशीन झाला.
१५१२ बेयिझिडचा मृत्यु व पहिला सेलीम तक्तनशीन झाला.
१५१८ सेलीम मिसर (ईजिप्त) मधून परत फिरला.
१५२० सेलीमचा मृत्यु, सुलेमानाची गादीवर स्थापना.
१५२१ सुलेमानाची बेलग्रेडवर स्वारी.
१५२९ सुलेमानाचा व्हीएन्नास वेढा.
१५३६ इब्राहिमचा खून.

१५३८ बहिलोल लोदी सुलेमानाची मदत मागतो.
१५४७ पोर्तुगीज दीव बेट घेतात.
१५६६ सुलेमानाची हंगेरीवर तिसरी स्वारी.
१५६८ सोकोल्लीनें आस्त्राखान घेण्यास सैन्य पाठविलें.
१५७० सोकोल्लीनें सायप्रस बेट घेतलें.
१६२२ सर टॉमस रो कॉन्स्टांटिनोपलास आला.
१६३२ सुलतान मुराद यानें जेनिसरीजचें बंड मोडलें.
१६३६ मुरादाची इराणावर स्वारी.
१६४१ मुरादानें रशियासून अझोव्ह घेतलें.
१६६० अल्जेरिया व ट्यूनिस तुर्कांपासून स्वतंत्र.
१६९८ ऑस्ट्रिया, हंगेरी व पोलंड यांबरोबर तुर्कांचा तह.
१७११ रशिया व तुर्कस्थान यांचें पहिलें युद्ध.
१७१८ तुर्कांपासून हंगेरी स्वतंत्र झाला.
१७३५ रशियाची तुर्कस्थानावर स्वारी.
१७७० ग्रीकांचें तुर्कांविरुद्ध बंड.
१७७४ प्रशिया, रशिया व ऑस्ट्रिया यांचा पोलंड वाटून घेण्याबद्दल केनार्डजीचा तह.
१७९२ फ्रान्सांत राज्यक्रांति.
१७९४ ईजिप्तवर नेपोलियनची स्वारी.
१८०६ सर्व्हियाचा तुर्कांवर जय.
१८०८ सुलतान महमद गादीवर बसला.
१८०९ सर्व्हियाकडून तुर्कांचा मोड.
१८१२ रशिया व तुर्कस्थान यांचे दरम्यान बुखाऱ्याचा तह.
१८२७ तुर्क सैन्याचा ग्रीसमध्यें संहार.
१८३३ ईजिप्तचा महमद अल्ली व सुलतान यांचा तह.
१८३५ सर्व्हियास पार्लमेंट मिळालें.
१८४१ महमद अल्लीचा मृत्यु.
१८४८ फ्रासांत दुसरी राजक्रान्ति.

१८६१	अबदुल अझीझ गादीवर बसला.
१८७२	महमद नेझीम मुख्य वजीर झाला.
१८७६	तुर्क सैन्याचा राजवाड्यास वेढा.अबदुल हमीद सुलतान झाला.
१८७७	रुमानियाचा रशियाशीं गुप्त तह.
१८७८	तुर्कांकडून बल्गेरियनांची कत्तल. पार्लमेंट रद्द.
१८७९	बॅटेनबर्गाचा प्रिन्स ॲलेक्झांडर बल्गेरियाचा राजा झाला.
१८८१	रुमानिया स्वतंत्र झाला.
१८८२	सार्व्हिया स्वतंत्र झाला.
१८९०	आर्मीनियनांची कत्तल.
१९०३	मॅसिडोनियांत बल्गेरियनांचें बंड.
१९०६	सॅलोनिकास फ्रीमेसनरींची स्थापना.
१९०७	तरुण तुर्कांची पॅरिस येथील परिषद.
१९०८	सॅलोनिकांतील गुप्त, सभा बंड, व हक्कदान. नव्या पार्लमेंटांचें उद्घाटन.
१९०९	कॉन्स्टांटिनोपलमधील सैन्याचें बंड.
१९११	इतालीची त्रिपोलीवर स्वारी.
१९१२	ग्रीस, बल्गेरिया व सार्व्हिया यांची तुर्कांवर स्वारी.
१०।९।१९१३	बुखारेस्टचा तह.
२८।६।१९१४	आर्चड्यूक फॅन्सिस फर्डिनांड यांचा साराजिव्हो येथें सपत्नीक खून.
२८।७।१९१४	ऑस्ट्रिया सार्व्हियाविरुद्ध युद्ध पुकारतो.
७।८।१९१४	मांटिनिग्रो सार्व्हियास मिळाला.
२।११।१९१४	तुर्कस्थान जर्मनीस मिळाला.
४।१०।१९१५	बल्गेरिया जर्मनीस मिळाला.
२८।४।१९१६	ब्रिटिश सेनापति टाऊनशेंड तुर्कांच्या स्वाधीन झाला.
७।१२।१९१६	अमेरिका दोस्तांस मिळाली.
१९१८	मेसापोटेमिया, सीरिया, पॅलेस्ताईन व आरबस्तान यांजवरील तुर्कांचा अंमल संपला.

३१।१०।१९१८	तुर्कस्थानानें दोस्तापाशीं युद्ध तहकूबी मागितली.
८।११।१९१८	महायुद्धाची परिसमाप्ति.
१५।५।१९१९	ग्रीक सैन्यानें स्मरना शहर घेतलें.
२३।४।१९२०	अंगोऱ्यास नॅशनल असेंब्लीची स्थापना.
११।८।१९२०	सेव्हर्सचा तह.
२३।७।१९२३	लॉसेनचा तह.
१।३।१९२४	खिलाफतविसर्जन.





खंड २ रा.

धार्मिक, सामाजिक, आर्थिक.

प्रकरण १ लें.

इस्लामी धर्म व खिलाफत

महंमद पैगंबर—

महंमदाचा जन्म आरबस्थानांतील हिजाझ प्रांतीं इ. स. ५८२ मध्यें झाला. त्याच्या बाळपणीं मक्केस घरोघरीं देव असून त्यांच्या पूजा होत असत. तेथील लोकांच्या वेगवेगळ्या जमाती किंवा कुटुंबसंघ असल्यामुळें त्यांचीं परस्परांत नेहमीं भांडणें, चोऱ्या व मारामाऱ्या होत. किंबहुना कुटुंब हा त्यांचा घटक व त्याबाहेरील सर्व जनता परकीय असा त्यांचा समज असे. ते स्वतःच्या हिमतीवर वागत, सुंदर आरबी घोड्यावर किंवा उंच उंटावर बसून ओसाड व रेताड मैदानें तुडवीत दूरदूरच्या मजला मारीत, आणि अशा एकाकीपणांत संकट बेतलें, तर त्यांचें संरक्षण करण्यास त्यांची कंबरेस लटकणारी तरवार म्यानांतून बाहेर उसळी घेण्यास सदैव तत्परच असे. अशा हिंमतबहाद्दर, लढवय्या, धाडसी पण दरिद्री समाजानें महंमदास जन्म दिला. तत्कालीन आरबांचे देव अनेक होते, पण त्या अनेक देवांच्या पाठीशीं एकाच देवास पहाणारे कांहीं महंतही आरबांत होते. त्यांची व महंमदाची गांठ पडून त्यांनीं महंमदास एकेश्वरी परमार्थाचा मार्ग दाखविला. महंताच्या सहवासांत असतां त्यास सर्वसाक्षी परमेश्वराचा ध्यास लागला. तो हिरा पर्वतांवरील एकान्तांत जाऊन बसे व परमात्म्याचें ध्यान करीत असे. हिजाझ व येमेन या प्रांतीं बरेच यहुदी लोक राहात असत. अध्यात्मपर विचारांस ठामपणा आणण्याचे कामीं जशी महंतांची, तशीच यहुद्यांच्या जुन्या करारांची व ख्रिस्त्याच्या नव्या कराराची महंमदास मदत झाली.

रमजानच्या महिन्यांत महंमद हिरा पर्वतावर ध्यानमग्न होऊन बसला होता. तेव्हां जिब्राईल नामक देवदूत त्यास येऊन भेटला आणि 'मनुष्य हा मी स्वतःकरितां आहे असें समजतो, तेव्हां तो मायेंत गुरफटला आहे असें समजावें. माणसें हीं स्वतःकरितां नसून ईश्वराकरितां आहेत व तीं

ईश्वराकडेच परत जावयाचीं आहेत' हा महामंत्र त्यानें महंमदाच्या कानांत सांगितला व तो गुप्त झाला. हा मंत्र मिळाल्यावर महंमदाची तळमळ अधिकच वाढली आणि परमेश्वरप्राप्तीविषयीं निराश होत्साता तो जीवहि द्यावयास निघाला. इतक्यांत जिब्राईलनें पुन्हां दर्शन देऊन त्याचें समाधान केलें. महंमदचा एकेश्वरी मताचा उपदेश मक्केच्या लोकांस तरी नवा नव्हता. येशू ख्रिस्ताच्या या उपदेशाचें त्यांस स्मरण असल्यामुळें महंमदाच्या मताची छाप त्यांजवर बसली नाहींच. पण उलट त्याच्या अधिकप्रसंगाबद्दल त्यांनीं त्यास वाळींतहि टाकलें. अखेर मक्केचा छळ असह्य झाल्यावर त्यानें इ. स. ६२२ त मदिनेस पळ काढला व यास हिजरत म्हणतात; व तेव्हांपासून हिजरी शक सुरू झाला. या वेळीं महंमदाचें वय चाळीस वर्षांचें होतें; यावरून त्याच्या बुद्धीस व अनुभवास आतां परिपक्व दशा प्राप्त झाली होती असें मानण्यास हरकत नाहीं. मदिनेची परिस्थिति मक्केहून बरीच वेगळी होती. यहुदी व ख्रिस्ती लोकांच्या संगतींत मदिनेच्या मूर्तिपूजकांच्या अंगीं परमताविषयीं बरीच सहिष्णुता बाणली होती. यामुळें त्या लोकांत महंमदाचें बस्तान बसण्यास फारसा विलंब न लागतां त्यास आरबांचें राज्य स्थापन करण्याकडे लक्ष पोंचवितां आलें. मदिनेजवळ कोबानामक खेडेगांवांत त्यानें एक मशीद बांधली व तिजसभोंवार पडशाळा बांधून त्यांतील एका भागांत अनुयायी व दुसऱ्या भागांत स्वतःच्या दोन बायका यांसह तो राहिला.

आरब आपल्या जमातींत लागलेले तंटे तोडून घेण्यास महंतांच्या मठाची वाट धरीत. महंतांचा महंत जो महंमद त्याचें वजन आरबांवर सहजच अधिक पडून त्यांनीं महंमदाकडेच यावें आणि महमदानें त्यांस निष्पक्षपातानें न्याय द्यावा. मदिनेस आल्यापासून महंमदाचें मक्केचें धोरण पालटलें. मक्केस असतांना 'जो माझ्या विरुद्ध नाहीं तो माझ्या बाजूचा आहे.' अशी महंमदाची सहिष्णुतेची भाषा होती. पण मेक्कस गेल्यावर 'जो माझ्या बाजूचा नाहीं तो माझ्या विरुद्ध आहे' अशी भाषा सुरू झाली. ख्रिस्ती व यहुदी धर्मांशीं मुळांत असलेलें साम्य मोडून टाकून जेरूसलेमच्या ऐवजीं त्यानें आपलें मक्का हें क्षेत्र ठरविलें. ख्रिस्ती उपवासाऐवजीं

रमजान हा उपवास पुढें आला आणि रविवाराऐवजीं शुक्रवार हा उपासनेचा दिवस मानला जाऊं लागला.

महंमदाभोवतालच्या आरबांची समाजरचना व राज्यरचना शरीरसंबंधावर होती. त्यांत मूलतः बदल करून शरीरसंबंधाचे ठिकाणीं त्यानें धर्माचा बळकट पाया भरला. धर्मापुढें इतर कशाचीहि ओळख महंमदीय मानीनात. एक महंमदीय दुसऱ्या महंमदीयाचा बंधु गणला जाऊं लागला. हा धर्मबंध इतर सर्व बंधांपेक्षां बळकट ठरल्यामुळें व महंमद आज्ञा करील तर भाऊ भावाचें गर्दन उडविण्यास कमी करणार नसल्यामुळें आरब जमाती व त्यांचीं बंधनें लटकीं पडून त्यांस महंमद भराभर आपल्या पोटांत घेत चालला. धर्माच्या चाकावर फिरणारा महंमदाचा राज्यरथ आरबस्थानांत अद्वितीयत्व पावला व तो राज्यरथ ज्या दिशेकडे फिरत गेला ती दिशा महंमदाची दासी होऊन शरण आली. उपदेश, आर्जव व समेटाचें बोलणें यांस कोणी भीक घालीत नाहीं, असें दृष्टीस पडल्यावर महंमदानें शत्रूवर अखेर नंगी समशेर धरली.

मदिनेस बस्तान सहज बसलें, पण मक्केस तें फिरून बसविणें बरेंच कठीण गेलें. मक्केच्या लोकांस भिववून सोडण्याकरितां मदिनेहून मक्केस जाणाऱ्या कारवानांस महंमदानें वाटेंत लुटलें, पण त्या योगानें मक्केचें लोक वचकण्याचें दूरच राहून त्यांनीं मदिनेस येऊन महंमद व त्याचे अनुयायी यांवर हल्ला केला. त्यांत महंमद पराभव पावला. या अपमानाचा सूड उगविण्याचा बेत करून मक्केस जाऊन काबा देवालयास प्रदक्षिणा घालण्याचा महंमदानें विचार ठरविला. या स्वारींत मक्केच्या बहुतेक यहुद्यांचा धुव्वा उडवून एका यहुद्याचा, द्रव्य दडवून ठेवल्याबद्दल शिरच्छेद करून त्याची रूपवती स्त्री सफिया बिन होयाय हिच्याशीं महंमदानें निका लावला. त्यानंतर दहा हजार सैन्यानिशीं महंमद मक्केवर चालून गेला. त्यानें तें शहर घेतलें. घरगुती देव्हाऱ्यांतील आणि सार्वजनिक देवालयांतील मूर्तींचा विध्वंस केला व काबांतील मूर्ती आपल्या जन्मस्थानाचा अभिमान व काबाविषयीं उपजत आदरबुद्धि म्हणून त्यानें शाबूत राखल्या. मक्का कबजांत आल्यानें महंमदाचें वजन पुष्कळच

वाढलें. ठिकाठिकाणचे शेख आपखुषीनें महंमदीय पंथास शरण आले. त्याच्या स्वाधीन होण्यांत सुरक्षितपणा आहे अशीच सर्वांची खात्री झाली. पुष्कळ ख्रिस्ती व यहुदी लोकांनींहि इस्लामी धर्म स्वीकारला. इराणचा बादशहा व कॉन्स्टांटिनोपलचें, बिझांटाईन साम्राज्य यांचें मांडलिकत्व ज्यांनीं पत्करलें होतें, त्याशिवाय बाकीचे आरबस्थानांतील सर्व लोक महंमदाच्या निशाणाखालीं जमा झाले. ग्रीक बादशहासहि आपणास येऊन मिळण्याचा निरोप महंमदानें जासुदाबरोबर पाठविला होता. पण तो वाटेंत मारला गेल्यामुळें महंमद ग्रीकांवर सैन्य घेऊन निघाला असतां त्याचा पराभव झाला व त्यानंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे ता. ८ जून ६३२ रोजीं महंमद मरण पावला

महंमदाच्या लग्नाच्या बायका व दासी मिळून एकंदर अकरा स्त्रिया होत्या. त्याची पहिली बायको खदिजा त्याजहून १५ वर्षांनीं वडील होती. ती मरण पावल्यावर त्यानें तीन बायका केल्या. मदिनेस यहुद्यांची महंमदाकडून कत्तल झाली. त्या कत्तलींत रैहा नामक एका रूपवती व तरुण यहुदी स्त्रीस महंमदानें बाटवून तिजबरोबर लग्न लावलें. सफियेशीं झालेल्या लग्नाचें वृत्त पूर्वीं दिलेंच आहे. आपल्या शिष्याच्या सहा वर्षांच्या मुलीशीं लग्न करण्यांत महंमदास गैर वाटलें नाहीं. अशा रीतीनें ज्यानें एकामागून एक लहरीप्रमाणें अनेक लग्नें केलीं त्यानें तीं लग्नें कधीं काळवेळ पाहून तर कधीं काममोहित होऊनच केलीं असलीं पाहिजेत असें ओघानेंच कबूल करावें लागतें. सौंदर्यास भुलून महंमद हव्या त्या स्त्रीचें पाणिग्रहण करतो हें पाहूनहि त्याजवर श्रद्धा ठेवणारे त्याचे असंख्य शिष्य त्याच्या महानुभावित्वानें डोळे दिपून अंध बनले असले पाहिजेत किंवा वैवाहिक बाबतींत त्यांच्या नीतिविषयक कल्पना तरी हलक्या प्रतीच्या असल्या पाहिजेत असें अनुमान काढणें भाग पडतें. दरोडे घालणें, लूट जमाविणें व कत्तली करणें हीं कृत्यें धर्मासारख्या आध्यात्मिक व अत्यंत उदात्त विषयाचा प्रसार करूं इच्छिणाऱ्या धर्मसंस्थापकाचे ठिकाणीं अनुचित व विसंगत दिसतात. एकेश्वरी धर्ममताचा प्रसार सामोपचारानें व मानवजातीवर अभेदभावानें प्रेम ठेवून होत नाहीं. या बाबतींत येशु ख्रिस्ताचें उदाहरण महंमदाच्या डोळ्या-

समोरच होतें. या प्रेमाच्या पायीं येशु ख्रिस्तास सुळावर स्वतःचा देह अर्पण करावा लागला. महंमदानें स्वतःचा देह तर अर्पण केला नाहींच, पण उलट सामोपचारानें आपल्या मतास कोणी मान देत नाहीं, असें पाहिल्यावर हजारो कट्टया परधर्मीयांचे बळी मात्र त्यानें आपल्या तलवारीस अर्पण केले.

धर्मप्रसारार्थ राजकारणाच्या नादीं लवकर लागल्यामुळें महंमदाचा अध्यात्माचा अभ्यास अर्धवट स्थितींत सुटून त्याची उन्नति खुंटली व जेवढें अध्यात्मज्ञान त्यानें संपादिलें होतें, तें परधर्मीयांचें समाधान करण्यास समर्थ नसल्यामुळें ख्रिस्ती, यहुदी व हिंदु यांनीं महंमदी धर्माचा स्वीकार आपखुषीनें कधींच केला नाहीं. महंमदी धर्म आरबापेक्षां कमी दर्जाच्या मध्य आशियांतील अडाणी जातींनीं खुषीनें पत्करला व इराण, रूमशाम (अनातोलिया व सीरिया) या सुधारलेल्या देशांतून तलवारीच्या बळावर त्याचा प्रसार करावा लागला. अध्यात्मापेक्षांहि महंमदाच्या अंगीं वैराग्य व ईश्वरनिष्ठा हे गुण इतर आरबांहून उच्चीचे असल्यामुळें त्याची छाप बहुजन समाजावर बसविण्यास तेच मुख्यतः कारणीभूत झाले. कोणी त्याच्या वैराग्यास भुलून तर कोणी त्याच्या पराक्रमानें दिपून त्याचें अनुयायित्व पत्करण्यांत बहुमान समजूं लागले. परंतु पाशवी शक्तीवर व राजसत्तेवर धर्मप्रसार करण्याचा महंमदानें जो दंड पाडला, त्यामुळें त्याचा धर्म जगांत मान्यता पावला नाहीं.

इस्लामी धर्म—

कुराण हा महंमदाचा मुख्य धर्मग्रंथ होय. महंमद आपणास परमेश्वराचा प्रेषित समजत असून आपल्यामार्फत परमेश्वरानें आपला आदेश प्रकट केला असें महंमदाचें सांगणें होतें. मुसलमान लोक याच सांगण्यावर श्रद्धा ठेवून कुराणांतील आज्ञा शिरसावंद्य मानतात. महंमदानें कुराणांतून प्रसंग पाहून वेगवेगळ्या प्रकारचा उपदेश केला असला, तरी त्याचे भाग पाडण्यासारखे आहेत. वास्तविक धर्माची व्याप्तिच इतकी विस्तृत आहे कीं, त्यांत मनुष्याच्या सर्व व्यवहारांचा समावेश होतो, किंबहुना मनुष्याच्या ऐहिक व्यवहाराचें मर्म ओळखून त्यास धरून अत्यंत बुद्धिमान विचारी, दूरदर्शी, निःस्पृह व मानवजातींचें कल्याण इच्छिणाऱ्या थोर पुरु-

षांनीं जे नियम घालून दिले तोच धर्म असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. या दिशेनें विचार केल्यास भिन्न भिन्न समाजांच्या विवक्षित परिस्थितींत प्रणीत केलेल्या धर्मांचीं स्वरूपें वेगवेगळीं असणें स्वाभाविक होय. ज्यांच्याकरितां महंमदानें आपला धर्म प्रकट केला, ते आरब लोक सुधारणेच्या शेवटच्या पायरीवर उभे होते. ते दारिद्र्यानें पछाडलेले व अज्ञानपंकांत रुतलेले होते. चोऱ्या व लूटमार करणें आणि त्याहून संभावितपणानें वागावयाचें तर उंटावरून शेळ्या हाकीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मुशाफरी करीत हिंडणें, हा त्यांचा नित्याचा व्यवसाय होता. अशा समाजास उपदेशिलेला धर्म बिनभानगडीचा, धोपट मार्गाचा, सर्वांस आचरण्यास सोपा असाच असावयाचा. जेणेंकरून आरबांची ऐहिक स्थिति अधिक सुधारेल व पारमार्थिक कल्याण साधेल, अशाच प्रकारचें धोरण महंमदानें स्वीकारलेलें दिसतें. त्याच्या उपदेशाचें आध्यात्मिक, नैतिक, आचारात्मक आणि विचारात्मक असे भाग पाडतां येतील. ईश्वर एक आहे व त्याचा महंमद हा प्रेषित आहे, हा मूलभूत सिद्धांत सांगून ईश्वर व मनुष्य प्राणी यांचा परस्पर संबंध महंमदानें स्थापन केला आहे, मनुष्याचें यशापयश कांहींसें दैवाधीन व कांहीं अंशीं प्रयत्नाधीन आहे हें उघड दिसतें. ईश्वर पापपुण्याचा निकाल करून त्याप्रमाणें मनुष्यास मरणोत्तर गति देतो असें महंमद एके ठिकाणीं सांगतो, तर दुसऱ्या ठिकाणीं प्रयत्नांची गति खुंटल्याचा कोठें अनुभव येतांच, ईश्वर लीलामात्रेंकरून विश्वांत वर्तत असून आपल्या इच्छेनुरूप कोणास सद्गतीस तर कोणास दुर्गतीस पोंचावितो असेंहि तो म्हणतो. ईश्वरापाशीं असलेले दोन चित्रगुप्त मनुष्याच्या सत्कृत्यांची व दुष्कृत्यांची नोंद ठवीत असतात आणि आत्म्यास स्वातंत्र्य नसल्यामुळें परमेश्वराच्या परवानगीवांचून त्यास नाश नाहीं असेंहि त्याचें सांगणें आहे. महंमदाच्या या दुहेरी विधानांमुळें इस्लाम धर्मीयांनीं त्याचा आपल्या सोयीप्रमाणें अर्थ लावला असल्यास नवल नाहीं.

अध्यात्मापेक्षां महंमदाचा मुख्य भर नीति-नियमांवर होता. राजकीय खटपटीस महंमद धर्मस्थापनेबरोबरच लागल्यामुळें अध्यात्म शास्त्राची वाढ त्याचे हातून म्हणण्यासारखी झाली नाहीं. तथापि इस्लामी धर्माची

नीति म्हणून आहे आणि त्या नीतिमत्तेमुळेंच महंमदी धर्माच्या अंगीं जयिष्णुता व परधर्मीयांविरुद्ध एकवाक्यता हे गुण उतरले आहेत. ईश्वर एक आहे, तो दुसऱ्या देवास उत्पन्न करीत नाहीं, किंवा दुसऱ्या देवापासून स्वतः उत्पन्न होत नाहीं, या अटीमुळें अनेक देवतांच्या उपासनेचा वादच मुळांत खुंटला. दुष्ट, अन्यायी, लोभी व जे कुराणास खोटें मानतात त्यांस नरकांत पडावें लागेल या आज्ञेनें महंमदीयांची मुख्य धर्मग्रंथा-वरील श्रद्धा अढळ व निःसीम राहिली. नमाज हा धर्माचा आधारस्तंभ व स्वर्गाची गुरुकिल्ली मानली गेल्यानें मुसलमान नमाज पढल्यावांचून सहसा राहीनासा झाला. आरबस्थानासारख्या प्रदेशांत पाण्याचें दुर्भिक्ष असूं नये तर कोठें असावें ? यासाठीं महंमदानें आपल्या अनुया-यांस प्रत्यहीं स्नान करण्याची अनुज्ञा दिलेली नाहीं. मनाला अपवित्रपणा वाटेल तेव्हां प्रार्थनेपूर्वीं कोपरापर्यंत हात, घोटयापर्यंत पाय आणि तोंड व डोकें धुवावें अशी सवलत ठेवण्यांत आली. फारच अमंगळपणा वाटेल तेव्हांच स्नान करावें, या विकल्पामुळें इस्लामी समाज सामान्यतः गलिच्छ राहिला.

समाजाच्या धारणेला व सुस्थितीला विवाहसंस्था ही अत्यावश्यक होय. या बाबतींत सांप्रतचा ख्रिस्ती समाज एकपत्नीक आहे, हिंदु समा-जांतील कांहीं जाती पूर्वीं बहुपत्नीक असल्या तरी तें हिंदुधर्माचें विशिष्ट लक्षण नव्हे. परंतु महंमदी धर्मांत तें कांहीं अंशीं तशा प्रकारचें लक्षण आहे असें म्हणावें लागतें. महंमदापूर्वीं आरब पुरुष अनेक भार्या करीत. तीच पद्धति महंमदानें पुढें चालू ठेवून स्वतः आकरा स्त्रियांशीं शरीरसंबंध केला. चार बायका करण्यापर्यंत महंमदाची आपल्या अनुयायांस परवानगी आहे. त्याशिवाय दासी या नात्यानें आणखी स्त्रिया जवळ बाळगण्यासहि त्याची हरकत नाहीं. भार्या अनेक असल्यामुळें त्यांजकडून व्यभिचार घडण्याचा व त्यामुळें घटस्फोट होण्याचा संभव फार. व्यभिचार घडूं नये या-साठीं स्त्रीला जबर शिक्षा सांगण्यांत आली आहे. व्यभिचारिणीस मरेपर्यंत खोलींत कोंडून ठेवावी अशी आज्ञा आहे. सुनी पंथांतील लोक अशा जारिणीस दगडानें ठेंचून ठार मारतात व ईजिप्तमधील मुसलमान त्यांस

जलसमाधि देतात. व्यभिचार सिद्ध करण्यास चार साक्षीदार लागतात, पण इतक्या दगदगींत व स्वतःचा बदलौकिक करून घेण्यांत पडण्यापेक्षां घटस्फोट करणेंच पुरुषांस बरें वाटतें. घटस्फोट झालेल्या स्त्रीचा फिरून अंगीकार करण्यास दोन घटस्फोटांची मर्यादा आहे. घटस्फोट तीनदां झाल्यानंतरहि स्त्रीचा स्वीकार करावयाचा तर तिनें प्रथम एखाद्या परपुरुषाशीं लग्न करावें, मग त्यानें तिजबरोबर काडी मोडावी व अशा रीतीनें पहिल्या तीन घटस्फोटांचा विटाळ जाऊन ती कोरी करकरीत व पूर्व पतीशीं त्याची मर्जी असल्यास फिरून लग्न करण्यास पात्र होते. जो बायकोवर व्यभिचाराचें कुभांड आणील, त्यास चाळीस फटक्यांची सजा सांगण्यांत आली आहे. व्यभिचाराच्या पातकापासून स्त्रियांस जपण्याचे बाबतींत महंमदीधर्माचा केवढा कटाक्ष आहे हें यावरून कोणाच्याहि लक्षांत येईल. तथापि जारिणीस जशा प्रकारचें कडक शासन सांगितलें आहे, तशा प्रकारचें शासन पुरुषाच्या वांट्यास आलें नाहीं, ही गोष्ट स्त्रियांहून पुरुषांचा श्रेष्ठपणा शाबीद करणारीच आहे. चोरीसहि जबर शिक्षा सांगितली आहे. जो चोरी करील त्याचे हातपाय तोडावे, जीव घेणाराचा जीव घ्यावा आणि डोळा फोडणाराचा डोळा फोडावा अशी महंमदाची आज्ञा आहे. समाज कार्यक्षम, सुव्यवस्थित, बलवान, व कैदशीर रहाण्यास या आज्ञा अत्यावश्यक होत हें सांगावयास नकोच.

महंमदीयांनीं आचार कोणता पाळावा व व्यवहार कसा चालवावा एतद्विषयक महंमदाच्या आज्ञाहि इतर धर्मीयांनीं चिंतन करण्याजोग्या आहेत. गरिबांस मदत, आतिथिअभ्यागतांचा परामर्श, गुरुजनांस मान, मठस्थापना, मितव्ययाची जरूरी या नियमांनीं महंमदीयांमधील ऐक्य व प्रेम यांच्या संवर्धनास आणि महंमदेतर आरबांस महंमदी पंथांत शिरण्याची इच्छा उत्पन्न होण्यास मदत झाली असली पाहिजे. खरीं वजनें व मापें वापरणें, उदार असणें, मद्यपान वर्ज मानणें, व्याजबट्टा न करणें, हेहि नियम महत्त्वाचे होत. यांपैकीं व्याजबट्ट्याच्या मनाईमुळें सावकारीच्या व सराफीच्या धंद्यास तुर्कस्थानांतील मुसलमानांस मुकावें लागलें, हा एक अर्थीं जसा तोटा, तसा अशा प्रकारच्या सावकारीनें एकाच धर्मांतील भिन्न व्यक्तींत द्वेष

वाढण्याचा प्रसंग टळला हा उलटपक्षीं थोडासा फायदाहि झाला असें म्हण-
ण्यास हरकत नाहीं. नास्तिकांविरूद्ध तलवार उपसावी, मूर्तिपूजकांशीं युद्ध
करावें, अशा युद्धांत जे पडतील त्यांस स्वर्गद्वार खुलें राहील, मूर्तिपूजक
सांपडतील तेथें त्यांस मारावें, पकडावें किंवा त्यांवर पाळत ठेवावी या
नियमांचे परिणाम फार दूरवर पोंचले. राज्याच्या निमित्तानें आपला देश
सोडून जे मुसलमान परदेशांत जाऊन राहिले त्यांचा देव एक, धर्म एक,
प्रार्थना मंदिर एक व प्रार्थना एक यामुळें एकत्र जुळण्याचे प्रसंग वारंवार
येऊन त्यांची जूट जमली हें तर खरेंच, पण त्याबरोबर मूर्तिपूजकांस देहान्त
शासन देणाऱ्या आज्ञेनें त्यांचा हिंदूसारख्या मूर्तिपूजकांशीं एकजीव
होण्याच्या कल्पनेस थारा मिळूं दिला नाहीं. आणि तशांतहि त्यांनीं मूर्ति-
पूजकांबरोबर सलोखा जोडला तरी तो तोडण्यास एखादें क्षुल्लक निमित्तहि
बस्स झालें. ख्रिस्ती व यहुदी लोकांशीं वागण्याचें इस्लामाचें धोरणहि
भिन्न आहे. "नोहा, अब्राहाम, मोजेस आणि जीजस यांस जो धर्म सांगि-
तला तोच धर्म हे महंमदा, मी तुला सांगत आहें" ही महंमदाच्या मुखां-
तून अवतरलेली वाणी असें दाखविते कीं, यहुदी, ख्रिस्ती व इस्लामी
धर्मपंथ हीं एकमेकांचीं भावंडें होत. म्हणूनच त्या त्या धर्मानुयायांपासून
डोईपट्टी घेऊन सोडून द्यावें असाच त्याचा आदेश आहे. तुर्की साम्राज्यां-
तील इस्लाम व किरिस्ताव आणि हिंदुस्थानांतील इस्लाम व हिंदु यांम-
धील फरकाचें कारण हेंच होय. भक्ष्याभक्ष्याच्या बाबतींत जो कोणी
प्राणी आपोआप मरतो, रक्त सांडून मरतो, असा मारलेला प्राणी खावा.
डुकराचें मांस किंवा देवास दिलेला बळी याचें मांस खाण्याचाहि निषेध
करण्यांत आला आहे.

महंमदानें आपल्या अनुयायांस सांगितलेला आचारधर्म चतुर्विध
आहे. (१) सल्वत (प्रार्थना) (२) जकात (दान) (३) सओम
(उपोषण) (४) हज्ज (यात्रा) या चतुर्विध आचारांपैकीं सल्वत व
जकात यांचें परिपालन प्रमुख व सओम आणि हज्ज यांचें परिपालन गौण
समजलें जातें. प्रार्थना हें धर्माचें अधिष्ठान आहे. उपोषण ही तपस्या व
पापक्षालनाचें साधन आहे. जकात म्हणजे दान. ह्या मिळकतीवर ऐहिक

राज्याचें जीवित अवलंबून आहे आणि हज्ज किंवा मक्का-मदिनेची यात्रा हिजपासून मुसलमानी समाजांतील अनेक जाती एकत्र येऊन आपल्या सामर्थ्याची जाणीव उत्पन्न होण्याचें साधन मिळालें आहे. या चतुर्विध उपायांनीं समानता, स्वतंत्रता, बंधुता हें लोकशाहीचें त्रिगुणात्मक स्वरूपहि महंमदी समाजाच्या प्रत्ययास येणें सुलभ झालें. इस्लामी वटवृक्षाचें बीज यांत आहे.

खिलाफत—

महमदाच्या मृत्यूनंतर त्याचें धर्मकार्य पुढें कसें चालावयाचें याची काळजी त्याच्या शिष्यवृंदास लागणें स्वाभाविक होय. महंमदाच्या महानुभावित्वानें आपसांत भांडणतंटे करण्यांत सदा दंग असलेल्या आरबांत एकजूट उत्पन्न केली होती. पण मधून ओवलेलें सूत्र काढून घेतां क्षणींच माळेचे मणी ओघळून वेगवेगळे पडतात, तशीच महमदाच्या पश्चात् त्याच्या अनुयायांची अवस्था झाली. त्यांच्यांत फिरून फळ्या पडल्या व त्या मिटविण्याची युक्ति म्हटली म्हणजे मुसलमानांस बाहेर मुलुखगिरीवर धाडण्याची होय. मुलुखगिरींत धर्मप्रसार व व्यक्तिशः द्रव्यप्राप्ति या दोन्ही गोष्टी साधणाऱ्या असतात. आणि त्या सतत साधीत राहिल्यानें तंट्यास अवसरहि मिळणें शक्य नसतें. कंगाल आरबांस ऊर्जितावस्थेस पोंचण्यास हाच एक मार्ग मोकळा होता आणि कष्टांत व विपत्तींत जीवित कंठणाऱ्या समाजास शौर्य व साहस हा मोबदला विधात्यानेंच निसर्गतः देऊन ठेवला असल्यामुळें आरबांनीं हाहां म्हणतां अष्टादिशा पादाक्रांत केल्या. त्यांस इतर समाजांविरुद्ध एकवटणारा धर्म होता आणि त्यांजपाशीं इतर समाजांस धाकविणारी समशेर होती. म्हणूनच आरब कांहीं काळ सर्वत्र विजयी झाले. परकीयांस जिंकणें म्हणजेच आरबांच्या मतें धर्मप्रसार करणें होतें. आणि आरबांकडून जिंकलें जाणें म्हणजेच परदेशस्थांच्या दृष्टीनें स्वराज्यास व स्वधर्मास मुकणें होतें. यामुळें ज्यांस स्वधर्म होता, त्यांजकडून आरबांस खराखुरा प्रतिकार झाला. कान्स्टांटिनोपलचा ग्रीक व खिस्तधर्मीय बादशाहा हिराक्लिस इस्लामी धर्म स्वीकारण्यास तयार नव्हता. महमदाच्या पश्चात् त्याचा सासरा अबूबकर याची

मदिनेस महंमदाच्या प्रतिनिधिपदावर स्थापना झाल्यावर त्यानें आपल्या आरब अनुयायांची धाड हिराक्लिसवर घालून त्याजपासून शेजारचा सीरिया देश जिंकून घेतला. ग्रीकांच्या हद्दीस इराणच्या बादशाहाची हद्द भिडली असल्यामुळें त्याच्या राज्यावर स्वारी करून आरबांनीं युफ्रातिस नदीच्या मुखाकडील इराक प्रांत आपल्या राज्यास जोडला. त्यामागून पॅलेस्ताईन, मेसापोटेमिया, सीरिया वगैरे प्रांत आरबांच्या ताब्यांत जाऊन इराणच्या बादशाहाची सत्ता पश्चिमेस इराणापुरतीच राहिली. उत्तर, पश्चिम व पूर्व दिशा अशा रीतीनें आक्रमिल्यावर दक्षिणेस ईजिप्त देशावर त्यांची नजर फिरून तोहि देश त्यांच्या छत्राखालीं आला. इराणांत या काळीं फारसी धर्म नांदत असल्यामुळें तो जिंकण्याची व त्यांतील लोकांस स्वधर्मांत ओढण्याची ईर्षा आरबांनीं बाळगावी यांत आश्चर्य नाहीं. इराणी लोक आरबांबरोबर निकरानें झगडले,पण आरबांच्या धार्मिक आवेशा पुढें त्यांस अखेर हातच टेकावे लागले. इराण्यांनीं मुसलमानी धर्म निरुपायानें स्वीकारला, तरी पण आरब व आरबी संस्कृति त्यांस मनापासून कधींहि आवडली नाहीं.

अबूबकरची कारकीर्द आरबांस महद्भाग्याची व यशाची गेली. अबूबकराच्या मागून उमर खलिफ झाला,पण त्यानें मदिनेंत बसूनच आपल्या सेनेकडून बाहेरच्या मोहिमा चालविल्या. उमर ६४४ त मारला गेला. यावरून खिलाफतीचा धार्मिकपणा झडत जाऊन तिच्या ठिकाणीं राजकीय स्वरूप अधिकाधिक कसें बाणत चाललें याची कल्पना होणार आहे. उमर मेल्यावर त्यानें निवडलेल्या सहा उमेदवारांपैकीं उस्मानाची खिलाफतीवर स्थापना झाली. मक्केहून महमदाबरोबर मदिनेस जे मूठभर अनुयायी येऊन राहिले होते, त्यांपैकीं उस्मान व इतर पांच असामी होते. पारमार्थिकापेक्षां ऐहिक वैभव वाढविण्याची आवडच उस्मानास असल्यामुळें त्याचें धोरण पसंत नसलेला असा एक पारमार्थिक पक्ष उदय पावून त्यानें उस्मानाचा त्याच्याच घरांत वध केला. त्याच्या मरणोत्तर खिलाफतीचें तख्त अलीच्या वाट्यास आलें. उस्मानाच्या वधामुळें त्याजविषयीं जिवंतपणीं जी सहानुभूति नव्हती, ती मरणोत्तर बाळगणारीं कांहीं माणसें

सहजगत्याच निघालीं. अलीची खिलाफत त्यांस मंजूर होईना. तथापि तख्तनशीन अलींचें शत्रुत्व पत्करून मदिनेंत रहाणें अवघड झाल्यानें तल्हा व जबीर या दोघा जणांनीं इराकांत पळून जाऊन बसऱ्यास बंड उभारलें.

तल्हा व जबीर यांच्याच वर्गांतील सीरियाचा सुभेदार मोआवीया हा होता. त्यानें उस्मानाचीं रक्तानें लाल झालेलीं वसनें दमास्कसच्या मशिदींत तेथील सर्व मुसलमानांस जमवून दाखविलीं व सदर दुष्कृत्य अलीनें केलें असें भासवून त्यास अलीवर सूड घेण्यास उद्युक्त केलें. सुडाच्या बुद्धीनें चिडून गेलेलीं मूआवीयाची सेना व अलीपक्ष यांचा निकराचा युद्धप्रसंग दुमतुल जांडाल येथें घडला. या युद्धांत सीरियन मुसलमान आपल्या भाल्यांस कुराणें बांधून लढले. इ. सन ६६० चे सुमारास मुआविया व अली यांमधील यादवी एरव्हां मिटत नाहीं असें दिसून आल्यावरून मक्केस तीन इसमांनीं अली, मुआवीया व त्याचा साथीदार यांच्या खुनाचा बेत केला. पण शेवटीं खून असा एकट्या अलीचाच झाला. खुनामुळें अलीविषयीं तत्पक्षीयांचा आदर वाढून त्यास शिया ही संज्ञा प्राप्त झाली.ते फक्त अबूबकर,उमर व अली यांसच खलिफा समजतात व त्या नंतरच्यांस मानीत नाहींत.अशा रीतीनें अलीचा नाश झाल्यावर इ.स.६५७ त रमजानचे मुहूर्तावर सीरिया व इराक यांच्या दरम्यान मुसलमानांची जंगी सभा भरून मोआवीया सर्वानुमतें खलिफा ठरला व त्याची राजधानी जी दमास्कस तेथेंच खलिफाची मसनद नेण्यांत आली.मोआवीया हा केवळ सीरियाचा सुभेदार. त्यानें खलिफाची गादी बळकवावी व मदिनेहून दमास्कसास ती हालवावी,ही गोष्ट मदिनेच्या मुसलमानांस व अलीच्या अनुयायांस रुचण्यासारखी नव्हती. मोआवीयाच्या घराण्यास ओमाइद घराणें म्हणतात. हें ओमाइद घराणें व अलींचें घराणें यांजमध्यें कित्येक वर्षें हाडवैर माजून राहिलें होतें व त्यांचें बरेचसें सामर्थ्य नवीन मुलख जिंकण्याचें दूर राहून परस्पराशीं लढण्यांतच खर्चीं पडलें. मोआवीयाचें वर्चस्व ईजिप्त, मक्का, मादिना, येमेन यांवर प्रस्थापित झालें व अली पक्षाकडे इराक व इराणचा थोडासा फार्सिस्थान नामक प्रांत राहिला.

अलीस हसन व हुसेन असे दोघे मुलगे होते. ते दोघेहि महम-

दाची मुलगी फातमा इजपासून झाले असल्यामुळें त्यांजविषयीं पुष्कळ मुसलमानांस आदरबुद्धि विशेष वाटत होती. हुसेन शांत स्वभावाचा व पडतें घेणारा होता. त्यास इराकच्या लोकांनीं आपला खलिफा म्हणून मानलें तरी यादवीस कंटाळून व मोआवीयास भिऊन त्यानें मोआवीयाशीं समेट केला. पुढें थोड्याच दिवसांनीं मोआवियानें हसनवर त्याच्या बायकोकडून विषप्रयोग करून त्याचा प्राण घेवविला. हसनचा धाकटा भाऊ हुसेन यास आपल्या वडील भावाचा हा मऊपणा मुळींच पसंत पडला नाहीं. हसनपाशीं लष्करी बळ नव्हतें व राजसत्ताहि फार थोडी असल्यामुळें मोआवीयापुढें त्याचा निभाव न लागून मोआवियानें बसरा, इराक व इराण हे देश ताब्यांत घेऊन त्यांचा कारभार आपला पराक्रमी भाऊ झियाद यास सांगितला. अशा रीतीनें अलीपक्ष जवळ जवळ संपुष्टांतच आला. पूर्वेस बसरा व पश्चिमेस दमास्कस अशी ओमाइद सत्तेचीं आतां दोन केंद्रें झालीं. आणि या दोन केंद्रांतून स्वसत्तेचा प्रसार करणारे तीन पुरुष पुढें आले, झियाद यानें मध्यआशियांतील ऑक्सस नदी ओलांडून खोकंद वगैरे भागांमधील तुर्कांपासून लूट गोळा करून आणिली. इतरांनीं सिंधु उतरून मुलतान गांठलें. खुद्द मोआवीयानें आर्मीनिया घेतला आणि त्याचा पुत्र याजीद यानें कॉन्स्टांटिनोपलवर जाऊन चवथ्या कॉन्स्टंटाईन बादशाहाबरोबर तेरा वर्षांचा तह केला. हुसेन क्यूबाकडे जावयास निघाला असतां त्याजवर उबायदुला यांजकडून उमर बिन सयद बिनवाकस हा सेनापति चाल करून आला. उभयतांची गाठ तैग्रिस नदीजवळ पडली. तेव्हां इमाम हुसेन यानें त्यास तिहींपैकीं कोणती तरी एक अट पत्करण्यास कळविलें. (१) मला मादिनेस परत जाऊं द्यावें (२) तार्तार व ग्वारीजाईत यांच्या तोंडावरील सैन्यांत ठेवावें (३) किंवा यझीदची भेट घेऊं द्यावी. उबायदुल्ला यास त्याची यांपैकीं एकाहि अट कबूल झाली नाहीं. तेव्हां हुसेन जिवावर उदार झाला. हुसेन व त्याजबरोबरचे ७० असामी यांजभोंवतीं शत्रूंचा सात दिवस वेढा पडला. त्यांची उपासमार सुरू झाली. एक यझीद यास खलीफ म्हणून तरी मान किंवा तैग्रीसचें पाणी तरी तूं व तुझ्याबरोबरचे पिऊं नका असा

हुसेन यास शत्रूकडून निरोप आला. मोहोरमची १० वी तारीख म्हणजे १० आक्टोबर सन ६८० ही तारीख उजाडली. हुसेनचे सर्व लोक शत्रूंचे तीर लागून पडले. हुसेन हा एकटाच जिवंत राहिल्यावर त्याचा शिरच्छेद करण्यांत आला आणि त्याचें शरीर लाथांनीं तुडविलें गेलें. त्याचें मुंडकें उबायदुल्ला याजकडे क्यूबास नजराणा म्हणून पाठविण्यांत आलें. इमाम हुसेन यानें कुराणाचें अध्ययन चांगलें केलें होतें. मक्केची यात्रा त्यानें पंचवीस वेळीं पायीं केली होती. त्याचें शव करबेला येथें पुरण्यांत आलें. त्याचें कबरस्थान शिय्या व सुनी दोघेहि पवित्र मानतात.

यजीदानें मदिना लुटली व मक्केचें कबरस्थान काबीज केलें. यजीद मेल्यावर त्याचा मुलगा मोआवीया दुसरा हा खलीफ झाला. तो लवकरच मृत्यु पावल्यामुळें मेरवान बी अल् हकम यास खिलाफत देण्यांत आली. मेरवानास एक विलक्षण अट घालण्यांत आली होती; ती अशी कीं, त्यानें यजीदच्या बायकोशीं लग्न करावें व तिचा यजीदपासून झालेला मुलगा खलीद यास आपला वारस समजावें. खलीद अल्पवयी असल्यामुळेंच ही तात्पुरती योजना करण्यांत आली होती. मेरवान यानें करारांतील गादी पत्करण्याची पहिली अट मात्र इमानानें पाळली, पण खालिदास वारस समजण्याची दुसरी अट मात्र नेमकी मोडली. मेरवानास विश्वासघाताबदल योग्य शासन मिळालें. त्याची बायको व खलीदाची आई मेसन हिनें मेरवानाचा श्वास दाबून जीव घेतला. मेरवान अशा चमत्कारिक रीतीनें मेला; पण खिलाफत तिच्या पुत्रास न मिळतां मेरवनच्या इच्छेप्रमाणें मेरवानच्या अबदुल मलीक नामक पुत्रानेंच बळकावली.

इराकच्या बाजूस अलीपक्ष साफ बुडाला नव्हता. बसऱ्यास हुसेनचा मुलगा महंमद बिन हनाकिया खलीफ म्हणून उभा करण्यांत आला, पण अबदल मलीकानें त्याचें बंड तेव्हांच मोडलें. त्यानें ग्रीक बादशहा स्टीनियन दुसरा यावर स्वारी करून आर्मीनिया व रूम यांचा बराच भाग हस्तगत केला. व आफ्रिकेंत कार्थेज गांठून तिकडूनहि ग्रीकांस पिटाळून लावलें. अबदुल मलीक इ. स. ७०५ त मरण पावला. व त्याचा मुलगा वलीद खिलाफतीवर बसला. वलीद रसिक व विद्वानांचा चाहता असल्यामुळें त्यानें आपल्या पदरीं ख्रिस्ती कवीहि बाळगले होते. इराक-

च्या सुभेदारीची जागा ओमाईद घराण्याच्या दृष्टीनें मोठी जोखमीची व
भानगडीची होती. त्या जागेवर वलीदानें हजाज याची नेमणूक केली.
हजाजचा अंमल करडा होता. त्याचाच सरदार महमद कासीम यानें सिंध
व मुलतान या प्रांतांवर स्वारी केली. व इजिप्तचा सुभेदार मुसा याच्या
तारीक नामक सरदारानें स्पेन देश जिंकला. तारीक स्पेनमध्यें
जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीनें उतरला. जबलतारीक म्हणजे तारीकचा पर्वत
यावरून जिब्राल्टर हें युरोपियन नांव प्रचलित झालें.

तारीक व मुसा यांनीं स्पेन देश परस्पर वांटून घेतला, याचा
वलीदास राग येऊन वलिदानें त्यांस परत बोलावून आपला मुलगा अबदुल
अजीज यास स्पेनचा सुभेदार नेमलें. वलीदच्या मृत्यूनंतर त्याचा
धाकटा भाऊ सुलेमान दमास्कसच्या खिलाफतीवर स्थापन झाला. त्याच्या
काळीं ग्रीक साम्राज्यांत अंदाधुंदी माजून राहिली होती. ही संधि उत्तम
समजून सुलेमानानें कॉन्स्टांटिनोपल सर करण्यासाठीं आपलें आरमार
पाठवून दिलें. पण त्याचा ग्रीक तोफांपुढें निभाव न लागून सुलेमानाचें
एक लाख सैन्य गारद झालें. एवढ्या भयंकर नाशानेंहि ओमायद खिलाफत
कमकुवत बनली नाहीं हें आश्चर्य होय. सुलेमानामागून अबदुल अजीजचा
मुलगा उमर बिन अबदुल अजीज गादीवर आल्यावर धर्मवेडानें व कर्मठ-
पणानें आपल्या राज्यांतील खिस्ती प्रजेचा ग्रीकांवरील सुडादाखल छळ
करण्यापलीकडे त्याचे हातून महत्त्वाचें कोणतेंच कृत्य झालें नाहीं. तो
मोठा धार्मिक, कर्मठ व म्हणून निष्ठुर होता. त्यास मुसलमान लोक मोठा
साधु समजतात. उमरमागून हशम गादीवर आला. त्याचा स्पेनमधील
सुभेदार अबदुल रहिमान यानें फ्रान्सहि पादाक्रांत केला. हशम ७४३ त
मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर ७४९ मध्यें ओमायद घराण्यांतून खिला-
फत जाऊन ती सदर घराण्याच्या सुभेदारांनीं १०३१ पर्यंत स्पेनमध्यें
चालविली. हशम हा ओमाइद घराण्यांतील शेवटचा पराक्रमी पुरुष होय.
त्यामागून सदर घराण्यास उतरती कळा लागून तें मोडकळीस आलें. यानंतर
महमद पैगंबराच्या भावाचा नातू अबदुल अबास इराकची राजधानी
क्यूफा येथें खलीफ होऊन त्यानें ओमाइद घराण्यांतील सगळे पुरुष ठार

मारविले. ओमाइद घराण्याकडे सुमारें शंभर वर्षेपर्यंत खिलाफत टिकली. तेवढ्या अवधींत मुसलमानांचा संचार चहूंमुलखीं झाला. त्यांनीं पूर्वेस हिंदुस्थान, पश्चिमेस फ्रान्स व कॉन्स्टांटिनोपल, दक्षिणेस मोरोक्को आणि उत्तरेस खोकंदपर्यंत इस्लामी झेंडा हिंडविला. ओमाइद घराण्यांत पराक्रमी पुरुष निपजले व नवीन धार्मिक स्फूर्ति व मुलूखगिरीची नवीन गोडी यांचा त्यांस पाठिंबा असल्यामुळें त्यांजपुढें परधर्मीय राजांचा व परदेशांचा टिकाव लागला नाहीं. तथापि अशा रीतीनें मुलूखगिरीवर व्यक्तिशः प्रत्येक मुसलमानास त्याच्या दर्जास साजेल असें वैभव प्राप्त होत असतांना मुसलमानांतील कलहाची खोड मोडली नव्हती; खलीफास सामान्य राजापलीकडे अधिक मान मुसलमानांकडून मिळत नव्हता; आणि उस्मानासारखा एखादा खलीफ, कर्मठ व धर्मनिष्ठ निघाला तरी मुसलमान बहुजन समाजानें मानावें असा अलौकिकपणाहि त्यांच्या अंगीं नव्हता असें स्पष्ट दिसतें.

आबासद घराणें--

आबासद घराण्याचा मूळ पुरुष आबस असून तो महमद पैगंबराचा चुलता होता. महमदाच्या हयातींतच आबस मोठ्या मान्यतेस चढला होता. आबसचा वडील मुलगा अबदल्ला आणि अल्लीचा मुलगा हुसेन यांचें परस्परांशीं नातें असलें, तरी शरीरसंबंधाहूनहि अधिक निकट व बळकट असें त्यांचें परस्परांशीं स्नेहसंबंधाचें नातें होतें. हुसेन यूफापाशीं करबेला येथें मारला गेल्यावर अबदल्लानें मक्केस वास्तव्य केलें. अबदल्लाचा धाकटा मुलगा अल्ली हा असून अबदल मलीक दमास्कसचा खलीफ असतां अल्ली दमास्कस येथेंच रहात असे. परंतु अबदल मलीक यानें काडी मोडून ज्या बायकोचा त्याग केला होता, तिजबरोबर लग्न करण्याचें साहस अल्लीकडून घडल्यावरून अल्लीवर अबदल मलीकाचा रोष झाला होता. अबदल्लचामागून दमास्कसची खिलाफत अबदल्लचाचा मुलगा वलीद याजकडे आली. वलीदानें बापावरहि ताण करून अल्लीस आपल्या दरबारांतून हांकून लावलें. अल्ली दमास्कसच्या दक्षिणेस हाशिमीया शहराच्या आश्रयास गेला व तेथें त्याचा मुलगा महमद यानें ओमायद घराण्याचा उच्छेद करण्याचें ठरविलें. महमद पैगंबराचा जांवई अल्ली याच्या

पक्षाचा आपणास पाठिंबा मिळावा म्हणून अलीच्या वंशांतील एका पुरु-षानें खिलाफतीवरील हक्क आपणास महमदानें दिला असल्याचें जाहीर केलें. अलीपक्ष इराकच्या बाजूस अद्यापि जीव धरून होताच. त्यानें मह-मदाच्या हांकेस ओ देऊन त्यास सर्वतोपरीं साहाय्य करण्याचें ठरविलें. याच महमदाचा मुलगा अबदुल आबस होय. यानें ओमायद घराण्यांतील एकुण एक पुरुष ठार मारण्याचा आपल्या बापाचा बेत तडीस नेला होता. त्यानें ओमायद घराण्यांतील पुरुषांस माफी देऊन मेजवानीस बोलाविलें. सदर मेजवानीस सर्व ओमायद हजर राहिले. ते दिवाणखान्यांत येतांच त्यांस आंत कोंडून व चोहोंकडून चाबूक व सोडगीं यांनीं बदडून त्यांचा महमदानें प्राण घेवविला. त्यांच्या प्रेतांची रास घालून त्यांवरून कातडें पसरून अबदुल आबस त्या टेबलावर जेवला असें म्हणतात. हा अबदुल आबस आबासद घराण्यांतील पहिला खलीफ होय. अशा रीतीनें अलीपक्षानें ओमायदांवर सूड घेतला. त्यानें ७४९ त खिलाफतीवर आपली स्थापना करून घेतली. अबदुल आबस मेल्यावर त्याचा मुलगा मन्सूर खिलाफती-वर विराजमान झाला. ओमायद घराण्यांतून निघून आबासद घराण्यांत खिलाफत स्थिर होईपर्यंत मधलीं वर्षे बरींच धामधुमीचीं गेलीं. तेवढ्या अवधींत स्पेनचा सुभेदार अबदुल रहिमान स्वतंत्र झाला; व त्यानें ओमा-यद घराण्यांतील एका पुरुषाची स्पेनमध्येंच खिलाफतीवर स्थापना केली. इकडे मन्सूर यानें हाशिमियांतून आपली राजधानी उठवून ती इ. स. ७८२ मध्यें तैग्रीस नदीचे काठीं बगदाद नामक नवीन शहर वसवून तेथें नेली.

मन्सूर मेल्यावर त्याचा मुलगा महमद बिन मन्सूर गादीवर बसला. त्यानें स्वत: मक्केची यात्रा केली. बगदादपासून मक्केपर्यंत सडक बांधली, अन्नछत्रें घातलीं, नळ आणिले, धर्मशाळा बांधिल्या व सडकेनें मैलांचे दगडहि बसविले. महमदाचा मुलगा हरून बापाहून शूर निघून त्यानें ग्रीक बादशहा कॉन्स्टांटिनोपल याचा पराभव केला. महमदामागून त्याचा पहिला मुलगा मुसा व मुसामागून दुसरा मुलगा हरून गादीवर आला. हरून यानें अल् रशीद म्हणजे सरळ, प्रामाणिक अशी पदवी

धारण केली. अरेबियन नाईट्समधील प्रख्यात हरून अल् रशीद हाच होय. हरून इ. स. ७८६ मध्यें गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दींत आबासद राज्य फारच भरभराटीस पोंचलें. त्याच्या वैभवाची कल्पना पुढील वर्णन वाचून येणारी आहे. त्याच्या दरबारीं मंडळी आदबशीर, चैनी आणि श्रीमान् होती. बगदाद शहरीं दांडगा व्यापार चालत असून त्या अवाढव्य शहराच्या मध्यभागीं खलिफाचा किल्ला होता. त्यांत सरकारी कचेऱ्या, शाळा व पाठशाळा चालू असत. जगाच्या निरनिराळ्या भागांतून तत्त्ववेत्ते, पंडित, धर्मज्ञ आणि कवि राजदरबारीं येत व त्यांचा बहुमान केला जाई. सरहद्दींच्या बंदोबस्ताचें काम सैन्यावर सोपविलें होतें. हें राज्य सीरियापासून एडनपर्यंत व मिसरपासून मध्य आशियापर्यंत पसरलें होतें. सरकारी नोकरींत मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी, मूर्तिपूजक या सर्वांचा समावेश झाला होता.सर्वत्र समृद्धि नांदत होती.रोगराईचा परिहार करण्यास सरकारी दवाखाने व सरकारी हकीम तत्पर होते. आरबांच्या उठवळ राज्यपद्धतीस अर्धचंद्र मिळून फार्सी व रोमन धर्तीवर राज्ययंत्राची रचना करण्यांत आली होती. टपालाची नेआण उंट करीत. जमाखर्च, न्यायमनसुबा, लष्कर वगैरे खातीं लायख दिवाणांच्या हातीं देऊन हरून सुखानें रहात होता. हरूनचें अन्तःपुर दासदासी,खोजे, खुषमस्करे, कवी, व बुटबैंगण यांनीं वेढून गेलें होतें. देशोदेशीं स्वाऱ्या करून आणिलेल्या लुटीवर राजधानी संपन्न झालीच होती.पण त्या संपन्नतेस व्यापारानें खेचून आणिलेल्या सुवर्णाची गंगा मिळाल्यामुळें बगदादच्या ऐश्वर्यास सीमाच उरली नव्हती.बिझांटाईन साम्राज्याशीं आबासद साम्राज्याच्या सदा कटकटी होत व त्यामुळें आबासद साम्राज्यांत त्यांत गुलामांचा व द्रव्याचा एकसारखा पुरवठा होतच असे. या विविध प्रकारच्या संपत्तीवर पोसलेला व्यापारी, जमीनदार, सरदार, सावकार, मानकरी, आणि दरबारी यांचा वर्ग हें साम्राज्याचें जसें भूषण तसें सामर्थ्यहि होऊन बसलें. त्यांच्या आश्रयानें विद्या, कलाकौशल्य, तत्त्वज्ञान यांची अभिवृद्धि होऊन उत्तुंग प्रासादांनीं बगदादच्या वैभवाची वर्दी देवलोकींहि पोंचविली.

कुराणाचा कडवा अभिमान आणि आरबांची साधी रहाणी हे

गुण हरूनच्या ठिकाणीं नामशेष झाले होते. हरून स्वतः मद्यपी होता
आणि तो मोठ्या मिजासीनें रहात होता. महंमद पैगंबराच्या पश्चात्
पावणेदोनशें वर्षांच्या अवधींत त्याच्या प्रतिनिधिपदावर अधिष्ठित झालेल्या
खालिफांचा धर्मदृष्ट्या जर एवढा अधःपात, तर सामान्य प्रजेची गोष्ट
बोलावयासच नको. हरून ८०९ मध्यें मरण पावला. त्याच्याच राजवटींत
सेल्जुक तुर्कांस पलटणींत ठेवण्याचा प्रघात पडला. हरूनची परंपरा त्याचा
पुत्र ममून यानें उत्तम प्रकारें पुढें चालविली. ज्योतिष, गणित, वैद्यक व
तत्त्वज्ञान या विषयांचें भाषांतर ग्रीक भाषेंतून आरबींत करविण्यात आलें.
पृथ्वीचा घेर मोजण्याचें काम त्यानें दोघा गणितज्ञांवर सोपविलें.ममूनचा
शेवट सन ८३३ त झाला.

ममूनच्या मागून अधिकारसूत्रें मोटाझिमकडे गेलीं. हरूनच्या
वेळीं तुर्कांचा पलटणींत प्रवेश झालाच होता. त्या पुढील काळांत तुर्कांचा
सुळसुळाट वाढत जाऊन मोटाझिमनें आत्मसंरक्षणार्थ त्यांचा पहाराच
ठेवला. या गारद्यांचें वर्चस्व इतकें वाढलें कीं, सर्व राज्यकारभार त्यांच्याच
तंत्रानें चालू लागला. मोटाझिम ८४१ सालीं दिवंगत झाल्यामुळें खिला-
फतीची मालकी मोटा वकील याजकडे आली. मोटा वकीलास अलीचा
मुलगा हुसेन याचा देव्हारा सहन होईना. त्यानें करबाला येथील हुसेन-
च्या कबरींचें दर्शन घ्यावयास येणाऱ्या शिया यात्रेकरूंस बंदी केली.
अशा कृत्यांनीं अप्रिय होत चाललेल्या या खलिफाचा त्यानेंच वाढविले.
त्या तुर्की सैन्यानें खून केला. यापुढील आबासद घराण्यांतील पुरुष
नामधारीच होते. ९३२ च्या सुमारास मोक्तापीर खलीफ असतां महं-
मदाची मुलगी व अलीची बायको फतिमा हिचा वंशज म्हणविणारा ओबे-
दुल्ला महादी यानें मिसर देशांत खिलाफत स्थापन केली. आबासद खलि-
फांनीं हुसेनच्या कबरीची केलेली मानखंडना सहन न झाल्यामुळेंच हुसे-
नच्या अनुयायांस वरीलप्रमाणें खिलाफतीचा सवता सुभा स्थापणें उचित
वाटलें व ही खिलाफत पुढें तीनशें वर्षें टिकून राहिली.धर्मयुद्धांत साऱ्या युरोप
खंडांत स्वपराक्रमानें सर्वतोमुखीं झालेला सालादिन यानें ईजिप्त देश फाति-
मेच्या वंशजापासून ११७१ चे सुमारास जिंकून घेतला. त्यामुळें बगदादच्या

खलिफास ईजिप्त पुन्हा मानूं लागला. सन १२५८ त जिंगीजखानानें बगदाद-वर स्वारी करून तें जाळून टाकलें व तेथील खलिफा मोटा अझीम यास तुरुंगांत ठेवलें. अबासद घराण्याचा अशा शोचनीय रीतीनें शेवट झाल्यावर आबासद घराण्यांतील एका पुरुषानें खिलाफतीसाठीं ईजिप्त-मधील केरो शहरीं फिरून निवाऱ्याची जागा पाहिली. तुर्कांच्या स्वारीपर्यंत खिलाफत केरोसच राहिली. सेलीम हा तुर्कांत फार प्रसिद्ध सुलतान होऊन गेला. हा सुनी पंथाचा आधारस्तंभ समजला जात होता. शिया पंथाच्या ताब्यांत गेलेली खिलाफत त्यास सहन होणें शक्य नसल्यामुळें त्यानें सीरिया, आरबस्तान व ईजिप्त हे देश एकामागून एक जिंकून केरो येथील खिलाफत बुडविली व महंमद पैगंबराचें निशाण, झगा व दाढी हिरावून नेऊन खिलाफतीचे अधिकार आपल्या हातीं घेतले. ही गोष्ट १५१७ मध्यें घडली. आणि १५१७ पासून १९२४ पर्यंत म्हणजे चारशेंसात वर्षें खिलाफतीचे अधिकार उस्मानच्या घराण्यांत टिकून राहिले.

अशा रीतीनें महमदाच्या मृत्यूपासून पुढील सुमारें तेराशें वर्षांत खिलाफतीचीं अनेक स्थित्यंतरें पहावयास सांपडतात. खिलाफतीस दमास्कस सव्वाशें वर्षेंच मानवलें, पण तेवढ्याच अल्प मुदतींत आरबांचा धार्मिक आवेश, एकजूट, मुलूखगिरीची हाव आणि द्रव्यलालसा आणि उलटपक्षीं मुसलमानेतरांतील फाटाफूट व शैथिल्य यामुळें इस्लामाचा डंका ग्रीस, फ्रान्स, मोरोक्को, खोकंद व हिंदुस्थान येथपर्यंत गाजला. दमास्कसच्या ओमायद घराण्यापेक्षां बगदादच्या आबासद घराण्याच्या हातांत खिलाफत फार वर्षें खेळली. आरब मूळचा आडदांड, कणखर, तंटेखोर, लुटारू व रानटी; पण बगदाद सभोंवारच्या सुपीक प्रदेशांत त्याच्या अंगचा रानवटपणा व इतर दोष बरेच मोडून त्याच्या ठिकाणीं माणुसकी उद्भवली. त्यास राज्यव्यवस्था सुचली आणि विद्या व कलाकौशल्य यांची चाड वाटूं लागली. आरबी भाषेस प्राप्त झालेल्या श्रीमंतीचें, अभिजातपणाचें व गौरवाचें पुष्कळसें श्रेय बगदाद शहरासच दिलें पाहिजे. ज्या नगराच्या वास्तूनें व आसमंतांतील भागानें, खाल्डियन, बाबिलोनियन व असीरियन संस्कृती यांचें जनन व मरण पाहिलें त्याच नगरांत आरब संस्कृतिहि ऊर्जित दशेस यावी हें स्वाभाविक होय. संस्कृतीस फाजील तलमपणा आला, म्हणजे त्यांतून

उद्धवणारें मरूपणाचें संकट अपरिहार्य होतें आणि याचमुळें जंगीजखानाच्या वज्राघाताखालीं तिचे तुकडे उडाले. आरब संस्कृतीनें त्यानंतर कधींहि मान वर करून पाहिलें नाहीं. बगदाद मागें पडल्यावर इस्लामी जगांत कॉन्स्टांटिनोपल शहराचें नशीब उघडलें व तेथील यशोदुंदुभि केरोमधील खिलाफतीच्या कानीं येतांच तिनें कॉन्स्टांटिनोपलची वाट धरली. कॉन्स्टांटिनोपलची तुर्की संस्कृति बगदाद व दमास्कस येथील आरब संस्कृती-हून अगदींच भिन्न होय.

सुमारें तीनशें वर्षें आरब मुलूखगिरीवर गुंतले असतांहि त्यांस आपल्या भांडखोर स्वभावाचें फारसें विस्मरण पडलें नाहीं. आरबस्थानांत ऐहिक वैभव त्यांच्या नशिबीं नव्हतें, तें दमास्कस व बगदाद या शहरीं किंवा सीरिया व मेसापोटेमिया या प्रांतीं कायमचें ठाणें दिल्यावर त्यांच्या सेवेस सादर झालें. दमास्कसचें धर्मवेडहि बगदादास राहिलें नाहीं. वैभवाच्या नादानें त्यांस चैन सुचली. परधर्मीय खिस्ती प्रजेशीं गांठ पडून त्यांच्या साहाय्यावांचून राज्यशकट हांकणें कठीण झाल्यामुळें परधर्मद्वेषाची तीव्रता पुष्कळच मावळली व स्वधर्मवेड थंडावलें. अशा परिस्थितींत स्वधर्मप्रसाराचें प्रमुख कार्य बहुतेक बंद पडून खलीफ हे निवळ राजे बनले.

उलेमा—

महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर खिलाफतीचे अधिकार त्याच्या शिष्यवृंदाच्या हातांतून हिंडत हिंडत प्रथम दमास्कसचें ओमाइद घराण्याकडे व त्यामागून बगदादच्या आबासद घरण्याकडे चालत गेले. मुसलमानी धर्मांत खलिफा म्हणजे खुद्द पैगंबराचा प्रातिनिधि असल्यामुळें धर्मशास्त्र आणि न्याय या कामीं निर्णय सांगण्याची जबाबदारी खलिफावरच राहिली. परंतु जग जिंकण्याच्या नादीं लागलेल्या खलिफास हीं कामें करण्यास फुरसत मिळेनाशीं झाल्यावर तीं दुसऱ्या कोणा तरी लायक वर्गाच्या हवालीं करणें त्यांस भाग पडलें.या सुमारास कुराणावर बऱ्याच टीका रचल्या गेल्या व वेगवेगळ्या टीकाकारांचे वेगवेगळे सांप्रदायहि निर्माण झाले. अशा स्थितींत सर्व टीका समजून घेऊन कुराणाचा अर्थ लावण्यास व धर्मशास्त्राचा विचार करण्यास विद्वानांची गरज भासूं लागली. उलेमा हा असाच

विद्वानांचा वर्ग होय. अलीम हा आरबी एकवचनी शब्द असून त्यापासून अनेकवचनी शब्द उलेमा होतो. उलेमा म्हणजे विद्वान किंवा ज्ञाता. शास्त्र म्हणजे कायदा हा मुसलमान धर्माचाच एक भाग समजतात. हा कायदा सांगणें व तदनुरूप न्याय देणें हें काम खालिफानें उलेमांकडे वाटून दिलें. सर्व मुसलमानी रियासतींत विद्वान् वर्ग उलेमांचा; आणि तो वर्ग शास्त्रार्थ सांगण्यांत व न्याय देण्यांत अधिकारी. अर्थात् त्यांचें प्रस्थ फार माजलें. राज्यांत कोणतीहि नवी व महत्त्वाची गोष्ट करावयाची झाल्यास त्यास उलेमांचा फतवा लागूं लागला.

तुर्की सुलतानांच्या कारकीर्दींत हे उलेमा बरेच डोईजड झाले. तेव्हां दुसऱ्या महमदानें १४५३ सालीं कॉन्स्टांटिनोपल सर केल्यावर उलेमांची अरेरावी कमी करण्याकरितां त्यांच्या अधिकाराची विभागणी केली. त्यानें धर्मखात्यापासून न्यायखातें वेगळें करून त्यांवर निरनिराळ्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली. पहिल्या सुलेमानाच्या वेळेस न्यायाधीश व कायदा सांगणाऱ्या इसमांचा न्यायखात्यांत व धर्मविधि करणाऱ्या इसमांचा धर्मखात्यांत समावेश झाला. हे अधिकार जास्त मिळण्याची लायखी ज्या शिक्षणानें यावयाची, त्याचा क्रम पुढीलप्रमाणें ठरला.

शिक्षणाची व्यवस्था मशिदीस जोडून असावयाची. आणि या पद्धतीनें प्राथमिक शिक्षण खेडेगांवांतील मकतबमध्यें मिळत असे. मकतबपुढील पायरी मद्रेसांची. मद्रेसा म्हणजे पाठशाळा आणि त्या मोठमोठ्या मशिदींच्या आश्रयानें असावयाच्या. न्याय, व्याकरण, अलंकार या शास्त्रांचें आणि कुराण या धर्मग्रंथाचें अध्ययन पाठशाळेंत होतें. मद्रेसांत अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चरितार्थास लागणारी भातरोटी मशिदीकडून पुरविली जाते. वरील विषयांचा अभ्यास संपविण्यास पुरें एक तप मोडतें. हा अभ्यास ज्यांचा पुरा झाला त्यांस शिक्षक, नायब म्हणजे आसि. जज्ज किंवा इमाम यांच्या जागा मिळत. अभ्यास संपवून जे सदर विषयाच्या परीक्षेंत उत्तीर्ण होतात ते उलेमा पदास पोचत किंवा काजीपद पावतात. यापुढें सात वर्षें अध्ययन करणारा व कुराणावरील टीकाही वाचणारा मुदर्री, मुफ्ती किंवा आचार्य अथवा प्रोफेसर होतो. आणखी दहा वर्षांच्या अध्ययनानें मुला मक्केद ही पदवी त्यास प्राप्त होतें मक्का.

व मादिना येथील शेरीफची जागा किंवा शेख उल् इस्लाम ही जागा त्यास मिळते. शेख उल् इस्लाम याची योग्यता मुख्य वजीराच्या खालोखाल असते. उलेमाचा फतवा त्याच्याच मार्फत निघतो व त्यास ख्रिस्ती धर्मांतील पोपच्या आज्ञेइतका मान मिळतो.

शेख हा धर्मकृत्यें करणारांचा वर्ग. त्याचे दोन विभाग. एकाचें नांव शेख व दुसऱ्याचें खतीब शेख. हे दुपारची प्रार्थना उरकल्यावर धार्मिक प्रवचन सांगतात. खतीब शुक्रवारीं खुतबा म्हणतात आणि लाधा इसम रोजचा नमाज पढतो. ह्या संस्था चारशें वर्षांपूर्वीं जशा स्थापन झाल्या त्याच स्वरूपांत आजहि अस्तित्वांत आहेत. नवीन प्रकारचें शिक्षण तुर्कस्थानांत प्रचलित करण्यास यांचाच काय तो मुख्य विरोध.

तुर्कांचें श्रेष्ठत्व

साऱ्या जगांतील लोकवस्तीची गणना करणें सामान्यतः कठीण खरेंच; तरी पण तिची ठोकळ कल्पना येण्याजोगे आंकडे पाश्चात्यांस माहीत नाहींत असें नाहीं. जगांत एकंदर वस्ती अजमासें १ अब्ज ७७ कोटि असून त्यांत गोरे लोक सत्तर कोटि आहेत व ते सर्व बहुधा किरिस्ताव आहेत. त्याखेरीज युरोप व अमेरिका याबाहेरील जगांत मिशनऱ्यांच्या कावेबाजीस बळी पडलेले लोक एक कोटि असतील असें समजण्यास हरकत नाहीं. एकंदर मनुष्य जातींतून ख्रिस्ती समाज वजा जातां इतर धर्मानुयायांकरितां एका अब्जाहूनहि कमीच वस्ती उरते. यांतील चीन, जपान, ब्रम्हदेश, तिबेट, सीलोन, सयाम इत्यादि देशांतील बौद्ध धर्मीयांच्या वांट्यास पन्नास कोटि लोकसंख्या देणें जरूर आहे. त्या खेरीज रानटी स्थितींतील अधर्मीय लोकांस हिशेबांत न धरल्यास सुमारें चाळीस कोटि वस्ती हिंदु व मुसलमान या धर्मानुयायांकरितां निराळी काढून ठेवण्यास अडचण नाहीं. उरलेल्या चाळीस कोटींत हिंदु मुसलमानांचा हिस्सा समसमान आहे हें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटेल.

ब्रिटिश साम्राज्य, त्याजवरील प्रभुत्वास भिऊन, ब्रिटिशांचें म्हणावयाचें इतकेंच. नाहींपेक्षां लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केल्यास सदर साम्राज्य हिंदूंचें व त्या खालोखाल मुसलमानांचें आहे असेंच म्हणावें लागेल. जगांत इस्लामानु-

यायी १८कोटि८९ लक्ष ३१ हजार असून ते रशिया, आफ्रिका व यूरोप या त्रिखंड पृथ्वींत पसरले आहेत.या अठराएकोणीस कोटींपैकीं ९कोटी ६२ लक्ष ३७ हजार म्हणजे जगांतील निम्मे मुसलमान एकट्या ब्रिटिश साम्राज्याच्या आश्रयानें राहिले आहेत. ब्रिटिश साम्राज्यानंतर संख्येच्या प्रमाणानें तुर्की साम्राज्यांत १ कोटि ८० लक्ष मुसलमान जमा होतात आणि फ्रेंच साम्राज्याच्या छत्राखालीं १ कोटि २८ लक्ष जातात. खंडापरत्वें तुलना करतां मुसलमानांची सर्वांत मोठी संख्या आशिया खंडांत असून त्याखालीं आफ्रिका व यूरोप यांचा अनुक्रम लागतो.खंडांत आशियाखंड, देशांत हिंदुस्थान देश आणि राज्यांत ब्रिटिश राज्य मुसलमानांचें आगर होय. हिंदुस्थानांत ६ कोटि ३० लक्ष मुसलमान तर तुर्कस्थानांत त्यांची संख्या १ कोटि ८० लक्ष. एवढी मोठी मुसलमान वस्ती हिंदुस्थानांत असतां हिंदुस्थान हा देश प्रामुख्यानें हिंदूंचा आणि इतकी थोडी मुसलमान वस्ती तुर्कस्थानांत असतां तुर्कस्थान मात्र मुसलमानांचा; इतकेंच नव्हे, तर साऱ्या इस्लामी देशांत मुसलमानी वस्तीच्या मानानें तुर्कस्थान हाच पहिल्या प्रतीचा इस्लामी देश ठरतो. यावरून इस्लामी देश किती लहान व त्यांतील लोकवस्ती किती तरी थोडी याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल.

बहुतेक इस्लामी देश पारतंत्र्यपंकांत रुतलेले व मागासलेले आहेत. त्यांत नांव घेण्यासारखा स्वतंत्र देश म्हटला म्हणजे तुर्कस्थानच होय. व त्यामागून उल्लेख करावयाचाच तर इराण व अफगाणिस्तान यांचाच करावा लागेल. इराणांतलि मुसलमानांची संख्या अवघी ९३ लक्ष ५० हजार असून अफगाणिस्तानांत अफगाण मुसलमान सारे ५० लक्षच आहेत. हे आंकडे मुसलमानांचें जगांतील बल उत्तम प्रकारें दर्शवितात. हिंदुस्थानांत मुसलमानांची वस्ती एक तृतीयांशाइतकी प्रचंड असल्यानें हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर इस्लामी सृष्टींत अग्रेसरत्वाचा मान हिंदुस्थानच्याच वांट्यास येईल आणि हिंदुस्थानांतील मुसलमानांस आपलें राजकीय धोरण हिंदूंस सोडून ठरवितां येणार नसल्यानें हिंदु व मुसलमान या दोन्ही धर्मांचीं म्हणजे जगांतील है मानवजातींचीं सूत्रें हिंदुस्थानांतूनच हालूं लागतील. परंतु हिंदुस्थान बंधमुक्त होईपर्यंत मुसलमा-

नांचें नेतृत्व एकट्या तुर्कस्थानाकडेच राहाणार हें ओघानेंच येतें. सांप्रत
मुसलमानांत एकट्या तुर्कस्थानानेंच आपलें डोकें काढलेलें दिसत
असून त्याचें अनुकरण इराण व अफगाणिस्तान करतील असा अंदाज
आहे. परंतु ह्या तिन्ही देशांची वस्ती चार कोटिहि नाहीं आणि परतंत्र
मुसलमान सुमारें चौदा कोटि म्हणजे साडेतीन पट असल्यानें तुर्क-
स्थानास आत्मोन्नति करून घेण्यास त्यांजकडून फारच थोडें पाठबळ
मिळेल आणि उलट पक्षीं एखाद्यास तुर्कस्थानानें पारतंत्र्यपंकांतून सोड-
वावयाचें म्हटल्यास तुर्कस्थानचें सामर्थ्य तोटकें पडेल. तथापि बहुतेक
सर्व इस्लामी राष्ट्रांच्या कपाळीं पाश्चात्य राष्ट्रांनींच परतंत्रता आणिली
आहे. आणि त्या सर्वांत पाश्चात्यांच्या ऐन तोंडावर असण्याची पाळी
एकट्या तुर्कस्थानावर येऊन तो महायुद्धाच्या अग्नींतून नुकताच तावून
सुलाखून बाहेरहि पडला आहे. तेव्हां त्याचाच कित्ता डोळ्यापुढें ठेवून
इतर इस्लामी देश प्रगतीच्या मार्गास लागतील यांत शंका नाहीं. स्वतंत्र
इस्लामी देशांपैकीं इराण हा एकच देश शियया पंथाचा असल्यामुळें
त्याचा सुनी पंथाचा जुना हाडवैरी जो तुर्कस्थान आणि अफगाणिस्थान
यांजबरोबर त्याची जूट जमेल कीं नाहीं, याविषयीं संशय वाटतो. तरी
पण युरोपियन राजकारणाचा वाण नसला तरी गुण तुर्कस्थानास लागून
त्यानें खलीफा अबदुल मजीद याच्या उचलबांगडीनें राजकीय उन्नतीच्या
आड धर्माभिमान येत असेल तर त्यास आपण गौणच समजतों, असें
तुर्कस्थानानें आपल्या कृतीनेंच जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहे.
तुर्कस्थानांत खेळूं लागलेलें हेंच वारें त्याच्या शेजारीं पसरलेल्या सर्व
मुसलमानी देशांतून वाहणार हें निश्चित होय. आणि पाश्चिमात्य युरो-
पियन राष्ट्रांपासून आत्मरक्षण करून घेण्याची जरूरी त्या सर्वांस सारखीच
असल्यामुळें त्यांची जूट लवकरच जमल्यावांचून रहाणार नाहीं. ईजिप्त,
सुदान, एडन, झांजिबार, ॲबिसीनिया, आरबस्तान, इराक, हे प्रमुख देश
इंग्लिशांच्या कबजांत सांपडले आहेत. मोरोक्को,ट्यूनिस आलजेरिया यांस
फ्रेंचांनीं आपल्या जबड्यांत धरलें आहे, आणि तुर्कांची जन्मभूमि असा
मध्य आशियांतील मुसलमानी प्रदेश रशियाच्या स्वाधीन झाला आहे.
आज हे सर्व देश कमी अधिक प्रमाणांत परतंत्र आहेत, म्हणून त्यांस स्वतं-

त्ताहि त्या मानानें आगेमागेंच मिळणार. स्वातंत्र्यरवीचे आनंददायक किरण आतां कोठें तुर्कस्थानच्या उदयाचलावर पसरत आहेत. ते उत्तरोत्तर जसजसे अधिकाधिक प्रखरता धारण करतील, तसतसा या सत्कार्यास तुर्कांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष किती उपयोग होईल याचा प्रत्यय सहजच येईल.

———

प्रकरण २ रें

समाजरचना

बारा जाती—

तुर्की साम्राज्यांत कमींत कमी बारा जातींचे लोक रहात असत. या जाती, देश, धर्म व वंश यांवरून पडल्या आहेत. मुसलमान, ख्रिस्ती व यहुदी हे तीन प्रमुख धर्म असले, तरी त्यांपैकीं प्रत्येकांत पोटभेद आहेत आणि धार्मिक पोटभेदास देशांनीं गुणल्यास तुर्कीसाम्राज्य हे आठरा न म्हटलें तरी बारा धान्यांचें कोडबोळें होतें असें दृष्टोत्पत्तीस येतें. सर्वांत मोठी संख्या तुर्कांची असून त्याखालीं आर्मीनियन, कुर्द, ग्रीक, सीरियन, आरब, सरकॅशियन, तुर्कोमन, यहुदी, तार्तार व जिप्सी यांचा क्रम लागतो. तुर्क एक कोटि, आर्मानियन २० लक्ष, कुर्द १२॥ लक्ष, ग्रीक १० लक्ष, सीरियन १० लक्ष, आरब ७ लक्ष, सरकॅशियन ३॥ लक्ष, तुर्कोमन ९० हजार, यहुदी ६० हजार व तार्तार आणि जिप्सी मिळून ५० हजार अशा लहान मोठ्या जमातींनीं सर्व साम्राज्य व्यापलें होतें. कॉन्स्टांटिनोपल शहरीं या सर्व जाती आजहि पहावयास सांपडतात. पण नवख्या माणसानें रस्त्या-नें जाणाऱ्या येणाऱ्या हजारो लोकांकडे सहज दृष्टि फेकली तर त्याच्या लक्षांत वरील फरक चटकन् येण्यासारखा नाहीं. पण थोड्या दिवसांच्या परिचयानें तो समजून येतो आणि विशेषतः कॉन्स्टांटिनोपल, स्मरना, सॅलोनिका या शहरांच्या बाहेर पडून खेड्यापाड्यांतून वावरणारास हा भेद अधिकच उमगतो.

तुर्क—

तुर्की साम्राज्यसंस्थापक उस्मान, त्याचे अनुयायी उस्मानअली, व त्यांत मुसलमानी धर्म स्वीकारून पूर्वीं एकरूप होऊन गेलेले देशज यांचा तुर्कांत समावेश होतो. तुर्क लोक मूळ मोंगोलियन जातीचे; पण त्यांचा शरीरसंबंध अनेक जातींशीं झाला असल्यामुळें सध्यां बनलेला परिपाक सौंदर्यदृष्ट्या मधुर आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. गुलामांची चाल तुर्कस्थानांत कित्येक शतकांपासून आहे व ती अद्यापि निर्मूल झाली आहे, असें नाहीं. ग्रीक, रुमानियन, बल्गेरियन, व सर्व्हियन या जातींच्या गौर-

काय स्त्रियांस लढाईत लुटीप्रमाणें मिळवून लुटींतील संपत्तीप्रमाणें सैनिकांत त्यांची वांटणी झाली असल्यामुळें पांश्चात्य व पौर्वात्य रक्त तुर्कांच्या धमन्यांतून अनेक शतकें मिसळून गेलें आहे. त्यांतच गोऱ्या व सुरेख सरकॅशियन स्त्रियांनीं वैचित्र्य आणून तुर्कांची सांप्रतची जात निर्माण केली आहे. निम्याहून अधिक तुर्क अनातोलियांत, पंधरा लक्ष आर्मीनियांत व कुर्दिस्तानांत, साडेसहालक्ष मेसापोटेमियांत व बाबिलोनियांत, पांच लक्ष सीरियांत व पॅलेस्ताईनमध्यें आणि बाकीचे युरोप व हेदजझमध्यें जाऊन राहिले आहेत. सारांश तुर्कांचा मुख्य बुडखा अनातोलियांत पण त्याच्या लहान मोठ्या शाखा साम्राज्यभर विस्तारल्या आहेत. तुर्क हे राज्यकर्ते असल्यामुळें त्यांचा अशा रीतीनें सर्वत्र संचार व्हावा यांत आश्चर्यहि नाहीं.

आर्मीनियन—

आर्मीनियन लोक इंडो आर्यन असून ते व इराणी लोक एकाच जातीचे आहेत. त्यांचें फार प्राचीन काळीं आर्मीनियांत स्वतंत्र राज्य होतें, परंतु त्यांजवर मध्य आशियांतून मोंगल व मिसर देशांतून केरोचे सुलतान यांच्या स्वाऱ्या होऊन आर्मीनियनांचें राज्य लयास गेलें. त्यानंतर तुर्कांनीं त्यांस जिंकलें व तेव्हांपासून तुर्कांच्याच छत्राखालीं ते मान वाकवून रहात आले. फार दिवस पारतंत्र्यांत काढल्यामुळें स्वाभिमानास अंचवून त्यांनी हळू हळू तुर्की भाषा, तुर्की पेहेराव व तुर्की रिवाज यांचा अंगीकार केला. तरी ते आपणांस स्वतंत्र राष्ट्र समजतात आणि त्यांचा वेगळा देश व वेगळा धर्म यांनीं त्यांच्या ठिकाणीं पृथक्पणाची जाणीव जिवंत राखली आहे. मुसलमानांखेरीज कोणाहि परधर्मीयांचा विटाळ आपल्या सेनेस होऊं द्यावयाचा नाहीं, या तुर्क राज्यकर्त्यांच्या धोरणामुळें ख्रिस्ती आर्मीनियनांचें क्षात्रतेज मावळून शतकें लोटलीं. या योगानें चातुर्वर्ण्य पद्धतीपैकीं आर्मीनियनांत आज तीनच वर्ग शाबूद आहेत. पुरोहित, व्यापारी व मजूर. या मुख्य त्रैवर्णिकांशिवाय व्यवसायभेदांमुळें डॉक्टर, वकील, कारकून, सराफ, कारागीर, असे अनेक वर्ग निर्माण झाले आहेत. या सर्वांत सराफ मोठे धनिक असून त्यांचें सरकार-दरबारीं वजनहि मोठें आहे. इस्लामी धर्मानें व्याजबट्टयास बंदी केली असल्यानें आर्मीनियन व

ग्रीक या खिस्ती जातीस तुर्कस्थानांत सावकारीचा ताम्रपटच मिळाल्या-
सारखा झाला आहे. त्यांनीं मुसलमान व खिस्ती शेतकऱ्यांस कर्ज देऊन
व त्यांच्या जमीनी गहाण ठेवून घेऊन भिकेस लावलें आहे. दाम हा
त्यांचा देव आहे आणि तो साध्य व्हावा व सुरक्षित रहावा यासाठीं ते
अधिकाऱ्यांशीं व सर्वांशीं आर्जवानें, शांततेनें व नमून वागतात. उद्योग-
प्रियता व नियमितपणा यांबद्दल त्यांची मोठी ख्याति आहे. साऱ्या जगांत
आर्मीनियनांची लोकसंख्या चाळीस लाख असून तुर्कस्थानच्या ताब्यांतील
आर्मीनियांत तेवीस लाख होती. व्यापारधंद्याच्या निमित्तानें ते रुमेलिया,
रशिया, हिंदुस्थान, इराण इत्यादि दूर देशांतून जाऊन राहिले आहेत.
शहरांतील मोहजालांत अडकून बऱ्याच आर्मीनियनांच्या उपजत गुणांस
कीड लागली असली, तरी खेड्यापाड्यांतून रहाणारांचे गुण अव्यंग स्वरू-
पांत आहेत. आर्मीनियन पृथ्वीच्या पाठीवर घरदार सोडून कोठेंहि जावो
तो आपला धर्म सोडणार नाहीं हें पक्कें समजावें. आर्मीनियनांच्या वरील
वर्णनावरून कोणासहि आपल्या देशांतील मारवाडी समाजाची आठवण
झाल्यावांचून राहणार नाहीं.

ग्रीक—

ग्रीक लोक मूळचे ग्रीस देशांतील रहिवाशी; तरी पण ग्रीस देश
सोडून व्यापाराच्या निमित्तानें व राज्यकर्ते या नात्यानें तुर्कांच्या पूर्वीं-
पासून ते रूममध्यें घर करून राहिले आहेत. रूममधील मूळचे आशिया-
टिक खिस्ती व हे युरोपियन खिस्ती यांचा शरीरसंबंध झाला असल्यामुळें
येथील ग्रीकांस आशियाटिक समजण्यास चिंता नाहीं. त्यांचा व्याप वाढत
जाऊन ते आतां मोसल, बगदाद व इराणी आखात येथपर्यंत पोंचले आहेत.
ग्रीकांची तुर्कस्थानांत व विशेषत: रूममध्यें(आशिया मायनरमध्यें)दहा लाख
संख्या असून त्यांचा मुख्य धंदा शेतकीचा आहे.शेतकीच्या खालोखाल बरेच
ग्रीक व्यापारांतहि शिरले आहेत. वकील व डॉक्टर यांचा पेशा पत्करलेले-
हि कांहीं ग्रीक आढळतात. परंतु रूममधील वकील किंवा वाणी यांची
दुकानदारी ग्रीकांनींच बळकावली आहे. पेढयांच्या धंद्यांत तर आपल्या
सर्व देशबंधूवर त्यांनीं ताण केली असून इस्तंबूलमध्यें तद्देशीयांच्या अशा

फक्त ग्रीक लोकांनींच बँका चालविल्या आहेत. दर्यावरून होणारा व्यापार पूर्वींपासून ग्रीकांनींच हस्तगत केला असल्यानें काळा समुद्र, बास्फोरस, मार्मोरा, दार्दानेलीस, भूमध्य समुद्र यांचा किनारा ग्रीकांनीं वेढला आहे. आर्मीनियनांपेक्षां ते बुद्धिमत्तेंत, कर्तबगारींत, व्यवहारचातुर्यांत व संपन्नतेंत श्रेष्ठ असल्यामुळें त्यांची तुलना इकडील गुजर किंवा भाटिया जातींशीं केल्यास शोभण्यासारखी आहे. ग्रीक व तुर्क या उभयतांचा रूम हा स्वदेश एकच; पण धर्म व परंपरा भिन्न या योगानें त्यांजमध्यें एक प्रकारची चुरस व मत्सर दृष्टीस पडतो.

कुर्द—

कुर्द संख्येनें अधिक, पण राजकीय व सामाजिक दृष्ट्या ग्रीक लोकांपेक्षां कमी दर्जाचे ठरतात. मनुष्याची जन्मसिद्ध स्वतंत्रवृत्ति कुर्दांनीं कायम राखली आहे. ते आर्य वंशांतील असून असीरिया व मेसापोटेमिया यांत पूर्वी राहिलेल्या पार्थियन लोकांचे वंशज असावे असें समजतात. हे कुर्दिस्थानांत म्हणजे मोसलच्या आसपास रहातात. जगाच्या प्रथमावस्थेंत ज्या प्रकारचें स्वातंत्र्य मनुष्य प्राणी भोगीत असेल तें स्वतंत्र्य कुर्दांनीं आपल्या धनुर्विद्येच्या जोरावर कोणासहि हिरावूं दिलें नाहीं. त्यांनीं तुर्कस्थानच्या सुलतानास कधीं जुमानलें नाहीं किंवा इराणच्या शहासहि मानलें नाहीं. त्यांची मान फक्त त्यांच्या जातीच्या बेग नामक नाइकाच्याच पुढें वांकते. कुर्द मोठा देखणा, मध्यम उंचीचा, नीटस अंगलोटाचा, काळ्या डोळ्याचा, अखूड दाढीचा व लांब मिशांचा असतो. त्याची रहाणी अगदीं साधी. धनुष्यबाण सज्ज करून व ढालतलवार लटकावून गुरांचे व मेंढरांचे कळप चारीत तो तहत इराणी आखातहि पाहून येतो. वनविहार व धनगरी स्वच्छंदीपणाचें वेड त्याच्या स्वभावास आवडतें. कुर्दांची भाषा कुर्द असून तिचें फार्शी भाषेशीं पुष्कळच साम्य आहे.

सीरियन—

सीरियांतील मूळचे रहिवाशी यहुदी व ख्रिस्ती. महमद पैगंबरानंतर दमास्कस येथें मुआबिया घराण्यांतील आरब सुभेदार अंमल करावयास आले असतां आरबांनीं बऱ्याच ख्रिस्त्यांस आणि मूर्तिपूजकांस बाटवून इस्लामी धर्माची दीक्षा दिली. कालान्तरानें सीरियन व आरब

सीरियन यांच्या शरीराच्या ठेवणींत म्हणण्यासारखा फरक पडला नाहीं. या देशांतील ख्रिस्ती व मुसलमान सारखेच दिसतात व यांतच रहाणारे यहुदी, तुर्क व आर्मीनियन त्यांजहून वेगळे वाटतात. सीरिया व पॅलेस्ताईन यांत मिळून वस्ती वीस लाख असून यांतील निम्मे खास सीरियन देशज आहेत. त्यांपैकीं २ लाख सीरियन मुसलमान, पांच लाख सीरियन किरिस्ताव व बाकीचे आरब मुसलमान, आरब किरिस्ताव,तुर्क, तार्तर व कुर्द आहेत. मुसलमानांची वस्ती बहुधा शहरांतून व मोठाल्या गांवांतून आहे व किरिस्ताव शेतकी करून बहुतेक खेड्यांतूनच रहातात. सीरियन किरिस्ताव ग्रीक पंथाचे आहेत. पण त्यांच्या शेजारास इंग्लंड व अमेरिका येथील प्रॉटेस्टंट मिशनरी आले असल्यानें सीरियाहि अनेक जातींच्या व धर्मांच्या लोकांची धर्मशाळाच होऊन बसली आहे.

आरब—

आरब आरबस्थानांतीलच रहाणारे हें काय सांगावयास पाहिजे? पण महंमदाच्या मोहिमांत आणि खलिफांच्या कारकीर्दींत आरब लोक अरबस्थानास सोडून बाहेर पडले व रेताड मैदानाच्या काठावरील सीरिया, पॅलेस्ताईन व मेसापोटेमिया प्रदेशांतून फैलावले. आरबांच्या जाती दोन आहेत. एक फिरस्ते व दुसरे स्थायिक. बेदाउनी ही फिरस्त्यांची जात लुटमार करून पोट भरते व ती फार आडदांड आहे. फिरस्त्या बेदाउनांपेक्षां स्थायिक आरब बुद्धिमान, सुसंस्कृत व आदबशीर असतात. जेथें तुर्की भाषेची छाप थांबते तेथून आरबांच्या पगड्यास सुरुवात होते. पॅलेस्ताईन, सीरिया व मेसापोटेमिया या प्रांतांवर आरबी भाषेची व आरबी संस्कृतीचीच छाप पडली आहे. आरबी संस्कृति ही तुर्की संस्कृतीस प्रतिस्पर्धी होऊन राहिल्यानें तुर्क व आरब यांचें दरम्यान वैमनस्य व मत्सराग्नि धुमसत आहे. कांहीं किरिस्ताव मूळचे आरबच आहेत व ते आजहि आपणास आरबच म्हणवितात. आरबांची संख्या दहा लक्ष आहे. आरबांची भाषा वेगळी, संस्कृति वेगळी व राष्ट्र वेगळें यामुळें त्यांचा व तुर्कांचा एकजीव व एकविचार होण्याचा संभव फारच कमी आहे.

यहुदी—

यहुदी, ख्रिस्ती व मुसलमानी या तिन्ही धर्मांत यहुदी धर्म जुना व त्याचें मूलस्थान पॅलेस्ताईनच; परंतु पॅलेस्ताईन प्रांत मुसलमानांच्या सत्तेखालीं गेल्यावर यहुद्यांची पांगापांग होऊन ते देशोधडीस लागले.त्यांतील साठ हजारांपासून एक लाखपर्यंत यहुदी महायुद्धाच्या सुरुवातीस पॅलेस्ताईनमध्येंच टिकाव धरून होते.तुर्की अमलाखालीं स्वस्थता प्रस्थापित झाल्यावर स्पेनमध्यें जाऊन राहिलेल्या यहुद्यांनीं पुन्हां स्वदेशाची वाट धरली. कांहीं रशिया व रुमानियांतूनहि परत आले आहेत. जुने व मूळचे यहुदी पॅलेस्ताईन व दमास्कस येथें आढळतात. यहुदी हा कवडीचुंबक म्हणून जगविख्यात असल्यामुळें बहुतेक यहुदी सधन असतील अशी समजूत सहज होणारी आहे. खुद्द सावकारी व व्यापार करणारे यहुदी श्रीमान आहेत. पण असे लोक फारच थोडे. त्या खालोखाल कायदा व वैद्यक यांत नैपुण्य मिळवून तो पेशा पत्करलेले यहुदीहि सुस्थितींत आहेत. तथापि मजुरी, खलाशीपणा व हमाली ज्यांच्या नशिबीं आली आहे असे यहुदी फार व ते अर्थात्च दारिद्र्यपंकांत रुतलेलेच असणार. बुद्धिमत्तेंत व नीतिमत्तेंत ते यहुदी बरेच मागासलेले आहेत. त्यांची रहाणी अत्यंत गलिच्छ असते. आपल्या जगप्रसिद्ध कृपणपणास बट्टा न लागेल अशा रीतीनें भाकरी व खारवलेले मासे असलें कदान्न भक्षण करून ते आपला गुजारा करतात. तरी सुद्धां ते शरीरानें मजबूत व निरोगी असतात. फसविणें व पोरें पळविणें हेहि दुर्गुण त्यांच्या अंगीं कमी नाहींत. या सर्व दोषांमुळें ग्रीक व तुर्क लोक यहुद्यांचा तिटकारा करतात. बहुतेक किरिस्ताव त्यांचा पाणउतारा करण्याची संधि सहसा दवडीत नाहींत. आणि अनेक शतकें परतंत्र व तेजोहीन स्थितींत रहाण्यास निर्ढावलेले यहुदी हें शल्य निमुटपणें सोसतात. इस्तंबूल व अनातोलिया येथील यहुदी तुर्की भाषा बोलतात व सिरियांतील यहुदी आरबी भाषेंतून व्यवहार चालवितात.

पॅलेस्ताईनची पुण्यभूमि हें यहुद्यांचें लहानसें राष्ट्र होय व त्यांत त्याचा नीट संसार थाटण्याचा पत्कर इंग्रजांनीं आपल्या शिरावर घेतला आहे व अशा रीतीनें स्वतःचें राष्ट्र यहुद्यांस आतां परत मिळत आहे व

त्यांचा धर्म तर अडीच हजार वर्षांपूर्वींचा आहे. स्वभाषेस अंतरल्यामुळें
त्यांची मोठीच हानि झाली आहे. आणि आरब हा मुसलमान व पॅलेस्ता-
ईन मधील वतनदार प्रतिस्पर्धी त्यांस भेटला आहे. तथापि तुर्कस्थानच्या
इतिहासांत राजकीय दृष्ट्या त्यांचें महत्त्व म्हणण्यासारखें केव्हांच नव्हतें.

वर निर्दिष्ट केलेल्या जाती तुर्की साम्राज्यांत प्रमुख होत. त्या-
खेरीज सरकॅशियन, युरक किंवा तुर्कोमन, तार्तार व जिप्सी या जातींचे
लोकहि तेथें राहतात. पण ते रानटी व मागासलेले आहेत. सरकॅशियन
लोक रशियन साम्राज्यांतून क्रीमियाच्या युद्धानंतर तुर्की साम्राज्यांत येऊन
राहिले आहेत. ते गौरवर्णाचे असून आपल्या गौरकाय व सुंदर मुलींस
विकून तुर्कांचीं अन्तःपुरें प्रकाशित करीत करीत आहेत. मध्य आशियांतून
अलीकडे उतरलेले तुर्कोमन किंवा युरक गाईबैलांवर सामान लादून कैकाडी
व वडार जातींप्रमाणें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं मुशाफरी करीत
हिंडत असतात व शेतांतून वैरणकाडी व धान्य चोरून आणून चरितार्थ
चालवितात. ते रांगडी तुर्क भाषा बोलतात.हीहि जात देखणी आहे.तार्तार
लोकांहि रशियाच्या राज्यांतूनच आले असून शेतभात करून राहतात.ते कट्टे
मुसलमान आहेत. जिप्सी ही विलक्षण जात आहे.या जातीस अब्रू व नीतिमत्ता
यांचा मुळींच चाड नाहीं. चेटूक करणें, सामुद्रिक पाहणें, आस्वलें व माकडें
यांचे खेळ दाखविणें आणि आरशांत पाहून किंवा पत्ते टाकून भविष्य सांगणें
हे धंदे करीत सदर जात गांवोगांव हिंडते व पोट भरते.

वरील विवेचनावरून तुर्की साम्राज्यापैकीं आशिया खंडामधील भागां-
त राहाणाऱ्या जनतेची सामाजिक स्थिति लक्षांत येण्यासारखी आहे.
तुर्की साम्राज्य एक, पण त्यावरील कवच फोडून काढलें असतां आंत सहा
राष्ट्रांच्या बारीक बारीक पाकळ्या दृष्टीस पडतात. अनातोलिया म्हणजे
रूम, आर्मीनिया, कुर्दिस्तान, सीरिया म्हणजे शाम, पॅलेसाईन व आरब
स्तान हीं सहा पृथक राष्ट्रें आहेत. मेसापोटामियांत अनेक जातींचीं कित्येक
शतकें गल्लत होऊन गेलीं असल्यामुळें त्यांतील प्राचीन बाबिलोनियन
खाल्डियन व असीरियन यांचा मागमूस लावणें दुरापास्त झालें आहे.
यामुळें आरबांनीं सीरिया व मेसापोटेमिया व्यापून व त्याजवर आपल्याच

नांवाचा शिक्का मारून त्या राष्ट्रांस आरबस्थानच्या पंक्तीस बसविलें आहे; आरबस्थान व आर्मीनिया यांशिवाय कोणताहि देश एका विशिष्ट जातीचा म्हणून उरलेला नाहीं. रूममध्यें ग्रीक व तुर्क हे दोघेहि उपरीच. तरी पण मूळच्या जाती त्यांनीं आपल्या पोटांत शेंकडो वर्षांपासून रिचविल्या असल्यामुळें रूम हा देश तुर्क व ग्रीक यांचा आतां स्वदेशच समजला पाहिजे.पण या उभय जातींतील धर्मभेदानें,संस्कृतिभेदानें व भाषाभेदानें त्यांचें एक राष्ट्र बनण्यास अडचण पडली आहे. सत्ताधारी तुर्कांपुढें ग्रीकांनीं मान वाकविली ही गोष्ट वेगळी.रूमच्या बाहेरील र. ..त तुर्क जेता व राज्यकर्ता म्हणूनच वावरत आला आहे.सगळा आर्मीनिया व थोडासा पॅलेस्ताईन सोडून बाकीच्या राष्ट्रांतील मुसलमानांस तुर्कानें मनावर घेतलें असतें तर खात्रीनें पचनीं पाडलें असतें. परंतु राष्ट्रीयत्वाची कल्पनाच जर अलीकडची, तर ती पलीकडच्या तुर्कांस सुचली नाहीं याबद्दल त्यांस दोष देण्यांत मतलब काय? ते सदा तलवार फिरवीत जित राष्ट्रांवर राज्य करीत होते ही गोष्ट सर्वथा खरी नसली, तरी साम्राज्य राखण्याचे इतर उपाय हरले म्हणजे तुर्कांस इतर साम्राज्यकर्त्यांप्रमाणें तलवारीवरच टेकावें लागत असेल यांत शंका नाहीं. तुर्कांचा खरा प्रतिस्पर्धी एका अर्थानें जसा ग्रीक तसा दुसऱ्या अर्थानें आरब होय.आरबांचें आणि तुर्कांचें फारसें कधींच पटलें नाहीं. धर्म एक असला म्हणजे परंपरा व जातहि एकच असली पाहिजे असें नाहीं. तसें असतें तर सारें युरोपखंड गोरे व किरिस्ताव या आधारावर त्यांचें एक अत्यंत बलाढ्य व प्रचंड राष्ट्र रचलें जाण्यास कोणती हरकत होती? तोच न्याय तुर्क, आरब व कुर्द या मुसलमान जातींस लागू पडतो. तुर्कांस आपल्या जेतेपणाचा तर आरबांस आपल्या प्राचीनत्वाचा,भाषेचा व महंमदापासून येऊन भिडलेल्या परंपरेचा डौल मोठा. खिलाफत मूळ आपली असतां ती तुर्कांनीं बळकावलेली मक्कामदिनेंतील आरबांस कधींहि सुखासमाधानानें पाहवली नाहीं. कुर्द मुसलमानच; पण त्यांच्या शौर्यास व स्वातंत्र्यप्रीतीस तुर्कांच्या तंत्रानें वागणें कधींहि खपलें नाहीं व तुर्कांनींहि त्यांस चुचकारून घेण्याचा प्रयत्न कधीं केला नाहीं. आर्मीनिया खास किरिस्तावांचा व रूमहि अर्धा-

मुर्धा किरिस्तावांचाच; पण आर्मीनियाचा पोटपंथ वेगळा व राष्ट्र वेगळें, यामुळें भिन्नपंथीय ग्रीकांचें व त्यांचें सख्य कधींहि जमलें नाहीं. आणि राजकीय दृष्ट्या ते जमवून घेण्यास ग्रीकांचा किंवा आर्मीनियनांचा हातहि कधीं मोकळा झाला नाहीं. पॅलेस्ताईन मूळचा यहुद्यांचा; पण तितकाच तो मागाहून सत्ताधारी बनलेल्या आरबांचा झाल्यामुळें त्याहि प्रांतांत स्वतंत्र राष्ट्रीयत्व जन्म घेऊं शकलें नाहीं. अशा रीतीनें कोठें धर्मभेदाचा, तर कोठें वंशभेदाचा, तर कोठें परंपराभेदाचा घुणा लागून तुर्कीसाम्राज्यांत ऐक्य नांदलें नाहीं व एकजीवपणाहि आला नाहीं. आणि त्या साम्राज्याच्या पोटांतील राष्ट्रांत अज्ञानामुळें, संधि न मिळाल्यामुळें व गरज नसल्यामुळें राष्ट्रीय भावना मुळींच रुजली नाहीं. जी हिंदुस्थानची तीच तुर्की साम्राज्याची स्थिति होय. परकीय सत्तेचा दाब जोंपर्यंत शिरावर आहे, तोंपर्यंत परदेशस्थांना हिंदुस्थान एकराष्ट्रासारखा दिसतो. पण तो दाब उडून गेला कीं, हिंदुस्थानची राष्ट्रीयत्वाच्या शिरेवर वेगवेगळीं शकलें पडणार. तुर्क महायुद्धांत नामोहरम होऊन त्यांच्या साम्राज्यांतील मेसापोटेमिया, आरबस्तान, सीरिया व आर्मीनिया या राष्ट्रांत इंग्रज व फ्रेंच यांचा पाय पडतांच त्यांस तुर्कांशीं काडीमोड करण्यास मुळींच फिकीर वाटली नाहीं. याचें झालें तरी कारण हेंच होय.

स्त्रिया—

तुर्कस्थानांत वेगवेगळ्या जातींचे व धर्मांचे लोक रहात असल्यामुळें स्त्रियांच्या रूपांत आणि सौंदर्यांत प्रकारहि अनेक आहेत. तुर्कीसाम्राज्यसंस्थापक उस्मान याजबरोबर आशियामानरांत येऊन राहिलेले तुर्क हे त्यापूर्वी रहिवाशी झालेल्या सेल्जुक तुर्कांहून भिन्न होते. ही भिन्नता दर्शविण्याकरितां उस्मानाच्या अनुयायांस उस्मान अली अशी संज्ञा प्राप्त झाली. तथापि कालगतीनें हाहि जुना भेद नाहींसा झाला ही गोष्ट अलाहिदा. उस्मान अली आशियामायनरांत आल्यावर त्यांचा शरीरसंबंध अनेक भिन्न जातींशीं हळूहळू होऊन त्यांचा पिंड ग्रीक, स्लाव्ह आर्यन्, तातार अशा विविध रक्तांचा बनला. पण हा मिलाफ मनोहर झाला असेंच आज त्यांच्या सौंदर्यावरून म्हणावें लागतें. उस्मान अली स्त्रिया मध्यम उंचीहून थोड्या

अधिकच असतात. त्यांचे हात पाय किंचित् आखूड, अंगलोट वाटोळा, केस विपुल, मृदु व किंचित् पिंगट किंवा काळे, डोळे झोपेजल्यासारखे; त्यांजवरील पापण्या लांब आणि भुवया बाकदार असतात. नाक सरळ, नाजुक पण किंचित् राघूच्या चोंचीसारखें दिसतें. दोन ओठांच्या गुलाबकळींतून दंतपंक्ति मुक्तामाळेसारखी विराजते. फजुली कवीनें पुढील प्रमाणें त्यांच्या सौंदर्याचें वर्णन केलें आहे.

Attar within base of crystal
Such the fair form silken gowned
and the breast is gleaming water
where the bubbles clear abound.

उस्मान अली स्त्रिया देखण्या खऱ्या पण त्यांचें लावण्य त्वरित सुरकुतून व फिकें पडून त्यांस तरूणपणींच म्हतारपणाची कळा येते. चांगल्या सुखवस्तू घराण्यांतील स्त्रियांचें सौंदर्य मात्र मध्यम वयापर्यंत आपल्या इमानास जागतें.

घराबाहेर पडतांना इस्मान अली स्त्रिया केरिद्जी म्हणजे झगा घालतात व तोंडावरून बुरखा घेतात. झग्याच्या बाह्य सैल असतात व तो पायघोळ असतो. श्रीमंतांच्या बायका रेशमी व जरीकाठी झगे परिधान करतात. घरांतील पोशाख त्यांस अनुरूप व साजेसा होता व आहेहि. परंतु युरोपियनांच्या अनुकरणानें तो बराच विकृत झाला आहे. युरोपियन व तुर्की अशा धेडगुजरी संयोगानें त्यांच्या पोशाखाची थट्टा मात्र होते.

उस्मान अलीच्या घरीं काबाडकष्टाचीं कामें करण्यास नीग्रो स्त्रिया ठेवलेल्या असतात. त्यांस बहुधा गुलाम म्हणून विकत घेण्यांत येतें. गुलामांचा उघडा व्यापार बंद झाल्यापासून हा व्यवहार चोरून होतो. ५।६ वर्षांच्या मुलीस व्यापारी १२०० रुपयांपर्यंत खरेदी करतात आणि त्या वाढवून १६।१७ वर्षांच्या झाल्या म्हणजे नफा घेऊन त्यांस विकून टाकतात. ज्यांचीं लग्नें होत नाहींत, किंवा लग्नास फार पैसा खर्चण्याचें ज्यांस सामर्थ्य नसतें असे तुर्क असल्याच मुलींस विकत घेऊन त्यांजबरोबर लग्न करतात आणि अशा अनन्यगतिक बायका नवऱ्याशींहि एकनिष्ठेनें वागतात.

कुर्द स्त्रियांची सौंदर्याबद्दल विशेष ख्याति आहे. तारस पर्वतांतील

या जातींच्या स्त्रिया तर चित्रासारख्या सुरेख दिसतात. त्यांचे काळे डोळे बुरख्यांतून हिऱ्याप्रमाणें झळकतात. पापण्या लांब, नाकतोंड सुरेख व बांधा नीटस असतो. त्या मोठ्या धीट, बळकट, गौरवर्ण असून अदबीनें रहातात. एखाद्या विवाहित स्त्रीचें पाऊल वाकडें पडल्यास नवरा तिचा जीव घेतल्यावांचून रहात नाहीं. उलट पक्षीं पुरुषानें व्यभिचार केला तरी त्यास शिक्षा नाहीं. स्त्रिया तोंडावरून बुरखा घेतातच असें नाहीं. गुरांचीं खिल्लारें चारणीस लावून त्या स्वच्छंदानें मागोमाग रानावनांतून फिरतात.

रशियाजवळील सरकॅशिया नामक प्रांतांतून तेथील स्त्रियांस गुलाम करून आणण्याचा प्रघात तुर्कस्थानांत परवापर्यंत होता. पुष्कळ तुर्कांनीं सौंदर्यास भुलून त्यांच्याशीं लग्नें केल्यामुळें त्या तुर्क जातींत मुरून गेल्या. जिप्सी म्हणूनहि एक जात आहे. ही जात सर्व तुर्कस्थानभर पसरली आहे. यांतील स्त्रिया कोलाटणीसारख्या नीतिभ्रष्ट व असभ्य असतात. त्या नाचण्याचा व चेटकीचा धंदा करून व गांवोगांव हिंडून पोट भरतात. या जातीचा तुर्कांस मोठा तिटकारा वाटतो. आर्मीनियनांचा मुख्य भरणा आर्मीनियांत असला, तरी कॉन्स्टांटिनोपल, स्मर्ना, सॅलोनिका इत्यादि शहरांतूनहि त्यांची वस्ती आहे. आर्मीनियन स्त्रियांचा वर्ण गोरा, आकृति सुंदर, हातपाय गोंडस व डोळे वाटोळे असूनहि त्या तोंडाला रंग लावतात. त्या अंगावर फार दागिने घालतात व मुसलमानासारख्या तोंडावरून बुरखा घेतात. त्या चातीवर सूत काढतात व मागावर विणतात.

यहुद्यांची मोठी वस्ती सॅलोनिकास आहे. बौद्धिक व नैतिक दृष्ट्या यहुदी फार मागे आहेत. त्याची रहाणी गलिच्छ असते. त्यांना सभ्यपणा व शिष्टाचार माहीत नाहीं. त्या उघड्या जागेंत बसून कामें करतात आणि एवढ्या मोठ्यानें बोलतात कीं दूरच्या माणसांस भांडण चाललें आहे कीं काय अशी भीति वाटते. ग्रीक व तुर्क यहुद्यांचा तिरस्कार करतात व त्यांचा पाणउतारा करण्याची संधि सहसा दवडीत नाहींत आणि झालेला अपमान यहुदीहि मुकाट्यानें सोसतात.

ग्रीक लोकांतील पुष्कळ स्त्रिया पूर्वकालीन ग्रीक स्त्रियांची आठवण

करून देणाऱ्या आहेत. त्यांचे कपाळ रुंद, डोळे काळे व तेजस्वी, ओंठ लाल, हनुवटी लांबट, गळा वाटोळा, उंची बेताची, शरीराचा झोंक ताठ, हात लहान आणि अंगठा व त्याच्या शेजारचें बोट सारख्या लांबीचें असतें. बोटांचा हा प्रकार फार प्राचीन ग्रीकांतहि आढळतो. आशियामायनरांत उत्कृष्ट ग्रीक स्त्रियांचे नमुने आजहि पहावयास सांपडतात. आशियामायनरमधील ग्रीक आपणांस रोमिअट्स् म्हणजे रोमन म्हणवितात. ग्रीक व इतर ख्रिस्ती स्त्रिया पुरुषांत मिसळत नाहींत, याचें कारण तुर्कस्थानांत भिन्न धर्मांचे व भिन्न पंथांचे लोक राहातात हें असावें.

विवाह पद्धति—

महंमद पैगंबरानें मुसलमानांना चार लग्नांपर्यंत मुभा दिली आहे. व हव्या तितक्या रखेल्या ठेवण्यास तर त्याची मुळींच हरकत नाहीं. तथापि धर्मांत अशी परवानगी असली तरी व्यवहारांत ती तशीच अमलांत येते असें नाहीं. तुर्कांचा जनानखाना म्हणजे अनेक विवाहित स्त्रियांचा गोठा, अशी युरोपांत समजूत आहे. पण ती आपला एक पत्नीत्वाचा टेंभा मिरविण्याकरितां युरोपियनांनीं मुद्दाम करून दिली आहे. एकीहून अधिक भार्या बाळगणें ही एक प्रकारची चैन असून ती फक्त श्रीमंतांसच सुसाध्य होय. एकीहून अधिक भार्या संभाळणें म्हणजे एका म्यानांत अनेक सुऱ्या ठेवण्याइतकेंच कठीण व त्रासाचें आहे. दुसरी बायको म्हटली कीं तिची खोली वेगळी, दासी वेगळ्या व सारा लवाजमा आणि खर्चहि वेगळा, यामुळें श्रीमान घराण्यांतूनहि दोन बायका केल्या म्हणजे शिकस्त झाली अशीच स्थिति असते. पहिल्या बायकोस मूल होत नसलें, तरच दुसरी बायको बहुधा करतात. आपल्याकडे वधुपक्षानें वर पक्षास हुंडा द्यावा असा शिष्टसांप्रदाय आहे. पण तुर्कांत याच्या उलट प्रकार आहे. वरपक्ष वधूपक्षास हुंडा देतो. ही गरीबाच्या वाटेंत मोठीच धोंड असल्यामुळें पुष्कळ गरीब लोक अशा तऱ्हेनें लग्नाच्या भरीस न पडतां गुलाम स्त्रियांस दासी या नात्यानें जवळ बाळगतात. पुरुषास काडी मोडून एखाद्या स्त्रीशीं झालेल्या विवाहांतून मुक्त होतां येतें; हा पुरुषास बाह्यतः मोठाच हक्क मिळाल्यासारखा दिसतो. पण अशा रीतीनें काडी

मोडणें ही गोष्ट फुकाची नाहीं. कारण बायकोशीं काडी मोडली,तरी तिला द्यावयाची पोटगी नवऱ्यास चुकत नाहीं. यामुळें काडी मोडल्याची व तसेंच अनेक विवाह केल्याचीं उदाहरणेंहि क्वचितच आढळतात.

लग्नें लवकर करतात. लग्नांत मुलीचें वय १२।१३ वर्षांचें आणि मुलग्याचें १६।१७ वर्षांचें असतें. हीच वयोमर्यादा ख्रिस्त्यांतहि आहे. वधूपक्षापेक्षां वरपक्षाकडून स्थळांची चौकशी आधीं सुरू होते व ती स्त्रियांतूनच होते. मुलगा लग्नाला योग्य झाला असें वाटतांच मुलाची आई फेरीवाल्या बायांमार्फत शेजारपाजारच्या स्थळांचा तपास काढते व या युक्तीनें तिनें स्वत: जाऊन १०।५ स्थळें पाहून झाल्यावर एखादें स्थळ पसंत करण्यांत येतें. व मागणी म्हणून वरपक्ष वधूकडे चांदीची दागिन्यांची पेटी, आरसा व वेणीफणीचें सामान पाठवून देतो. वधूपक्षां-कडूनहि नंतर वरास रत्नजडित तपकिरीची डबी व काश्मिरी शाल येते. थोड्या दिवसांनीं वराचा बाप व्याह्याकडे हुंड्याची रक्कम पटवितो.पुढें एका आठवड्यांत विवाह समारंभ साजरा होतो. विवाह हा मुसलमानांत धर्म-विधि नसून व्यवहार(Cōntract)मानला जातो. हा लेखी करार इमामच्या देखत होतो. लग्नाच्या वेळीं वधूवरें एकमेकांच्या तोंडांत साखर घाल-तात. भोजनप्रसंगीं नवऱ्याऐवजीं बायकोच रुसून बसते आणि नवऱ्यानें ‘ चल ’ म्हणून तिचीं कितीहि आर्जवें केलीं, तरी ऐकूं नये अशी पोक्त स्त्रियांनीं तिला भर दिलेली असते. सरतेशेवटीं नवरी मुलगी होय म्हणाली म्हणजे पंगत जेवावयास बसते.

एखादा पुरुष बहुभार्य असल्यास त्याच्या पहिल्या बायकोस बूयुक खानम् म्हणतात.मराठी भाषेंतलि बायको हा शब्द व तुर्की भाषेंतील बूयुक हा शब्द या दोन शब्दांतील साम्य विलक्षण आहे यांत शंका नाहीं. मुलगी वयांत आली कीं तिचें लग्न झालेंच पाहिजे असा तुर्कांत नियम आहे. पुरुष बिनबायकोचा नसावयाचाच आणि असलाच तर बहु-पत्नीक असावयाचा आणि एखाद्यास अस्सल तुर्क स्त्री लग्नास नच मिळाली तर तो गुलाम स्त्रीस घरीं बाळगून तीं उभयतां पतिपत्नीप्रमा-णेंच नांदतात. युरोपांतील चाल याच्या उलट आहे. युरोपांत ख्रिस्ती लोक

एकपत्नीकत्वाचें व्रत कडक रीतीनें पाळतात. खेरीज समाजास पूर्वींचा धरबंध न राहिल्यानें कित्येक स्त्रीपुरुष आजन्म अविवाहितच रहातात. परंतु ही चाल समाजविध्वंसक व सृष्टिक्रमास सोडून असल्यामुळें बेवारशी मुलें युरोपांत पुष्कळ आढळतात आणि त्यांच्या संगोपनार्थ अनाथालयें (Fondling Hospitals) ठेवावीं लागतात. खेरीज अविवाहित पुरुषाकरितां लहान मोठ्या शहरांतून वेश्यागृहें असतातच. तुर्क स्त्रिया लग्नाच्या किंवा निक्याच्या नीतिशुद्ध बंधनांत सुरक्षित असल्यामुळें त्यांपैकीं फारच थोड्यांवर कायविक्रयाचा धंदा पत्करण्याचा हीन प्रसंग ओढवतो. आणि विवाहित पुरुषवर्गासहि वेश्यागृहांच्या पापी विचाराचा मनास स्पर्श होऊं देण्याचें कारण पडत नाहीं. तुर्कस्थानांत वेश्यागृहें फारशीं नाहींत आणि जीं आहेत तीं ख्रिस्ती वस्तीच्या शहरांतूनच आहेत. वैवाहिक बाबतींत तुर्की मुसलमान ख्रिस्ती लोकांहून श्रेष्ठ आहेत आणि योग्य अशा विवाहकालींच किंवा त्यापूर्वींहि थोडे आधीं विवाह होत असल्यामुळें त्यांच्या नीतिमत्तेस अधिकच बळकटी आली आहे

युरोपियन लोक बहुपत्नीकत्वाप्रमाणेंच मुसलमानांच्या हॅरमची म्हणजे अन्तःपुराचीहि हेटाळणी करतात. हॅरम हा स्त्रियांचा बंदिवास आहे अशी त्यांची समजूत आहे, पण ती तितकी खरी नाहीं. त्यांना रस्त्यानें बुरख्यावांचून मोकळेचाकळें फिरतां येत नाहीं. व न फिरण्यामुळें त्यांची शरीरप्रकृतिहि निरोगी रहात नाहीं हें कबूल केलें, तरी हॅरम म्हणजे कारागृह मानणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणेंच होय. तुर्क स्त्रियांस पोटाकरितां काम धंदा पहावा लागत नाहीं व पोटाची फिकीर बाळगण्याचेंहि कारण पडत नाहीं. पुरुषांनीं मिळवावें व स्त्रियांनीं उपभोगावें अशीच वहिवाट असल्यामुळें त्यांच्या अन्तःपुरास देवघरासारखें पावनत्व आलें आहे. त्या आपल्या अन्तःपुरांत निश्चिंत व निरुपाधि रहातात. लौकिक उलाढालींतील शिंतोडे त्यांच्या अंगावर उडत नाहींत व कुविचाराचें वारें त्यांच्या अव्याज मनास स्पर्श करीत नाहीं. पुरुषासहि आपली पत्नी, मातुश्री व भगिनी यांशिवाय परस्त्रींचें सहसा दर्शन होत नसल्यामुळें परस्त्रीविषयक विचार त्यांच्या मनांत उद्भवतच नाहींत

स्त्रियांना जशी फक्त आपल्या नवऱ्याची ओळख, तशी पुरुषांना फक्त आपल्या बायकोचीच ओळख असते. अशा समाजांत सुख, समाधान व शांति नांदावी हें स्वाभाविक होय.

सुलतानाचा जनानखाना

सुलतानाचा जनानखाना ही एक निराळीच सृष्टि किंवा राज्य होतें. बहुतेक स्त्रिया गुलाम म्हणून आणिलेल्या असत.गुलाम स्त्रिया,नजर केलेल्या स्त्रिया, सुलतानाची आई व आप्त स्त्रिया अशांची संख्या एक हजारापर्यंत भरत असे. जनानखान्याच्या महालाकरितां कॉन्स्टांटिनोपलमध्यें अत्यंत रमणीय व हवाशीर स्थान शोधून काढलेलें होतें. बॉस्फरसच्या किनाऱ्यावर आणि कॉन्स्टांटिनोपलच्या अगदीं एका टोकास निवांत ठिकाणीं हे महाल वीस असून त्यांतील मुख्य तीन होते. महालांस आसमंतांतील कृत्रिम साधनांनीं मनोहर शोभा आणिलेली होती.झाडांनीं झांकलेल्या टेकड्या,हिरव्यागार तृणांनीं भरलेल्या दऱ्या, फळभारानें वाकलेल्या बागा, पक्षांची किलबिल,पशूंच्या गर्जना आणि कारंज्यांचे तुषार यांचा महालाभोंवती वेढा पडला असल्यामुळें तो जनानखान्यांतील रमणींच्या मुखावर बुरखाच टाकल्याप्रमाणें वाटे.

जनानखान्यांतील स्त्रिया ज्या भागांत रहात, त्यास सराई म्हणत. सर्व स्त्रियांवर मुख्य हुकमत सुलतानाच्या आईची. अधिकाराची तिजपासून प्रणालिका लावावयाची, तर तिच्या खालचा नंबर भावी सुलतानाच्या आईचा, त्या खालोखाल सुलतानांच्या मुलांच्या आया, अविवाहित मुली, सुलतानाच्या स्त्रिया असा क्रम लागतो. सुलतानांच्या लाडक्या स्त्रियांना इकबल म्हणत. इकबल या खास स्त्रिया होत.पण त्याखेरीज सुलतानाचें प्रेम ज्यांच्यावर नुकतेंच जडत आहे, अशाहि स्त्रिया जनानखान्यांत असत. पण त्यांखेरीज इतर स्त्रियांस पेनशन असे.

राजमातेचें एक प्रकारचें तेथें राज्यच असून तिच्या दरबारांत खाजिनदार,चिटणीस,फराशी वगैरे कामांवर स्त्रियांचीच नेमणूक केलेली असे. स्त्रिया गुलाम म्हणून आणून अन्तःपुरांत गुदरल्या म्हणजे सौंदर्यानुरूप त्यांची वर्गवारी व्हावयाची. सर्व प्रकारच्या स्त्रियांचा खप अन्तःपुरांत

होईच. कुरूप अशा नीग्रो स्त्रियांकडे आचारीपाणक्यांचें काम यावयाचें. सुस्वरूप स्त्रियांस मात्र सुलतानाच्या समागमाची आशा. अशा स्त्रिया समागमसुखास लायख होण्यापूर्वीं त्यांस गायन, वादन, नर्तन : शिकविण्यांत येई.

वर्षांतून कित्येक समारंभाचे वेळीं राज्यांतील कोणाहि प्रतिष्ठित गृहस्थानें आपली सुंदर कन्या सुलतानास नजर करावी असा प्रघात असे. सुलतानाच्या भार्यापदास पात्र होण्याकरितां किंवा त्याची लाडकी स्त्री (Favourite) समजली जाण्याकरितां निवड करण्याची कामगिरी सुलतानाची आई म्हणजे वलीद (Valide) हिनें करावें. याखेरिज गुलाम म्हणून आणिलेल्या स्त्रियांपैकीं कोणास वरील तऱ्हेचा मान मिळत नसे असें नाहीं. पण तो प्रसंग अपवादात्मकच. सुलतान मातेस भेटण्यासाठीं अन्तःपुरांत आला म्हणजे सर्व स्त्रियांत एकच गोंधळ उडावा. कोणी कॉफी, कोणी फराळाचें, कोणी सरबत, तर कोणी हुक्का आणावा. अशा समोर नाचणाऱ्या स्त्रियांपैकीं एकादीवर सुलतानाची नजर गेली व तिजविषयीं सुलतानानें आपल्या मुलीपाशीं (सुलताना) विचारपूस केली कीं, सुलतान बसला असेल त्या खुर्चीचें चुंबन घेण्याची सदर स्त्रीस आज्ञा व्हावी. अशा स्त्रीस लाक्षित (eyed) स्त्री म्हणत. ती जर सुलतानाच्या मर्जींतून क्वचित् उतरली, तर सुलतानानें तिचें एखाद्या हजामाशींहि लग्न लावावें.

सुलतान शास्त्रोक्त असा विवाह कोणत्याच स्त्रीशीं करीत नसत. तरी पण विवाह नसला तरी विवाहाचें बंधन मात्र आमरण टिकावयाचें. सुलतानाच्या मरणोत्तर त्याच्या संगतींतिल सर्व स्त्रियांची रवानगी दुसऱ्या महालांत व्हावी व नव्या सुलतानाच्या नव्या स्त्रियांनीं पहिल्या महालांत येऊन रहावें. आपल्या आईच्या आज्ञेंत वागलें पाहिजे अशी शपथ सर्व स्त्रियांकडून सुलतान घेववी. त्यांनीं राजमातेच्या परवानगीवांचून अन्तःपुरांतून बाहेर कोठेंहि जातां कामा नये. सुलतान बाळपणीं दाईच्या अंगावर वाढत आणि दाईच्या मुलास अन्तःपुरांत रहाण्यास सदर परवानगी असे.

रीतभात

शोभीवंत स्थळें, चकचकीत समुद्र, घनदाट छाया, थंडगार झरे

आणि क्षितिजास डवचणारीं हिमाच्छादित गिरिशिखरें यांचें साहचर्य उस्मान अल्लींस फार आवडतें. अशाच स्थळासन्निध ते आपलीं घरें बांधतात. बॉस्फरस व एजियन समुद्राच्या कांठीं अशींच स्थळें शोधून त्यांनीं आपल्या हवेल्या उठवून दिल्या आहेत. प्रत्येक घरास वेगळी बाग नसली तरी घराच्या परसास बागेची शोभा आलेली असते. प्रत्येक घर दुसऱ्या घरापासून तुटक असल्यामुळें जागा फार व वस्ती विरळ अशी स्थिति असते. मध्यम वर्गांतील कुटुंबांचीं घरेंहि प्रशस्त बांधण्यांत येतात. त्यांच्या तिन्ही बाजूस झाडें आणि अंगण ठेवतात. चौथी बाजू रस्त्याकडे असून तिजवर दुमजला असतो. भिंतीला गडद लाल रंग देतात. खिडक्या सरकत्या फळ्यांच्या असतात. घरांवर सायप्रस व मलबेरी वृक्ष आपली दाट सावली पसरतात. आणि त्या छायेंत गुलाब, नारिंग, डाळिंब टोमॅटो, लिंबू, कोबी, कोथिंबिर अशीं झाडें, फुलझाडें व फळझाडें उगवतात.

तळमजल्यांतील दोन खोल्यांस वेगवेगळीं दारें असून त्यांस सेलामलिक म्हणतात. येथें यजमानाकडे भेटावयास येणारीं परकीं माणसें बसतात. स्त्रियांच्या बैठकीच्या जागेस हरमलिक अशी संज्ञा आहे. पत्नीचें सामान्य नांव हनम. तुर्कांत कॉफीचें व्यसन फार मोठें. स्वयंपाक घरांत कॉफी उकळत ठेवून, स्वयंपाकीण म्हातारी सदा शेजारीं बसून रहाते. स्वयंपाक घर पैस असतें. आचाऱ्याचें काम नीग्रो करितो. स्त्रियांची बसावयाची जागा कोच, टेबल, आरसे, गुलाबदाणी, सरबताची उपकरणीं, व शोभेच्या जिनसा यांनीं शृंगारतात. नित्य स्नानासाठीं न्हाणीघर असतेंच, पण विशेष प्रसंगीं सार्वजनिक स्नानगृहांत म्हणजे हमामखान्यांत न्हाण्यास जाण्याचाहि रिवाज आहे.

कुलीन तुर्की स्त्रिया वागणुकीनें साध्या, सरळ, संभावित व इभ्रतदार असतात. त्यांचें शिक्षण कमी खरें, तरी पण त्यांचें संभाषण सुशिक्षित स्त्रियांस शोभेल इतकें विनोदप्रचुर आणि अस्खलित असतें. त्या लहान मुलांस फारच ममतेनें वागवितात. आणि हीं मुलें मोठीं झालीं म्हणजे आईबापांच्या आज्ञेंत राहून त्यांस सुख देतात. इतर स्त्रियांकडे जाणें येणें समाजबंधनांनीं अशक्य करून सोडल्यामुळें मुलगा वयांत आल्यावर लग्नापूर्वीं आपल्या आईबहिणींसच प्रेमसर्वस्व समजतो.

नवऱ्याच्या निळ्या दाढीची चाकरी करणें, कोचावर बसून मिष्ट-पदार्थांचें सेवन करणें व अंगावरील दागिन्यांशीं खेळत बसणें यांशिवाय तुर्की स्त्रियांस दुसरा चाळा नाहीं म्हणतात हें खोटें आहे. हनम सकाळीं लवकर उठते, पेलाभर कॉफी पिऊन, सिगारेटचा झुरका मारून व थोडीशी वेणीवरून फणी फिरवून पतीच्या सेवेला सादर होते. त्याचा जोडा व झगा घालण्याकरितां त्याजपाशीं ती आणून ठेवते, त्याच्या पेल्यांत कॉफी ओतते, त्याचा हुक्का पेटवून देते आणि अशा रीतीनें आपली पतिपरायणता सिद्ध करते. मंत्रतंत्राच्या अनेक कल्पना तुर्कांत प्रचलित आहेत. घरांत पत्नीप्रमाणें इतर दासीहि असतात. त्या चेटें करून नवऱ्याचे कपडे मंतरतील या शंकेनें हानम त्याचे कपडे स्वतः धुते. जेवणें दोन वेळां होतात. एक जेवण सकाळीं ११ वाजतां व दुसरें हिंवाळ्यांत सायंकाळीं ५ वाजतां आणि उन्हाळ्यांत रात्रीं ८ वाजतां होतें. ऑलिव्ह, कुकुंबर, मुळे, मीठ, मिरपूड, लोणी, भात इत्यादि पदार्थ बहुधा जेवणांत असतात व ते पुरुष टेबलावर आणि स्त्रिया गादीवर बसून खातात.

सदा घरांत कोंडून बसल्यामुळें मोकळ्या हवेंत फिरण्याची तुर्क स्त्रियांना विशेषच हौस वाटते. प्रत्येक शहरीं स्त्रियास हवा खाण्यासाठीं वेगळी जागा असतेच. हमामखान्यांत जाऊन समारंभानें न्हाणें हाही एक स्त्रियांच्या करमणूकीचा विषयच होय. केसास तेल व अंगाला साबण, बोटांना हिना आणि नखांना मेंदी लावणें हे प्रकारहि हमामखान्यांतच उरकून घेण्यांत येतात.

तुर्की साम्राज्य ऐश्वर्याच्या भरात असतां जी एक प्रकारची विशिष्ट संस्कृति परिणत झाली होती ती अलिकडे ऱ्हास पावत चालली आहे. पाश्चात्यांचें अनुकरण करावयाचे नादांत त्यांनीं आपल्या तारतम्य बुद्धीस गुंडाळून ठेवून पाश्चात्य पद्धतीची नुसती नक्कल चालविली आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वीं थोर घराण्यांतील स्त्रियांस स्वभाषेंत लिहितां वाचतां येत असे. कविता रचणें, गाणें, नाचणें, सारंगी व सतार वाजविणें, उत्कृष्ट कवींच्या काव्यांतील वेंचे व कुराणांतील कांहीं भाग मुखोद्गत करण्याचा त्यांजमध्यें प्रघात होता. पण तो तुर्की समाजास अनुरूप व हितावह असलेला हा प्रघात

मोडून त्याऐवजीं गव्हरनेसकडून इंग्लिश, फ्रेंच जर्मन भाषांचें प्रस्थ माजत चाल-ल्यानें, तुर्की स्त्रिया आत्मसंस्कृतीस पारख्या होत आहेत. तुर्क जाऊन इंग्लिश किंवा फ्रेंच भाषा, सारंगीऐवजीं पियानो फोर्ट, रेखाकला व रंगकला यांचें चुटपुटतें ज्ञान प्राप्त करून घेण्यांत त्यांस एक प्रकारचा प्रतिष्ठितपणाच वाटूं लागला आहे.

हिंदुस्थान देशांतल्याप्रमाणेंच तुर्कस्थानांतहि दृष्टीचें मोठें बंडच आहे. तान्ह्या मुलास दृष्ट लागूं नये म्हणून त्याच्या डोक्यास तांबडें कुंचडें घालतात, बाळंतिणीच्या बाजेवर केरसुणी ठेवतात, चुलींत मोहऱ्या ओंवा-ळून टाकतात आणि त्या फटफट उडाल्या म्हणजे ज्यांचें नांव दृष्ट काढ-तांना घेतलें असेल त्याची दृष्ट लागली असें समजतात. थुंकणें व शिव्या देणें हाहि दृष्ट काढण्याचा एक प्रकार आहे. लग्नाप्रमाणें मुलांच्या सुंतेचा समारंभ थाटानें होतो. श्रीमंत लोक आपल्या मुलांबरोबर गरीबांच्या मुलांचीहि धर्मार्थ सुंता करतात.

मुलांना व मुलींना सातव्या वर्षी प्रार्थना शिकवितात. ज्यांचें कुराण मुखोद्गत झालेलें आहे अशा स्त्रीपुरुषांस 'हफीज' ही बहुमानदर्शक पदवी मिळते. श्रद्धाळू मुसलमान चवदाव्या वर्षापुढें रमजानचा तीस दिवसांचा उपवास करतात. त्या मुदतींत दिवसा अन्न, दारू आणि तंबा-खू कोणीहि सेवन करतां कामा नये. मक्केची यात्रा करण्यास बहुधा स्त्रिया फार जातात. दरवेशी जातीच्या मृतशेखाच्या पीरासहि त्या भजतात. दुखण्यांत शेख देवऋषिपणा करण्यास येतो. जपजाप्याच्या बळावर त्यानें सिद्धि प्राप्त करून घेतली आहे असें समजतात. तुर्कांचा दैवावर हवाला फार. जीवित क्षणभंगुर आहे, आपण जगांत यात्रेकरू आहोंत अल्ला ठेवील तसें राहिलें पाहिजे, मरण येणार असेल तर तें औषधानें चुकणार नाहीं अशा समजुतीनें पुष्कळ स्त्रीपुरूष औषधहि घेत नाहींत.

ग्रीक शेतकरी साऱ्या तुर्कस्थानभर पसरले आहेत. पण ते इतर जातींच्या गांवीं रहाण्याचें टाळतात. बरेच ग्रीक शेतकरी कुळासारखे आहेत जमीनी त्यांच्या मालकीच्या नाहींत. त्यांचीं घरें म्हणजे एकमजली खोपटें. त्यांस कूड केलेलें असतें. जवळच गोठा व धान्याच्या कणगी लावलेल्या

असतात. शेतांत मुख्य कष्टाचीं कामें पुरुष करतात व बायका गुरांची राखण व दूधदुभतें पहातात. धान्याच्या मळणीचें व वावडीवरून धान्य उफणण्याचें काम मुली करतात. मुली गुरेंहि वळतात. मेंढरांची लोकर कांतरल्यावर ती कातणें व लोकरीचीं आणि कापसाचीं वस्त्रें विणणें हीं कामें बायका व मुली यांचीं होत. त्या चातीवरून सूतहि काढतात. रेशमाचे किडे बाळगण्याचा धंदाहि कांहीं ठिकाणीं स्त्रियांचाच समजतात. ग्रीक शेतकऱ्यांच्या बायका मोठ्या प्रामाणिक, उद्योगी, असून आपल्या मुलांवर माया करतात आणि पतीशीं प्रेमानें व निष्ठेनें वागतात. पति कित्येक वर्षें परागंदा असतां त्यांच्या पश्चात् मुलाबाळांस अब्रूनें संभाळून राहिलेल्या पतिव्रता स्त्रियांचीं उदाहरणें अनेक आहेत. शहरापासून ग्रीकांची वस्ती जितकी दूर तितकें नीतिनियमांचें पालन अधिक कडक. क्रीट बेटांत डोंगरामधील खेड्यांत राहाणाऱ्या ग्रीकांत तर असा नियम आहे कीं, जी स्त्री व्यभिचारी निघेल तिला देहांत शासन करावयाचें. ग्रीक शेतकऱ्याची पोर मुसलमान तुर्कांच्या लालुचीस भुलून खिस्ती धर्माचा त्याग करून त्याजबरोबर निका लावण्यास तयार झाल्याचे दाखलेहि पहावयास सांपडातात. देवऋष्यांचें बंड ग्रीकांतहि बरेंच आहे. निपुत्रिक स्त्रिया, प्रेमविव्हळ कुमारी, रोगग्रस्त मुलांच्या माता या देवऋष्यांच्या भजनीं लागतात.

आईबापांच्या नजरेखालीं समाईक कुटुंबांत रहाण्याची प्राचीन चाल ग्रीक लोकांनीं अद्यापि सोडली नाहीं. मुलगे लग्नानंतर आईबापांपाशींच सपत्नीक रहातात. वृद्ध मातेस सर्व कुटुंब मान देते. लेकी सुना तिच्या अर्ध्या वचनांत वागतात. ग्रीक स्त्रिया पुरुषांत मिसळत नाहींत. परधर्मीय व परपंथांतील समाजांपासून बचाव करून घेण्याची ही युक्ति मनुष्यमात्रांत उपजतच आहे. मुसलमानांची वस्ती कमी आहे, अशा निर्भयस्थळीं त्या मोकळेपणानें सर्वांत मिसळतात.

आर्मीनियनांचा मुख्य भरणा आर्मीनियांत असला, तरी कॉन्स्टांटिनोपल, आद्रियानोपल, ब्रूसा, स्मरना, गॅलीपोली येथें त्यांची वस्ती आहे. त्यांची घरें धाब्याचीं असून उन्हाळ्यांत उकाड्याच्या रात्रीं ते लोक

धाब्यावरच निजतात. समाईक कुटुंबव्यवस्था आडवळणी गांवांतून अद्यापि दृष्टीस पडते. तीन तीन चार चार पिढ्या आर्मीनियन एकत्र रहातात. एका कुटुंबांत ४०।५० पर्यंत माणसें असतात. स्त्रियांत मर्यादशीलपणा फार आहे. नवी नवरी मुलगी सासऱ्याशींहि बोलत नाहीं, मग सासूसासऱ्यासमोर नवऱ्याशीं बोलण्याची गोष्ट दूरच. सुनेस सासुरवास बराच जाणवतो. 'लेकी बोले सुने लागे' या मराठी म्हणीची नक्कल आर्मीनियन भाषेंतहि असून सुनेस टोंचून बोलावयाचें झाल्यास सासू आपल्या मुलीस संतापून बोलण्याचा आव आणते. हा सासुरवास एक मूल होईपर्यंतच टिकतो. त्यानंतर पारडें हळूहळू फिरून अष्टाधिकार सुनेकडे जातात व सासू निर्माल्यवत् होऊन घरांत बसते. स्त्रीचें पुरुषांशीं एकदां लग्न झालें कीं ती मेल्यानंतर सुटणारी ब्रह्मगांठच समजावयाची.

तोंडाला रंग लावण्याची, पुष्कळ दागिने घालण्याची आणि मुसलमानांप्रमाणें तोंडावरून बुरखा घेऊन बाहेर पडण्याची आर्मीनियन स्त्रियांत चाल आहे. त्या चातीवर सूत काढतात आणि मागावर कापड विणतात. त्यांस जनावरांची आवड मोठी. कुत्रें, मांजर किंवा उंदीर मारणें हें त्या पाप मानतात.

ज्या समाजांत बालविवाह रूढ आहे, त्या समाजांत समाइककुटुंबपद्धति असावयाचीच. ही पद्धति यहुद्यांतहि आहे. मुलग्याचें लग्न आठरा वर्षांच्या आंत व मुलीचें पंधरा वर्षांच्या आंत होतें. यहुद्यांची रहाणी मोठी गलिच्छ असते. ते भाकरी व खारवलेले मांस असलें कदान्न भक्षण करीत असूनहि त्यांची शरीरयष्टि मजबूत व निकोप रहाते. समाईक कुटुंबपद्धतीमुळें बाप, त्याचे पुष्कळ मुलगे व सुना आणि नातवंडें, पणतवंडें यांचें मोठें खटलें एकत्र पहावयास सांपडतें. या सर्वांस पोसण्याचा भार एकट्या बापावर पुष्कळदा पडतो. स्त्रिया तरुणपणींच म्हाताऱ्या दिसूं लागतात. समाईक कुटुंबांत स्त्रियांच्या नीतिमत्तेवर मात्र सर्वांची करडी नजर रहाते. स्त्रियांचें पाऊल बहुधा वाकडें पडत नाहीं आणि चुकून पडलेंच, तर साऱ्या गांवांतून त्यांची तीन दिवस धिंड काढून तिला प्रत्येक घराजवळ थांबवून

तिच्या तोंडावर सर्वांनीं थुंकण्याची चाल आहे. अडाणीपणामुळें स्त्रियांच्या चर्येवर तरतरी दिसत नाहीं.

लोकशिक्षण

शिक्षण हें सुधारणेचें प्रमुख अंग पुरातन कालापासून सर्व देशांत मानण्यांत येत असल्यामुळें तुर्कस्थानांतहि शिक्षणपद्धतीस पांचशें वर्षांपूर्वींच सुरुवात झाली. या दृष्टीनें साऱ्या युरोपांत तुर्कस्थानाचा नंबर पहिला लागतो. आरखान सुलतान असतां त्याच्या कारकिर्दींत म्हणजे १३२६ चे सुमारास तुर्कस्थानांत प्राथमिक शाळा स्थापन झाल्या. या शाळा अर्थांतच सर्रास गांवोगांव निघाल्या नसून कांहीं गांवींच उघडण्यांत आल्या यांत शंका नाहीं. यापुढील सुधारणा दुसऱ्या महंमदाच्या कारकिर्दींत पंधराव्या शतकांत घडून आली. त्यानें कॉन्स्टांटिनोपल शहरीं मशिदीच्या आश्रयानें मद्रेसा म्हणजे कॉलेज सुरूं केलें. अशा प्रकारच्या कॉलेजांची संख्या पुढें ४०।५० पर्यंत वाढली. यांची सर्व व्यवस्था व देखरेख उलेमाच पहात. यामुळें शिक्षणांत सर्व भर धर्म व वाङ्मय यांवरच देण्यांत येत असे. या दोन विषयांचा व्यवहाराशीं साक्षात् संबंध फारच थोडा असल्यामुळें आपल्याकडील शास्त्रीपंडितां इतकाच या पढिक विद्वानांचा समाजास उपयोग होत होता. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, गणित इत्यादि व्यवहारोपयोगी ज्ञानाच्या अभावीं मद्रेसांत शिकून बाहेर पडलेले विद्यार्थी संकुचित विचाराचे, दुरभिमानी, हेकड व धर्मवेडे असत. आपला धर्म व आपली शिक्षणपद्धति हीच काय ती निर्दोष व सर्वश्रेष्ठ अशा घमेंडींत त्यांनीं युरोपांतील शिक्षणपद्धतीकडे ढुंकून पहाण्याचे व देशकाळवर्तमानानुसार सुधारणा करण्याचें नाकारल्यामुळें मुसलमानांची प्रगति थांबली व ते शर्यतींत प्रारंभीं युरोपच्या पुढें असूनहि कालांतरानें मागें पडले.

प्राथमिक शिक्षणसंस्था म्हणजे मकतब; व उच्च शिक्षणसंस्था म्हटली तर मद्रेसा, मकतब व मद्रेसा यांचे दरम्यान ज्ञानाचें बरेंच मोठें अंतर पडलें असल्यानें मकतबमधून सुटलेल्या विद्यार्थास मद्रेसांतील शिक्षण झेपणें अवसानाबाहेरचें होतें. ही खिंड बुजविण्यास मध्यम शिक्षण संस्थेची गरज होती. पण तशा प्रकारच्या शिक्षण संस्थेच्या अभावीं ज्योतिष, अलंकार,

भाषाशास्त्र, भूमिति इत्यादि कठीण विषय न समजून विद्यार्थ्यांस घोकंपट्टी-
चाच आश्रय करावा लागत असे. पण मद्रेसांत जाणें दुरापास्त, अशीं
शेंकडा ९.० मुलें असत. त्यांस मकतबमध्यें नीति व धर्म यांचेंच शिक्षण
मुख्यत: मिळत असे. तें शिक्षण संपादून बाहेर पडल्यावर लवकरच
इतर कमावलेलें ज्ञान गमावून टाकून फक्त कुराणाची माहिती त्यांजपाशीं
शिल्लक राही.

शिक्षण पद्धतींतील हें व्यंग दुसरा सुलतान महंमद याच्या लक्षांत
१८४५ सालीं आलें. तुर्कस्थान पाश्चात्य राष्ट्रांच्या टकरींतून टिकाव
धरून रहावयास पाहिजे असेल, तर शिक्षणसंस्था उलेमांच्या हातच्या
काढून घेऊन पाश्चात्य धर्तीवर त्या सुधारणें इष्ट आहे अशी सुलतानानें
आपल्या मनाशीं खूणगांठ बांधून ठेवली होती. त्यानें याप्रीत्यर्थ एक
कमिशन नेमलें व सदर कमिशनानें हायस्कुलें स्थापणें, विश्वविद्यालयाची
प्राणप्रतिष्ठा करणें व विद्याखात्यावर देखरेख करण्याकरितां कौंसिल
नेमणें या सुधारणा सुचविल्या. कमिशनच्या या सूचनांस धरून सुलतान
अबदुल मजीद यानें कॉन्स्टांटिनोपल येथें प्राचीन सेंट सोफिया नामक
प्रसिद्ध ग्रीक प्रार्थनामंदिरापाशीं विश्वविद्यालयाचा पाया घातला. शिक्षण-
पद्धति चांगली कोणती, याची चौकशी करण्यास जें कौंसिल युरोपांत
फिरतीवर गेलें होतें, त्यानें इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी येथील शिक्षणपद्धति
पाहून त्यांपैकीं फ्रेंच शिक्षणपद्धति पसंत केली. परंतु त्या पद्धतीवर तुर्क-
स्थानांतील सर्व शिक्षण बदलण्यास उलेमांनीं हरकत घेतली आणि मद्रे-
सांस तर ते हातहि लावूं देईनात. उलेमांची मर्जी मोडणें सुलतानास जड
वाटून त्यानें मद्रेसा कायम राखल्या व त्याखेरीज वेगळ्याच दोन शाळा
स्थापन केल्या. मात्र मद्रेसांपेक्षां या शाळांस श्रेष्ठ मानण्यांत येऊन
त्यांत शिकून बाहेर पडलेल्या तरुणांसच सरकारी नोकऱ्या मिळूं लागल्या.

मद्रेसांत व्याकरण, शब्दशास्त्र, न्याय, अध्यात्म, भाषाशास्त्र, अलंकार,
भूमिति व ज्योतिष या विषयांचा अभ्यास होत असे. हा अभ्यासक्रम
पुष्कळच जुनाट झाला असून त्याचा उपयोग असलाच, तर तो धर्मा-
संबंधानेंच होता. त्यांत शिकून तयार झालेले पंडित घटपटादि खटपटींतच

धन्यता मानीत व त्यांस, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र व राजकारण अशा व्यवहारोपयोगी विषयांचा गंधहि नसे. तुर्कस्थानाची युरोपियन राजकारणांतून पिच्छेहाट होण्याचें मुख्य कारण हेंच होय. सुलतान अबदुल मजीद यानें काढलेल्या नव्या पाठशाळांत आरबी व फार्सी व्याकरण, इतिहास, भूगोल, गणित, ह्या विषयांचा समावेश करण्यांत येऊन ते विषय उत्तम प्रकारें शिकविले जाऊं लागले. इ. स. १८५० त सुलतानाच्या आईनें एक नवें कॉलेज काढलें. त्यांत वरिष्ठ प्रतीचें शिक्षण मिळून त्यांतून शिकलेल्यांस मोठमोठ्या अधिकाराच्या जागा देण्यांत येऊं लागल्या. त्यांत सांप्रत पांचशे विद्यार्थी शिकत असून कोणत्याहि धर्माच्या व जातीच्या विद्यार्थ्यांस येण्याची मोकळीक आहे. अशा प्रकारचीं तीन कॉलेजें सध्यां आहेत. प्राथमिक व दुय्यम शाळांसाठीं शिक्षक तयार करणारीं इस्तंबुलांत ट्रेनिंग कॉलेजें असून त्यांत शंभर विद्यार्थी शिकत आहेत आणि त्यांपैकीं निम्म्यांच्या अन्नवस्त्रांचा खर्च सरकार सोसतें. सॅन स्टीफॅनो येथें शेतकी शाळा निघाली आहे व १८२७ त एक आधुनिक धर्तीवर वैद्यक शाळा सुरू होऊन ती भरभराट पावत आहे. त्यांत शिकविणारे प्रोफेसर युरोपियन आहेत. ही शाळा सुरू करण्याचें श्रेय सुलतान महंमदास देणें जरूर आहे. महंमदानें एक लष्करी कॉलेज स्थापून त्यावर जर्मन व फ्रेंच प्रोफेसरांची नेमणूक केली. मार्मोरा समुद्राच्या तीरावर एक नाविक शाळा (Naval School) हि निघाली आहे. वरील वर्णनावरून रसायन, पदार्थविज्ञान आदिकरून भौतिक विषयांखेरीज बाकीच्या विविध शाखांतील शिक्षणाचें बीजारोपण तुर्कस्थानांत झालें आहे हें कोणाच्याहि लक्षात येईल. त्यांची योग्य वाढ करणें व भौतिक शास्त्रांचीहि तुर्क विद्यार्थ्यांस गोडी लावणें हें नवोदित लोकसत्ताक राज्यपद्धतीचें कर्तव्य होय.

स्त्रीशिक्षणाकडे तुर्कांचें लक्ष गेलें नाहीं असें नाहीं. त्यांस फक्त प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. पडद्याची पद्धति जारीनें अमलांत असल्यामुळें मुली वयाच्या सहाव्या वर्षापासून नवव्या वर्षापर्यंत शाळेंत जातात व त्यापुढें त्यांचें शिक्षण थांबतें. मिळालेलें शिक्षणहि

तुटपुंजें असतें व त्यामुळें तें लवकर विसरतेंहि. इस्तंबूल आद्रियानोपल व स्मरना अशा मोठाल्या व सुधारलेल्या शहरांतून थोरामोठ्यांच्या कुटुंबांत घरीं गव्हरनेस ठेवून तिजकडून स्त्रियांस घरगुती शिक्षण देण्याचा प्रघात अलीकडे पडला आहे. तुर्कभाषा व तिजबरोबर फ्रेंच भाषाहि कामचलाऊ शिकविण्यांत येते. कांहीं स्त्रिया पियानोहि वाजविण्यास शिकतात. पण बहुतेक स्त्रिया एकंदरींत अडाणीच असतात.

तुर्कस्थानांत सरकारमार्फत दिलें जाणारें शिक्षण सर्वांस मुक्तद्वार आहे; पण त्याखेरीज ग्रीक व आर्मीनियन जाती आपल्या धर्माचा संबंध ज्यांत आहे असें शिक्षण देतात. त्यांत प्राथमिक, दुय्यम व वरिष्ठ असे तीन प्रकार आहेत व ते धर्मादाय फंडांतून, देणग्यांतून व फी घेऊन दिलें जातें. ग्रीक व आर्मीनियन ह्या दोन्ही ख्रिस्तीच जाती. पण त्यांतहि आर्मीनियांवर ग्रीकांची ताण आहे. प्रत्येक ग्रीक खेड्यांत प्राथमिक शिक्षणाची एक मोफत शाळा आहेच आहे. व ती चर्चला जोडलेली आहे. शाळेंत लिहिणें, वाचणें, अंकगणित व धर्माचें शिक्षण दिलें जातें.शिक्षणाचा प्रसार इतका झाला आहे कीं, अक्षरशत्रु ग्रीक औषधासहि उरला नाहीं. दुय्यम शाळा थोड्या असून त्यांत प्राचीन ग्रीक भाषा, इतिहास, भूगोल वरिष्ठ प्रतीचे अंकगणित शिकवितात. त्याखेरीज धर्मगुरूंची हुकमत नाहीं अशीं दोन कॉलेजें आहेत. सदर कॉलेजांत प्राचीन व अर्वाचीन ग्रीक व लॅटिन भाषा, युरोपांतील प्रमुख भाषा, इतिहास, भौतिक शास्त्रें व वरिष्ठ प्रतीचें गणित हे विषय शिकविण्यांत येतात. धर्मगुरूंच्या ताब्यांत एक कॉलेज असून त्यांतून व्यावहारिक शिक्षण संपादलेले निम्मे व बाकीचे धर्मशिक्षण घेतलेले विद्यार्थी बाहेर पडतात.

ग्रीक शाळांत मुलींच्या शिक्षणाची सोय नाहीं. खेड्यांतील प्राथमिक शाळांच्या खालच्या वर्गांत मुलें व मुली एकत्र बसून अभ्यास करतात. यापुढील शिक्षणाची सोय घरीं गव्हर्नेस ठेवून किंवा मिशनऱ्यांच्या शाळांतून करावी लागते.

आर्मीनियन लोकांची शिक्षणव्यवस्था ग्रीकांसारखीच आहे. प्रत्येक गांवीं प्राथमिक शाळा मोफत आहे. त्यांत मुलगे व मुली एकत्र शिकतात.

कॉन्स्टांटिनोपल व इतर शहरें यांत पुढील शिक्षणाची सोय आहे. सराफ व व्यापारी आपल्या मुलांस विद्याभ्यासासाठीं युरोपांत पाठवितात. स्त्री-शिक्षणांत ग्रीक आर्मीनियन तुर्कांइतकेच मागे आहेत.

यहुदी शिक्षणांत फार मागासलेले आहेत. त्यांच्या कॉन्स्टांटिनोपल, आद्रियानोपल, सालोनिका, स्मरना, अलेप्पो इत्यादि शहरीं शाळा आहेत. तथापि या शाळांतून दिलें जाणारें शिक्षण कनिष्ठ प्रतीचेंच असतें. मुलें बाटतील या भीतीनें त्यांस पालक ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या शाळेंत पाठवीत नाहींत. स्मरन्यास यहुद्यांची वीस हजार वस्ती आहे. पण त्यांची १५० च मुलें शाळेंत शिकतात.

तुर्कस्थानांत सरकारी व ज्या त्या जातींनीं खाजगी प्रयत्नानें शिक्षणाची तरतूद केलीच आहे. पण तिच्यांतील अपुरेपणा भरून काढण्याकरितां अमेरिकन मिशनऱ्यांनीं आशियामायनर, सीरिया व आर्मीनिया या देशांतून शिक्षणाचें जाळें पसरलें आहे. अशा संस्थांतून धर्मप्रसार हा तर प्रमुख हेतु असतोच. पण त्याहीखेरीज सीरिया व आजूबाजूचे देश ख्रिस्ती धर्माचें माहेरघर असल्यामुळें तेथील मूळच्या ख्रिस्ती लोकांची स्थिति सुधारावी व त्यांच्या धर्माभिमानास बळकटी यावी यासाठीं मिशनऱ्यांचा हा प्रयत्न आहे. अमेरिकन मिशनच्या खालोखाल ब्रिटिश व फ्रेंच मिशनऱ्यांचा व्याप आहे. अमेरिकन मिशन आपल्या शाळांतून इंग्रजी, आर्मीनियन व तुर्क भाषांचें लिहिण्यावाचण्यापुरतें शिक्षण, अंकगणित, सूचिकला (Needle work) व ख्रिस्तीधर्मज्ञान देतें. कॉन्स्टांटिनोपलास अमेरिकन मिशनचें रॉबर्ट कॉलेज आहे. हें कॉलेज अमेरिकेंतील रॉबर्ट नामक धनिक व्यापाऱ्याच्या देणगींतून १८६३ सालीं निघालें. त्यांत इंग्रजींतून उत्कृष्ट प्रकारचें शिक्षण दिलें जातें.

ख्रिस्ती धर्माचें माहेरघर जो सीरिया, त्यावर सर्व प्रकारच्या मिशनऱ्याचा मोठा भर आहे. अमेरिकन मिशनऱ्यांखालोखाल सीरियांत फ्रेंचांचें प्रस्थ आहे. त्यांनीं मुलींच्या उच्च प्रतीच्या शाळा काढल्या आहेत. नाझारेथ, एकर, दमास्कस येथील मिशनरी संस्थांतून ११०० पर्यंत विद्यार्थी शिकतात. बिरूट येथें युरोपांतील नाना देशचे लोक हवा खाण्या-

साठीं येऊन रहात असल्यानें मिशनऱ्यांनीं आपले छापखाने घातले आहेत; व त्यांतून देशी भाषांतील शालोपयोगी पुस्तकें छापलीं जातात. कांहीं पुस्तकें अरबी भाषेंतूनहि प्रसिद्ध होतात. बिरूटास मासिकें व वर्तमानपत्रेंहि निघतात. सबंध तुर्की राज्याची युरोपियनांनीं शिक्षण, व्यापार, धर्मप्रसार आणि हक्कसंबंध यांनीं पूर्वींच चाळणी करून ठेवली आहे. आणि सीरिया तर महायुद्धानंतरच्या तहांनीं कागदोपत्रीं फ्रेंचांचा ठरण्यापूर्वींच युरोपियनांनीं कसा गिळंकृत केला होता हें वरील विवेचनावरून लक्षांत येईलच. दमास्कससारख्या मुसलमानांच्या जुन्या राजधानींत मिशनऱ्यांच्या शाळा आहेत. परंतु त्यांत मुसलमानांचीं मुलें क्वचित्‌च शिकावयास जातात. दमास्कसची वस्ती सुमारें दीड लाख आहे. परंतु मिशनच्या शाळेंत अवघे दोनशेंच मुलगे शिकतात. तुर्कस्थान स्वतंत्र असतां मिशनऱ्यांच्या खटाटोपाच्या मानानें मुसलमानांत प्रतिक्रियेचा उद्योग फारसा दिसून न यावा ही आश्चर्याची व खेदाची गोष्ट होय. सीरियांतील स्थानिक प्रॉटेस्टंटांनीं निराळ्याच वळणावर शाळा चालविल्या आहेत. त्या शाळांतून सर्व धर्मांच्या मुलांस घेऊन त्यास ज्या त्या धर्माचें शिक्षण देण्याकरितां ख्रिस्ती पुरोहित, मुसलमानी इमाम आणि यहुदी रॅबी यांची योजना करण्यांत आली आहे.

सारांश, तुर्कस्थानांत शिक्षणाच्या अनेक प्रकारच्या सोयी आहेत. सरकारी शिक्षण संस्था हयगयीनें चालविलेल्या व मागासलेल्या आहेत. यामुळें मुसलमान शिक्षणांत फार मागे पडले आहेत. मिशनरी जातभाईंच्या मदतीनें व अंगच्या हुषारीनें ग्रीक लोक पुढें सरसावले आहेत आणि आर्मीनियनांचा व यहुद्यांचा पंथ वेगळा पडल्यामुळें त्यांच्यांत शिक्षणप्रसार जरूरीपुरता म्हणजे मध्यम झाला आहे. युरोपची प्रगति पाहून मुसलमानी समाज युरोपियनांच्या बरोबरीस आणून सोडण्याची हिंमत अलीकडील सुलतानांनीं बांधली, तरी नव्या जगाचें ज्ञान नसलेल्या आणि जुन्या संस्कारांत वाढलेल्या उलेमांनीं त्यांचें फारसें चालूं दिलें नाहीं.

तुर्की वाङ्मय.

तुर्कांचें तरु युरोपांत नेऊन लावलें आहे, पण त्याचें मन आशिया-

टिकच आहे. त्यांच्या वाङ्मयाचा उगम आरबी व फार्सी भाषांतून झाला आहे. तुर्की साम्राज्यांत पंचवीस भाषा बोलल्या जात असत. तुर्क भाषा ही कधीं आरबी लिपींत तर कधीं फारसी लिपींत लिहिलेली आढळते. कॉन्स्टांटिनोपलांत अनेक भाषांचा गोंगाट ऐकू येतो. आणि त्याचा संस्कार तुर्की भाषेवर झाला असला, तरी तुर्की भाषेचें विशिष्टत्व म्हणून कांहीं वेगळें आहेच. राजकारण व राज्यकारभार या विषयांवर तुर्की भाषेंत ग्रंथरचना बरीच झाली आहे. त्याचप्रमाणें स्फुट काव्यें व महाकाव्येंहि बरींच आहेत. नाटकें, नवलकथा व नीतिपर कल्पित कथाहि पुष्कळ आहेत. या सर्वांची निर्मिति व वृद्धि सुलतानांच्या आश्रयानें कॉन्स्टांटिनोपल राजधानींतच झाली. सोळाव्या शतकांतील सुलतान मुस्तफासारखे कांहीं सुलतान यांनीं स्वतः ही ग्रंथरचना केली आहे.

तुर्की वाङ्मयाचे तीन काळ कल्पितात. प्रथम काळ १३०१ ते १५२०पर्यंतचा त्या काळीं उस्मानी कवींवर फार्सी नवलकथा व गूढकाव्यें यांची घनदाट छाया पडली होती. शहानाम्यांतील बऱ्याच कथा तुर्क कवींनीं उचलल्या; वृत्त व छंद इराणापासून घेतले. दिवाण व चाळीस वजिरांच्या गोष्टी याच काळांतील होत.

तुर्की वाङ्मयाचा मध्यकाळ १५२० ते १७३० पर्यंत टिकतो. हा अभिजात किंवा (classical) काळ होय. त्याचा आरंभ सुलतान पहिला सुलेमान याच्या कारकिर्दींत झाला. याची कारकीर्द तुर्कस्थानास भाग्याची गेली. युद्धप्रसंगीं राष्ट्राचें तेज प्रकटलें म्हणजे लेखकांच्या लेखणीस स्फुरण चढत असतें. सुलेमानांची कारकीर्द याच थाटाची असल्यामुळें फजली प्रभृति अगणित कवी या काळीं उदय पावले.

तुर्की वाङ्मयाच्या तिसऱ्या कालखंडांत युरोपीयन वळण आढळतें. या काळांत नाटकें फार झालीं. मिर्झा फत्तेअली आदिकरून नाटककारांनीं १९ व्या शतकांतील गृह्य व सरकारी नोकरींतील आयुष्यक्रम रेखाटला आहे. अलीकडे वर्तमानपत्रांचाहि प्रसार पुष्कळ होऊन तुर्की भाषा आवेशयुक्त बनली आहे.

तुर्की कवितेंत वृत्तें अनेक आहेत, आणि भाषेच्या लवचिकपणा-

मुळें तिला अनेक आविर्भाव आणतां येतात. फार्सी भाषेंतील एका पौराणिक कथेच्या आधारानें फझली नामक कवींनें 'गुल आणि बुलबुल' कविता रचिली. या कवितेचा जनक महमद फजली कॉन्स्टांटिनोपलच्या जिनगराचा मुलगा होता. तो लहानपणीं सति नामक कवीचा चेला बनला. दरबारचें लक्ष त्याजकडे गेलें. व त्यास मुस्तफा सुलतानानें दिवाणाचा चिटणीस नेमलें. तो १५६३त वारला; त्याचें हें परिणत काव्य होय.

गुल आणि बुलबुल काव्य झणझणीत आणि भपकेदार आहे. तें घोळघोळून विस्तारपूर्वक लिहिलें आहे. तरी पण त्यामुळें रसहानि न होतां रसपरिपोषच झाला आहे. या काव्याचा शेवट गूढार्थवाचक असल्यानें त्याचे अनेक जण अनेक अर्थ करतात, मिर्झा फत्तेअली हा एक नामांकित नाटककार होऊन गेला. त्याचीं सर्व कथानकें तज्जन्य (original) आहेत. तुर्की भाषेंत फ्रेंच, जर्मन किंवा इंग्लिश भाषेंतील कथानकें नाटकांत पर्वापर्यंत उद्धृत करण्यांत येत.

'चाळीस वजिरांचा इतिहास' यांत पुरातन कथा आहेत. या गोष्टी शेख झदा कवींनें सुलतान दुसरा मुराद (१४२१-'५१) याच्या कारकीर्दींत लिहिल्या. त्या गोष्टी त्यानें मुरादासच अर्पण केल्या आहेत. त्या अरेबियन नाईट्सच्या धर्तीवर मनोरंजनार्थ लिहिल्या आहेत. अनेक लेखकांनीं लिहिलेल्या कल्पित अन्योक्ति पुष्कळ आहेत. त्यांत सुलतानांचा जुलमी स्वभाव व दरबाऱ्यांचे लाचलुचपतीचे प्रकार दर्शविले आहेत.

कांहीं उतारे

खालील दोन कविता फझली व अवनी या कवींच्या आहेत.

(गजल)

(चालः—आले हे दास्य देशाला)

जिवाची जागती ज्योती जगीं या मातली प्रीती ॥ ध्रु॰
कपोती प्रीतिच्या म्हणुनी उराशीं ओढुनी धरिती ॥
परी त्या अंतरीं कलिजा अरेरे ! तोडुनी खाती ॥ १ ॥
विखारीं विंचवाच्या कीं जणो नाग्याच लवलवती ॥
तशा त्या भूलता त्यांच्या डसाया फार चळवळती ॥ २ ॥

तयांच्या चूर्ण कचलेखा विषारी सर्पची डुलती ॥
द्वरोनी श्वासितां नुसते, कसे झेंडू न ते फुटती ! ॥ ३ ॥
दिसे चंद्रानना प्यारी वरोनी चंद्रिका ओती ॥
निदानीं त्या निदाघाच्या तपाचे देह चटके ती ॥ ४ ॥
अरेरे इष्कवेडे हे विषाचे वृक्ष वाढविती ॥
उसासे दग्ध हृदयांचे तयांचे शेवटीं उरती ॥ ५ ॥
जिरोनी मर्दुमी सगळी उरे ही मर्दकी माती ॥
भराका प्रीतिचा भुरटा कसा या पाडितो माती ॥ ६ ॥
कटाक्षें विंधुनी तुमचीं हृदें या रक्त प्याल्याती ॥
फुकाचा ' रक्तनयना ' हा निराळा डौल वागविती ॥ ५ ॥
' इमानी या किती मैना ' कवी गातात हें गीतीं ॥
कवींनीं कोणचीं सत्यें जगीं या गोपिलीं नसतीं ? ॥ ८ ॥

(चालः– असे पति देवचि ललनांना)

हलाली एक इस्लामीं । पडावे त्याचिया कामीं ॥
कटावा काफिरी कबिला । असा ये कौल कीं मजला ॥
खुदाचा भक्त हा बंदा । उधाने घेत निकराला ॥
वधाचा शत्रु सैतानी । उभा या धर्मयुद्धा मी ॥
महंमद ! मुख्तरा हातीं । करावी कुमक ही फार्ति ॥

कपोती = कबूतरी; चूर्ण = कुरळ्या; निदानीं = शेवटीं; निदाघ = उन्हाळा; मर्दुमी = मर्दपणा; मर्दकी माती = मरतमढी, पुरुषार्थ रहित; भराका = पक्षी उडून जाताना होणारा आवाज; रक्तनयना = आरक्तनयना, मादिराक्षी; गोपणें = झांकून ठेवणें.

अन्योक्ति

एक माळी व त्याची बायको.

एका माळ्यास तरुण व फक्कड बायको होती. एके दिवशीं नित्याप्रमाणें आपलीं धुणीं धुण्यास ती नदीवर गेली असतां माळी घरीं आला आणि मनांत म्हणाला 'आज एक गंमत करून पाहूं या. माझ्या बाय-

कोची प्रीति मजवर खरोखर आहे कीं नाहीं हें एकदां पाहिलेंच पाहिजे.' असें म्हणून खोलीच्या मधोमध हातपाय पसरून तो मेल्यासारखा पडला.

इतक्यांत त्याची बायको बाहेरून आली आणि आपल्याशीं पुटपुटली, 'बाई बाई' जीव तर अगदीं दमून गेला आहे आणि भुकेनें प्राण कासावीस झाले आहेत. तेव्हां नवरा मेला म्हणूत इतक्यांतच रडावयाला पाहिजे कीं पोटांत घासभर अन्न गेल्यावर अभळशानें रडलें तरी चालेल ?' एवढें बोलून ती खाण्याच्या पुढील उद्योगास लागली. तिनें वाळविलेला मांसाचा तुकडा काढला व निखाऱ्यावर भाजत टाकला. मग ती तशीच माडीवर गेली. मातीच्या थाळ्यांत दूध घेऊन प्याली आणि बाकीचें दूध तिनें चुलीवर तापत ठेवलें. या सुमारास एक म्हातारी खापराचा तुकडा घेऊन तिजकडे विस्तव मागावयास आली. माळ्याची बायको म्हातारी येतांच उठून उभी राहून तिला म्हणाली, 'सासूबाई जरा चुलीकडे नजर असूं द्या बरें.' असें म्हणून तिनें ओक्साबोक्शीं रडावयास सुरुवात केली.

'अगबाई ! माझा नवरा मेला ग बया'

तिचा हा आक्रोश ऐकून शेजारी पाजारी धांवत आले आणि बाईनें रडणें तसेंच चालविलें.

'अग आई, कसं ग माझ्या नवऱ्याला मरण आलं' असें म्हणून तिनें घळाघळा डोळ्यांतून पाणी काढलें.

इतकें होत आहे तों नवऱ्यानें डोळे उघडले.

"हें ग काय करतेस." नवरा म्हणाला "मासाचा तुकडा आधीं भाज, दूध पी आणि मग सावकास रडत बैस"

कारण म्हणच आहे कीं, 'सबसे जीव प्यारा'

विधवा व तिचा वल्लभ.

एक विधवा स्त्री एकटी रहाण्याला कंटाळून लग्न करावें असें मनांत ठरवीत होती. पण जनापवादापुढें तिचें मन कच खाऊं लागलें. तिच्या वल्लभानें जनरीती कशी असते याची ओळख तिला पटवून देण्या-करितां तिच्याच गाढवाला हिरवा रंग फासला. असें तें रंगविलेलें गाढव

हातीं धरून ती सारा गांव हिंडली. तें पाहून लोकांनीं आश्चर्य केलें. कांहीं दिवस असेच गेले आणि मग लोकांचें औत्सुक्य कमी होऊन त्या गाढवाला पाहून गांवकरी म्हणत, " काय तरी प्राणी आहे हा ! "

आणखी थोड्या दिवसांनीं ते लोक गाढवाकडे मुळींच लक्ष देईनासे झाले. त्यानंतर विधवेचा वल्लभ तिजकडे पुन्हां आला आणि म्हणाला, " पाहिलेस मी म्हणतो त्याचा प्रत्यय आला ना ? तूं लग्न केलेस तरी असेंच होणार, कांहीं दिवस तुझा पाट हाच चर्चेचा विषय होऊन बसेल आणि तेवढी कळ तूं सोसलीस म्हणजे लोक सारे विसरून जातील."

गुलाब आणि फुलपाखरूं.

तिफलीस नामें नगरींतील उपवनांत एक गुलाबाचें फुल उगवलें होतें. त्यानें चित्रविचित्र रंगांचें एक फुलपाखरूं शेजारींच फुलाच्या ताटव्यांत भ्रमण करीत असतां पाहिलें.

' हायरे प्राण्या,' त्यास गुलाब म्हणाला, 'तुझें जीवित किती क्षणभंगुर ! तूं आज येथें आहेस तर उद्यां नाहींस. पण मी पहा कसा आहे तो. मी आपल्या झाडावरच बसून असतो, उन्हांत पाकळ्या पसरतो आणि दशदिशा सुगंधित करतो.'

त्यावर फुलपाखरूं उत्तर करतें. ' मला उद्यानांतून स्वच्छंदेंकरून फिरतां येतें. आणि तूं काय बंदिवान.पावसाची सर आली कीं मी कशाचा तरी आश्रय करतों, उन्हाच्या वेळींहि मला अडोशाला जाता येतें आणि माझें जीवित क्षणभंगुर असलें तरी मजेचें आहे कीं नाहीं ! तुझें आयुष्यहि क्षणभंगुर. वावटळ उठलें कीं, तूं जमीनदोस्त होऊन तुझ्या पाकळ्या मातींत मिसळावयाच्या. "

हें ऐकून गुलाबास रागाचा झणकारा आला. ' माझें जीवित अल्प असेल पण तेवढ्यांतच मी सुंदर व सुगंधी आहे खरा. पण तूं काय एक पाखरूं आणि तुला पंख अवघे दोनच.'

उभयतांचें भांडण असेंच चालू होतें तोंच घरधनीण तेथें आली आणि फूल तोडून गेली. तसेंच आम्रवृक्षावर बसलेल्या एका पक्ष्यानें झाप घालून फुलपाखरासहि उचलून नेलें.

माणसें गर्वानें फुगून उगाच आपणास इतरांहून श्रेष्ठ समजतात. सर्व माणसें सारखींच मरणशरण असतात.

(नबी युसफ अफंदी याचा जन्म १८३२ मध्यें झाला. त्यावेळीं चौथा मुराद कॉन्स्टांटिनोपलचा सुलतान होता. कॉन्स्टांटिनोपलास चौथ्या महमदाच्या कारकिर्दींत तो रहावयास आला व महमदाचा कारभारी मुस्तफा पाशा याचा तो प्यार बनला. पुढें त्यानें मक्का व मदिना येथील यात्रा केली. नंतर त्यास कॉन्स्टांटिनोपलास मुद्दाम बोलावण्यांत येऊन त्याची नेमणूक अनातोलियाच्या कोशाध्यक्षाचे जागीं करण्यांत आली. नबी १९१२ त मरण पावला. तो तुर्की वाङ्मयांत अभिजात ग्रंथकार मानला जातो. तो गद्यपद्यलेखक होता. खालील स्तवन त्याचें आहे.)

इस्तंबूलस्तवन.

बा चन्द्रा ! तू आज्ञेचा डोळा आहेस. विद्या व ज्ञान यास इस्तंबूल-शिवाय दुसरा आश्रय नाहीं. तेथील ज्ञानवृक्षाच्या फळाच्या रुची-ची सर दुसऱ्या कशासहि येणार नाहीं. विद्येचें पीठ, थोर पुरुषांचें आगर आणि राजधानींचें ठिकाण अशा या स्थानाची परमेश्वर भरभराट करो. येथें गुणांची चहा होते. येथें सर्व दर्जाचे लोक रहातात. या शहराबाहेरील आयुष्याचा नाश होतो. येथें प्रत्येक धर्तीच्या माणसास आपलें आयुष्य शतांतेनें घालविण्यास सापडतें. आणि गुणिजनांस श्रीमंतांकडून अपमान होण्याची भीति नसते. कॉन्स्टांटिनोपलला सोडून आकाश जगाभोंवतीं व्यर्थ फिरतें. तेथें चित्रकला, शिल्पकला, लेखनकला, परमावधीस पोंचली आहेत. पहा, ही नगरी आपल्या सौंदर्यानें कशी विराजत आहे आणि हा सागर पहा कसा तिला कुरवाळतो आहे.

ते पहा सेंट सोफिया चर्च. त्याचें शिखर म्हणजे आकाशांतील आठवा तेजोगोलच होय. सेंट सोफियाची बरोबरी पृथ्वीच्या पाठीवर नाहींच, पण नंदनवनांत झाली तर कोण जाणे ? इस्तंबूलचे सुलतान जगाचे

बादशहा होत. मनांत आणाल ती वस्तू इस्तंबूलमध्यें आहे. वेचक बे, पाशा, अफंदी येथें रहातात. नरवीर व शहाणेहि येथें रहातात. जगांतील भानगडीचे प्रश्न येथें सुटण्यासाठीं येतात व सुटतात. इस्तंबूलची तुलना इतर प्रांतांशीं करणें योग्य नव्हे. कारण त्या प्रांतांत शहाणा ठरलेला माणूस इस्तंबुलास मठ्ठ समजला जातो.

चाळीस वजिरांचा इतिहास

प्रस्तावना

इराणांत एक मोठा राजा होता. त्यांचें नांव खानकीन.त्याच्या ताब्यांत सप्तद्वीपें होतीं. तो राजा मोठा दयाळू, शहाणा व सद्गुणी होता. त्याचा मुलगाहि परमेश्वरकृपेनें सुंदर होता. तो केवळ मदनाचा पुतळाच होता. तो रूपानें सुंदर व स्वभावानें मोहक होता. शास्त्रें, लेखनकला, धनुर्विद्या व घोड्यावर बसणें हे गुण त्यास अवगत होते. राजाचा तर तो जिवाचा कलिजा होता व प्राणविसावाहि होता. त्याची आई चीनची शुभांगी होती. एके दिवशीं आजारी पडून ती देवाच्या घरीं गेली. तेव्हां राजानें एका मोठ्या राजाच्या मुलीशीं लग्न लावलें.

नव्या राणीचें राजपुत्रावर मन गेलें. ती मनांत म्हणाली ‘तो तर माझा सावत्र मुलगा आहे, पण त्याला काय हरकत आहे ?’ दिवसें दिवस त्याचें सौंदर्य देखून ती फारच भुलून गेली. तिला मदनबाधा सहन होईना. ज्योतिष व फलज्योतिष यांचा अभ्यास करण्याकरितां राजानें राजपुत्रास एका गुरुजीपाशीं शिकण्यास ठेविलें होतें. एके दिवशीं गुरुजींनीं त्याची पत्रिका पाहिली आणि त्यावरून राजपुत्रास पुढील चाळीस दिवस वाईट आहेत असें त्यास आढळून आलें. तो राजपुत्रास म्हणाला ‘ आज मी तुझी पत्रिका पाहिली. त्यावरून तुला ग्रह वाईट आहेत. यासाठीं मी सांगतों तें ऐक, नाहीं तर जिवास मुकशील.’ हें ऐकून राजपुत्राचें तोंड काळवंडलें. तो म्हणाला, ‘तुम्ही सांगाल ती आज्ञा मानण्यास मी तयार आहे.’ मग गुरुजी म्हणाले, ‘ तुझ्या डोक्यावर नागवी तलवार धरली तरी त्वां बोलतां कामा नये.’ त्यानंतर राजपुत्र राजास भेटावयास आला, तेव्हां राजानें त्यास विचारलें ‘ बाळ, आज तूं काय

वाचलेंस व लिहिलेंस!" मुलगा कांहींच बोलला नाहीं. राजा पुन्हां म्हणाला 'माझ्या जीवा! तुझे गुरूजो काय करीत आहेत?" तरी मुलगा बोलेना. तेव्हां राजा, रक्षकापाशीं बोलला, 'मुलाचें मन स्वस्थ नाहीं असें दिसतें. तरी त्यास त्याच्या आईकडे घेऊन जा.' रक्षक त्यास आईकडे घेऊन जाऊन म्हणाला, 'बाईसाहेब, राजपुत्र आज खिन्न आहे. बापानें त्यास किती परोपरीनें विचारलें, पण तो एक अक्षरहि बोलला नाहीं. तेव्हां तो आपणापाशीं बोलला तर बोलेल, म्हणून महाराजांनीं त्यास आपणाकडे पाठविलें आहे.' राणी आनंदानें म्हणाली, 'ठीक आहे, तुम्हीं जावें. मला त्यास वाईट कां वाटत आहे हें समजून घेतलें पाहिजे आणि त्याच्या खिन्नतेचा परिहार केला पाहिजे.'

राजपुत्र आपणापाशीं एकटा आहे असें पाहून राणी त्याच्या गळ्यास मिठी मारून म्हणाली, 'माझ्या प्राणसख्या, असें कोणतें संकट तुजवर आलें आहे. म्हणून तूं इतका खिन्न आहेस? तुझ्या पित्याचें सर्वस्व मजपाशीं आहे; मन मोकळें करून मजपाशीं बोल; मी सांगतें तसा वाग कीं तुझें दु:ख नष्ट झालें म्हणून समज.' राजपुत्र कांहींच बोलला नाहीं. राणी पुढें म्हणाली, 'तूं आतां प्रौढ झालास, मीहि भरज्वानींत आलें. तुझा बाप आतां असून थकला त्यास नीट समजेनासें झालें आहे. तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. मला तूं आपली बायको करून घे म्हणजे तुझ्या बापाला मी नाहींसें करून टाकते, म्हणजे गादी तुझी. मी देवास स्मरून सांगतें कीं, हें मी मनापासून बोलत आहें.' तरी राजपुत्र कांहीं बोलेना.

राणी पुन्हां म्हणाली, 'प्राणप्रिया, मी तुझ्या बापाला कसा मारीन हीच तुला शंका ना! अरे जामदारखान्यांत किती तऱ्हेतऱ्हेचीं विषें आहेत, त्यांतील एखादें विष माणसाच्या पोटांत गेलें कीं, माणूस आजारी पडतो व तीन महिन्याच्या आंत मरतो. लोकांना त्याच्या मरणाचें कारण सुद्धां कळत नाहीं. तो आजारी पडून मेला असें लोक समजतील. व तुला गादी देतील. तूं म्हणशील कीं तूं माझी सावत्र आई, तर मग तुजबरोबर लग्न कसें करावें? त्यावरहि तोड सांगतें. मला माझ्या देशांत पाठीव; मी वाटेनें चाललें असतां माझ्या पाठोपाठ कोणी तरी माणूस पाठीव. त्यानें

चोराचें सोंग घेऊन यावें व मला पकडून घेऊन जावें. सदर इसमापासून तूं मला विकत घे. आणि माझ्याशीं लग्न कर म्हणजे कोणास सुगावा लागणार नाहीं, तरी राजपुत्र बोलेना. तेव्हां राणी चिडली. 'प्रिया, तूं बोलत नाहींस काय?' असें म्हणून तिनें त्याचे गळ्याभोंवतीं हात टाकला आणि चुंबन घेऊं लागली. राजपुत्रानें हिसका देऊन तिच्या तोंडावर हात उरफाटा करून मारला आणि तिचें तोंड रक्तबंबाळ झालें. राजपुत्राची ही वर्तणूक पाहून राणी फारच रागावली. मूर्ख कारट्या, चालता हो. मी तुला राजा करावयाला गेलें काय आणि तूं माझ्या तोंडांत मारलीस काय? दम खा, आतां तुझ्या बापाकडे जातें व त्यास तुझे राई एवढे तुकडे करावयास सांगतें. राणीनें केस पिंजारले, आपल्या लुगड्यास रक्त फासलें आणि तेथें बसून रडूं लागली. राजपुत्र आपल्या खोलींत गेला. राजा कांहीं वेळानें महालांत आला आणि राजपुत्राची हकीकत विचारणार तोंच राणीची ती चर्या पाहून तिला म्हणाला, 'काय ग, हें काय झालें मला सांग.' राणी म्हणाली ' तो तुमचा पाजी मुलगा आहे ना ! असा कुलांगार तुमच्या पोटीं यावा ना!' 'पण झालें काय ? तें तर सांगशील,' राजा म्हणाला. राणीनें उत्तर दिलें ' राजपुत्र खिन्न आहे असें पाहून त्याची मी गांठ घेतली. जवळपास कोणासही राहूं दिलें नाहीं. त्यास तूं दुःखी कां म्हणून विचारलें. तेव्हां त्यानें माझ्यावर हात टाकला आणि म्हणतो काय ' तूं माझी बायको झालीस, माझ्या मनासारखी वागूं लागलीस, तर मी राजाला ठार मारीन व तुझ्याशीं लग्न लावीन. मग सारी संपत्ति, सारा देश, गादी व राज्य आपलें होईल. मी जेव्हां कबूल होईना तेव्हां तो माझा जीव घेण्यास उठला. मी मोठ्यांदा ओरडलें तेव्हां तो निघून गेला. राजा ! तो माझ्या जिवाचा कधीं तरी घात करणार खासः तूं आपल्याहि जिवास संभाळ; नाहींतर जिवापरी जीव आणि राज्यापरी राज्य घालवून बसशील. ' राणीच्या तोंडून हे शब्द कानीं पडल्यावर राजा रागावला व त्या रात्रीं त्यास झोंपहि आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं राजा सिंहासनावर येऊन बसला. त्यानें राजपुत्रास समोर बोलावलें व मारेकऱ्यास त्याचें मुंडकें उडविण्याचा

हुकूम सोडला. पण दरबारी मंडळींनीं जरा राजास थांबवून धरून वजिरास बोलावणें पाठविलें. वजीर येतांच त्यांनीं बायकांच्या शब्दावर विश्वासून असें अनुचित कृत्य करण्यास प्रवृत्त न होण्याविषयीं राजास बजावलें. राजपुत्रानें असें केलें याबद्दल साक्षी पुरावा असला तर त्यास फाशीची शिक्षा फर्मावा. अन्यायानें रक्त सांडूं नये. कारण त्यामुळें मागाहून पश्चात्तापाची पाळी येते. एखाद्या देशांत होत असलेला जुलूम राजानें बंद करावा. कायद्यास सोडून रक्त सांडण्याचें राजास कारण काय? जुलूम राजाच्यानें बंद करवत नसेल तर ईश्वर राजावर चार प्रकारचीं संकटें आणतो (१) तो त्याचें आयुष्य अल्प करतो. (२) शत्रू त्याजवर चढाई करतो (३) देव शत्रूस साहाय्य होतो व त्यास विजय मिळवून देतो. आणि (४) राजास नरकास पोंचवितो. यासाठीं, राजा! स्त्रीच्या शब्दावर विश्वासून हें घोर कृत्य तूं करूं नकोस. एक राजा आपले पुत्र, वजीर, वृद्ध माणसें यांचें ऐकून वागत असल्यामुळें भरभराटीस पोंचला. त्याजप्रमाणें तूंहि वाग. त्या राजाची गोष्ट तुला पाहिजे तर सांगतों. राजा म्हणाला 'गोष्ट सांगा' मग वजीरानें गोष्ट सांगितली.

एक शिंपी व त्याची बायको—

येशू ख्रिस्ताच्या काळीं एक तरूण शिंपी होता. त्याची बायको सुरेख होती. त्या उभयतांचें एकमेकांवर प्रेम असे. एके दिवशीं त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, बायको आधीं मेली तर नवऱ्यानें लग्न करूं नये आणि नवरा आधीं मेला तर बायकोनें लग्न करूं नये. ईश्वरी इच्छेकरून बायको आधीं मेली. शिंपी पुष्कळ रडला. बायकोचें त्यानें दफन केलें व तिच्या थडग्याभोंवतीं तो मिठी मारून रडत बसला. थडग्यावर त्याची सारखी नजर होती. एके दिवशीं जीजस त्या बाजूनें जात होता. त्याच्या दृष्टीस तो तरूण शिंपी पडला. जीजस शिंप्यापाशीं गेला व त्यानें त्यास रडण्याचें कारण विचारलें. तेव्हां शिंप्यानें सर्व हकीगत सांगितली. मग जीजसनें प्रार्थना केली. त्याबरोबर शिंप्याची बायको जिवंत झाली. ती थडग्यांतून दफनाच्या कपड्यानिशीं बाहेर पडली. शिंपी तिला म्हणाला, अशा वस्त्रानें जाऊं नये, यासाठीं क्षणभर येथेंच थांब. मी

घरीं जाऊन तुझे कपडे घेऊन येतों. ते तूं घाल आणि मग आपण मिळून जाऊं ' असें म्हणून शिंपी तडक घरीं गेला. आणि ती स्त्री तेथेंच थांबली. इतक्यांत त्या देशचा राजपुत्र त्याच वाटेनें आला आणि ती सुंदर स्त्री त्याच्या दृष्टीस पडली. राजपुत्र तिला पाहून मोह पावला. त्यानें तिला विचारलें ' तूं कोण ', ती म्हणाली ' मी परस्थ आहे. एका चोरानें मला बुचाडलें आहे.' तेव्हां राजपुत्रानें आपल्या नोकरांस तिला वाड्यांत घेऊन जाण्यास सांगितलें.

शिंपी कपडे घेऊन आला आणि पहातो तों बायको नाहीं ! तो रडत बसला व प्रत्येक जाणारायेणारास तिजविषयीं विचारूं लागला. विचारतां विचारतां त्यास राजपुत्राचे नोकर भेटले. त्यांनीं शिंप्यास रडण्याचें कारण विचारलें. त्यानें घडलेली सर्व हकीकत सांगितली. ' राजपुत्र तिला राजवाड्यांत घेऊन गेला' असें नोकर त्यास म्हणाले. तेव्हां शिंपी राजपुत्रास जाऊन भेटला. व ' माझी बायको कां घेऊन आलास' म्हणून त्यास म्हणाला. राजपुत्रानें त्या स्त्रीस विचारलें, तेव्हां ती म्हणाली ' हा चोर आहे. हा माझे कपडे घेऊन पळाला. तूं त्यास ठार करशील तर त्याबद्दल तुला बक्षीस मिळेल. राजपुत्रानें त्याचे हात बांधून त्यास वधस्तंभाकडे नेवविलें. वाटेनें जीजस भेटला, त्यानें ती मंडळी थांबवून धरली. जीजस स्वतः राजपुत्राकडे गेला. आणि म्हणाला ' ही स्त्री त्या शिंप्याची बायको आहे. मी तिला जिवंत केलें.' त्या स्त्रीच्यानें जीजसचें म्हणणें नाकारवेना. जीजसनें पुन्हा प्रार्थना केली त्या बरोबर ती स्त्री मेली.

एका राणीची लबाडी—

एक मोठा राजा होता. त्याची राणी इतकी लावण्यवती होती कीं तिच्या गालावर रुळणाऱ्या केसांत कित्येकांचे प्राण घुटमळत असत. तिचा एका तरुण सोद्याशीं संबंध होता. ती राजवाड्यांतील एका पेटींत त्याला लपवून ठेवीत असे. एके दिवशीं तो तरुण राणीला म्हणाला ' राजाला ही गोष्ट कळली तर तो आपणा उभयतांसहि ठार करील. राणी म्हणाली 'तो विचार सोडून दे. मी तुला पेटींत ठेवीन आणि राजाला सांगेन कीं, पेटींत माझा प्रियकर आहे. आणि मग राजा तुला मारण्यास उठला कीं, एक

शब्द बोलून त्याला पश्चाताप करण्याची पाळी आणीत. दोघांचें असें बोलणें चाललें आहे तोंच राजा आला आणि राणीनें प्रियकरास सरळ पेटींत घातलें आणि पेटीस कुलूप लावलें.' राजा तिला म्हणाला 'इतक्या घाईनें पेटीचें कुलूप तूं कां घातलेंस?' राणीनें उत्तर केलें 'पेटींत माझा प्रियकर आहे. मी तुम्हाला येतांना पाहिलें म्हणून त्यास पेटींत घालून 'पेटीला कुलूप लावलें.' मग राजाचा राग काय विचारता! त्यानें तलवार उपसली आणि पेटींतून सदर असामीस बाहेर काढून ठार मारणार, तोंच राणी म्हणाली, 'राजा तुला काय वेड लागलें आहे? तुझी अक्कल गेली कोठें? मी अशी काय वेडी लागून गेली आहे कीं, मी एखाद्या तरुणास तुझ्या पलंगापाशीं आणावें आणि तुला म्हणावें कीं पहा पेटींत माझा प्रियकर आहे? माझ्या पातिव्रत्यावर तुझा कितीसा विश्वास आहे याविषयीं मला शंकाच वाटते, असें म्हणून राणी कोपऱ्यांत जाऊन बसली. तें पाहून राजाला आपण काय बोललों याबद्दल पश्चाताप वाटला आणि त्यानें राणीची क्षमा मागितली

गोष्टींचें पर्यवसान—

चाळीस वजिरांच्या चाळीस दिवस गोष्टी झाल्या. चाळीस दिवसांनंतर राजा सिंहासनावर नित्याप्रमाणें येऊन बसला. त्यानें राजपुत्रास घेऊन येण्याविषयीं नोकरांस सांगितलें. त्याला नोकरांनीं पुढें आणल्यावर राजा म्हणाला ' त्याला विचारा कीं अजून तरी राणीनें केलेला आरोप तूं कबूल करतोस कीं नाहीं?' तरी राजपुत्र बोलेना. राजा पुन्हां म्हणाला, ' गप्प बसूं नकोस. तुला बोलण्यास सदर परवानगी आहे! राजपुत्र स्वस्थच. मुख्य वजीर म्हणाला, 'कदाचित् त्याचा गुरू आला तर तो त्यास बोलावयास लावील. गुरुजीस घेऊन या.'नोकरांनीं गुरुजीस हुडकलें. पण ते कोठें सांपडेनात. राजा म्हणाला 'आज माझ्या न्यायाचा मासला समजलाच पाहिजे. वधकास बोलावा. वधक येतांच राजा त्यास म्हणाला,'राजपुत्र आणि चाळीस वजीर यांस नेऊन ठार कर.' नोकर त्या सर्वांस घेऊन गेले. त्यांनीं वजिरांच्या दहा दहाच्या टोळ्या करून त्यांस बसविलें. वधक पुढें झाला आणि राजास म्हणाला 'राजा लक्षांत ठेव. एकदां मुंडकें उडालें कीं, तें कायमचें उडालें. हा पहा तलवार उपसली. त्यानें दोन प्रदक्षिणा घातल्या आणि राजाची

परवानगी विचारली. राजा म्हणाला 'उडीव डोकें!' इतक्यांत गलबला झाला कीं, 'गुरुजी आले.' राजा म्हणाला 'पकडा त्याला' त्यास नोकरांनीं तात्काळ धरून आणिल्यावर राजानें त्यास ठार मारण्याचा हुकूम केला! गुरू राजास म्हणाला 'तूं इतका रागांत कां आहेस? राजा! राजपुत्रानें बोलावें एवढेंच ना तुझें म्हणणें! बोलीव त्याला कीं तो बोलेल. राजानें गुरुजीस विचारलें तुम्हीं त्यास न बोलण्यास कां सांगितलें? गुरुजी म्हणाले 'होय. 'मी त्याची कुंडली पाहिली, तिच्यांत त्याला ४० दिवस वाईट होते. म्हणून त्यास न बोलण्याविषयीं मी सांगितलें. आतां ती मुदत संपली!' नंतर राजपुत्रानें झालेली हकीकत सांगितली. राजानें सर्वांस क्षमा केली व सर्वांची माफी मागितली. राणीस गाढवाच्या शेपटांस व तंगड्यास बांधलें आणि त्यांस चाबूक लगावून पळावयास लावलें. गाढव पळूं लागून राणीचे राई एवढे तुकडे झाले.

परकीय हक्कसंबंध

व्यापाराच्या निमित्तानें फ्रेंच, इंग्लिश आदिकरून बऱ्याच गोऱ्या युरोपियनांनीं तुर्की साम्राज्यांत कायमचा तळ दिला आहे. तत्कालीन सुलतानांस व्यापार ही बाब निरुपद्रवी वाटून किंबहुना व्यापार वाढणें म्हणजे राज्याची भरभराट होणें अशी समजुत पटून त्यांनीं परकीयांस विशेष सवलती व हक्क बहाल करून खुशींत ठेवलें. सुलतान दुसरा महंमद यानें इ.स. १४५२ त कॉन्स्टांटिनोपल शहर जिंकून घेतल्यावर तेथील ग्रीक लोकांस परकीय राज्य सुसह अथवा सुखावह वाटावें यासाठीं सुलतानानें त्यांच्या धर्मांत हात न घालतां सवलतीनें वागविण्याचें ठरविलें. कॉन्स्टांटिनोपल या नव्या राजधानींतील व्यापाराच्या अभिवृद्ध्यर्थ महंमदानें जिनोई व्यापाऱ्यांस राजधानींत ठेवून घेऊन त्यांसहि सवलती दिल्या. महंमदाच्या मृत्यूनंतर सुमारें सव्वाशें वर्षांनीं भाग्यशाली सुलेमान गादीवर आला. त्याच्या कारकिर्दींत फ्रान्सचा राजा पहिला फ्रॅन्सिस आणि स्पेनचा राजा पांचवा चार्लस यांचे दरम्यान पश्चिम युरोपांत वरचढपणाबद्दल एक प्रकारची चुरस लागून राहिली होती त्या वेळीं आपली बाजू मजबूत करण्यासाठीं फ्रान्सिस राजानें सुलेमानाशीं तह जमविल्यामुळें सुलेमानापासून फ्रेंच व्यापाऱ्यांनींहि सवलती मिळविल्या. सन १६२१ त चौथा मुराद

गादीवर आला असतां तुर्की राज्यांत अंदाधुंदी बरीच माजली होती व
सुलतानाच्या हद्दींतील अल्जेरिया व ट्यूनिस या आफ्रिका खंडाच्या भागांत
चाचे लोक इंग्रजांचीं जहाजें वाटेंत गांठून लुटीत असत. त्या बाबतींत
मुरादच्या दरबारीं शिष्टाई करण्यास सर टामस रो नामक प्रसिद्ध इंग्रज
वकील आला होता. सदर वकील या पूर्वींच हिंदुस्थानांत दिल्लीचा
मोगल बादशाहा सेलीम याच्या दरबारीं व्यापारी सवलती मागण्यासाठींच
येऊन गेला होता. तेंच कार्य रोनें कॉन्स्टांटिनोपलासहि साधलें. सन
१६७५ त चौथा महंमद व इंग्लंडचा राजा यांचे दरम्यान नवीन तह
होऊन पूर्वींचे करारमदार बळकट करण्यांत आले. इंग्रजांनीं जे अधि-
कार प्राप्त करून घेतले ते पुढील सुलतानांस साऱ्या युरोपियनांस द्यावे लागले.

तहांतील अटीप्रमाणें आयातनिर्यातीवर जी जकात एकदा बस-
विली असेल ती भरल्यावर परकीयांच्या व्यापारास कोणतीहि हरकत करूं
नये आणि त्यांजवर त्याशिवाय इतर कोणतेहि कर बसविले जाऊं नयेत,
या हक्काचें महत्त्व अतर्क्य आहे. सुलतानास अडचणीच्या प्रसंगीं मालावरील
जकात वाढविण्याची जरूरी असल्यास तो आपल्या मुसलमान प्रजाजना-
पासून वसूल करून घेई. पण गोऱ्या परकीय व्यापाऱ्यांच्याकडे त्यास
वाकड्या नजरेनेंहि पहतां येत नसे. या पुढील हक्क तर अधिकच विलक्षण
आहेत. तुर्कांचा मुसलमानी कायदा व युरोपियनांचा ख्रिस्ती कायदा
या भिन्नपणामुळें ग्रीक प्रजाजनांतील इनसाफ त्यांच्याच धर्मगुरूंच्या न्याय-
मंदिरानें करावा अशी सवलत त्यांस साहाजिकच मिळाली होती. तीच
सवलत इंग्रज, फ्रेंच वगैरे लोकांच्या पदरांत पडून ज्या त्या गोऱ्यांचा फैसला
त्यांच्या त्यांच्या तुर्कस्थानांतील प्रतिनिधीनें (कौंसलनें) करावा असें ठरलें.
त्यांचा तंटा तुर्कांशीं होऊन दाव्याच्या कामीं पक्षकार या नात्यानें तुर्की
कोर्टाची पायरी चढण्याची एखाद्या युरोपियनावर पाळी आल्यास दिवाणी
व फौजदारी कामांत त्याच्या कान्सलास हजर राहण्याची सवड देण्यांत
आली. ह्या सवलती अशा होत्या कीं, त्यामुळें युरोपियनांवर तुर्क सरका-
रची सत्ता चालूं नये. युरोपियनांस मिळालेलें हें स्वातंत्र्य तुर्कांस
फारच नडलें व तुर्कांच्या सत्तेस कीड लागण्यास तेंच मुख्यतः कारण

झालें. जशी हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनी तशी तुर्कस्थानातहि इंग्रजांची लीव्हंट कंपनी होती. तिला इंग्लंडतर्फे व्यापाराचा पूर्ण मक्ता देण्यांत आला होता. सदर कंपनी सन १८२५ पर्यंत चालू होती. १८२६ साली ती मोडल्यावर इंग्रजांस तुर्कस्थानांत सर्वत्र व्यापार करण्याची मुभा मिळाली. या सवलतीनें इंग्रजांची तुर्की साम्राज्यांतील कॉन्स्टांटिनोपल, आद्रियानोपल, स्मरना, ब्रूसा, मोसल, बगदाद, बसरा इत्यादि प्रमुख शहरांत वस्ती वाढल्यामुळें त्यांचा न्यायमनसुबा करण्यासाठीं १८५७ त कान्स्टांटिनोपल शहरीं सुप्रीम कान्स्यूलर कोर्ट ऑफ दि लीव्हंट स्थापन झालें. त्याला अंकित असें लीगल व्हाईस कॉन्स्यूलेट नामक दुय्यम कोर्ट स्मरना शहरास मिळालें. त्याशिवाय इतर शहरांतील कॉन्सलकडे सुप्रीम कोर्टानें दिवाणी अधिकार सोंपविले. सुप्रीम कोर्टास सर्व दिवाणी व फौजदारी अधिकार मिळाले होते. फांशीच्या शिक्षेचाहि अधिकार सदर कोर्टास होता. परंतु अशा गुन्हेगारास तुर्कस्थानांतच फांसावर न चढावितां त्याची रवानगी जवळच्या इंग्रजांच्या अमलाखालील माल्ट बेटांत किंवा इंग्लडांत करण्यांत यावी असा नियम होता.

वरील विवेचनावरून तुर्कस्थानांत इंग्रजी अंमल विवक्षित प्रमाणांत कसा चालू झाला होता याची कोणासहि सहज कल्पना येईल. अशा पद्धतीस (Imperium in imperio) 'साम्राज्यांत साम्राज्य' म्हणतात. ही पद्धति परकीयांस सोयीची असली तरी तुर्कस्थानास अत्यंत अपमानकारक, नुकसानकारक व जाचक होती. तुर्कस्थानचा रहिवाशी व परकीय व्यापारी यांजमधील खटल्याची चौकशी मात्र तुर्की कोर्टांत होत असे. पण अशा खटल्यांत समन्स बजावण्यास तुर्की बेलिफास गोऱ्याच्या घरांत शिरण्याची चोरी होती इतक्याहि अडचणींतून पार पडून खटला कोर्टांत निघाला तर गोऱ्याचा बचाव करण्याकरितां त्याच्यातर्फे कौन्सल हजर रहावयाचाच. तुर्की पोलिसासहि अशीच बंदी असे. सन १८६७ पूर्वी परकीयांस तुर्कस्थानांत जमीनजुमला किंवा घरदार खरेदी करणारास मनाई होती. पण याहि प्रतिबंधांतून कित्येक बिलंदर गोरे पळवाट काढीत. पुरुषाच्या नांवानें असें खरेदीखत करतां न आल्यास बायकोस किंवा

मुलीस कॅथोलिक पंथाची म्हणजे लीव्हंटमधील रहाणारी ठरवून तिच्या नांवें खरेदीखत करतां येईल. अशाच रीतीनें पुरुष आपला सर्व कारभार निर्वेधपणें चालवीत. उलटपक्षीं व्यापारांत अंगलट येऊन दिवाळें काढ- ण्याची पाळी आली तर याच बायका कामास येत. त्यांच्या नांवानें सर्व मिळकत करून दिली म्हणजे गोऱ्या पुरुषांची सावकारांच्या तावडींतून सहज सुटका होत असे. पण १८६७ सालापासून खरेदी-विक्रीचा अधिकार परकीयांसहि मिळाला. लॉसेनच्या तहानें गोऱ्या लोकांचे हक्कसंबंध नष्ट केले आहेत. तुर्कांची या राजकीय वर्चस्वांतून अशा रीतीनें सुटका झाली असली, तरी त्यांजवर युरोपियन व्यापारी कंपन्या आपलें औद्योगिक वर्चस्व कायम राखणार हें लिहावयास नकोच.

देशरचना

तुर्की साम्राज्यांत महायुद्धापूर्वी सामील असलेल्या देशांचें वर्णन सुरू करण्याच्या आधीं तुर्कस्थानचें साम्राज्य महायुद्धांत मोडल्यानंतरची त्या देशांतील राजकीय घडामोड सांगणें जरूर आहे तुर्कस्थानच्या ताब्यांत फ्रेंच आशिया मायनार व कॉन्स्टांटिनोपलसुद्धां पूर्वथ्रेस, एवढाच प्रदेश उरला आहे. त्याखेरीज पूर्वी तुर्की साम्राज्यांत मोडणारे देश म्हणजे आर्मीनिया, सीरिया, आरबस्थान व मेसापोटेमिया हे होत. आर्मीनियास स्वातंत्र्य मिळालें आहे. सीरियाचे तीन तुकडे पडले आहेत, त्यांतील आशिया- मायनरमधील अदाना विलायतपासून पॅलेस्ताईनपर्यंतचा संबंध तुकडा एक असून तो फ्रेंचांच्या ताब्यांत आहे. पॅलेस्ताईन हा दुसरा तुकडा इंग्रजांच्या ताब्यांत असून तो लॉर्ड बॉल्फोर यांनीं कबूल केल्याप्रमाणें यहुद्यांचा स्व- देश करण्याचें ठरलें आहे, त्यावर इंग्लंडतर्फे हायकमिशनर नेमण्यांत आला आहे. ट्रॅन्स जॉर्डिनिया हा तिसरा तुकडा. मक्केचा शेरीफ हुसेन याचे मुलगे दोन एक फैजुल व दुसरा अबदुल्ला. महायुद्धानंतर शेरीफ हुसेन आरब- स्थानचा राजा झाला. फैजुलची स्थापना इंग्रजांनीं बगदाद येथें इराकच्या राजपदावर केली. आणि अबदुल्ला यांस ट्रॅन्सजॉर्डिनियाचा राजा नेमण्यांत आलें. पॅलेस्ताईन व इराक यांची राजकीय स्थिति प्रस्तुत पुस्तकाच्या राजकीय खंडात दिलीच आहे. आर्मीनिया सोडून उरलेल्या प्रदेशाची राजकीय

माहिती खालीं देत आहें. आरबस्थानचा तुर्कांच्या साम्राज्यांत पूर्वी मोडत असलेला भाग म्हणजे हेजज होय. मक्केचा शेरीफ हुसेन हा आपणास सदर प्रांताचा राजा म्हणवितो. परंतु हुसेनचा कारभार तत्प्रांतीय आरबांस नापसंत पडून यांनीं हुसेन राजास पदच्युत केलें व त्याच्या गादीवर ट्रॅन्स-जॉर्डीनियाचा राजा व हुसेनचा पुत्र अबदुल्ला याला यास बसविलें. परंतु त्यानंतर अलीकडे इब्न सौद नामक वहाबी लोकांच्या पुढाऱ्यानें मक्केवर स्वारी करून अबदुल्लयास पिटाळून लावलें व तेंव्हांपासून इब्न सौद हाच या प्रदेशाचा कारभार पहात आहे.

सीरिया—

महायुद्धानंतर सीरिया फ्रेंचांच्या सत्तेखालीं आला. अमीर फैजुल याची इराकच्या गादीवर सोय लागेपर्यंत अमीर फैजुल सीरियांतच राहिला. फ्रेंचांनीं त्यास सीरिया सोडून जाण्यास लावलें व मॅंडेटप्रमाणें आपला अंमल त्यांनीं सीरियावर बसविला. मॅंडेटच्या आधारें सीरियाचा कबजा घेतल्यावर फ्रेंचांनीं सीरियाचे वेगवेगळे तुकडे पाडले आणि प्रत्येक प्रांतास अन्तर्गत स्वातंत्र्य देऊन त्या प्रत्येक प्रांतावर लोकांनीं निवडलेला एक अध्यक्ष,त्याचे एक लोकनियुक्त सल्लागार मंडळ अशी व्यवस्था करण्यांत आली. ही व्यवस्था लेबानन व दमास्कस प्रांतांतील झाली; पण ड्रूज लोकांचा देश हारॉन यास हें वेगळें स्वातंत्र्यहि मिळालें नाहीं. त्यांना लोकनियुक्त कौंसिल नाहीं व लोकनियुक्त अध्यक्षहि नाहीं. कॅप्टन कारविआलेट या फ्रेंच अधिकाऱ्यास यांजवर फ्रेंचांनीं गव्हरनर नेमलें. पण तो ड्रूज लोकांस अप्रिय असल्यामुळें त्यांनीं त्याजविरुद्ध तक्रारी केल्या, पण त्या फ्रेंचांनीं जुमानल्या नाहींत.

ड्रूज लोक सीरियांतील दक्षिण लेबानन व प्रतिलेबानन (Anti-Lebanon) यांचे दरम्यान राहतात. दक्षिण लेबाननमध्यें त्यांची ४० शहरें व खेडीं आहेत. व प्रतिलेबाननांत ८० खेडीं आहेत. त्यांच्या शेजारीं ख्रिस्ती लोकांचीहि वस्ती आहे. या भागांतील ख्रिस्त्यांपेक्षां ते संख्येनें कमी आहेत. तरी पण बुद्धिमत्ता व नीतिमत्ता या गुणांमुळें त्यांचा पगडा ख्रिस्त्यांवरहि आहे. ड्रूज लोकांनीं ख्रिस्त्यांची कत्तल केली. या सब-

बीवर फ्रेंचांनीं सन १८६० मध्यें या प्रदेशावर स्वारी केली. तथापि ड्रूज व ख्रिस्ती यांचें हाडवैर मूळ युद्धापासून आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इतर मुसलमानांच्या मतानें ड्रूजलोक धर्मलंड आहेत. कारण ते मशिदींत जाऊन नमाज पढत नाहींत. परंतु ड्रूज लोकांना वाटतें कीं, निमाज मशिदीबाहेरहि पढतां येतो, तर मशिदींतच गेलें पाहिजे हा आग्रह व्यर्थ होय. ते इतर मुसलमानांशीं अननुरूप असें एकपत्नीव्रत पाळतात. सन १९२१ सालीं फ्रेंचांनीं ड्रूज लोकांस फारच कडकपणानें वागविलें. याचा परिणाम असा झाला कीं, १९२३ मध्यें सुलतान नेसीब अॅत्राश यानें ड्रूज सरदारांच्या मदतीनें फ्रेंचांविरूद्ध बंड केलें, सदर बंडाचा बीमोड सेनापति बेगंड याजकडून व्हावा तसा झाला नाहीं.

सन १९२४ सालीं से. सरेल यास सीरियाचा हाय कमिशनर नेमण्यांत आलें. व त्याच्या हाताखालीं कॅप्टन कारबिऑलेट हा गव्हरनरीचें काम करूं लागला. कारबिऑलेट कर सक्तीनें वसूल करी. जून १९२५मध्यें कारबिऑलेट रजेवर गेला व दमास्कस येथें जाऊन ड्रूज लोकांचें शिष्ट मंडळ से. सरेल यांस भेटलें व त्यास कारबिऑलेट याची पुन्हा सीरियांत गव्हरनर म्हणून पाठवणी होऊं नये अशी त्यांनीं विनंति केली. से. सरेल यांनीं ती विनंति न मानल्यामुळें शिष्टमंडळाचा पुढारी नेसीब अॅत्राश यानें त्यास खडखडीत जबाब दिला कीं, ' ठीक आहे. याचें उत्तर बंदुकीच्या नळींतूनच तुम्हांस मिळेल.' तेव्हांपासून ड्रूज जनता अधिकच खवळली. ता. १८ जून रोजीं नेसीब बिरूटास दोघा ड्रूज सरदारांस भेटला व थोड्या दिवसांतच त्यांनीं बंडाची सिद्धता केली. जूनच्या १९ व्या तारखेस कारबिऑलेट परत गव्हरनरीच्या जागेवर रूजू झाला. व त्या दिवसापासून बंडाचें निशाण उघडपणें फडकत राहिलें. आगष्ट महिन्यांतच दमास्कसमध्यें १५०० ड्रूजांनीं घुसण्याचा प्रयत्न केला व त्याप्रमाणें ते आंत घुसल्यावर फ्रेंच फौजेनें से. सरेल याच्या हुकुमानें किल्ल्यावरून दमास्कस शहरावर तोफा डागल्या व शहरांतील बऱ्याच इमारती जमीनदोस्त होऊन त्याखालीं दडपून हजारो माणसें मरण पावलीं. से. सरेल यानें नागरिकांस शहर सोडून जाण्याची आगाऊ इशा-

रत न दिल्यामुळें हा नाश झाला. त्याबद्दल त्याजवर टपका येऊन त्यास फ्रेंच सरकारानें परत बोलावून नेलें.

ट्रॅन्सजॉर्डन—

पॅलेस्ताईनचें छत्र ग्रेटब्रिटननें मिळविलें आहे. त्याचाच ट्रॅन्सजॉर्डन किंवा टॅन्सजार्डार्निया हा एक भाग आहे. याच्या उत्तरेस फ्रेंचांच्या छत्राखालील सीरिया, पश्चिमेस जॉर्डन नदी व मृत समुद्र, दक्षिणेस हेजझचें राज्य व पूर्वेस मेसापोटेमिया अशा चतुःसीमा आहेत. थोडक्यांत सांगावयाचें तर ट्रॅन्स-जॉर्डन म्हणजे पॅलेस्ताईनच्या बाजूनें जॉर्डन नदी पलीकडचा प्रदेश होय. इंग्रजांस सुएझ कालव्याचें रक्षण करावयास पॅलेस्ताईन व जॉर्डन पली-कडचा प्रदेश महत्त्वाचा आहेच. पण त्याखेरीज सुएज कालवा इंग्रजांच्या हातचा गेला तर इंग्लंडचें हिंदुस्थानाबरोबर दळण वळण न तुटण्यास पॅलेस्ताईन व ट्रॅन्स जॉर्डन यांचा फारच उपयोग आहे. कारण पॅलेस्ता-ईन, ट्रॅन्स जॉर्डन व मेसापोटेमिया हे एकमेकास लागलेले देश आतां इंग्लंडच्या ताब्यांत आल्यामुळें भूमध्यसमुद्रांतून इराणचें आखात गांठा-वयाचा मार्ग इंग्लंडास या रीतीनें निर्वेध मिळाला. पॅलेस्ताईनपासून मेसापोटेमियापर्यंत पसरलेली जमीन चालून जाण्यास झालेल्या मोटा-रच्या सोयीमुळें हा एक नवा मार्ग इंग्लंडास उपलब्ध होत आहे

जॉर्डन नदीचा काठ हा काय तो यांतील सुपीक प्रदेश होय. त्यांत नारिंगें, केळीं व कापूस पिकतो. उत्तरेच्या भागांत गहूं व बार्ली पिकते. मदिरेहून दमास्कस व बगदादकडे जाणारा रेल्वेचा फाटा ट्रॅन्स-जॉर्डन प्रांतांत सांपडतो. वस्ती अजमासें दोन लक्ष असून त्यांत ख्रिस्ती १८ हजार आहेत. बाकीचे मुसलमान आहेत. बहुतेक लोक खेड्यांत रहातात. शहरें अशीं आमान व सॅालट हीं दोनच. या दोन शहरांत बरेच परदेशस्थ वस्ती करून आहेत.

ट्रॅन्स जॉर्डन प्रांताची राजधानी आमान. येथें मोटारींतून जेरूस-लेमहून जाण्यास अवघे पांच तास लागतात. सॅाल्ट हें दुसरें शहर फारच शांत आहे. त्यांत १८ हजार वस्ती आहे. तें शहर चढावर असल्यामुळें खालचा मजला एकाच्या मालकीचा व दुसरा मजला

वरील रस्त्याशीं येत असल्याकारणानें तो दुसऱ्याच्या मालकीचा असें बहुधा घडतें. तुर्कांशीं युद्धतहकुबी झाल्यानंतर ट्रॅन्स जॉर्डन हा प्रांत इंग्रजांनीं आपल्या छत्राखालीं घेतला. अमीर अबदुल हा तेथील राजा म्हणून इंग्रजांनीं कबूल केला असून त्याला एक मंत्रिमंडळ देण्यांत आलें आहे. राजा उधळ्या वाटल्यावरून त्याला १९२१-२२ मध्यें २७ लक्ष रुपयांची जी नेमणुक होती, ती छाटीत छाटीत १९२४-२५ सालांत १॥। लक्ष रुपयांवर आणिली. राज्यकारभार अमीर अबदुल व त्याचा मुख्य प्रधान पहातो. मक्केचा राजा हुसेन यास दोन मुलगे. एक मुलगा फैजुल इराकचा राजा आहे व अबदुल्ला ट्रॅन्स जॉर्डनचा राजा आहे. अबदुला ३८ वर्षांचा आहे. हुसेन यास मक्केच्या लोकांनीं पदच्युत केल्यावर हेजाझचा राज्यकारभार अबदुल्ला याजकडेच आला. अबदुल्ला वस्तुतः नामधारीच राजा असून खरा कारभार ब्रिटिश अधिकारीच पहातात.

आशिया मायनर—

आशिया मायनर या इंग्रजी शब्दाचा सरळ मराठी अर्थ सरहद्दीचा व धाकटा आशिया असा होतो. आशिया खंडाच्या पश्चिमचा युरोपास अगदीं नजिकचा असा हा प्रदेश होय. यास अनातोलिया असेंहि ग्रीक नांव आहे. व तेंच नांव युरोपांत प्रचलित आहे. ग्रीस, रोम व इराण या राष्ट्रांनीं हा देश अनेक वेळा तुडविला आहे, व त्यावर तुर्कांपूर्वीं आपला अंमल चालविला आहे. यामुळें त्यांचीं नांवेंहि वेळोवेळीं बदलत गेलीं आहेत. रोमन साम्राज्य मोडल्यावरहि त्याचा लौकिक अनेक शतकें दूरदूरच्या देशांतून पसरून राहिला होता. त्याप्रमाणें मराठ्यांसहि रोमन लोकांच्या नांवाची व त्यांच्या साम्राज्याची पुसट माहिती असल्यामुळें मराठे लोक आपल्या वैभवकाळीं रूम या नांवानें व त्यास अलीकडे लागून असलेल्या सीरियास शाम या नांवानें ओळखीत असत. हीं नांवें त्याहि देशांतून एक वेळ प्रचलित होतीं, व आजहि आहेत. रूम—शामवर आपलें निशाण रोवलें म्हणजे आपल्या बाहुबलाची पराकाष्ठा झाली अशी पेशवाईतील सदाशिवराव भाऊ सारख्या वीर पुरुषांची समजूत होती व ती यथार्थ नव्हती असें कोण म्हणेल ?

आशियामायनर साडेसहाशे मैल लांब व चारशें मैल रुंद आहे.

याचें क्षेत्रफळ फ्रान्सएवढें भरेल. उत्तरेस काळा समुद्र व दक्षिणेस भूमध्य समुद्र यांनीं अंकित आणि पूर्वेकडून आर्मीनिया व सीरिया यांपासून विभक्त करणारी तारस वगैरे पर्वतांची रांग असलेल्या या देशाची औद्योगिक स्थिति हिंदुस्थानासारखीच आहे हें सहज लक्षांत येणार आहे. आशियामायनरांतून पूर्वेकडून बाहेर पडण्यास तारस पर्वतांतून एक खिंड आहे. डरायस या सुप्रसिद्ध इराणी बादशहास पिटाळून लावल्यावर शिकंदर याच खिंडीनें युफ्रातीस नदीच्या दरींत उतरला. जमिनीच्या उंचसखलपणामुळें हवेंत पुष्कळ वैचित्र्य आलें आहे. पश्चिम किनाऱ्याजवळील हवा कांहींशीं उष्ण असून तेथील उष्णतामान उन्हाळ्यांत ८४ ते १०० अंशाइतकें रहातें. उत्तर किनाऱ्यावरील हवा तितकीच उष्ण आहे. पाऊसहि वर्षभर मधून मधून पडतो. किनारा सोडून आंतील उंच प्रदेशांत हिंवाळा कडक व दीर्घकालीन असतो. चार महिने हिमहि पडतें. उन्हाळा मात्र थोड्या दिवसांचा सोबती. तारस पर्वतांत थंडीचा कडका फार. पर्वतांच्या रांगा अनेक असून त्या पूर्व पश्चिम पसरल्या आहेत. या रांगांमधून उंच पठारें आहेत आणि त्या पठारांवरून अनेक नद्या वहात वहात आर्किपेलागोस जाऊन मिळतात. पठारांच्या तक्तावर सरोवरांचे ठिपके पुष्कळ पडलेले आहेत. तारस पर्वत अगदीं दक्षिणेस आहे. प्रतितारस मध्यभागीं व पूर्वेस आहे. आशियामायनराच्या उत्तर किनाऱ्याजवळील डोंगराच्या उतरणीवर पुष्कळ उपयुक्त जातींचीं अरण्यें आहेत. यांतील ॲश व ओक जातीच्या झाडांचीं जहाजें बांधण्याकडे उपयोग होतो. तारस पर्वतांतहि दाट जंगल पुष्कळ आहे.

जमीन सुपीक व हवापाणी विविध असल्यामुळें आशियामायनरमध्यें नाना प्रकारचें पीक येतें. तुतीचीं झाडें लावून व त्यावर रेशमाचे किडे वाढवून रेशीम उत्पन्न करतात आणि ऑलीव्ह झाडांच्या लागणीपासून तेल काढतात. खसखस, अफू व तंबाखू यांचें पीक उत्तम व दांडगें येतें. अंजिरांचे बाग, द्राक्षांचे मळे व इतर फळझाडें व खरबुजें यांची लागवड पुष्कळ होते. तांदूळ, सातू, तीळ, मका व ऊंस, ताग, कापूस यांचें उत्पन्न मोठें आहे. ज्यांच्या पासून अनेक रंग, तेलें व रोंगणें तयार

होतील अशीं व्हॅलेनिया, मॅस्टिक या प्रकारचीं झाडें मोठ्या प्रमाणावर उगवतात. अंगोरा शहराच्या आसपासची लोकर रेशमासारखी मऊ व तकतकीत असते. तांबें, रुपें, लोखंड, शिसें, सैंधव, संगमरवरी दगड यांच्या खाणी विपुल आहेत.

आशियामायनराच्या पश्चिमेस आर्किपेलागोचा समुद्र बऱ्याच बेटांनीं ठिगळला असून त्यांतील लेमनास, मिटिलीन, स्कान्हानोव्हा व ऱ्होडस हीं बेटें ठळक होत. या सर्व बेटांतून मुख्य वस्ती ग्रीक लोकांची. लेमनास-मधील स्त्रिया लावण्याविषयीं आणि पुरुष नौकानयनाविषयीं विख्यात आहेत. मिटिलीन बेट मोठें मनोहर आहे. त्यांतील बराच भूभाग पाईन वृक्षांच्या अरण्यांनीं झाकून गेला आहे. ऑलिव्हांच्या राया बहुत आहेत. स्किओ नामक बेटांतून लिंबें, नारिंगें, व मद्य परदेशीं रवाना होतें. होरेस कवीनें आपल्या काव्यांत वाखाणलेलें मद्य तें हेंच. स्कालानोव्हा बेटांत गतकाळांत मोठमोठे तत्त्वज्ञ व कवि निर्माण झाले. यांतून द्राक्षें, तेलें व व्हॅलोनिया नामक विख्यात मद्य बाहेर देशीं जातें. ऱ्होडस बेटांतूनहि मेण मध, तेल व नाना प्रकारचीं फळें यांची निर्गत चालते.

आर्मीनिया—

हा देश फार प्राचीन आहे. त्याचे तीन तुकडे पडून रशिया, इराण व तुर्कस्थान यांत तो वाटला गेला. तुर्कांच्या ताब्यांतील आर्मी-नियाच्या उत्तरेस काळा समुद्र व त्याचा रशियानें घेतलेला जॉजिया प्रांत, पश्चिमेस आशिया मायनर, पूर्वेस सीरियाचें रण व मेसापोटेमिया आणि दक्षिणेस इराण आहे. आर्मीनियांत अनातोलियापेक्षां झाडी कमी आहे; पण पाण्याची समृद्धि आहे. हिंवाळा आक्टोबरांत सुरूं होतो व मे महिन्यांत संपतो. यामुळें जमीन आठ महिने हिमाच्छादित असते. उंच पठारावर उन्हाळा इतका कडक असतो कीं, त्यानें जमीन अगदीं करपून निघते. पण तो टिकतो फक्त दोन अडीच महिनेच. यांत मोठी नदी आरास ती पांचशें मैल दक्षिणेस वहात गेल्यावर कर नदीस मिळते. व कर नदी तेथून थोडे मैल पुढें कास्पियन समुद्रास शरण जाते. युफ्रातीस व तैग्रीस या दोन महा-नद्या आर्मीनियांतच उगम पावतात. तैग्रीस नदीच्या तीरावर मोसल शहर

वसलें आहे. तैग्रीस बगदादवरून जाते व बगदादच्या खालीं वीस मैलावर युफ्रातीस नदीशीं एकरूप होते. या दोन नद्यांचा संगम झाल्यावर पुढें वहाणाऱ्या नव्या नदीस त्यांपैकीं कोणत्याहि नदीचा पाणउतारा न व्हावा म्हणूनच कीं काय शर एल आरब हें नवें नांव देण्यांत आलें आहे.

आर्मीनियाच्या पश्चिमेस काळ्या समुद्रावर त्रिबिझोंद बंदर आहे. अर्झरूम ही आर्मीनियाची राजधानी. त्रिबिझोंदहून अर्झरूम व अर्झरूमवरून इराणच्या सरहद्दीपर्यंत एक मोठी सडक बांधली आहे. व्हॅन नामक प्रशस्त सरोवर आर्मीनियांत आहे. तें ७० मैल रुंद आहे. त्यांत सुंदर बेटें पुष्कळ आहेत. आर्मीनियन चर्चचा जगद्गुरु (पॅट्रिआर्क) सदर सरोवरावरील आल्दिजिवास गांवीं रहातो. व्हॅन सरोवर व त्याचा परिसर अत्यंत रमणीय आहे. मनुका, ॲप्रिकॉट, पीच, अंजीर व द्राक्षें यांचें वैपुल्य आहे.

आर्मीनिया व त्याच्या आजूबाजूच्या भागांत दरवेशी जातीचे बरेच शेख आहेत ठिकठिकाणीं तुर्बती बांधून त्यांच्याशेजारीं ते महंत होऊन बसतात. निपुत्रिक स्त्रिया पुत्रप्राप्तीच्या आशेनें त्यांची सेवा करतात. या तुर्बती बहुधा मेलेले खेचर किंवा घोडे पुरून त्यावर बांधलेल्या असतात.

कुर्दिस्तान—

आर्मीनिया व कुर्दिस्तान यांचे दरम्यान व्हॅन सरोवर आहे. त्याचा उत्तर भाग आरारार पर्वतावर चढला आहे. तुर्कस्तान व इराण यांच्या पूर्वीच्या सरहद्दीवरील हा प्रदेश. यांत लहान मोठ्या बऱ्याच नद्या असून त्या सर्व तैग्रीस नदीस मिळतात. येथें उन्हाळा व हिंवाळा आर्मीनिया व अशिया मायनर यांपेक्षां कमी जाणवतो. यांतील डोंगराळ प्रदेश पाईन, ओक, ॲश, व अक्रोड या मौल्यवान वृक्षराजींनीं आच्छादला आहे. दऱ्यांखोऱ्यांतून तुतींचीं झाडें विपुल आहेत. कपाशी, तंबाखु, ताग, गहू, डाळी, मका, एरंड्या, लिंबें, पंपाकिन, द्राक्षें व इतर फळफळावळ मुबलक पिकते. कुर्दिस्तानाची मोठी व्यापाराची पेठ व राजधानीचें शहर म्हटलें म्हणजे दायर बकर. मोसल हें दुसरें शहर असून त्या भोंवतालचा प्रदेश अत्यंत सुपीक आहे.

कुर्दिस्थानांत कुर्द, आरब, तुर्क व ख्रिस्ती यांची वस्ती आहे. या प्रांतासंबंधानें तुर्कस्थान व इंग्लंड यांजमध्यें वाद माजला असून राष्ट्र-संघानें नेमलेल्या कमिशनानें मोसल शहर तुर्कांकडे रहावें व बाकीचा इराकाच्या लगतचा भाग इराकास मिळावा म्हणजे इंग्लंडच्या छत्राखालीं जावा असा निकाल दिला आहे. इराकच्या संरक्षणास या प्रदेशाची इराकास गरज आहे असें इंग्लंडातर्फे भासविण्यांत येत असलें, तरी तेथील तेलाच्या खाणींच्या अभिलाषानें इंग्लंडच्या तोंडास पाणी सुटलें आहे असें सर्वत्र लोकमत आहे.

मेसापोटेमिया—

आल्जेरिया, इराक आरबी व कुर्दिस्तान यांचा समावेश मेसापोटेमियांत एक वेळ होत होता हें खरें, तरी पण अलीकडे कुर्दिस्तान वेगळा निघाला आहे. इतिहासप्रसिद्ध बाबिलोनिया, खाल्डिया व असीरिया हीं राष्ट्रें मेसापोटेमियाच्याच मातीस मिळालीं आहेत. पूर्वीचा बाबिलोनिया व खाल्डिया म्हणजे हल्लींचा इराक आरबी आणि मागचा असीरिया म्हणजे आजचा कुर्दिस्तान. सरकारी कागदोपत्रीं मेसापोटेमियाचें अल्जेरिया असें नांव लागलें आहे. युफ्रातिस व तैग्रिस नद्यांमधील दुआब आल्जेरियांत मोडतो. आल्जेरियाचा अर्थ दुआब किंवा दोन नद्यांमधील बेट. मेसापोटेमियाचा अफाट प्रदेश युफ्रातीस व तैग्रीस या नद्यांचें पाणी पितो. कुर्दिस्तानांतील दायर बकर शहराखालीं युफ्रातीस मेसापोटेमियांत पाऊल टाकते. तिच्यांत ८५० मैल अंतरापर्यंत जहाजें चालतात. युफ्रातिसच्या उत्तरेकडून पूर्वेकडे तैग्रीस नदी वहात जाते. बगदादच्या वरच्या अंगास तिचा रोख दक्षिणेकडे दिसतो आणि बगदादमधून खालीं गेल्यावर ती युफ्रातीस नदीस समांतर वहाते. बगदादपाशीं तैग्रीस व युफ्रातीस या नद्यांमधील अंतर तीस मैलांहून अधिक नाहीं. बगदादपासून खालीं शट एल् हाय नामक कालव्यानें या दोन्ही नद्या एकत्र जोडल्या आहेत. तेथून पुढें त्यांजमधील अंतर वाढत जाऊन कुर्ना गांवापाशीं दोन्ही नद्यांच्या संगमांतून शट् एल् आरब नदी निर्माण होऊन ती पुढें १५० मैल वहात गेल्यावर

इराणी आखातास मिळते. शट एल् आरब बाराशेंपासून सातशें फूट रुंद व तीस पासून वीस फूट खोल आहे.

मेसापोटेमियाची कमाल लांबी ६३० मैल व रुंदी ४०० मैल आहे. हा देश त्रिकोणी असून त्याच्या पूर्वेस इराण, व उत्तरेस कुर्दिस्तान आहे. दक्षिणेस व पश्चिमेस अरबस्तानचें रण आहे. लोकसंख्या अदमासें बारा लक्ष भरेल. युफ्रातीस व तैग्रीस या दोन महा नद्या सदर प्रांताचें खरें भूषण होय. युफ्रातीस नदीच्या दक्षिणेस सीरियाचें रुक्ष रण आणि तैग्रीस नदीच्या उत्तरेस डोंगराळ प्रदेश लागतो. संस्कृतीच्या उत्पादनास व संगोपनास या दोन नद्यांच्या चिमटयांतील भूमिभागाइतका धनधान्यसमृद्ध भूमिभाग आजबाजूस बऱ्याच अंतरापर्यंत नाहीं. आर्यावर्तांतील गंगा-यमुनांचा तीरप्रदेश आर्यांस व त्यानंतर मुसलमानांच्या अनेक जातींस ज्या कारणांनीं पसंत पडला, त्याच कारणांनीं गेल्या ४।५ हजार वर्षांत युफ्रातीस व तैग्रीसचा तीरप्रदेश दक्षिणेकडील सेमिटिक जातींनीं व उत्तरेच्या तुर्क-तातारांनीं उपयोगी ठरविला. बाबिलोनियन, असीरियन व खाल्डियन यांनीं सदर दोन नद्यांस दुरून हुडकीत येऊन त्यांच्या जिवावर आपला जगविख्यात संसार थाटला. गंगा-यमुना ही जशी आर्यांची कर्मभूमि, त्याचप्रमाणें युफ्रातीस व तैग्रीस यांनीं आपला हात फिरवून सुपीक व सजल करून सोडलेली भूमि कर्मभूमि ठरून वर नमूद केलेल्या तीन संस्कृतीस प्रसवती झाली. आणि त्यानंतर महंमदीय अमदानींत आबासद घराण्यानें तिला पावनत्व आणिलें. तैग्रीसच्या तीरावरील बगदाद आणि युफ्रातीस नदीवरील हुसेनच्या रक्तसिंचनानें पुनीत झालेला करबेला हीं मुसलमानांचीं पवित्र तीर्थेंच होत. त्याखेरीज बाबीलोन व निनवी या प्राचीन शहरांचे अवशेषहि येथेंच पहावयास सांपडतात. सुपीक प्रदेशाचा गुण असा आहे कीं, तो आपल्यावर रहावयास आलेल्या मऊ मातीप्रमाणेंच मानव वंशास कालान्तरानें मऊपणा आणतो. मध्य आशियांतून उतरलेला धिप्पाड व क्रूर तातार वरील नद्यांचें पाणी पिऊन व अन्न खाऊन ढिला व सुखलोलुप बनला आणि सीरियाच्या रणांतून तीव्र उन्हांत तापून आलेला आरबहि असाच थंडावला. तीं सर्व सुसंस्कृत

राष्ट्रें नव्या दमाच्या मानववंशाचे दास होऊन बसलीं. आणि या दोन्ही नद्यांच्या काळ्याभोर मातीस जसे ग्रीक, रोमन व इराणी या लोकांनीं पायाखालीं तुडविलें त्याचप्रमाणें त्याच मृत्तिकेचा ज्याचा पिंड त्या मानववंशाच्या शिरावर त्यांचे पाय पडले. जनता नाजूक, नरम व सुखलोलुप होण्यास मेसापोटेमियाची हवाहि बरीच कारणीभूत झाली आहे. एकटच्या बगदादचें हवामान वर्णिलें म्हणजे त्यावरून समग्र प्रांताची अटकळ बांधणें अवघड नाहीं. बगदादची हवा तशी निरोगी आहे, पण तेथील उन्हाळा फार कडक व त्याचें कारणहि उघड आहे. सीरियाचें रण तापलें म्हणजे त्यावरून उष्ण वारे सुटतात. दोन प्रहरपासून अस्तमानापर्यंत असा वारा सारखा वहात असतो. मात्र रात्रीं अगदीं थंडगार असतात म्हणून बगदादास उन्हाळ्यांत रहाववते तरी. घरें धाब्याची असून त्यांवर मे महिन्यापासून सपटेंबरपर्यंत लोक रात्रीचे सुखानें झोपीं जातात. त्याखेरीज दिवसा विश्रांति घेण्यास लोकांनीं घराखालीं थंड तळघरें बांधलीं आहेत. हिंवाळ्यांत हिम पडत नाहीं तथापि घराबाहेर उघड्यावर पाण्याचें भांडें भरलेलें असलें तर त्याजवरच पाण्याचा थर थिजतो. मेपासून सपटेंबरअखेर पांच महिने उन्हाळा असतो व सपटेंबर महिना उलटला कीं, पावसास सुरुवात होते. उभ्या वर्षांत पर्जन्याचें मान ३५ इंचापर्यंत असतें. तैग्रीस नदीस पावसाळ्यांत आणि आर्मीनिया व कुर्दिस्तान या उगमाजवळच्या देशांत उन्हाळ्यांत बर्फ वितळूं लागलें म्हणजे मोठाले पूर येतात. तैग्रीस व युफ्रातीस या दोन्ही दुथडी भरून भोंवतालच्या शेतांतून पसरतात व सर्वत्र अफाट सरोवरासारखा देखावा दृष्टीस पडतो. १८३१ सालीं निम्में बगदाद शहर पाण्याखालीं बुडालें होतें.

युफ्रातीस व तैग्रीस यांशिवाय इतर अनेक नद्या असून त्या उत्तरेकडून यांस येऊन मिळतात. वरील दोन्ही नद्यांस कालवे बांधून त्यांचें पाणी चोहोंकडे शेतांतून खेळविलें असल्यामुळें वाळू व चिकणमाती यांनीं मिश्रित अशा या जमिनींत मका, गहूं, सातू, कापूस, तंबाखू, द्राक्षें, खरबूज, अंजिर, आक्रोड, डाळिंबें, पीअर वगैरे जिनसा विपुल पिकतात.

मोसलापासून इराणीआखातापर्यंत पसरलेल्या पांचशें मैलांत खजुरीची झाडें फार आहेत. बगदादच्या वरपासून इराणी आखातापर्यंत एकजात काळी-भोर जमीन लागून राहिली असून डोंगराचें एखादेंहि डोकें दृष्टीस पडत नाहीं. इराणी आखाताजवळची जमीन दलदलीची असल्यामुळें तिच्यांत पीक निघत नाहीं. पाण्याच्या कडेला उगवलेल्या विपुल गवतांत गुरांचे कळप स्वच्छंदानें चरत असतात. नद्यांचा कांठ सोडून थोडें दूर गेल्यास सारा मुलुख भाजून निघाल्यासारखा दिसतो.

युफ्रातीस व तैग्रीस नद्या या आगबोटींच्या व जहाजांच्या सडकाच होत. युफ्रातीस नदींत ११०० मैलपर्यंत जहाजें चालतात. तैग्रीस नदीहि मोसलपासून खालीं तीनशें मैल नौकानयनास अशीच उपयोगी पडते.

सीरिया—

सीरिया हें नांव ग्रीक लोकांनीं दिलें आहे. पण तद्देशीय लोक व शेजारचे आरब त्यास शामच म्हणतात. याच नांवानें हिंदु लोक पूर्वीं सदर प्रांतास ओळखीत असत. शाम ह्या नांवाची कथा थोडी चमत्का-रिक आहे. मक्केचे कर्मठ मुसलमान प्रातःकाळीं सूर्याकडे तोंड करून प्रार्थना म्हणूं लागले म्हणजे त्यांच्या डाव्या हातास सीरिया व उजव्या हातास येमेन प्रांत रहातो. आरब लोक आपल्या बोलीप्रमाणें 'बेलेद एम् शाम' डाव्या हाताच्या देशास आणि बेलेद् एम् येमेन उजव्या हाताच्या देशास म्हणूं लागून हेंच नांव रूढ झालें. सीरिया ही दक्षिणोत्तर अशी लांबच लांब जमीनीची पट्टी आहे. तिच्या पश्चिमेस भूमध्य हा पाण्याचा समुद्र आणि दक्षिणेस अरबस्तानचें रण हा वाळूचा समुद्र पसरला आहे. उरलेल्या दोन बाजूंपैकीं उत्तर बाजू तारस पर्वतानें अडविलेली आहे आणि दक्षिणेस अरबस्थानचा सीनाय प्रांत आहे. सीरियाची लांबी ४४० मैल व रुंदी ५० ते १५० मैल आहे.

उत्तरेकडून तारस पर्वतापासून डोंगराची एक जोड ओळ सीरियाच्या मधून जाऊन तिनें सीरिया दुभंगला आहे. यामुळें महाराष्ट्रांतील कोंकण व देश यांप्रमाणें त्याचे दोन विभाग झाले आहेत. या जोड ओळीस लेबा-

नन पर्वत म्हणतात. लेबानन पर्वत व भूमध्य समुद्र यांनींच सीरियास थोडें बहुत वैभव व शोभा आणून दिली आहे. भूमध्य समुद्रास धरून त्याचे बिरूट, फोनीशिया व पॅलेस्ताईन असे पोटविभाग आहेत. हा किनारा सोयीस्कर असल्यामुळें त्यावर फार प्राचीन काळापासून धाडसी, उद्योगी व नौकानयननिपुण लोकांची वस्ती झाली आहे. बिरूट हें हवा खाण्याचें स्थळ असून पुष्कळ युरोपियन प्रकृति सुधारण्यासाठीं येथें येऊन रहातात. बिरूटपासून थोडें आंत गेलें कीं, लेबानन पर्वत व त्याचीं उत्तुंग शिखरें नेत्रांस तोषवितात. तेथील शैलशृंगें सदाच हिमाच्छादित असतात. त्यावरील थंड हवेंत जेसुइट लोकांनीं ठिकठिकाणीं आपले मठ बांधले आहेत. तेथील निरभ्र आकाश, खडखडीत सूर्यप्रकाश आणि हृदयंगम देखावे युरोपियनांस संतोषवितात. या प्रांतांत नाना प्रकारची फळफळावळ पिकते. पिस्ते, मनुका, खरबुजें, चेरी, एप्रिकॉट, द्राक्षें, अंजीर, ऑलिव्ह, संत्रीं, नारिंगें हीं येथें उत्पन्न होणारीं फळें मोठीं आरोग्यकारक व हितावह आहेत. त्यांखेरीज वाटाणे, पावटे हीं कडधान्येंहि पिकतात.

गहूं, सातू, मका, तांदूळ, ऊस, कापूस, तंबाखू व रेशीम या जिनसा सीरियाच्या निरनिराळ्या भागांत मिळून पिकतात. येथील रेशीम फ्रान्समधील लायन्स शहरीं जाऊन तेथें तयार झालेलीं उंची वस्त्रें देशोदेशीच्या श्रीमान् स्त्रीपुरुषांची हौस भागवितात. गुलाब, जास्वंद, हीं फुलें लेबानन पर्वताजवळील भागांत रानोमाळ उगवतात. त्यांपासून काढलेलीं अत्तरें, रत्नें, हिरे, मोत्यें परदेश पहातात. याच गुणांनीं सीरिया प्रांताची आरबी व तुर्की भाषेंत स्तुतिस्तोत्रें गाइलीं आहेत. तुर्क कवीस सीरिया हा नंदन-वनांतील परिमळ वाटतो. विधात्यानें जगांत प्रथम जन्मास आलेल्या मानवासाठीं निर्माण केलेलें हें उद्यानच होय अशी हिब्रू कवि त्याची वाहवा करतात. आरब लोकांनीं आपले कल्पनावैभव लेबानन पर्वतावर खर्च करण्यांतच धन्यता मानली. त्याच्या शिरोभागीं हिमवृष्टि, स्कंध-भागीं पर्जन्यवृष्टि, वक्षःस्थलीं पुष्पवृष्टि आणि चरणकमळीं सूर्यनारायणाची तेजोवृष्टि होते असें आरब कवि त्याचें स्तवन करतात.

सीरियाच्या किनाऱ्यास लागून असलेल्या भूमध्य समुद्राच्या भागास

लीव्हंट असें म्हणतात. या समुद्रावर अलेक्झांड्रेटा, त्रिपोली, बिरूट, एकर, जाफा, अशीं बंदरें आहेत. सिडन व तायर या फोनीशियन लोकांच्या काळीं प्रसिद्धीस आलेल्या बंदरांचे अवशेष याच रांगेंत आहेत. पॅलेस्ताईन ही येशू ख्रिस्ताच्या जन्मानें उद्धरलेली भूमि ख्रिस्ती लोकांस अत्यंत पवित्र वाटते. ज्यांत येशू बालपणीं राहिला व जेथें त्यानें पाण्याचें मद्य करून दाखविलें तें नाझारेथ व ज्यांत त्यानें स्वचरित्र प्रकटाविलें तें येरूसलेम शहर याच प्रांतांत आहे. येशू स्वतः मरून कीर्तिरूपानें अमर राहिला, त्या येरूसलेमवरून जॉर्डन नदी वहात जाऊन ती मृत समुद्रास मिळते. जॉर्डन नदीची लांबी २५० मैल आहे व ती ज्यास मिळते तो मृतसमुद्र ४० मैल लांब व ५ ते ९ मैल रूंद आहे. त्याच्या कांहीं भागांतील पाणी १२०० फूट खोल आहे. सरोवराचें पाणी फार खारें असून त्यांत गाळ अतिशय सांचला आहे. तीरावर गंधक, नायटर यांचे खडक असल्यामुळें पाणी फार कडवट लागतें व वांती येण्याइतकी त्यास घाण येते. पाण्यांत २६ टक्के Saline matter मिसळल्यामुळें त्यांत मासे वांचत नाहींत. म्हणूनच त्यास मृतसमुद्र हें नांव मिळालें आहे. पाण्यावरून पक्षी मात्र स्वच्छंदानें इकडून तिकडे उडतात. उन्हाच्या वेळीं पाण्यांतून वाफा अंगावरून गेल्यास मनुष्यास ताप येतो.

सीरियाच्या कोंकणपट्टींत फोनीशिया व पॅलेस्ताईन हे जसे प्रांत आहेत तसे लेबानन पर्वतापलीकडे अलेप्पो व दमास्कस हे घाटांवरील प्रांत होत. युफ्रातीस नदी अलेप्पो प्रांतास चाटून जाते. मिल्टनच्या काव्यांत वर्णिलेली ॲडोनिस नदी याच प्रांतांतून वहाते. अलेप्पोस समुद्रास जोडणारें बंदर अलेक्झांड्रेटा होय. अलेप्पोचा मोसल व उत्तर मेसापोटेमियाशीं व्यापार चालतो. दमास्कस शहर सीरियाच्या रणापाशीं सपाटीवर आहे.

सीरियांत सर्व प्रकारची हवा अनुभवण्यास मिळते. उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा हे तिन्ही ऋतु फेरबदलानें येतात. आक्टोबर ते एप्रिल अखेर थंडी कडक पडते. उन्हाळा तितका त्रासदायक नसतो. पाऊस थोडाच पण नियमितपणें पडतो. जेरूसलेममध्यें उन्हाळ्यांत म्हणजे जुलई–ऑागष्ट

महिन्यांत सूर्यास्तसमयीं उष्णतामान ७९ अंशांवर व जानेवारींतील हिंवाळ्यांत सूर्योदयाचे वेळीं ४९ अंशांवर असतें.

अरबस्तान—

हें द्वीपकल्प फार मोठें आहे. याची लांबी १२०० मैल व रुंदी ६०० मैल आहे. युरोपखंडाच्या इतका अरबस्तानचा विस्तार असून नुसताच किनारा मोजला तर तो चार हजार मैल भरेल. पण बडा घर पोकळ वासा अशी त्याची स्थिति आहे. नारळाचा आकार मोठा तथापि त्यांतील मधला भाग पोकळ राहून त्याच्या कडेला खोबऱ्याचा थर बसलेला असतो; त्याप्रमाणें आरबस्तानच्या मधल्या भागांत रेतीः भरली असून कडेकडेनें मनुष्यांनीं वस्ती करण्याजोगी जमीन आहे. मधील रेताड रणास चिकटून पश्चिम, दक्षिण व पूर्व या दिशांनीं पर्वतांच्या रांगा आहेत. समुद्र व पर्वत यांच्या दरम्यान जमिनीचा थर असून तोच खरा अरबस्तान. उत्तरेस पर्वत नाहींत, पण युफ्रातिस ही नदी असल्यामुळें ती बाजू सुपीक व समृद्ध आहे. तथापि तिचा अरबस्थानांत समावेश होत नाहीं. सीरियाच्या पश्चिमेस जसा भूमध्य समुद्र आहे तसा अरबस्तानच्या पश्चिमेस तांबडा समुद्र आहे. अरबस्तानांत हेजज, मन, एडन, ओमान व रास अल् हद असे प्रांत आहेत. त्यांतील पश्चिमेचे हेजज व येमेन आणि दक्षिणेचा एडन प्रांत एवढाच तुर्कांच्या ताब्यांत होता. या सर्व प्रांतांपैकीं महमदाच्या चरित्राशीं ज्याचा निकट संबंध असा हेजज प्रांत होय आणि त्यासच मुख्यतः अरबस्तान असें मानण्यांत येतें. हा प्रांत सीरियास लागून असून सीरिया व अरबस्तान यांस आफ्रिकेशीं जोडणारा दुवा म्हणजे सीनई प्रांतच होय. त्यावरून चढून गेलें कीं, पुढें इजिप्तचें रण लागतें. हेजज प्रांत सामान्यतः निर्जन व रुक्ष असा आहे. त्यांत कांहीं ठिकाणीं विहिरी आहेत. त्यांच्या कृपेनें त्यासभोंवर झाडझुड असेल तेवढेंच. हेजजचा दक्षिणभाग मोठा पवित्र (बेल्ड ए हराम) मानला जातो. मक्का व मदिना हीं त्यांतील प्रसिद्ध शहरें होत. मदिना समुद्रतीरापासून १४० मैल आंत आहे. मदिनेच्या दक्षिणेस मक्का असून तिला जिद्दा

हें जवळचें बंदर होय. जिद्द्यापासून मक्का ४० मैल दूर आहे. मक्केहून मदिनेस जाण्याकरितां सडक आहे. मदिनेची वस्ती फक्त वीस हजार आहे. तिला जवळचें बंदर यंबो हें आहे. जेबेल् एल्कोरा नामक पर्वतांतून वहाणाऱ्या एका ओढ्याचा जिव्हाळा मिळून मदिनेंतील विहिरींस पाण्याचा पुरवठा झाला आहे. त्यांच्याच जिवावर मदिनेभोंवतीं बागबगीचे करतां आले आहेत. मक्का शहर वालुकामय हद्दींत आहे. तेथून पुढें पूर्वेस ओसाड रण सुरू होतें. मक्केची कायमची वस्ती तीस हजार. पण यात्राप्रसंगीं ती १॥–२ लाखापर्यंत जाते. मक्केहून एक रस्ता सीरियांत दमास्कस शहरीं जातो व दुसरा ईजिप्तमध्यें केरो शहराकडे जातो. हे रस्ते ओळखण्याच्या खुणा म्हणजे मधल्या मुशाफरास पाणी पिण्याकरितां बांधलेल्या विहिरी. दमास्कस व मक्का आणि केरो यांच्या दरम्यान पसतीस विहिरी आहेत. प्रवासाची ही लांबण व कष्ट चुकविण्याकरितां अलीकडे यात्रेकरू जिद्दा ह्या बंदरीं उतरून पायीं किंवा खेचरांवरून प्रवास करतात. हेजजपासून दक्षिणेस येमेन प्रांत लागतो. त्याची लोकसंख्या दहा लाख आहे. येमेन प्रांत एडनला भिडला आहे. येमेनमध्यें नांव घेण्यासारखें ठिकाण एकहि नाहीं.

अरबस्तानची हवा उन्हाळ्यांत अति उष्ण व हिंवाळ्यांत अति थंड असते. ह्या देशांत सिमूम नांवाचा अति उष्ण व क्लेशकारक वारा वहातो. पावसाळ्यांत नैऋत्येकडून वारा वाहूं लागून तो किनाऱ्याच्या प्रदेशांत थोडाबहुत पाऊस पाडतो. या पावसावर गहूं, फळफळावळ, सातू, कॉफी, हे पदार्थ येतात. खजुराचें उत्पन्न फार मोठें आहे.

व्यापारी पेठा

आशिया मायनर

कॉन्स्टांटिनोपल खालोखाल तुर्की साम्राज्यांत अतिशय मोठें व्यापाराचें शहर म्हटलें म्हणजे स्मरना होय. ही आशियामायनरची राजधानी असून तिची लोकसंख्या जवळजवळ दोन लाख आहे. पैकीं ८० हजार तुर्क, ४० हजार ग्रीक, १५ हजार यहुदी १० हजार आर्मिनियन व १४ हजार फ्रेंच आहेत. ह्या सर्व जाती एकमेकांत मिसळून रहात नसून तुर्क व आर्मीनियन व यहुदी यांच्या पेठा वेगवेगळ्या आहेत. कॉन्स्टां-

टिनोपलपासून स्मरना २१० मैलांवर आहे. लीव्हन्टमधील सर्व व्यापार याच बंदरांतून चालतो. किनाऱ्यापर्यंत समुद्राचें पाणी खोल असल्यामुळें मोठमोठीं जहाजें अगदीं आंत येऊं शकतात. देशोदेशीचीं जहाजें स्मरना बंदरांत दृष्टीस पडतात. जहाजांत बसून किनाऱ्याकडे येत असतां सुंदर दगडी इमारती, आणि मशिदीचे वाटोळे घुमट व उंच शिखरें पाहून संतोष होतो. परंतु शहरांत शिरून बसकट लांकडी घरें व त्यांतून वळणें घेत जाणारे गलिच्छ बोळ दिसूं लागल्यावर पहिला अनुकुल ग्रह साफ नाहींसा होतो. स्मरना बंदरांतून अंजीर, मनुका, कापूस, व्हॅलोनिया, औषधें, रेशीम, कातडीं, ऑलिव्हाचें तेल, स्पंज, डिंक, दारू, गालिचे, तंबाखू, भुईमूग इत्यादि प्रकारचा माल निर्गत होतो. यांतील निम्या किंमतीचा माल इंग्लंडांत जातो. आयातींत कॉफी, साखर, नीळ, टीन, लोखंड, शिसें, कापड, सूत, रमदारू, ब्रँडी, मसाला यांची प्रमुखत्वानें गणना होते. स्मरनाची आजूबाजू मोठीं सुंदर व सुपीक आहे. होमर कवीचा स्मृतिशेष अशी मेलीज नांवाची नदी जवळून वहाते. तिच्या पुलावरून फळफळावळीच्या दिवसांत फळांचीं ओझीं घेऊन उंटांचे तांडे स्मरना शहरीं येत असतात. स्मरना बंदरांतून कॉन्स्टांटिनोपल, मार्सेलीस, माल्टा व भूमध्यसमुद्रावरचीं बंदरें यांतून जहाजांची व आगबोटींची रहदारी चालू असते.

ब्रूसा--

हें बरेंच जुनें शहर उस्मानचा मुलगा आरखान यानें राजधानी केल्यापासून प्रख्यातीस आलें. इ. स. १३२६ पासून १४५३ पर्यंत म्हणजे कॉन्स्टांटिनोपल सर होईपर्यंत तुर्की सुलतानांची ब्रूसा हीच राजधानी होती. त्यामुळें विद्वान व धर्माभिमानी तुर्कांचें हें शहर आगरच बनलें. एकंदर वस्ती ६० हजार. पैकीं ९ हजार आर्मीनियन, ३ हजार ग्रीक, दोन हजार स्पॅनिश यहुदी आणि बाकीचे तुर्क आहेत. शहरांतील रस्ते अरुंद पण बरेच स्वच्छ आहेत. घरें दगडमातीचीं व लांकडाचीं आहेत. ब्रूसांत प्रेक्षणीय इमारती पुष्कळ असून मशिदीच दोनशें आहेत. शहराच्या मध्यभागीं किल्ला आहे. त्याखेरीज मोठाले बाजार, धर्मशाळा, कॉलेजें, ख्रिस्ती देवळें व शाळा पुष्कळ आहेत. येथें फार मोठा व्यापार चालतो.

भोंवतालच्या खेड्यांतून रेशीम पिकत असल्यामुळें कच्चें रेशीम पक्कें करण्याचा धंदा पुष्कळ कारखानदार करतात. साटीण, गालिचे, कापसाचें कापड व सूत तयार करणारे ९० कारखाने असून ते बहुतेक परदेशस्थांच्या ताब्यांत आहेत. येथून फ्रान्स व इंग्लंड या देशांत बरेंच रेशीम जातें. धान्य व अफू यांचीहि बरीच निर्गत होते. बाजार इंग्लिश व युरोपियन मालांनीं गच्च भरले आहेत. बरेच युरोपियन ब्रूसास कायम वस्ती करून राहिले आहेत. देशांतल्या देशांत माल उंटावरून जातो. ब्रूसाच्या सभोंवतालचा भाग अत्यंत रम्य आहे. उन पाण्याचे झरे जवळच आहेत.

अंगोरा—

ब्रूसापासून २४० मैलांवर अंगोरा नामक शहर आहे. हीच तुर्कस्थानची सध्यांची राजधानी. वस्ती पसतीस हजार असून त्यांतील एक तृतीयांश ग्रीक, आणि बाकीचे आर्मीनियन व यहुदी आहेत. रस्ते अरुंद व घरें मातीचीं आहेत.शहराच्या मध्यभागीं एक किल्ला असून त्यासभोंवतीं तीन तट असून वर सिंहाचे पुतळे आहेत अंगोऱ्यांत बरेच रस्ते जमिनीच्या पोटांतून आहेत. आशिया मायनरमधील आर्मीनियन कॅथोलिकांची मुख्य वस्ती अंगोऱ्यास आहे. येथें रेशमासारख्या मऊ लोंकरीपासून नाना प्रकारचे जिन्नस तयार करतात. बरीचशी लोंकर इंग्रज दलाल खरेदी करून इंग्लंडांत पाठवितात. अफू डिंक, मध, मेण, बकऱ्यांचीं व कुत्र्यांचीं कातडीं परदेशीं रवाना होतात.

सिवास—

आशियामायनरच्या पूर्वेचें हें महत्त्वाचें ठिकाण होय. काळ्या समुद्रापासून तें फारसें लांब नसल्यामुळें सडका झाल्यास याच समुद्रावरील खुष्कीचा व्यापार पुष्कळ वाढेल. सिवासची लोकसंख्या पसतीस हजार असून त्यांतील सर्वांत मोठी वस्ती मुसलमानांची आणि मुसलमानांखालोखाल अनुक्रमें ग्रीक, आर्मीनियन व यहुदी यांची आहे. आयातीतला $\frac{3}{4}$ माल इंग्लंडांतून येतो. मालाची ने आण फ्रेंच व आस्ट्रियन बोटींतून होते.

आदाना--

आशिया मायनरमधील एका विलायतेची (भागाची) ही राजधानी असून वस्ती ४० हजार आहे. सर्वांत मोठी संख्या मुसलमानांची व त्याखालीं ग्रीक आर्मीनियन व यहुदी यांची. शहरांत कापड विणणें, व रंगविणें, कातडें कमावणें आणि साबण तयार करणें हीं कामें चालतात. जमीन अत्यंत सुपीक, धंदा शेतीचा आणि पिकें गहूं, सातू व कापूस यांचीं. आदाना, विलायत, तारस व लेबानन या पर्वतांच्या चिमट्यांत आहे. याला भूमध्य समुद्रावर जवळचें बंदर मर्सिना हें होय. आयात मालांत ब्रिटिश माल सर्वांत अधिक येतो.

खारपूट--

आशियामायनरच्या पूर्व सरहद्दीवरील हें मुख्य शहर होय. याची वस्ती सारी २१ हजारच आहे. त्या भोंवतालचा प्रदेश अति सुपीक व दाट लोकसंख्येचा आहे. त्यांत दोन मैलांवर खेडीं आहेत. वस्ती फार दाट असल्यामुळें पुष्कळ लोक उद्योगाकरितां अलेप्पो, ईजिप्त, कॉन्स्टांटिनोपल इकडे जातात. या टापूंत तांब्याच्या व रुप्याच्या खाणी आहेत आणि जमीन इतकी उत्कृष्ट आहे कीं, ती गहूं, सातू, तांदूळ कापूस, तंबाखू, अफू, जवस, दारू, रेशीम, कातडी आणि हरएक प्रकारचें फळ देते. यांतील बऱ्याच जिनसा अर्जरूम, अलेप्पो, कॉन्स्टांटिनोपल इकडे रवाना होऊन, चीट, घड्याळें, कापड इत्यादि तयार माल बाहेरून येतो.

दायरबकर--

खारपूटच्या दक्षिणेस व तैग्रीस नदीच्या कांठावर हें शहर वसलें आहे. कुर्दिस्थानची ही पूर्वीं राजधानी होती. एक शतका-पूर्वीं येथील वस्ती दीड लाख होती. पण ती कमी होत आतां पन्नास हजारांवर आली आहे. यांतील निम्मे मुसलमान व बाकीचे यहुदी आणि ख्रिस्ती आहेत. ख्रिस्त्यांत प्रकार चार आहेत. दायरबकरहून लोंकर, कापूस, सुगंधी सामान व मेण हे जिन्नस बाहेर देशीं जातें. उत्तर भागांत मध पुष्कळ उत्पन्न होतो.

मोसल-हें शहर कुर्दिस्थानच्या पूर्वेस असून त्याचा मध्य मेसापोटो-मिया व पूर्व कुर्दिस्तान यांजबरोबर व्यापार चालतो. शहराभोंवतालचा

प्रदेश अत्यंत सुपीक आहे. तें तैग्रीस नदीच्या उजव्या कांठावर खाल्डियन् लोकांच्या प्राचीन निनवी शहरासमोर वसलें आहे. वस्ती ४० हजार आहे पैकीं दोन तृतीयांश मुसलमान म्हणजे तुर्क, आरब व कुर्द आणि बाकीचे सीरियन ख्रिश्चन व यहुदी आहेत. मुसलमानांत सुनी पुष्कळ आहेत. मोसल भोंवतालच्या प्रांतांत गहूं व सातू पुष्कळ पिकतो. पण तो परदेशास पाठविण्यास चांगले रस्ते नाहींत. स्वताई फार. यामुळें थोडक्या पैशांत पोट चांगलें भरतें. मोंसलपासून बसऱ्यापर्यंत बोटी जातात—येतात. मेसर्स लिंच आणि कंपनी ही सर्व युरोपियन व्यापाऱ्यांत प्रमुख आहे. मोसलास कापड व साबण तयार होतें. भुईमूग व लोंकर परदेशास जाते. भूमध्य समद्रावरील त्रिपोली बंदरापासून सीरिया व मेसापोटेमियांतून बसऱ्यास जाणाऱ्या रेल्वेवर मोसल हें महत्त्वाचें स्टेशन आहे.

आर्मीनिया

अेझरूम हें आर्मीनियांतील सर्वांत मुख्य व व्यापारी शहर होय, येथें आगपेटीचें लाकूड तंबाखू, भुईमूग, बकऱ्याचीं कातडीं व लोंकर यांचा व्यापार चालतो. अझरूमजवळ आगपेटीस जरूर त्या लाकडाचेंच एक हजार चौरस मैलांचें जंगलच आहे. या शहरचा व्यापार वाढण्यासारखा आहे. पण त्यास जाण्यास सडका नसल्यामुळें व्यापाराची वाढ खुंटली आहे.

मेसापोटेमिया

बगदाद—

हें मेसापोटेमियाच्या राजधानीचें व सर्वांत मोठें शहर आहे. आबासद खलिफांची ही जुनी राजधानी. बगदाद तैग्रीस नदीवर असून युफ्रातीस व तैग्रीस या नद्यांच्या संगमापासून २०० मैल व मुखापासून ३०० मैल आहे. अरबस्तान, हिंदुस्थान व युरोप यांच्याशीं बगदादचें दळणवळण फार मोठें. याच्या आसपास गहू पुष्कळ पिकतो. रोटी स्वस्त आहे. जमीन काळीभोर आहे. वस्ती ९० हजार असून त्यांतील ७० हजार शियापंथी मुसलमान आहेत. १८ हजार यहुदी आहेत. बँका यहुद्यांच्या व व्यापारधंदा करणाऱ्या ख्रिस्त्यांच्या हातीं आहेत.

बगदादची वस्ती बहुविध आहे. पोशाखावरून तेथील वेगळाल्या जाती ओळखू येतात. तुर्क पुष्कळ आहेत. पण इस्तंबूलच्या तुर्कांची ती नकशीदार जरीचीं जाकीटें, सैल विजारी, आणि डोक्यास घट्ट बसलेली टोपी हा पेहेराव बगदाद येथें दृष्टीस पडत नाहीं. त्याऐवजीं अंगांत लांब अंगरखे, त्यावरून बेढब झगे, डोक्याला निळ्या गोंड्याची व सैल आकाराची लाल टोपी व तिजभोंवतीं गुंडाळलेला जरीचा रुमाल असा पोशाख दृष्टीस पडतो. हा मुसलमानपुरुषांचा पोशाख झाला. तसलाच पोशाख स्त्रियांचाहि असतो. यहुदी हा त्यानें डोक्यास घट्ट बसविलेल्या तांबड्या टोपीवरून व तिजभोंवतीं गुंडाळलेल्या पिवळ्या रुमालावरून ओळखू येतो. बगदाद येथें आरब बरेच आहेत. ते डोक्यास रेशमाची किंवा कापडाची शाल गुंडाळतात. तिला तांबडे व पिवळे पट्टे असतात. शालीचे शमले खांद्यावर व मानेवर सुटलेले असतात. ते अंगांत कफन्या घालतात. त्यांचा रंग काळा, व पांढरा असतो. कफनीवरून कंबरेभोंवतीं केसांचा किंवा लोंकरीचा पट्टा आंवळण्यांत येतो. आरबांचा हा पोशाख त्यांच्या हूड स्वभावाचा निदर्शक होय. कुर्द अशींच मुंडाशीं घालतात, पण तीं एवढीं मोठीं नसतात. तीं त्यांनीं अशा बेफिकिरपणानें लपेटून दिलेलीं असतात कीं, त्यामुळें त्यांची धीट, गंभीर व उग्र मुद्रा अधिकच उठून दिसते. त्याशिवाय इराणी लोकहि बगदादास आढळतात. त्यांच्या त्या काळ्या निमुळत्या टोप्या, ते उंच टाचेचे चढाव, आणि हिरवे किंवा निळे झगे यांकडे प्रेक्षकांचें लक्ष सहज वेधतें.

अशीं नाना प्रकारचीं माणसें बगदादमधून घोड्यावर बसून हिंडत असलेलीं किंवा रस्त्याच्या कडेला चिलीम व हुक्का पीत बसलेलीं दिसून येतात. बहुतेक अडाणी, चढेल, धर्मवेडे व युरोपियनांचे द्वेष्टे आहेत. आर्मीनियन हिंदुस्थानांत राहून आलेले असल्यामुळें सर्वांत अधिक माहितगार आहेत. सर्व स्त्रिया पडदानशीन आहेत. त्यांपैकीं जर कोणाचें नख दृष्टीस पडत असेल तर तें आरब स्त्रियांचेंच. साऱ्या वस्तीपैकीं चार पंचमांश तुर्क व आरब आहेत आणि त्यांच्या खालोखाल यहुदी आहेत. तैग्रीस नदीच्या दोन्ही कांठावर बगदादची वस्ती आहे. शहराभोंवतीं कोट आहे व त्याला

मधून मधून समान अंतरावर बुरूज आहेत. आणि त्यांवर तोफा ठेवलेल्या आहेत. बगदादचा बालेकिल्ला तैग्रीसच्या डाव्या अंगाला आहे व त्याज-वरील तोफेच्या टप्यांत नदी सांपडते. तटानें त्यासहि वेढलें असून त्याची लांबी पांच मैल आहे. तटाभोंवतीं बाहेरून खंदक आहे.

बगदादमध्यें शंभर मशिदी आहेत, पण त्यांपैकीं विशेष प्रसिद्ध व प्रेक्षणीय थोड्या आहेत. मशिदींचे डेरे डौलदार व प्रचंड आहेत आणि त्यांचे कळस अति उंच असून सूर्यप्रकाशांत चकचकत असतात. मशिदी व इतर उंच इमारती यांनीं शहरास शोभा आणिली असली आणि दुरून शहर सुंदर दिसत असलें तरी शहरांत शिरल्यावर सर्व अनुकूल ग्रह बद-लून जातो. रस्ते अरुंद, नागमोडी व गलिच्छ आहेत. रस्त्यावर सर्व प्रका-रची घाण व जनावरांची मढींहि पडलेलीं असतात. हीं मढीं फस्त कर-ण्याचें काम मोकाट कुत्रीं करतात. रस्त्याच्या बाजूस घरांना जाळ्या नाहींत. घरें बहुतेक विटांचीं व त्यांचीं दारें अगदींच ठेंगणीं आहेत. घरांचा दर्शनी भाग विटांचा, पण त्यांच्या मागच्या बाजूनें चिखलाचा थर दिलेला. बहुतेक घरांना तळघरें व त्यांवर दुमजली इमारत असते. घरांतील दिवाणखान्यांचें लाकडी छत नक्षीचें, खांब सुरूचे व कमानी प्रमाणबद्ध असतात. घरांना चौक व चौकांतून खजुरीचीं थोडीबहुत झाडें तरी असावयाचींच. चौक फरसबंदीचे आहेत व त्यांच्या मध्यभागीं कारंजाचें पाणी थुई थुई उडत हें असावयाचेंच.

शहरांत येण्यास सहा वेशी आहेत आणि नदीच्या दोन्ही तीरां-वरील वस्तीचें दळणवळण कायम रहाण्यास तीस पूल आहेत. शहराबाहेर पूर्वेच्या बाजूस कबरस्थान असून त्याच्या मध्यभागीं प्रसिद्ध खलीफा हरून अल् रशीद याच्या बायकोचें थडगें आहे. अरबी भाषेंतील सुरस व चम-त्कारिक गोष्टींतील झोबेदी राणी ती हीच.

रस्त्यानें फक्त आरब स्त्रियाच दृष्टीस पडतात. त्या पायांत जोडे घालीत नाहींत. त्या डोक्यावरून काळ्या कापडाचें वेष्टण घेऊन तें गळ्या-भोंवतालीं गुंडाळतात. तें वेष्टण मणी, शंख व नाणीं यांनीं गजबजून सोडलेलें असतें. पायांत रुप्याचे वाळे व हातांत पाटल्या घालतात.

नाकांत नथेसारखें एक विलक्षण प्रकरण अडकावून दिलेलें असतें. हात गोंदलेलें असतात. अशा प्रकारचा हा अवतार पाहिला म्हणजे या सुरेख शृंगारलेल्या स्त्रिया आहेत कीं शृंखलाबद्ध बंदिवान आहेत असा भ्रम उत्पन्न होतो.

बगदाद येथें तांबडें व पिवळें कमावलेलें कापड विकत मिळतें. त्याची साऱ्या तुर्कस्थानभर मोठी चहा आहे. त्याखेरीज जरतारीचा मालहि पुष्कळ प्रकारचा तयार होतो. बगदाद ही एक वेळ व्यापाराची मोठी पेठ होती. हिंदुस्थानचा माल येथें जलमार्गानें येई व तेथून सारा तुर्कस्थान तो विकत घेई. इराणहि आपला माल बगदादासच आणून विकीत असे. पण आतां सुएझच्या कालव्यामुळें तांबडा समुद्र व इराणास काळा समुद्र खुला होऊन बगदादचें व्यापारी महत्त्व पुष्कळ कमी झालें आहे. तथापि आतां इराणी आखातापासून सीरियापर्यंत बांधलेला लोहमार्ग व इराकच्या राजधानीचा मिळालेला मान बगदाद शहरास पूर्वी इतकें नसलें तरी बरेंच वैभव प्राप्त करून देईल असा भरवसा वाटतो. शहराभोंवतीं खजुरीचीं झाडें फार आहेत; पुष्कळांचा उदरनिर्वाह यावरच होतो. द्राक्षें, अंजीर, डाळिंबे, अननस, नारिंगें यांची लयलूटहि आहे इतर फळें हलक्या प्रतीचीं येतात.

बसरा—

तैग्रीस व युफ्रातीस या दोन नद्यांचा संगम होऊन नवीन बनलेल्या नदीस शट् एल् आरब म्हणतात. ह्या नदीच्या पश्चिम तटाकावर बसरा शहर वसलें आहे. तेथून बगदाद पांचशें मैलावर रहातें व इराणी आखात ८० मैल खालीं रहातें. सभोंवारचा प्रदेश उत्कृष्ट पीक देणारा आहे. या जमिनींत सर्व धान्यें येतात. बसऱ्याहून बराचसा दाणा हिंदुस्थानांत व आफ्रिकेंतहि जातो. खारका व खजूर हें या ठिकाणचें मुख्य खाद्य. बसऱ्यास ३५ हजार टन खारीक गोळा होते व त्यांतील २७ हजार टन माल इंग्लंड व अमेरिका यांनाच लागतो. याशिवाय लोंकर व बकऱ्याचीं कातडीं व हाडेंहि बाहेर देशीं रवाना होतात. बसऱ्याची खानेसुमारी लाखाजवळ आहे. बसराई मोतीं बसऱ्याचेंच होय.

सीरिया

अलेप्पो—

सीरियाचे कोंकण व देश असे दोन भाग पाडल्यास देशावरील अगदीं उत्तरेकडील नांव घेण्याजोगें शहर अलेप्पोच होय. याच्या पूर्वेस व दक्षिणेस ओसाड व रेताड रण आहे. यामुळें त्याची उत्तर व पश्चिम हीच बाजू काय ती पिकाऊ. पश्चिमेस समुद्राशीं व त्यामार्फत युरोप व आफ्रिका खंडांशीं संबंध जोडण्याचें मुख्य साधन अलेक्झांड्रेटा हें बंदर होय. मक्केहून बगदादकडे जाणाऱ्या नव्या आगगाडीच्या रस्त्यानें अलेप्पोस भेट दिली असल्यानें अलेप्पोचें खुष्कीचेंहि दळण वळण वाढून त्यास पूर्वीचें महत्त्व फिरून थोडें बहुत प्राप्त होईल असा रंग दिसतो. अलेप्पोस तयार होणाऱ्या कापडाची चकाकी व पक्का रंग यांविषयीं फार कीर्ति होती. तथापि परदेशच्या हलक्या पण स्वस्त कापडानें हा स्वदेशी धंदा बसविला. अलेप्पो आणि आजूबाजूचीं खेडीं येथें पुष्कळ माग चालत व हल्लींहि चार हजार माग चालतात. पण परदेशी कापडापुढें टिकाव न लागल्यामुळें माग दिवसानुदिवस बंद पडत आहेत. अद्यापिहि चार हजार माग जीव धरून असून त्यांवर तीस लाख रुपयांचा माल निघतो. तथापि तो पूर्वींच्या मानानें अगदींच थोडा असून खेड्यापाड्यांतील आरब लोक खरेदी करतात. जरतारीचा मालहि येथें तयार होतो. त्याचे ५-६ माणसांचा एक असे २५-३० कारखाने आहेत. साबणहि ४-५ लाख रुपयांचा पैदा होतो. जमीन फारच सुपीक आहे. तिची मशागत जुन्या पद्धतीची आऊतकाठी करते. या प्रांतांतील मुख्य पीक गव्हाचें. त्याशिवाय सातू, तांदुळ, तंबाखु, कापूस, हीं धान्यें आणि भुईमूग, बोरें, व रताळीं, पिकून त्यांचें सालीना उत्पन्न सुमारें सव्वा कोट रुपयांचें येतें. तेथील साबण तेलापासून तयार करतात व त्यांचे तीस कारखाने आहेत. रंगाचे व चिटाचे कारखाने शंभर आहेत. जरतारीचे कारखाने पंधरा आहेत.

अलेप्पोचा व्यापार ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इताली व जर्मनी या युरोपियन राष्ट्रांशीं चालतो. आयात होणाऱ्या मालांत साखर, कॉफी, नीळ,

मिरीं, सूत, धोतरें, तांबड्या टोप्या, हातरुमाल, कांच पोवळीं, फ्रान्समधील रेशमी वस्त्रें, रंगीत लाकडी सामान, मलमल, कोरें पांढरें कापड, चीट, लोखंडी व पोलादी जिनसा, मातीचीं भांडीं, तांदूळ या जिन्नसा आहेत.

अलेप्पो शहर सात टेंकड्यांवर वसलें असून त्या सभोंवार तट बांधला आहे. तटाला सात वेशी आहेत. तट बहुतेक पडला आहे. तटाबाहेरहि बरीच वस्ती पसरली आहे. सन १८२२ सालीं भूकंपाचा धक्का बसून शहरांतील दोन तृतीयांश घरें कोसळलीं. रस्ते रुंद,बांधीव व दुतर्फा पाऊल वाटा असे आहेत. इमारतींचा घाट आरबी धर्तीचा आहे. घरांचीं छपरें सपाट, खोल्या प्रशस्त, जाळ्या व खिडक्या मोठ्या, भिंती नक्षीदार आहेत. मशिदी बऱ्याच आहेत. पण त्यांतील एका मशिदींत ख्रिस्त्यांस येण्यास बंदी आहे. शहरांत बाहेरून पाणी बांधून आणलें असून तें हौदांतून खेळविलें आहे. येथें एक इस्लामी कॉलेज, ख्रिस्ती देवळें, वखारी, बाजार पेठा आणि कॉफीगृहें आहेत. अलेप्पोस मुसलमान, ख्रिस्ती व यहुदी यांची वस्ती असून ती वेगवेगळ्या भागांत आहे. शहराजवळची जमीन चांगली सुपीक व मशागत केलेली आहे. शहरास एक नदी आहे आणि नदीच्या दोन्ही तीरांवर बगीचे आहेत. त्यांत पिस्ते पिकतात. सीरियांत अलेप्पो हें अत्यंत निर्मळ शहर आहे. अलेप्पोबाहेरील प्रदेशांत बिदाऊन आरबांची वस्ती आहे.

इस्किंदर ऊर्फ अलेक्झांड्रेटा—

इस्किंदर हें आलेप्पोचें बंदर होय. त्याचा किनारा फार उत्कृष्ट आहे. आयातीपेक्षां निर्गत ज्यास्त होते. एरंड्या, गहूं, तंबाखू, लोंकर,भुईमूग,बोरें, रेशमी कापड, गालिचे, कमावलेलीं व साधीं कातडीं, धातू व साबण या जिनसा येथून परदेशीं रवाना होतात. आयातीपैकीं ३/४ माल इंग्लंडांतून येतो.

हामा—

अलेप्पोहून मक्केस जाणाऱ्या लोहमार्गावर हामा नामक शहर आहे. हामाच्या पूर्वेस पामीरचें इतिहासप्रसिद्ध पठार आहे. वस्ती तीस हजार असून त्याचा भूमध्य समुद्रांतून व्यापार चालण्यास त्रिपोली बंदर आहे. कापूस, रेशीम व लोंकर यांपासून येथें चांगलीं वस्त्रें तयार होतात. कापसाचें

जाडी कापडही पुष्कळ निघतें.सभोंवार उत्तम पिकाऊ जमिनी व चराऊ रानें आहेत. लोणी, धान्य व लोंकर बरीच उत्पन्न होते व तीं सर्व त्रिपोली बंदरांतून परदेशीं जातात. हामापासून त्रिपोली सत्तर मैलांवर आहे. हामा सध्यां भरभराटीच्या स्थितींत आहे.

दमास्कस—

सीरियाच्या लेबानन पर्वतानें दोन फळ्या पाडल्या आहेत. त्यांतील पूर्वेकडील बाजूस दमास्कस शहर आहे. तें अलेप्पोच्या दक्षिणेस १८० मैल व भूमध्य समुद्रापासून ६० मैल आहे. अत्यंत प्राचीन शहर अशी याची प्रसिद्धि आहे. आब्राहामच्या वेळीं हें शहर होतें असा दाखला सांपडतो. त्यावर अनेक राज्यें आलीं व गेलीं. असीरिया, इराण, मॅसिडोनिया रोम यांच्या हातांतून निसटत निसटत दमास्कस अबुबकरच्या आमदानींत म्हणजे इ.स. ६३४ मध्यें आरबांच्या हातांत पडलें. अलीकडे त्यावर तुर्कांचा अंमल चालू होता व हल्लीं फ्रेंचांचा अंमल बसत आहे.शहरासभोंवार तट आहे पण त्यास अनेक ठिकाणीं आतां खिंडारें पडलीं आहेत. तटबंदीबाहेरहि वस्ती पसरली आहे. रस्ते अरुंद, पडीक व बहुतेक एक तोंडी आहेत.

बहुतेक घरें आंतून भव्य आहेत. घरांना चौक व तो संगमरवरी फरसबंदीचा, व त्याच्या मध्यभागीं हौद आणि त्यांत कारंजें अशी बहुतेक घरांतून व्यवस्था आहे. शहरांत सुंदर मशिदी पुष्कळ आहेत, त्यांतील मुख्य माशिदी चर्च पाडून बांधल्या आहेत. अर्मीनियन मेलशाईट व सीरियन या ख्रिस्ती पंथांचे मठ व प्रार्थनामंदिरें (चर्च) येथें आहेत. त्याखेरीज यदुयांचीं देवळें आहेत.धर्मशाळा,दवाखाने,शाळा व बाजार अनेक आहेत. एकएका जातीचा माल एकएका बाजारांत किंवा पेठेंत मिळतो. दमास्कसास व्यापार मोठा चालतो. तेथें तलवारींचीं पातीं तयार होत असत, पण अलीकडे ह्या धंद्यास उतरती कळा लागली आहे. जडावाचें काम केलेले लगाम व खोगीरें व जवाहीर हा माल अद्याप तयार होतो.रेशमी व कापसाचीं वस्त्रें विणणारे चार हजार माग थोड्या वर्षांपूर्वीं चालू होते,पण हल्लीं पुष्कळ बंद पडले आहेत.येथें लेबानन पर्वतावरचें बर्फ मिळतें.त्यांत अंजीर घालून तें पेय लोक मोठ्या आवडीनें पितात. येथून माल,रेल्वे होण्यापूर्वीं बगदाद, मक्का,

अलेप्पो येथें उंटांवरून जात येत असे. बिरूट, त्रिपोली व एकर येथें अद्यापिहि उंटावरूनच माल जातो. गांवठाण ज्यांस उत्कृष्ट मिळालें आहे, अशा जगांतील शहरांत दमास्कसची गणना आहे. दमास्कसची लोकसंख्या १॥ लाख असून तिच्यांत ख्रिस्ती यहुदी, तुर्क, आरब व इतर मुसलमान यांचा समावेश होतो. परराष्ट्रीय वकील येथें रहातात. दमास्कसच्या भोंवतीं बागा विपुल असून फळफळावळ पुष्कळ पिकते. पाणी मुबलक आहे. भोंवतीं सुपीक शेतें आहेत.

बिरूटची वस्ती ६५हजार आहे हें दमास्कसचें बंदर होय. रेशीम, लोंकर, कातडीं, स्पंज, चिंध्या हा माल परदेशास व विशेषतः इंग्लंड व फ्रान्स या देशांस जातो. निर्गतीपेक्षां आयात दुप्पट किंमतीची आहे. सूत, चीट, नीळ, शाली, कॅलीको, सद्रयांचें कापड हा माल येतो व रेशीम, कापूस, कातडीं, भुइमूग, डिंक, फळें, स्पंज व तंबाखू या जिनसा परदेशीं रवाना होतात. शहर भरभराटत आहे.

जेरुसलेम—

हें शहर उंच ठिकाणीं वसलें आहे. त्याचा आकार चौकोनी आहे. त्याजभोंवतीं सुलतान सुलेमानानें १५४२ सालीं कोट बांधला. वेशी चार आहेत. शहरांत ख्रिस्त्यांची वस्ती वायव्य कोपऱ्यांत, आर्मीनियनांची नैऋत्येस, यहुद्यांची अग्नेयीस व बाकीचा सर्व भाग मुसलमानांनीं व्यापला आहे. एकंदर वस्ती तीस हजार; पैकीं निम्मी मुसलमानांची व बाकीची ख्रिस्ती व यहुदी यांची सारख्या प्रमाणांत आहे. गांवांतील रस्ते अरुंद, व ओबडधोबड आहेत. घरें दगडी व बळकट आहेत. ओढे व झरे यांच्या पाण्याचा पुरवठा भरपूर आहे. ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीनें जेरुसलेम अत्यंत पवित्र होय. सालोमन राजानें बांधलेल्या देवळाची मुसलमानांनीं मशीद बनविली. खलीफा उमर यानें बांधलेली मशीद फार प्रसिद्ध आहे. येशू-ख्रिस्त पुरला तें चर्च अद्यापि असून तें जिंकून घेण्यासाठीं ख्रिस्ती राजांनीं धर्मयुद्धें आरंभिलीं होतीं. याच चर्चच्या हद्दींत येशू ख्रिस्तास फाशीं देण्यांत आलें. त्याखेरीज कॅथोलिक, ग्रीक, आर्मीनियन, यांचे मठ आहेत. मुसलमानांनीं आपल्या मशिदी व पाठशाळाहि येथें बांधल्या आहेत.

जेरुसलेमचा जाफा बंदरांतून परदेशाशीं बराच व्यापार चालतो.

कडधान्य, कापूस, तीळ, ऑलीव्हाचें तेल, साबण, लोंकर, कातडीं, नारिंगें, या जिनसांची निर्गत व तांदूळ, कापड, पेट्रोलम, दारू, सागवान यांची आयात होते. जेरुसलेम भूमध्य समुद्रापासून पूर्वेस :२९ मैल व जॉर्डन नदीच्या मुखापासून पश्चिमेस २१ मैल आहे.

अरबस्थान

जिद्दा—मकेचें बंदर जिद्दा होय. पश्चिम अरबस्थानचा हिंदुस्थान व ईजिप्त यांजबरोबर व्यापार याच बंदरांतून चालतो. तें मक्केपासून ३० मैल व सुएझपासून ६५० मैल आहे. किनाऱ्याला पोंवळ्याचे खडक फार आहेत. हिंदुस्थान, बव्हेरिया, सिंगापूर, इराणी आखात येथून मक्केस जाण्यास या बंदरांत दरसाल ५० हजारांपर्यंत यात्रेकरू उतरतात. त्या शिवाय ईजिप्त, तुर्कस्थान व बार्बरी यांतून ६०।७० हजार यात्रा जुळते. खारका, हिना, लोंकर, काळ्या पोंवळ्याच्या माळा व काळ्या फण्या हिंदुस्थान आदिकरून देशांस जातात आणि हिंदुस्थानांतून वेलदोडे, ऊद, हस्तिदंत, मसाला, तांदूळ, चहा, साखर, रेशमी वस्त्रें, सोनें व मोत्यें येतात. ख्रिस्त्यांस मक्केस जाण्यास मनाई आहे.